लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या महसुली क्षेत्रावर लेखापरीक्षा अहवालामधील महसूल व वन (महसूल) विभाग आणि उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ७.१ व परिच्छेद क्रमांक ७.२) यावरील

चौपन्नावा अहवाल

(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहास
दिनांक जून/जुलै, २०१९ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
जून/जुलै, २०१९

लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या महसुली क्षेत्रावर लेखापरीक्षा अहवालामधील महसूल व वन (महसूल) विभाग आणि उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक ७.१ व परिच्छेद क्रमांक ७.२) यावरील

चौपन्नावा अहवाल

लोकलेखा समिती

२०१७-२०१८

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

* (१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(१०-अ) ॲड. पराग अळवणी, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

** (१२) श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि.स.स.

(१३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(१४) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

(१९) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(२०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

*** (२१) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(२२) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

**** (२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(२३अ) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

***** (२४) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२५) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

******(२६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

निमंत्रित :

*******(२७) श्री. प्रसाद लाड, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (का.)

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM).

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(४) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि. अ.

(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(६) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी.

(७) श्री. रवींद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी.

* **श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर ॲड. पराग अळवणी, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

** **श्री. सुरेश उर्फ बाळू धानोरकर, वि.स.स. यांनी दिनांक २२ मार्च, २०१९ रोजी आपल्या सदस्य पदाचा राजीनामा दिल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.**

*** **श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स. यांची पुन्हा दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

**** **श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

***** **श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे सदर जागा रिक्त झाली.**

****** **श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी निमंत्रित समिती सदस्य म्हणून दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी नामनियुक्ती केली होती. दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्यांची निमंत्रित समिती सदस्यत्वाची नियुक्ती संपुष्टात आली होती. ते विधानपरिषद सदस्य म्हणून पुन्हा निवडून आल्यामुळे मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून रिक्त जागेवर नामनियुक्ती केली.**

******* **श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी दिनांक १ मार्च, २०१९ रोजी 'विशेष निमंत्रित' समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या महसुली क्षेत्रावर लेखापरीक्षा अहवाल यावर विचार करून लोकलेखा समितीचा चोपन्नावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक २३ मे, २०१८, दिनांक १३ जून, २०१८, दिनांक ८ व २९ ऑगस्ट, २०१८ आणि दिनांक ३ ऑक्टोबर, २०१८ रोजी अपर मुख्य सचिव, महसूल व वन (महसूल), उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) विभाग व सचिव, वन विभाग तसेच इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई व महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन, महाराष्ट्र, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरून बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचे देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट 'अ' मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट 'ब' मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक २२ मे, २०१९ रोजीच्या बैठकीत महसूल व वन (महसूल) व उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) विभागासंदर्भात तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन :
मुंबई/नागपूर,
दिनांक २२ मे २०१९.

गोपालदास अग्रवाल,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

अनुक्रमणिका

अनुक्रमांक (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	(पाच)
(१)	**महसूल व वन (महसूल) व उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) विभाग**	१
	(परिच्छेद क्र. ७.१)	
	(परिच्छेद क्र. ७.२)	

महसूल व वन (महसूल) विभाग

१.१ ज्ञापनः

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवाल

परिच्छेद क्रमांक	विषय	स्पष्टीकरण	महालेखापाल यांचे अभिप्राय
७.२.१.३	***महसुलाची थकबाकी*** भूशास्त्र आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर (DGM) यांचेद्वारे सादर केलेल्या माहितीनुसार महसूलाची थकबाकी खाली तक्ता 7.2.1.3 (अ) मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे. तक्ता 7.2.1.3 (अ)		

(रु.लाखात)

वर्ष	थकबाकीची सुरुवातीची शिल्लक		थकबाकीची अखेरची शिल्लक	
	मुख्य	गौण	मुख्य	गौण
2009-10	--	--	120.19	8,352.00
2010-11	120.19	8,352.00	122.19	16,195.11
2011-12	122.18	16,195.11	250.24	16,459.42
2012-13	250.24	16,459.42	1,235.45	16,464.62
2013-14	1,235.45	16,464.62	1,232.34	15,850.23

यावरुन असे निदर्शनास येते की, मागील पाच वर्षात मुख्य खनिजांच्या थकीत रक्कमेत 10.25 पटीने आणि गौण खनिजांच्या थकीत रक्कमेत 1.9 पटीने वाढ झाली. थकीत रक्कमेच्या प्रलंबनाचे टप्पेवार विवरण खालील **तक्ता** 7.2.1.3 **(ब)** मध्ये दर्शविले आहे.

तक्ता 7.2.1.3 **(ब)**

(रु.लाखात)

अ.क्र.	टप्पा जेथे थकित रक्कम प्रलंबित आहे	थकित रक्कम		एकूण थकित रक्कम
		मुख्य	गौण	
1	तहकुबी अंतर्गत वसुली/न्यायालय किंवा शासनाकडे प्रलंबित	0.37	4,381.53	4381.90
2	धंदा बंद होण्याच्या स्थितीतील कंपनी	0.55	1.72	2.27

3	पैसे न भरणाऱ्यांची माहिती/थांगपत्ता नाही	0.66	2.34	3.00
4	महसूल वसुली प्रमाणपत्र (RRCs) वसुलीकरिता दुसऱ्या राज्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना पाठविले होते.	14.72	82.27	96.99
5	RRCs पाठविण्याकरिता राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांना सूचित केले आहे.	1,003.93	254.26	1,258.19
6	RRC प्रकरणांसहित वसुलीची प्रगती	212.11	11,128.11	11,340.22
एकूण		1,232.34	15,850.23	17,082.57

यारुन असे निदर्शनास येते की, गौण खनिजांच्या थकबाकीचा मुख्य भाग एकतर न्यायालयात प्रलंबित आहे (27.64 टक्के) किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रलंबित आहे. (72.33 टक्के). तसेच, मुख्य खनिजांच्या थकबाकीचा मुख्य भाग (99.87 टक्के) जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रलंबित आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडे RRCs च्या स्वरुपात प्रलंबित असलेली रक्कम वसूल करण्याकरिता पुरेसा वाव आहे. उदाहरणार्थ, **चंद्रपूर** मध्ये एका भाडेपट्टेदाराने[2] 2009 पासून चुनखडी वर देय असलेल्या स्वामित्वधनाची अदायगी केली नाही. विभागाने रक्कमेच्या वसूली करता मे, 2013 पर्यंत कोणतीही कारवाई केली नाही व मे,2013 मध्ये रू. 9.87 कोटी रक्कमेचे RRC जारी केले होते. त्यानंतर, रक्कमेच्या वसुलीकरीता दुसरे कोणतेही उपाय करण्यात आले नाही.

मे. मुरली इंडस्ट्रीज लि. यांची उपलब्ध स्थावर व जंगम मालमत्ता अटकावून लिलावाद्वारे वसुलीची कार्यवाही महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १८० ते १८२ मध्ये विशद केलेल्या तरतुदीनुसार उर्वरित रकमेच्या वसुलीकरिता कार्यवाही सुरू आहे. तसेच इनसॉल्व्हन्सी ॲन्ड बँन्क्रप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (इन्सॉल्व्हन्सी रिझोल्युशन प्रोसेस फॉर कॉर्पोरेट पर्सन्स) रेग्युलेशन्स, २०१६ च्या रेग्युलेशन्स ६ अंतर्गत वसूलीची कार्यवाही सुरू आहे.

Following remarks are made:

1. M/s Murali Industries Ltd.

The dues of Rs.9.87 crore was payable from 2009, out of which huge amount of Rs.7.79 crore is yet to be recovered even after lapse of 4 & 1/2 years.

	यवतमाळ जिल्ह्यात दुसऱ्या एका प्रकरणात लिलावातून रेती घाट वाटपाच्या बाबतीत (2013-14) अटींचे पालन न केल्यामुळे रेती घाट प्राप्तकर्त्या[3] कडून रू.91.36 लाख रक्कमेची वसुली देय होती. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी एक वर्षानंतर रेती घाट प्राप्तकर्त्याला नोटीस निर्गमित केली (जानेवारी 2015). त्यानंतर रक्कमेच्या वसुलीकरिता दुसरे कोणतेही उपाय योजण्यात आले नाही. **शासनाने कमीतकमी अशी प्रकरणे, जी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रलंबित आहेत, लवकर निकाली काढण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांना जादा प्रयत्न करावयाच्या सूचना देण्याचा विचार करावा, कारण कालांतराने वसुलीची शक्यता कमी होते.** [2]मुरली इंडस्ट्रीज लिमिटेड, चंद्रपूर [3]श्री.राजू सव्वालाखे, रेतीघाट :मौजे शिरफुली आणि मौजे राहूर, तालुका महागाव, यवतमाळ (2013-14)	जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी लिलावधारक श्री. राजू सव्वालाखे यांचेकडून रक्कम वसूल करण्याकरीता दि.१७/०१/२०१५ रोजी आदेश पारित केले त्याअनुषंगाने दि.२३/०१/२०१६ रोजी तहसील कार्यालय नेर येथे लिलावधारक यांच्या स्थावर मालमत्तेचा लिलाव ठेवण्यात आला. तथापि, लिलावास कोणीही उपस्थित न राहिल्याने लिलाव तहकूब करण्यात आला. तद्नंतर दि.१६/०३/२०१६ व दि.०७/०४/२०१६ रोजी फेरलिलाव घेण्यात आला. तथापि, यावेळीदेखील लिलावास कोणीही उपस्थित राहिले नाही. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या दि.१७/०१/२०१६ रोजीच्या आदेशाविरूध्द लिलावधारक यांनी अपर आयुक्त अमरावती विभाग, अमरावती यांच्याकडे अपील दाखल केले. अपर आयुक्त अमरावती यांनी अपिलार्थीकडून जमा करण्यात आलेली २० टक्के रक्कम रू.७,२६,९३०/- शासनजमा करणे तसेच रू.८४,०९,१३९/-	**2. Shri Raju Sawalakhe**-Sand Ghat allottee of Yavatmal In this case the sand ghat was allotted to Shri Sawalakhe in January 2014 for Rs.1.36 crore and he was asked to credit the amount by 17-2-2014. As he failed to credit the amount, action taken by Collector, Yavatmal for forfeiting the amount deposited by him and recovery of differential amount in terms of Government Resolution of March 2013 was justified. However, the Appellate Authority i.e. Additional Commissioner has cancelled the Collector's order. In this context please intimate whether Government had reviewed the order passed by Additional Commissioner.

		महसूल थकबाकी म्हणून वसूल करण्याचे आदेश रद्द केले. तथापि, अपिलार्थीकडून जमा केलेली २० टक्के रक्कम अपिलार्थीस परत करण्यात आलेली नाही.	

(दिनेश चव्हाण)
अवर सचिव, महसूल व वन विभाग

परिच्छेद क्र.	विषय	स्पष्टीकरण	महालेखापाल यांचे अभिप्राय
७.२.३.१	**गौण खनिज साधनसंपत्तीचे व्यवस्थापन** **अ) रेती व्यतिरिक्त गौण खनिजांची केंद्रीकृत माहिती (data) आणि धोरणाचा अभाव** महाराष्ट्र शासनाकडे गौण खनिजांच्या (रेती शिवाय) परिमाणाची व ठिकाणांची केंद्रीकृत माहिती नाही, परिणामी गौण खनिजांचे व्यवस्थापन, खालील काही प्रकरणांत दर्शविल्याप्रमाणे, प्रभावीपणे सनियंत्रित करता येऊ शकले नाही. अंतिम बैठकीत प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांनी सर्व गौण खनिजांसाठी एक डेटाबेस योग्यरित्या तयार/स्थापित करण्यात येईल व त्यासाठी संचालक, भूशास्त्र व खनिकर्म यांना निर्देश दिले जातील, असे सांगितले.	खनिजांसाठी एक डेटाबेस स्थापित करण्याच्या अनुषंगाने भारतीय खाण ब्यूरो व विप्रो यांच्या मध्ये MOU स्वाक्षरी करण्यात आली आहे त्यात महाराष्ट्रासह इतर १२ राज्यांचा सहभाग आहे.	
	(i) बहुमोल दगड/निमरत्न आमच्या इंटरनेट शोधात (www.mindat.org, www.iRocks.com) असे दिसून आले की तहसील हवेली, जिल्हा पुणे येथील वाघोळी मध्ये कॅवानसाईट (Cavansite), पेन्टॅगोनाईट सारखे दगड/निम-रत्न [१५] उपलब्ध आहेत. विभागाने सूचित केले की त्यांना बहूमोल दगड/निम्न रत्न असण्याबाबत माहिती नाही. यावरून असे निदर्शनास येते की येथे गौण खनिजांच्या पूर्वेक्षणाचा अभाव आहे. अंतिम बैठकीत (नोव्हेंबर २०१५), प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांनी बहुमोल दगड/निम-रत्न उत्खननाच्या बाबींची तपासणी करण्यात येईल आणि संचालक, भूशास्त्र आणि खनिकर्म हे याबाबत तपास	भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण (Geological Survey of India, Pune) यांनी मौजे वाघोली, ता. हवेली, जि. पुणे येथील कॅवानसाईट, पेन्टॅगोनाईट सारखे बहुमोल दगड/निम्न रत्न निदर्शनास आलेले नाही, ह्या प्रकारच्या खनिजाचा आढळ तुरळक प्रमाणात असतो, त्यामुळे या खनिजाचे साठे सिध्द करणे शास्त्रीयदृष्ट्या शक्य नाही असे कळविले आहे. तसेच, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालयाने	Principal secretary (RFD) in exit conference held in November २०१५ stated that matter regarding extraction of the precious/semi-precious stone in Pune district would be examined and investigated by DGM. Whether such exercise has been done, when it was done and the results thereof may be stated to PAC.

	करतील असे सांगितले.	सन २०१५ मध्ये केलेल्या निरीक्षणात सदर भागात अर्धमौल्यवान रत्न असल्याचे निदर्शनास आले नाही.	
	(ii) डोंगर कापणी दरम्यान काढण्यात आलेले दगड विभागाने डोंगर कापणी दरम्यान काढण्यात आलेल्या खनिजांची कुठलीही माहिती जतन करून ठेवली नाही. राज्य पर्यावरण विभागास असेही आढळले की डोंगर कापणीवर कुठल्याही प्रकारचे प्रतिबंध घालण्यात आलेले नाही, असे प्रतिबंध निश्चित करावयास पाहिजे होते. जिल्ह्यांत दगडखाणींचे, गौण खनिजांच्या राखीवांचे कोणतेही निश्चित रेखांकन नाही, खनिज साधनांच्या विवेकपूर्ण उपयोगासाठी योजनाबध्द आराखडा नाही. अंतिम बैठकीत प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांनी विभागाद्वारे जिल्हा स्तरावर दगडखाणी चिन्हांकित करण्यात येईल असे सांगितले. त्यांनी पुढे असेही सांगितले की डोंगरी भागांत खनिकर्मासाठी कोणतेही धोरण नाही, यासाठी योग्य धोरण तयार करण्यात येईल आणि खनिकर्माच्या उद्देश्याने करण्यात येणाऱ्या डोंगरी भागाच्या खोदकामासाठी सीमा निश्चित करण्याबाबत व समन्वेषणाबाबत नियम विनिर्दिष्ट करण्यात येईल.		Reply not furnished. In exit conference Principal Secretary (RFD) stated that there is no policy on mining in hilly areas, suitable policy would be framed and rules would be prescribed for defining and exploring hills for quarrying purposes. Action taken in the matter may be stated to PAC.
	(iii) खाण पट्टा आणि खनिकर्म परवान्याचे मोजमापन जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यास खनिज उत्खनन आणि त्यावर अदा केलेलया स्वामित्वधनाचे तिमाही	शासन पत्र दि.८/०७/२०१३ अन्वये गौण खनिजाच्या उत्खननाचे ETS मशिनद्वारे मोजणी करण्याच्या सूचना	In exit conference Principal Secretary (RFD) stated that provision in the Rule ४६ (३)for annual measurements through ETS machine

	विवरण सादर करण्यात येते. तथापि, जिल्हा खनिकर्म अधिकारी कार्यालयात प्रत्यक्ष उत्खनन केलेल्या परिमाणाचे विवरणात दर्शविलेल्या परिमाणासोबत पडताळणी करण्यासाठी कोणतीही पध्दत नाही. खाणिकेतून उत्खनन केलेल्या खनिजांचे मोजमापन करण्यासाठी जरूरी असलेली उपकरणे जसे इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन्स (ETS) विभागाकडे उपलब्ध नाही. दस्तावेजांत असे मापदंड दिसून येत नाही ज्याद्वारे असे निदर्शित होईल की विभागाने खाणींचे नियमित निरीक्षण केले आहे. अवैध उत्खननाचा तपास लावण्याकरीता खाणींची तपासणी उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार (सप्टेंबर २०१४) करण्यात आली. या निर्देशाप्रमाणे विभागाने रू. ३६.२८ कोटी स्वामित्वधनाची आकारणी केली ज्यात ७५१ प्रकरणांतील शास्ती अंतर्भूत होती. अशाप्रकारे, गौण खनिजासाठी जर असे धोरण आखले गेले ज्यात इतर गोष्टींबरोबर खाणींचे नियमित निरीक्षण, खाण क्षेत्राचे वेळोवेळी मोजमापन आणि स्वामित्वधनाचे निर्धारण यांचा समावेश असेल तर ते महसूलाच्या दृष्टीने हितावह ठरेल. अंतिम बैठकीत प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांनी ETS द्वारे वार्षिक मोजमाप करण्याबाबतची तरतूद नियमात केली जाईल असे सांगितले.	देण्यात आल्या आहेत. तसेच, शासन निर्णय दि.११/०६/२०१५, दि.१३/०६/२०१६ दि.१२/०६/२०१७ अन्वये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्याच्या दृष्टीने गौण खनिजाच्या उत्खनन स्थळांची वेळोवेळी पाहणी करून केलेल्या उत्खननाची मोजणी करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम,२०१३ मधील नियम ४६ मध्ये ETS मशीनद्वारे खाणपट्यातील उत्खननाची वार्षीक मोजणी करण्याची तरतूद करण्याचे प्रस्तावित आहे.	would be incorporate. Same reply repeated now. Action taken to incorporate the above provision in the rules may be stated to PAC.

(दिनेश चव्हाण)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

परिच्छेद क्रमांक	विषय	स्पष्टीकरण	महालेखापाल यांचे अभिप्राय
७.२.३.२	<u>स्वामित्वधनाची कमी वसुली/वसुली न करणे</u> महसूल व वन विभागाने (फेब्रुवारी,2010) बंधारे, रस्ते व इमारती यांच्या बांधकामात भरणा अथवा सपाटीकरण करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या साधारण मातीच्या स्वामित्वधनाच्या दरात सुधारणा करुन हे दर रु.100 प्रति ब्रास वरुन रु.200 प्रति ब्रास वाढविले. • **रायगड** जिल्ह्यातील उप विभागीय कार्यालय अलीबाग, येथे असे आढळले की, कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, कोलाड यांनी (जून 2010) कंत्राटदार मेसर्स एफ.ए. इंटरप्रायजेस, मुंबई यांचेकडून बाळगंगा नदी मध्यम प्रकल्पांचे कामावर रू.6.88 कोटी ऐवजी 3.44 लाख ब्रास वर जुन्या दराने रु.3.44 कोटी स्वामित्वधन वसूल केले. यामुळे रु.3.44 कोटी स्वामित्वधनाची कमी वसुली झाली. याशिवाय, फक्त रु.1 कोटी स्वामित्वधन शासनजमा झाले आणि रु.5.88 कोटी रक्कम प्रलंबित आहे. • **नाशिक** जिल्ह्याच्या निफाड तहसील मध्ये गाव तलावाच्या 22 कामांचे 2010-11 या कालावधीचे रू. 41.26 लाख जुन्या दराने स्वामित्वधन वसूल करण्यात आले आणि ही रक्कम महाराष्ट्र जल संवर्धन महामंडळ औरंगाबाद (MWCC) यांचेकडे ठेवलेली होती. नविन वाढविलेल्या दरानुसार वसुलीयोग्य स्वामित्वधन रू.82.52 लाख होते. महसूल प्राधिकाऱ्यांनी महाराष्ट्र	**रायगड**- स्वामित्वधनाची फरकाची रक्कम अदा करण्याचे कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड यांनी मान्य केले आहे. त्यानुसार त्यांनी अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे यांचेकडे रु.५.८८ कोटी एवढी रक्कमेची मागणी केली आहे. **तहसिलदार निफाड** यांनी फरकाची रक्कम रू. ४१.२६ लाख जमा करणेबाबत कार्यकारी अभियंता लघुसिंचन (जलसंधारण विभाग) विभाग नाशिक यांना तसेच मुख्य लेखा व लेखापरिक्षण अधिकारी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ	Further progress of recovery in respect of cases related to Raigad and Nashik may be intimated to audit.

	जल संवर्धन महामंडळ, औरंगाबाद यांचेकडून योग्य दराने स्वामित्वधन वसुलीसाठी प्रयत्न करावे आणि त्यास कोषागारात जमा करावे.	औरंगाबाद यांना कळविण्यात आले आहे. प्रकरणी पाठपुरावा सुरू असून रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे.	
	• तीन[16] तहसिलींमध्ये (दौंड, कर्जत आणि वसई) 2011-12 ते 2013-14 वर्षासाठी रू.1.45 कोटी स्वामित्वधन कंत्राटदारांकडून निष्पादन करणाऱ्या एजन्सीनी[17] वसूल केल्यानंतरही ते शासन जमा केले नाही. आणि महसूल प्राधिकारी, जे वसुलीसाठी जबाबदार आहेत, त्यांनी याची मागणीही केली नाही. अंतिम बैठकीत प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांनी याबाबतीत शासन निर्णय काढण्यात येईल असे मान्य केले. [16]तहसीलदार दौंड, कर्जत आणि वसई [17]कार्यकारी अभियंता (EE), सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे, कार्यकारी अभियंता (EE), सार्वजनिक बांधकाम विभाग, कोलाड, रायगड आणि कार्यकारी अभियंता (EE), ठाणे.	**तहसिल दौंड-** कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, पुणे यांनी दौंड तालुक्यातील झालेल्या गौण खनिजाचे स्वामित्वधनाची रक्कम रु.६१,०१,०७१/- दि.२४.६.२०११ रोजीच्या धनादेशाद्वारे तहसिलदार दौंड यांचेकडे जमा केली आहे. **तहसिल कर्जत-** कार्यकारी अभियंता रायगड पाटबंधारे विभाग कोलाड यांचेकडून जमीन महसूलाची रक्कम रू १.१९ कोटी वसूल करण्याबाबत तहसिलदार कर्जत यांनी वेळोवेळी पत्रान्वये तसेच नोटीसीद्वारे कळविले होते. तथापि, तहसिलदार कर्जत यांना सदर रकमेची वसूली होणार नाही असे निदर्शनास आल्याने त्यांनी जिल्हाधिकारी रायगड यांना सदर प्रकरणी महसूल वसूली प्रमाणपत्र करून पाठविले. सदर प्रकरणी वसूलीची कार्यवाही सुरू आहे.	In case of three Tahsil offices pointed out in the para, following remarks are made: **Tahsil Daund-** The department stated that amount of Rs.61.01 lakh has been recovered whereas the amount recoverable was Rs. 4.41 lakh. This may please be explained. **Tahsil Karjat-** Further progress of recovery may be intimated.

		तहसिल वसई - कार्यकारी अभियंता, सांर्वजनिक बांधकाम विभाग क्र. १, ठाणे यांनी सन २०११-१२ व २०१३-१४ मधील वसई तालुक्यातील गौण खनिजाची रक्कम दि. २०.३.२०१५ रोजी ५,००,०००/- व रु. ५,४६,६७२/- इतकी रक्कम तहसिल कार्यालय वसई येथे जमा केली आहे.	**Tahsil Vasai-** Further progress of recovery of balance amount of Rs.11.04 lakh may be intimated.

(दिनेश चव्हाण)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

परिच्छेद क्रमांक	विषय	स्पष्टीकरण	महालेखापाल यांचे अभिप्राय
७.२.३.३	<u>शास्ती कमी वसुली/वसुली न करणे</u> महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या नियम 48(7) प्रमाणे अवैधरित्या काढलेल्या अथवा विल्हेवाट लावलेल्या खनिजाच्या बाजार मूल्याच्या तिप्पटीपेक्षा जास्त नसेल इतकी रक्कम शास्ती म्हणून आकारावयास पाहिजे. **कोल्हापूर आणि ठाणे** जिल्ह्यात आम्हाला असे आढळले की, विभागाने निरीक्षणात 1.16 लाख ब्रास माती अवैधरित्या खोदण्याची 46 प्रकरणे शोधली. जिल्हा दर अनुसूचित नमूद असलेल्या खनिजाच्या दरानुसार शास्ती वसूल करावयास पाहिजे होती. तथापि, लेखापरीक्षेस असे आढळले की:- • **ठाण्यात** पाच प्रकरणांत रू.2.08 कोटी स्वामित्वधन आणि रू.6.35 कोटी शास्ती सुध्दा वसूल करण्यात आली नाही.	**ठाणे-** उक्त पाच प्रकरणांची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे:- १) मे. अभिराज ॲग्रो फार्म या कंपनीने मौजे ससूनवघर येथे अनधिकृत उत्खनन केलेबाबत दंडाची वसूली न झाल्याने सदर रकमेचा बोजा ७/१२ व इतर हक्कात बोजा चढविण्यात आला आहे. २) श्री. देवेंद्र गुलाब जोशी यांनी उपविभागीय अधिकारी भिवंडी, यांच्या आदेशाविरूध्द उपजिल्हाधिकारी (अपिले) ठाणे यांचेकडे अपील दाखल केले होते. उपजिल्हाधिकारी (अपिले) ठाणे यांनी उपविभागीय अधिकारी भिवंडी यांचे आदेश रद्द करून फेरतपासणी आदेश दिले. त्याअनुषंगाने मुळ परवान्यांची तपासणी केली असता, १२३ परवान्यांमध्ये खाडाखोड असल्याने २४६ ब्रास मातीचा भराव अनधिकृतरित्या केल्याचे सिध्द झाले. त्याअनुषंगाने रू.३,४४,४००/- आकारण्यात येवून कसूरदार यांचेकडून सदर	**Following remarks are given:** **Thane:** Five cases were pointed out in the para **Case 1 & 4:** Mere recording note of encumbrances in 7/12 would not result in recovery. Reasons for not taking action by treating the case as Arrears of Revenue as provided in section 180 to 182 of Maharashtra Land Revenue Code, 1966 may be stated. **Case 2:** No comments in view of recovery. **Case 3** : The reasons for reducing the amount by SDO may be stated. Copy of SDO's order dated 16-06-2016 may be furnished to audit. Progress made in recovering the amount since June 2016 may also be stated. **Case 5 :** Date of issue of notice may be stated. Date/Stage wise

		रकमेचा भरणा दि.१४/१०/२०१४ रोजी करण्यात आला आहे. ३) मे. इंडिया शिप ॲण्ड गोट ट्रेडिंग कंपनी- तहसिलदार वसई यांनी पारीत केलेल्या आदेशाच्या विरूध्द संबंधित कंपनीने उपविभागीय अधिकारी, वसई यांचेकडे अपील दाखल केले. उपविभागीय अधिकारी, वसई यांनी दि.१६/०६/२०१६ रोजी सदर अर्ज अंशत: मान्य केला व तहसिलदार, वसई यांचे आदेश रद्द करून संबंधितांकडून रू.२४,४८,०००/- रक्कम वसूलीचे आदेश पारित केले. ४) मो. हाजी आदम- तहसिलदार, वसई यांनी श्री.आदम यांना माती व दगडाचा अनधिकृतरित्या भराव केल्यामुळे रू.१,४०,६१,१३८/- एवढा दंड आकारला त्याअनुषंगाने कसूरदार यांचे ७/१२ वर उक्त रक्कमेचा बोजा चढविण्यात आला आहे. ५) श्री. श्रीकांत पाटील- संबंधितांना नोटीस बजावण्यात आली असून वसुलीची कार्यवाही सुरू आहे.	progress made thereafter may also be stated.
	• **कोल्हापूरमध्ये** स्वामित्वधन वसूल करण्यात आले परंतु वसुलीयोग्य रू.58.59 लाख शास्ती ऐवजी रू.13.99 लाख शास्ती आकारून वसूल करण्यात आली. परिणामी, रू.44.60 लाख शास्तीची कमी वसुली झाली. अंतिम बैठकीत प्रधान सचिव, महसूल व	सन २०११ -१२ मध्ये **कोल्हापूर जिल्ह्यातील** मौजे कोथळी, मौजे उदगांव व मौजे चिंचवाड येथील ४१ व्यक्तींनी मंजूर परिमाणापेक्षा जादा उत्खनन केल्यामुळे त्यांचेवर नियमानुसार एकूण १२२१० ब्रास उत्खननाकरीता स्थानिक बाजारमुल्याच्या एक पट दंडाची रक्कम रू.१४,०२,२७५/- स्वामित्वधनाची रक्कम रू.९,७६,८००/- व भूपृष्ठ भाडे रक्कम रू.४१००/- अशी एकूण रक्कम	Cases related to Kolhapur district: Reasons for levy of penalty at the market value and the authority for it may be stated/ furnished to audit.

	वन विभाग यांनी सर्व प्रकरणे तपासण्यात येतील असे सांगितले. बाजार मुल्यावर शास्ती आकारण्यासंदर्भात खनिजांचे बाजार मूल्य ठरविण्यासाठी मार्गदर्शक सूचना जारी करण्याची वैध शक्यता शासनाद्वारे तपासण्यात येईल असे नमूद करण्यात आले.	रू.२३,८५,१७५/- वसूल करून शासनजमा करणेत आलेली आहे. शासन अधिसूचना दि.१५/४/२०१७ अन्वये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्याकरीता गौण खनिजाच्या बाजार मुल्याच्या पाचपटीपर्यंत शास्तीची रक्कम आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतुदीनुसार शास्ती आकारण्याची कारवाई करताना एकाच प्रकारच्या अनियमिततेच्या प्रकरणांत वेगवेगळी शास्तीची रक्कम आकारली जाणार नाही. तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांना भेदभाव करण्यास वाव राहू नये याकरीता शासन परिपत्रक दि.१४/०६/२०१७ रोजी गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत शास्तीची कारवाई करण्यासंबंधी दिशादर्शक निर्देश देण्यासंबंधीच्या सूचना देण्यात आल्या आहेत.	

(दिनेश चव्हाण)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

परिच्छेद क्र.	विषय	स्पष्टीकरण	महालेखापाल यांचे अभिप्राय
७.२.३.४	**भूई भाडे आणि प्रतिपूर्ती अथवा कब्जे हक्क किंमत** महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार (जुलै १९९९/मे २००६) जेव्हा शासकीय जमीन भाडेपट्यावर देण्यात येते त्या परीस्थितीत भुईभाडे (Lease Rent) स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मूळ सावकारी दराने (prime lending rate) जमीन वाटपाच्या आदेशाच्या तारखेवर लागू असलेल्या वार्षीक दर अनुसूची अनूसार जमीनीच्या बाजारमूल्यावर आकारावयास पाहिजे. वर्ष २०१४ साठी मूळ सावकारी दर (SBI) १० टक्के होते. आमच्या असे निदर्शनास आले की चाचणी तपासणी केलेल्या नऊ जिल्ह्यांपैकी चार[१८] मध्ये २८ गौण खनिज भाडेपट्टयांवर आणि १३ मुख्य खनिज भाडेपट्यांवर शासकीय जमीन देण्यात आली होती. खनिकर्म प्रक्रियेसाठी भाडेपट्टयांवर देण्यात आलेल्या शासकीय जमिनीवर संबंधित जिल्हाधिकाऱ्याने कॅलेंडर वर्ष २०१४ चे रू. १२.९० कोटी	शासन निर्णय महसूल व वन विभाग दि.८/०७/१९९९ व दि.२९/०५/२००६ अन्वये शासकीय जमीनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर कब्जेहक्काच्या रकमेवर आकारावयाच्या व्याजाच्या दराबाबत व भाडेपट्टयाने द्यावयाच्या जमिनीच्या वार्षीक भाडेपट्याच्या दर स्टेट बँकेच्या "प्राईम लेंडींग रेंट" इतका असावा अशी तरतूद करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने दरवर्षी स्टेट बँकेच्या प्राईम लेंडींग रेट प्रमाणे भुईभाडे आकारण्यात येते. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील तरतुदीनुसार गौण खनिजाचे खाणपट्टे मंजूर करण्यात येते. सदर नियमात खनिपट्टा धारकाकडून शासनाने निर्धारीत केलेल्या दराने स्वामित्वधन किंवा ठोकबंद भाडे, भूपृष्ठ भाडे व अकृषीक निर्धारणाइतका उपकर वसूल करण्याची तरतूद आहे. खनिपट्टयांसाठी दिलेल्या जमिनीपोटी नियमांतील तरतुदीनुसार देय रकमा वसूल केल्या जातात. खनिपट्टयासाठी दिलेल्या जमिनीवर या	Reply is not acceptable as R&FD, GR (July 1999) provides levy of lease rent on allotment of government land on lease bases. In case if lease rent is not leviable on government land allotted on lease for extraction of minor minerals then Department may issue specific orders in this regard.

	भूईभाडे आकारले नव्हते. अंतिम बैठकीत प्रधान सचिव महसूल व वन विभाग यांनी खनिकर्म प्रक्रियेसाठी देण्यात आलेल्या शासकीय जमिनीवर भुईभाडे आकारावयासाठी शासन निर्णयाची (जुलै १९९९) प्रयोज्यता तपासण्यात येईल, असे सांगितले. १८- रायगड, चंद्रपूर, यवतमाळ आणि नागपूर	व्यतिरीक्त भुईभाडे आकारता येणार नाही: कारण सदर जमिनी उत्खननासाठी दिल्या जातात.	

(दिनेश चव्हाण)
अवर सचिव, महसूल व वन विभाग

परिच्छेद क्र.	विषय	स्पष्टीकरण	महालेखापाल यांचे अभिप्राय
७.२.३.५	**शिखर स्तरावर माहितीचा अभाव** महसूल व वन विभागातर्फे रेती घाटांची एकूण संख्या महसूल व वन विभागाकडे उपलब्ध नव्हती हे सूचित करण्यात आले की माहिती संचालक, भूशास्त्र आणि खनिकर्म यांचेकडून मागविण्यात येईल व लेखापरिक्षेस सादर करण्यात येईल. **अ) रेती घाटांची माहिती आणि लिलाव** लेखापरीक्षेने संकलित केलेली नऊ जिल्ह्याच्या[१९] रेती घाटांच्या माहिती ची आणि लिलावांची स्थिती **तक्ता ७.२.३.५ (अ)** मध्ये दर्शविली आहे.		Reply not furnished.

वर्ष	चिन्हांकित करून ठेवण्यात आलेल्या रेती घाटांची एकूण संख्या	लिलाव झालेल्या रेती घाटांची संख्या	निकाली काढण्यात न आलेल्या रेती घाटांची संख्या
२०१०-११	७९७	४८५	३१२
२०११-१२	१,२९६	५७०	७२६
२०१२-१३	५०३	२५१	२५२
२०१३-१४	५००	१९२	३०८
एकूण	३,०९६	१,४९८	१५९८

(स्त्रोत: जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्याने दिलेली माहिती)

वरील माहितीवरून असे दिसून येते की २०१०-१४ दरम्यान ३,०९६ रेती घाट लिलावासाठी चिन्हांकित करून ठेवण्यात आले होते जे विभागीय स्तरावर प्रशंसनीय आहे. २०१२-१३ आणि २०१३-१४ मध्ये रेती घाटांच्या संख्येत घट एक किलोमिटर अंतरामधील जवळ-जवळ असणाऱ्या घाटांचा एकत्रीकरण करून एकच घाट तयार केल्यामुळे झाली आहे.

ब) रेती घाटांचे लिलाव न होणे.

तक्ता ७.२.३.५ (अ) वरून असे दिसन येते की, ५२ टक्के रेती घाटांची | | Reply not furnished. |

	निर्गती करण्यात आली नाही. या घाटांची निश्चित केलेली धारणा किंमत रू.९९४.९० कोटी होती. एवढ्या मोठ्या प्रमाणात घाटांचा लिलाव न केल्यामुळे राज्य महसूलावर प्रतिकूल प्रभाव पडत आहे. विभागाने घाटांच्या लिलावाच्या पध्दतीचा आढावा घेऊन अशी पध्दती अंमलात आणावयास पाहिजे ज्यात जास्तीत जास्त घाटांचा लिलाव संभव होऊ शकेल. याशिवाय, लेखापरीक्षेस असेही आढळले की, बरेच रेती घाट लिलावासाठी चिन्हांकित करून ठेवण्यात आले होते. परंतु खालील परिच्छेदांत दर्शविल्याप्रमाणे त्यांचा लिलाव होऊ शकला नाही. **क) लिलावासाठी पर्यावरण मंजुरी** रेती घाट निर्गती विषयीच्या १२ मार्च २०१३ च्या शासन निर्णयाप्रमाणे रेती घाटाचे सर्वेक्षण आणि त्यांना चिन्हांकित करून ठेवणे १५ ऑक्टोबर पर्यंत पूर्ण व्हावयास पाहिजे. त्यानंतरी पर्यावरण मंजुरी प्राप्त करावयास पाहिजे, ज्यासाठी धोरणांतर्गत कोणतीही कालमर्यादा निश्चित केलेली नाही. • कोल्हापूर आणि नागपूर जिल्ह्यात २०१२-१४ दरम्यान १२२[२०] रेती घाटांचे लिलाव होऊ शकले नाही. कारण रेतीची आणि पाण्याची खोली, सक्शन पंप वापरण्याची मंजुरी, गट क्षेत्र आणि समूहातील अंतर आणि पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन मधील तफावती, जिल्हाधिकाऱ्याद्वारे पर्यावरण विभागास सादर केलेला सर्वेक्षण अहवाल असे आवश्यक तपशील सादर न केल्यामुळे पर्यावरण मंजुरी वेळेत मिळाली नाही. याखेरीज, नागपूर च्या १६ प्रकरणांमध्ये पर्यावरण विभागाने या प्रक्रियेत आणखी तीन महीने विलंब केला. परिणामी,१२२ रेती घाटांतून रु. २४.८८ कोटी [२१] महसूल वसूल होऊ शकला नाही. • राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाने गाळ उपसणी [२२] संबंधात पर्यावरण आघात निर्धारण (Environment Impact Assessment-EIA) करावयास पाहिजे आणि त्यावरील अहवाल रेती घाटांच्या लिलावाकरिता जिल्हाधिकाऱ्यास द्यावयास पाहिजे. ठाणे जिल्ह्यात ११ रेती घाटांपैकी नऊ रेती घाटांत गाळ उपसणी द्वारे रेती उत्खनन करण्याचे ठरले होते (फेब्रुवारी २०१३). पर्यावरण आघात निर्धारणाचे काम एका खाजगी संस्थेला, "फाईन एन्वायरोटेक इंजीनिअर्स (गाळ उपसणीचे	**नागपूर**-नागपूर जिल्ह्यातील साहोली -अ-१ आणि अ-२ या वाळूगटाचे लिलाव अनुक्रमे रू.१,०९,३९,३३७/- व रू.६६,६६,०००/- अशा एकूण रू. १,७६,०५,३३७/- इतक्या सर्वोच्च बोलीस मंजूर करण्यात आले होते. सदर रेतीघाटापर्यंत जाणारा रस्ता झुडपी जंगलातून जात असल्याने वन परिक्षेत्र अधिकारी पारशिवणी यांनी वाळू वाहतूकीसाठी बंद केला होता. त्यामुळे तहसिलदार पारशिवनी यांनी दि. २४ जानेवारी २०१३ रोजी सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्याच्या उपस्थितीत स्थळ निरीक्षण व पंचनामा करून स.क्र.५ हा खाजगी मालकीचा असून त्या जमीन मालकाने तात्पुरता रस्ता रेती घाटाकरीता देण्यास संमती होती. परंतु वनपरिक्षेत्र अधिकारी	Reply not furnished. The contention of the department is not acceptable as in the order passed (February 2014) by Revenue Minister in the matter it was mentioned that providing alternate road for sand extraction was possible. However, it could not be made available. As a result, sand extraction was not

	अधिकृत पर्यावरण संमंत्रक)" एप्रिल २०१३ मध्ये देण्यात आले. परंतु या संस्थेने आज पर्यंत (जून २०१५) अहवाल सादर केला नाही आणि घाटांचा लिलाव होऊ शकला नाही. या रेती घाटांतील २०१२-१४ कालावधीचा रू. ७२.२५ कोटी संभाव्य महसूल प्राप्त होऊ शकला नाही. अंतिम बैठकीत प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांनी ही प्रकरणे पडताळण्यात येतील असे सांगितले. पुढे असेही सांगण्यात आले की राष्ट्रीय हरीत न्यायाधिरणाद्वारे जून २०१४ मध्ये पारित निर्णयाच्या अनुषंगाने गाळ उपसणी आणि पर्यावरण ही बाब महाराष्ट्र सागरी मंडळाकडे सूपूर्द केली आहे आणि रेती लिलावाच्या प्रक्रियेचे पर्यवेक्षण जिल्हाधिकारी करतील. कोल्हापूर व नागपूर बाबत असे नमूद करण्यात आले की रेती घाटाच्या लिलावापूर्वी पर्यावरण मंजुरी प्राप्त करण्याबाबतची अट राज्यात पहिल्यांदाच घातल्यामुळे, या दोन जिल्ह्यांत ती वेळेत पूर्ण होऊ शकली नाही. परंतु पुढील वर्षात पर्यावरण मंजुरी वेळेत प्राप्त करण्यात आली. **ड) मूलभूत सुविधांचा अभाव** "रेती धोरणा"बाबत महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार (ऑक्टोबर २०१०) जिल्हाधिकाऱ्याने रेती घाट चिन्हांकित करून ठेवते वेळी रेती घाटासाठी पोच रस्ते उपलब्ध आहेत याबावत खात्री करावयास पाहिजे. • नागपूर येथील दोन रेतीघाटांचे[२३] २०१२-१३ मध्ये रू. १.७६ कोटीत लिलाव करण्यात आले होते. परंतु भाडेपट्टेदाराने सूचित केले की रेती वाहतूकीसाठी प्रस्तावित मूळ रस्ता राखीव वनातून (जेथून जाण्यावर बंदी आहे, जात असल्यामुळे रेतीचे उत्खनन करण्यात येऊ शकले नाही. दस्तावेजांनुसार जरी दुसरा रस्ता खाजगी व्यक्तिद्वारे देऊ करण्यात आला होता, तरी तो भाडेपट्टेदारास रेतीच्या उत्खननाकरीता उपलब्ध करण्यात आला नव्हता. परिणामी, शासन स्वामित्वधनावरील रू. १.७६ कोटी महसूल प्राप्त करू शकले नाही. अंतिम बैठकीत प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे योग्य कारवाईसाठी ही बाब मांडण्यात येईल असे सांगितले. • नाशिक येथे २०११-१२ मध्ये रू. ९६.७९ लाख रक्कमेवर लिलाव	पारशिवनी यांनी सदर रेती घाटापर्यंत जाणारा रस्ता हा झुडपी जंगलातून जात असल्याने सदर रस्ता रेती घाटासाठी बंद केला. उपलब्ध रस्ता हा संरक्षित वनक्षेत्रातून जात असल्यामुळे निश्चितच वन कायदा भंग होण्याची शक्यता होती. वाळू वाहतूकीसाठी रस्ता उपलब्ध होत नसल्याने संबंधीत लिलावधारकाने लिलावाची रक्कम शासनजमा केली नसल्याने लिलावधारकास वाळू उत्खननास परवानगी देता आली नाही. वन कायदा अंतर्गत रेतीघाट बंद ठेवण्याशिवाय पर्याय नव्हता. वाळू वाहतुकीसाठी रस्ता उपलब्ध होवू न शकल्याने सदर रेतीघाटांतून रेतीचे उत्खननन झाले नाही. **नाशिक**-नाशिक जिल्ह्यात सन २०११-१२ मध्ये वाळूलिलावाची मुदत दि.३१/०७/२०१२ पर्यंत होती. पाच रेतीघाटांपैकी २ रेतीघाटांमध्ये मे व जून २०१२ मध्ये वाळू लिलावाची रक्कम जप्त करण्यात येऊन संबंधितांना काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. तसेच लिलावात न गेलेल्या वाळूगटांकरीता २५ टक्के अपसेट प्राईज कमी करून दि.९/१/२०१२ रोजी फेरलिलाव आयोजीत करण्यात आला होता. तथापि सदर फेरलिलावास प्रतिसाद न मिळाल्याने त्यावेळी उपस्थित असलेल्या जिल्ह्यातील सर्व तहसिलदार व वाळू लिलावधारक यांना पुन्हा लिलाव	done and Government could not earn the revenue. Department stated that all the five bidders have been blacklisted. The re-auction was conducted in two sand ghats but no response was received. Reasons for not re-auctioning the remaining three sand ghats were not furnished.

	करण्यात आलेल्या पाच रेती घाटांचे लिलाव बोलीदाराने बोली रक्कम जमा न केल्यामुळे रद्द करण्यात आले. रेती घाटांचे पुन:लिलाव करण्यात आले नव्हते. त्यामुळे अनुज्ञप्तिधारकाद्वारे आधीच भुगतान करण्यात आलेल्या रू. २१.९२ लाख समायोजित केल्यानंतर रू. ७६.८० लाख चे महसूल उत्पन्न होऊ शकले नाही. उत्तरादाखल जिल्हा खनिकर्म अधिकारी, नाशिक यांनी नमुद केले (मे २०१५) की हे बोलीदार काळया यादीत घालण्यात आले. तथापि, रेती घाटांचा पुन:लिलाव का करण्यात आला नाही, याबाबत कोणतेही कारण देण्यात आले नाही. अंतिम बैठकीत प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांनी प्रकरणांची तपासणी करण्याचे आणि आवश्यकतेनुसार योगय कारवाई करण्याचे मान्य केले. १९- चंद्रपूर, कोल्हापूर, नागपूर, नाशिक, पुणे, रायगड, सातारा, ठाणे आणि यवतमाळ २०-कोल्हापूर: १०६ रेती घाट आणि नागपूर: १६ रेती घाट २१- कोल्हापूर: रू.१५.७५ कोटी (१०६ घाटांची धारणा किंमत) आणि नागपूर : रू.९.१३ कोटी (१६ घाटांची धारणा किंमत) २२- गाळ उपसणी म्हणजे पात्रातून सुलभतेने वाहतूक होण्यासाठी रेती अथवा गाळाचे यांत्रिक उत्खनन २३- साहोळी A१ आणि A२ तालुका- पारशिवणी, नागपूर २४- [(रू.९६.७९ लाख-बोलीदाराने जमा केलेली रू. २१.९२ लाख रक्कम) + पर्यावरण उपकर : रू.१.९३ लाख]	घेण्याकामी विचारणा केली असता वाळू लिलावास प्रतिसाद नसल्याने वाळू लिलाव करण्यात येवू नये असे मत दिल्याने पुढील लिलावाची प्रक्रिया बंद केलेली आहे. उर्वरीत तिन प्रकरणांमध्ये लिलाववर्ष संपल्यानंतर म्हणजे दि.३१/०७/२०१२ नंतर त्या ठेकेदाराच्या लिलावाच्या रक्कमा जप्त करून त्यांना काळया यादीत टाकण्याचे आदेश दि.३/०८/२०१२ रोजी निर्गमित करण्यात आल्याने उक्त तीन प्रकरणांमध्ये फेरलिलाव करण्यात आले नाहीत.	

(दिनेश चव्हाण)
अवर सचिव, महसूल व वन विभाग

परिच्छेद क्र.	विषय	स्पष्टीकरण	महालेखापाल यांचे अभिप्राय
७.२.३.६	**रेती घाटाचे वाटप झाल्यानंतर प्रत्यक्ष उत्खनन केलेल्या रेतीचे प्रमाण ठरविण्यासाठी पध्दतीचा अभाव-** रेती निर्गतीविषयी असलेल्या शासन निर्णयाप्रमाणे भूजल सर्वेक्षण आणि विकास अभिकरण (GSDA), जिल्हा खनिकर्म अधिकारी आणि संबंधित तहसीलदार यांनी रेतीचे प्रमाण आणि घाटाच्या जवळपासच्या भागातील जल स्तरावर त्याचा परिणाम या बाबत संयुक्त सर्वेक्षण करावयास पाहिजे. या धोरणात रेती घाटाच्या वाटपाच्या वेळी वाळूच्या उपलब्ध परिमाणाबाबत उल्लेख आहे, परंतु त्यात वाटप केल्यानंतर रेतीच्या उत्खननावर नियंत्रण ठेवण्याबाबत काही ही उल्लेख नाही. या उणीवेमुळे खालील परिच्छेदांत दर्शविल्याप्रमाणे अवैध उत्खनन झाले होते. • तीन[25] जिल्ह्यांकरीता 37 प्रकरणात रेती घाट प्राप्तकर्त्याने रेतीचे अतिरिक्त वहन केल्याबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालयाने डिसेंबर, 2011 ते जुलै,2014 दरम्यान सूचित केले होते. या प्राप्तकर्त्यांवर जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या ट्रांझिट पासपेक्षा अधिक प्रमाण ट्रकमध्ये वाहून नेल्यामुळे शास्ती आकारण्यात आली होती. त्यांनी दिलेल्या रेती घाटातून अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त उत्खनन करण्याची अथवा इतर रेती घाटांवर अतिक्रमण करण्याबाबतची शक्यता नाकारता येत नाही. • नागपूर जिल्ह्यातील दोन प्रकरणांत तहसीलदार	लिलावाकरीता वाळूगटाची निश्चिती व उपलब्ध वाळूसाठा याचे परिमाण ठरविण्याबाबत शासनाने वाळू/ रेती निर्गती धोरण विहीत करण्यात येत असून त्यामध्ये सविस्तर तरतूदी प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. वाळूगटांवर व्हिडीओ सनियंत्रण यंत्र बसविण्याबाबत नमूद करण्यात येते की, शासन निर्णय दि.२६/१२/२०१४ अन्वये वाळू/रेती यांचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्याकरीता SMATS (Sand Mining Approval and	**Following remarks are made:** • Whether Sand Mining Approval & Tracking System (SMATS) has been implemented in the entire State? • Whether it has been ascertained that the SMATS is effective in detecting illegal/excess excavation of minor minerals. • Number of cases of illegal/excess excavation of minor Minerals through SMATS may be intimated. Government of India, Ministry of Environment, Forecast and Climate Change vide its notification dated 15-01-2016 had prescribed procedure for monitoring sand mining or river bed mining in Appendix-XII (ref para 10(iv). In this connection kindly state: • Whether the security features of Transport permit was implemented. • Whether the routes of vehicles from source to destination are being tracked through GPS. • In respect of large size plots (more than 5 hectare), Kindly state. ➢ How many lease sites were sanctioned wherein plot size is more than 5 hectares. ➢ In how many of above sites CCTV camera, PC, Internet connection, power back-up etc has been provided.

	सावनेरने संयुक्त निरीक्षणात (जानेवारी, 2012) ज्यांना रेती घाट वाटप केले आहे, त्यांच्याद्वारे अतिरिक्त परिमाणाचे उत्खनन केल्याचे निदर्शनास आणले आणि त्यांच्यावर उल्लंघन केल्यामुळे शास्ती आकारण्यात आली व त्यांना वसुलीबाबत नोटिस पाठविण्यात आली. अशाप्रकारे, वरील प्रकरणांवरुन असे निदर्शित होते की, रेतीचे अवैध उत्खनन रोखण्यासाठी वेळोवेळी मोजमापन होण्याची आवश्यकता आहे आणि शासनाने रेती घाटांचे नियतकालिक मोजमापन करण्यासाठी शास्त्रोक्त पध्दती आखण्याचा विचार करावा. अंतिम बैठकीत प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांनी सांगितले की, सुरुवातीलाच रेती घाटातील रेतीचे प्रमाण जाणून घेण्याची पध्दती शास्त्रोक्त नाही कारण यात बाह्य रेषांवर जमणारी रेती विचारात घेण्यात येऊ शकत नाही म्हणूनच शासन रेती घाटांचे मोजमापन हस्तांतरण करतेवेळी शास्त्रोक्त पध्दतीने करण्याबाबत प्रस्ताव मांडत आहे आणि रेती घाटांवर विडिओ संनिरीक्षण यंत्र बसविण्याचे प्रस्तावित करीत आहे, त्यामुळे रेतीच्या अतिरिक्त/अवैध उत्खननाच्या बाबीचेही निरसन होईल. [25] चंद्रपूर, नागपूर आणि यवतमाळ	Tracking System) प्रणाली लागू करण्यात आली आहे. तसेच उक्त प्रणालीबरोबरच अतिरिक्त उपाययोजना करण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना मुभा देण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाची अधिसूचना दि.१५/०१/२०१६ मधील परिशिष्ट १२ मध्ये ५ हेक्टरवरील वाळूगटांवर सीसीटीव्ही कॅमेरा बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने, शासन पत्र दि.२४/०२/२०१६ व २२/०३/२०१६ अन्वये सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी यांना कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.	

(दिनेश चव्हाण)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

परिच्छेद क्रमांक	विषय	स्पष्टीकरण	महालेखापाल यांचे अभिप्राय
७.२.३.७	**महसूल विभाग, प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि पोलीस यांच्यात समन्वयाचा अभाव – खनिजांच्या अवैध वाहतूकीची प्रकरणे** महसूल व वन विभागाने दिलेल्या आदेशानुसार (जून,2002) एखादी व्यक्ति जर अवैध वाहतूक कामात गुंतलेली असेल तर त्याविरुध्द FIR नोंदविली जाऊ शकते, ट्रक चालकाचे लायसेन्स रद्द केल्या जाऊ शकते व वाहनांवर सहा महिन्यांसाठी वाहतूक करण्यास बंदी घालण्यात येऊ शकते आणि बाजार मुल्याच्या तिप्पट अथवा रु.3000/- प्रति ब्रास शास्ती अशा प्रकारे अवैधरित्या वाहून नेलेल्या खनिजावर आकारण्यात येऊ शकते. महसूल व वन विभागाने अवैध उत्खनन आणि रेतीची वाहतूक याविरुध्द कडक कारवाई करण्याच्या आणि अशा प्रकारच्या घटना प्रादेशिक परिवहन विभाग, पोलिस आणि महसूल विभाग यांनी एकमेकास सूचित करण्याच्या सूचना दिल्या. (फेब्रुवारी,2011). ऑक्टोबर, 2010 आणि मार्च, 2013 मध्ये निर्गमित करण्यात आलेल्या रेती धोरणाच्या खंड C 28 मध्ये विर्निदिष्ट केले आहे की, एखादे खनिज वाहतूक करणारे वाहन जर अनुज्ञात परिमाणापेक्षा जास्त परिमाण वहन करीत असेल तर त्या संपूर्ण परिमाणास अवैध समजण्यात यावे. नऊ जिल्ह्यात[26] संबंधित प्रादेशिक परिवहन विभागांकडून अतिरिक्त भार लादून खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांची माहिती, जेथे उपलब्ध/पूर्ण होती, गोळा करण्यात आली. त्या माहितीची जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माहितीशी उलट तपासणी करण्यात आली आणि RTO/पोलीसांनी जिल्हाधिकाऱ्यांस सूचित केलेली अवेध उत्खनन/वाहतूकीची प्रकरणे पडताळण्यात आली. आम्हाला असे आढळले की तेथे एक तर समन्वयनाचा अभाव होता अथवा गौण खनिजांची अवैध वाहतूक	गौण खनिजाचे अवैध उत्खनन/वाहतूकीस प्रभावी आळा घालणे तसेच सर्व संबंधित विभागाचा परिणामकारक समन्वय साधून त्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने शासन निर्णय दि.५ डिसेंबर, २०१५ अन्वये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा पोलीस अधीक्षक/पोलीस आयुक्त, प्रादेशिक परिवहन अधिकारी व जिल्हा खनिकर्म अधिकारी यांची समिती गठीत करण्यात आलेली आहे. तसेच शासन परिपत्रक, दि.१४ जून,२०१७ अन्वये सदर समितीची बैठक स्थानिक पातळीवर गौण खनिजाची चोरी रोखण्यासाठी नेमण्यात आलेल्या भरारी पथकांमध्ये महसूल/पोलीस व परिवहन या तिन्ही विभागातील कर्मचाऱ्यांचा समावेश करण्याच्या सूचना	1. As envisaged in GR dated 05-12-2015, whether Committee under the Chairmanship of Collector is formed in every district? 2. The details of meetings conducted along with minutes of meetings may be furnished to PAC. 3. Department did not furnish reply on the observations pointed out by audit

	रोखण्यासाठी/प्रतिबंधित करण्यासाठी या तीन विभागात समन्वयन नव्हते. यामुळे राज्यातील महसूल वसुलीची हानि झाली. खालील परिच्छेदात अशी काही प्रकरणे मांडली आहेत. • जास्त भार लादण्याची प्रकरणे जिल्हाधिकाऱ्यास सूचित करण्याची पध्दती :- आम्हाला असे निदर्शनास आले की, सात[27] जिल्ह्यात RTO द्वारे नोंदविलेली 157 प्रकरणे संबंधित जिल्हाधिकाऱ्यास सूचितच करण्यात आली नव्हती. या प्रकरणातील संपूर्ण 758.50 ब्रास खनिजाचे प्रमाण ऑक्टोबर 2010 आणि मार्च 2013 च्या रेती धोरणांच्या परिच्छेद क्र. C 28 प्रमाणे अवैध खनिकर्म म्हणून घोषित करावयास पाहिजे होते. परंतु, ही प्रकरणे जिल्हाधिकाऱ्यास सूचित करण्यात आली नसल्यामुळे त्यांच्याद्वारे स्वामित्वधन आणि शास्ती आकारण्यासाठी कारवाई करण्यात येऊ शकली नाही. अशाप्रकारे, RTO आणि जिल्हाधिकारी यांच्यातील समन्वयाच्या अभावापायी रु.24.27 लाख शास्तीची आकारणी झाली नाही. • अतिरिक्त भार वाहतूकीची प्रकरणे RTO ला सूचित करण्याची पध्दती:- चंद्रपूर खनिज वाहून नेणाऱ्या अवैध वाहतूक करणाऱ्या 10 ट्रकांवर महसूल प्राधिकाऱ्यांनी शास्ती आकारली होती. परंतु ही प्रकरणे अतिरिक्त भार लादल्यामुळे कारवाई करण्यासाठी RTO ला सूचित करण्यात आली नव्हती. यवतमाळ जिल्ह्यात अतिरिक्त भार लादण्याची प्रकरणे जिल्हाधिकाऱ्यास सूचित करण्याची त्या जादाभारित वाहनांवर शास्ती आकारण्याची पध्दती अवलंबण्यात येत आहे. रायगड येथील RTO द्वारे जिल्हाधिकाऱ्यास कोणतेही प्रकरण सूचित करण्याबाबत दस्ताऐवजांत उल्लेख नाही. RTO रायगड ने खनिकर्म कामांतील जादाभारित वाहनांबाबत कुठलीही माहिती दिली नाही, त्यामुळे आकारणीयोग्य शास्तीचा अंदाज बांधता आला नाही. • RTO/पोलीसांद्वारे माहिती न देणे :- चार महसूल प्राधिकाऱ्यांनी [28] 114 ट्रक ट्रांझिट पास शिवाय अथवा ट्रांझिट पासपेक्षा जादा गौण खनिज वाहून नेत असण्याच्या प्रकरणांचा तपास लावला. तथापि,	दे यात आल्या आहेत.	

	ट्रक पळून जाण्यात सफल झाले. परंतु या ट्रकांच्या नोंदणी क्रमांकाची घेऊन ती संबंधित RTO ला त्या रेती वाहून नेणाऱ्या वाहन मालकांची नावे आणि पत्ते काढण्यासाठी पाठविण्यात आली. परंतु, RTO ने संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास माहिती पाठविली नाही. याशिवाय, असेही आढळले की, जिल्हाधिकाऱ्यांनी RTO ला प्रकरणे कळविल्यानंतर परत त्याबाबतीत माहिती मिळविण्यासाठी त्याचा पाठपुरावा केला नाही. नाशिकमध्ये एका प्रकरणात पोलीस विभागाने 4.41 ब्रास जादा भर रेती वाहून नेण्याचे प्रकरण मोटर वाहन अधिनियमानुसार शास्ती आकारण्यासाठी RTO ला कळविले (जानेवारी 2011) RTO, नाशिकने पोलीस विभागास स्वामित्वधन आणि शास्ती वसूल करण्यासाठी महसूल प्राधिकाऱ्यांसोबत महसूल प्राधिकाऱ्यांस ही बाब कळविली नाही आणि म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारे कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. • एका सामाजिक कार्यकर्त्याने अवैधपणे रेती उत्खनन करुन करुन वाहून नेणाऱ्या 1,033 ट्रकांची सूची जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिली. ही सूची RTO ठाणे, नवी मुंबई आणि वसई येथे मार्च, 2013 मध्ये ट्रक मालकांची नावे आणि पत्ते माहिती करण्यासाठी पाठविण्यात आली. यापैकी RTO ठाणे ने फक्त 318 ट्रक मालकांचे तपशील दिले. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी जून 2013 मध्ये ट्रक मालकांना "कारणे दाखवा" नोटीस पाठविल्या. पुढे केलेली कारवाई कळविण्यात आली नाही. तथापि, उरलेल्या दोन RTO ने मागविलेली माहिती कळविली नाही आणि जिल्हाधिकाऱ्यांनी त्याचा पाठपुरावाही केला नाही. • पोलीस विभागाने 24 ट्रकांद्वारे रेतीच्या अवैध वाहतूकीबाबत तहसीलदार हवेली, पुणे यांना कळविले (ऑगस्ट,2013) त्यानंतरही तहसीलदाराद्वारे कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. हे निदर्शनास आणल्यावर (जुलै,2015) तहसीलदाराने उत्तर दिले की, ही प्रकरणे RTO ला कळविण्यात येतील आणि वाहनांची नावे व पत्ते प्राप्त करण्यात येतील. त्यानंतर अवैध वाहतूकी विरुध्द कारवाई		

करण्यात येईल.

- **इतर जिल्हा/राज्यातून रेतीची अवैध वाहतूक** :- नमुना चाचणी केलेल्या दोन[29] जिल्ह्यात RTO कडून घेतलेल्या माहितीवरुन असे आढळले की, RTO द्वारे नोंदविलेली खनिजांच्या अवैध वाहतूकीची 24 प्रकरणे इतर जिल्हे/राज्यांशी [30] संबंधित होती. ही प्रकरणे [31] संबंधित जिल्ह्यांच्या /राज्याच्या जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यास, ज्यांनी ट्रांझिट पास दिली होती, रेती घाट ज्यांना देण्यात आले होते व ट्रांझिट पास दिले होते त्यांचेविरुध्द कारवाई करण्यासाठी कळविण्यात आली नव्हती.
- अलीबागमध्ये तहसीलदाराने 288.44 ब्रास रेती अवैध उत्खननामुळे कार्यस्थळावरच जप्त केली होती (जानेवारी, 2013). विभागाने रेतीच्या अवैध उत्खनन प्रकरणी गुंतलेल्या व्यक्ति जाणून घेण्यासाठी कोणतीही कारवाई केली नाही आणि FIR सुध्दा फाईल केले नाही.

वरील तथ्यांवरुन असे निदर्शित होते की, रेती आणि इतर खनिजांचे अवैध उत्खनन आणि वाहतूक रोखण्याकरीता महसूल प्राधिकारी, RTO आणि पोलीस विभाग यांच्यात समन्वयनाची गरज आहे. विभागाने इतर विभागांसोबत या बाबींचा विचार करावयास पाहिजे आणि त्यांचे सोबत समन्वय साधण्यासाठी एखादी पध्दती विकसित करावयास पाहिजे.

अंतिम बैठकीत प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांनी याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे व त्यात महसूल प्राधिकारी, RTO आणि पोलीस यांच्यात समन्वय साधण्यासंबंधित बाबींचा समावेश करण्यात येईल, असे सांगितले.

[26] चंद्रपूर, कोल्हापूर, नागपूर, नाशिक, पुणे, रायगड, सातारा, ठाणे आणि यवतमाळ.
[27] चंद्रपूर, कोल्हापूर, नागपूर, नाशिक, पुणे, सातारा आणि ठाणे
[28] ठाणे, नाशिक, पुणे आणि चंद्रपूर

	[29] नागपूर आणि यवतमाळ [30] महाराष्ट्रातील अमरावती, भंडारा, चंद्रपूर, नांदेड, वर्धा जिल्हे आणि मध्यप्रदेश [31] जिल्हा खनिकर्म अधिकारी, नागपूर यांची 16 प्रकरणे आणि जिल्हा खनिकर्म अधिकारी, यवतमाळ यांची आठ प्रकरणे		

(दिनेश चव्हाण)
अवर सचिव,महसूल व वन विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवाल			
परिच्छेद क्र.	विषय	स्पष्टीकरण	महालेखापाल यांचे अभिप्राय
७.२.३.८	**रेती घाटाची लिलाव रक्कम परत करणे** "रेती धोरण" याबाबतच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार(मार्च २००३) रेती लिलाव रक्कमेचे रेती घाटातील खनिकर्म रद्दबातल असण्याच्या अथवा त्यावर बंदी असण्याच्या कालावधीसाठी प्रमाणशीर परतावे[३२] अनुज्ञेय आहेत. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार एका रेती घाटात[३३] खनिकर्म प्रक्रिया २३-०९-२०१० ते २८-१०-२०१० पर्यंत ३६ दिवस निलंबित होती आणि त्यानंतर खनिकर्म प्रक्रिया सुरू करण्यात आली. विभागाने परताव्याची रक्कम चुकीची रू.४६.५० लाख काढली आणि तेवढीच रक्कम परत केली. या काम बंद असण्याच्या दिवसांचा परतावा फक्त रू. ११.३५[३४] लाख अनुज्ञेय होता. अशाप्रकारे रू.३५.१५ लाख रक्कम चुकीने परत केल्या गेली. अंतिम बैठकीत प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांनी ही बाब तपासण्यात येईल आणि नियमांनुसार योग्य कारवाई करण्यात येईल, असे सांगितले. ३२-(लिलाव रक्कम/रेती उत्खननासाठी दिलेला कालावधी)X खनिकर्म ज्या काळासाठी प्रतिबंधित होते तेवढे दिवस ३३-२०१०-११ मध्ये मौजे ईटान, तालुका मोहाडी, जिल्हा भंडारा येथील रेती घाट ३४- ३१,५३०X३६ दिवस (२३-०९-२०१० ते २८-१०-२०१०)	सन २०१०-११ या वर्षाकरीता मौजा ईटान, ता. लाखांदूर जि. भंडारा हा ३३४७७ ब्रासचा वाळूगट मो. इक्बाल जॉन मोहम्मद यांना १,०१,२१,०००/- इतक्या सर्वोच्च बोलीस मंजूर करण्यात आला होता. त्याअनुषंगाने लिलावधारकाने सर्व रक्कम शासनजमा केली. तथापि, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी सदर वाळूगटातून २१,२०० ब्रास वाळू उत्खननाची शिफारस केली. त्यानुसार लिलावधारकास २१,२०० ब्रास रेती उचल व वाहतुक करण्यास अनुमती दिली. सदर वाळूगटातील ३३४७७ ब्रास वाळूचा लिलाव केला होता. मात्र लिलावधारकास २१,२०० ब्रास वाळू उत्खननास अनुमती दिली. त्यामुळे लिलावधारकास १२,२७७ ब्रास इतक्या रेतीच्या स्वामित्वधनाचा परतावा करणे क्रमप्राप्त होते. लिलावधारकाने लिलावाच्या कालावधीत उत्खननास परवानगी दिलेल्या २१,२०० ब्रास वाळूपैकी १८,०९७ ब्रास इतक्या रेतीचे उत्खनन केले. मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.४८३०/२०१० मध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने दि.२३-०९-२०१० ते २८-१०-२०१० या कालावधीत राज्यात वाळू/रेती उत्खननावर बंदी घातली होती. ही वस्तुस्थिती विचारात घेवून लिलावधारकास उत्खननास परवानगी दिलेल्या वाळूपैकी उत्खनन न करता आलेल्या ३१०३ ब्रास व उत्खननास परवानगी न दिलेल्या १२,२७७ ब्रास अशा एकूण १५३८० ब्रास वाळूसाठ्याची प्रमाणशीर रक्कम शासन मान्यतेने दि.३०/०३/२०१३ च्या ज्ञापनान्वये अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. (दिनेश चव्हाण) अवर सचिव,महसूल व वन विभाग	No remarks.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवाल			
परिच्छेद क्र.	विषय	स्पष्टीकरण	महालेखापाल यांचे अभिप्राय
७.२.३.९	**खनिजांच्या उत्खननासाठी निष्पादित केलेल्या संलेखावर मुद्रांक शुल्काची वसुली न करणे:-** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या अनुच्छेद ३६ अनुसार जर एखादा भाडेपट्टा पाच वर्षांपेक्षा कमी कालावधीसाठी असल्याचे अभिप्रेत असेल तर त्याबाबतीत बाजार मूल्याच्या दहा टक्क्यांच्या तीन टक्के दराने मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य आहे. मुद्रांक शुल्क आकारण्याकरिता भाडेपट्टयाची बोली किंमत बाजार मूल्य म्हणून धरण्यात येते. • सहा[३५] जिल्ह्यांत २०१२-१३ ते २०१३-१४ या कालावधीच्या रेती घाटांच्या लिलावासंबंधीच्या दस्तावेजांत असे आढळले की ४४८ रेती घाट रू. १०६.१३ कोटी बोली रक्कमेवर भाडेपट्याने देण्यात आले ज्यावर रू. ३१.८४ लाख मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य होते. तथापि, हे मुद्रांक शुल्क आकारण्यात आले नाही व भरणा सुध्दा करण्यात आली नाही. • तसेच दोन[३६] जिल्ह्यांत गौण खनिजांच्या १३ भाडेपट्टा प्रकरणांत भाडेपट्टा निष्पादनासाठी रू.८.३२ कोटी बाजार मूल्यावर रू. २.५० लाख मुद्रांक शुल्क आणि रू. ०.८३ लाख नोंदणी फी भरण्यात आली नाही. • नागपूरमध्ये गौण खनिजाच्या १४ भाडेपट्टा प्रकरणांत रू. १,३६१.७५ लाख बाजार मूल्यावर भाडेपट्टानिष्पादनासाठी रू ४०.१८ लाख मुद्रांक शुल्क आणि रू. ५.२७ लाख नोंदणी फी कमी आकारण्यात आली. अंतिम बैठकीत प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांनी रेतीच्या उत्खननासाठी निष्पादित करण्यात येणाऱ्या संलेखावर मुद्रांक शुल्क आकारण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात येतील, असे सांगीतले. ३५- चंद्रपूर, कोल्हापूर, नाशिक, पुणे, सातारा आणि यवतमाळ ३३- चंद्रपूर आणि यवतमाळ	महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियमातील तरतूदीनुसार वाळू लिलावधारकासोबत करण्यात येणाऱ्या करारनाम्यावर रू. १० लाखापर्यंतच्या लिलावाच्या रकमेवर ०.१ टक्के मुद्रांक शुल्क आकारण्याच्या सूचना दि.१८/०३/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत.	Action Taken on the cases of non-payment of stamp duty pointed out in the para may be stated to PAC.

(दिनेश चव्हाण)
अवर सचिव, महसूल व वन विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवाल			
परिच्छेद क्र.	विषय	स्पष्टीकरण	महालेखापाल यांचे अभिप्राय
७.२.३.१०	<u>पर्यावरणाचा अभ्यास</u> **(अ) EIA अभ्यास न करता उत्खननाची परवानगी देणे** पर्यावरण आघात निर्धारण (Environment Impact Assessment-EIA) ही एक प्रक्रिया असून याचा उपयोग एखाद्या प्रकल्पाबाबत निर्णय घेण्यापूर्वी त्या प्रकल्पाचे पर्यावरण, सामाजिक आणि आर्थिक परिणाम जाणून घेण्यासाठी करण्यात येतो. प्रकल्पाचे नियोजन आणि योजना आखतांना प्रारंभीच त्या प्रकल्पाचा पर्यावरणावर होणारा आघात आधीच आगाऊ वर्तविणे, प्रतिकूल परिणाम कमी करण्यासाठी मार्ग आणि साधने शोधणे, स्थानिय पर्यावरणाशी अनुरूप प्रकल्प आखणे आणि निर्णयकर्त्यांस भविष्याबाबत भाकीत आणि पर्याय पुरविणे हा EIA चा उद्देश्य आहे. EIA मध्ये योजनाबध्द पध्दतीने प्रस्तावित प्रकल्पाचे लाभदायक आणि प्रतिकूल दोनही परिणाम तपासून प्रकल्प योजनेत या आघातांचा विचार करण्यात येईल याची खात्री करण्यात येते. पर्यावरणावरील परिणाम आणि प्रकल्प नियोनाच्या प्रारंभीच त्या परिणामांचे सौम्यकरण केल्यास, त्याचे अनेक लाभ आहेत, जसे पर्यावरणाचे संरक्षण, साधनसंपत्तीचे अनुकूलतम उपयोजन आणि प्रकल्पाचा वेळ व पैसा यात बचत. पर्यावरण व वन मंत्रालयाने निर्गमित केलेल्या (जानेवारी २०११) समुद्र तट विनियमन क्षेत्र (CRZ) अधिसूचनेद्वारे जमीन	(अ) शासन पत्र दि.३/०८/२०११ अन्वये श्री महालक्ष्मी औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थेस पालघर, वसई व वाडा तालुक्यातील खाडी नदीक्षेत्रातील गाळ व गाळमिश्रीत रेती परवाना पध्दतीने यांत्रिक सहाय्याने उत्खनन करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यामध्ये पर्यावरण विभागाने त्यांचे दि.२५/०१/२०१० अन्वये दिलेल्या नाहरकत पत्रातील अटी व शर्तीचे पालन करण्याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार श्री महालक्ष्मी औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थेस पर्यावरण विभागाने दिलेल्या अटी व शर्तीनूसार गाळ व गाळमिश्रीत रेतीचे उत्खनन करताना कोस्टल रेग्यूलेशन झोन अधिसूचनेचा भंग होणार नाही याबाबत कळविण्यात आले होते. सदर संस्थेकडून पर्यावरण विभागाने दिलेल्या अटी व शर्तीचा भंग झाल्याचे आढळून आलेले नाही. जिल्हाधिकारी ठाणे यांनी दि.२०.४.२०१३ च्या पत्रान्वये ठाणे जिल्हयातील खाडी/नदीपात्राचा पर्यावरण विषयक अभ्यास व पर्यावरण आघात मूल्यांकन (EIA) करण्याकरिता अधिस्विकृतीधारक पर्यावरण सल्लागार मे. फाईन इनव्हायरोटेक इंजिनियर्स मुंबई (Accredited Environment Counsultant in Dredging) यांची नियुक्ती करण्यात आली होती. पश्चात EIA चा अभ्यास पूर्ण करण्यात आला. त्यामुळे समुद्र	The contention of department is not acceptable as the Coasterl Regulation Zone (CRZ) Notification (January 2011) issued by MoEF allows maintenance or clearing of water ways, channels and ports in CRZ. Thus environmental assessment study (EIA) was not done before granting permission for sand extraction in August 2011. The EIA study conducted by department in 2013-14 has no meaning as extraction of sand was done in 2011-13.

	लागवडी खाली आणणे, बांध बांधणे अथवा पर्यावरण आघात निर्धारण अभ्यासावर आधारित जल मार्ग, पात्र आणि बंदरांचा रखरखाव अथवा साफ करणे व्यतिरीक्त CRZ खालील सागरी जलाच्या प्राकृतिक गतिस अडथळा आणणे, अशा कामांवर प्रतिबंध घातला आहे. ठाणे जिल्ह्यात २०११-१२ मध्ये महालक्ष्मी इंडस्ट्रीयल मॅन्युफॅक्चरर को-ऑपरेटीव सोसायटीस पर्यावरण आघात निर्धारण अभ्यास केल्याविना रू. २०.५६ कोटी स्वामित्वधनाच्या अदायगीवर ३.४८ लाख ब्रास रेती किंवा रेती मिश्रीत माती, सक्शन पंप वापरून यांत्रिकी पध्दतीने उत्खननाचा परवाना दिला. अशा प्रकारच्या मोठ्या प्रमाणाच्या म्हणजेच ३.४८ लाख ब्रास रेतीच्या उत्खननाचा पर्यावरणावरील आघाताचा अंदाज परवाना देण्यापूर्वी बांधण्यात घेण्यात आला नाही, हे समुद्र तट विनियमन क्षेत्र अधिसूचनेचे उल्लंघन होते. अंतिम बैठकीत प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांनी या प्रकरणाचा तपास करण्यात येईल असे सांगितले आणि पुढे असेही नमूद केले की पर्यावरणासह विविध बाबी विचारात घेऊन शासनाने एक धोरण आखले आहे. (मे.२०१५) **(ब) जिल्हा खनिकर्म नियोजनाशिवाय तात्पुरता परवाना देणे-** अल्पावधी खाण परवाना जिल्हा खनिकर्म नियोजनानुसार द्यावयास पाहिजे होता. चार जिल्ह्यांत[३७] नोव्हेंबर २०१३ ते जानेवारी २०१५ दरम्यान १२६ तात्पुरते परवाने ७.२९ लाख ब्रास गौण खनिज उत्खननासाठी जिल्हा खनिकर्म	तट विनियमन क्षेत्र अधिसूचनेचे उल्लघंन झाले अशी बाब नाही. त्याचप्रमाणे शासन निर्णय दि.२१/०५/२०१५ अन्वये सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातील नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळूचे उत्खनन करण्यासंबंधीचे धोरण विहीत केले आहे. त्यामध्ये वाळू उत्खननापूर्वी पर्यावरण अनुमती घेण्याची तरतुद आहे. **(ब) नागपूर :** नागपूर जिल्हयात जिल्हा खाणकाम आराखड्यात समाविष्ट क्षेत्रातूनच नोव्हेंबर २०१३ ते डिसेंबर २०१५ कार्यालयीन अभिलेखाची तपासणी केली असता सदर कालावधीत नागपूर जिल्हयात जिल्हा खाणकाम आराखड्यात समाविष्ट क्षेत्रातूनच तात्पुरते परवाने निर्गमित करण्यात आलेले आहेत.	Department accepted that in three (Pune, Satara and Thane) out of four districts (except Nagpur) the temporary permits were issued without District Mining Plan. Action taken in the matter as it was violation of rule 58 of Maharashtra Minor Mineral

	योजनेत नसतांनाही देण्यात आले जे अयोग्य होते. चंद्रपूर आणि रायगड च्या जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा खनिकर्म नियोजन तयार करण्याबाबत व त्यानुसार तात्पुरते परवाने जारी करण्याबाबत माहिती दिली नव्हती. अंतिम बैठकीत प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांनी जिल्हा खनिकर्म योजना तयार करण्याबाबतची बाब तपासण्यात येईल, असे सांगितले.	**सातारा** : सातारा जिल्हयात नोव्हेंबर २०१३ ते जानेवारी २०१५ या कालावधीत जिल्हा खाणकाम आराखड्याशिवाय तात्पुरते परवाने देण्यात आले होते. जिल्हाधिकारी सातारा यांनी जिल्हा खाणकाम आराखडा तयार करून गौण खनिजाचे तात्पुरते परवाने देण्याची दक्षता घेतली आहे. **पुणे** : पुणे जिल्ह्यात माहे नोव्हेंबर २०१३ ते जानेवारी २०१५ या दरम्यान गौण खनिज उत्खननासाठी तात्पुरते परवाने दिले आहेत. तद्नंतर पुणे जिल्ह्याचा खाणकाम आराखडा तयार करणेत आला असून जिल्हा खाणकाम आराखड्यानुसार तात्पुरते परवाने देण्यात येत आहेत. **ठाणे** : ठाणे जिल्ह्यात नोव्हेंबर २०१३ ते जानेवारी २०१५ या कालावधीत जिल्हा खाणकाम आराखड्याशिवाय तात्पुरते परवाने देण्यात आले होते. तथापि, जिल्हा खाणकाम आराखडा तयार करण्यासाठी जिल्हास्तरीय समितीचे गठन करण्यात आले असून, तालुकानिहाय खाणकाम आराखडा जिल्हास्तरीय समितीकडून मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. मंजूर खाणकाम आराखड्यानुसार गौण खनिजाचे तात्पुरते परवाने देण्याची दक्षता घेतली जाईल.	Extraction Rules, 2013, may be stated to PAC.
	(क) पर्यावरण उपकराची (Environmental Cess) कमी वसुली- रेतीच्या विल्हेवाटासंबंधीचा दि.२५/१०/२०१० चा शासन निर्णय आणि महसूल आणि वन विभागाचे पत्र दि.१४/०१/२०११ यात असे विनिर्दिष्ट आहे की लिलाव रक्कमेच्या दोन टक्के दराने रेती घाटाच्या	**(क) पुणे** जिल्ह्यात सन २०११-१२ मधील वाळू लिलावामध्ये लिलावधारकांकडून स्वामित्वधनावर दोन टक्के पर्यावरण शुल्क घेण्यात आले आहे. महालेखापाल कार्यालयाने उपस्थित केल्यानुसार दोन टक्के रक्कम सर्वोच्च बोलीवर शासनजमा करण्याकरीता तहसिलदार जुन्नर, आंबेगाव,	Action taken for recovery may be stated to PAC

	यशस्वी बोलीदाराकडून उपकर वसूल करावयास पाहिजे. महसूल व वन विभागात (मे २०१३) असे निदर्शनास आले की, वर्ष २०११-१३ दरम्यान रेती घाटांच्या लिलावावर वसूल केलेल्या रू.३९०.६५ कोटी रक्कमेवर रू ७.८१ कोटी पर्यावरण उपकर वसुलीयोग्य होता. परंतु यासाठी केवळ रू. ६.०२ कोटी पर्यावरण उपकर वसूल करण्यात आला, ज्यामुळे रू.१.७९ कोटी कमी वसुली झाली. कमी वसुलीचे एक कारण असेही आढळले की पुणे जिल्ह्यात उपकराची आकारणी रेती घाटातील लिलाव रकमेवर न करता घाटातील परिमाणावर स्वामित्वधन दर रू.२०० प्रती ब्रास प्रमाणे करण्यात आली. अंतिम बैठकीत प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांनी ही बाब तपासून त्यावर कायद्यानुसार उचित कारवाई करण्याचे मान्य केले. ३७- नागपूर, पुणे, सातारा आणि ठाणे	मावळ, शिरूर, खेड व दौंड यांना फरकाची रक्कम वसूल करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्यानुसार वसुलीची कार्यवाही सुरू आहे.	

(दिनेश चव्हाण)
अवर सचिव,महसूल व वन विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवाल			
परिच्छेद क्र.	विषय	स्पष्टीकरण	महालेखापाल यांचे अभिप्राय
७.२.३.११	**भूपृष्ठ भाडे वसूल न करणे** महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियम १९५५ च्या कलम १८ (iii) अनुसार भाडेपट्टेदाराने त्याचेद्वारे दगडखाण/ खनिकर्मसाठी वापरण्यात येणाऱ्या भूपृष्ठ जागेसाठी जमिनीवरील जमीन महसूल आणि उपकर यांच्यापेक्षा जास्त नसेल अशी रक्कम भूपृष्ठ भाडे म्हणून अदा करावयास पाहिजे. • पुणे जिल्ह्यात ६६ भाडेपट्टेदारांकडून ऑगस्ट २००९ ते जुलै २०१४ या कालावधीसाठी रू.७८.२७ लाख भूपृष्ठ भाडे वसूल करण्यात आले नाही. जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्याने याची मागणी केली नव्हती. • ठाणे जिल्ह्यात शहर आणि औद्योगिक विकास महामंडळाने (CIDCO) अतिरीक्त जिल्हाधिकारी, ठाणे यांना त्याचेद्वारे ८६ खाणींच्या भाडेपट्टे धारकांकडून CIDCO च्या जमीनीवर काम केल्यामुळे ऑक्टोबर २००६ ते सप्टेंबर २०१६ पर्यंतच्या कालावधीचे भूपृष्ठ भाडे वसूल करण्यात आल्याचे कळविले (मे २०१५). CIDCO ने वसुलीची रक्कम सूचित केली नाही आणि ती कोषागारात जमा केली नाही. जिल्हाधिकाऱ्यांनीही या रक्कमेची मागणी केली नाही. अंतिम बैठकीत प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांनी ही प्रकरणे तपासण्यात येतील, असे सांगितले.	**पुणे**- भुपृष्ठ भाडेबाबत एकूण ७८.२७ लाख रकमेपैकी रक्कम रू.७ लाख ९७ हजार वसूल करणे आलेली आहे. उर्वरीत रक्कम वसुल करणेकामी संबंधितांना नोटीस देण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे रक्कम रू.७०.३० लाख रक्कम रूपये संबंधितांकडून त्वरीत वसूल करण्याची दक्षता घेतली जात आहे. **ठाणे** - जिल्हाधिकारी ठाणे यांनी सदर परिच्छेदाबाबत सिडको प्राधिकरणाकडून वेळोवेळी माहिती मागविली आहे. तथापि, सदर माहिती अद्याप अप्राप्त आहे.	Department stated that in Pune district surface rent of Rs.7.97 lakh out of 78.27 lakh has been recovered whereas the recovery details in Nasik district is not received. Further progress of recovery may be intimated to PAC. Surface rent recoverable in other districts may also be checked and intimate to PAC.

(दिनेश चव्हाण)
अवर सचिव महसूल व वन विभाग

परिच्छेद क्र.	विषय	स्पष्टीकरण	महालेखापाल यांचे अभिप्राय
७.२.४	**<u>निष्कर्ष आणि शिफारशी</u>** खनिज महसूल वसुलीची यंत्रणा आणि नियंत्रणाच्या संपादणूक लेखापरीक्षणात कार्य पध्दतीत व अनुपालनात अनेक उणीवा निदर्शनास आल्या. भाडेपट्टेदारांनी एकतर खनिकर्म नियोजनापेक्षा जास्त उत्खनन केले अथवा खनिकर्म योजना मंजूर झाल्याविना उत्खनन केले. खनिजांचे उत्खनन/उत्पादनासाठी एकसमान कमाल मर्यादा राखण्यासाठी संचालक, भूशास्त्र व खनिकर्म, पर्यावरण व वन मंत्रालय आणि IBM (केंद्र शासन) यांच्यात समन्वयन नव्हते. पर्यावरण मंजुरीत नमूद केलेले परिमाण, खनिकर्म योजनेत दिलेले परिमाण आणि भाडेपट्टेदाराने प्रत्यक्ष केलेले परिमाण यांच्यात तफावत होती. • शासनाने खनिजांच्या उत्खननाची कमाल मर्यादा निश्चित करण्यासाठी जबाबदार असलेल्या संबंधित विभागांमध्ये समन्वय साधण्यासाठी एक पध्दती विकसित करावयास पाहिजे आणि खनिजांच्या उत्खननासाठी एकसमान लक्ष्य निर्धारीत करावयास पाहिजे. खनिजांचे उत्खनन मंजूर खनिकर्म नियोजन अथवा योजनेनुसार होत आहे यावर संनियंत्रण ठेवावयास पाहिजे. गौण खनिजांचे परिमाण आणि त्यांचे ठिकाण याची माहिती (databank) शासनाद्वारे राखण्यात आलेली नाही. वाटप केलेल्या खाणी आणि रेती घाटांचे नियतकालिक मोजमाप करण्याची पध्दत नसल्यामुळे खनिज उत्खननाच्या प्रमाणाची आणि त्यावर अदा करण्यात आलेल्या स्वामित्वधनाची पडताळणी करता आली नाही. • गौण खनिज क्षेत्र आणि त्यात अभिप्रेत असलेले गौण खनिजांचे परिमाण निदर्शित करण्यासाठी शासनाने एक डेटाबेस/डेटाबँक तयार करावयास पाहिजे. खाणी व रेती घाटांचे वाटप झाल्यानंतर त्यांचे नियतकालिक मोजमाप व्हावे यासाठी शासनाने एक	शासन निर्णय दि.११/०६/२०१५, दि.१३/०६/२०१६ दि.१२/०६/२०१७ अन्वये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्याच्या दृष्टीने गौण खनिजाच्या उत्खनन स्थळांची वेळोवेळी पाहणी करून केलेल्या उत्खननाची मोजणी करण्याच्या, मंजूर परिमाणापेक्षा जास्त उत्खनन होणार नाही याची काटेकोरपणे दक्षता घेण्याच्या व विनापरवाना आळा बसण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच, शासन परिपत्रक दि. १४.६.२०१७ अन्वये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रभावीपणे प्रतिबंध करण्याकरिता सविस्तर निर्देश दिले आहेत. खनिजांसाठी एक डेटाबेस स्थापित करण्याच्या अनुषंगाने भारतीय खाण ब्यूरो व विप्रो यांच्या मध्ये MOU स्वाक्षरी करण्यात आली आहे त्यात महाराष्ट्रासह इतर १२ राज्यांचा सहभाग आहे. शासन निर्णय दि. ५.१२.२०१५ अन्वये, गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा	

	पध्दती तयार करावयास पाहिजे. खनिजांची अवैध वाहतूक नियंत्रित करण्यासाठी व रोखण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पोलिस आणि महसूल विभाग यांच्यात समन्वयनाचा अभाव होता. खनिजांची अवैध वाहतूक नियंत्रित करण्यासाठी आणि त्याबाबतची प्रकरणे तत्परतेने सोडविता येण्यासाठी शासनाने प्रादेशिक परिवहन कार्यालय, पोलीस आणि महसूल विभाग यांच्यात बळकट समन्वय साधण्यासाठी निर्देश निर्गमित करावयास पाहिजे.	पोलीस अधिक्षक/ पोलीस आयुक्त/प्रादेशिक परिवहन अधिकारी व जिल्हा खनिकर्म अधिकारी यांची समिती गठीत करण्यात आली आहे.	

(दिनेश चव्हाण)
अवर सचिव, महसूल व वन विभाग

साक्ष :

परिच्छेद क्रमांक ७.२.१.३ : महसुलाची थकबाकी

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या महसुली क्षेत्रावर लेखापरीक्षा अहवालातील परिच्छेद क्र. ७.२ खनिज प्राप्तीच्या वसूलीची पद्धती आणि नियंत्रण याचे संपादणूक लेखापरिक्षण' याबाबत अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक २३ मे, १३ जून व ८ ऑगस्ट २०१८ रोजी समितीने महसूल विभागाच्या अपर मुख्य सचिव व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. त्यावेळी मुरली इंडस्ट्रीकडे असलेल्या थकबाकीबाबत समितीस थोडक्यात माहिती देण्यास सूचित केले असता, मे. मुरली इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्याकडे एकूण ९.८७ कोटी रुपये थकबाकी आहे. ही थकबाकी स्वामित्वधनावरील व्याजापोटीची आहे. या कंपनीविरोधात सन २०१३ मध्ये विभागाने आर.आर.सी. इश्यू केला होता. सद्यस्थितीत सदर कंपनीस इनसॉल्व्हन्सी बॅन्क्रप्टसी कोड, २०१६ च्या अनुषंगाने नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनलने दिनांक ५ एप्रिल २०१७ रोजी आदेश पारित केले आहेत.त्यांच्याविरोधात कोणत्याही प्रकारची सक्तीची कारवाई करणे आता शक्य होत नाही. कॉर्पोरेट इनसॉल्व्हन्सी रिझोल्युशन प्रोसिडींगज् सुरू झाले असून त्याच्या अनुषंगाने अंतरिम रिझोल्युशन प्रोफेशनल नियुक्त करण्यात आलेला आहे. त्यांच्याकडे विभागाने मागणी नोंदविली आहे. जेव्हा इनसॉल्व्हन्सी रिझोल्युशन प्रोसिडींगज् पूर्ण करतील तेव्हा शासनाच्या मागणीचा विचार केला जाईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

इनसॉल्व्हन्सी प्रक्रियेमध्ये पहिला दावा शासनाचा असतो, अशी तरतूद आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने मागणी नोंदविली आहे, परंतु प्राधान्याबाबत तेच ठरवतील असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे पैसे आता इनसॉल्व्हन्ट झाले. वेळेवर जर याबाबत कार्यवाही केली असती तर ही वेळ आली नसती. ही रक्कम मोठी असून याबाबत कोणावर जबाबदारी निश्चित केली आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये अद्यापपर्यंत कोणावरही जबाबदारी निश्चित केलेली नाही. विभागाने केवळ शासनाची मागणी सादर केलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने केलेली पुढील कार्यवाही समितीला मान्य आहे. परंतु यामध्ये जर वेळेवर वसूली झाली असती तर नक्कीच आणखी पैसे मिळाले असते. संबंधितांची ही जबाबदारी होती. त्यांनी त्यांच्या कर्तव्याचे योग्य पालन केले नाही असे विभागास वाटत नाही का ? असे मत समितीने व्यक्त केले असता, मे, २०१३ मध्ये आरआरसी इश्यू केल्यानंतर पुढील प्रक्रियेमध्ये त्यांची मालमत्ता जप्त करणे किंवा मालमत्तेचा लिलाव करण्याची कारवाई काही कारणास्तव होऊ शकली नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आरआरसी इश्यू केल्यानंतर पुढील कारवाई का होऊ शकली नाही याची कारणे समितीला समजली पाहिजेत असे समितीने सूचित केले असता, मे, २०१३ मध्ये सदर प्रकरण निदर्शनास आले होते. तेव्हा संबंधित जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांमार्फत त्या कंपनीला नोटीसेस पाठविण्यात आल्या होत्या. परंतु सदर कंपनीने नोटीसेसला कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे जिल्हाधिकारी यांच्याद्वारे आरआरसी इश्यू केली होती. या संदर्भात तहसीलदारांनी सुद्धा कारवाई करून त्या अनुषंगाने त्यांनी सदर कंपनीला नोटीसेस देण्याची कारवाई केली होती. परंतु जप्तीची कारवाई करण्यासाठी ते कंपनीमध्ये गेल्यानंतर तेथे त्यांना कोणीही आढळून आले नाही. त्यामुळे जप्तीच्या संदर्भात त्यांच्याकडून कारवाई करण्यात आली नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

२ पंचांना समावेत घेऊन पंचनामा करून जप्ती करता येऊ शकते. तसेच सदर कंपनीकडे जवळपास ९ कोटी रुपयांची थकबाकी आहे. एवढी मोठी कंपनी असताना तेथे कोणी ना कोणी निश्चितपणे उपस्थित असणार. कोणत्या तारखेला आरआरसी इश्यू केली व त्या संदर्भात खालच्या स्तरावरील अधिकाऱ्यांनी कोणकोणत्या तारखांना कोणती कारवाई केली ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर फॅक्टरी सन २०१३ नंतर जवळपास बंद अवस्थेत आहे. दिनांक १८ डिसेंबर २०१३ रोजी जंगम मालमत्ता जप्त करण्याबाबत नोटीस बजाविण्यात आली. त्या दरम्यान तहसीलदारांनी नोटीसेस इश्यू केलेल्या आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आरआरसी याचा अर्थ काय आहे ? आरआरसी इश्यू झाल्यानंतर पुन्हा नोटीसेस देण्याची गरज नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, आरआरसी याचा अर्थ थकबाकीची रक्कम ही महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येते. तसेच एमएलआरसीच्या तरतुदी अशा प्रकारच्या वसूलीला लागू होतात. त्यानुसार नोटीसेस दिल्या जातात त्यात नमुना-२, नमुना-५ अशा प्रकारच्या नोटीसेसचा समावेश असतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कोणत्या तारखेला आरआरसी इश्यू केली व त्या संदर्भात खालच्या स्तरावरील अधिकाऱ्यांनी कोणकोणत्या तारखांना कोणती कारवाई केली ? अशी विचारणा समितीने केली असता, नमुना-५ ची नोटीस दिल्यानंतर मालमत्तेच्या लिलावाची तारीख जाहीर केली जाते. नमुना-५ ही शेवटची कारवाई असते. अशाप्रकारे लिलावाच्या प्रक्रियेतून वसूली होत असते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या प्रकरणामध्ये त्यांच्या मालमत्तेचा लिलाव करण्यात आला होता का ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी लिलाव केला नाही असे सांगितले.

याचा अर्थ सदर प्रकरणी लिलावाची प्रक्रिया जाणीवपूर्वक थांबविण्यात आली. सदर प्रकरणी लिलावाची प्रक्रिया कोणतेही कारण नसताना जाणीवपूर्वक थांबविण्यात आल्यामुळे संबंधितांवर कारवाई प्रस्तावित करणार आहात का? अशी विचारणा समितीने केली असता, सदर प्रकरणी आरआरसी इश्यू केल्यानंतर ज्यांनी पुढील कारवाई करण्यासाठी निष्काळजीपणा केला किंवा त्वरेने कारवाई न केल्यामुळे त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली जाईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदर प्रकरणी एक महिन्याच्या आत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी. तसेच त्याबाबतची माहिती समितीला द्यावी. ९ कोटी रुपयांच्या वसूलीसाठी निष्काळजीपणा करून लिलाव प्रक्रिया जाणीवपूर्वक थांबविली अशा परिस्थितीत जबाबदारी निश्चित करणे याचा अर्थ काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर प्रकरणी आरआरसी इश्यू झाल्यानंतर ज्या गतीने कारवाई करणे अपेक्षित होते ती कारवाई करण्यासाठी कोण, कोणत्या स्तरावर कमी पडले आहे व त्यात कोण दोषी आहेत, तसेच या प्रकरणी कोणी जाणीवपूर्वक चालढकल केली असल्यास तो सदर विलंबास जबाबदार असल्यामुळे त्याच्यावर जबाबदारी निश्चित केली जाईल. त्यानंतर त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदर प्रकरणी शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर प्रकरणी शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे का याची माहिती आता या ठिकाणी सांगता येणार नाही. याचे कारण असे आहे की, इंटेरियम रिझोल्युशन प्रोफेशनल यांना नियुक्त करण्यात आले असून त्यांच्याकडे विभागाची मागणी नोंदविण्यात आली आहे. त्यांच्याकडून कार्पोरेट इन्सॉलव्हन्सी रिझोल्युशनची प्रक्रिया पूर्ण केली जाईल त्यात शासनाच्या क्लेमचा त्यांच्याकडून निश्चितपणे विचार केला जाईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समिती असे गृहीत धरते की, इन्सॉलव्हन्सीच्या संदर्भात असलेले अधिकारी आपली बाजू मान्य करतील. त्यानंतर इन्कम टॅक्सची रक्कम वसूल झाल्यानंतर शासनाच्या थकबाकीच्या रकमेसंबंधी कार्यवाही सुरू होईल. ही प्रक्रिया झाल्यानंतरसुद्धा थकबाकीची रक्कम वसूल न झाल्यास त्यानंतर कोणती कारवाई करणार आहात ? अशी विचारणा समितीने केली असता, अद्याप ती वेळ आलेली नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ते इन्सॉलव्हंट आहेत याचा अर्थ त्यांच्या संपूर्ण स्थावर मालमत्तेमधून रक्कम वसूल करायची आहे. त्यादृष्टीने पुढील जप्तीची कारवाई करण्यासंबंधी प्रथमदर्शनी विलंब झालेला आहे व ती कारवाई प्रस्तावित झाली नाही. त्यानंतर ती कंपनी इन्सॉलव्हंट झाली आहे. या संदर्भात वेळेवर कारवाई प्रस्तावित केली असती तर त्यांच्याकडून थकबाकीच्या रकमेसंबंधी प्रथम कारवाई करता आली असती. तसेच आरआरसी इश्यू झाल्यानंतर ज्या अधिकाऱ्यांनी पुढील कारवाई वेळेवर केली आहे. अशा संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून व त्यांच्यावर पुढील कारवाई करून एक महिन्याच्या आत समितीकडे माहिती सादर करावी असे समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

वसूलीच्या संदर्भात आरआरसीचे आयुध खरोखर परिणामकारक आहे का ? मागील ३-४ वर्षांच्या काळात राज्यात आरआरसीच्या माध्यमातून किती केसेसमध्ये वसूली झालेली आहे ? याची माहिती घेणे आवश्यक आहे. अन्यथा सदर तरतूद काढून टाकली पाहिजे. तसेच जिल्हाधिकारी व तहसीलदार कार्यालयात मोठ्या संख्येने आरआरसी प्रलंबित असल्यास व त्याबाबत पुढे कोणतीही कारवाई होत नसल्यास काही अर्थ नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी आरआरसी इश्यू केल्यानंतर सदर प्रकरणी मालमत्तेची जप्ती किंवा लिलावाची कारवाई विहित वेळेमध्ये होणे अत्यावश्यक आहे. या संदर्भात शासनाने साधारणतः दिशा निर्देशाबाबत आदेश काढले पाहिजेत अन्यथा काही उपयोग होणार नाही अशी समितीची भूमिका आहे. आरआरसी इश्यू केल्यानंतर संबंधितांच्या ७/१२ उताऱ्यावर नोंद झाली पाहिजे. तसेच ३ महिन्यांच्या आत लिलावाची कार्यवाही झाली पाहिजे. शासनाची थकित वसूली करण्यासाठी आरआरसी काढली जाते असे मत समितीने व्यक्त केले असता, विविध कायद्याअंतर्गत असलेल्या तरतुदीनुसार जी थकबाकी असते ती महसुलाची थकबाकी आहे असे समजून ती रक्कम वसूल करण्यासाठी आरआरसी इश्यू केली जाते. सदर कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावरून केली जाते. तसेच वसूली करण्यासाठी ‘ अ ’, ‘ ब ’ व ‘ क ’ असे तीन पत्रक असतात. आरआरसीचा ‘ क ’ पत्रकामध्ये समावेश होतो. त्या आधारावर त्याचे मॉनेटरिंग केले जाते. तरीसुद्धा समितीच्या भावना लक्षात घेऊन आरआरसीची वसूली आस्थेने करण्यासंबंधी पुन्हा त्यांना सूचित केले जाईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यवतमाळ येथील रेती घाटाच्या वसूली संदर्भात दोन वेळा त्यांच्या स्थावर मालमत्तेचा लिलाव करीत असताना कोणीही उपस्थित राहिले नाही असे लेखी स्पष्टीकरणात नमूद केलेले आहे. त्यांची कोणत्या प्रकारची स्थावर मालमत्ता होती, फेरलिलाव कधी करण्यात आला ? तसेच जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशाविरुद्ध लिलावधारकांनी अपर आयुक्ताकडे अपिल दाखल केल्यानंतर त्यांनी वसूली करण्यासंबंधी स्थगिती आदेश दिलेले आहेत. सदर प्रकरणी संबंधितांकडून ८० टक्के वसूली करण्याची गरज नाही अशाप्रकारे अपर आयुक्तांनी आदेश दिलेले आहेत त्या

अपर आयुक्तांचे नाव काय आहे ? सदर प्रकरणी अपर आयुक्तांनी दिलेल्या आदेशाबाबत विभाग सहमत आहे का ? नसल्यास याबाबत त्यांच्या विरोधात पुन्हा अपिल करणार आहात का ? अशी विचारणा समितीने केली असता, अमरावतीच्या विभागीय आयुक्तांनी दिनांक ९ फेब्रुवारी २०१८ रोजी अपर आयुक्तांनी दिलेल्या आदेशाचे पुनर्विलोकन करून सदर आदेश रद्द केले आहेत. त्यानंतर संबंधित व्यक्ती उच्च न्यायालयात गेली. त्यात उच्च न्यायालयाने दिनांक १५ मार्च २०१८ रोजी स्थगिती आदेश दिलेले आहेत. श्री. रवींद्र ठाकरे हे अपर आयुक्त होते. तसेच ते सध्या शासकीय सेवेत कार्यरत आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागीय आयुक्तांनी सदर प्रकरणी अपर आयुक्तांचे आदेश रद्द केल्यानंतर कोणत्या स्थावर मालमत्तेचा लिलाव करण्यात आला होता ? अशी विचारणा समितीने केली असता, तहसीलदारांनी त्यांच्याकडील शेती व इतर मालमत्तेसंबंधी दोन वेळा लिलावाची कार्यवाही केली होती. परंतु सदर लिलावाला कोणीही प्रतिसाद दिलेला नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

लिलावाला कोणीही प्रतिसाद न देणे ही बाब शक्य नाही. सदर लिलावाला उचित प्रकारे प्रसिद्धी देण्यात आली नव्हती. एखाद्या व्यक्तीने रेती घाट घेतल्यानंतर १०० टक्के पैसे वसूल केल्याशिवाय त्याला रेती उत्खननाची परवानगी देत नाहीत. अशा परिस्थितीत त्यांच्याकडे ८४ लाख रुपयांची थकबाकी कशी राहिली ? अशी विचारणा समितीने केली असता, या संदर्भात लिलावाची सर्व प्रक्रिया पूर्ण केली होती असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर प्रकरणाबाबत समितीला सविस्तर माहिती द्यावी असे समितीने सूचित केले असता, मूळ प्रकरण असे आहे की, सन २०१३-१४ मध्ये महागाव तालुक्यात शिरफुली व मौजे राहूर असे दोन रेती घाट आहेत. त्याकरिता श्री. राजू सव्वालाखे नावाच्या व्यक्तीने रक्कम रु. १,३५,८२,९९९ ची सर्वोच्च बोली लावली व त्याकरिता त्याने फक्त एमडीची रक्कम रु. ७,२६,९३० भरली होती. अशाप्रकारे त्याने प्रथम १/४ व १५ दिवसानंतर ३/४ रक्कम भरायची होती. परंतु त्याने ३/४ रक्कम न भरल्यामुळे त्याची एमडीची रक्कम जप्त करून रेती घाटांचा दुसऱ्यांदा लिलाव करण्यात आला तेव्हा रु.३७,२०,०००/- रकमेची सर्वोच्च बोली लावण्यात आली होती. शासनाचा असा जीआर आहे की, प्रथम लिलाव केल्यानंतर काही कारणास्तव सदर घाटधारकाने रेती उत्खनन केले नसल्यामुळे पुन्हा लिलाव केल्यानंतर त्यात ज्या रकमेचा फरक येत असेल त्या फरकाची रक्कम पहिल्या व्यक्तीकडून वसूल केली पाहिजे. प्रथम बोलीच्या रकमेतून दुसऱ्या बोलीची रक्कम वजा करता उर्वरित असलेली रक्कम श्री. राजू सव्वालाखे यांच्याकडून वसूल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. परंतु सदर प्रकरण उच्च न्यायालयामध्ये गेले असून सदर प्रकरणी उच्च न्यायालयाने १५ मार्च २०१८ रोजी स्थगिती दिलेली आहे. श्री. राजू सव्वालाखेला सदर रेतीघाट मिळालेले नाहीत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याचा अर्थ असा आहे की, सदर रेती घाटासाठी दोन वेळा लिलाव करण्यात आला. दुसऱ्या लिलावात सदर घाटाकरिता कमी रकमेची बोली लावण्यात आल्यामुळे शासनाचे नुकसान झाले असून त्याची वसूली श्री. सव्वालाखे यांच्याकडून केली जात आहे. उच्च न्यायालयात शासनाच्या वतीने कोण बाजू मांडणार आहे ? सदर प्रकरणी विभागीय आयुक्तांनी अपर आयुक्तांनी दिलेले आदेश रद्द केलेले असल्यामुळे त्यात निश्चितपणे तथ्य आहे. सदर प्रकरणी चांगल्या वकिलांची नेमणूक करावी अशी समितीची अपेक्षा आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, त्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली.

परिच्छेद क्र.७.२.३.१ — गौण खनिज साधनसंपत्तीचे व्यवस्थापन

२.२ तालुका हवेली (जि.पुणे) मध्ये बहुमोल दगड / निमरत्न आढळून आले आहेत. परंतु याबाबत विभागाने असे स्पष्टीकरण दिले आहे की, अशा प्रकारे कोणतेही दगड आढळून आलेले नाहीत. याबाबत समितीला माहिती द्यावी असे समितीने सूचित केले असता, महालेखाकारांकडून हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर ८ दिवसांच्या कालावधीत त्या क्षेत्राचा दौरा केला होता. जवळपास २४ खाणीला भेटी दिल्या होत्या. तेथील भौगोलिक क्षेत्रात जवळपास १०० पेक्षा जास्त खाणी आहेत. तेथे कोणत्याही ठिकाणी कॅंवानसाईट, पेन्टॅगोनाईटसारखे दगड आढळून आलेले नाहीत. हा दगड अतिशय तुरळक प्रमाणात आढळून येतो. सदर दगड हा नेटवर मार्किंग करून ठेवलेला आहे. भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण संस्था ही जगातील सर्वमान्य संस्था आहे. ही संस्था पुणे येथे असून त्यांनी यासंबंधी कोणताही क्रिस्टल रिपोर्ट केलेला नाही. परंतु महालेखाकार कार्यालयाने इंटरनेटवरुन हा विषय घेऊन सदर आक्षेप काढलेला आहे. जिऑलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडिया यांनी सुद्धा याबाबत कधी रिपोर्ट केलेला नाही. पण महालेखाकाराने इंटरनेटवरून ती माहिती घेतलेली आहे व आक्षेप काढला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

५.५ से.मी. × २ से.मी. × ३.६ से.मी. म्हणजे १ लक्ष ६५ हजार त्याची किंमत आहे. तिकडे तशा प्रकारचा स्टोन आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, तिकडे तशा प्रकारचा स्टोन नाही. महालेखाकार कार्यालयाने इंटरनेटवरून माहिती घेतलेली दिसत आहे, इंटरनेटवर तो दगड आहे. जिऑलाईट या प्रकारचे समकक्ष दगड आहेत पण या प्रकारचा दगड नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने या दगडाचा नमुना आणलेला आहे, तो समितीच्या अवलोकनार्थ सादर करतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

इंटरनेटवर कसे सांगतात की, तिकडे तो दगड उपलब्ध आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, म्हणून जिऑलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडियाचे नाव घेतले आहे, ही केवळ राज्यातील नव्हे तर देशातील प्रिमीयर एजन्सी आहे. देशामध्ये कोठे काय मिळते किंवा देशामध्ये जिऑलॉजीकली काय रिसोर्स आहेत हे सांगणारी ही एजन्सी आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

इंटरनेटवर चुकीचे आले असेल तर विभागामार्फत आपण त्यांना तसे कळवावे असे समितीने सूचित केले असता, समिती म्हणत असेल तर जीएसआयला मॅटर रेफर करू. महाराष्ट्रात ७५ टक्के दगड बेसॉल्ट आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ठीक आहे. पण डोंगर कापणी दरम्यान काढण्यात आलेले दगड यामध्ये आपण सांगत आहात की तशी काही पॉलीसी नाही. There is no policy of mining in hilly areas असे मत समितीने व्यक्त केले असता, डोंगरी भागामध्ये खाणकाम करावे किंवा कसे याबाबत सध्याच्या परिस्थितीत शासनाचे कोणतेही विविक्षीत धोरण नाही ही वस्तुस्थिती आहे. मात्र विभागाने आता संचालक जिऑलॉजी व मायनिंग यांचेशी चर्चा केलेली आहे व त्यांना सांगितले आहे की, त्यांनी विभागाला याबाबत सूचना करावी. प्राथमिक सूचना अशी आहे की, डोंगरी भागातील जो भाग इकॉलॉजीकली सेन्सेटीव्ह एरियामध्ये मोडतो तेथे बिलकुल खाणकाम करू नये. मात्र जो एरिया इकॉलॉजीकल सेन्सेटीव्ह एरियामध्ये मोडत नाही तेथे काही अटी व शर्तीच्या अधीन राहून त्याबाबत विचार करता येऊ शकेल असे त्यांचे प्राथमिक मत आहे. विभागाने त्यांना सांगितले आहे की, तुम्ही विभागाला याबाबत सविस्तर सुचना कराव्यात. जेणेकरून या आधारे शासनाला धोरण ठरविणे शक्य होईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने तीन वर्षांपूर्वी सांगितले आहे की, धोरण निश्चित करतो. याबाबतचे धोरण लवकर झाले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, इकॉलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडिया केंद्र सरकारने डिफाईन केलेला आहे. महाराष्ट्रातील १२ जिल्हे त्यामध्ये येतात. नंदूरबार ते कोल्हापूर पर्यंत पट्टा आहे. या जिल्ह्यांमध्ये डोंगरदऱ्यावर खाणकाम बंद करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आपण राज्याचे धोरणही ठरवू मात्र केंद्र सरकारच्या धोरणाशी ते कोलायट्रल असावे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक ७.२.३.१ अ) (iii) खाणपट्टा व खनिकर्म परवान्याचे मोजमापन :—

२.३ उपरोक्त परिच्छेदाबाबत विभागाने सांगितले आहे की, ईटीएसद्वारे वार्षिक मोजमाप करण्याबाबतची तरतूद नियमात केली जाईल. तसेच महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील नियम ४६ मध्ये ईटीएस मशीनद्वारे खाणपट्ट्यातील उत्खननाची वार्षिक मोजणी करण्याची तरतूद करण्याचे प्रस्तावित असल्याचे म्हटले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, समितीने सांगितलेली बाब खरी आहे. विभागाने अद्याप नियमांमध्ये याबाबत अंतर्भुत केलेले नाही. मात्र विभागाने एक्झीट कॉन्फरन्स नंतर तीन जीआर इश्यू केलेले आहेत. या तीन जीआरमध्ये जिल्हाधिकारी यांना स्पष्ट सूचना केलेली आहे. दिनांक ११ जुलै २०१५, १३ जून २०१६, १२ जून २०१७ या तारखांना जीआर इश्यू केलेले आहेत. स्थळ पाहणी करून मोजमाप करण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना निर्देश दिलेले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक ७.२.३.२ स्वामित्वधनाची कमी वसूली/वसूली न करणे :—

२.४ रायगड जिल्ह्याची स्थिती काय आहे. ५ कोटी ८८ लाख रुपयांची ही रक्कम येणे प्रलंबित आहे ? यामध्ये दोन गोष्टी आहेत, एक तर रक्कम वसूल करावी नाही तर जबाबदार असणाऱ्या व्यक्तींबाबत विभागाचे काय मत आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडील माहिती समितीसमोर सादर करतो, तहसीलदार पेण यांनी कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग यांचे एसबीआय रोहा येथील बँक खाते गोठविण्याचे आदेश पारित केलेले आहेत. त्यांचे वाहनही जप्त केले होते. मात्र नंतर ते रिलीज करण्यात आले असे विभागीय सचिवांनी सांगितले.

देयक वितरित करतात तेव्हा स्वामित्वधन अदा केल्याशिवाय कसे केले. How they can release the fund? स्वामित्वधन कपात केल्याशिवाय देयक काढले जात नाही. आता तर नियम आहे की, प्रथम रक्कम जमा करावी व नंतरच बाकीचे काम करावे. जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग येथे तशी यंत्रणा आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, समिती म्हणते तशी यंत्रणा आहे. परंतु या परिच्छेदामधील मुद्दा वेगळा आहे. शासनाने दिनांक ११ फेब्रुवारी २०१० रोजीच्या निर्णयानुसार बंधारे, रस्ते व इमारती यांच्या बांधकामात भरणा अथवा सपाटीकरण करण्यासाठी वापरात येणाऱ्या साधारण मातीचे स्वामीत्वधनाचे दर १०० रुपयांवरून २०० रुपये केले होते. २०० रुपये प्रमाणे स्वामित्वधन वसूल होणे आवश्यक होते. कार्यकारी अभियंता यांनी १०० रुपये प्रमाणे स्वामित्वधनाची वसूली कंत्राटदाराकडून केली होती. त्यामुळे फरकाची रक्कम वसूल करण्याचा हा विषय आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

फेब्रुवारी, २०१० मध्ये तो कंत्राटदार निघून गेला होता का ? फेब्रुवारी, २०१० मध्ये विभागाने २०० रुपये प्रती ब्रास दर केलेले आहे. सदरील प्रकल्प सन २०११ ते २०१३ या कालावधीत सुरू होता. त्यांनी त्यावेळी रक्कम का वसूल केलेली नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, यातील कार्यकारी अभियंता यांनी अशी भुमिका घेतली आहे की, विभागाचे कार्यादेश, प्रशासकीय मंजुरी, एस्टीमेट, निविदा ह्या दिनांक ११ फेब्रुवारी २०१० पूर्वीच्या होत्या. प्रत्यक्षात काम दिनांक ११ फेब्रुवारी २०१० नंतर झालेले आहे. त्यामुळे कंत्राटदाराने मंजूर निविदेनुसार पैसे भरलेले आहेत. विभागाचे म्हणणे आहे की, ज्या तारखेस उत्खनन झाले आहे, त्या तारखेचे स्वामीत्वधन वसूल केले पाहिजे. पण संबंधित कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, आम्ही त्यांच्याकडून त्यावेळी वसूल करू शकलो नाही. आम्ही आता डिमांड रेज करतो तेव्हा कंत्राटदार निघून गेलेला आहे. आता ही रक्कम विभागाने भरावयाची आहे. कारण ही रक्कम वसूल करून देण्याची जबाबदारी खात्याची होती. आता खात्याकडे याकरीता तरतूद नाही. काही प्रकरणामध्ये ते म्हणतात की, याकरिता वरिष्ठांची परवानगी घ्यावी लागेल. या विविध कारणामुळे ते अजूनपर्यंत राहिलेले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे स्वामित्वधन कोण अदा करणार आहे, कंत्राटदार अदा करणार आहे की विभाग अदा करणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणामध्ये उत्खनन त्या कंत्राटदाराने केलेले आहे. ॲज ए एजंट ऑफ द कार्यकारी अभियंता असे त्याने उत्खनन केले आहे. ॲज ए एजन्सी म्हणून त्याने हे काम केलेले आहे. पहिली जबाबदारी कंत्राटदाराची आहे, मात्र कंत्राटदार ही जबाबदारी पार पाडीत नसेल तर कार्यकारी अभियंता यांच्यावर ही जबाबदारी येते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

प्राईज एक्सलेशन हा एक क्लॉज एस्टीमेटमध्ये असतो, हा क्लॉज लागू होत असेल तर ठीक आहे. नाही तर निविदा भरतानाचे दर अदा करावे लागतात. अशा प्रकरणात काही सुट नसते की, भाव वाढले म्हणून आम्ही जुन्या भावाने भरू. त्यामुळे संबंधित कार्यकारी अभियंता यांचे सबमीशन मान्य करण्यासारखे नाही. आपल्या देशातील सात हजार लोकांनी भारताचे नागरिकत्व सोडले व इतर देशाची घेतली, तर त्यामध्ये त्याचे नाव आहे का. आपल्या राज्यामध्ये तो कंत्राटदार कोठे तरी काम करीत असेल ? १०० रुपये ब्रास या दराप्रमाणे रु. ३.४४ कोटी ही मुळ रक्कम होती. त्याचे ६.८८ कोटी रुपये झाले आहेत. त्यापैकी आपण फक्त १ कोटी रुपये वसूल केले आहेत. २ कोटी ४४ लाख त्यावेळचे बाकी आहेत. ३.४४ कोटी दुप्पट रकमेचे येणे आहे. असे ५.८८ कोटी रुपये येणे बाकी आहे. म्हणजे १०० रुपये प्रती दरानेसुद्धा त्या कंत्राटदाराने आपल्या खात्यामध्ये रक्कम भरलेली नाही. जुना दर व फरकाची रक्कम समिती समजू शकते. आता हा वादाचा विषय आहे. म्हणजे मूळ दर १०० रुपये या दरानेसुद्धा या प्रकरणामध्ये रक्कम कंत्राटदाराने भरलेली नाही, असे महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. Rs. 3.44 crore is the original amount, double is Rs. 6.88 crore, out of that they have given only Rs.1 crore; Rs. 5.88 crore is pending म्हणजे मूळ रक्कम १०० रुपये दरानेसुद्धा शासनाची वसूली झालेली नाही, यास जबाबदार कोण आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सदरील रक्कम वसूल करून भरण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता यांचीच होती. त्यांनी वसूल केली नाही म्हणून विभागाने त्यांचे बँक खातेदेखील सील केलेले आहे, त्यांचे वाहनदेखील जप्त केली होते. कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग यांच्यावर केलेल्या कारवाईचा तपशील विभागाने समितीसमोर सादर केला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

नाशिक जिल्ह्यातील निफाड येथील परिस्थितीदेखील तीच आहे. तेथे १०० रुपये ब्रास दराप्रमाणे रक्कम जमा झालेली आहे व १०० रुपये ब्रास प्रमाणे रक्कम प्रलंबित आहे. तसेच पुणे जिल्ह्यातील दौंड येथेदेखील तीच परिस्थिती आहे. तहसील दौंड येथे वसूली झालेली आहे. कर्जत तहसीलमध्ये वसूली झाली आहे काय, तहसीलदार यांनी सदरील रकमेची वसूली होणार नाही असे सांगितले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, कर्जतमध्ये अद्याप वसूली झालेली नाही. कर्जतच्या प्रकरणामध्ये तहसीलदार, रोहा यांनी कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे यांचेकडे पाठपुरावा केला होता. त्यांना नोटीसदेखील दिली होती, त्यांनी खुलासा केला आहे की, मार्च, २०१३ पासून त्यांनी अद्याप कोणतेही देयक अदा केलेले नाही, जेव्हा देयकाची रक्कम अदा केली जाईल तेव्हा आक्षेपीत स्वामित्वधनाची रक्कम देयकातून वसूल केली जाईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यांचे देयक प्रलंबित आहे का, १ कोटी १९ लाख रुपये त्यांच्या प्रलंबित देयकातून वसूल होईल का, त्यांच्याकडून वसूल होणार नसेल तर विभागाकडून वसूली करावी लागणार आहे ? याबाबत माहिती द्यावी असे समितीने सूचित केले असता, संबंधित अधिकारी येथे उपस्थित आहेत, समितीच्या परवानगीने ते तपशील देतील असे विभागीय सचिवांनी सांगितले. कंत्राटदाराचे देयक अद्याप अंतिम झालेले नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

कंत्राटदाराची अंतिम देयकाची रक्कम अंदाजे किती आहे अशी विचारणा समितीने केली असता, सुमारे १७ कोटी रुपयांचे देयक अद्याप प्रलंबित आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

दौंडमध्ये ४ लाखाऐवजी ६१ लाख रुपये कसे मिळाले आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, दौंडमध्ये विभागाने दोन कालावधीच्या रकमा वसूल केलेल्या आहेत. दिनांक १ जानेवारी २०११ ते ३१ मार्च २०११ या कालावधीचे रु. ६१,०१,०७१ दिनांक २४ जून २०११

रोजी वसूल केले आहेत. दिनांक १.४.२०१२ पासून ३०.९.२०१२ या कालावधीकरीता रु.२६,१२,९५९ दिनांक २०.३.२०१३ रोजी वसूल केले आहेत असे रु.८७,१४,३०० वसूल केलेले आहेत. ४ लाख ८१ हजार रुपये हा त्याचा भाग आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

वसई तहसिल येथील स्वामित्वधनाच्या वसूलीबाबत अवगत करण्यास सूचित केले असता, विभागाने समिती समोर सादर केले आहे की, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १ ठाणे यांच्याकडून दोन टप्प्यात एकूण रु.१०,४६,६७२ रक्कम वसूल केलेली आहे. बाकीची रक्कम रु. ११,०४,००० वसूलीबाबत विभागाची माहिती आहे की, वसई विरार महानगरपालिकेकडून दिनांक ३१.३.२०१७ रोजी रु.११,०८,७३९ वसूल केले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

रु. ११,०४,००० घ्यावयाचे होते, रु. ११,०८,७३९ वसूल केले आहेत, हीच ती रक्कम आहे का वेगळी रक्कम आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, प्राप्त माहितीनुसार रु.११,०८,७३९ वसूल केलेले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभाग अनेक रकमा वसूल करतो, ही रक्कम महानगरपालिकेकडून वसूल करावयाची होती का ? विभाग असे कसे सांगू शकतो की, the amount has come and adjusted against this account अशी विचारणा समितीने केली असता वास्तविक महालेखाकार यांच्या परिच्छेदामधील ही रक्कम नाही. परिच्छेदामध्ये १०,४६,६७२ रुपये वसूल करण्याबाबत आहे. महालेखाकारांनी त्यांच्या रिमार्कमध्ये नमूद केले आहे की, ११ लाख ०४ हजार रुपये वसूल करावयाचे होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

रिमार्कमध्ये महालेखाकारांनी रक्कम दिलेली आहे परंतु विभागाने किती रक्कम वसूल केली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, महालेखाकारांनी त्यांच्या रिमार्कमध्ये कोणता स्त्रोत आहे हे स्पष्ट केलेले नाही, त्यांनी केवळ ११ लाख ०४ हजार रुपयांबाबत उल्लेख केलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

दौंड, कर्जत व वसई या तीन तहसील विभागात १ कोटी ४५ लक्ष रुपये सन २०११-२०१२ ते २०१३-२०१४ पर्यत कार्यकारी अभियंता यांचेकडून यायचे होते असे महालेखाकारांचे म्हणणे आहे, ती रक्कम आली नाही त्याबाबत त्यांनी डिटेल्स दिलेले आहेत. वसईमधील १० लाख ४६ हजार रुपये आले आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, ११ लाख रुपये बाकी आहेत. तीन तहसील विभागाची एकूण बेरीज रु.१.४५ कोटी आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, वसई तहसीलमधून दुसरी वसूली समोर सादर करीत आहोत. वसई तहसिलद्वारे महानगरपालिकेडून रु.११,०८,७३९ वसूली केलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभाग अशा ज्या विभागांनी पैसे भरले नाहीत, यांच्या वसूलीसाठी विभागाकडे काय नियोजन आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, हे शासकीय विभाग आहेत. समितीसमोर स्पष्ट केले आहे की, तहसिलदार रोहा, तहसिलदार पेण यांनी सक्तीची कारवाई केली होती. यापुढेही विभागाने पाठपुरावा चालू ठेवलेला आहे. वरिष्ठ स्तरावरुन याबाबत पाठपुरावा करु असे विभागीय सचिवांनी सांगितले.

रायगडचा विषय गंभीर आहे, कारण तेथे मुळ १०० रुपये ब्रास या दराने देखील रक्कम वसूल करु शकला नाही. जुनी वसूल व्हावयाची रक्कम २ कोटी ४४ लाख रुपये बाकी आहे. कर्जतमध्ये त्यांचे १५ कोटीचे देयक विभागाला दयावयाचे आहे. ही रक्कम शासनास लवकर मिळाली पाहिजे. याबाबत जलसंपदा विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांना येथे बोलावले पाहिजे. शासनाला ही रक्कम कंत्राटदाराकडून वसूल करावयाची आहे. शेवटी ही वसूली खाजगी व्यक्तीकडून करावयाची आहे. Both the recoveries speciafically of Karjat and Raigad हे दोन्ही विषय जलसंपदा विभागाचे आहेत. याबाबत भूमिका पुढील साक्षीच्या वेळी सांगावी नाही तर समिती त्यांना बोलवेण असे समितीने सूचित केले असता, सहका-यांना पत्र पाठवितो व त्यांना या वसूलीमध्ये स्वत: लक्ष घालण्याबाबत विनंती करतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कर्जतमध्ये अगोदरच विभागाकडे त्यांचे देयक प्रलंबित आहे, विभागाची वसूली त्यांनी दिली पाहिजे. या प्रकरणामध्ये २ कोटी ४४ लक्ष रुपये मुळ दर म्हणजे १०० रुपये ब्रासप्रमाणे देखील वसूल झालेले नाही. त्यामध्ये त्या विभागाचे कार्यकारी अभियंता व आपल्या विभागाच्या अधिका-यांची चुक आहे. याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी. तसेच वसूलीकरीता प्रयत्न केला पाहिजे. मुळ दराने सुद्धा रक्कम वसूल करु शकले नाही त्यांच्यावर देखील कारवाई निश्चित केली पाहिजे. रायगडच्या प्रकरणात २ कोटी ४४ लक्ष रुपये मुळ दराच्या १०० रुपये प्रती ब्रास प्रमाणे बाकी आहेत. याबाबत विभागाने अगोदर प्रयत्न करावेत नसता संबंधित सचिवांना बोलावण्यात येईल असे समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली. **(विभागाकडून प्राप्त झालेली माहिती विवरणपत्र क्र. १ येथे जोडण्यात आली आहे.)**

कोणाला यासंबंधी काही बोलावयाचे आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, हा प्रकल्प आता माझेकडे हँडओव्हर झाला आहे. या अगोदरही मी त्या प्रकल्पावर उप अभियंता म्हणून काम केलेले आहे. मूळत: बाळगंगा हा प्रकल्प सिडकोचा आहे. हा प्रकल्प ठेव तत्वावर व्यवसायास जलसंपदा विभागास दिला होता. या प्रकल्पाचे बांधकाम सन २०११-२०१२ या कालावधीत झालेले आहे, बेसीक एस्टीमेट व टेंडर

करताना १०० रुपये ब्रासचा दर होता. त्यानंतर तो २०० रुपये ब्रास झाला आहे. येथे झालेल्या कामाच्या संदर्भात शासनाने एसीबीकडून उघड चौकशी सुरू केलेली आहे. तत्कालीन सर्व अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल झालेले आहेत. समितीने म्हटल्याप्रमाणे अंडर रिकव्हरी झाली आहे, ही वस्तुस्थिती आहे. कंत्राटदाराकडून जेवढी रक्कम वसूल करायला पाहिजे होती ती रक्कम वसूल करण्यात आलेली नाही. मध्यंतरीच्या काळात सन २०१३ पासून या प्रकल्पाचे लिटीगेशन सुरू आहे. सन २०१५ मध्ये मा.उच्च न्यायालयाने या प्रकल्पावर पाच सदस्यीय लवाद, आर्बीट्रेशन नेमलेला आहे. त्यांनी या प्रकरणी स्टेथेस्को दिलेला आहे. कोठेही वसूली करायची नाही असा स्टेथेस्को दिलेला आहे. लवादाची कार्यवाही अंतिम टप्प्यात आलेली आहे, साधारणपणे जूनमध्ये लवादाचा अवॉर्ड होऊन जाईल. एकूण वसूली रु. ६.८८ कोटी दाखविली आहे. परंतु एकूण वसुली २९ कोटी रुपये आहे. लवादाची कार्यवाही झाल्यानंतर ही रक्कम वसूल करता येईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने सांगितले आहे की, हे सिडकोचे काम आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, आम्ही एजन्सी म्हणून काम करीत आहोत, हे डिपॉझीट वर्क आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

म्हणजे रक्कम वितरीत करणे ही सर्व विभागाची जबाबदारी आहे. मग सिडकोचा काय संबंध आहे ? आपणास डिपॉझिट वर्क म्हणून दिले असेल तर त्यात सिडकोची काहीच भूमिका नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, तसे झाले आहे म्हणून शासनाला अहवाल दिला आहे. सद्य:स्थितीत काहीही करता येत नाही. जो पर्यंत लिटीगेशन संपत नाही तो पर्यंत पैसे देणार नाही अशी सिडकोची भूमिका आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

न्यायालयाच्या आदेशाचे पालन केलेच पाहिजे. सिडको पेमेंटसाठी जबाबदार आहे. मागणी विभागाने सिडकोकडे केलेली आहे. जून मध्ये लवादाचा निर्णय झाल्यानंतर ते पैसे नियमानुसार काढून घ्यावेत. समिती समोर हा विषय आला की, १०० रूपयाप्रमाणे आपण क्वांटीटी काढली असेल. ती महसूल विभागाने जमा करून घेतली नाही असा समितीचा मूळ विषय होता. कारण रूपये ५.८८ कोटी मध्ये २.४४ कोटी रूपये १०० प्रमाणे शिल्लक आहेत. आता आपली क्वांटीटी वाढली असेल. रूपये २००/- प्रमाणे आपण मोजमाप करीत आहात. त्या दृष्टीने रक्कम रु. २९.०० कोटी इतकी झाली असेल. त्याबद्दल समितीचा काही वाद नाही. जास्तीत जास्त रक्कम जमा करावी. समितीचा मूळ मुद्दा असा होता की, रूपये २.४४ कोटी हे घेतलेच पाहिजे होते. ते पण घेण्यात आलेले नाहीत असे मत समितीने व्यक्त केले असता, तशी रक्कम घेण्यात आलेली नाही. तसा अहवाल शासनाला सादर केलेला आहे. तसेच, तत्कालीन अधिकाऱ्यांवर गन्हे देखील दाखल झाले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाकडून रूपये २९.०० कोटीची वसूली झाली पाहिजे ही बाब देखील लक्षात घ्यावी व त्याबाबत संबंधितांविरूद्ध ताशेरे देखील ओढावेत. महालेखाकार सर्व कामांचे लेखापरिक्षण करीत नाहीत. आजही २००/- रूपयाचा भाव आहे आणि १०० रूपयाने वसूली करतात आणि बाकीचे सोडून जातात. अंतर्गत तपासणी करून पहावी. नक्कीच १०-२० जण निघतील असे मत समितीने व्यक्त केले.

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक १३ जून, २०१८ रोजी विभागीय सचिवांची पुन्हा साक्ष घेतली. त्यावेळी रायगड आणि कर्जत (जि. रायगड) येथे स्वामित्वधनाची वसूली होत नसल्यामुळे जिल्हाधिकारी यांना साक्षीसाठी बोलाविण्यात आले आहे. सिडकोचे अधिकारी बैठकीस उपस्थित आहेत काय ? सिडकोच्या अधिकाऱ्यांना सुद्धा बैठकीस उपस्थित राहण्याबाबत पत्र पाठविले होते. कारण, बाळगंगा प्रकल्पाची वसूली बाकी आहे. समितीकडील अभिलेख्यानुसार ३.४४ कोटी रुपये प्रलंबित आहेत. परंतु, अतिरिक्त जिल्हाधिकारी व कार्यकारी अभियंता यांचे म्हणणे आहे की, २९ कोटी रुपये प्रलंबित आहेत. या संदर्भात सद्य:स्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, समितीचे मत बरोबर आहे. कारण, आतापर्यंत जे काम झाले त्याचे कार्यादेश मे, २००९ मध्ये देण्यात आले आणि जानेवारी, २०१० मध्ये काम सुरू झाले. साधारणत: मार्च, २०१२ पर्यंत हे काम सुरू होते. त्यानंतर कंत्राटदाराबरोबर काही वाद निर्माण झाले. केलेल्या कामाचे प्रदान आणि प्रत्यक्षात किती परिमाण झाले याबाबत वाद होता. मार्च २०१२ पासून हे काम बंद पडलेले आहे. जानेवारी, २०१० ते मार्च, २०१२ या कालावधीत जे काम झाले त्यासाठी माती, मुरुम, वाळू तसेच काँक्रीटसाठी खडी वापरण्यात आली होती. त्याची स्वामित्वधनाची एकूण रक्कम २९ कोटी २४ लाख रुपये आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२९ कोटी रुपयांमध्ये जुन्या व नवीन दराने किती रक्कम आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, फेब्रुवारी, २०१० पासून प्रती ब्रास २०० रुपये स्वामित्वधनाचे दर वाढले होते. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाचे ॲग्रीमेंट किती रुपयांचे आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, ॲग्रीमेंटमध्ये १०० रुपये प्रती ब्रास नमूद आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. म्हणजे १०० रुपयांच्यावर दर द्यावा लागेल असे मत समितीने व्यक्त केले असता, तशी तरतूद आहे. परंतु, प्रथम कंत्राटदाराने स्वामित्वधनाची रक्कम जमा करून चलन प्रोड्युस करावयाचे आणि विभाग त्याला रिएम्बर्स करील अशी प्रक्रिया त्यामध्ये आहे. देयकातून ८ कोटी ३१ लाख रुपयांची वसूली झालेली आहे.असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२९ कोटी रुपयांच्या अगेन्स्ट ८ कोटी ३१ लाख रुपयांची वसूली झालेली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, २९ कोटी २४ लाख रुपयांपैकी ८ कोटी ३१ लाख रुपयांची वसूली झालेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीला त्यावेळी २९ कोटी रुपये वसूली प्रलंबित असल्याचे सांगण्यात आले होते असे समितीने निदर्शनास आणले असता, २९ कोटी रुपये प्रलंबित नाहीत. आता २०.९३ कोटी रुपये प्रलंबित आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

स्वामित्वधनाच्या रकमेवर व्याज आकारले जाते काय?

तसेच त्या रकमेवर व्याज घेण्याची पद्धत आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, व्याज घेतले जात नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एकदा डिमांड रेज केली आणि त्यानंतर पैसे भरले नाहीत तर व्याज द्यावे लागते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने २९ कोटी रुपयांची डिमांड रेज केलेली आहे काय? ५ कोटी ८८ लाख रुपयांची डिमांड केलेली आहे अशी विचारणा समितीने केली असता, तहसीलदार यांनी ५,८७,५१,२३६/- रुपयांची डिमांड नोटीस दिलेली आहे. त्यांचे कार्यालय वगैरे जप्त केले होते. परंतु, त्यांच्या विभागाने सांगितले की, त्यांनी जे काम केले ते २९ कोटी रुपयांच्या जवळपास आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाकडे स्वामित्वधन घेण्याचे कोणतीही यंत्रणा नाही. त्यांनी सांगितले तरच स्वामित्वधनाची रक्कम वसूल करणार आहात काय? कंत्राटदाराला खाण दिली जाते. त्याचे मोजमाप करण्यासाठी यंत्रणा आहे. विभाग ज्यावेळी खाण भाडेपट्टीवर देतो त्यावेळी खाण कोठे आहे, तो मुरुम कोठून काढणार आहे या सर्व गोष्टी निश्चित केलेल्या असतात असे मत समितीने व्यक्त केले असता, विभाग ज्यावेळी एखाद्या कामाच्या अनुषंगाने स्वामित्वधन वसूल करतो त्यावेळी कामावर किती मटेरिअल वापरण्यात आले आहे याचा अंदाज घेऊन त्या आधारावर स्वामित्वधनाची वसूली करतात. मघाशी पाटबंधारे विभागाच्या सचिवांनी सांगितले की, त्यांच्या हिशोबानुसार जे काम झालेले आहे त्या अनुषंगाने अजून स्वामित्वधनाची २०.९३ कोटी रुपये वसूली शिल्लक आहे. जे काम झालेले आहे त्यावरुन त्यांनी हे स्पष्ट केलेले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभाग जे सांगत आहे ते समितीला मान्य आहे. परंतु, ज्यावेळी काम झाले त्यावेळी किती काम झाले याबाबत विभागाने त्यांच्याकडून माहिती घेतली होती काय? म्हणजे विभागाने काहीच करावयाचे नाही. पाटबंधारे विभागाने कळविले तरच माहिती होईल. महालेखाकारांनी हा परिच्छेद काढला नसता तर शासनाचा महसूल बुडला असता असे मत समितीने व्यक्त केले असता, या कामाचे दोन भाग आहेत. पहिला भाग असा आहे की, जी कार्यान्वयीन यंत्रणा आहे ती सुद्धा शासकीय यंत्रणा आहे. म्हणजे जे लोक काम करीत आहेत ते सुद्धा शासकीय अधिकारी/कर्मचारी आहेत आणि शासनाला जी रक्कम देय आहे ती देयकातून वसूल करण्याची त्यांची सुद्धा जबाबदारी आहे. त्या अनुषंगाने ते दक्षता घेतात आणि त्यांनी वेळोवेळी स्वामित्वधनाची रक्कम वसूल केलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

स्वामित्वधनाची रक्कम वसूल केलेली नाही असे महालेखाकारांचे म्हणणे आहे. दरातील फरक मान्य करु. परंतु, परिमाणामध्ये सुद्धा डिस्प्युट आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, दरातील फरकामुळे यामध्ये जास्त फरक पडलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२९ कोटी रुपये आहेत. २०० रुपयांप्रमाणे १४.५ कोटी रुपये होतात. विभागाने ६ कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. यामध्ये ८ कोटी रुपयांचा फरक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, जिल्हाधिकाऱ्यांनी ५ कोटी ८८ लाख रुपयांची मागणी केली होती. जिल्हाधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी सुद्धा कामाला भेट देऊ शकतात, कामावर किती मटेरिअल वापरण्यात आले याचे मोजमाप करु शकतात आणि त्या अनुषंगाने डिमांड रेज करु शकतात. मात्र ज्याअर्थी शासकीय विभाग आहे आणि शासकीय विभागामार्फत हे काम होते त्याअर्थी ते स्वत:हून त्यांच्या देयकातून स्वामित्वधनाची रक्कम कपात करून घेतात. या प्रकरणामध्ये अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, त्यांनी जी डिमांड रेज केली होती ती ५.८८ कोटी रुपयांपुरती मर्यादित होती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाचा कनिष्ठ अभियंता किंवा इतर अधिकारी नोंद करतात. त्यामुळे किती परिमाणाचे काम झाले याची त्यांना माहिती असते. कारण, कंत्राटदाराला देयक अदा करतो. त्यावेळी त्यांनी किती मटेरिअल वापरले, किती काम झाले, त्यानुसार स्वामित्वधनाची रक्कम भरण्यात आली किंवा नाही हे बघण्याचे काम सुद्धा जलसंपदा विभागाचे आहे. मग स्वामित्वधनाची रक्कम न भरता देयक कसे अदा करण्यात आले, असा प्रश्न निर्माण होतो. जलसंपदा विभागाने या संदर्भात स्पष्टीकरण द्यावे असे समितीने सूचित केले असता, ठेकेदाराकडून वेळोवेळी वसूली करण्यात आलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या प्रकरणी दराच्या बाबतीत वाद नसून परिमाणाच्या बाबतीत वाद आहे. या प्रकरणात परिमाणाच्या बाबतीत दुप्पट फरक आहे.विभागाने दराच्या बाबतीत न सांगता अगोदर परिमाणाच्या बाबतीत सांगावे असे समितीने सूचित केले असता, या कामामध्ये एकूण अर्थवर्क हे ३९ लाख ६८ हजार इतके झाले होते. या अर्थवर्कवर वर्कआऊट केलेले २९ कोटी २४ लाख रुपये आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समितीचे मत आहे की, २९ कोटी २४ लाख रुपयांतील १४ कोटी रुपयांच्या बाबतीत नंतर चर्चा करु या. परंतु उर्वरित १४-१५ कोटी रुपयांच्या बाबतीत स्पष्टीकरण द्यावे. जलसंपदा विभागाने १४ कोटी रुपये स्वामित्वधनाची रक्कम कापून महसूल विभागाकडे का जमा केली नाही? मुळात शासन निर्णयानुसार ठेकेदाराच्या देयकातून स्वामित्वधनाची रक्कम कपात करून ती महसूल विभागाकडे जमा करण्याची जबाबदारी जलसंपदा विभागाची होती. विभागाने आपली जबाबदारी पार का पाडली नाही ? १४ कोटी रुपयांपैकी ८ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत. त्यामुळे उर्वरित ६ कोटी ३० लाख रुपये कपात करूनच ठेकेदारास देयक अदा करावयास पाहिजे होते. आपण प्रति ब्रास १००/- रुपये दराने स्वामित्वधनाची रक्कम वसूल करावयास पाहिजे होती. अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, २९ कोटी रुपये वसूल करावयाचे आहेत. एवढी मोठी रक्कम वसूल करावयाची असल्यामुळेच समितीने विभागाच्या सचिवांना या ठिकाणी बोलविले. या पलीकडे जाऊन आपण सांगत आहात की, सिडको स्वामित्वधनाची रक्कम देण्यास तयार नाही. मुळात हा प्रकल्प सिडकोचाच आहे. जलसंपदा विभागाच्या सचिवांनी हे स्पष्ट केले पाहिजे की, तशा प्रकारचा शासन निर्णय अस्तित्वात आहे काय ? असल्यास, जर विभागाच्या अधिकाऱ्यांनी ठेकेदाराकडून स्वामित्वधनाची रक्कम कपात केली नसेल तर ही त्यांची चूक आहे काय, असल्यास, त्यांच्याविरुद्ध विभाग काय कारवाई करणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, या कामाच्या निविदेमध्ये स्वामित्वधनाची रक्कम वसूल करण्याच्या बाबतीत तीन तरतुदी आहेत. या कामाच्या निविदा शर्ती व अटीमध्ये क्लॉज-३६ मध्ये नमूद केले आहे की, "All quarry fees, royalties, octroi dues and ground rent for stacking materials, construction materials if any should be paid by contractor." याचाच अर्थ ठेकेदाराने स्वामित्वधनाची रक्कम महसूल विभागाकडे चलनाद्वारे जमा करावयास पाहिजे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने असा शासन निर्णय काढला आहे की, शासकीय कामात जेवढे मटेरियल वापरण्यात येईल तेवढी कपात करून ती रक्कम जलसंपदा विभागाने महसूल विभागाकडे जमा करावी. अशा प्रकारचा जी.आर. जलसंपदा विभागाने काढला आहे काय ? या संदर्भातील शासन निर्णय २०१० पर्यंत अस्तित्वात नव्हता. कदाचित २०१२-१३ मध्ये तो शासन निर्णय निर्गमित झाला असेल, पूर्वी स्वामित्वधनाची रक्कम ठेकेदार जमा करीत होते. पण आता ठेकेदाराने स्वामित्वधनाची रक्कम भरल्याची पावती सादर केल्याशिवाय देयक अदा करावयाचे नाही, असा शासन निर्णय काढण्यात आलेला आहे. परंतु आता स्वामित्वधनाची रक्कम भरल्यानंतरच काम करता येते. तसेच दुसरी बाब अशी की, एका क्वॉरितून दोन ठेकेदारांना माल जाऊ शकतो. एका क्वॉरितून माती, दगड आणले असतील तर त्या ठिकाणी कार्यरत असलेले तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार, तहसीलदार यांनी लक्ष ठेवावयास पाहिजे की, त्या क्वॉरितून किती माल गेला आहे. रायगड जिल्ह्यातील एका क्वॉरितून केवळ बाळगंगा नदी प्रकल्प या एकाच ठिकाणी माल गेला नसून जेएनपीटी, रिलायन्स आणि इतर ठिकाणीसुद्धा माल गेला आहे वास्तविक पाहता तेथील महसूल विभागाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी क्वॉरिची दररोज किंवा किमान ८ दिवसांतून एकदा तरी तपासणी करावयास पाहिजे. समितीची मागणी आहे की, सॅटेलाईट सर्व्हेच्या माध्यमातून पूर्वी त्या क्वॉरिमध्ये किती माल होता आणि किती मालाचे उत्खनन केले हे समजू शकते. अशा प्रकारचा सर्व्हे करण्याच्या बाबतीत विभागाकडे अर्ज सुद्धा सादर केलेला आहे. जो मुद्दा मांडलेला आहे त्या बाबतीत कार्यवाही करावयास पाहिजे असे समितीने सूचित केले.

परिच्छेद क्र. ७.२.३.३३ शास्ती कमी वसूली/वसूली न करणे :—

२.५ ठाणे जिल्ह्यामध्ये विभागाने शास्ती आणि मुद्दलही वसूल केलेले नाही असे महालेखाकार यांचे म्हणणे आहे. मे.अभिराज ॲग्रो फार्म, मो.हाजी आदम, या दोन्ही प्रकरणात आरआरसी इश्यू केली नाही. पण ७/१२ नोंद केली आहे. महालेखाकार यांचे म्हणणे आहे की, आरआरसी इश्यू का केली नाही? अशी विचारणा समितीने केली असता, संबंधित जिल्ह्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी उपस्थित आहेत. समितीच्या अनुमतीने ते या संबंधातील माहिती देतील असे विभागीय सांगितले.

समितीची अनुमती आहे. ससून घर कुठे आहे? अशी विचारणा समितीने केली असता, ते पालघर जिल्ह्यामध्ये आहे. ज्यावेळी लेखापरीक्षण परिच्छेद निघाला तेव्हा तो भाग ठाणे जिल्ह्यामध्ये होता असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागीय प्रतिनिधी कोणत्या प्रकरणासंबंधात माहिती देणार आहात? अशी विचारणा समितीने केली असता, दोन्ही प्रकरणासंबंधी माहिती देत आहे. या दोन्ही प्रकरणात आरआरसीची कारवाई सुरू केली आहे. हाजी आदम प्रकरणात क्रमांक ५ ची नोटीस देण्यात आली असून लिलाव देखील ठेवण्यात आला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

पहिल्या प्रकरणात क्रमांक ५ ची नोटीस दिली नाही काय? पहिल्या प्रकरणात नोटीस क्रमांक ३ कधी पाठविण्यात आली आहे? अशी विचारणा समितीने केली असता, पहिल्या प्रकरणात ३ पर्यंत नोटीसा गेल्या आहेत. त्यानंतरची पुढची कारवाई बाकी आहे. आता दिनांक ६.२.२०१८ रोजी नोटीस पाठविली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

तीन आणि पाच मध्ये फरक का येत आहे? क्रमांक ३ ची नोटीस दिल्यानंतर क्रमांक ५ ची नोटीस कधी देण्यात येते? अशी विचारणा समितीने केली असता, साधारणतः १५ दिवसांचा कालावधी दिला जातो असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने ७/१२ वर नोंद घेतली. पण आरआरसी जास्त दिवस प्रलंबित ठेवण्याचे कारण काय आहे ? तीन वर्षे प्रलंबित का ठेवण्यात आले? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१५ मध्ये ही प्रकरणे पालघर जिल्ह्यांमध्ये आलेली आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समितीचा मुद्दा तो नाही. ७/१२ वर नोंद केली आहे. आरआरसी कार्ड इश्यू केले नाही. हा विषय लोकलेखा समितीसमोर आल्यामुळे आता आरआरसी कार्यवाही करत आहात. आरआरसी न करण्याचे कारण काय होते ? अशी विचारणा समितीने केली असता, आरआरसी आता केलेली नाही. या प्रकरणामध्ये ठाणे खणिकर्म अधिकाऱ्याने वसईला भेट दिली होती आणि त्या नंतर त्यांनी ठाणे जिल्हाधिकारी यांना एक पत्र पाठविले. त्यांनी १९८१ च्या प्रकरणाचा उल्लेख होता. महालेखाकार यांनी त्या पत्राच्या आधारावर त्रुटी काढलेली आहे. त्यावेळी फक्त नोटीसेस देण्यात आल्या होत्या. ती प्रकरणे येथे आल्यानंतर एसडीओ यांनी रितसर आदेश पारित केला. त्यानंतर डिमांड नोटीस देण्यात आली. वसूली करीत नाही म्हणून बोजा ठेवला. वसूली होईल असे वाटले होते. परंतु, अजून वसूली झाली नाही म्हणून आरआरसीची कारवाई करण्यास सुरूवात केलेली आहे. एका प्रकरणात दिनांक ५ जून व ६ जूनमध्ये लिलाव ठेवण्यात आले. एका प्रकरणामध्ये तिसरी नोटीस देणे बाकी आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

यासंबंधात सचिवांनी एक परिपत्रक काढले पाहिजे की, अशी बाकी असेल तर बोजा चढवावा आणि इतक्या दिवसात कोणत्याही परिस्थितीत आर.आर.सी. केली पाहिजेत. आज कसे आहे की, त्यांना वाटले तर ती केली. असे जर केले तर जेवढा कालावधी घ्यायचा असेल तो घ्यावा. याबाबतीत अजून काही होत नसेल तर ते चुकीचे आहे. यासंबंधातील प्रक्रिया ही सुरू झाली पाहिजे. असे परिपत्रक काढले तर सिस्टीम बसू शकेल. श्री. देवेंद्र गुलाब जोशी यांच्या प्रकरणात पावत्यांमध्ये खाडाखोड केली आहे. त्यासंबंधात गुन्हे दाखल केले आहेत काय? असे प्रकार सर्रास होत आहेत. मातीच्याच नाही तर वाळूसह सर्वच गौण खनिजामध्ये असे प्रकार होत असतात. ते थांबले पाहिजे. १३० पावत्यांमध्ये खाडाखोड केलेली आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, या प्रकरणात तहसीलदार, वसई यांनी दंड केला होता. त्या दंडावर उप विभागीय कार्यालय भिवंडी येथे अपील झाले. ते प्रकरण अपीलार्थीच्या विरोधात गेल्यानंतर ते अतिरिक्त जिल्हाधिकारी यांचेकडे गेले. तेथे उप जिल्हाधिकारी (अपील) असे पद आहे. तेथे सुनावणी झाल्यानंतर तहसीलदारकडे प्रकरण फेर सुनावणीसाठी आले. तपासणी केल्यानंतर त्यांना आढळले की, इतके इतके पासेस चुकीचे आहेत. इतके इतके पासेस बरोबर आहेत. जे चुकीचे पासेस होते त्याबाबत दंडात्मक कारवाई करून वसूली केलेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

फसवणुकीचे गुन्हे का दाखल करण्यात आले नाहीत? ज्यांनी खाडाखोड केली त्यांच्यावर कारवाई का करण्यात आली नाही? वसूली केली हे ठीक आहे. संबंधितांवर गुन्हे का दाखल केले नाहीत? अशी विचारणा समितीने केली असता, त्यावेळी गुन्हे दाखल केल्याचे दिसत नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

यासंबंधात सचिवांना काय वाटते? अशी विचारणा समितीने केली असता, खाडाखोड कोणत्या स्वरूपाची होती हे बघावे लागेल. त्यांनी आकडा खोडला होता की, नाव खोडले होते हे बघावे लागेल. ते प्रत्यक्षात बघत नाही तो पर्यंत निष्कर्ष काढणे शक्य नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

नावामध्ये खाडाखोड असेल तर त्यात महसुली नुकसान होत नाही. कोणतीही कारवाई न केल्यामुळे क्वांटीटीमध्ये फरक होत गेला असेल तर मग ते चुकीचे आहे. तेव्हा अशी कारवाई न करण्याचे कारण काय आहे, ज्यांनी ही कारवाई केली नाही त्यांच्यावर विभाग कारवाई प्रस्तावित करणार आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, समितीच्या अनुमतीने अतिरिक्त जिल्हाधिकारी यांना सूचित करतो की, पावत्या उपलब्ध असतील तर त्या स्वतः पहाव्यात व कशा स्वरूपाची खाडाखोड आहे आणि त्याचे स्वरूप पाहून कारवाई करावी. शासनाची फसवणूक करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला असेल तर पोलीस कारवाई करावी असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाच्या स्पष्टीकरणात नमूद करण्यात आले आहे की, "१२३ परवान्यांमध्ये खाडाखोड असल्याने २४६ ब्रास मातीचा भराव अनधिकृतरित्या केल्याचे सिद्ध झाले आहे." असे समितीने निदर्शनास आणले असता, थोडक्यात सांगावयाचे तर जे परवाने होते ते वैध धरण्यात आले नाहीत, ते अवैध धरण्यात आले. त्यामुळे पैसे वसूल करण्यात आले. परवाने अवैध धरण्यात आले हे मान्य करीत आहोत. समितीचा मुद्दा पोलीस केस केली पाहिजे असा आहे. संबंधितास सूचित केले आहे की, पावत्यांचे स्वरूप बघून घ्यावे आणि त्या अनुषंगाने पुढील कारवाई करावी असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अनधिकृत उत्खनन करण्यात आल्याचा उल्लेख विभागाच्या लेखी स्पष्टीकरणात आहे. कोणत्या भागात उत्खनन सुरू आहे हे पटवाऱ्याला माहीत असते. तेव्हा पटवाऱ्याने या सर्व गोष्टी निदर्शनास आणून दिल्या होत्या काय, नसल्यास, पटवाऱ्याच्याविरुद्ध कारवाई केली आहे काय ? कारण या सर्वांचे मूळ पटवारी आहे. तेव्हा विभागाने तेथील पटवाऱ्याविरुद्ध कारवाई केली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणात कोणत्याही प्रकारची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली नाही. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

तलाठी यांना गाव, क्षेत्र वाटून दिलेले असते. त्यामुळे सर्वात प्रथम पटवाऱ्याला निलंबित करून त्याच्यावर कारवाई केली पाहिजे. कारण त्याच्या मर्जीशिवाय काहीच होत नाही. दंड, शास्ती काही तरी केले पाहिजे. पावत्या, ब्रासची रक्कम कमी करून विषय संपवून टाकला आहे. अनधिकृतपणे कोणी असे करीत असेल तर त्याच्यावर शास्ती लावणे आवश्यक आहे. दिनांक १४.६.२०१७ रोजी शासनाने जी.आर.निर्गमित केला आहे. त्या जी.आर.च्या आधारानुसार त्यांची काही चूक आहे काय हे तपासून पहावे. या जी.आर.नुसार चूक असेल तर त्यांच्यावर कारवाई करावी असे समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

मे. इंडिया शिप अँड गोट ट्रेडिंग कंपनी यांची रिवाईज ऑर्डर एस.डी.ओ.यांनी काढली आहे. मूळ किंमत किती होती आणि सुधारित आदेश काढल्यामुळे किती रक्कम कमी झाली आहे ? त्यांनी रूपये २४,४८,०००/- इतक्या रकमेची वसूलीची ऑर्डर काढली आहे. त्यामुळे मूळ रक्कम किती होती ? अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणामध्ये तलाठी यांनी मूळ पंचनामा ६०३० ब्रासचा केला होता. त्याची रक्कम रूपये २६,८४,०००/- इतकी होती. त्यानंतर या प्रकरणाचे रिव्हीजन झाले. तहसीलदार, वसई यांच्याकडे प्रकरण फेर तपासणीसाठी पाठविले असता संबंधितांनी परवानगी घेतली होती असे आढळून आले. त्यांनी ५०१० ब्रासची परवानगी आणि मूळ पावत्या दिल्या. त्या मूळ रकमेतून वजा केल्यानंतर दंडात्मक आदेश देण्यात आले. वसई प्रांताचा आदेश झाल्यानंतर हे प्रकरण अतिरिक्त जिल्हाधिकारी, जव्हार, पालघर यांच्याकडे गेले. त्यांची ऑर्डर दिनांक ३.११.२०१७ रोजी प्राप्त झाली आहे. आता पर्यंत क्रमांक १ व २ संबंधातील नोटीसीची कारवाई झालेली आहे. आता आरआरसीची कारवाई सुरू झालेली आहे. ते आता पैसे देण्यास तयार नाहीत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

श्री. श्रीकांत पाटील यांच्यासंबंधात विभागाचे काय म्हणणे आहे ? त्यांना नोटीस कधी पाठविली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, श्री. श्रीकांत पाटील यांना २४:१० ची नोटीस बजावली होती. ही सन २०११ च्या दरम्यानची गोष्ट आहे. ही नोटीस रेती तहसीलदार, ठाणे यांनी बजावली होती. त्यानंतर तहसीलदार, वसई यांनी देखील नोटीस बजावली होती. त्यास श्री. श्रीकांत पाटील यांनी उत्तर दिले होते की, यासंबंधातील पावत्या माझ्याकडे आहेत तरी देखील मला नोटीस देण्यात आली आहे. याबाबत पुन्हा काहीही कारवाई झालेली नाही. विभागाकडे श्री. श्रीकांत पाटील यांच्या संबंधातील नस्ती नाहीत. त्यामुळे त्यांना बोलावून काय वस्तुस्थिती आहे हे विचारले असता त्यांनी आमच्याकडे वैध ट्रान्सपोर्ट पासेस दिलेले आहेत. त्यांनी मुंबई एअरपोर्ट ते उपनगर, परवानगी घेतली होती. ते पासेस डम्प केले होते. त्यात थोडा फरक आहे यासंबंधात ऑर्डर तपासून वसूलीची कारवाई करू असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सन २०११ चे प्रकरण २०१८ मध्ये आले. विभागाने हा विषय मार्गीच लावला नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, जे कसूरदार आहेत त्यांना विभागाकडून नोटीस गेली होती. एवढेच विभागाच्या नस्तीमध्ये आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०११ पासून कोणतीही कार्यवाही केली नाही. तुम्ही पत्र पाठविले, वसईच्या तहसीलदारने उत्तर दिल्यानंतर देखील कार्यवाही केली नाही. विभागाने पुन्हा तपासणी सुरू केली आहे काय, त्यात विभागाला काय आढळले. आता आरआरसी उपलब्ध करून देत आहात. आरआरसी देखील कुठे इश्यू होणार नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, यात परवानगीचे पासेसे सापडले आहेत. सर्वे नंबर तपासत आहोत. थोडा फार फरक आढळतो. तेव्हा तेवढे स्वामित्वधन वसूल करून घेतो असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

या प्रकरणात १५ दिवसात कारवाई करून समितीला अहवाल द्यावा. त्यांच्याकडे काही दंड असेल तर त्या संबंधातील नोटीस देखील निर्गमित करावी असे समितीने सूचित केले असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

कोल्हापूरच्या प्रकरणाबाबत माहिती द्यावी. येथे मुद्दा आहे की, ४४.६० लाख रुपये कमी वसूली झाली. परंतु विभागाचे असे मत आहे की, २३ लाख ८५ हजार रुपयांची वसूली करून शासन जमा केले. यामध्ये पाहिजे तेवढी वसूली झालेली नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, येथे स्पष्ट केले आहे की, ४१ व्यक्तींनी मंजूर परिमाणापेक्षा जास्त उत्खनन केले होते. त्यामध्ये १२२१० ब्रास उत्खनन होते व त्याच्या एक पट दंडाची रक्कम रुपये १४ लाख २ हजार २७५ व ९ लाख ७६ हजार ८०० रुपये भूपृष्ठ भाडे असे एकूण २३ लाख ८५ हजार १७५ रुपये वसूल करु शासनाकडे जमा केले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखापाल यांच्या अहवालामध्ये रु. ५८.५९ लाख कसे आले ? अशी विचारणा समितीने केली असता, कायद्यामधील कलम ४८ (७) मध्ये आता पाच पटींची तरतूद आहे ती पूर्वी तीन पट होती. परंतु यामध्ये एक पट घेतले असल्यामुळे महालेखापालांचा मुद्दा तोच आहे की, एक पट घेण्याची परवानगी काय आहे ? पूर्वीचा कायदा तीन पटीपर्यंत असा होता.ा याचा अर्थ, प्रत्येक प्रकरणात तीन पट दंड केला पाहिजे असा होत

नाही. तीन पटींच्या आत परिस्थितीनुरुप दंड करु शकतो. त्यामुळे या प्रकरणी संबंधित महसूल अधिकाऱ्यांनी एक पट दंड करण्याचा निर्णय घेतला होता. माहितीनुसार सदर व्यक्तीला परवानगी होती परंतु त्यापेक्षा अधिक उत्खनन केले होते. सर्रास विनापरवाना उत्खनन केलेले नव्हते. परवानगी घेऊन मंजूर परिमाणापेक्षा जास्त उत्खनन केल्यामुळे तीन पट दंड न करता एक पट दंड करण्यात आलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कोणाला एक पट, कोणाला दोन पट, कोणाला तीन पट किंवा कोणाला पाच पट दंड करायचा याबाबत सर्वांसाठी समान नियम केला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, याबाबत पूर्वी नियम नव्हता परंतु सन २०१७ मध्ये तसा नियम केला असून उत्तरामध्ये देखील तसे नमूद करण्यात आलेले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

उक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी विभागीय सचिवांची पुन्हा साक्ष घेतली. खनिजाच्या महसूल वसूलीशी संबंधित हा मुद्दा असून जलसंपदा आणि महसूल विभागामध्ये यावरुन एक वाद आहे. आणि म्हणून ७.२.३.३ या मुद्दयावर आता सविस्तर चर्चा करायची आहे. यावर पूर्वी सिडको पैसे देत नाही यावर चर्चा झाली होती. बाणगंगा प्रकल्पाबाबतचा हा मुद्दा आहे. तुमचा काही आपसात डिस्प्यूट आहे, लवाद सुरू आहे. प्रकरण न्यायालयात गेलेले आहे. परंतु शेवटी महसूलाची वसूली झाली पाहिजे. या दृष्टीने विभागाची काय भूमिका आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर बाणगंगा प्रकल्पाकरिता सिडको आणि जलसंपदा विभागाचा करारनामा झालेला आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

करारनामा महसूल विभाग, जलसंपदा विभाग आणि सिडकोचा देखील आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ ही यामध्ये आहे. त्याप्रमाणे डिपॉझिट वर्क म्हणून विभागाने त्यांना आवश्यक रक्कम दिलेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

स्वामित्वधन वसूलीचा जो प्रश्न आहे, कामाचे प्रदान केआयडीसीने केलेले आहे. त्यासंदर्भातील अटी व शर्तींचे कंत्राट सी आहे. त्याप्रमाणे दोन क्लॉजेस आहे. एका क्लॉजमध्ये क्लॉज क्रमांक ३६ आहे. त्याप्रमाणे क्लॉज वाचतो. Towards payment of quarry fees and royalties. All quarry dues, royalties, octroi dues and ground rent for extracting material, construction material, if any, should be paid by the contractor. त्याप्रमाणे स्वामित्वधन दायित्त्व असेल, त्याचे कंत्राटदाराला प्रदान करणे आवश्यक आहे. एक दुसरा क्लॉज ४४ क्रमांकाचा आहे. वाल्यूम ०१, सेक्शन ५ मध्ये पुढीलप्रमाणे दिलेले आहे. The contractor should utilise material due available from excavated stuff for bad filling. Royalty charges of all construction material are included in the estimate at the rate of Rs. 35.34/cu.m. Any increase or decrease in the rates will have effect its payments, recovery on submission of valid documents, challan, etc. "याप्रमाणे स्वामित्वधनाचे जे काही डयूज आहे, ते एक तर संबंधित विभागाला कंत्राटदाराने द्यायचे आहे. जर त्यामध्ये काही वाढ झाली तर त्याचे दस्तावेज किंवा चलन विभागाला किंवा केआयडीसीला सादर करतील. केआयडीसी याला रिएम्बर्स करतील, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

प्रत्यक्ष विभागाशी संबंधित काही नसले तरीही ते आता महसूल विभागाला पैसे देत नाहीत. ते म्हणतात की, विभागाला सिडको पैसे देत नाही. आता समितीच्या साक्षीमध्ये त्यांच्या सचिवांनी सांगितले की, सिडकोने हा विषय न्यायालयात टाकलेला आहे. तो लवादाचा निर्णय जुलै अखेरपर्यंत होणार आहे. आता समितीची बैठक ऑगस्टमध्ये होत आहे. यामध्ये शंभर रुपये प्रती ब्रासची जबाबदारी कंत्राटदाराची होती. त्यातील सहा कोटी रुपये कंत्राटदाराकडून वसूल झालेले नाहीत. अंदाजे १४ कोटी रुपये अतिरिक्त वाढ खर्चामध्ये नवीन दराप्रमाणे झालेली आहे. त्याची प्राथमिक जबाबदारी केआयडीसीची आहे. आणि आता दुसरी विभागाची आहे. आता हे कंत्राटदाराला भरण्याचे आदेश दिले पाहिजे. त्यावर उच्च न्यायालयातून स्थगिती आणलेली आहे. २० कोटी रुपये महसूलाचे प्रलंबित आहेत. वसूली का करीत नाही. ते म्हणतात की शासकीय काम आहे. केआयडीसी देत नाही. केआयडीसी म्हणते की त्यांना सिडको देत नाही. समिती विचारणा करते की, अंतिमतः प्रकल्प विभागाच्या मालकीचा आहे. विभागाच्या अखत्यारित काही प्रकरण असेल किंवा त्या लवादामध्ये असेल हे शासनाचे पैसे आहेत. डिपॉजिट बेसिसवर केलेल्या कामाची जबाबदारी शेवटी विभागाचीच आहे. ठेकेदार म्हणतो की, त्यांचे पैसे सिडको देत नाही. केआयडीसीही आमचे पैसे देत नाही. शेवटी या विषयावर विभागाने तोडगा काढला पाहिजे. यासाठीच विभागाला पाचारण केलेले आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये महालेखाकारांचा जो परिच्छेद आहे, त्यामध्ये स्वामित्वधनाच्या वसूलीचा मुद्दा आहे. कंत्राटामध्ये जे मुद्दे आहेत, त्याप्रमाणे एकतर ठेकेदाराने ती स्वामित्वधनाची रक्कम द्यायला पाहिजे होती. जर ठेकेदाराने दिली नाही तर केआयडीसीने त्यांच्या देयकातून वसूल करणे अपेक्षित होते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

देयकातून वसूल करु ठीक आहे, देयकाचे पैसे विभाग देत नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, त्यांचे हे प्रकरण लवादामध्ये गेलेले आहे. याची प्राथमिक जबाबदारी स्वामित्वधनाची ठेके आहे. हे कंत्राटामध्ये स्पष्टपणे येणे गरजेचे आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ज्यावेळी ही रक्कम वितरीत केली जाईल, त्यावेळी विभागाने ही रक्कम महसूल विभागाला ठेकेदाराने देय करणे आवश्यक आहे. तेवढे राखीव करून रक्कमेचे वितरण करणे आवश्यक आहे. यामध्ये हा विषय आता वादग्रस्त झालेला आहे. १४ कोटी रुपये तर द्यायचेच आहेत. रुपये १४ कोटीची अधिकची जबाबदारी केआयडीसीची आहे. रॉयल्टीमध्ये वाढ झाल्यामुळे ही अधिकची जबाबदारी वाढलेली आहे. केआयडीसी म्हणते की, सिडको देत नाही म्हणून आम्ही भरणार नाही. सात कोटी रुपयांच्या प्रश्नाबाबत बोलायचे झाले तर ठेकेदाराला पैसे देणार त्यावेळी हे सात कोटी रुपये त्यातून कापूनच पैसे त्याला द्यावे, अशी भूमिका घेतलीच पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले असता, केआयडीसीकडून स्वामित्वधनाची मागणी आली, त्यामध्ये विभागाला अडचण नाही. याची वसूली झालेली नाही. महालेखाकारांच्या परिच्छेदामध्ये आलेले आहे की, रकमेचा भरणा केलेला नाही. केआयडीसी आणि ठेकेदारामध्ये हा करार आहे, त्यामध्ये प्रत्यक्ष विभाग सहभाग घेऊ शकत नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ज्यावेळी जलसंपदा विभागाने जबाबदारी टाळली त्यामुळे समितीला आपल्याला बोलवावे लागले. हा उपक्रम शासकीय आहे. केआयडीसीला विभागाने रक्कम द्यावी. केआयडीसी ते शासनाला देईल. त्यामुळे १४ कोटी रुपयांचा प्रश्न सुटेल. सात कोटी रुपये ठेकेदाराकडून घ्यायचे आहेत, त्यांचे देयक ज्यावेळी अंतिम होईल, त्यावेळी इतके रुपये कापूनच त्याला द्यावेत. महसूल सचिव येथे उपस्थित आहेत. महसूल सचिवांनी दोघांना बसवून त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. या विषयावर समितीमध्ये मध्ये चर्चा होणे आवश्यक नाही. याबाबत तीन विभागांनी ठरवून समितीसमोर केवळ निर्णय सांगितला पाहिजे. यावर समिती निर्णय करु शकत नाही. केआयडीसीने आणि सिडकोने असे करावे आणि महसूल विभागाने असे करावे, असा निर्णय समिती घेऊ शकत नाही. वसूली महसूलची झालेली नाही. यामुळे महसूल विभागाने दोघांना बोलावून जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, महसूल विभागाचा या प्रकरणामध्ये जो संबंध आहे, तो वसूलीपुरता मर्यादित आहे. मूळतः या प्रकरणामध्ये विभागाचे जे धोरण आहे, ते असे आहे की, ज्यांनी एस्टीमेट केले असेल त्यांनी स्वामित्वधन भरले पाहिजे. त्या अनुषंगाने जर बघितले तर या प्रकरणात स्वामित्वधन भरण्याची जी जबाबदारी आहे, ती यंत्रणेची होती. ज्यांनी प्रत्यक्ष उत्खनन केलेले आहे. त्यांचे जर बॅक टू बॅक ॲग्रीमेंट असेल की हे डिपॉझिट कंट्रीब्यूशनचे काम आहे. त्यामुळे या कामावर जेवढा खर्च होणार आहे, तो सिडकोने दिला पाहिजे. असा जर काही करार असेल तर त्यांनी ते सिडकोवर घेतले पाहिजे. आता विभागावर अधिकचा भूर्दंड झालेला आहे. स्वामित्वधनाचे दर सुधारीत झालेले असल्यामुळे विभागाला अतिरिक्त रक्कम भरावी लागत आहे. त्यामुळे अतिरिक्त रक्कम सिडकोने दिली पाहिजे. अशी मागणी त्यांनी सिडकोकडे केली पाहिजे. असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

मागील बैठकीत जलसंपदा विभागाचे सचिव साक्षीला आले होते, त्यांनी स्पष्टपणे म्हटले पाहिजे की, सिडको रक्कम देत नाही म्हणून आम्ही अडलो, विभागाकडे या प्रकल्पाकरिता पैसे नाहीत. याकरिता अर्थसंकल्पीय तरतूद नाही. You are doing on Deposit basis work and that is why we are demanding CIDCO but they are not releasing the fund and that is why there is a problem. हा विषय सामोपचाराने सोडविण्यासाठी मागील वेळी देखील सिडकोला बोलाविले होते. त्यावेळी ते आले नाही. आज सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक आलेले आहेत. परंतु जलसंपदा विभागाचे प्रतिनिधी आलेले नाहीत. जे सिडकोला डिपॉझिट बेसिसवर द्यायचे आहेत, ते केआयडीसी देणार नाही. ते आपण दिले पाहिजे. जे द्यावयाचे आहे ते आपण दिले पाहिजे, कंत्राटदाराचे बाकीचे लायबलीटीचे फरकाची रक्कम ही जेव्हा तुम्ही त्यांचे पैसे प्रदान करणार तेव्हा तितके पैसे कपात करून सरकार जमा करण्यात यावेत एवढीच समितीची मागणी आहे. कंत्राटदाराचे व यांचा करारनामा काय आहे हे समितीस माहिती नाही. लवादामध्ये गेल्यानंतर तेथे त्याचा उल्लेख नसेल तर सिडको पैसे देणार नाही. फरकाची रक्कम देण्याबाबत करारनाम्यामध्ये कोठे उल्लेख नसेल तर कसे करणार? कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ म्हणजे केआयडीसी हा महाराष्ट्र शासनाचा उपक्रम आहे. त्यांनी यांचे काम डिपॉझीट बेसीसवर केल्यानुसार त्यांचे म्हणणे आहे की, ही रक्कम वाढवून पाहिजे असेल तर सिडकोने द्यावयाचे आहेत. त्याबाबत समिती सातत्याने मागणी करीत आहे. याबाबत दोन वेळा साक्ष झालेली आहे. समितीने मागील वेळी देखील सिडकोला बोलावले होते. सिडकोला जी रक्कम देणे भाग आहे, ती त्यांनी प्रदान करावी. बाकीच्या पैशाबाबत जेव्हा केआयडीसीची मागणी होईल तेव्हा केआयडीसीने कंत्राटदाराकडून वसूल करावेत. असे समितीने सूचित केले असता, विभागाने सुरूवातीला सांगितले होते की, या प्रदानामध्ये दोन भाग आहेत, अतिरिक्त जे दर बदललेले आहेत त्यामुळे १४.६१ कोटी रुपये रक्कम देय आहे, त्या रकमेच्या स्वामित्वधन दरामध्ये १०० रुपयांवरुन २०० रुपयावर फरक झाल्यामुळे १४.६१ कोटी रुपये झाले आहेत. ती रक्कम भरण्याचा विषय सामोपचाराने सोडवावा लागेल. मात्र यातील दुसरा भाग रु. ६.३० कोटीचा आहे. तो कंत्राटदारांकडून वसूल व्हायचा होता, त्याची जबाबदारी केआयडीसीची आहे. त्या त्या वेळी ती कंत्राटराकडून मुळ दराप्रमाणे वसूल करणे आवश्यक आहे. रु.६.३० कोटीची जबाबदारी केआयडीसीची आहे. केआयडीसीने देयकातून ती वसूल केली पाहिजे. ही त्याची जबाबदारी आहे. रु. १४.६१ कोटी बाबत सिडको व यांच्यात काय करार झालेला आहे, त्या आधारावर निर्णय करावा लागणार आहे. त्याकरीता नगरविकास विभाग (१) चे प्रधान सचिव हे सिडकोचे नियंत्रण सचिव आहेत. त्यांनी व जलसंपदा विभागाचे सचिव व महसूल विभागाचे सचिव यांनी एकत्र येऊन निर्णय घ्यावा असे समितीने सुचित केले असता, याबाबत सर्वांनी ठरवून समितीला सांगावे की, यावर कोणता तोडगा काढला आहे. समितीचा वेळ घेण्याऐवजी हे करावे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

The M.D., CIDCO is himself empowered to do. कारण त्यांनी यांचेकडून कंत्राट घेतलेले नाही. केआयडीसीने डिपॉझीटवर काम केलेले आहे. ही रक्कम त्यांनी भरावी लागणार आहे. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित तीन विभागाच्या सचिवांची बैठक आयोजित करावी व १५ दिवसांत निर्णय करण्यात यावा. याबाबत समितीला अवगत करावे काय निर्णय झाला आहे.

उपरोक्त तीन विभागाचे सचिव, केआयडीसीचे ईडी व सिडकोचे एमडी यांनी एकत्र बसून ठरवावे की, शासनाला या जलसंपदा विभागाच्या प्रकल्पावर काय करावयाचे आहे. हे काम त्यांनी डिपॉझीट बेसीसवर केले आहे, म्हणून त्याचे उत्तरदायित्व मुळतः सिडकोचे आहे. ही सदर ट्रान्सफर करण्याचा निर्णय घेण्यासाठी १५ दिवसाच्या आत एक बैठक आयोजित करण्यात यावी. त्यामध्ये तोडगा काढण्यात यावा. बाकीची सहा कोटी रुपये रक्कम हा विषय केआयडीसी व कंत्राटदार यांच्यामधील आहे. त्यांच्याकडील डिपॉझीट घेण्याकरीता सूचनाही दिली होती, त्यावर उच्च न्यायालयातून स्थगिती आणली आहे, असे समितीला सांगण्यात आले आहे. हा विषय बाजूला ठेऊन १४ कोटी रुपये शासनाला आपसात ट्रान्सफर करून द्यावयाचे आहेत. ट्रान्सफर एंट्रीच करावयाची आहे. किमान याबाबत निर्णय घेतला पाहिजे. १५ दिवसाच्या आत बैठक घेऊन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला देण्यात यावी, असे समितीने विभागास सूचित केले.

परिच्छेद क्रमांक : ७.२.३.४ : भूई भाडे आणि प्रतिपूर्ती अथवा कब्जे हक्क किंमत :-

२.६ समितीला असे वाटते की, सदर परिच्छेदावर विभागाने दिलेले उत्तर योग्य आहे. त्यावर विभागीय सचिवांनी समितीचे आभार मानले.

When you give land for mining then how can you ask for ground rent ? अशी विचारणा समितीने केली असता, जेव्हा विभाग भाडेपट्टीवर जागा देतो तेव्हा संबंधित व्यक्तीला जमीन विकसित करण्याचे अधिकार देतो. सदर व्यक्तीला त्या जागेवर विकास करता येतो, बांधकाम करता येते व त्याचा उपभोग घेता येतो. ज्यावेळी खनिज उत्खननासाठी भाडेपट्टीवर जमीन देतो त्यावेळी सदर जमीन फक्त खनिजपट्ट्यासाठी देतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याबाबत शासन निर्णय काढण्याची देखील आवश्यकता नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, होय, कारण तसे अपेक्षितच नाही. खनिजपट्टयासाठी विभागाचे नियम निश्चित आहेत. विभाग त्यांच्याकडून डेड रेंट, सर्फेस रेंट, स्वामित्वधन व एन.ए. वसूल करतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्र.७.२.३.५ शिखर स्तरावर माहितीचा अभाव :—

२.७ या परिच्छेदातील 'अ' आणि 'ब' च्या बाबतीत समितीचे असे मत आहे की, ५२ टक्के रेती घाटांचे लिलाव होऊ शकले नाहीत. या विषयाच्या बाबतीत सविस्तर खुलासा सादर करण्यास समितीने सूचित केले असता, स्थानिकरित्या लिलावास प्रतिसाद न मिळणे, ही वस्तुस्थिती असून ती अनेक ठिकाणी पहावयास मिळते. काही ठिकाणी कार्टेल देखील असू शकेल, असे विभागाला वाटते. अधिकृत लिलाव होऊ द्यावयाचे नाही, त्यामध्ये सहभागी व्हावयाचे नाही आणि नंतर अनधिकृत उत्खननासाठी प्रयत्न करावयाचे असेही प्रघात काही ठिकाणी दिसून आलेले आहेत. यामुळे काही ठिकाणी लिलावास प्रतिसाद मिळाला नाही. लिलाव व्हावा यासाठी शासनाने विविध धोरणात्मक निर्णय घेतलेले आहेत. सुरूवातीला अपसेट प्राईस जाहीर करतो व त्यानंतर तीन वेळा लिलाव पुकारल्यानंतर सुद्धा त्यास प्रतिसाद मिळाला नाही तर २५ टक्के दर कमी करून विभागीय आयुक्तांच्या स्तरावर लिलाव करण्यात येतो. शासन स्तरावर हीच भूमिका आहे की, विभागाच्या माध्यमातून लिलाव व्हावेत आणि अधिकृतरित्या लोकांना वाळू उपलब्ध व्हावी असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने राज्याचे सरसकट चित्र समितीसमोर मांडले आहे. परंतु या परिच्छेदाच्या अनुषंगाने या प्रकरणी ५२ टक्के लिलाव झालेले नाहीत. विभागाने लिलाव जाहीर केले होते काय, किती प्रकरणात लिलावांना प्रतिसाद मिळाला नाही, किती प्रकरणांत अपसेट प्राईस आली नाही, किती प्रकरणात विभागीय आयुक्तांनी २५ टक्के दर कमी करून परत लिलाव केले ? या प्रश्नांची सविस्तर माहिती मिळणे गरजेचे आहे. कारण हा फार मोठा विषय आहे. रेती घाटांचे ५२ टक्के लिलाव न होणे हे योग्य नाही. समितीला संपूर्ण लिलावांच्या बाबतीत सविस्तर माहिती हवी आहे. ही संपूर्ण माहिती मिळाली तरच समिती त्या बाबतीत निष्कर्ष काढू शकेल असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीने विचारलेली माहिती सध्या विभागाकडे उपलब्ध नाही. या बाबतची सविस्तर माहिती संकलित करून समितीला नंतर सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या परिच्छेदातील 'अ' आणि 'ब' हे दोन्ही विषय प्रलंबित ठेवण्यात आले.

'क' मध्ये नमूद केलेल्या "लिलावासाठी पर्यावरण मंजुरी" या मुद्याच्या अनुषंगाने समिती विशद करु इच्छिते की, नागपूर आणि कोल्हापूरच्या बाबतीत माननीय महसूल मंत्र्यांनी फेब्रुवारी, २०१४ मध्ये आदेश पारित केले होते. विभागाने नमूद केले आहे की, रेती घाटापर्यंत जाण्यासाठी झुडपी जंगलातून रस्ता असल्यामुळे वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांनी तो बंद केला होता. माननीय महसूल मंत्र्यांचे फेब्रुवारी, २०१४ चे आदेश आहेत की,

it was mentioned that providing alternate road for sand excavation was not possible. पण तो रस्ता उपलब्ध होऊ शकला नाही. परिणामी रेती उत्खनन झालेले नाही आणि त्यामुळे महसुलाची हानी झाली. या बाबतीत विभागीय सचिवांचे काय मत आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणी विभागाने खुलाशामध्ये सादर केले आहे की, लिलावाच्या वेळी रेती घाटापर्यंत जाणारा रस्ता झुडपी जंगलातून दाखविला होता. परंतु त्यावर वन परिक्षेत्र अधिकारी, पारशिवनी यांनी हरकत घेतल्यामुळे तो रस्ता उपलब्ध होऊ शकला नाही. परंतु एक संभाव्य रस्ता सर्व्हे क्र. ५ हा खाजगी मालकीचा होता. तो रस्ता रेती घाटाकरिता देण्यास जमीन मालकाची सहमती आहे असा अहवाल होता. मात्र प्रत्यक्षात तो रस्ता उपलब्ध होऊ शकला नाही. रस्ता उपलब्ध नसल्यामुळे ईएमडी परत करण्याचा निर्णय मंत्री महोदयांनी घेतला होता. त्या अनुषंगाने ईएमडीची रुपये १३,१८,१५०/- इतकी रक्कम त्यांना परत करण्यात आली असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परंतु नाशिकमध्ये तर विभागाने लिलावच केला नाही. नाशिकमध्ये लिलाव न करण्याची कारणे काय आहेत? नाशिकमध्ये केवळ ५ पैकी २ ठिकाणीच लिलाव केले अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने नाशिकमध्ये पाचही रेती घाटांचा लिलाव केला होता. मात्र ५ रेती घाटांपैकी २ रेती घाटांची उर्वरित रक्कम न भरल्यामुळे त्यांनी जमा केलेली १/४ रक्कम एप्रिल व जून महिन्यामध्ये जप्त करण्यात आली.

उर्वरित तीन रेती घाटांबाबत ऑगस्ट, २०१२ मध्ये ही रक्कम जप्त केली. १/४ रक्कम जप्त करून त्या कंत्राटदाराला काळ्या यादीमध्ये टाकण्यात आले आहे. कारण त्यांनी उर्वरित ३/४ रक्कम भरली नव्हती. ५ प्रकरणांमध्ये १/४ रक्कम जप्त केली व त्यांना काळ्या यादीमध्ये टाकण्यात आले असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जप्त केल्यानंतर फेर लिलाव झालेला नाही हा विषय आहे. सदर रक्कम कधी जप्त करण्यात आली आहे अशी विचारणा समितीने केली असता, तीन रेती घाटांबाबत १/४ रक्कम जप्त करून कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याचे काम दिनांक ३ ऑगस्ट, २०१२ रोजी केले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ऑगस्ट महिन्यात रक्कम जप्त केली तर त्याचा पुन्हा फेर-लिलाव कसा होईल. तसेच मूळ लिलाव कधी झाला होता अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणात मूळ लिलाव १३ डिसेंबर, २०११ रोजी झालेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने हे रेती घाट ऑगस्ट मध्ये जप्त केले आहेत. रेती काढण्याची वेळ मे व जून मध्ये संपते. ऑगस्ट मध्ये रक्कम जप्त केली तर ते नवीन वर्षे सुरू होते. शासनाने तातडीने निर्णय घेतला असता आणि फोरफिट केले असते तर २५ टक्के रक्कम कमी करून नवीन फेरलिलाव करता आला असता. यामध्ये विभागाने ८ महिन्यांच्या कालावधी घालविला आहे. त्यांची आठ महिने वाट बघितल्यामुळे पूर्ण वर्षे निष्फळ गेले आहे. २५ टक्के रकमेमध्ये विभाग समाधानी आहे. विषय असा आहे की, कंत्राटदराने पैसे जमा केले नाही, हंगाम जात होता, विभागाने त्यांची रक्कम जप्त करून त्यांना काळ्या यादीत टाकून फेर निविदा काढायला पाहिजे होती असे मत समितीने व्यक्त केले असता, नाशिक जिल्ह्यात तीन टप्प्यात ही कामे केली आहेत. सन २०११-१२ मध्ये ८२ रेतीघाट चिन्हांकित केले होते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समिती विशेषत्वाने सदरील ५ वाळूघाटांबाबत विचारणा करीत आहे. बाकीचा विषय खूप मोठा आहे. निविदा डिसेंबरमध्ये काढल्या व ऑगस्टमध्ये जप्त केल्या. यामध्ये आठ महिन्याचा कालावधी गेला याबाबत विभागाने निश्चित माहिती द्यावी. डिसेंबर म्हणजे खूप उशीर झालेला आहे. It should be completed by the end of October. ते विभागाने डिसेंबरमध्ये केले आहे. पैसे जमा करण्याची एक महिन्याची मर्यादा असते. त्या मर्यादेत त्यांनी पैसे जमा केले नाहीत. Why have you not taken decision before 31st January ? विभाग आठ आठ महिने निर्णय घेत नाही. पूर्ण हंगाम गेल्यावर २५ टक्के रकमेवर समाधान व्यक्त करतात. यासाठी कोण जबाबदार आहे. जे जबाबदार आहेत त्यांच्यावर कारवाई करावी असे समितीने सूचित केले असता, या प्रकरणात उशीर झाला हे मान्य आहे. नाशिक जिल्ह्यात हे ५ वाळूघाट वगळून उर्वरित घाटांचा लिलाव करण्याचा प्रयत्न केला होता. ते घाट लिलावात गेले नाहीत. त्यानंतर त्यांनी २५ टक्के अपसेट प्राईस कमी करून दिनांक ९/१/२०१२ रोजी फेर लिलाव आयोजित केला होता. त्याला देखील प्रतिसाद मिळाला नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या ५ वाळू घाटांचा पुन्हा लिलाव केला होता काय? अशी विचारणा समितीने केली असता, उक्त ५ वाळू घाटांचा लिलाव केलेला नाही. ते वेगळे घाट होते. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीचे म्हणणे फक्त या पाच वाळू घाटांविषयी आहे, समितीचा मुद्दा असा आहे की, हे पाच वाळू घाट रद्द केले असते व सांगितले असते की, सर्व ठिकाणी अशीच परिस्थिती आहे. हे पाच वाळू घाट रद्द करण्यास विभागाने उशीर केला आहे. हे पाच रेती घाट विभागाकडे उपलब्ध नव्हते. कारण विभागाने लिलाव करून घेतले होते. ज्यांना वाळू घाट देण्यात आले त्यांनी पैसे जमा केले नाहीत. It was pending with him. ते वाळू घाट जोपर्यंत रद्द करीत नाही तोपर्यंत त्याचा विचार करता येत नाही. या विषयाला अनुसरुन विभागाचे असे मत आहे की, बाकीचे लिलाव विभागाने जानेवारी महिन्यात कमी करून घेतले. त्यांना प्रतिसाद मिळाला नाही हा विषय उपस्थित होत नाही. समिती विशेषत्वाने ५ वाळू घाटांबाबत विचारणा करीत आहे जे डिसेंबरमध्ये वाटप झाले आहेत. ऑगस्टपर्यंत त्यावर अंतिम निर्णय घेऊन त्यांना काळ्या यादीत टाकणे किंवा त्यांचे पैसे

भरून घेण्याचा निर्णय विभागाने घेतला नाही. त्यामुळे पूर्ण वर्षे निष्फळ गेले असा महालेखाकार यांचा आक्षेप आहे. असे केले नसेल तर या नुकसानीची जबाबदारी कोणत्या तरी अधिकाऱ्यावर टाकायला पाहिजे होती. तशी जबाबदारी विभागाने एक महिन्याच्या आत टाकावी व कारवाई करून समितीला माहिती द्यावी असे समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

उक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी विभागीय सचिवांची पुन्हा साक्ष घेतली. यामधील अ व ब हे दोन मुद्दे सोडून तर बाकीचे प्रलंबित होते. रेती घाटाची व लिलाव याबाबत माहिती देण्यात यावी. रेती घाटाचे लिलाव न होणे हा विषय आहे. अ व ब या मुद्द्यांबाबत विभागाने सांगितले होते की, त्यावेळी याची माहिती विभागाकडे नाही. आता अ व ब या दोन मुद्दयाबाबत माहिती देण्यात यावी.असे समितीने सूचित केले असता, समितीने मागील वेळी अशी माहिती विचारली होती की, जेवढे रेती घाट गेलेले नाहीत. विभागाने ते सर्व घाट लिलावामध्ये काढले होते काय, त्यावेळी विभागाकडे याची माहिती उपलब्ध नव्हती. विभागाने जिल्हानिहाय माहिती संकलित केली आहे. विभाग ती माहिती आता देऊ शकतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीला एकत्रित सांगावे. किती निविदा काढल्या आहे व किती निविदा काढल्या नाहीत. समितीकडील तक्त्यानुसार ५२ टक्के निविदा काढल्या नाहीत. विभागाकडे जी आकडेवारी आहे ती सांगावी. असे समितीने सूचित केले असता, विभागाची आकडेवारी सांगतो. या जिल्ह्यांमध्ये निश्चित करण्यात आलेले वाळूघाट ४२२१ होते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

म्हणजे ३०९६ ही आकडेवारी चुकीची आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, सन २०१०-२०११, २०११-२०१२, २०१२-२०१३, २०१३-२०१४ ची आकडेवारी देत आहे. १५४१ एवढ्या घाटांना पर्यावरण विभागाची मान्यता मिळू शकली आहे. म्हणजे पर्यावरण विभाग मान्यता प्राप्त वाळूघाटाची संख्या १५४१ होती. ३६२७ घाटांचा लिलाव घेण्यात आला. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पर्यावरण विभागाच्या मान्यतेचा प्रश्न केव्हापासून लागू झाला. समितीच्या माहितीप्रमाणे हा प्रश्न सन २०१०-२०११ ते २०१२-२०१३ मध्येही नव्हता. विभागाने सन २०१०-२०११ ते २०१३-२०१४ पर्यत पर्यावरणाचे कारण दाखवून फक्त १५०० घाटांचे लिलाव केल्याचे म्हटले आहे. समितीच्या माहितीप्रमाणे याबाबतचे नियम व कायदे २०१३-२०१४ नंतर लागू करण्यात आलेले आहेत. यास मान्यता होती किंवा नव्हती. विभागाने हे लिलाव का केले नाहीत हा विषय होता. अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने लिलावामध्ये ३६२७ वाळूगट ठेवले होते. त्यापैकी १९४० वाळूगट प्रत्यक्षात लिलावात गेले, १८७२ वाळूगट लिलावात गेले नाही. लिलावात घाट न जाण्याची विविध कारणे असतात. काही ठिकाणी विशिष्ट वाळूगटाबाबत संबंधित कंत्राटदाराचा उत्साह नसतो. विभागाकडे जिल्हानिहाय माहिती आहे. पुणे जिल्ह्याबाबत अवगत करतो. पुणे जिल्ह्यांमध्ये १६१ लाभार्थी घाट ठेवले होते, त्यापैकी १०४ घाट लिलावामध्ये गेले आहेत, ५७ घाट लिलावात गेले नाहीत. सदरील माहिती २०१०-२०११ ची आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या ५७ घाटांचा फेरलिलाव केला का ? अशी विचारणा समितीने केली असता, फेरलिलाव केला तरी हे घाट गेले नाहीत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदरील परिच्छेदामध्ये अ व ब चा अभिप्राय लेखापरीक्षणाला आलेला नाही. त्याचे कारण काय असू शकते.अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता, या परिच्छेदाच्या ए (ए) मध्ये त्रुटी नाही. फक्त आकडेवारी दिली होती. सन २०१२-२०१३ व २०१३-२०१४ मध्ये रेतीघाटांच्या संख्येत घट ही एक किलोमीटर अंतरावर जवळजवळ असणाऱ्या घाटांचे एकत्रिकरण करून एकच घाट तयार केल्यामुळे झालेली आहे. यामुळे यामध्ये त्रुटी नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Are figures which we have pointed out correct or not ? As per your record you have pointed out above figures. Your figures are not matching with my figures. असे मत महालेखाकारांनी समितीच्या माध्यामातून व्यक्त केले.

महालेखाकार यांच्या कार्यालयातील कर्मचारी लेखापरीक्षणासाठी गेले तेव्हा विभागाकडून देण्यात आलेली आकडेवारी वेगळी होती. मात्र आज विभागाने दिलेली आकडेवारी वेगळी आहे असे होऊ नये हा मूळ मुद्दा आहे. सचिवांनी दिलेल्या माहितीनुसार चिन्हांकित करून ठेवलेल्या रेतीघाटांची एकूण संख्या ४,४३८ इतकी आहे. त्यात लिलाव झालेल्या रेतीघाटांची संख्या ३,६२७ आहे व त्यापैकी १९४० रेती घाटांचे लिलाव झालेले आहेत. ४४२१ आणि ३६२७ यात ८०० रेतीघाट कमी झाले आहे. ते लिलावात न काढण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, काही प्रकरणामध्ये रस्ता उपलब्ध नसणे, ग्रामसभेचा ठराव प्राप्त न होणे अशा विविध कारणांमुळे रेतीघाट लिलावात काढले जात नाहीत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

रस्ते उपलब्ध नाही हे ठरविण्याचा अधिकार स्थानिक तहसीलदार किंवा त्या स्तरावरील अधिकाऱ्यांना असतो. याचा अर्थ असा आहे की, तेथे लोकांनी रेती काढलीच नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, रेती काढण्यासाठी सार्वजनिक रस्ते उपलब्ध नाहीत अशा परिस्थितीत तेथे वाहन नेऊ शकत नाही. असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

जवळपास २० टक्के रेतीघाट आहेत. यापूर्वी त्या रेतीघाटांमधून कधी रेती उचलली गेली होती का? अशी विचारणा केली असता, समितीला फक्त लघु स्वरुपात माहिती दिली आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने समितीला दिलेल्या माहितीनुसार सन्माननीय सदस्यांनी त्या रेतीघाटांमधून पूर्वी रेती उचलण्यात आली होती का ? असा प्रश्न विचारला आहे. रेती न काढण्यासंबंधी ग्रामसभेने ठराव केल्यास त्याबाबत काही दुमत नाही. त्याबाबतची वेगळी आकडेवारी समितीने मागितलेली नाही. ती आकडेवारी विभागाने विभाग स्तरावर तपासली असेल व माहिती घेतली असावी. परंतु रेतीघाटाच्या ठिकाणी रस्ता आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार तहसीलदार किंवा उप जिल्हाधिकाऱ्यांना आहे का? तेथे रस्ता नाही किंवा तेथे रस्ता करता येत नसल्यास अशा ठिकाणी असलेले रेती घाट यादीत समाविष्ट का केले जातात ? ज्याअर्थी सदर रेतीघाटाचा यादीत उल्लेख झाला आहे याचा अर्थ तेथून यापूर्वी निश्चितपणे रेती काढण्यात आली असेल. असे मत समितीने व्यक्त केले असता, काही वेळा रेतीघाटात रेती उपलब्ध असते. परंतु त्या रेतीघाटातून रेती काढण्यासाठी सार्वजनिक मार्ग उपलब्ध नसतो. त्यामुळे त्या रेतीघाटातील रेती काढता येत नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाचे असे मत आहे की, अनेक वेळा अशी परिस्थिती निर्माण होते. परंतु प्रत्यक्ष परिस्थिती वेगळीच असते. सध्या रेतीची अशी स्थिती आहे की, रात्रीमध्ये रस्ता तयार केला जातो. यासंबंधीचा अभिप्राय विभागाने तपासून घ्यावा. असे मत समितीने व्यक्त केले असता, लिलाव करण्याची कार्यवाही अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी स्तरावरून होते. परंतु त्याबाबतचे अहवाल तालुका स्तरीय तहसीलदार यांच्याकडून पाहणी करून दिले जातात. त्यामुळे रस्ता उपलप्रब्ध नाही असा तहसीलदारांनी अहवाल दिला असल्यास तेथील रेतीघाट लिलावात घेतला जात नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

एखादा रेतीघाट रस्ता नाही म्हणून सोडून दिला तर इतर रेती घाटांवरील वाहने त्या घाटावर येऊन वाळू घेऊन जातात. ग्रामसभेचे ठराव प्राप्त न होणे तसेच रस्ता नसल्याच्या कारणास्तव किती रेती घाटांवरील वाळू उचलण्यात आली नाही? अशी विचारणा केली असता, ही माहिती संकलित करावी लागेल. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

या संदर्भात जी माहिती सांगितली आहे त्याबाबत तपासणी करून योग्य ती कार्यवाही केली पाहिजे. ज्यांच्या स्वीकृती किंवा मंजुरीने रेतीघाटाचे लिलाव केले जातात त्याच अधिकाऱ्यांच्या पातळीवर तेथे रस्ते आहेत किंवा नाही याबाबतचा निर्णय घेण्यास सांगावे. एका जिल्ह्यात ४०० ते ५०० रेतीघाट नसतात. तेथे अधिकारी भेटी देऊ शकतात. या संदर्भात जबाबदार व्यक्तीने निर्णय घेतला पाहिजे की, रस्ता नाही म्हणून रेतीघाटाचा लिलाव होणार नाही. याबाबत सदर अधिकाऱ्यांना तसे अधिकार दिले पाहिजेत. जेणेकरून तेथे अतिरिक्त जिल्हाधिकारी स्तरावरील जबाबदार अधिकारी उपस्थित राहू शकेल. असे मत समितीने व्यक्त केले असता, तालुका स्तरावर तहसीलदारांना सर्वात जास्त जबाबदार अधिकारी मानले जाते. तसेच ते तालुक्याची क्षेत्रीय माहिती अचुकपणे जिल्हाधिकाऱ्यांना देऊ शकतात. अशा अपेक्षेने त्यांच्याकडून अहवाल घेत असतो. तसेच रस्ता उपलब्ध नसल्यास तहसीलदारांनी तसा अहवाल दिलेला असतो. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समितीला वाटत नाही यात ३-४ टक्क्यांपेक्षा जास्त ग्रामपंचायतीचे ठराव असू शकतील. ग्रामपंचायतीला वाळू उपशासंबंधी स्वामित्वधन मिळत असल्यामुळे वाळू उपसा करण्यासाठी ग्रामपंचायत नकार देत नाही. तसेच रस्ता नसल्यामुळे १५ ते १७ रेती घाटाचे लिलाव होत नसल्यास यासंबंधी असलेल्या ॲथॉरिटीसंबंधी विभागाने पुनर्विचार करावा अशी समितीची अपेक्षा आहे.असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय प्रतिनीधींनी त्यास सहमती दर्शविली.

सन २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये लिलाव झालेल्या रेतीघाटांची संख्या कमी झाली आहे. त्याबाबत महालेखाकार यांनी केलेले निरीक्षण मान्य आहे का? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली व याचे कारण घाटांचे एकत्रिकरण करण्यात आले होते असे सांगितले.

घाटांचे एकत्रिकरण करणे याचा अर्थ एका रेतीघाटाचा रस्ता दुसऱ्या रेतीघाटासाठी वापरला जातो. त्यामुळे अनेक रेतीघाटांना रस्ते नाहीत असे कारण सांगण्यात आले आहे. परंतु ते कारण बऱ्याच अंशी बरोबर नाही. प्रत्यक्षात कार्यस्थळावरील वस्तुस्थिती पाहिली आहे. असे मत समितीने व्यक्त केले.

उक्त परिच्छेदासंबंधी समितीने कारवाई करण्याची सूचना दिली असता ती विभागाने मान्य केली होती. ५ रेतीघाटासंबंधी एक महिन्याच्या आत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यासंबंधी केलेल्या कारवाईची माहिती समितीला द्यावी असे सांगण्यात आले होते. त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता, संबंधित तहसीलदारांना याबाबत दिनांक २६ फेब्रुवारी २०१८ रोजी आणि जिल्हा

खनिकर्म अधिकाऱ्यांना दिनांक १३ जुलै २०१८ रोजी नोटीस देण्यात आली होती. त्यांच्याकडून खुलासा प्राप्त झाला आहे. आता त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

परिच्छेद क्र.७.२.३.६ रेती घाटाचे वाटप झाल्यानंतर प्रत्यक्ष उत्खनन केलेल्या रेतीचे प्रमाण ठरविण्यासाठी पद्धतीचा अभाव :–

२.८ SMATS ही प्रणाली पूर्ण राज्यात लागू झाली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने ही प्रणाली दिनांक २६/१२/२०१४ च्या शासन निर्णयानुसार संपूर्ण राज्यात लागू केली होती. मात्र केंद्र शासनाने दिनांक १५/१/२०१६ च्या अधिसूचनेद्वारे वेगळी प्रणाली लागू करण्याच्या सूचना केल्यानंतर SMATS या प्रणालीचा वापर बंद झाला. आता नवीन प्रणाली वापरात येत आहे. या प्रणालीनुसार बारकोडेट ट्रान्झिट पासेस देण्यात येतात असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Is it more effective ? अशी विचारणा समितीने केली असता, केंद्र शासनाने या प्रणालीबाबत सांगितले आहे की, ही प्रणाली वापरा त्या अनुषंगाने राज्यभर ती प्रणाली लागू केली आहे. Yes, it is effective असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागामार्फत बारकोडेट रॉयल्टी पास देण्यात येतात. एकाच रॉयल्टी पासवर दोन किंवा तीन चक्कर मारण्यात येतात अशी पद्धत सुरू झाल्यामुळे रेती घाटाचे वाटप झाल्यानंतर प्रत्यक्ष उत्खननाच्या वेळी जास्तीचे उत्खनन केले जाते असा येथे मुद्दा आहे. त्याचे आपण प्रमाण ठरवितो समजा एखाद्या रेती घाटावर ५ हजार ब्रास रेती उत्खनन करण्याची परवानगी आहे. त्यामध्ये एक मीटर खोदायची परवानगी असताना तो २ ते १० मीटर खोदतो. अतिरिक्त उत्खनन करून रेती नेतो. हे समायोजित करण्यासाठी एकाच पासवर दोन तीन चक्कर मारण्यात येतात. असे प्रकार होऊ नये यासाठी महसूल विभागाने कोणती यंत्रणा विकसित केली आहे अशी विचारणा समितीने केली असता, केंद्र शासनाने जी प्रणाली प्रस्तावित केली त्याबाबत थोडक्यात माहिती देतो. ती प्रणाली आता राज्यात वापरीत आहोत असे विभागीय सचिवांनी सांगितले.आता विभागाने सांगितले की, बारकोटेड रॉयल्टी पास ही प्रणाली वापरण्यात येते. एकाच पासवर एक ट्रक तीन वेळा ट्रीप मारतो असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये एक तास, दोन तास असे वेळेचे बंधन आहे. याबाबत वस्तुस्थिती काय आहे त्याबाबत अवगत करण्यास सूचित केले असता, बारकोडेड ट्रान्झिट पासेसमध्ये टेक्निकल स्पेसिफिकेशन दिले आहेत. ते तांत्रिक आहे ते माहितीकरिता वाचून दाखवितो. तशा प्रकारच्या ट्रान्झिट पासेस वापरण्याच्या सूचना राज्यभर १५ जानेवारी, २०१६ च्या अधिसूचनेनुसार लागू केल्या आहेत. यामध्ये प्रत्येक पावतीवर युनिक बारकोड असायला पाहिजे. यामध्ये मॅग्नेटिक इंक कॅरेक्टर रेकग्नीशन कोड पेपरवर छापले गेले पाहिजेत. एमआयसीआर पेपरवर ते छापले गेले पाहिजे. त्यावर युनिक बारकोड असला पाहिजे. किंवा क्यूआर कोड असायला पाहिजे. दुसरे असे की, त्यांची फ्यूजीटीव्ह इंकची बॅकग्राऊंड असायला पाहिजे. व्हायोप पॅन्टोग्राफ आणि वॉटर मार्क याची सोय असायला पाहिजे. अशा प्रकारे त्यामध्ये त्यांनी टेक्निकल स्पेसिफिकेशन दिल्या आहेत. समिती सदस्यांनी प्रश्न विचारला की, सदर पासचा मल्टीपल वापर होऊ नये. जेव्हा त्यांना ट्रान्झिट पास इश्यू करतो, त्यामध्ये त्याचे ओरिजीन काय आहे, त्याचे डेस्टिनेशन काय आहे, किती वाजता पास इश्यू केला आहे, तो पास किती कालावधीसाठी वैध राहणार आहे, ट्रकचा क्रमांक अशा सर्व गोष्टी त्यामध्ये नमूद करण्यात येतात असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या सर्व बाबी नमूद करूनही ट्रक दोन किंवा चार ट्रीप करीत आहे. असे होऊ नये यासाठी काही तपासणी यंत्रणा आहे काय ? हा समितीचा प्रश्न आहे अशी विचारणा समितीने केली असता, जेव्हा अशा प्रकारे कोणताही ट्रक सापडतो, तेव्हा त्याची टीपी चेक करण्यात येते. ती वैध आहे काय ते पाहण्यात येते. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीचा मुद्दा समजून घ्यावा त्यांची टीपी वैध आहे, एकदा त्या टीपीवर ट्रक भरून नेल्यानंतर तो खाली करून झाल्यावर त्याच टीपीवर तो दुसरी ट्रीप आणण्यासाठी जातो तेव्हा त्याची तपासणी होण्यासाठी शासनाकडे कोणती यंत्रणा आहे अशी विचारणा समितीने केली असता, अशा प्रकरणात टीपीवर असा कालावधी नमूद केला पाहिजे की त्या कालावधीत त्यांना दुहेरी किंवा तिहेरी ट्रीप करण्याची संधी मिळू नये असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अशा प्रकारे कालावधी नमूद करून देखील अशा दोन तीन ट्रीप होत आहेत. त्यासाठी शासनाने काही चेकपोस्ट केले आहेत काय? अशी विचारणा समितीने केली असता, असे प्रकार भौतिक तपासणी केल्याशिवाय थांबविणे शक्य नाही. भौतिक तपासणी म्हणजे तो ट्रक थांबवून त्याचा टीपी चेक करणे या बाबी आवश्यक आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समिती सदस्यांनी सांगितले होते की, सॅटेलाईटद्वारे तपासणी करा. कंत्राटदार एकाच रॉयल्टी पासवर एक मीटर खोदायच्या ऐवजी ३ ते ४ मीटर खोदत आहे, १० हजार ब्रास च्या ऐवजी २५ हजार ब्रास रेती नेत आहे. यासंदर्भात विभागीय आयुक्त यांच्याकडे बैठक घेऊनही जिल्हाधिकारी किंवा त्यांच्या अधिनस्त अधिकारी कामकाज करीत नाही. आयुक्तांनी आदेश देऊनही कारवाई होत नाहीत, तपासणी केली जात नाही. याबाबत माहिती अशी आहे की, बारकोड पासेस ठेकेदाराला देतो. वेळेसाठी पुण्यामध्ये काही टोल फ्री नंबर देण्यात आले आहेत. टोल फ्री क्रमांकावर विनंती करावी लागते की, आमचा व्हेईकल क्रमांक हा आहे, आम्हाला अमुक वेळेपासून अमुक वेळेपर्यंत परवानगी द्या. शासनाने त्यांना तशा प्रकारची

परवानगी दिली. त्या कालावधीत त्यांनी सांगितले की मी हे वापरत नाही माझी गाडी फेल झाली. तर त्यांची तिकडे ब्रास नोंद होते अशी माहिती आहे. जी पास इश्यू केली ती परत शासनाकडे जमा झाली पाहिजे. नाही तर त्या पासचा वापर वारंवार होऊ शकतो असे मत समितीने व्यक्त केले असता, आताच्या परिस्थितीत या प्रणालीबाबत काही जिल्हाधिकारी यांनी आपापल्या स्तरावर खाजगी एजन्सीकडील साफ्टवेअर प्रणालीचा अवलंब केला आहे. जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या स्तरावरून अशी प्रणाली प्रस्तावित केली आहे. आपण ज्या कार्यप्रणालीचा उल्लेख केला त्या कार्यप्रणालीचा तो भाग आहे. शासन स्तरावरून अशा प्रकारची प्रणाली अद्यापपर्यंत प्रस्तावित केली नव्हती. राज्य स्तरावर राबविण्यासाठी कॉमन कार्यप्रणाली करण्याचे शासन स्तरावर प्रस्तावित केले आहे. राज्य स्तरावर कॉमन सेंट्रल यंत्रणा निश्चित करण्यात येणार आहे. त्यांच्या मदतीने संगणकीय प्रोग्राम याकरिता वापरण्यात येणार आहे. जेणेकरून त्यामध्ये विविध प्रकारचे उपांग असतील, त्यामध्ये जीपीएस तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. टीपीची वैधता तपासण्याची त्यात सोय राहणार आहे. या सर्व बाबींचा अंतर्भाव शासन नवीन प्रणालीत करणार आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ही प्रणाली किती दिवसात लागू होईल अशी विचारणा समितीने केली असता, यासंदर्भातील दस्तऐवज अंतिम करण्याची प्रक्रिया सुरू आहे. १५ दिवसात किंवा या महिना अखेर यासंदर्भातील निविदा अंतिम होईल. जुलै महिन्यात निविदा प्रक्रिया सुरू करण्यात येईल. निविदेच्या माध्यमातून एजन्सी निश्चित करण्यात येईल व त्या एजन्सीमार्फत राज्यस्तरावर अशा प्रकारची एक समान प्रणाली वापरण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

बारकोड यंत्रणेमध्ये एकदा वाहन गेल्यावर त्याची वैधता संपते याबाबत काही स्पष्टता येत नाही काय? यासंदर्भात आज तपासणी करण्यासंदर्भात कोणतीही पद्धत नाही. आज फक्त बारकोड यंत्रणा आहे. टोल फ्री क्रमांकावर जोपर्यंत कळवित नाही तोपर्यंत त्याची नोंद होणार नाही. आज फक्त ही एक यंत्रणा आहे. या पासेसची तपासणी कोठे तरी झाली पाहिजे. परंतु तशी तपासणी करण्याची यंत्रणा कोठेच नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, आता जी नवीन प्रणाली तयार करण्यात येणार आहे त्यामध्ये अशी देखील सोय असणार आहे की, मोबाईल ॲप असेल, त्या ॲपच्या माध्यमातून एखादी पावती स्कॅन केली व ती पावती वाचली तर कळेल की, ही पावती केव्हा इश्यू झाली आहे. कोणत्या वाहनासाठी केली होती. त्या पावतीचा वैधता कालावधी काय आहे. त्या अनुषंगाने तपासणी करू शकतो की, ही योग्य पद्धतीने वापरली जात आहे किंवा नाही. योग्य प्रकारे वापरली जात नसेल तर संबंधितांवर दंडात्मक कारवाई करू शकतो. मोबाईल ॲपवर हे केले तर ते सगळीकडे वापरता येईल. नुसते चेक नाक्यावर तपासत बसलो तर ही कार्यवाही होणार नाही. मोबाईल ॲपच्या माध्यमातून तपासण्याची सोय या प्रणालीमध्ये करण्यात येत आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

गाडी तेथून निघाली की, ॲपवर वेळ व स्थानाची सर्व माहिती मिळू शकेल. अतिरिक्त उत्खननाच्या बाबतीत टीपी पास घेऊन घाटातून रेती काढून साठा करून ठेवण्याची पद्धत अलिकडे रुढ झाली आहे. नदीतील रस्ता खराब होतो ते निश्चित परिमाणापेक्षा जास्तीचे उत्खनन करतात. गाव खेड्यात ५०० ते १००० ब्रासचे मोठ-मोठे ढीग लावून ठेवतात. तहसीलदार ती रेती जप्त केल्याचे दाखवितात. अंदाजे इतकी रेती आहे असे दाखवून पुन्हा टीपी पास दिली जाते. असे जे ढीग लावतात त्यांचा फक्त २० टक्के महसूल शासनाकडे जमा होतो. ८० टक्के त्या कंत्राटदाराला दिला जातो ही बाब थांबविण्यासाठी या नवीन ॲप प्रणालीमध्ये शासन काही उपाययोजना करणार आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, अतिरिक्त उत्खननाबाबत जी प्रणाली आहे त्याचा उल्लेख केला आहे, त्या प्रणालीत कशा प्रकारे ॲपबेस डिडक्शन राहणार आहे ते स्पष्ट केले आहे. सन्माननीय सदस्य जप्त केलेल्या वाळू विषयी बोलत आहेत. जप्त केलेल्या वाळूचा लिलाव केला असेल. ज्यांनी लिलाव घेतला त्याची विल्हेवाट लावण्यासाठी टीपी घेतला जातो हा एक वेगळा विषय आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जास्तीचा वाळूसाठा नदीपात्रातून उचलला आणि अवैधरित्या गोळा करून ठेवला. म्हणून तो साठा जप्त केला असे मत समितीने व्यक्त केले असता, साठा जप्त केला त्याचा नंतर लिलाव केला. ज्यांनी तो साठा खरेदी केला तो त्याची विल्हेवाट लावेल. अशा प्रकारचे जे साठे आहेत त्यांना देखील या कार्यक्षेत्रात आणणार आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जप्त केलेल्या वाळूला संरक्षण देण्याचे काम कोणाचे आहे. अतिरिक्त वाळूचा साठा महसूल विभागाने जप्त केला. ज्याने साठा केलेला असतो तो न्यायालयात जातो. ते प्रकरण न्यायालयात सुरू असते. वाळूचा साठा निम्यापेक्षा जास्त गायब होऊन जातो. जेव्हा जो साठा जमा केला आहे तोच दाखवावा लागतो. इतक्या मोठ्या परिमाणात लिलाव केला जातो असे दाखविण्यात येते. दर कमी दाखविण्यात येतो. शेवटी जुळवाजुळव करून त्या रेतीची विल्हेवाट लावली जाते असे मत समितीने व्यक्त केले.

परिच्छेद क्र. ७.२.३.७ महसूल विभाग, प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि पोलीस यांच्यात समन्वयाचा अभाव-खनिजांच्या अवैध वाहतुकीची प्रकरणे :—

२.९ ज्या समितीबाबत विभाग सांगत आहे. ती सर्व जिल्ह्यांमध्ये गठित झाली आहे का? त्या समितीच्या त्याच्या बैठका होतात का? अशी विचारणा समितीने केली असता, दिनांक ५ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये समिती स्थापन केलेली आहे, ती प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्थापन झालेली आहे. या समित्यांच्या बैठकांचे इतिवृत्त आणलेले आहेत. अधिकृतपणे लोकलेखा समितीच्या अवलोकनार्थ सादर करतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आता हे जे काही मुद्दे सांगितलेले आहेत. याबाबत विभागाने कोणतेही उत्तर दिलेले नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, अधिकृतरित्या याबाबतची माहिती जिल्हानिहाय सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सात जिल्ह्यात आरटीओद्वारे चंद्रपूर, कोल्हापूर, नागपूर, नाशिक, पुणे, सातारा आणि ठाणे या सात जिल्ह्यात आरटीओची १५७ प्रकरणे संबंधित जिल्हाधिकाऱ्यास सूचितच करण्यात आली नव्हती. या प्रकरणातील संपूर्ण ७५८ ब्रास खनिजाचे प्रमाण ऑक्टोबर, २०१० आणि मार्च, २०१३ च्या रेती धोरणाप्रमाणे अवैध खनिकर्म म्हणून घोषित करणे आवश्यक होते. परंतु ही प्रकरणे जिल्हाधिकाऱ्याला सूचित करण्यात आली नसल्यामुळे त्यांच्याद्वारे स्वामित्त्वधन आणि शास्ती आकारण्यासाठी कारवाई करण्यात येऊ शकली नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, ही बाब जी या लेखापरीक्षण परिच्छेदाच्या माध्यमातून महालेखाकार यांनी निदर्शनास आणलेली आहे ती खरी आहे की, बऱ्याच वेळा परिवहन विभाग, पोलीस विभाग, महसूल विभागाची क्षेत्रीय यंत्रणांमध्ये माहितीचे आदान प्रदान होत नाही त्याच्यामुळे एका विभागाने जर कारवाई केली असेल तर त्याबाबतची माहिती त्वरित इतर दोन विभागाला दिली जात नाही, त्याच्यामुळे त्यांच्या स्तरावर अशा प्रकरणी जी कारवाई अपेक्षित आहे ती होत नाही. ही खरी परिस्थिती आहे. अशा बाबी होऊ नये या दृष्टीकोनातूनच ही समन्वय समिती स्थापन करण्यात आलेली आहे. समन्वय समिती स्थापन करण्याचे कारण असे की जेणेकरून जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक किंवा पोलीस उपायुक्त आणि जे आरटीओ आहेत, या तिघांनी यामध्ये त्यांच्या यंत्रणेमार्फत जी कारवाई झालेली आहे, त्याबाबत एकमेकांशी समन्वय माहितीचे आदान-प्रदान करावे आणि त्याच्याबद्दल जी कार्यवाही आहे ती करावी असे विभागीय सचिवांनी सांगितले. **(विभागाकडून प्राप्त झालेली माहिती विवरणपत्र क्र. . मध्ये जोडण्यात आली आहे.)**

हा अत्यंत गंभीर विषय आहे. जिल्हा किंवा राज्यातून रेतीची अवैध वाहतूक होत आहे. नागपूर व गोंदिया येथे देखील ही अवैध वाहतूक सर्रास होत असते. दुसऱ्या राज्यातील वाळू आपल्या राज्यामध्ये कशी काय आणतात? अशी विचारणा समितीने केली असता, आजच्या तारखेला अन्य राज्यातून आपल्या राज्यामध्ये सॅण्ड इम्पोर्ट करण्याबद्दल सद्यःपरिस्थतीमध्ये ही वस्तुस्थितीमध्ये नियम नाहीत. जर आपल्याला ऑफिशियली इम्पोर्ट करायची असेल आपले सन २०१३ चे नियम मायग्रेन मिनरलचे त्यामध्ये स्पष्ट तरतूद नाही. आम्ही एका अन्य प्रकरणाच्या अनुषंगाने अशा प्रकारचे नियम करीत आहोत. अशा प्रकारचा जो अन्य राज्यातून आपल्या राज्यामध्ये वाळू उपसा होते. त्याच्याबद्दल आपण कशा प्रकारची भूमिका स्वीकारली यामध्ये काही आपण रेग्यूलेट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, काही बाबतीत आकारणी करायला पाहिजे, या सर्व गोष्टींचा परामर्श घेऊन अशा प्रकारचे नियम करायला हाती घेतलेले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आंतरजिल्हा खनिज अवैध वाहतूक होत आहे, त्याबाबत शासनामार्फत कोणती कारवाई केली जाते केली? अशी विचारणा समितीने केली असता, इंटर-डिस्ट्रीक्टसंदर्भात ट्रान्झिट पास इश्यू केले असतील तर त्याच ठिकाणी जात नसेल तर त्यामध्ये काही जी.आर नाही. त्या त्या वेळी ते जर दुसऱ्या जिल्ह्यामध्ये अशा प्रकारचे वाहन पकडले गेले तर दंडात्मक कारवाई होणार असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यवतमाळहून टी.पी.घेऊन डेस्टीनेशन अमरावतीकडे जर खनिज वाहन होत असेल तरी कारवाई होणार का? अशी विचारणा समितीने केली असता, डेस्टीनेशन अमरावती कुठे न दाखविता अन्य कुठे असेल तरीही गाडी अमरावतीत सापडली तर मात्र यासंदर्भात दंडात्मक कारवाई होईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्र. ७.२.३.८ रेती घाटाची लिलाव रक्कम परत करणे :—

२.१० यामध्ये समितीने कम्प्लायन्स सादर केला होता आणि महालेखाकार यांनी नो रिमार्क्स असा शेरा दिला होता. यामध्ये समितीचा मुद्दा आहे की, विभागाने काही रक्कम परत केली. असे विभागाचे उत्तर आहे. ३१०३ ब्रास वाळूचे उत्खनन लिलावधारकास करता आले नाही. असे गृहित धरले विभागाला तसे करता येते का? त्यांनी जे कमी ब्रास घेतले, विभागाचे ३६ दिवसांचे पैसे त्याला परत करतात. दुसऱ्या बाजूला ३१०३ ब्रासचेही पैसे तुम्ही त्याला कमी करतात, ही तर खूप आश्चर्याची गोष्ट आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, पूर्ण निवेदनाचा तपशील सादर केलेला आहे. सन २०१०-२०११ मध्ये विभागाने लिलाव केला होता. ३३४७७ ब्रास वाळूचा लिलाव केला केला होता. मात्र जीएसडीएच्या सल्ल्यानुसार विभागाने त्याला रिस्ट्रीक्ट केले आणि २१२०० ब्रास वाळू उत्खननाची केवळ शिफारस केली म्हणजे थोडक्यात त्या व्यक्तीने विभागाला ३३४७७ ब्रास चे पैसे भरले होते. २१२०० ब्रास पर्यंत त्याला रिस्ट्रीक्ट केले. १२२७७ ब्रासचा परतावा त्याला क्रमप्राप्त होता. २१२०० ब्रास वाळूपैकी १८०९७ ब्रास इतक्या वाळूचे उत्खनन केले असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याची काय खात्री आहे की त्यातून तितकेच ब्रास खनिज झाले ? अशी विचारणा समितीने केली असता, जे अभिलेखे त्यांनी सादर केले, त्याच्या आधारावर ही कारवाई केलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने त्याच्या अभिलेख्यावर विश्वास ठेवून ३६ दिवसांची बंदी केली. या कालावधीमध्ये उत्खनन करण्यास मनाई केली. असे मत समितीने व्यक्त केले असता, उच्च न्यायालयाने रिट याचिकेमध्ये जे आदेश दिले होते, त्याच्या अनुषंगाने जवळपास ३६ दिवस लिलावधारक उत्खनन करु शकला नव्हता.असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

लिलावधारक ३६ दिवस उत्खनन करू शकला नाही म्हणून त्याने २१,२०० ब्रास वाळूचे उत्खनन केले नसेल असे कसे गृहित धरता ? विभागाने लिलावधारकास १२,२७७ ब्रास इतक्या रेतीला स्वामित्वधनाचा परतावा केलेला आहे.

ते अयोग्य आहे कारण लिलावधारकास उत्खनन करण्यास अनुमती दिलेल्या २१,२०० ब्रास वाळूपैकी त्याने पूर्ण उत्खनन केले नाही. त्याला कोणतेही परिमाण विभागाकडे नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये उच्च न्यायालयाने जर स्थगिती दिली नसती तर अशा पद्धतीने त्याने कमी उत्खनन केलेले आहे, याचे पोटी त्यांना काहीही पैसे देय ठरले नसते. मात्र ज्याअर्थी उच्च न्यायालयाने यामध्ये स्थगिती दिल्यामुळे तो ३६ दिवस उत्खनन करू शकला नाही त्याअर्थी त्यामध्ये प्रमाणशीर रक्कम परत करण्याचा शासनाने निर्णय घेतला. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

निर्णय घेतला म्हणजे अशा प्रकारची तरतूद आहे का की, एखाद्या वेळी काही कारणामुळे त्यांनी सांगितले की, रस्ता बंद झाला म्हणून दोन महिने उत्खनन केलेले नाही. त्यामुळे त्याला सूट द्यावी. ॲडिशनल मशिनरी लावून तो उत्खनन करू शकत होता, त्याला वेळ वाढवून देता आली असती.असे मत समितीने व्यक्त केले असता, दिनांक २५.१०.२०१० ची धोरणा लागू होती. दिनांक २५.१०.२०१० च्या धोरणामध्ये निश्चित तरतूद आहे ती मी समितीच्या परवानगीने वाचून दाखवितो. लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीमध्ये शासनाने तो ठेका रद्द केल्यास किंवा त्याला मंजूर केलेल्या क्षेत्राचे उत्खनन करण्यास रेती काढण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही, परंतु लिलावाची मुदत संपण्यापूर्वी ज्या कालावधीसाठी ठेका रद्द केला जाईल किंवा ज्या कालावधीसाठी त्यांनी ज्या किंमतीत लिलाव घेतला त्याा प्रमाणात त्याला परतावा देण्यात येईल. अशी रक्कम त्याला परत करताना लिलावाची देकाराची रक्कम देयकावर वाळूसाठा व उत्खनन केलेला वाळूसाठा विचारात घेऊन दिली जाईल. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

लिलावधारकास किती दिवसांचा ठेका दिला होता? हे उत्खनन ३६ दिवस बंद होते. जितके दिवस उत्खनन बंद केले, त्याप्रमाणामध्ये त्याचे पैसे परतावे असावे, असे आपले म्हणणे आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीच्या परवानगीने यातील केवळ संबंधित भाग वाचून दाखवितो. लिलावाची देकाराची रक्कम देयकातील अंदाजित वाळू साठा व प्रत्यक्ष उत्खनन वाळू साठा विचारात घेऊन त्यानुसार परताव्याच्या रकमेची परिगणना केली जाईल. म्हणजे त्यांनी ज्यावेळी उत्खनन केले, ते विचारात घेऊन ते परताव्याच्या रकमेची परिगणना करण्यात येईल. याच्या अनुषंगाने जेवढा आता साठा तो नाही करू शकला त्याची त्याला परतफेड करण्यात आली. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

वाळू साठा व उत्खनन मोजण्याचे कोणते साधन होते केवळ विभागाने ट्रान्झिट पासला गृहित धरून निर्णय घेतलेला आहे. याकरिता विभागाकडे काही मापदंड आहे का? समितीला विभागाचे नियम मान्य आहेत. परंतु परिमाण किती आहे, याचे कोणते साधन नसताना विभागाने असे गृहित धरून याच्यात आपण ज्याला सहा महिन्यांसाठी दिले त्यापैकी ३६ दिवस उत्खनन बंद राहिले, त्याप्रमाणे कमी करावे. परंतु जर त्याने २१,२०० ब्रास वाळूचे पूर्ण उत्खनन केले असेल तर ते पैसे कमी करणे समितीला योग्य वाटत नाही. त्याने जेवढे सांगितले तेवढीच शासनाने कारवाई केलेली आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाने दिनांक २५.१.२०१० च्या धोरणामध्ये काय तरतूद होती, ते सादर केलेले आहे. समिती जे म्हणत आहे, त्या भूमिकेशी विभाग सहमत असल्यामुळे आता शासनाने जे नवीन धोरण आणलेले आहे, त्यामध्ये दिनांक ०३ जानेवारी, २०१८ चे जे धोरण आहे. त्यामध्ये समिती म्हणत आहे की तसेच केलेले आहे. जेवढे दिवस उत्खननामध्ये खंड पडला असेल त्या दिवसाच्या प्रतीदिन उत्खननाप्रमाणे किती दिवस खंड पडला त्यानुसार परताव्याचे पैसे मिळतील अशी तरतूद केलेली आहे. मात्र पूर्वी ही तरतूद नव्हती, त्यानुसार परतावा करण्यात आलेला आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

प्रतीदिन किती उत्खनन करावे, याचे काही मोजमाप नव्हते. आता जे नवीन धोरण आलेले आहे, नवीन धोरणामध्ये असे केलेले आहे की, जेवढे दिवस त्याला उत्खननाकरिता उपलब्ध आहे आणि जेवढा साठा उपलब्ध आहे, त्याच्या अनुषंगाने दररोज किती उत्खनन अपेक्षित होते याचा भागाकार करून जेवढे दिवस स्टे ऑर्डर होता, तेवढ्या दिवसामध्ये या सुत्रानुसार तो किती उत्खनन करू शकला नाही. पूर्वी ३६ दिवसांचे खंड पडला त्यामुळे किती रक्कमेच्या खनिजाचे उत्खनन तो करू शकला नाही तर एकूण किती रक्कम त्याच्या प्रमाणात त्याला दिली जात होती. पूर्वी तशी तरतूद धोरणामध्ये नसल्यामुळे करावे लागले. आता नवीन धोरणामध्ये ही दुरुस्ती केलेली आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ही निविदा कधी काढली? कार्यादेश कधी दिले? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१०-२०११ चा हा लिलाव आहे. याचा लिलाव दिनांक ०६.०९.२०१० रोजी झाला होता. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने आदेश कधी दिले? त्याने अनामत रक्कम कधी भरली? अशी विचारणा केली असता, दिनांक ०६.०९.२०१० रोजी त्याला मंजुरी दिली. त्यांनी विहित कालावधीमध्ये त्याचे पूर्ण पैसे भरलेले आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

दिनांक २३.०९.२०१० पासून न्यायालयाची बंदी होती. त्याने कधी डिपॉझिट भरले आणि त्याला कार्यादेश कधी दिले? याची तारीख याबाबत समितीला अवगत करण्यास सांगितले असता, माझ्याकडे ॲग्रीमेंट फॉर्म आहे. मात्र त्यामध्ये त्यांनी २५ टक्के रक्कम आणि ७२ टक्के रक्कम भरण्याचा डी.डी.नंबर दिलेला आहे. त्यावर तारीख दिलेली नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ही जी बंदी होती, ती बंदी पावसाळ्याच्या शेवटी बंदी केली गेली होती. त्यानंतरच वाळू उत्खनन करीत असतो असे मत समितीने व्यक्त केले असता, दिनांक २३.०९.२०१० ते २८.१०.२०१० या कालावधीमध्ये बंदी होती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याच कालावधीत विभागाने त्यांना टेंडर दिले. एक महिन्याची वेळ दिली असे मत समितीने व्यक्त केले असता, सुरूवातीच्या एक महिन्याच्या कालावधीमध्ये बंदी होती. असे विभागीय सचिवांनी सांगितले. समितीला डी.डी.ची तारीख समजली पाहिजे असे समितीने सूचित कले असता, ती तारीख उपलब्ध नाही. दिनांक १४.०९.२०१० रोजी ॲग्रीमेंट झालेले आहे. हे सन २०१३ मध्ये मंजूर झालेले होते. तत्कालीन मंत्री महोदयांच्या मान्यतेने निर्णय घेण्यात आला होता असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कोणत्या महिन्यामध्ये उत्खनन करावे, असा काही नियम असेलच असे मत समितीने व्यक्त केले असता उत्खनन तर ॲग्रीमेंट झाल्यानंतर लगेच करता येते. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

३१०४ ब्रासस चे परिमाण केवळ ट्रान्झिट पासच्या आधारावर गृहित धरले ते योग्य नाही, असे समितीचे म्हणणे आहे. याच बरोबर भंडारा जिल्ह्यामध्ये सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये रेती उपसणे इतके सोपे नाही. बेनिफिट ऑफ डाऊट्च्या निमित्ताने ३१०४ ब्रास ची सूट त्यांनी घेतलेली आहे. मंत्री महोदयांच्या मान्यतेचे काही सांगू शकत नाही. परंतु प्रस्ताव तर विभागानेच सादर केला असेल. असे मत समितीने व्यक्त केले असता, उच्च न्यायालयाने हे प्रकरण न्यायालयात गेले नव्हते. एका अन्य याचिकेमध्ये पूर्ण राज्य पातळीवर हायकोर्टाने जे रेती उत्खनन होते, त्याला स्थगिती दिली होती. रिट याचिका नंबर ४८३०/२०१० यामध्ये याचा उल्लेख केलेला आहे. रेती घाटाच्या अनुषंगाने ही रिट याचिका दाखल झाली होती. त्याचा या प्रकरणाशी संबंध नव्हता. मात्र त्या रिट याचिकेमध्ये उच्च न्यायालयाने राज्य पातळीवर सर्व उत्खननावर स्टे दिला होता. नंतरच्या काळात हा स्टे उठविण्यात आला होता. स्टे देणे आणि उठवणे यामध्ये ३६ दिवसांचा कालावधी गेला. त्यामुळे हे ३६ दिवस या व्यक्तीचे उत्खनन बंद होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक ७.२.३.९ खनिज उत्खननासाठी निष्पादित केलेल्या संलेखावर मुद्रांक शुल्काची वसूली न करणे :—

२.११ या परिच्छेदातील मुद्दा विभागाने मान्य केलेला आहे. या प्रकरणामध्ये दिनांक १८.३.२०१७ रोजी किती दराने मुद्रांक शुल्क वसूल करावा याबाबत सर्वांना दिशानिर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने सर्वत्र कार्यवाही होत आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले असता, विभागाने आता ही कार्यवाही सुरू केली पण पूर्वीचे काय? अशी विचारणा समितीने केली असता, पूर्वीच्या काही प्रकरणामध्ये वसूली झालेली आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये रुपये ४२ हजार रक्कम वसूल करावयाची होती त्यापैकी रुपये १७ हजार रक्कम वसूल झालेली आहे रुपये २५ हजार रक्कम वसूल व्हावयाची आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एकूण किती रक्कम वसूल करायची होती त्यापैकी किती वसूल झाली याबाबत समितीला माहिती द्यावी असे समितीने सूचित केले असता, हा परिच्छेद जिल्ह्यांबाबतचा आहे. सहा जिल्ह्यांत एकूण रुपये १०६.१३ कोटी रकमेवर रुपये ३१.८४ लाख मुद्रांक शुल्क आकारणी योग्य होते असा आक्षेप आहे. याबाबत विभागाकडे जिल्हानिहाय माहिती आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

रुपये ३१.८४ लाख इतकी रक्कम मुद्रांक शुल्क वसूल झाला आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, अजून झालेला नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यात २.५ लक्ष रुपये मुद्रांक शुल्क आणि ८३ हजार रुपये नोंदणी फी घेण्यात आली नाही. नागपूर जिल्ह्यात ४० लाख १८ हजार रुपये आणि ५ लाख २७ हजार रुपये नोंदणी फी घेण्यात आली नाही. त्याबाबत काही प्रगती आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, यवतमाळ जिल्ह्यात ४७ हजार रुपयांची वसूली होती त्यापैकी १६ हजार रुपये वसूल केलेले आहेत तर ३१ हजार रुपये वसूल करावयाचे आहेत. नागपूरमध्ये आकारणीयोग्य मुद्रांक शुल्काची रक्कम रु.४३ लाख ७५ हजारर होते त्यापैकी रुपये २३.४० लक्ष इतकी रक्कम वसूल केली असून रुपये २०.३५ लक्ष वसूल करावयाचे आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पुढील तीन महिन्यांत शिल्लक वसूली तातडीने करण्याबाबतची कारवाई करावी असे समितीने सूचित केले.

परिच्छेद क्रमांक ७.२.३.१० पर्यावरणाचा अभ्यास :—

(अ) EIA अभ्यास न करता उत्खननाची परवानगी देणे :—

२.१२ सदर परिच्छेदाबाबत महालेखाकार यांचे असे मत आहे की,पर्यावरण आघात निर्धारण अभ्यास न करता उत्खननाची परवानगी देण्यात आली. विभागाने यासंबंधी तत्कालीन परिस्थिती सादर केली आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले त्यावर, विभागाने सन २०१३ मध्ये पर्यावरण आघात निर्धारण केलेले आहे. परंतु सन २०१० मध्ये उत्खनन झालेले आहे. त्यामुळे सन २०१३ मध्ये झालेले पर्यावरण आघात निर्धारण सन २०१० च्या उत्खननासाठी कसे लागू होईल? असा महालेखाकार यांचा आक्षेप आहे.असे मत समितीने व्यक्त केले असता, या प्रकरणामध्ये दिनांक २५.०१.२०१० रोजी पर्यावरण विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात आले होते. म्हणजे उत्खननापूर्वी पर्यावरण विभागाची मान्यता घेण्यात आली होती, यासाठी परवानगी देण्यात आली होती. महालेखाकारांचे असे म्हणणे आहे की, विभागाने पर्यावरण विभागाची परवानगी घेतली असली तरी सीआरझेडच्या अधिसूचनेप्रमाणे पर्यावरण आघात निर्धारणाचा अभ्यास करणे आवश्यक होते. परंतु, त्यावेळी पर्यावरण विभागाची परवानगी आहे असे समजून पुढील कार्यवाही करण्यात आलेली आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

पर्यावरण आघात निर्धारण आणि सीआरझेड हे दोन्ही विषय वेगळे आहेत. स्पष्टीकरणामध्ये नमूद केले आहे की, श्री महालक्ष्मी औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थेस पर्यावरण विभागाने दिलेल्या अटी व शर्तीनुसार गाळ व गाळमिश्रीत रेतीचे उत्खनन करताना समुद्र तट विनियमन क्षेत्र (CRZ) अधिसूचनेचा भंग होणार नाही याबाबत कळविण्यात आले होते. श्री महालक्ष्मी औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थेस पालघर, वसई व वाडा तालुक्यातील खाडी नदी क्षेत्रातील गाळ व गाळमिश्रीत रेती परवाना पद्धतीने यांत्रिक सहाय्याने उत्खनन करण्यास मान्यता देण्यात आली होती. आता गाळमिश्रीत रेती हे थेट सीआरझेडला अफेक्टेड आहे. कोणत्याही परिस्थितीत सीआरझेड कायद्यानुसार त्यांना गाळमिश्रीत रेती म्हणजे समुद्रातील किंवा नदीतील वाळू जी प्रतिबंधित आहे ती उपसण्याचा अधिकार नाही. मग त्यांना पर्यावरणाच्या आधारे उत्खननासाठी परवानगी देण्यात आली की सीआरझेडच्या आधारे परवानगी देण्यात आली? कारण, सीआरझेडमध्ये तर शंभर टक्के प्रतिबंध आहे. तेथून मूठभर रेती सुद्धा घेऊन जाऊ शकत नाही. स्पष्टीकरणामध्ये जे नमूद केले आहे ते असंदिग्ध आहे. कारण, दोन्ही कायदे वेगळे आहेत, त्यांचे विनियमन वेगळे आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

पर्यावरण विभागाचे असे मत आहे की, तुम्ही रेती उपसा करा. आपले पर्यावरण आघात निर्धारण झाले असेल त्यामुळे त्यांनी परवानगी दिली. परंतु, रेती उत्खनन करताना गाळमिश्रीत रेतीमध्ये समुद्रातील किंवा नदीतील वाळूच येणार आहे. जी परवानगी दिली आणि जे उत्खनन झालेले आहे त्यामुळे सीआरझेड कायद्याचा शंभर टक्के भंग झाला असेल. विषय असा आहे की, सीआरझेडच्या परवानगीशिवाय पर्यावरण विभागाने परवानगी कशी काय दिली? अधीन राहून परवानगी कशी काय देता येते? अधीन राहून परवानगी दिली असेल तर जोपर्यंत सीआरझेडची परवानगी मिळत नाही तोपर्यंत वाळू काढता येणार नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, शासनाने या प्रकरणामध्ये दिनांक ३.८.२०११ रोजीच्या पत्रान्वये श्री महालक्ष्मी औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थेस अशा प्रकारची परवानगी दिली होती. त्यावेळी पर्यावरण विभागाची ना हरकत घेतली गेली होती. ज्याअर्थी पर्यावरण विभागाची परवानगी आहे त्याअर्थी शासनाने ही परवानगी दिलेली आहे. त्यावेळी सीआरझेडची स्वतंत्र परवानगी वगैरे असे पाहण्यात आल्याचे दिसून येत नाही असे प्रतिनिधींनी सांगितले.

स्पष्टीकरणामध्ये नमूद केले आहे की, पर्यावरण विभागाने दिलेल्या अटी व शर्तीनुसार गाळ व गाळमिश्रीत रेतीचे उत्खनन करताना समुद्र तट विनियमन क्षेत्र (CRZ) अधिसूचनेचा भंग होणार नाही याबाबत कळविण्यात आले होते. आता गाळमिश्रीत रेती काढण्यात येणार असेल तर तो सीआरझेड कायद्याचा भंगच आहे. त्यांना तो अधिकारच नाही. सीआरझेडची वेगळी परवानगी घ्यावयाची असा नियम आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभाग सद्य:स्थितीत सीआरझेडची वेगळी परवानगी घेतो. त्यावेळी पर्यावरण विभागाची एनओसी होती. त्या आधारे ही कार्यवाही करण्यात आलेली आहे. असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

सीआरझेडची वेगळी परवानगी घ्यावी असा त्यावेळी नियम होता काय? परंतु, या प्रकरणामध्ये तो घेतलेला नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, या प्रकरणामध्ये फक्त पर्यावरण विभागाची एनओसी घेतलेली आहे. असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

सीआरझेडची एनओसी घेतलेली नाही काय? अशी विचारण समितीने केली असता, सीआरझेडची स्वतंत्र एनओसी घेण्यात आलेली नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. मग त्या संदर्भात कारवाई केली पाहिजे. ते सन २०११ पासून लागू आहे. या प्रकरणामध्ये सीआरझेडची एनओसी घेतलेली नाही हे स्पष्ट आहे. त्यामुळे हा विषय अहवालामध्ये घ्यावा. जे केले त्यासाठी विभागाचे समर्थन आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, जे झालेले आहे ते विभागाने समिती समोर सादर केलेले आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ज्यांनी याचे पालन केले नाही त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता, ही शासन-स्तरावरील कार्यवाही आहे. शासनाने पत्र दिलेले आहे. असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

शासनाने सीआरझेडचे पालन करावे या आधारावरच हे केलेले आहे. सब्जेक्ट टू सीआरझेड ॲप्रुव्हल आहे. शासन म्हणजे मंत्री महोदय असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय? मंत्री महोदयांच्या स्तरावर ही परवानगी देण्यात आलेली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणात शासनस्तरावरून पत्र निर्गमित झालेले आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सन २०११ मध्ये नियमांचे उल्लंघन झालेले आहे हे मान्य आहे काय? अशी विचारणा केली असता, ज्याअर्थी शासनाने त्यावेळी पर्यावरण विभागाला कन्सल्ट केले आणि पर्यावरण विभागाची एनओसी होती त्याअर्थी शासनाने ही कार्यवाही केलेली आहे. पर्यावरण विभागाची एनओसी आहे म्हणजे त्यावेळी सर्व प्रचलित नियमांचा परामर्श घेऊन एनओसी देण्यात आलेली असेल असे गृहीत धरून शासनाने कार्यवाही केलेली आहे.असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

शासनाने असे गृहीत धरून दिले. विभागाने ते नियमामध्ये नसल्याचे अगोदरच सांगितले. ज्यावेळी या संस्थेला परवानगी दिली गेली त्यावेळी सीआरझेडची परवानगी घेणे आवश्यक होते. त्यावेळी असा नियम होताच. असे मत समितीने व्यक्त केले असता, आजच्या परिस्थितीत अशा प्रकारची परवानगी जिल्हास्तरावरून दिली जाते. आपण जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देतो. हे प्रकरण आणि इतर प्रकरणांमध्ये फरक आहे. या प्रकरणामध्ये शासनस्तरावरून परवानगी देण्यात आलेली आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

शासनस्तरावरून म्हणजे कोणी परवानगी दिलेली आहे? शासन कोण आहे हे समितीला कळले पाहिजे. ती नस्ती जळालेली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, ही सन २०१२ पूर्वीची नस्ती आहे. सध्या ती नस्ती उपलब्ध नाही.असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. शासनस्तरावरून म्हणजे मंत्रीस्तरावर हे समितीचे मत बरोबर आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शवली व शासनस्तरावरून म्हणजे त्यासाठी किमान मंत्री महोदयांची मान्यता असली पाहिजे असे सांगितले.

स्पष्टीकरणामध्ये असे नमूद केलेले आहे की, "पर्यावरण विभागाने दिलेल्या अटी व शर्तीनुसार गाळ व गाळमिश्रित रेतीचे उत्खनन करताना समुद्र तट विनियमन क्षेत्र (CRZ) अधिसूचनेचा भंग होणार नाही. समितीचा प्रश्न असा आहे की, सीआरझेडच्या अधिसूचनेत कोणत्या गोष्टींचा अंतर्भाव होतो? शासनाने परवानगी देताना सीआरझेडच्या अधिसूचनेचा भंग होणार नाही असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. सचिव महोदयांनी सीआरझेडच्या अधिसूचनेत कोणकोणत्या गोष्टी अंतर्भूत आहेत याबाबत समितीला माहिती द्यावी. म्हणजे अधिसूचनेचा भंग झालेला आहे किंवा नाही हे कळेल. शासनाने सीआरझेडच्या परवानगीच्या अधीन राहून परवानगी दिलेली आहे. अधिसूचनेचा भंग होणार नाही असे म्हटलेले आहे. मग सीआरझेडच्या अधिसूचनेत काय नमूद आहे आणि त्यानुसार काय अपेक्षित आहे, सीआरझेड कायदा आहे. त्या कायद्यानुसार काय अपेक्षित आहे? शासनाने लेखी उत्तर दिलेले आहे. अधिसूचनेत काय नमूद केलेले आहे? नस्ती जळालेली आहे. मग विभागाकडून या संदर्भात स्पष्टीकरण कसे काय देण्यात आले? अशी विचारणा समितीने केली असता, जे पत्र दिलेले असते त्याची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयात उपलब्ध असते. त्यामुळे जुन्या नस्त्यांचा पत्र व्यवहार उपलब्ध होतो. परंतु, टिप्पणी मिळत नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

शासनाने परवानगी दिली असे विभागाचे मत आहे. आपण ते गृहीत धरून सांगत आहे की माहितीच्या आधारे सांगत आहे अशी विचारणा समितीने केली असता, ज्याअर्थी शासनस्तरावरून पत्र निर्गमित झालेले आहे म्हणजे त्यासाठी शासनाची मान्यता असावी असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समितीने या संदर्भात शिफारस करावी. याचा परिणाम काय झालेला आहे हे समितीला सांगतो. वर्सोवा खाडीवरील पूल कमकुवत झालेला आहे. शासनाचे वर्ष-वर्ष किंवा तीन-तीन वर्षे कोट्यवधी रुपये खर्च होतात, भाईंदर पासून वसईकडे जाणारी खाडी आहे. पश्चिम द्रुतगती मार्ग जवळ वर्सोवा खाडी आहे. वाडा, पालघर, वसईमध्ये जे गाळमिश्रित रेती उत्खनन करण्यात आले त्याचा हा परिणाम आहे. त्याचा सरसकट उपयोग भाईंदरपासून चारोटी-मनोरपर्यंत करण्यात आला आहे. त्याचा परिणाम असा होत आहे की, वसईच्या खाडीमध्ये वाहतुकीला अडथळा येतो, नवीन पूल बांधण्यामध्ये अडथळा येतो. समितीने यासंदर्भात प्रश्नावली काढली तेव्हा सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव आशिषकुमार सिंग होते. एक वर्षापासून त्या संदर्भातील दस्तावेज मिळत नाहीत. तो पूल कधी व कोणी बांधला आहे ते मिळत नाही. गॅमन इंडिया यांनी बांधला होता. त्या पुलाचे संकल्पचित्र व रेखाचित्र मिळत नाही. परदेशातून ते मागविण्यात आले आहे. त्यामुळे हे प्रकरण फार गंभीर आहे, शासनस्तरावर निर्णय केला असला तरी हा निर्णय कोणी केला. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे याची सर्व माहिती असावी. यासंदर्भातील नस्ती जिल्हाधिकारी कार्यालयाकडे असेलच. अधिसूचनेत काय नमूद केले आहे, सीआरझेडचा कायदा आहे, उत्खनन करताना त्या बाबीचा भंग केला असेल तर ते कारवाईस पात्र आहेत. सीआरझेडची अधिसूचना काय आहे. त्यामध्ये कोणत्या बाबींचा समावेश आहे अशी विचारणा समितीने केली असता, ती नस्ती विभागाकडे उपलब्ध नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. ती नस्ती जळाली की, ती विभागाकडे उपलब्ध नाही अशी विचारणा समितीने केली असता, सदर नस्ती विभागाकडे उपलब्ध नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

असे असेल तर ही आणखी गंभीर बाब आहे. नस्ती जळाली असेल तर ती बाब समिती समजू शकते. खाडीमध्ये डुबकी मारून रेती काढतांना तेथे बाज लावले आहेत. तेथे ८० ते १०० बाज लावले आहेत, रेती काढण्यासाठी मोठे ड्रेझर लावण्यात आले आहेत. तेथून जातांना ते बघतो. शासनाने रेती काढण्यास मान्यता देऊन जे आदेश काढले त्या आदेशाची प्रत उपलब्ध करून देण्यात यावी. त्यामध्ये कोणकोणत्या बाबींचा उल्लेख करण्यात आलेला आहे. अशी विचारणा समितीने केली असता, ती प्रत उपलब्ध आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

यासंदर्भातील शिफारस त्यावेळी जिल्हाधिकारी यांनी केली होती काय? सीआरझेड अधिसूचनेच्या अधीन राहून, अधिसूचना आणि कायदा काय आहे, त्यामध्ये कोणकोणत्या बाबींचा अंतर्भाव केलेला आहे. ज्या बाबींचा अंतर्भाव केलेला असेल व उत्खनन करताना त्याबाबत भंग झाला असेल त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणे क्रमप्राप्त आहे. पर्यावरणाचा विचार करून सीआरझेडच्या कायद्याच्या व अधिसूचनेच्या अधीन राहून परवानगी देण्यात आली आहे. ब्लँकेट परवानगी दिलेली नाही. पर्यावरण विभागाने परवानगी देतांना अट टाकली आहे. पर्यावरण विभागाची परवानगी मिळाली त्यामुळे इतर विभागांच्या परवानगीची गरज नाही असे नाही, किंवा त्या कायद्यानुसार कंत्राटदाराला किंवा त्या सहकारी संस्थांना विशेष परवानगी दिली अशातला भाग नाही. यामध्ये स्पष्ट अट टाकली आहे की, सीआरझेड कायद्याच्या अधिसूचनेचा भंग होणार नाही. नेमकी सीआरझेडची अधिसूचना व कायदा काय आहे त्यामध्ये कोणत्या गोष्टींचा अंतर्भाव आहे, उत्खनन करताना त्याचे उल्लंघन झाले असेल तर ती व्यक्ती कायदेशीर कारवाईस व इतर सर्व बाबींसाठी आपोआप पात्र होतो. असे मत समितीने व्यक्त केले असता या प्रकरणात शासनस्तरावरून पत्रव्यवहार झालेला आहे, शासनाने ज्या आधारावर कारवाई केली त्यासंदर्भातील माहिती विभागाकडे उपलब्ध आहे, ती समितीसमोर सादर करू इच्छितो. शासनाने सुरूवातीला दिनांक १०/०१/२०११ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी ठाणे, यांना परवानगी कळविली होती. जिल्हाधिकारी ठाणे, यांच्याकडून दिनांक १८/८/२०१० रोजी प्रस्ताव होता त्या अनुषंगाने ती परवानगी दिली होती. असे या पत्रावरून दिसून येते. त्यांनी या पत्रात असे नमूद केले होते की, श्री. महालक्ष्मी औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था यांच्या विनंतीनुसार उपरोक्त संस्थेस खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून पालघर, वसई व वाडा या तालुक्यातील खाडी किंवा नदी क्षेत्रातील गाळ व गाळ मिश्रित रेती परवाना पद्धतीने यांत्रिकी सहाय्याने उत्खनन करण्यास शासनाकडून मान्यता देण्यात येत आहे. या परवानगीमध्ये एकूण ०६ अटी व शर्ती नमूद करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये (१) अर्जदाराकडून आगाऊ स्वामित्वधनाची रक्कम वसूल करण्यात यावी. ही अट आर्थिक होती. (२) जिल्हाधिकारी यांनी अर्जदारांना परवाना देण्यापूर्वी संबंधित विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात आल्याची खातरजमा करण्यात यावी. (३) अर्जदाराने उत्खनन केलेल्या गौण खजिनाची योग्य ती नोंद ठेवावी, यादी ठेवावी. (४) जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांनी विहित कालावधीमध्ये त्या अर्जदाराने उत्खनन सुरू केलेल्या क्षेत्रात प्रत्यक्ष भेट द्यावी. भेट देऊन उत्खनन केलेल्या गौणखनिजाची नोंद करावी. (५) तहसीलदार व उप विभागीय अधिकारी यांनी कामावर देखरेख ठेवावी अशा प्रकारे सर्वसाधारण अटी व शर्ती नमूद केल्या होत्या. असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

ना हरकत प्रमाणपत्र संबंधित विभागाकडून घ्यावे अशी अट यामध्ये आहे, म्हणजे सीआरझेडकडून त्यांना प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. ही बाब सीआरझेडमध्ये येत असल्यामुळे सीआरझेडची एनओसी अत्यावश्यक आहे. अशी एनओसी घेण्यात आली होती काय? अशी विचारणा समितीने केली असता, ही पहिली परवानगी होती. त्यानंतर दुसरी परवानगी दिली होती. १०/१/२०११ रोजी दिलेल्या परवानगीची मुदत दिनांक ३१/७/२०११ च्या पुढे सुरू ठेवण्यासाठी पुन्हा श्री. महालक्षी औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था यांनी विनंती केली होती. त्यानुसार शासनाने दिनांक ३/८/२०१८ च्या पत्रान्वये पुन्हा त्यांना मुदत वाढ दिली. यावेळी देखील अटी व शर्ती घालण्यात आल्या होत्या. यामध्ये पहिली अट तीच आहे की, स्वामित्वधनाची रक्कम आगाऊ वसूल करण्यात यावी असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

सीआरझेडबाबत काय नमूद केले आहे? अशी विचारणा समितीने केली असता सीआरझेडबाबत त्यांनी स्पेसिफिक नमूद केले नाही, असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले. महालक्ष्मी औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थेचे कोण कोण मालक आहेत. त्याची यादी समितीला देण्यात यावी. ही संस्था कोणाची आहे. त्यांनी सांगितले की, संबंधित विभागाच्या एनओसी घ्याव्यात. यामध्ये सर्व आले असे मत समितीने व्यक्त केले असता, जिल्हाधिकारी यांनी अर्जदारास परवानग्या देण्यापूर्वी गौण खनिजाच्या उत्खननासाठी संबंधित विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. यामध्ये सीआरझेड असे स्पष्ट उल्लेख केला जाणार नाही. ही जबाबदारी जिल्हाधिकारी यांची आहे. यासंदर्भातील अट टाकण्यात आली आहे. अटींचे पालन केले पाहिजे. त्यावेळी जे धोरण होते, त्या धोरणात मंत्री महोदयांची परवानगी आवश्यक होती की, दुसरे काही होते. अशी विचारणा समितीने केली असता, कामकाजाच्या नियमाप्रमाणे विभागाचे कामकाज चालते. विभागाचे मंत्री यांच्या परवानगीने विभागाचे कामकाज चालते. असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले. गौण खनिजाच्या उत्खननाचे जे धोरण त्यावेळी अस्तित्वात होते. त्यावेळच्या धोरणाप्रमाणे मंत्री महोदयांची परवानगी बंधनकारक होती काय? असा समितीचा स्पष्ट प्रश्न आहे. अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडे नस्ती उपलब्ध नसल्यामुळे या प्रकरणात आज हा निर्णय घ्यावयाचा असेल तर मंत्री महोदयांच्या परवानगीने हा निर्णय घेता येईल. असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले. त्यावेळच्या धोरणाप्रमाणे काय होते. अशी विचारणा समितीने केली असता, धोरणामध्ये कोणत्या स्तरापर्यंत न्यावे असे नसते. कामकाजाच्या नियमाप्रमाणे ते असते. कामकाजाच्या नियमाप्रमाणे मंत्री महोदयांच्या मान्यतेने असे निर्णय घेतले जातात. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

यामध्ये वाळू व रेती निर्गतीचे नवीन धोरण दिनांक २५/१०/२०१० रोजी राज्य शासनाने घेतलेले आहे. त्या धोरणात नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी खालील क्षेत्रातील वाळू रेतीचे उत्खनन करणे आवश्यक असल्याने खाडीतील रेती गटातील वाळू उत्खननाबाबत महाराष्ट्र मेरीटाईम्स बोर्डाकडून सर्वेक्षण करण्यात येते. खाडीतील रेती काढण्याचा विषय सन २०१० चा आहे. परंतु तो मार्ग सुकर करण्यासाठीचा आहे. तिकडे कोणत्याही प्रकारचे नौकायन होत नाही. परवानगी दिली आहे तेथे कोणत्याही प्रकारचे दुसरे ट्रान्सपोर्टेशन आयदर कमर्शियली ऑर पब्लिकली होत नाही. हे कोकणातील आहे. जेथे नौकायन चालते, ट्रान्सपोर्टेशन ऑफ पिपल होते, त्यासाठी ते लागू होते किंवा जेथे मोठ्या कॉरिडोरमध्ये कंटेनर ट्रान्सपोर्टेशन होते, त्यासाठी ते लागू होते, यासाठी ते लागू होत नाही. उल्लंघन झाल्याबाबत महालेखाकारांचा आक्षेप आहे, त्यांच्या म्हणण्यानुसार समितीला असे वाटते की, विभागाने याकडे दुर्लक्ष केले आहे. शासनाने निर्णय देताना पर्यावरण आघात निर्धारण करावे आणि ते करताना पर्यावरणाची बाब पहावी. त्यामध्ये सीआरझेडचाही उल्लेख होता. मात्र कुठेही त्याचे पालन करण्यात आल्याचे दिसत नाही, असे समितीला स्पष्ट जाणवत आहे. नस्ती सापडत नाही, हाही गंभीर विषय आहे. त्यामुळे हा विषयही रेकॉर्डवर आला पाहिजे. अपर मुख्य सचिवांना माहीत असेल की, महालक्ष्मी औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थेचे नाव आले आहे, त्याची माहिती पाहिजे. सदर संस्थेचे पदाधिकारी कोण आहेत, ते समजले पाहिजे. अशी विचारणा समितीने केली असता, संस्थेच्या संदर्भातील माहिती सादर करतो.असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

(ब) जिल्हा खनिकर्म नियोजनाशिवाय तात्पुरता परवाना देणे :—

२.१३ नागपूर सोडून बाकी ठिकाणी जिल्हा खनिकर्म नियोजनानुसार अल्पावधी खाण परवानगी दिली नाही, हे विभागाने मान्य केले आहे. मात्र त्यावर कोणतीही कारवाई केलेली दिसत नाही. विभागाने मान्य केले आहे. नागपूर सोडून सातारा, पुणे, ठाणे अशा सर्व ठिकाणी देण्यात आलेली परवानगी नियोजनाशिवाय देण्यात आली आहे. नियमांच्या बाहेर जाऊन, नियोजनाशिवाय परवानगी देण्याचे कारण काय आहे, ती देणाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे? महालेखाकारांनी या ४ जिल्ह्यांचा विषय उपस्थित केला आहे. विभागाने बाकी जिल्ह्यांचीही तपासणी केली होती का? अशी विचारणा समितीने केली असता, मायनर मिनरल एस्केव्हेशनच्या नियम ५८ प्रमाणे अल्प कालावधीसाठी परवानगी देताना जिल्हा खाणकाम आराखडा दिला पाहिजे, हे खरे आहे. विभागाने पूर्वी सादर केल्याप्रमाणे, नागपूरमध्ये त्यांचा खाणकाम आराखडा अस्तित्वात होता. मात्र सातारा, पुणे, ठाणे या ३ जिल्ह्यांत त्यावेळी त्यांचा खाणकाम आराखडा अस्तित्वात नव्हता. साताऱ्यात त्यांनी नोव्हेंबर, २०१३ ते जानेवारी, २०१५ या कालावधीत एकूण २२ तात्पुरते परवाने दिले होते, पुण्यात त्यांनी ५३ परवाने दिले होते, मात्र त्यापैकी ४५ परवाने विकासकांना पाया उत्खननाकरिता दिले होते, ते वेगळ्या खाणकामकरिता दिले नव्हते. विकास करताना पाया खोदायचा असतो, त्याकरिता उत्खननाची परवानगी दिली होती. ठाण्यात ५३ तात्पुरते परवाने दिले होते. विभागाकडील माहितीनुसार त्या सर्व परवानग्या पाया उत्खननासाठी देण्यात आल्या होत्या. ठाणे व पुणे यांच्या संदर्भात पाहिले तर असे दिसेल की, तात्पुरती परवानगी मेजॉरिटीने दिली होती आणि ती विकासकामांमध्ये पाया उत्खननासाठी दिली होती. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. सातारा जिल्ह्याबाबत अवगत करण्यास समिती सूचित केले असता, सातारा जिल्ह्यात खाणकामासाठी परवानगी दिली होती.असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. त्यांच्यावर कारवाई केली आहे का? अशी विचारणा समितीने केली असता, अपर जिल्हाधिकारी, सातारा यांनी सांगितले आहे की, प्रामुख्याने राष्ट्रीय महामार्गाच्या कामाकरिता दगड व मुरुम उपलब्ध होण्यासाठी त्यांनी ही परवानगी त्यावेळी दिली होती असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.राष्ट्रीय महामार्गाचे काम करायचे आहे म्हणून नियोजनाच्या बाहेर जायचे का? समिती पाया उत्खननाच्या संदर्भात समजू शकते. ठाणे व पुणे या संदर्भातील विषय प्रामाणिक वाटत आहेत. पण साताऱ्याचे काय करायचे, साताऱ्यात या कामासाठी आवश्यक आहे म्हणून नियोजनाच्या बाहेर जायचे का? विभागाने त्याचाही विचार केला पाहिजे, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले असता, विभाग पूर्णपणे सहमत आहे. सातारा जिल्ह्यात त्यांनी कार्यवाही केली आहे, त्यांच्या खुलाशानुसार ती कार्यवाही त्यांनी राष्ट्रीय महामार्गाकरिता गौण खनिज उपलब्ध व्हावे यासाठी केली होती. मात्र हे करताना त्यांनी खाणकम आराखड्याचा विचार करणे आवश्यक होते. संबंधितानी तशा सूचना दिल्या जातील की, येथून पुढे याची पुनरावृत्ती होऊ नये. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सूचना देऊन चालणार नाही, त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. विभागाने बाकीच्या दोन्ही विषयी दिलेले जस्टिफिकेशन समितीला मान्य आहे. मात्र त्यांनी नियमांचे पालन केलेले नाही, त्यामुळे त्यासाठी साताऱ्याच्या अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांची विभागीय चौकशी सुरू केली पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले असता, त्यांच्याकडून स्पष्टीकरण घेतो. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. स्पष्टीकरणच घेऊ नये तर कारवाई करावी असे समितीने सूचित केले असता, कारणे दाखवा नोटीस देतो. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

साताऱ्यात राष्ट्रीय महामार्गासाठी गौण खनिजाचा, खनिज उत्पादनाचा नियोजन आराखडा तयार केला पाहिजे होता, मात्र तो केला नाही म्हणून सचिवांना त्या संदर्भात स्पष्टीकरण मागविण्यास व कारवाई करण्यास सांगितले आहे. महालक्ष्मी औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थेचे कर्ता-धर्ता कोण होते, संचालक कोण होते, याची माहिती घेणार आहात. मात्र त्यांच्यावर कोणती कारवाई होणार आहे ? अधिकाऱ्यांनी सीआरझेडचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन केले आहे, जिल्हाधिकाऱ्यांनी अटी टाकल्यानंतर परवानगीही जिल्हाधिकारीच देतात. अशा प्रकरणांत तहसीलदार किंवा तलाठी

परवानगी देत नाहीत. साताऱ्याच्या संदर्भात स्पष्टीकरण व दंडात्मक, शिक्षात्मक कारवाई इन्सिस्ट करीत आहोत. मग यांना फक्त नाव विचारुन कसे जाऊ द्यायचे, समितीच्या शिफारशीमध्ये हे आले पाहिजे. कारवाई काय होणार आहे, कोणत्या स्तरावर कारवाई होणार आहे, कोण चौकशी करणार आहे, हे त्यांना सांगावे. जिल्हाधिकारी स्तरावरील चौकशी साधा अधिकारी करु शकणार नाही. कारण अटी, शर्ती जिल्हाधिकाऱ्यांनी घातल्या होत्या आणि परवानगी देखील जिल्हाधिकारी देणार आहेत. त्यामुळे त्या संदर्भातील चौकशी सचिव, प्रधान सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांनी किंवा अशा समितीने केली पाहिजे अन्यथा यामध्ये काहीही होणार नाही. वर्सोवा खाडीची दशा काय झाली आहे, ते पहावे. सन्माननीय समिती सदस्य सीआरझेडच्या संदर्भात सांगत आहेत. अत्यंत गंभीर विषय आहे. विभागाकडे माहिती मागितली आहे. मात्र त्याची ग्रॅव्हिटी कमी झालेली नाही. त्या विषयाच्या संदर्भात जबाबदारी निश्चित केली पाहिजे. जिल्हाधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करायची असेल तर आयुक्त किंवा सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांमार्फत या संपूर्ण विषयाची चौकशी करून समितीला एक महिन्याच्या आत माहिती द्यावी, जेणेकरून समिती शिफारस करु शकेल.असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय प्रतिनिधींनी समितीस माहिती सादर करतो असे सांगितले.

(क) पर्यावरण उपकराची (Environmental cess) कमी वसुली :—

२.१४ पर्यावरण उपकर वसूलीची स्थिती काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता, पुणे जिल्ह्यामध्ये पर्यावरण उपकरापोटी रुपये १३,८७,५९१/- ची करावयाची होती.असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.सदरहू रक्कम रुपये वसूली १३,८७,५९१/- इतकी नसून १ कोटी ७९ लाख रुपये इतकी आहे. कारण पर्यावरण उपकरापोटी १ कोटी ७९ लाख रुपये इतक्या कमी रकमेची वसूली झालेली आहे, असा महालेखाकार यांचा आक्षेप आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाकडील माहितीनुसार पुणे जिल्ह्यात पर्यावरण उपकरापोटी रुपये १३,८७,५९१/- इतकी वसूली करावयाची होती. यापैकी त्यांनी रुपये ३,५१,०००/- वसूल केलेले आहेत आणि उर्वरित रक्कम वसूल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाचे मत आहे की, पर्यावरण उपकरापोटी रुपये १३,८७,५९१/- इतकी रक्कम वसूल करावयाची होती आणि महालेखापाल यांचे म्हणणे आहे की, यापोटी १ कोटी ७९ लाख रुपये वसूली करावयाची होती. विभागीय सचिवांना पुनश्च विचारु इच्छिते की, पुणे जिल्ह्याची वसूली किती रकमेची होती? अशी विचारणा समितीने केली असता, पुणे जिल्ह्याची वसूली रुपये १३,८७,५९१/- आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. परंतु जुन्नर, आंबेगांव, मावळ, शिरुर, खेड, दौंड यांनी पर्यावरण उपकराची रक्कम जमा का केली नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, पर्यावरणाचा उपकर २ टक्के प्रमाणे वसूल करावयाचा असतो. परंतु संबंधितांनी मूळ स्वामित्वधनाच्या रकमेवर वसूली केली. महालेखाकार यांचे म्हणणे आहे की, हा उपकर सर्वोच्च बोलीच्या रकमेवरच वसूल केला पाहिजे. यामुळे ही तफावत आलेली आहे. ही तफावत वसूल करण्याची कार्यवाही पुणे जिल्ह्यात सुरू आहे. त्यानुसार त्यांनी आतापर्यंत रुपये ३ लाख ५१ हजार वसूल केलेले आहेत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. या रकमेतील तफावत रू. १३ लाख ८७ हजार नसून १ कोटी ७९ लाख रुपये आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता,समितीकडे महालेखाकार यांचे पत्र असून त्या पत्रामध्ये त्यांनी पुणे जिल्ह्याची वसूली रुपये १३,८७,५९१/- एवढीच नमूद केली आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. आपण पुणे जिल्ह्याच्या बाबतीत सांगत आहात. परंतु महालेखाकार यांनी संपूर्ण राज्याची वसूली १ कोटी ७९ लाख रुपये असल्याचे नमूद केले आहे. राज्यातील संपूर्ण जिल्ह्यातील पर्यावरण उपकराच्या वसूलीची यादी त्यांनी समितीकडे सादर केली आहे. त्या यादीनुसार पर्यावरण उपकराच्या ७ कोटी ८१ लाख रुपयांपैकी ६ कोटी २ लाख वसूल झालेले आहेत आणि १ कोटी ७९ लाख रुपये वसूली होणे बाकी आहे. समितीची सूचना आहे की, सदरहू उपकराच्या वसूलीची कार्यवाही तीन महिन्याच्या आत करावी.असे समितीने सूचित केले असता, राज्यात विशेष मोहिम हाती घेऊन उक्त वसूलीची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले.

परिच्छेद क्र. ७.२.३.११ भूपृष्ठ भाडे वसूल न करणे :—

२.१५ पुणे जिल्ह्यात ७८.२७ लाख रुपये भूपृष्ठ भाडे वसूलीपैकी रु. ७ लाख ९७ हजार इतक्या रकमेची वसूली करण्यात आल्याचे नमूद केले आहे. उर्वरित रकमेच्या वसूलीबाबत काय कार्यवाही सुरू आहे? अशी विचारणा समितीने केली असता, चालू वसूली ४६ लाख ६६ हजार रुपये झाली असून, उर्वरित रक्कम पुढील तीन महिन्यात वसूल करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. ठाणे जिल्ह्यातील वसूलीच्या बाबतीत काय स्थिती आहे? अशी विचारणा समितीने केली असता, ठाणे जिल्ह्यात माहे ऑक्टोबर,२००६ ते सप्टेंबर, २०१६ पर्यंत एकूण भूपृष्ठ भाडे रुपये ६०,०८,८०८/- होते. यामध्ये पूर्वी रुपये १२,५०,०९६/- वसूल करण्यात आले होते. आता उर्वरित रक्कम आणि त्यावरील व्याज रुपये ५४,७२,५१९/- एवढी रक्कम वसूल करावयाची आहे. आतापर्यंत ३७,०८,४९३/- इतकी रक्कम वसूल केली आहे. उर्वरित १७ लाख रुपये वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. उक्त दोन्ही वसूली तीन महिन्यात करण्याचे प्रयत्न करावेत. असे निदेश समितीने दिले असता, विभागीय प्रतिनिधींनी वसुली करतो असे सांगितले.

विभागाने दिलेल्या माहितीमध्ये नमूद केले आहे की, जिल्हाधिकारी, ठाणे यांनी सदर परिच्छेदाबाबत सिडको प्राधिकरणाकडून वेळोवेळी माहिती मागविली आहे. तथापि, सदर माहिती अद्याप अप्राप्त आहे. सदरहू माहिती उपलब्ध करून न देण्याची कारणे काय आहेत? अशी विचारणा समितीने कली असता, सिडकोच्या माध्यमातून असा खुलासा करण्यात आला आहे की, सिडकोने जी वसूली केली आहे ते सरफेस रेंट नाही. त्यांनी लिज रेंटने ही वसूली केली आहे. त्यांनी या बाबतचा खुलासा नंतर सादर केला आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

वास्तविक पाहता विभागाने सिडकोला प्राधिकरण म्हणून गृहीत धरतो. शासनाने ८६ खाणीचे भाडेपट्टे हे सिडकोच्या नावे करून दिलेले आहेत. मूळ कल्पना अशी होती की, म्हाडा आणि सिडको यांनी स्वत:हून आर्थिकदृष्टया मागास किंवा गरीब लोकांना त्या त्या शहरात सुविधा देण्यासाठी स्वत: इमारती बांधाव्यात. त्यासाठी त्यांना उक्त ८६ खाणीचे भाडेपट्टे दिले होते. परंतु आता सिडको प्लॉट विकून टाकते. अशा परिस्थितीत खाणपट्टे आणि सिडकोचा काय संबंध राहतो? या महसुली बाबी आता शासनाने स्वत:च्या अखत्यारीत घेतल्या पाहिजेत. यामध्ये सिडकोचा काडीमात्र संबंध राहता कामा नये. खाणपट्ट्यांचे भाडे वसूल करणे, लिजची रक्कम वसूल करून महसूल विभागाकडे भरणे ही सिडकोची कामे नाहीत. त्या काळात सिडकोला खाणपट्टीचे स्वामित्वधन भरण्यासाठी वारंवार महसूल विभागाकडे यावे लागता कामा नये म्हणून हे अधिकार त्यांना दिले होते, अशी माहिती आहे. सिडकोला ८६ खाणपट्ट्यांतून गौण खनिज काढण्याचे भाडेपट्ट्याने दिलेले अधिकार तातडीने काढून घेऊन ते महसूल विभागाच्या अंतर्गत घेणार काय? आता सिडकोचा यामध्ये काहीच संबंध नाही. त्यामुळे या प्रक्रियेतून सिडकोला वगळले तर बरे होईल, असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीने सांगितले की, सिडकोने भूपृष्ठ भाडे वसूल केले नाही. समितीच्या निदर्शनास आणून देतो की, त्यांच्या पत्रानुसार त्यांनी भूपृष्ठ भाडे वसूल केलेले आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. परंतु सन्माननीय समिती सदस्यांचे म्हणणे आहे की, सिडकोने ज्याला भूपृष्ठ भाडे म्हटलेले आहे तो लिज रेंट आहे. This is not the surface rent which is to be recovered by the Revenue Department. ठीक आहे. त्यांनी याबाबतचे स्पष्टीकरण दिलेले आहे. परंतु या संदर्भातील कागदपत्रे विभागाला प्राप्त झालेली नाहीत. आम्ही सिडकोच्या मे, २०१५ या वर्षाच्या कागदपत्रांचा आधार घेतला आहे. त्यात त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, भूपृष्ठ भाडे आहे. But, now they are saying that it is not surface rent. विभागाकडे जी कागदपत्रे आलेली आहेत त्यामध्ये या बाबतचा उल्लेख नाही. सदरहू कागदपत्रे महसूल विभागाकडून समितीस सादर करण्यात येतील. त्यांनी सांगितले आहे की, सिडकोकडे सरफेस भूपृष्ट भाडयानुसार पर्यावरण अधिभार जमा केला आहे. सिडकोचे पत्र जिल्हाधिकारी, ठाणे यांनी पाठविलेले आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, सिडकोचा खुलासा समितीकडे सादर करतो. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समितीचे असे मत आहे की, आता उक्त खाणपट्टे हे शासनाच्या नावे करावयास पाहिजेत.असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाच्या माहितीनुसार सिडकोचे जे प्रकल्पग्रस्त आहेत त्यांना दिलेल्या जागेवर हे खाणपट्टे स्थित आहे. या संदर्भातील कोणताही निर्णय घेण्यापूर्वी सिडकोबरोबर चर्चा करणे आवश्यक आहे. समितीची परवानगी असेल तर या विषयी सिडकोबरोबर चर्चा करण्यात येईल. समितीचा मुद्दा विभागाच्या लक्षात आलेला आहे. या विषयी सिडकोबरोबर चर्चा करण्यात येईल आणि त्यानंतर यामध्ये नेमकी काय भूमिका घ्यावी याबाबत ठरविण्यात येईल. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

परिच्छेद क्र.७.२.४ निष्कर्ष आणि शिफारशी :—

२.१६ या परिच्छेदाच्या अनुषंगाने असे सुचविण्यात आले होते की, गौण खनिज क्षेत्र आणि त्यात अभिप्रेत असलेले गौण खनिजांचे परिमाण निदर्शित करण्यासाठी शासनाने एक डेटाबेस/डेटाबँक तयार करावयास पाहिजे. खाणी व रेती घाटांचे वाटप झाल्यानंतर त्यांचे नियतकालिक मोजमाप व्हावे यासाठी शासनाने एक पद्धती तयार करावयास पाहिजे. यावर विभागाने असे उत्तर दिले आहे की, द्वखनिजांसाठी एक डेटाबेस स्थापित करण्याच्या अनुषंगाने भारतीय खाण ब्युरो व विप्रो यांच्यामध्ये MOU स्वाक्षरी करण्यात आली आहे. या संदर्भातील सद्य:स्थिती काय आहे? तसेच रेती घाटांचे मोजमाप व्हावे यासाठी विभाग काय नियोजन करीत आहे? अशी विचारणा समितीने केली असता, पहिल्या साक्षीच्यावेळी संचालक, जिऑलॉजी ॲण्ड मायनिंग यांनी समितीला माहिती दिली होती की, भारतीय खाण ब्युरो आणि विप्रो कंपनी यांच्यामध्ये एमओयु झालेला आहे. त्यामध्ये महाराष्ट्र राज्यासह इतर १२ राज्यांचा सहभाग आहे. त्या अनुषंगाने अशाप्रकारचा डेटाबेस तयार करण्याची कार्यवाही विप्रो या खाजगी संस्थेमार्फत होणार आहे. अद्यापपर्यंत त्यांच्याकडून अहवाल प्राप्त झालेला नाही. या परिच्छेदाच्या अनुषंगाने शासनाने अलीकडच्या कालावधीमध्ये सविस्तर सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यामध्ये खनिकर्म उत्खनाच्या स्थळांची वेळोवेळी पाहणी करणे, त्याची मोजणी करणे आणि मंजूर परिमाणापेक्षा जास्त उत्खनन झाले असेल तर त्याबाबतीत कारवाई करणे अशाप्रकारच्या सूचनांचा अंतर्भाव आहे. समितीची परवानगी असेल तर हे परिपत्रक समितीसमोर सादर करतो. या परिपत्रकाच्या माध्यमातून क्षेत्रीय यंत्रणांना सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. अवैध उत्खननाच्या बाबतीत समन्वय साधत आहोत. महालेखाकारांनी मुद्दा काढला होता की, समन्वय नाही. समन्वय नसल्यामुळे आरटीओ काही कारवाई करतात. त्या अनुषंगाने महसूल विभाग कारवाई करते. आता विभागाने एक समिती स्थापन केलेली आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

रेती घाटाच्या मोजमापाबद्दल काय कार्यवाही केली आहे? अशी विचारणा समितीने केली असता,कोणत्या घाटामध्ये किती साईड आहेत? तसेच किती खोलीपर्यंत वाळू आहे याची माहिती जीएसडीए स्थळ निश्चित करून देतात. त्या आधारावर किती क्षेत्रामध्ये किती ब्रास वाळू आहे याची माहिती होते. त्या अनुषंगाने जेवढे खोदकाम असते त्याची वेळोवेळी पाहणी करून किती खोदकाम केलेले आहे याची माहिती घेतो. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आता रेरा रजिस्ट्रेशन आहे. त्यामुळे किती चौरस फुटाचे बांधकाम आहे हे कार्यस्थळावर कळते. बांधकामासाठी दगड, खडी आणि रेती या तीन प्रकारच्या खनिजांची आवश्यकता आहे. ज्या विकासकांचे रजिस्ट्रेशन रेराकडे होतात त्यांना संबंधित नियोजन प्राधिकारी मंजुरी देते, त्यांच्याकडून कन्स्ट्रक्शनला किती खडी, दगड आणि रेती लागणार आहे आणि त्याचे स्त्रोत कोठून आहेत याची माहिती घेऊ शकतो. त्यांना सोर्स वेळोवेळी बदलण्याचा अधिकार असू द्यावा. आपण असे केले तर वाळू चोरीचा प्रकार तसेच तहसीलदार आणि पोलिसांच्या अंगावर गाडी घालण्याचे प्रकार बंद होतील. आपण या विषयाच्या स्वतंत्र बैठक घेऊन या विषयावर सविस्तर चर्चा केली तर प्रत्यक्षात किती वापर आहे आणि त्याचा सोर्स सांगितला तर अनेक गोष्टी नियंत्रणात येतील. नियतकालिक तपासणीमध्ये मोजणी करणे या अनुषंगाने एमओयु झालेला आहे. त्याचा कार्यक्रम निश्चित झालेला आहे. सुरूवातीला किती कालावधीसाठी काम केले जाणार आहे त्याचे लक्ष्य ठरविण्यात आले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, आयबीएम आणि विप्रो कंपनी यांच्यामध्ये एमओयु झालेला आहे. राज्यातील खनिजाचा डेटा बेस तयार करण्यासाठी एमओयु झालेला आहे. विप्रो कंपनीमार्फत ही कार्यवाही होणार आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. कार्यवाही केव्हा सुरू होणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, अद्यापपर्यंत विप्रो कंपनीने अशाप्रकारचा डेटाबेस सादर केलेला नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. विभागाला नेमके काय अपेक्षित आहे? अशी विचारणा समितीने केली असता, संचालक, जिऑलॉजी आणि मायनिंग येथे उपस्थित आहेत. समितीची परवानगी असेल तर ते समितीला माहिती देतील. प्रधान सचिवांनी सांगितल्याप्रमाणे आयबीएम, विप्रो कंपनी आणि महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये संयुक्त करार झालेला आहे. पण विप्रोचे टेंडर अंतिम व्हावयाचे आहे. त्यांचा मूळ स्टडी झालेला आहे. पण अजून कार्यवाहीस सुरूवात झालेली नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. निविदा प्रक्रिया टेंडरची प्रोसेस सुरू झाली काय ? अशी विचारणा समितीने केली असता, निविदा झालेली आहे. अजून किमान एक वर्ष लागेल. कारण डेटाबेस फार मोठा आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. निविदा अंतिम केव्हा होईल ? अशी विचारणा समितीने कली असता, निविदा अंतिम झालेले आहे. विप्रोला काम मिळालेले आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. सचिवांनी सांगितले की, जीएसडीएच्या माध्यमातून पाण्याखाली किती ब्रास रेती उपलब्ध आहे हे कळू शकेल. पण आता किती रेती उपलब्ध आहे आणि किती उत्खनन झाले हे ठराविक काळानंतर पाहणी केल्याशिवाय कळणार नाही. या वर्षी उत्खनन झाले, पुढच्या वर्षी किती होणार आहे याचे काही कालावधीनंतर मोजमाप झाले पाहिजे. किती वापर होणार आहे आणि त्याचा पुरवठा कोठून होणार आहे हे त्यांनी जाहीर केले पाहिजे. जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांच्या अंगावर गाडी घातली जाते म्हणून सर्वजण चिंता करीत असतो.आपण प्रत्येक वेळेला अधिक सक्षम व परिणामकारक काय होईल याचा नेहमी विचार करतो. आपण तसा विचार नेहमीच करीत असता आणि समिती या परिच्छेदाच्या अनुषंगाने करीत आहे. एखाद्या ठिकाणाहून हजार ब्रास रेती निघत असेल आणि तेथून अमूक ठिकाणी १० ब्रास नेली, दुसऱ्या ठिकाणी २० ब्रास नेली याची माहिती ठेवणारी यंत्रणा तयार करता येईल काय, जेणेकरून या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळू शकतील. असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीने केलेल्या सूचनेबाबत वस्तुस्थिती समितीस सादर करतो. कलम ४८ अन्वये स्वामित्वधन वसूल करतो. जमिनीखालील खनिजावर राज्य शासनाचा अधिकार आहे आणि ते खनिज काढायचे असेलतर त्यासाठी राज्य शासनाची परवानगीची आवश्यकता आहे अशी तरतूद महाराष्ट्र जमीन महसूल संहितेमध्ये आहे. सध्या कन्झम्शनच्या पॉईन्टला स्वामित्वधन वसूल करण्याची तरतूद नाही तर उत्खननाच्या पॉईंटला स्वामित्वधनाची वसूल करण्याची तरतूद आहे. म्हणजे खोदकामापूर्वी परवानगी लागते आणि तेथे स्वामित्वधन वसूल करतो. सन्माननीय सदस्यांची सूचना आहे की, जो कन्झम्शन करणार आहे त्याने जाहीर केले पाहिजे की, मला हजार ब्रास पाहिजे,अमूक येथून रेती आणणार आहे, त्यामुळे मी इतका स्वामित्वधन भरतो. परंतु सध्या कायद्यामध्ये अशी तरतूद नाही. उत्खननच्या ऐवजी कन्झम्शनच्या पॉंईटला स्वामित्वधन भरावे असा बदल करावयाचा असेल तर त्यासाठी कायद्यामध्ये सुधारणा करावी लागेल. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. समितीला तशी शिफारस करता येईल. उत्खननच्यावेळी रॉयल्टी घेणे योग्य आहे. ॲट दसोर्स जास्त योग्य आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाने ही कल्पना आणखी परस्यू केली. प्रत्येक वापरकर्त्याने त्यांच्याकडे असलेला गौण खनिज योग्य मार्गाने आणलेला आहे याची पावती दाखविणे बंधनकारक राहील अशाप्रकारचा प्रस्ताव विभागाने मंत्रिमंडळापुढे ठेवला होता. पण त्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. ज्याने उत्खनन केले किंवा ज्यांनी १०० ब्रास वाळू काढली त्यांनी ती कुठे नेली हे विचारु शकतो. अशी विचारणा समितीने केली असता, त्यावर विभाग नियंत्रण करतो. कारण उत्खनन केल्यानंतर जेव्हा डिस्पॅच करतो त्यावेळी याला ट्रान्झीट पास द्यावे लागतात. आपण टीपीएसच्या माध्यमातून कंपेअर करतो. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. समितीचा मुद्दा असा आहे की, वापर किती आहे आणि त्याचे स्त्रोत किती आहे हे दोन्ही बाजूंकडून घेतले तर प्रत्यक्षात किती उत्खनन झाले आणि किती स्वामित्वधन भरले याची माहिती मिळेल. खाजगी ठिकाण असेल आणि शासनाची कामे असतील तेथून समजून घेतले तर जे खरोखर उत्खनन होते ते आणि रॉयल्टी किती येते याचे गणित कळून येईल. आपल्याला कन्झम्पशन किती होते हेच माहीत नाही.मग आपण जी स्वामित्वधन येते त्यावरुन गृहित धरतो. समितीने ज्या सूचना केल्या आहेत त्याबाबत शक्य असल्यास अंमलबजावणी करण्याची कारवाई करावी. असे समितीने सूचित केले असता, विभागीय प्रतिनिधींनी अंमलबजावणी करण्यात येईल असे सांगितले.

लोकलेखा समिती

उद्योग विभाग

३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाचे महसूली क्षेत्रावर लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट बाबींसंबंधी स्पष्टीकरणात्मक ज्ञापने लोकलेखा समितीस सादर करणेबाबतची माहिती :-

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	परिच्छेद क्र.७.२.२.१	खनिज सवलत नियम, १९६० च्या नियम ६३ A मध्ये पुर्वेक्षण अनुज्ञप्ती(Processing License-PL) अर्ज आणि खनिकर्म भाडेपट्टा (ML) अर्जांचा निपटारा अनुक्रमे नउ महिने आणि १२ महिन्यांच्या आत करण्याची तजविज आहे. संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपुर आणि उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दस्तावेजांवरून असे आढळले कि पुर्वेक्षण अनुज्ञप्ती(PL) आणि खनिकर्म भाडेपट्टा(ML) प्रदान करण्याकरीता महाराष्ट्र शासनाने २००८-०९ ते २०११-१२ दरम्यान अधिसूचना प्रकाशित करून अर्ज मागविले.विभागाने पुर्वेक्षण अनुज्ञप्तो आणि खनिकर्म भाडेपट्टा यांच्या २०११-१२ पर्यंतच्या प्रदानाकरीता अधिसुचना जारी केली होती. चुनखडी आणि बॉक्साईट या दोन निवडक	एक्झिट कॉन्फरन्समध्ये असे सांगण्यात आले कि, अधिनियमातील प्रस्तावित सुधारणांच्या अनुषंगाने खाणपट्टामंजुरीबाबतचे अर्ज प्रलंबित ठेवण्यात आले होते. दिनांक ०७ मार्च,२०१५ च्या अधिसुचनेन्वये अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. पुर्वेक्षण अनुज्ञप्तो आणि खाणपट्टा मंजुरीबाबत प्रलंबित अर्जांचा निपटारा करण्यासाठी शासनाने केलेल्या कार्यवाही बाबतची माहिती लोकलेखा समितीस द्यावी.	केंद्र शासन(खाण मंत्रालय) व्दारे खाण व खनिजे (विकसन व विनियमन) सुधारणा अधिनियम-२०१५ हा २७ मार्च, २०१५ ला अधिसूचित करण्यात आला आहे. एमएमडीआर ॲक्ट २०१५ च्या कलम १० (क) (१) अन्वये सदर अधिनियम निर्गमित होण्याच्या दिनांक १२ जानेवारी २०१५ पुर्वी शासनास प्राप्त झालेले सर्व खाणपट्टा अर्ज अपात्र ठरले आहेत. तसेच एमएमडीआर ॲक्ट २०१५ च्या कलम ८ मधील तरतुदीप्रमाणे सदर खाणपट्टे इ-लिलाव प्रक्रियेद्वारे वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. राज्य शासनाद्वारे प्रमुख खनिजांच्या खाणपट्टयांची लिलाव प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सद्यःस्थितीत प्रमुख खनिजाच्या लिलावाकरिता चार फेऱ्या पुर्ण झालेल्या असून त्याद्वारे तीन खाणपट्टयांचे यशस्वीरित्या सर्वोच्च बोलीधारकास वाटप करण्यात आले आहे. ई-लिलाव प्रक्रियेद्वारे राज्यात खाणपट्टा वाटपात १२५% पर्यंत अतिरिक्त अधिमुल्याची बोली प्राप्त झाली आहे. सदर

अ. क्र	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		खनिजांच्या संदर्भातील अर्जांच्या निपटाऱ्याची स्थिती खाली तक्ता क्र.७.२.२.१ मध्ये दर्शविली आहे.		अधिमुल्य स्वामित्वधनाव्यतिरिक्त प्राप्त होणार आहे. प्रस्तुत सुधारित अधिनियमा पुर्वी शासनास केवळ स्वामित्वधन प्राप्त होते. यास्तव राज्य शासनाच्या महसुलात घट नसुन याद्वारे वाढ होणारआहे.

काला वधी	पूर्वेक्षण अनुज्ञप्ती (PL)		खनिकर्म भाडेपट्टा (ML)	
	प्राप्त अर्जांची संख्या	निपटारा केलेल्या अर्जांची संख्या	प्राप्त अर्जांची संख्या	निपटारा केलेल्या अर्जांची संख्या
२००८-०९	३९२	४४	१५०	७१
२००९-१०	१०८	०	७१	०
२०१०-११	९७	०	११९	०
२०११-१२	३१२	०	०	०
एकूण	**९०९**	**४४**	**३४०**	**७१**

अनुज्ञप्ती आणि भाडेपट्टयाच्या निपटाऱ्यात मोठया प्रमाणात असलेले प्रलंबन निर्देशित करते की

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		अनुज्ञप्ती आणि भाडेपट्टा बहाल करण्यास विभाग गंभीरतेने घेत नाही. यामुळे खनिकर्माकरीता नविन क्षेत्र कमी स्थापित होत असून राज्य महसूल अवरोधित होत आहे. खनिज संपत्तीचा शोध घेणे हे राज्य खनिज धोरण १९९९ च्या उद्दीष्टांपैकी एक उद्दीष्ट होते आणि विभागाद्वारे यासंदर्भात उपाय न केल्यामुळे हे उद्दीष्ट विफल ठरत होते. प्रधान सचिव उद्योग, उर्जा व कामगार यांनी अंतिम बैठकीत सांगितले कि खाणी व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियमांमध्ये प्रस्तांवित बदलांचा विचार करून अर्ज हेतूपुरस्पर प्रलंबित ठेवण्यात आले होते. जेणेकरून लागू नियमांनूसार अर्जाची प्रक्रिया केली असता होणारी महसूलाची संभवणिय हानी टाळता आली.		
२.	परिच्छेद क्र. ७.२.२.२	**खनिकर्म भाडेपट्टयाचे नूतनीकरण** खनिकर्म सवलत नियम १९६० च्या नियम २४ A(६) अनुसार राज्य शासनाद्वारे जर भाडेपट्टयांच्या समाप्तीपूर्वी भाडेपट्टयाच्या नुतरीकरण आवेधानाचा निपटारा करण्यात आला नाही तर राज्य शासन त्यावर आदेश जारी करे पर्यंत त्या भाडेपट्टयाचा कालावधी तेवढया काळासाठी वाढविण्यात आला असे मानन्यात यावे. आमच्या पडताळणीत असे आढले की	-	सदर कालावधीमध्ये खाणपट्टा नुतनीकरण करण्यात आले नाही. खाण व खनिजे विकसन व विनियमन(सुधारणा) अधिनियम १९५७ च्या प्रस्तावित बदलांच्या अनुषंगाने खाणपट्टा नुतणीकरणाबाबतचे अर्ज प्रलंबित ठेवण्यात आले होते. तथापि, खाण खनिजे सुधारित अधिनियम २०१५ च्या कलम ८ च्या तरतुदीप्रमाणे सदर खाणपट्टे ५० वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात आली आहे.

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		चुनखडीच्या ५२ भाडेपट्टयांपैकी सात भाडेपट्टयांचा कालावधी २००४-२०१० दरम्यान संपूष्टात आला आहे. सात ही भाडेपट्टयांदारानी खनिकर्म भाडेपट्टयाच्या मे २००४ आणि जुलै २०१० दरम्यान नूतनीकरणाकरिता अर्ज केले होते. तथापी, एकाही भाडेपट्टयाच्या नुतनीकरण झाले नाही. अंतीम बैठकीत प्रधान सचिव,उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांनी सांगितले की MMDRअधिनियमातील प्रस्तावीत बदल विचारात घेवून अर्ज हेतू पूरस्सर प्रलंबित ठेवण्यात आले.		
२	परिच्छेद क्र. ७.२.२.३ (अ)	**खनिकर्म नियोजन/ खनिकर्म योजनेस मान्यता** खनिज संधारण व विकास नियमांच्या नियम ९ अंतर्गत खनिकर्म आराखडा हा राज्यातील खनिकर्म कार्यासाठी पूर्वापेक्षित आहे. खनिकर्म नियोजन खाणीचे नाव, मालक, अशुध्द धातूच्या उत्खननावेळी पाळावयाचे मानदंड इत्यादि आवश्यक तपशिल निर्देशित करतो.हे भारतीच खाण ब्युरो द्वारे मान्य केले आहे.चाचणी तपासणी केलेल्या तीन जिल्हयात बॉक्साईट आणि चुनखडी भाडेपट्टयाची एकूण ६९ प्रकरणे होती. लेखापरिक्षेने प्रत्येक जिल्हयातून सहा प्रकरणांची चाचणी तपासणी केली आणि त्यात असे आढळले की बहाल केलेल्या सर्व १८ भाडेपट्टयांचे खनिकर्म	एमएमडीआर अधिनियमाच्या कलम २१ (५) मध्ये कोणत्याही व्यक्तिने अधिकृत परवानगीशिवाय खनिजाचे उत्खनन केले असल्यास, त्या व्यक्तिकडून त्याने उत्खनन केलेल्या खनिजाचे मुल्य खनिजाच्या स्वामित्वधनासह वसूल करण्याबाबत नमूद केले आहे. मान्यताप्राप्त खाणकाम योजनेनुसार खाणपट्टाधारकास मर्यादित स्वरूपात खनिज उत्खननास परवानगी असते. तथापि खाणपट्टाधारकाने त्यास मंजूर खाणपट्टाक्षेत्रातील खनिजाचे	सदर मुद्यांबाबत महालेखाकार, नागपूर यांचेसमवेत सन २०१४ मध्ये झालेल्या Entry तसेच "Exit Conference" मध्ये चर्चा करण्यात आली. लेखापाल यांनी आक्षेपामध्ये अधिकचे खनिज उत्खनन हे अवैध उत्खनन मानले जावे आणि दंड आकारला जावा, असे नमूद केले आहे. तथापि अवैध उत्खननाच्या विदयमान परिभाषेमध्ये सदर बाब समाविष्ट होत नाही. एमएमडीआर ॲक्टच्या कलम ४ मध्ये अवैध उत्खननाची परिभाषा पुढीलप्रमाणे नमूद केली आहे. " illegal mining" means any reconnaissance or prospecting or mining operation undertaken by any person or a company in any area without holding a reconnaissance permit or a prospecting

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		नियोजन भारतीय खाण ब्यूरो द्वारे मान्य करण्यात आले होते. खनिज संधारण वि विकास नियमांच्या नियम १२ अनुसार भारतीय खाण ब्युरोच्या कार्यक्षेत्रांतर्गत असलेल्या खाणींचे क्षेत्रीय नियंत्रक यांना पुढील पाच वर्षाकरीता खनिकर्म नियोजनाचा आढावा आणि खाणकाम योजना सादर करावयास पाहिजे. खनिज संधारण व विकास नियमांच्या नियम १३ मध्ये पुढे असे विहित केले आहे की खनिकर्म प्रक्रिया ही मंजूर खनिकर्म नियोजन आणि योजनेनुसार करण्यात यावी आणि त्याचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास प्राधिकृत अधिकारी सर्व किंवा कोणत्याही एखादया खनन उपक्रमाबाबत स्थगिती आदेश देवू शकतात. **अ) खनिकर्म नियोजनापेक्षा जादा/ खनिकर्म योजनेस मान्यता मिळाल्याशिवाय खनिजांचे उत्पादन** **खनिकर्म नियोजन:** आम्हाला असे आढळले कि चुनखडीच्या एका प्रकरणांत आणि बॉक्साईटच्या एका प्रकरणांत भाडेपट्टेदारांनी अप्रत्यक्ष उत्खनन केलेली खनिजे मंजुर खनिकर्म नियोजनात दर्शविलेल्या उत्पादनापेक्षा खाली तक्ता ७.२.२.३(अ) मध्ये दर्शविल्याप्रमाणे जास्त होती.	परवानगीपेक्षा अधिकचे खनिज उत्खनन वैध मानले जावू शकत नाही. सबब, परवानगीपेक्षा अधिकचे उत्खनन हे बेकायदेशीर मानून अशा खाणपट्टाधारकांविरूध्द कारवाई करणे आवश्यक आहे.	licence or as the case may be a mining lease, as required under sub- section (1) of section 4 of the Act". महालेखाकार कार्यालयाने काढलेल्या आक्षेपात एकूण ०५ खनिपट्टयांपैकी रायगड जिल्हयातील मुल-वेलास-हरवीट-कुडगांव बॉक्साईट माईन्स क्षेत्र ५०.२१ हे. व दांडगुरी खुजारे बॉक्साईट माईन्स क्षेत्र ७१.४२ हे. या खाणीतील खाणकाम योजनेनुसार झालेले नसल्याचे आढळून आल्यामुळे सदर दोन्ही खाणपट्टाधारकांना भारतीय खाण ब्यूरो यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली होती. तद्नंतर दोन्ही खाणपट्टाधारकांनी आक्षेपांची पूर्तता केल्यामुळे सदर खाणपट्टयाचे निलंबन आदेश भारतीय खाण ब्यूरो कार्यालयाद्वारे दिनांक ३१/०५/२०१६ चे पत्रान्वये रद्द करण्यात आले होते. **अ. क्र. / खाणपट्टा / कारवाई** १ / अडेगाव चुनखडक व डोलोमाईट खाण / खाणकाम निलंबित करण्यात आले होते. २ / मेघरे बाक्साईट खाण, श्री. मनोहर व्हेन्सीमल दर्यानानी. / फरकाची रक्कम जमा करण्यात आली आहे. ३ / मूळ-वेलास, हार्वित-कुडगाव बाक्साईट / खाणकाम निलंबित करण्यात आले होते.

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.</th><th>महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप</th><th>महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय</th><th>आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण</th></tr>
<tr><td>(१)</td><td>(२)</td><td>(३)</td><td>(४)</td><td>(५)</td></tr>
<tr><td></td><td></td><td>
<table>
<tr><th>भाडेपट्टादाराचे नाव</th><th>वर्ष</th><th>मंजूर खनिकर्म नियोजनानूसार परिमाण (MT)</th><th>प्रत्यक्ष उत्खनन (MT)</th><th>जादा उत्पादन (MT)</th></tr>
<tr><td>अडेगांव डोलोमाईट आणि चुनखडी खाण</td><td>२०१०-११</td><td>७५६</td><td>१२.७४८</td><td>११.९९२</td></tr>
<tr><td rowspan="3">मेघारे बॉक्साईट खाण</td><td>२००९-१०</td><td>३६,०००</td><td>५९,२००</td><td>२३.२००</td></tr>
<tr><td>२०१०-११</td><td>४८,०००</td><td>५६,०००</td><td>८.०००</td></tr>
<tr><td>२०१३-१४</td><td>७६.३२९</td><td>७९.२००</td><td>२.८७१</td></tr>
<tr><td colspan="2">एकूण</td><td>१,६१,०८५</td><td>२,०७,१४८</td><td>४६,०६३</td></tr>
</table>
खनिकर्म योजना: १८ पैकि तीन भाडेपट्टयांच्या चाचणी तपासणीत दस्तवेजांत खनिकर्म योजना आढळली नाही. विभागाने नमूद केले कि</td><td></td><td>
<table>
<tr><td></td><td>खाण, मे. भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी.</td><td></td></tr>
<tr><td>४</td><td>दांडगुरी खुजारे बाक्साईट खाण, मे. भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी</td><td>खाणकाम निलंबित करण्यात आले होते.</td></tr>
<tr><td>५</td><td>गिरगांव बाक्साईट खाण, मे. भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी</td><td>खाणपट्टा धारकाने स्वामित्वधनाची विहित रक्कम शासनास जमा केली आहे.</td></tr>
</table>
खाणकाम योजनेच्या मंजूरीच्या अनुषंगाने खाणपट्टा धारकांकडून नियमाचे पालन होत असल्याची पडताळणी करण्याची कार्यवाही Mineral Conservation and Development Rules, १९८८ अंतर्गत भारतीय खाण ब्युरो यांच्याकडून करण्यात येते. सन २०१४-१५ पासून भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांनी Integrated Lease Management System उपयोगामध्ये आणली आहे. त्यान्वये खाणपट्टा धारकास वाहतूक परवाना देत असताना त्याच्या खाणकाम योजनेमध्ये मंजूर असलेल्या क्षमतेची गणना करण्यात येते. सदर ILMS प्रणाली द्वारे मंजुर खाणकाम योजनेच्या अनुषंगाने वाहतूक परवाने देण्यात येतात.</td></tr>
</table>

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		मूल्वेलास-हर्वित-कुडगाव बॉक्साईट खाण आणि दांडगुरी-खुजारे बॉक्साईट खाणी मध्ये बॉक्साईटचे उत्खनन खनिकर्म योजनेला मंजुरी प्राप्त न करता करण्यात आले होते. तसेच गिरगाव बॉक्याईट खाणीकरता कार्योत्तर मंजुरी प्राप्त करण्यात आली होती. भारतीय खाण ब्युरोने नमूद केले की या प्रकरणांमध्ये भाडेपट्टादाराने पुढील पाच वर्षाकरता खनिकर्म योजना सादर केली नव्हती त्यामुळे २०१२-१३, २०१३-१४ या वर्षाचे उत्पादनाचे लक्ष्य लेखापरिक्षेस देण्यात आले नाही. तपशिल खालील तक्ता ७.२.२.३(अ) (i) मध्ये दर्शविले आहे. **भाडेपट्टादाराचे नाव** / **वर्ष** / **उत्खनन केलेले परिमाण (MT)** मूळ-वेलास, हर्वित-कुडगाव बाक्साईट खाण, / २०१३-१४ / ४१,५०० दांडगुरी खुजारे बाक्साईट खाण, / २०१२-१४ / ९९,००० गिरगांव बाक्साईट खाण, / २०१०-१२ / २,१६,३३० **एकूण** / **३,५६,८३०** अशाप्रकारे पट्टेदाराने उत्खनन केलेल्या ४.०३ लाख मे.टन खनिजांच्या रू. ६.२३ कोटी किंमतीची MMDR अधिनियमाच्या कलम २१(५) अंतर्गत		

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.</th><th>महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप</th><th>महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय</th><th>आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण</th></tr>
<tr><td>(१)</td><td>(२)</td><td>(३)</td><td>(४)</td><td>(५)</td></tr>
<tr><td></td><td></td><td>वसूली करण्यात येवू शकते, ज्यात असे विहित आहे की कोणतीही व्यक्ती ज्याने कोणत्याही अधिकाराशिवाय खनिजांचे उत्खनन केले त्याच्याकडून स्वामित्वधन इत्यादिसह खनिजांचे रकमेची वसूली करण्यात यावी. या तरतूदीकडे विभाग आणि IBM चे दुर्लक्ष झाल्यामुळे अतिरिक्त उत्पादन रोखण्यासाठी समयोचित कारवाई करता येवू शकली नाही.
अंतिम बैठकित प्रधान सचिव उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांनी सांगितले कि मानदंडाच्या उल्लंघनावर कारवाई करण्यात येईल.</td><td></td><td></td></tr>
<tr><td>३</td><td>परिच्छेद क्र. ७.२.२.३ (ब)</td><td>ब) पर्यावरण मंजुरी प्रमाणपत्र, खनिकर्म योजना आणि उत्पादन यांच्यातील खनिज उत्पादनातील तफावत
भारत सरकार (GoI) द्वारे पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ अंतर्गत दिनांक १४ सप्टेंबर २००६ ला निर्गमित अधिसुचनेनुसार खनिकर्म प्रकरणांत पर्यावरण आणि वन मंत्रालय (MoEF) यांचेकडून पर्यावरण मंजुरी खनिकर्मापुर्वीच घ्यावयास पाहिजे . पर्यावरण मंजुरीत इतर गोष्टींबरोबरच विशिष्ट क्षेत्रातून उत्खनन करावयास आलेल्या खनिजांचे परिमाण दर्शविले असते.
आमच्या असे निर्दशनासे आले कि भूशास्त्र आणि खनिकर्म, पर्यावरण व वन मंत्रालय आणि भारतीय</td><td>किती प्रकरणांमध्ये अधिकचे खनिज उत्खनन आणि त्याबाबत करण्यात आलेली कारवाई याची कोणतीही माहिती विभागाने उपलब्ध करून दिलेली नाही (प्रकरणनिहाय तपशील). सदरील माहितीच्या अभावी, वेळोवेळी कारवाई केल्याबाबतचे विभागाचे म्हणणे मान्य होण्यासारखे नाही. वरील माहिती लोकलेखा समितीला दयावी. परिच्छेद क्र. ७.२.२.४ मधील विभागाच्या अभिप्रायावरून भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, पर्यावरण व वन विभाग</td><td>संचालनालयाद्वारे राज्यातील प्रमुख खनिजांकरीता मंजूर खाणपट्टयांमध्ये मान्यताप्राप्त खाणकाम कार्यक्रम योजनेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा जास्तीचे उत्खनन करणे तसेच पर्यावरण विषयक परवानगीमध्ये मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा जास्त उत्खनन व वाहतूक करणाऱ्या खाणपट्टाधारकांविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्याचे परिपत्रकांद्वारे वेळोवेळी जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना निर्देशित करण्यात आलेले आहे.
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>खाणपट्टा</th><th>कारवाई</th></tr>
<tr><td>१</td><td>मूळ-वेलास,</td><td>खाणकाम निलंबित करण्यात</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.</th><th>महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप</th><th>महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय</th><th>आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण</th></tr>
<tr><td>(१)</td><td>(२)</td><td>(३)</td><td>(४)</td><td>(५)</td></tr>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>खाण ब्युरो, (GoI) यांच्यात खनिजांचे अतिरिक्त उत्पादनाचा शोध घेण्यासाठी खनिज उत्खनन/ उत्पादन याबाबत कमाल मर्यादा निश्चित करण्याबाबत समन्वयन नाही. पर्यावरण मंजुरीत नमूद परिमाण, खनिकर्म योजनेत नमूद परिमाण आणि प्रत्यक्ष उत्खनन केलेले परिमाण हे खालील तक्ता ७.२.२.३(ब) मध्ये दर्शविल्याप्रमाणे भिन्न भिन्न होते.
<table>
<tr><th colspan="5">परिमाण मे. टन मध्ये</th></tr>
<tr><th>भाडेपट्टाधारकाचे नाव</th><th>वर्ष</th><th>पर्यावरण मंजूरीमध्ये मंजूर परिमाण</th><th>प्रत्यक्ष निर्मित परिमाण</th><th>खनिकर्म योजनेत मंजूर परिमाण</th></tr>
<tr><td rowspan="4">मूळ वेलास-हर्वीत - कूडगांव</td><td>२००९-१०</td><td>२०,४७२</td><td>२०,६१८</td><td>१,२५,००० </td></tr>
<tr><td>२०१०-११</td><td>२०,४७२</td><td>२४,०००</td><td>१,३८,००० </td></tr>
<tr><td>२०११-१२</td><td>२०,४७२</td><td>६४,३२५</td><td>१,५१,६०० </td></tr>
<tr><td>२०१२-१३</td><td>२०,४७२</td><td>२०,६००</td><td>१,६६,८०० </td></tr>
<tr><td rowspan="2">कूरवाडे — मारळ</td><td>२००९-१०</td><td>१२,०००</td><td>३७,५००</td><td>७६,००० </td></tr>
<tr><td>२०१०</td><td>१२,०००</td><td>१,११,०००</td><td>७८,००० </td></tr>
</table>
</td>
<td>आणि भारतीय खाण ब्युरो यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव असल्याचे सुचित होते. कारणे दाखवा नोटीस निर्गमित केल्याची दिनांक आणि प्रत्येक खाणपट्टाधारकाविरूध्द केलेल्या कारवाईची माहिती लोकलेखा समितीला दयावी.</td>
<td>
<table>
<tr><td></td><td>हार्वित-कुडगाव बाक्साईट खाण, मे. भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी .</td><td>आले होते.</td></tr>
<tr><td>२</td><td>कुरवाडे-मारळ बाक्साईट खाण, अलतगे स्टोन क्रशिंग इंडस्ट्रीज.</td><td>फरकाची रक्कम जमा करण्यात आली आहे.</td></tr>
<tr><td>३</td><td>दांडगुरी खुजारे बाक्साईट खाण, मे. भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी</td><td>खाणकाम निलंबित करण्यात आले होते.</td></tr>
</table>
राज्य शासनाने N-Code Solution, Gujrat यांचे मार्फत ILMS(एकात्मिक खाणपट्टा व्यवस्थापन प्रणाली) विकसित करून त्याद्वारे खाणकाम योजना व पर्यावरण विषयक मंजूरीपेक्षा उत्खनन जास्त होवू नये यास आळा बसविणे शक्य झालेले आहे. तसेच अवैध उत्खनन/ वाहतूकीस नियंत्रण ठेवण्याकरताऑनलाईन वाहतूक परवाना देण्यात येत आहे. संचालनालय, भारतीय खाण ब्यूरो कार्यालय व पर्यावरण विभागात समन्वय नाही असे
</td>
</tr>
</table>

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		<table><tr><td>बॉक्साईट खाण</td><td>-११</td><td></td><td></td><td></td></tr><tr><td></td><td>२०११-१२</td><td>१२,०००</td><td>१,३३,०००</td><td>८२,०००</td></tr><tr><td></td><td>२०१२-१३</td><td>१२,०००</td><td>८९,८००</td><td>८३,६००</td></tr><tr><td></td><td>२०१३-१४</td><td>१२,०००</td><td>१२,४५०</td><td>८९,५८६</td></tr><tr><td>दांडगुरी – खुजारे बॉक्साईट खाण</td><td>२००९-१०</td><td>१८,०००</td><td>१८,५००</td><td>१,४१,०००</td></tr><tr><td></td><td>२०१०-११</td><td>१८,०००</td><td>४८,०००</td><td>१,९५,०००</td></tr><tr><td></td><td>२०११-१२</td><td>१८,०००</td><td>१,२४,३००</td><td>२,००,०००</td></tr><tr><td colspan="2">**एकूण**</td><td>**१,९५,८८८**</td><td>**७,०४,०९३**</td><td>**१५,२६,५८६**</td></tr></table> वरिल माहितीवरून असे दिसून येते कि प्रत्यक्ष उत्पादन पर्यावरण मंजुरीपेक्षा २५९.४४ टक्क्यांने जास्त असून खनिकर्म योजनेपेक्षा ५३.८८ टक्के कमी आहे.या तफावती बाबतची कारणे दस्तावेजांत उपलब्ध नाहीत आणि विभागानेही स्पष्ट केली नाहीत. भारतीय खाण ब्युरोने नमूद केले कि पर्यावरण मंजुरी त्यांच्या अखत्यारित येत नाही व ते फक्त खनिकर्म नियोजन/ योजनेशी संबंधित आहेत. संचालक यांचेकडून उत्तर प्राप्त झाले नाहि. वरिल तथ्यांवरून असे निर्देशित होते कि		म्हणणे उचित ठरणार नाही.

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		विभागामध्ये आपसांत एखादया खाणीतून खनिज उत्खननाबाबत एकसारखे लक्ष्य निश्चित करण्याबाबत समन्वय नाही. महसूल आणि पर्यावरण यांच्या हितासाठी महाराष्ट्र शासनाने उत्खननाचे एकसारखे लक्ष्य ठरविण्याबाबची बाब भारत सरकारकडे मांडावयास पाहिजे.		
४	परिच्छेद क्र. ७.२.२.४	एखादया व्यक्तीने कायदेशीर प्राधिकाराशिवाय खनिज उत्पत्ती केली असल्यास त्या व्यक्तीकडून स्वामित्वधन इत्यादीसह खनिजाच्या किंमतीची वसूली करण्याबाबतची तरतूद MMDR अधिनियमाच्या कलम २१(५) विनिर्दिष्ट आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ४ ऑगष्ट २००६ च्या आदेशाप्रमाणे कोणत्याही राष्ट्रीय उदयानाच्या एक किलोमीटर पर्यंत कोणत्याही खनिकर्म प्रकियेची अनुमती देण्यात येवू नये. आमच्या असे निदर्शनास आले की कोल्हापूर जिल्हयात डिसेंबर २००६ मध्ये बॉक्साईट कच्च्या धातूचे उत्खनन करण्याकरिता दोन भाडेपट्टा दारांना पर्यावरण व वन मंत्रालयतर्फे पर्यावरण मंजुरी प्रदान करण्यात आली. भाडेपट्टादारांनी निर्बाध प्रमाणपत्र मिळण्यासाठी पर्यावरण व वन मंत्रालयास सादर केलेल्या दस्तांवेजांत राष्ट्रीय उदयान आणि भाडेपट्टा क्षेत्र यांच्यातील अंतर १० किलोमीटर पेक्षा जास्त असल्याचे नमूद केले होते. तथापि नंतर	पर्यावरण मंजुरीबाबतची कागदपत्रे थेट पर्यावरण मंत्रालयाकडे जमा करण्यात आली असल्याने सदर कागदपत्रांची छाननी केली नसल्याचे विभागाने मान्य केले आहे. यावरून, परिच्छेद क्र. ७.२.२.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, पर्यावरण व वन विभाग आणि भारतीय खाण ब्युरो यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव असल्याचे स्पष्ट होते. खोटी कागदपत्रे सादर करून करण्यात आलेले प्रत्येक खाणकाम हे अवैध मानले जावे, हे स्पष्ट आहे. म्हणून एमएमडीआर अधिनियमाच्या कलम २१ (५) अंतर्गत खनिजाचे मुल्य स्वामित्वधनासह वसूल करणे आवश्यक आहे.	कोल्हापूर जिल्हयातील मौजे-उदगिरी ता.शाहूवाडी येथे राज्य शासनाद्वारे श्री. प्रकाश आनंदराव गायकवाड (गवंडी) यांना शासनाकडील क्र. एमएमएन-१६९६/५०९७१/७१९३/कार्या-४, दिनांक १६/१०/१९९९ व मे. स्वाती मिनरल्स, कोल्हापूर यांना शासनाकडील क्र. एमएमएन-२८९४/२२५३०/(६६९३)/ आयएनडी-९, दिनांक ०६/०५/१९९७ रोजी बॉक्साईट खनिजाचे खाणपट्टे मंजूर करण्यात आले आहेत. खाणपट्टाधारकांनी सदर खाणपट्टयांकरीता आवश्यक केंद्रीय वन व पर्यावरण विभागाची अनुमती अनुक्रमे दिनांक २२/१२/२००६ व २०/१२/२००६ च्या आदेशान्वये प्राप्त केली होती. तथापि खाणपट्टाधारकाने चुकीची माहिती देऊन पर्यावरण अनुमती मिळविल्यामुळे दोन्ही खाणपट्टयाची पर्यावरण अनुमती अनुक्रमे दिनांक ०६/०८/२०१२ व दिनांक १८/१०/२०१३ च्या आदेशान्वये रद्द करण्यात आली. तथापि सदर कालावधीपर्यंत दोन्ही खाणपट्टाधारकांनी एकूण स्वामित्वधन रु. ३६ कोटी १० लक्ष इतकी स्वामित्वधनाची रक्कम शासन जमा केलेली आहे. तेव्हापासून सदर खाणपट्टयातील खाणकाम बंद आहे. केंद्रशासनाची पर्यावरण अनुमती प्राप्त करुन घेतांना

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		पर्यावरण व वन मंत्रालयास असे आढळले कि चांदोली राष्ट्रीय उदयानाची सीमा व खाणपट्टा क्षेत्र यांच्यातील अंतर ८०० मीटर ते १६०० मीटर आहे आणि या कारणावरून ऑगष्ट २०१२ आणि ऑगष्ट २०१३ मधे ही पर्यावरण मंजुरी रद्द करण्यात आली होती. खनिकर्म प्रक्रिया जरी निलंबित करण्यात आली होती तरी खोटया दस्तांवेजांवरून खनिकर्म कामे करण्यासाठी कोणतीही कारवाई करण्यात आली नव्हती. खनिकर्म प्रक्रिया कालावधीत रू ३०.०२ कोटी किंमतीचे २६.९७ लाख मे. टन बॉक्साईटचे उत्खनन करण्यात आले होते. हे संपूर्ण उत्पादन अवैध म्हणून समजावयास पाहिजे होते. आणि त्या खनिजांची किंमत वसूल करावयास पाहिजे होती. याशिवाय, जे व्यक्ती खोटे दस्तावेज स्विकारून पर्यावरण हानी पोहचविण्यास कारणीभूत ठरले, अशा व्यक्तींवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. अंतिम बैठकीत प्रधान सचिव उद्योग उर्जा व कामगार विभाग यांनी नियमानूसार भाडेपट्टा निलंबित करण्याची कारवाई केली असल्याचे नमूद केले आहे. त्यांनी पुढे असेही नमूद केले कि, सदर उत्खनन अवैध खनिकर्माच्या व्याख्येत बसत नाही म्हणून खनिजांची किंमत वसूल करण्यात येवू शकत नाही. विभागाचे उत्तर योग्य नाही कारण	खाणपट्टाधारकांविरूध्द करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती लोकलेखा समितीस दयावी.	राज्यशासन / संचालनालयाचा कुठेही थेट संबंध येत नाही. यामध्ये वन विभाग, वन्यजीव विभाग महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचा मुख्यत: संबंध येतो. परिच्छेदामध्ये नमूद कालावधीत खनिपट्टा मंजूर होता व खनिपट्टा करारनाम्याच्या अटी व शर्तीनुसार स्वामित्वधन शासनजमा करुन खाणकाम करणेत आले होते. सबब MMDR च्या कलम 21 (5) लागू ठरत नाही. त्यामूळे घटकाने उत्खनन केलेल्या खनिजाचे स्वामित्वधन जमा केले असल्याने दंड व शास्ती लादण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		भाडेपट्टादारांनी खोटी माहिती दिली आणि म्हणूनच त्याच्याद्वारे करण्यात आलेली खनिकर्म कामे वैध नव्हती आणि त्याकामांना अवैध घोषित करावयास पाहिजे होते आणि MMDR अधिनियमाच्या कलम २१(५) अंतर्गत शास्ती आकारावयास पाहिजे होती. ज्यात अवैधरित्या उत्खनन केलेल्या खनिजांची किंमतीची वसूली करणे विहीत आहे. विभागाने अशी पध्दती आखावी ज्यावरून भाडेपट्टा अथवा पर्यावरण मंजुरी प्रदान करावयासाठी भाडेपट्टादारांनी केलेल्या अर्जामध्ये अथवा इतर कुठे नमूद तपशील योग्य असल्याची पडताळणी करता येईल.		
५	परिच्छेद क्र. ७.२.२.५	महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (MLR संहिता) च्या नियम ४८ (७) प्रमाणे एखादी व्यक्ती जर कायदेशिर प्राधिकाराशिवआय कोणत्याही खनिजाचे उत्खनन, वहन, एकत्र करणे, दुस-या जागी नेणे, विल्हेवाट लावणे यापैकी काही करत आसेल असेल तर राज्य शासनाने अशा उत्खनन केलेल्या, हलविलेल्या, विल्हेवाट लावलेल्या इ. खनिजांच्यसा बाजार मूल्याच्या तिप्पटीपेक्षा जास्त नसलेली रक्कम शास्ती म्हणून वसूल करावयास पाहिजे. संचालक, भूशास्त्र आणि खनिकर्म / उप-संचालक, कोल्हापूर येथील निरिक्षण अहवालांच्या पडताळणीत असे निदर्शनास आले की दोन	उपसंचालक, कोल्हापूर यांच्या निरिक्षण अहवालामध्ये शेखाडी बॉक्साईट खाणीबाबत खाणपट्टाधारकाने सुमारे २५१४७.१२६ मे.टन बॉक्साईट मंजुर खाणपट्टाक्षेत्राबाहेर अवैधपणे केल्याबाबत नमूद आहे. त्यान्वये लेखापरिक्षणामध्ये आक्षेप नमूद करण्यात आला आहे. उपसंचालक, कोल्हापूर यांच्या अहवालाबाबत केलेली कार्यवाही लोकलेखा समितीला सादर करावी. जर	महालेखाकार कार्यालय नागपूर यांचेकडील उपरोक्त आक्षेपात रायगड जिल्हयातील शेखाडी बॉक्साईट खाण व मेघरे बॉक्साईट खाणीत खाणक्षेत्राबाहेर खनिज उत्खनन केल्याचा मुद्या उपस्थित करण्यात आला आहे. उपसंचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म कार्यालय, कोल्हापूर यांचे कार्यालयाकडील दि. ०४/०४/२०१४ रोजीच्या तपासणी अहवालाच्या अनुषंगाने मौजा-शेखाडी, ता.श्रीवर्धन येथील बॉक्साईट खाणपट्टयात संबंधित खाणपट्टाधारक यांनी २५,१४७.१२६ मे. टन अवैध खनिजाचे उत्खनन / वाहतूक केल्या प्रकरणी त्याच्याकडून रु.७५,४४,१००/- इतकी रक्कम वसूल करण्याबाबत आक्षेप नोंदविण्यात आला होता. उपसंचालक

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		प्रकरणांत (मार्च २०११ / एप्रिल २०१४) १.४१ लाख मे. टन बाक्साईचे उत्खनन भाडेपट्टा बाहेरील क्षेत्रातून करण्यात आले जे अवैध होते. या दोन प्रकरणांपैकी एका प्रकरणात भाडेपट्टादाराला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली जेव्हा की दुस-या प्रकरणांत कोणतीही कारवाई करण्यात आल्याचे दिसून आले नाही. भाडेपट्टारांनी रु. ५.८० कोटीशास्ती अदा करावयास पाहिजे होती. अंतिम बैठकीत प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांनी ही रक्कम वसूल करण्याबाबत कारवाई करण्यात येईल असे नमूद केले.	उपसंचालक, कोल्हापूर यांचा अहवाल योग्य नसेल तर त्याबाबत लोकलेखा समितीस स्पष्ट करावे. मेघरे बॉक्साईट खाणीबाबतच्या अवैध उत्खननाबाबत कारणे दाखवा नोटीस यापूर्वी दिली असेल तर सदर नोटीस लोकलेखा समितीस सादर करावी.	कार्यालयाद्वारे दि. ०४/०४/२०१४ रोजी केलेल्या तपासणीत मोजणी अहवालानुसार सदर क्षेत्रात १४०५२.८७४ मे. टन इतके खनिजाचे उत्खनन झाल्याचे दिसून आले. तथापि संबंधित खाणपट्टाधारक यांचेकडील वार्षिक / त्रैमासिक/ मासिक विवरणानुसार त्यांनी सदर क्षेत्रात एकूण ३९,२०० मे. टन इतके खनिजाचे उत्पादन वाहतूक व निर्यात केले होते. सबब, संबंधित खाणपट्टाधारक यांनी निर्यात केलेले खनिजाचे परिमाण व मोजणीनुसार निदर्शनास आलेले खनिजाचे परिमाण यामध्ये सुमारे २५,१४७ मे. टन इतकी तफावत येत असल्याने तपासणी पथकाकडून संबंधित खाणपट्टाधारकाने खनिपट्टयाच्या बाहेरील अथवा इतरत्र क्षेत्रातून २५,१४७ मे. टन इतके अवैधपणे उत्खनन करुन खनिजाचे वाहतुक/ निर्यात केल्याचा निष्कर्ष काढण्यात आला. सदर प्रकरणात संबंधित खाणपट्टाधारक यांनी दिनांक २७/०७/२०१५ चे पत्रान्वये खुलासा सादर केला असून खुलाशानुसार उपरोक्त क्षेत्रात एकूण ५१.२४ हे. आर क्षेत्रावर खाणपट्टा मंजूर असून उपसंचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर यांचेकडील पथकाने मोजणी केलेल्या खड्डयाचे क्षेत्र फक्त ०.७५ हे.आर आहे. सदर खाणक्षेत्रात यापूर्वी बॉक्साईट खनिजाच्या छोटया छोटया टेकडया व Float Ore होते व त्यातुनच त्यांना जास्तीचे खनिज प्राप्त झाले आहे. त्यांनी इतरत्र क्षेत्रातून अवैधपणे उत्खनन करुन वाहतूक निर्यात

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
				केले नसल्याचा खुलासा केला आहे. मे.मनोहर वेन्सीमल दर्यानानी यांचे मौजे-मेघरे, ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथील बॉक्साईट खाणपट्टयाची दि. ०४/०३/२०११ रोजी उपसंचालक, प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर कार्यालयाकडून तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान मे.मनोहर वेन्सीमल दर्यानानी यांनी मंजूर नसलेल्या व त्यांच्या खाणपट्टाक्षेत्रालगत असलेल्या गट क्र. २६ व ४६ मध्ये मोजमापे घेतली असता सुमारे ९३,५५० मे.टन इतके बॉक्साईटचे अवैध उत्खनन झाल्याचे आढळून आले. अवैध उत्खनन झालेले क्षेत्र हे मनोहर वेन्सीमल दर्यानानी यांचे उपरोक्त मंजूर खाणपट्टयालगतचे असल्याने सदर अवैध उत्खनन त्यांनीच केल्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे गृहीत धरून मे. मनोहर दर्यानानी यांना खाणपट्टाक्षेत्राबाहेर ९३,५५० मे. टन इतके बॉक्साईटचे अवैध उत्खनन केल्या प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांनी दिनांक ३१/०८/२०१३ आणि दिनांक २०/११/२०१३ रोजीच्या पत्रान्वये नोटीसा देण्यात आल्या. त्यानुषंगाने सदर कंपनीने त्यांच्याकडील दिनांक १८/११/२०१३ चे पत्रान्वये खुलासा सादर केला आहे. **सदर खुलाश्यामध्ये त्यांनी गट नं. २६ व ४६ मध्ये आमचे कंपनीने उत्खनन केलेले नाही. सदर जमीनी सन १९७०/८० च्या दशकामध्ये भाडेपट्टयाने दिलेल्या होत्या असे समजते त्या भाडेपट्टेधारकाने त्या जमिनीमध्ये**

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
				खोदलेल्या खड्डयांची माहिती शासनाकडे असावी आमच्याकडे ती नाही. त्या उत्खननाशी आमच्या कंपनीचा संबंध नाही ते उत्खनन आम्ही केले असल्याचा आरोप आम्हाला मान्य नाही आम्ही तो नाकारत आहोत. असे नमूद करुन त्यांचेविरुध्द दंडनीय कारवाई करण्यात येऊ नये अशी विनंती केली. सदर प्रकरणी सं.नं.२६ व ४६ मध्ये ९३,५५० मे. टन इतके बॉक्साईटचे अवैध उत्खनन करणाऱ्या व्यक्ती/ कंपनी/ जमीन मालक यांचा शोध घेऊन त्यांच्यावर दंडनीय कारवाई करण्याचे निर्देश देऊन सदर प्रकरणात कसुरदार यांचेकडून अवैध उत्खनन केल्यापोटी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता-१९६६ मधील तरतूदीनुसार दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत जिल्हा खनिकर्म अधिकारी, रायगड यांनी ३०/१०/२०१५ चे पत्रान्वये तहसिलदार, श्रीवर्धन यांना सूचना केल्या आहेत. सदर अवैध बॉक्साईट खनिज उत्खननासंदर्भात तहसिलदार, श्रीवर्धन यांनी संबंधित जमीन मालक श्री.नितिन नागीनदास गोराडिया व श्रीमती वंदना नितिन गोराडिया यांस दिनांक १८/०६/२०१८ रोजी थकबाकीची मागणीची नोटीस बजावली असून महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ मधील तरतूदीनूसार उपरोक्त मौजा मेघरे ता. श्रीवर्धन गट नं२६ व ४६ या मिळकतीच्या ७/१२ च्या इतर अधिकारात रु. ३,९९,९१,१५८/- इतक्या रकमेच्या बोजाची नोंद व फेरफार नोंद क्र.३६५ अन्वये ठेवली आहे. तसेच प्रस्तुत अवैध खाणकामाबाबत अज्ञात व्यक्तिबाबत गुन्हा दाखल होणेबाबत सुचना दि. ०३.०८.२०१८ रोजी जिल्हा खनिकर्म अधिकारी रायगड यांना

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
				देण्यात आल्या आहेत.
६	परिच्छेद क्र. ७.२.२.६	**शासनाच्या पुर्व परवानगीशिवाय भाडेपट्टाधिकाराचे हस्तांतरण** MC नियम, १९६० च्या नियम ३७ अनुसार भाडेपट्टादाराने, राज्य शासन / केंद्र शासनाच्या लिखित परवानगी शिवाय खनिकर्म भाडेपट्टा अभिहस्तांकित करू नये किंवा कुठलेही अधिकार, हक्क अथवा त्यातील हितसंबंध किंवा कोणतीही व्यवस्था, करार अथवा जबाबफ़्दारीत सामिल होऊ नये अथवा तयार करु नये, ज्यात भाडेपट्टादारास प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष भरीव भांडवल पुरवण्यात येईल अथवा आले किंवा ज्या अंतर्गत भाडेपट्टेदाराचे कार्य अथवा उपक्रम भादेपट्टेदारा व्यतिरिक्त दुस-या व्यक्ती अथवा व्यक्तींच्या गटाने भरिवरित्या नियंत्रित करण्यात येणार असेल अथवा आली असेल. संचालक, भूशास्त्र आणि खनिकर्म व जिल्हा खनिकर्म अधिकारी, कोल्हापूर जिल्हा येथील भाडेपट्टा दस्तांवेजांच्या पडताळणीत असे निर्दशनास आले कि नोव्हेबर १९९४ ते २००६ दरम्यान तीन जिल्हयातील ६ भाडेपट्टादारांनी रद्द न करण्याजोगा मुखत्यारनामा आणि विकास करारनाम्याद्वारे (रोजी १०.११.१९९४, २१.०९.२००१ आणि २६.०२.२००६) भाडेपट्टाधिकार अभिकर्त्याला खनिकर्म कार्य इत्यादि चालवणे	महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या कलम २(r) नुसार पॉवर ऑफ अॅटर्नी मध्ये एखादया विशिष्ट व्यक्तिचे कार्य करण्यासाठी आणि त्याला अंमलात असलेल्या व्यक्तिच्या नावाने कार्य करणारी कोणतीही साधने समाविष्ट आहेत. लेखा परिक्षणामध्ये उपस्थित प्रकरणांमध्ये, खाणपट्टाधारकाने दिलेल्या मोबदल्याच्या अनुषंगाने भाडेपट्टयाचा विकास आणि खाणव्यवसायासाठी पॉवर ऑफ अॅटर्नी धारकास रद्द न करता येण्याजोगी मुखत्यारनामा दिला आहे. म्हणून यास भाडेपट्टयाच्या अधिकाराचे हस्तांतरण मानले जावे. खनिज सवलत नियमाच्या नियम ३७ अन्वये शासनाकडून खाणपट्टयाच्या अधिकाराच्या हस्तांतरणाबाबत परवानगी घेणे बंधनकारक आहे. सदर प्रकरणी खाणपट्टाधारकांनी शासनाची परवानगी घेतली नसल्याने सदरील अवैध खनिज उत्खननाच्या अनुषंगाने खाणपट्टाधारकांकडून दंड व इतर	खाणपट्टयातील खाणकाम संदर्भात मुखत्यारनामा द्वारे (Power of Attorney) प्रतिनिधीस अधिकार देणे ही बाब खनिज सवलत नियम १९६० चे नियम ३७ चा भंग झाल्याचे म्हणता येणार नाही असे मत आहे. एकूण ६ प्रकरणांत power of Attorney Act 1882 नुसार कार्यवाही झालेली आहे. खाणपट्टाधारकाद्वारे सदर power of Attorney अंमलात आणल्याच्या प्रती व बँकेचे विवरण सोबत सादर करण्यात आलेले आहे. Mines Act, १९५२ च्या कलम २ (c) मध्ये Definition अंतर्गत पुढीलप्रमाणे नमूद केले आहे- 'agent', when used in relation to a mine, means every person, whether appointed as such or not, who, acting or purporting to act on behalf of the owner, takes part in the management, control, supervision or direction of the mine or of any part thereof; त्यामूळे सदर प्रकरणे खनिज सवलत नियम १९६० चे नियम ३७ मधील तरतूदीच्या अनुषंगाने खनिपट्टा हस्तांतरणाच्या कक्षेत येणार नाहीत.

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		आणि व्यवस्था पाहण्यासाठी हस्तांतरित केले. दस्तांवेजात असे काही आढळले नाही ज्याद्वारे असे निर्देशित हेाईल कि यासाठी शासनाद्वारे मंजुरी प्राप्त करण्यात आली होती. शासनाच्या परवानगी शिवाय भाडेपट्टा हक्क हस्तांतरित करणे अनियमित होते आणि म्हणूनच या भाडेपट्टादारांच्या अभिकर्त्याने रू. ६०.८३ कोटी किंमतीचे ३२.९७ लाख मे. टन खनिजाचे कायदेशीर प्राधिकाराशिवाय उत्खनन केले, ज्याची वसूली करणे आवश्यक आहे. आम्ही निर्देशनास आणल्यावर जिल्हा खनिकर्म अधिकारी कोल्हापूर यांनी नमूद केले (जून २०१५) कि भाडेपट्टा हक्कांच्या हस्तांतरणाबाबत त्यांच्या कार्यालयास माहिती नव्हती. यावरून असे निर्देशित होते कि विभागाने अशा प्रकाराची पुनरावृती पुन्हा घडू नये याबाबत खात्री करण्यासाठी आंतरिक नियंत्रण मजबूत करावयास पाहिजे. अंतिम बैठकीत प्रधान सचिव उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांनी वस्तुस्थिती मान्य केली आणि या बाबतीत कारवाई करण्यात येईल असे सूचित केले.	शासकीय देणी वसूल केली पाहिजेत.	

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
७	परिच्छेद क्र.७.२.२.७ (अ)	**स्वामित्वधन वभाडे यांचे निर्धारण आणि वसूली** MCD नियमाच्या नियम ४५ अंतर्गत प्रत्येक भाडेपट्टादाराने मासिक / वार्षिक उत्पादन, निपटारा आणि उत्खनन केलेल्या खनिजावर प्रदान केलेले स्वामित्वधन या बाबी दर्षविणारे मासिक व वार्षिक विवरण फाईल करावयास पाहिजे. आम्हाला असे निदर्शनास आले की, विभागाने नुसतेच विवरण स्विकारले आहेत आणि भाडेपट्टादारांनी सादर केलेल्या विवरणाची पडताळणी करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. यामूळे विवरण सादर करण्या मागचा उद्देश्यच विफल ठरला. शिखर स्तरावर भाडेपट्टादाराने सादर केलेल्या आकडेवारीच्या अचूकतेची खातरजमा करण्यासाठी कोणतेही कार्यतंत्र नाही. लेखापरिक्षणेने वार्षिक विवरणाची पडताळणी केली आणि त्यात खालील परिच्छेदात दर्शविल्याप्रमाणे स्वामित्वधन व भाड्याची कमी वसूली /वसूली न करणे अथवा विलंबाने वसूली करणे लेखापरिक्षेस आढळले. **अ) स्वामित्वधनाची कमी वसूली.** MC नियम, १९६० च्या नियम ६४ (D) (१) (i) आणि (iv) मध्ये विहित सूत्रानुसार स्वामित्वधनाचे दर काढण्यात येतात. स्वामित्वधनाचे दर कच्च्या धातूतील अल्युमिनियम धातूच्या आतील द्रव्य,	**अ)स्वामित्वधनाच्या वसूलीबाबतच्या प्रगतीची माहिती लोकलेखा समितीला द्यावी.**	**अ) स्वामित्वधनाची कमी वसूली** :- महालेखाकार कार्यालयाद्वारे उपरोक्त परिच्छेद नुसार सात भाडेपट्टेादारांकडून रु. ६.५४ कोटी स्वामित्वधनाची कमी वसूली झाल्याचे आक्षेप काढण्यात आले आहे. तथापि सदर दर्शविलेली रकमेबाबत पुनर्विलोकन होणे गरजेचे

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)

डालर-रूपया विनिमय दर, बॉक्साईट / ॲल्यूमिनिलयमची विक्रि किमंत ईत्यादी वर आधारीत असते. सात पटेदांराच्या वार्षिक विवरणाच्या पडताळणी खालील तक्ता ७.२.२.७ (अ) मध्ये दर्शवल्याप्रमाणे रु. ६.५४ कोटी स्वामित्वनधन कमी अदा केल्याचे आढळले.

रक्कम रुपये

अ. क्र.	पटेदाराचे नाव	वर्ष	प्रदानकरण्यायोग्य स्वामित्वधन	प्रदान केलेले स्वामित्वधन	स्वामित्वधनाची कमी वसूली
१	मे. शिवराम मिनरल्स(बुरम्बल, शाहूवाडी)	२०१२-२०१३	१,१७,६२,१५०	१,०२,८५,२९१	१४,७६,८५९
		२०१३-२०१४	१,०८,७८,७२५	१,०८,५९,११२	१९,६०३

आहे असे मत खुलाश्यात देण्यात आलेले आहे. तसेच महालेखाकार कार्यालयासोबत झालेल्या Exit Conference मध्ये देखील सदर मुद्यांवर चर्चा होऊन याबाबत पुनर्विलोकन करण्याचे महालेखाकार कार्यालयाने मान्य केले होते.

सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात मे. आशापुरा माईनकेम लि. यांचे रत्नागिरी जिल्हयातील रोवले बॉक्साईट खाणीची स्वामित्वधनाची रक्कम रु.२,१५,००,०००/- (रु. दोन कोटी पंधरा लक्ष) व उंबरशेत बॉक्साईट खाणीचे खाणकामासंदर्भात स्वामित्वधन रक्कम रु. १,९०,००,०००/- (एक कोटी नव्वद लक्ष) चा भरणा करण्यात आलेला आहे. तसेच रायगड जिल्हयातील मनोहर दर्यानानी यांचे मेघरे बॉक्साईट माईन्स, मे. अलतगे स्टोन क्रशिंग इंडस्ट्रीज यांचे दांडा-बागमंडला-सायगांव बॉक्साईट खाण व कुरवळे – मारळ येथील बॉक्साईट खाणीचे खाणकामाबाबत **एकूण फरकाची रक्कम रु.३१,९५,२२८/- वसूल करण्यात आलेली आहे.**

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप						महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)						(४)	(५)
		२	मे. भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी (गीर गांव/ येळवणजूगाई, शाहूवाडी)	२०१३-२०१४	३,३७,७४,६६६	३,३०,०००	३,३४,४४,६६६		
		३	मे. भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी (मूळवेलास — हार्वीत - कूडगांव,	२०१२-१३	२५,६०,७७४	१४,२८,७७८	११,३१,९९६		
				२०१३-१४	३४,१९,४५२	४,३१,०००	२९,८८,४५२		

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप					महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)					(४)	(५)
			श्रीवर्धन)					
		४	मे. अलतगे स्टोन क्रशीग इंडस्ट्रिज (दांडा, बागमंडल-साईगांव, श्रीवर्धन)	२०१२-१३	६४,३४,४९७	३०,००,०००	३४,३४,४९७	
				२०१३-१४	५२,९१,२५१	१५,००,०००	३७,९१,२५१	
		५	मनोहर व्ही. दर्यानानी (मेघरे श्रीवर्धन)	२०१३-१४	६२,६८,२४६	३५,००,०००	२७,६८,२४६	
		६	मे.	२०१	३,०४,२	२,१५	८९,	

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप						महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)						(४)	(५)
			आशा पूरा माईन केम लि. (रोवले बॉक्साईट खाण)	३-१४	८,३९४	,००,०००	२८,३९४		
		७	मे. आशा पूरा माईन केम लि. (उंबर शेत बॉक्साईट खाण)	२०१३-१४	२,३९,६३,९०४	१,६५,५०,०००	७४,१३,९०४		
		एकूण			१३,४७,८२,०५९	६,९३,८४,१९१	६,५३,९७,८६८		

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		अंतिम बैठकीत प्रधान सचिव, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांनी जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्याद्वारे विवरणाचे निर्धारण न करण्याबाबतचे तथ्य मान्य केले आणि नमूद केले की, दोन पटेदाराकडून रु. ३२ लाख वसूल केले व उर्वरित प्रकरणात कारवाई करण्यात येईल. वरिल कमी आकारणी फक्त लेखापरिक्षेस सादर करण्यात आलेल्या कार्यकाळातील विवरणांच्या संदर्भात होती. विभागाने सर्व विवरणे तपासण्याबाबत विचार करावयास पाहिजे आणि वसूल केलेल्या स्वामित्वधनाच्या अचूकतेची पडताळणी करावयास पाहीजे. विभागाने भाडेपटादारानी सादर केलेल्या विवरणांची तत्परतेने पडताळणी करावयासाठी एखादी प्रणाली सुध्दा विकसीत करावयास पाहीजे. **ब) व्याजाचा भरणा न होणे** MC नियम , १९६० च्या नियम ६४ A अनुसार स्वामित्वधनाचा भरणा विलंबाने झाला असल्यास , २४ टक्के दराने व्याज वसूली योग्य असते. विभागाने स्वामित्वधनाचा वेळेवर भरणा झाला आहे याची खातरजमा करण्याकरिता दस्तावेज योग्य प्रकारे जतन केलेले नाही. दस्तावेजांच्या अभावी लेखापरीक्षेस स्वामित्वधनाचा भरणा	**ब) व्याजाच्या वसूलीबाबतच्या प्रगतीची माहिती लोकलेखा समितीला द्यावी.**	ब) **व्याजाचा भरणा न होणे :-** सदर मुद्यांच्या अनुषंगाने मे. भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी, कोल्हापूर यांना व्याजाची रक्कम भरण्याबाबत नोटीस बजावण्यात येवून संबंधितांकडून संपूर्ण रक्कम रु.२०,९०,६२२/- (अक्षरी रु.वीस लाख, नव्वद हजार सहाशे बावीस) वसूल करण्यात आले आहे.

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		वेळेवर झाला आहे याबाबत सर्व प्रकरणांत खात्री करता आली नाही, केवळ एका प्रकरणात सर्व दस्तावेज आढळले. त्या फाईलचे लक्षपूर्वक पठन केले असता असे आढळल की भाडेपटेदाराने भरणा ३ दिवस ते ११३ दिवसांच्या विलंबाने केला आणि तो एकूण रु. १४.३८ कोटी स्वामित्वधनाचा विलंबाने भरणा केल्यामुळै रु. २०.९१ लाख व्याज देणे लागत होता. अशी शिफारस करण्यात येते की विभागाने याबाबत दस्तावेज ठेवण्याचा विचार करावा आणि जेथे स्वामित्वधन विलंबाने भरण्यात येत आहे तेथे व्याजाच्य आकारणीची खात्री करावी. अंतिम बैठकीत प्रधान सचिव, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांनी वस्तुस्थिती मान्य केली आणि जिल्हा खनिकर्म अधिकारी, कोल्हापूर यांनी रु. २०.९० लाखाची वसुलीची नोटिस बजावली आहे, असे सूचित केले. **क) मृत भाडे आणि भूपृष्ठ भाडयाची वसुली न करणे** MMDR अधिनियमाच्या कलम ९A (१)अनुसार खनिकर्म भाडेपटयाच्या प्रत्येक भोडेपटादाराने दर वर्षी संपूर्ण वर्षासाठी अनुसूची III मध्ये विहित दरानुसार अग्रिम मृत भाडे भरावयास पाहिजे. MC नियम १९६० च्या नियम २८(१) मध्ये विनिर्दिष्ट	क)	क) **मृत भाडे आणि भूपृष्ठ भाडयाची वसूली न करणे :-**

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		आहे की खनिकर्म प्रक्रिया भाडेपटा निष्पादित झाल्याच्या तारखेपासून एका वर्षात सुरु न झाल्यास अथवा खनिकर्म प्रक्रिया सुरु झाल्यानंतर निंरतर एक वर्षाच्या कालावधीसाठी निष्क्रिय असेल तर महाराष्ट्र शासनाने खनिकर्म भाडेपटा रद होण्याबाबत घोषणा करावयास पाहिजे आणि भाडेपटादारास तसे सूचित करावयास पाहिजे. शिवाय, MC नियम १९६० च्या नियम २७(१) (d) मध्ये विनिर्दिष्ट आहे की भाडेपटेदाराने खनिकर्म प्रक्रियेसाठी वापरलेल्या जमीनीच्या क्षेत्रावर जमीन महसूलापेक्षा जास्त नसेल एवढया दराने , भूपृष्ठ भाडे म्हणून अदा करावयासा पाहिजे. **i) मृत भाडे:** आमच्या असे निदर्शनास आले की यवतमाळ आणि कोल्हापूर येथे जिल्हा खनिकर्म अधिका-याने २६ भाडेपटयाचे, जे एक ते १६ इतक्या कालावधीसाठी निष्क्रीय होते, रु. ८२.९२ लाख मृत भाडे वसूल केले नव्हते. भाडेपटे एक ते १६ वर्षे निष्क्रीय असल्यावरही शासनाद्वारे भाडेपटे रद करण्यात आले नाही. आम्ही निदर्शनास आणल्यावर संचालक, भूशास्त्र आणि खनिकर्म यांनी जिल्हा खनिकर्म यांनी जिल्हा खनिकर्म अधिका-याकडून भाडेपटे रद झाल्याचे घोषित न करण्याची कारणे मागविली आहेत, असे सूचित केले. चंद्रपूर येथील सहा	**i) मृत भाडे- अद्ययावत माहिती लोकलेखा समितीला द्यावी.**	i) **मृत भाडे** :- उपरोक्त मुद्यांमध्ये एकूण रक्कम रु.८२.९२ लाख रकमेपैकी कोल्हापूर जिल्हयातील ७ बॉक्साईट खाणपट्टाधारकाद्वारे मृतभाटकाची एकूण रक्कम रु.५५,३२,४०४/- पैकी एकूण २२,०७,७४०/- रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. उर्वरीत रक्कम वसूल करुन शासन जमा करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे. तसेच यवतमाळ जिल्हयातील एकूण ८ खाणपट्टाधारकांकडून रुपये १४.७७ लक्ष ची वसूल करण्यात आलेली आहे. इतर रकमांचो वसूलीची कार्यवाही सुरु आहे. तसेच चंद्रपूर जिल्हयातील एकूण ०७ खाणपट्टाधारकांकडून रु.१३.१५ लक्ष एवढी मृतभाटक रकमेची वसूली झालेली आहे.

अ. क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.	महालेखाकार कार्यालयाचे आक्षेप	महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय	आक्षेपा / अभिप्रायासंदर्भात स्पष्टीकरण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		निष्क्रीय चूनखडी खाणींचेही वसुलीयोग्य मृत भाडयाचे तपशील प्रतीक्षित आहे. अंतिम बैठकीत प्रधान सचिव, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांनी मृत भाडयाची वसुली करण्यात येईल असे नमूद केले. ii) **भूपृष्ठ भाडे:** यवतमाळ जिल्हयातील २१ प्रकरणांत MC नियम १९६० च्या नियम २७(१)(d) अंतर्गत भाडेपटेदाराने रु. २.१९ कोटी भूपृष्ठ भाडे अदा केले नाही व जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्याने त्याची मागणीही केली नाही. अंतिम बैठकीत प्रधान सचिव, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांनी नियमानूसार रक्कम वसूल करावी असे नमूद केले.	**ii) भूपृष्ठ भाडे- अद्ययावत माहिती लोकलेखा समितीला द्यावी.**	ii) **भूपृष्ठ भाडे** :- यवतमाळ जिल्हयातील २१ प्रकरणांत भाडेपट्टेदाराने रु.२.१९ कोटी भूपृष्ठ भाडे अदा नसल्याचे महालेखाकार कार्यालयाने आक्षेप नोंदविले आहे. तथापि सदर २१ प्रकरणांमध्ये मृतभाटक रक्कम प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा देखील समावेश करण्यात आला. खनिज सवलत नियम १९६० चे नियम २७ (ड) प्रमाणे भूपृष्ठभाटक (Surface Rent) वसुलीची तरतूद आहे. मृतभाटकाच्या रकमा खाणपट्टयातील खाणकाम बंद असल्यास वसूल करण्याची तरतूद आहे. यवतमाळ जिल्हयातील एकूण ०५ खनिपट्टा धारकाकडे भूपृष्ठ भाटकाची रक्कम प्रलंबित असून एकूण १४ खाणपट्टाधारकाकडून रु.३५.४९ लक्ष एवढी भूपृष्ठभाटकाच्या रकमेची वसूली करण्यात आलेली आहे. उर्वरित खनिपट्टा धारकांकडून वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

****

अवर सचिव
महाराष्ट्र शासन
ऊर्जा व कामगार विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

साक्ष :

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या महसुली क्षेत्रावर लेखापरीक्षा अहवालातील परिच्छेद क्र. ७.२ 'खनिज प्राप्तीच्या वसुलीची पद्धती आणि नियंत्रण याचे संपादणूक लेखापरीक्षण' या संदर्भात समितीने दिनांक १३ जून, २०१८, दिनांक ८ व २९ ऑगस्ट व ३ ऑक्टोबर, २०१८ रोजी उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) विभागाचे अपर मुख्य सचिव व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

परिच्छेद क्रमांक-७.२.२.१ अनुज्ञप्ती आणि भाडेपट्टा प्रदानाच्या अर्जांचा निपटारा :-

४.१ साक्षीच्या वेळी पूर्वेक्षण अनुज्ञप्ती (Prospecting License-PL)आणि खनिकर्म भाडेपट्टा (ML) प्रलंबित राहण्याबद्दलचा मुद्दा आहे. या बाबतीत खुलासा एवढाच आहे की, हे अर्ज जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवले होते याचे कारण असे की, प्रणालीमध्ये बदल करण्याचा विषय होता. आता जी प्रणाली अवलंबिण्यात आली आहे ती, जाहीर लिलावाने करण्यात आली आहे. असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. ही प्रणाली सन २०१५ मध्ये अस्तित्वात आली. २००८-०९ मध्ये सुद्धा परवाने थांबविले, २००९-१० मध्ये थांबविले होते. २०१०-११ मध्ये थांबविले होते. एक-दोन वर्षांनंतर योजना येणार आहे म्हणून थांबविणे समजू शकतो. पण विभागाने २००८-०९ पासून प्रक्रिया थांबविली आणि काही ठराविक लोकांना परवाने दिले. विशेषतः २००८-०९ मध्ये ४४ लोकांना विभागाने दिले. हे पाहता सर्वांना न्याय देण्याची भूमिका दिसून आली नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, हा प्रश्न खनिकर्म विभागाशी संबंधित आहे. २०१० पासून या पूर्ण प्रक्रियेला संसदीय समिती निर्माण करण्यात आली. २०१० पासून लिलावाची प्रक्रिया हुडा समितीपासून सुरू झाली. २०१० ते २०१५ पर्यंत या समितीच्या तीन वेळा चर्चा झाल्या. तेव्हापासून ही प्रकरणे जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवण्यात आली असे म्हटले आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

हे थांबविण्यास कोणी सांगितले? निवडक लोकांना का दिले हे सांगा? अशी विचारणा समितीने केली असता, पूर्वेक्षण, अनुज्ञप्ती आणि खनिकर्म भाडेपट्टा याची जी प्रकरणे आहेत त्याला सिमलेसली मायनिंग लिज द्यायचे ही कायद्यामध्येच तरतूद आहे. पीएल टू एमएलच्या केसेस करण्यात आल्या. असे विभागीय सचिवांनी सांगितले. पूर्वेक्षण अनुज्ञप्ती ४४ लोकांना मिळाली. खनिकर्माची परवानगी ७१ लोकांना मिळाली. ही संख्या जास्त आहे. एवढ्याच लोकांना परवानगी का मिळाली? पुढील २००९-१०, २०१०-११, २०११-१२ या वर्षी कोणालाच परवानगी दिली नसेल तर मान्य आहे. परंतु २००८-०९ मध्ये ठराविक लोकांना दिली, पूर्वेक्षण अनुज्ञप्ती कमी लोकांना मिळाली असताना परवानगी जास्त लोकांना कशी मिळाली ? पूर्वेक्षण अनुज्ञप्तीशिवाय परवानगी देता कामा नये. असे मत समितीने व्यक्त केले असता, पूर्वेक्षण अनुज्ञप्ती च्या ४४ आणि परवानगीच्या ७१ केसेस आहेत त्याचा ब्रेक अप आता उपलब्ध नसला तरी तो समितीला देता येईल. २००८-०९ चा तपशील आता उपलब्ध नाही. या बाबतीत अधिक माहिती प्राप्त करून समितीला सादर करतो. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. मुळात हे आक्षेप आजचे नाहीत. विभागाने समितीसमोर साक्षीसाठी येत असताना पूर्ण अभ्यास करून येणे अपेक्षित आहे. विभागाने कोणाला परवानगी दिली नाही, त्यामुळे इतके वर्षे महसुलाची हानी किती झाली? याला स्थगिती नव्हती आणि प्रक्रिया विचाराधीन होती तर इतके दिवस आपण थांबण्याचे कारण नव्हते. ज्यावर्षी अनुमती दिली त्या वर्षी सर्वांना संधी मिळाली पाहिजे होती. विभागाने सर्वेक्षणाची संधी दिली नाही. संसदीय समितीची स्थापना झाली हे म्हणणे बरोबर आहे. पण शासनातर्फे लेखी निर्देश किंवा अधिसूचना आलेली होती का? जोपर्यंत पुढील धोरण निश्चित होत नाही तोपर्यंत नवीन परवाने देण्यात येऊ नये असे ऑन रेकॉर्ड आले होते का? रेकॉर्डवर आले नसेल तर त्याचा अर्थ असा आहे की, रेकॉर्डवर आले नाही आणि विभागाने दिले नाही. विभाग २००९-१० ते २०१४-१५ पर्यंत सहा वर्षे गृहीत धरत राहिले. आपण आता २००८-०९ ते २०१०-११ ची तपासणी करीत आहोत.त संसदीय कमिटी काही नवीन धोरण आणणार आहे म्हणून २०१४-१५ पर्यंत अर्ज प्रलंबित ठेवण्याचा निर्णय कोणी दिला? एमएलचे किंवा पीएलचे हे परवाने नवीन द्यायचे नाही किंवा रिन्यू करायचे नाही हा निर्णय कोणाचा होता? अशी विचारणा समितीने केली असता, शासनानेच निर्णय घेतला होता. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. त्याबाबतचा निर्णय दाखवा. अनुज्ञप्ती द्यायची नाही किंवा त्याचं नूतनीकरण करायचे नाही असा निर्णय झाला का? सचिव जर म्हणत असतील की, अधिक माहिती घेऊन समितीला सादर करतो. मग पुढील उत्तराला अर्थ काय उरतो? सचिव महोदयांना प्रश्न आहे की, २००८-०९ मध्ये विभागाने पूर्वेक्षण अनुज्ञप्ती (PL) आणि खनिकर्म भाडेपट्टा (ML) ४४ आणि ७१ परवानग्या दिल्या, २००९ नंतर २०१३-१४ पर्यंत बंद केल्या. संसदीय समिती निर्णय करीत नाही तोपर्यंत कोणतेही नवीन लायसन्स द्यायचे नाहीत किंवा त्यांचे नूतनीकरण करायचे नाहीत असे शासनाचे लेखी आदेश किंवा सूचना विभागाकडे होती का? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाच्या माहितीनुसार ते निर्णय सर्क्युलर किंवा आदेशानुसार कम्युनिकेट केलेले नाहीत. परंतु संचिकेमध्ये ते निर्णय ऑन फाईल घेण्यात आलेले आहेत. त्याची एकदा खात्री करून समितीला माहिती देतो.असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

महसुलाची हानी झाली असे समजून घ्यायचे आणि लोकांनी त्या खनिजापासून वंचित राहायला पाहिजे होते. कारण ते दोन्ही विषय एकदाच झाले आहेत. लोकांचे नुकसान झाले. पण त्यांना कामाची संधी मिळाली असती, रोजगार मिळाला असता. याचबरोबर ५ वर्षांनंतर राजस्वची हानी झालेली आपण आता बघत आहोत. या विषयावर कोणताही शासन निर्णय किंवा कोणतेही आदेश नसताना जिल्हा पातळीवर अशा प्रकारची सर्व

प्रकरणे थांबवण्याचे योग्य स्पष्टीकरण द्या किंवा ज्या ८-९ लोकांना मर्यादीत देण्यात आले त्याची कार्यवाही पण समितीला दाखवा. हा परिच्छेद आपण प्रलंबित ठेवत आहोत. संचिकेवर जो काही निर्णय घेतला होता तो शासनस्तरावर घेतला होता काय ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यास सहमती दर्शवित शासनस्तरावर हा निर्णय घेतला होता कारण ते अधिकार यांना नाहीत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदरील परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक २९/८/२०१८ रोजी विभागीय सचिवांची पुन्हा साक्ष घेतली. समितीच्या दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या बैठकीमध्ये पूर्वेक्षण अनुज्ञप्ती (PL) आणि खनिकर्म भाडेपट्टा (ML) सन २००८-०९ ला दिले आणि त्यानंतर सन २००९-१०, सन २०१०-११, सन २०११-१२ आणि सन २०१५ पर्यंत ते दिले नाही. याबद्दल विभागाने सांगितले की, शासनाचा निर्णय होता, संचिकेवर नोंदणी होती आणि त्याबद्दल समितीला काही कागदपत्रे देणार होते ते दिलेली नाहीत असे समितीने निदर्शनास आणले असता, परवानगी असेल तर याची माहिती समितीला देऊ इच्छितो असे विभागीय सचिवांनी सांगितले असता, त्यास समितीने सहमती दर्शविली. त्यावेळी जी प्रक्रिया अवलंबविली जायची त्यामध्ये एक तर ब्लॉक्स करीता सर्व अर्ज आमंत्रित केले जायचे आणि त्यावर माननीय मंत्र्यांकडे नस्ती सादर केली जायची. त्या सर्व अर्जांवर चर्चा विनिमय होऊन निर्णय व्हायचा. यामध्ये जर क्रोनॉलॉजी बघितली तर सन २००८-०९ मध्ये ही प्रकरणे मंजूर झालेली आहेत. त्यानंतर कोणतीही प्रकरणे मंजूर झालेली नाहीत. एकूण २ ब्लॉक्ससाठी ४४ अर्ज आले होते. फक्त २ त्या ब्लॉक्समध्येच मंजुरीचे निर्णय झालेले आहेत. त्यानंतरचा कालावधी बघितला तर सन २००९-१० मध्ये आचारसंहिता लागल्यामुळे त्या सुनावणी झाल्या नाहीत.

सन २०११ मध्ये शासनाने हे अधिकार सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यापर्यंत डेलिगेट केले. परंतु १ एप्रिल, २०१० मध्ये रास हे एमएमडीआरचे नियम आहेत ज्यामध्ये लिलाव करण्याचे प्रारूप नियम प्रकाशित झाले. २-जी चे प्रकरण झाले होते त्यामध्ये आधीच्या सचिवांनी विधान केले होते की, आपण ज्या लिजस् द्याल त्या सर्व लिलाव पद्धतीने द्याव्यात. दरम्यानच्या कालावधीत म्हणजे दिनांक १ एप्रिल, २०१० मध्ये हे प्रारूप नियम प्रकाशित झाले आणि त्यामध्येसुद्धा लिलावाचीच प्रक्रिया निर्धारीत केली असल्यामुळे यावर कोणतीही सुनावणी किंवा निर्णय झालेला नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

प्रारूप नियम प्रकाशित झाले पण सन २०१०-११, सन २०११-१२ या वर्षी काय झाले आहे? अशी विचारणा समितीने केली असता सन २०१० मध्येच प्रारूप नियम प्रकाशित झालेले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले. शासनाने यावर नंतर काही कार्यवाही केली नाही. पण यामध्ये विभागाचे किती नुकसान झाले आहे अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये विभागाचे नुकसान झाले असे म्हणता येणार नाही. कारण जे लिलाव केलेले आहेत त्यात निश्चित केलेल्याच्या १२५ टक्के एवढेच लिलाव आतापर्यंत केलेले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

लिलाव झाला नसला तरी महसुलाचे नुकसान झाले असेल ना? राज्याला जो महसूल मिळणार होता तो विभागाने प्रक्रिया न राबविल्यामुळे मिळाला नाही. ही वस्तुस्थिती आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, सन २००८-०९ आणि सन २००९-१० यावर्षी फक्त दोन ब्लॉक्समध्ये हेअरिंग झालेल्या आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जी प्रक्रिया राबविल्यामुळे शासनाला महसूल मिळणार होता त्या महसुलाला शासन का मुकले आहे? ही प्रक्रिया जर झाली असती तर राज्य शासनाला यातून महसूल मिळाला असता काय? या प्रश्नामध्ये फक्त हो किंवा नाही ते सांगा. असे समितीने सूचित केले असता, या प्रश्नामध्ये हो किंवा नाही असे उत्तर देणे कठीण आहे कारण यामध्ये पूर्वी फक्त सुनावणी हीच प्रक्रिया होती. त्याकरीता ही दोन प्रकरणे गाळली तर त्याव्यतिरिक्त कोणत्याही प्रकरणामध्ये सुनावणी झालेली नाही. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने वेळेमध्ये प्रक्रिया न राबविल्यामुळे राज्य शासनाच्या महसुलाचे नुकसान झाले काय, विभागाने ही प्रक्रिया राबवली असती तर राज्य शासनाला महसूल मिळाला असता ही खरी परिस्थिती आहे काय? राज्य शासन महसुलाला मुकले हे खरे आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी शासनाचे नुकसान झाले नसल्याचे सांगितले.

विभागाने तीन वर्ष तर लिलावाची प्रक्रिया राबवलीच नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता होय, ही वस्तुस्थिती आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले. याबाबतीमध्ये विभागाने आर्थिक नुकसानीव्यतिरीक्त रोजगाराच्या संधीदेखील गमावल्या आहेत. निपटारा केलेल्या अर्जांची संख्या ४४ एवढी आहे असे विभाग सांगत आहे. सन २००८-०९ मध्ये ३९२ अर्जांपैकी फक्त २ अर्जांची सुनावणी केली आहे, हे चुकीचे आहे. यावरुन समितीचे काही समाधान होत नाही. जर विभागाने ही प्रक्रिया राबविली असती तर राज्य शासनाला १ रुपया, २ रुपये किंवा ५ रुपये एवढा तरी महसूल मिळाला असता. प्रक्रिया न राबविल्यामुळे राज्य शासनाचे नुकसान झाले किंवा नाही, हे सांगा. अशी विचारणा समितीने केली असता, त्या काळात महसूल मिळाला नाही, हे सत्य आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यामध्ये ६ वर्षांचा कालावधी गेला, रोजगार मिळाला नाही तसेच त्यावर्षी पैसे मिळाले नाहीतर नंतरच्या कालखंडात मिळाले. विभागाने समितीला सांगितले होते की, पैसे काढू नका असा संचिकेवर आदेश आहे. तसे तुमच्या म्हणण्याप्रमाणे काही दिसत नाही आणि तसे काही आदेश पण नाहीत. मागच्यावेळी विभागाने सांगितले होते की, संचिकेवर नोटींग आहे, ऑर्डर निघालेली आहे, ऑर्डर देतो. शासनाने प्रारूप नियम मंजूर

केले नाहीत त्याला उशिर लागला तर त्याला जुने नियम लागू असतात की नाही अशी विचारणा समितीने केली असता, स्ट्रिंजन्ट ऑफ द टू लागू करायचे झाले तर मग लिलावाच्या पद्धती लागू करायला हव्यात. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीचे असे मत आहे की, प्रारूप नियम मान्य झाले नव्हते तोपर्यंत मागचे नियम लागू होते काय? जर मागचे नियम लागू होत असतील तर हे थांबवण्याचे काही कारण नव्हते, पण विभागाने ते थांबवले ही वस्तुस्थिती आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, माननीय मंत्र्यांच्या स्तरावर सुनावणी झाली पण निर्णय झाला नाही, याचा आढावा घेतला पण असे काही झालेले नाही, तर यामध्ये सुनावणीच झालेली नाही. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सुनावणी झाली किंवा नाही झाली यामुळे निर्णय राहिला असे समितीचे मत नाही. ही प्रक्रिया झाली असती तर राज्य शासनाला महसूल प्राप्त झाला असता आणि रोजगार प्राप्त झाला असता. असे मत समितीने व्यक्त केले असता, मग त्यामध्ये पारदर्शकतेचा मुद्दा उपस्थित होता. हा मुद्दा सर्वांच्या बॅक ऑफ द माइंडमध्ये होता. त्यावेळी टु जी चे प्रकरण घडले होते. त्या पार्श्वभूमीवर हे निर्णय आणि ज्यावेळी संसदीय समितीची दिल्लीमध्ये सुनावणी झाली होती त्यावेळी त्यांनी पारदर्शकता आणणे गरजेचे आहे अशा प्रकारचे विधान केले होते. असे विभागीय सचिवांनी सांगितले. विभागाने कोणती यंत्रणा राबवावी असे समितीचे मत नाही. राज्याला जास्त महसूल मिळवून देणारी जी कोणती पारदर्शी प्रक्रिया आहे, ती राबवली गेली पाहिजे होती असे समितीला वाटते, यापेक्षा वेगळे असे समितीचे काही मत नाही. असे समितीने स्पष्ट केले.

परिच्छेद क्र. ७.२.२.२ खनिकर्म भाडेपट्ट्याचे नूतनीकरण :

४.२ खनिकर्म भाडेपट्ट्याच्या नुतनीकरणाचा विषय आहे. खनिकर्म सवलत नियम, १९६० च्या नियम २४ ए-(६) नुसार राज्यात शासनाद्वारे जर भाडेपट्ट्याच्या समाप्तीपूर्वी भाडेपट्ट्याचे नूतनीकरण, अवेधानाचा निपटारा करण्यात आला नाही तर राज्य शासन त्यावर आदेश जारी करेल. तोपर्यंत त्या भाडेपट्ट्याचा कालावधी तेवढया कालावधीसाठी वाढवण्यात आला असे म्हणण्यात यावे.असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले. नूतनीकरण का केले नाही तर तेच सांगितले जाते की, नूतनीकरण करायचे नाही, असे संचिकेवर लिहिले आहे.असे मत समितीने व्यक्त केले असता, सदर कालावधीमध्ये खाणपट्टा नूतनीकरणात आला नाही, खाण व खनिज विकास विनियम सुधारणाच्या प्रस्तावित बदलाच्या अनुषंगाने मागच्या मुद्द्याचा खुलासा समितीला देऊ शकतो. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

परिच्छेद क्र. ७.२.२.३ (अ) खनिकर्म नियोजन/खनिकर्म योजनेस मान्यता :

४.३ खनिकर्म नियोजन व खनिकर्म योजनेस मान्यता हा मुद्दा आहे. खनिकर्म संधारण व विकास नियमांच्या नियम ९ अंतर्गत खनिकर्म आराखडा हा राज्यातील खनिकर्म कार्यासाठी पूर्वापेक्षित आहे. सदर विषयातील मुद्दा असा आहे की, खनिज संधारण व विकास नियमाच्या नियम ९ अंतर्गत आराखडा पूर्वापेक्षित आहे. त्यामध्ये जी काही चाचणी किंवा तपासणी करण्यात आली. प्रत्येक जिल्ह्यातून ६ प्रकरणांची तपासणी करण्यात आली तसेच इतर ३ जिल्ह्यांची तपासणी केलेली आहे. यामध्ये अनेक उल्लंघने आली. त्यात खनिकर्म प्रक्रिया मंजूर खनिकर्म नियोजन आणि योजनेसंदर्भात उल्लंघन झाल्याचे आढळल्यास, त्यांना स्थगिती आदेश देऊ शकतात,असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये शासनाने दिलेल्या खुलाशात महालेखाकाराने काढलेले आक्षेप म्हणजे एकूण ५ खाणपट्ट्यांपैकी रायगड जिल्ह्यातील मूल्वेलास हर्वित, कुडगाव, बॉक्साईट खाण, खाणीमध्ये क्षेत्र ५० हेक्टर व दांडगुरी, खुजारे, बॉक्साईट खाणीमध्ये ७१ हेक्टर या खाणीतील योजनेद्वारे झालेल्या खाणकाम योजनेनुसार झाले नसल्याचे आढळून आल्यामुळे सदर दोन्हीही खाणपट्टेधारकांना भारतीय खाण ब्युरो यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली होती. तद्नंतर दोन्हीही खाणपट्टाधारकांनी आक्षेपांची पूर्तता केल्यामुळे सदर खाणपट्टयाचे निलंबन आदेश भारतीय खाण ब्युरो कार्यालयाद्वारे दिनांक ३१ मे, २०१६ रोजीच्या पत्रान्वये रद्द करण्यात आलेले आहेत.असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. आक्षेपांची पूर्तता केली म्हणजे काय केले आहे, त्यात काय आक्षेप होते? अशी विचारणा समितीने केली असता, खाणकाम योजनेच्या पलीकडे म्हणजे एक क्वांटीटी परमीटेड होती. त्यापेक्षा जास्त त्यांनी उत्खनन केले त्या विषयी हे आक्षेप होते.असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. त्यातील मुद्दा असा आहे की, विभागाने जो हिशोब केला आहे ते बेकायदेशीर खाणकाम आहे असे महालेखाकारांचे म्हणणे आहे. विभागाचे मत असे आहे की, जेवढी परवानगी होती त्यापेक्षा जास्त उत्खनन केले तर ते बेकायदेशीर नाही. मग यावर तुम्ही काही दंड आकारला किंवा काय केले आहे? आधीच्या गौण खनिजाची जेवढी किंमत आहे तेवढेच त्यांनी अधिकचे उत्खनन केले त्याची वसुली केली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, एमसीडीआरच्या नियमाचे अधिकार राज्य शासनाला नाहीत. ते भारतीय ब्युरो ऑफ खाण अधिकार आहेत. त्यांनी ती खाण निलंबित केली आणि नंतर ती रिवॉक पण केली. सस्पेन्शन ऑफ माईनचे त्यांना अधिकार आहेत ते यांनी या प्रकरणामध्ये केले आहेत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समजा फक्त २ टन उत्खनन करण्याची परवानगी असताना ३ टन उत्पादन त्यांनी काढले असेल तर त्यावर महालेखाकारांचे असे आक्षेप होते की, हे जे १ टन जास्तीचे काढले आहे ते बेकायदेशीर आहे. पण ते बेकायदेशीर नाही हे तुम्ही स्पष्टीकरणमध्ये इश्यु केले आहे. समितीचा प्रश्न आहे की, हे जे १ टन अधिकचे उत्पादन त्यांनी काढले आहे त्याचा चार्ज २ टनाइतकाच घेतला आहे आणि त्यांच्यावर काहीच कारवाई केली नाही.

त्या ठिकाणी खाणकाम नियोजनाचे उल्लंघन झाले आहे. दोन खाणीमध्ये खाणकाम योजनेनुसार झालेले नसल्याचे आढळून आल्यामुळे सदर दोन्ही खाणपट्टाधारकांना आयबीएम ने नोटीस दाखवली आहे. नोटीसनंतर आक्षेपांची पूर्तता झाली आणि त्याचे निलंबन रद्द केले. असे का झाले ? म्हणजे खाणकाम नियोजनाची पूर्तता झाली आहे काय? यामध्ये नेमके काय झाले हे समितीला सांगा. रिव्हिव्ह ऑफ माईनिंग प्लॅनची एक पद्धत आहे तर रिव्हिव्ह ऑफ माईनिंग प्लॅन आणि मॉडीफिकेशन रिव्हिव्ह ऑफ माईनिंग प्लॅन हे दोन्ही आयबीएम करते. मॉडीफिकेशन करून कमी क्वांटीटी असलेले पुढच्या वेळी रिव्हाईस करून घेतात. ही मॉडीफिकेशन तरतूद आहे. हे त्यांनी केलेले आहे म्हणून आयबीएमने सस्पेंशन रिवॉक केले आहे. आता आलेगाव, मुळवेढा आणि दांडगुरी खुजारे अशा तीन ठिकाणी रिवॉक केले आहे. त्या तीनपैकी दोनचे निलंबन रद्द केले आहे. एकाचे काय केले आहे? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये पण रेग्युलराईज झालेले आहे. या तिन्हींची कागदपत्रे सोबतच आहेत.असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. हा पूर्ण विषय केंद्राच्या अखत्यारीतील आहे, हे खरे असले तरी राजस्व शासनाचा बुडत आहे. जी काही घटना घडली आहे त्यामध्ये शासनाचे नुकसान झालेले आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, महसूल बुडालेला नाही.असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. महसूल बुडाला नसला तरी हे एका अर्थाने नुकसान आहे. त्यामुळे त्यांचे सस्पेंशन झाले हे ठीक आहे. त्यांच्या अधिकाराचा काही विषय नाही. त्यात असा विषय आहे की, हीच जर मोडस ओपरेंडी प्रत्येक वेळेला वापरली गेली तर राज्याला एकप्रकारे ते हानिकारकच आहे. समजा ५ टनची परवानगी घेतली आणि १० टनचे उत्पादन काढले आणि नंतर म्हटले की, त्याचे स्वामित्वधन भरले आहे. मग तिथे १० टन काढण्यास कोणी सांगितले हाही एक प्रश्न आहे. केंद्राचे अधिकार म्हणत नाही तर ज्याला रेग्युलॅटरी बॉडी म्हणतात ते तुम्ही आहात तर मग विभागाच्या हातात काय अधिकार आहेत ?अशी विचारणा समितीने केली असता, या सर्वांवर ओव्हरकम करण्यासाठी विभागाने सन २०१५-१६ इंटीग्रेटेड लिज मॅनेजमेंट सिस्टिम सुरू केली आहे. ही प्रकरणे यापूर्वीची आहेत.असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. महालेखाकारांचा परिच्छेद स्पष्टपणे आहे. जे अधिकचे उत्खनन झाले आहे त्याचे ६ कोटी रुपये विभागाने माफ केले आहेत. पट्टेदारांनी उत्खनन केल्याने ४ लक्ष ३ हजार मॅट्रीक टन खनिजाच्या ६ कोटी २३ लक्ष किंमतीच्या नियमाच्या कलम ३१(५) अंतर्गत वसुली करण्यात येऊ शकते. पण आयबीएम व विभागाचे दुर्लक्ष झाल्यामुळे अतिरिक्त उत्पादन रोखण्यासाठी समोचित कारवाई करता येऊ शकली नाही. त्यांच्याकडून स्वामित्वधन इत्यादीसह खनिजाच्या रकमेची वसुली करण्याची तरतूद होती. उद्योग विभागाच्या सचिवांनी मान्य केले की कार्यवाही करु आणि विभागाने आता थातूरमातूर उत्तर दिले आहे. आयबीएमने मान्यता दिली असल्यामुळे आता विषय संपला आहे. विभागाने ६ कोटी २३ लाख रुपयांचा दंड वसूल करायला हवा होता तो केलाच नाही. राज्याची यंत्रणा जर अशा पद्धतीने चालत असेल आणि ६ ते सव्वा सहा कोटी रुपयांचा महसूल बुडत असेल आणि विभाग सांगतो की त्यांच्यावर ही जबाबदारी दिली होती तर ती जबाबदारी कशाच्या आधारावर दिली होती हा विषय पुढे आहेच. त्यामुळे विभागाने ही जबाबदारी कशाच्या आधारावर दिली त्याबाबत पूर्णपणे खुलासा लागेल आणि तो जर आपण देऊ शकत नसाल तर आपल्यावर जबाबदारी निश्चित होईल. विभागाने त्या आयबीएमच्या अधिकाऱ्यांना बैठकीसाठी घेऊन यावे. त्यांना याबाबतचे सविस्तर उत्तर द्यावे लागेल. कारण हे समाधानकारक उत्तर नाही. ६ कोटी २३ लाख रुपये जे त्यांनी अधिकचे उत्खनन केले त्याच्या स्वामित्वधनाच्या व्यतिरिक्त म्हणजे खनिज रकमेव्यतिरिक्त त्यांनी पैसे घ्यायला हवे होते ते त्यांनी घेतले नाही. तरी सुद्धा व्यवहार नियमानुकूल करून दिला. त्यामुळे यामध्ये आयबीएमचे दुर्लक्ष असल्याचे महालेखाकार यांचे स्पष्ट आक्षेप आहेत. असे मत समितीने व्यक्त केले असता, जर नुकसान झाले असेल तर ते अक्ष्यम आहे हे विभाग येथेच मान्य करतो. अतिरिक्त उत्खनन झाले ते बेकायदेशीर झाले असा तो आक्षेप आहे. नियमामध्ये जी तरतूद आहे ती आज निदर्शनास आणण्याचा प्रयत्न होत आहे. पण त्या नियमामध्येच असे म्हटले आहे की अमुक इतके उत्खनन करण्याची परवानगी असेल आणि त्यापेक्षा वाढीव उत्खनन त्यांनी केले असेल तर त्या वाढीव उत्खननावर वसुली करण्याची वेगळी तरतूद आहे. म्हणून ते बेकायदेशीर गृहित धरणे किंवा त्यातून त्याचा परवाना निलंबित करणे वा रद्द करणे हे विधिग्राह्य नाही अशा प्रकारची तरतूद आहे. ते समिती मान्य करत असेल तर योग्य होईल. फक्त मुद्दा इतकाच राहतो की त्यांनी जे अतिरिक्त उत्खनन केले असेल त्याची वसुली झाली किंवा नाही हाच मुद्दा आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले .

याची जी वसुली झालेली आहे किंवा नाही आणि वसुली झाली नसेल तर त्याला तोच दंड आकारला आहे काय की जो आधीसाठी आकारला होता, असा समितीचा प्रश्न होता. त्याची प्रक्रिया पूर्ण होऊन त्यांनी ते मान्य केले आहे की अतिरिक्त उत्खनन झाले आहे. विभागाने सुरूवातीला असे सांगितले की "Illegal mining means re-concessions or prospecting or mining operation undertaken by any person or by a company in any area without holding a re-concessions permit or its prospecting license or as the case may be a mining lease as required under section 1 of section 4 of the Act." असे समितीने निदर्शनास आणले असता, बरोबर या ठिकाणी त्याला मायनिंगची लिज आहे. पण परिमाण मर्यादित आहे. त्यांनी परिमाणापेक्षा जास्त उत्खनन केलेले आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. महालेखाकारांचा तोच आक्षेप आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, आता मुद्दा असा आहे की अशा प्रकारे जर अधिकचे उत्खनन केले असेल तर त्याच कायद्यामध्ये एक वेगळे सेक्शन आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. पण महालेखाकार यांनी त्याच सेक्शननुसार वसुली करावी असे दाखविले आहे. मात्र आपण इतर मायनिंगचा विषय पुढे आणला आहे. We have quoted

same provision which you are mentioning before the Commitee. असे मत महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून व्यक्त केले असता, Because there is a word 'permit' saying that, खाणपट्टाधारकाला जर १०० मे.टन खनिज उत्खाननाची परवानगी असेल आणि तो ११० मे.टन उत्खनन करीत असेल. तर ते बेकायदेशीर आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

If there is power to condone then why they have mentioned this provision. असे असेल तर दंडाची तरतूद चुकीची आहे. विभाग ६ कोटी रुपयांचा दंड कसा काय लावू शकतो. त्यांचे म्हणणे असे आहे, की मग ते कन्डोन करायचे पॉवर कशाला दिले तर त्याचे कारण असे आहे की त्याच्यामागे क्रिमीनल इन्टेन नाही असे गृहित धरले आहे. It is a conflict business mining. याचा अर्थ ते मान्य करण्यात आले. याचा अर्थ ती तरतूद चुकीची आहे. मग विभागाने ती तरतूद २०१४-१५ च्या धोरणामध्ये बदलली आहे काय, जर ती तरतूद चुकीची असेल तर विभागाने ६ कोटी रुपयांचा दंडा कशाच्या आधारे आकारला आहे. अशी विचारणा समितीने केली असता, आपण जी मानयिंग परमिटची व्याख्या वाचत आहात की रिकनेक्ट टू परमिट म्हणजे परमिट होत नाही. रिकनेशन्स टू परमिट म्हणजे एक पूर्व प्राथमिक पाहणीचा परवाना आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

यामध्ये असे लिहिले आहे की अशाप्रकारे खाणपट्टेधारकाने उत्खनन केलेल्या ४ लक्ष ३ हजार मेट्रिक टन खनिजाचे रुपये ६ कोटी २३ लाख रकमेची वसुली एमएमडीआर अधिनियमाचे कलम २१ (५) अंतर्गत वसुली करण्यात येऊ शकते. यात असे विहित आहे की कोणतीही व्यक्ती ज्याने कोणत्याही अधिकाराशिवाय खनिजाचे उत्खनन केले. त्याच्याकडून स्वामित्वधन इत्यादिसह खनिजाच्या रकमेची वसुली करण्यात यावी. महालेखाकार यांनी समितीला जे सांगितले की एकूण ५ खनिजांमध्ये एकूण ४ लाख ३ हजार मेट्रिक टन्स खजिनाचे अधिकचे उत्खनन झाले आहे. या पुस्तकामध्येच ते नमूद आहे. २ विषयांचे वेगळे आहे. २ चे ४६ हजार आणि ३ चे ३ लाख ४६ हजार असे मिळून ४ लाख ३ हजार मेट्रिक टन्स खनिजाचे अधिकचे उत्खनन झाले असून त्याचे ६ कोटी २३ लाख रुपये विभागाने घेतलेले नाहीत. मंजूर खनिकर्मचे जे नियोजन आहे आणि प्रत्यक्ष उत्खनन यामधील फरक ३ लाख ४६ हजार मेट्रिक टन इतका आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, या ३ लाख ४६ हजार मेट्रिक टन उत्खननाचे स्वामित्वधन शासनाला मिळालेले आहे. यामध्ये एकही टन उत्खनन विना स्वामित्वधन गेलेले नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

कलम २१ (५) हे कलम या प्रकरणी कसे लागू होत नाही त्याबाबत समितीला अवगत करून इच्छितो. Whenever a person rises without any lawful authority. या सर्व प्रकरणांमध्ये खनिपट्टा मंजूर आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. या ठिकाणी जो खनिपट्टा मंजूर आहे तो मर्यादित उत्खननासाठी आहे. त्यांना खनिपट्टा मिळालेला आहे. त्यानुसार त्यातून अमुक इतके उत्खनन करायचे आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की त्याच्यापेक्षा थोडे जास्त उत्खनन झाले आहे आणि त्याची रक्कम त्यांनी ठरविली आहे. त्यावर महालेखाकारांचे म्हणणे असे आहे की, It should be treated as illegal. त्यांचे म्हणणे असे आहे की, as per their rules that cannot be treated as illegal. त्यांनी ठराविक उत्खननापेक्षा जास्त खनिजाचे उत्खनन केले असेल तर त्याच्या काही कम्पायलेशन करायच्या असतात आणि त्याच्या काही नोटीस असतात त्या त्यांनी केल्या आहेत. त्यावरुन त्यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी ते नियमांच्या अधिन राहून केले आहे. आता हा मूलभूत मुद्दा आहे असे समितीने मत व्यक्त केले असता, विभागाचा फक्त कलम २१ (५) अप्लिकेशन होते त्याबद्दल आक्षेप आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

महालेखाकारांचे मत असे आहे की, विभागाला कलम २१ (५) अनुसार रक्कम वसूल करता येते. कारण त्या ठिकाणी उत्खननाची मर्यादा आहे. it should be treated as illegal. त्यांचे म्हणणे असे आहे की, as per their rules that cannot be treated as illegal. असे मत समित्शाीने व्यक्त केले असता, कलम २१ (५) अवगत करायचे आहे. महालेखाकार म्हणत आहेत की, ते ॲप्लिकेबल आहे. त्याबाबत एकदा वाचून दाखवितो. Whenever any person raises without any lawful authority any mineral from any land the State Government may recover from such person the minerals were raised or where such minerals has been disposed off, the price thereof and may also recover from such person rent, royalty, tax. या प्रकरणी त्याने स्वामित्वधन भरलेले आहे. त्याला भाडेपट्टा मंजूर आहे. त्याचा राज्य शासनासोबत भाडेपट्टा करार झालेला आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. यामध्ये दांडगुरी, खुजारे बॉक्साईट खाण आहे. सन २०१२-१४ दरम्यान मंजूर खनिकर्म नियोजनानुसार परिमाण (MT) ३ लाख ५६ हजार ८३० मेट्रिक टन आहे. तर यामध्ये भाडेपट्ट्याचा कालावधी काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, याचा कालावधी २० वर्षांचा असून तो आता ५० वर्षे केला आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. २० वर्षांच्या कालावधीमध्ये किती उत्खननाची परवानगी होती व त्यांनी किती उत्खनन केले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता भाडेपट्टा कालावधी अजून पूर्ण व्हायचा आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

त्या वर्षामध्ये जेवढी परवानगी होती त्यापेक्षा या पाचही खाणींमध्ये ४ लक्ष ३ हजार मेट्रिक टन जास्तीचे उत्खनन झालेले आहे. विभाग म्हणत आहे की, हे उल्लंघन नाही. They are lawful lease holder. असे विभागाचे मत आहे. जर असे असेल तर करारनाम्यात परिमाण टाकण्याची गरज काय आहे ? वाढीव उत्खननाबाबत त्यांनी परवानगी घेतली आहे का ? They are lawful lessee but they have a limited power. जिल्हाधिकाऱ्यांना आयुक्तांचे अधिकार नसतात. त्याप्रमाणे त्यांना जेवढे अधिकार होते तेवढे उत्खनन करण्यास परवानगी दिली. त्यांना जर जास्त उत्खनन करायचे असेल तर त्याची परवानगी अगोदर घेणे आवश्यक होते. परंतु त्यांनी तसे केले नाही. आय.बी.एम. च्या लोकांनी माफ केले. यांचे तेच म्हणणे आहे की, आय.बी.एम. मुळे ६ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. आपण कलम २१ (५) बाबत बोलत आहात. They are a lease holder they can excavate but they should take permission. खाणकाम योजनेच्या त्यांनी बाहेर जाऊन उत्खनन केले आहे. खाणकाम योजनेप्रमाणे आपण परवानगी दिली होती. परंतु त्यांनी त्याबाहेर जाऊन ४ लक्ष मेट्रिक टन जास्तीचे उत्खनन केले आहे. त्याचे स्वामित्वधन व किंमत हे दोन्ही पैसे वसूल करायला हवे होते. विभागाने स्वामित्वधानाची वसुली केली परंतु किमतीची वसुली केली नाही. त्यामुळे शासनाचे ६ लाख ३ हजार रुपये एवढे नुकसान झाले. याबाबत महालेखापरीक्षकांचा परिच्छेद असून विभाग याचे कसे समर्थन करते हे समितीला समजत नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, सदर लेखापरीक्षण सन २०१५ मध्ये झाले आहे. या संपूर्ण खनिकर्म योजना सन २०१०-११, २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४ च्या होत्या. जर विभागाने ते नियमित करून वाढीव उत्खनन मान्य केले असते तर तसे लेखापरिक्षणामध्ये दाखवायला पाहिजे होते. If you have revised these mining plans then such plans were not produced before the audit team? This whole issue is of mining plans. असे महालेखाकारांनी सांगितले.

How you are regularising the excess excavation without approving the revised mining plan? This is the issue in this audit para. असे मत महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून व्यक्त केले असता, माझा एक कायदेशीर मुद्दा आहे. जर एखाद्याला लाँग टर्म लीज दिली असेल तर मूळतः त्या वर्षी तेवढी दाखवितो. कारण खनिपट्टा जिल्हाधिकारी हे मंजूर करतात किंवा बऱ्याच स्तरावर मंजूर होतात. विभाग त्या वर्षी यासाठी दाखवितो की, स्वामित्वधनाचा अंदाज यावा. या प्रकरणात त्याला दिलेल्या परिमाणापेक्षा त्याने अतिरिक्त उत्खनन केले आहे. त्याचा भाडेपट्टा कालावधी २० वर्षांचा आहे. त्याला पूर्ण बेकायदेशीर धरुन त्याने उत्खनन केलेल्याची वसुली करावी का ? सर्वसाधारणपणे राज्यामध्ये इतर खाणीला जे धोरण लावतो तेच येथे लावले पाहिजे. एकच प्रकरणी युनिक करून पुढे कायदेशीर अडचणी येतील, असे वाटते, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

There is a concept of mining plan and excavation has to be done in an orderly manner according to this plan. You can revised the mining plan. However, they have done the recovery without revising the mining plan. Now, Section २१ (५) also provides for recovery of price of the excavated material . असे मत महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून व्यक्त केले असता, The main issue is, whether the said Section is applicable or not. What is our general policy we should adopt it. Otherwise, we cannot say only in this case that, this is completely illegal and make recovery whereas we are regularising it in 100 remaining cases. राज्यस्तरावर किंवा जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर अनेक खाणी मंजूर होतात. त्यामध्ये जे अंदाज देतो त्याप्रमाणे उत्खनन न करता अतिरिक्त उत्खनन केले असेल तर इतर प्रकरणात जे सामूहिक धोरण राबवितो ते राबविले पाहिजे. कारण अतिरिक्त उत्खननाची ही पहिलीच घटना नसावी. इतर प्रकरणात जे करतो तेच येथे करावे. एकाच प्रकरणात त्याचा भाडेपट्टा कालावधी सुरू असताना त्याची वसुली पूर्ण केली तर त्यामध्ये कायदेशीर अडचणी येतील, असे वाटते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. आपण कलम २१ (५) संदर्भ देता तो कशासाठी आहे ? हे कायदे आज बनले नसून ते संपूर्ण राज्य व देशासाठी लागू आहेत. खाणकाम योजनेला सुधारित करा व नंतर हे करा. असे मत समितीने व्यक्त केले असता, या सगळ्यांना आपण आता ओव्हरकम केले आहे. या सर्व घटना पूर्वी झालेल्या आहेत. विभागाने आता या पूर्ण यंत्रणेला एकत्रित केले आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने हे सर्व आता चांगले केले आहे, परंतु समिती मागील कालावधीमध्ये घडलेल्या बाबींवर चर्चा करीत आहोत. बुडालेल्या पैशांबाबत चर्चा करीत आहोत. असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाने स्वामित्वधन घेतले आहे. हा मुद्दा कायदेशीर आहे महालेखाकार यांचे मत आहे की, कलम २१ (५) हा इलॅगिलिटीचा असून तो लागू झाला पाहिजे. विभागाचे असे मत आहे की, हे बेकायदेशीर नाही. त्याला भाडेपट्टा वैध आहे फक्त त्यावर्षी त्याने खाणकाम योजनेचे उल्लंघन करून जास्तीचे उत्खनन केले आहे. अशा कृत्याला कलम २१ (५) लावावा का, हा कायदेशीर मुद्दा आहे. समितीची परवानगी असेल तर याबाबत विधी व न्याय विभागाकडून अभिप्राय घेऊन समितीस सादर करतो. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. त्यावर याबाबत विधी व न्याय विभागाचा अभिप्राय घेऊन दिनांक २७ रोजी होणाऱ्या पुढील बैठकीमध्ये समितीस सादर करावा. असे समितीने सूचित केले.

उक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक २९ ऑगस्ट २०१८ रोजी विभागीय सचिवांची पुन्हा साक्ष घेतली. यामध्ये मंजूर खनिकर्म योजनेपेक्षा अधिक खनिज उत्खनन खाणपट्टाधारकाने केले. विभागाने असे सांगितले की, त्याला एमएमडीआर अधिनियमाचे कलम २१(५) लागू होत नाही. विधी व न्याय विभागाचे याबाबत मत घेऊन अवगत करण्याचे आश्वासन विभागाने दिले होते त्यांच्या मताबाबत समितीने विचारणा केली असता, विधी व न्याय विभागाचे मत प्राप्त झालेले आहे त्यांच्या मताप्रमाणे महालेखाकारांच्या मुद्याप्रमाणेच त्यांनी विधान केलेले आहे. पूर्वलक्षी प्रभावाने वसुली करण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा जो निर्णय आहे त्याची सुद्धा अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. समितीला एवढेच अवगत करणे गरजेचे वाटते आणि ते Subject to verification आहे. अधिकाऱ्यांनी मला सूचना केली की, निती आयोगाने या निर्णयाविरुद्ध रिव्हिव पिटिशन दाखल करण्याच्या सूचना खनिकर्म विभागाला दिलेल्या आहेत. अद्याप त्याचा काही निर्णय झालेला नाही. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

तो निर्णय जेव्हा व्हायचा तेव्हा होईल. पण आज महालेखाकारांचे म्हणणे होते की, खनिकर्म योजनेप्रमाणे त्यापेक्षा जास्तीचे उत्खनन झालेले असेल तर त्याला फक्त रॉयल्टी घेऊ नका तर त्याला दंड पण लावा. तो दंड विभागाने लावलेला नाही आणि वसुलीची कार्यवाही सुरू केलेली आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, वसुलीची कार्यवाही सुरू करण्याच्या सूचना विभागाने दिलेल्या आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

वसुली कधीपर्यंत होणे अपेक्षित आहे? ही वसुली कोण करणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता, तीन महिन्यांत ही प्रक्रिया करून समितीला अहवाल सादर करू. जिल्हा खनिकर्म अधिकारी याची वसुली करतील. आता जी इंटीग्रेटेड लीज मॅनेजमेंट सिस्टिम आहे त्यामध्ये अशी तफावत दिसते की, जेवढी माईन क्वांटीटी किंवा मंजूर परिमाणापेक्षा जास्त खनिकर्म उत्खनन होणार नाही. कारण ते पासेस पण ऑनलाईनच इश्यु होतात. असे विभागीय सचिवांनी सांगितले. **(विभागाकडून प्राप्त झालेली माहिती विवरणपत्र क्र. २ मध्ये जोडण्यात आलेली आहे.)**

वर्तमानपत्रामध्ये अशी बातमी आली होती की, मोरले, चंद्रपूर येथील वसुली प्रलंबित आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, मुरली सिमेंटची वसुली एनसीएलटीला रेफर झालेली आहे. दालमिया सिमेंटने आता ते मुरली सिमेंट घेतलेले आहे. दालमिया सिमेंटचे एकूण स्वामित्वधन मिळून १३ कोटी रुपयांची वसुली आहे. गेल्या ६ वर्षांपासून त्यांनी ती वसुलीची रक्कम भरलेली नाही. या १३ कोटी रुपयांच्या वसुलीसाठी आरआरसी म्हणून प्रक्रिया सुरू झालेली आहे. पण एनसीएलटीमध्ये प्रकरण असल्यामुळे सक्तीची वसुली करता येत नाही. दालमिया सिमेंटची लायबलीटी घेऊन विभागाला ती वसुली करता येईल. एनसीएलटीमध्ये हे प्रकरण आहे आता ते पूर्ण प्रकरण आयबीसीच्या अंतर्गत आहे. त्यामुळे आता त्यावर इतर नियम लादता येत नाहीत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. त्यांच्याकडे विभागाने मागणी नोंदवली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शवली.

(ब) पर्यावरण मंजुरी प्रमाणपत्र, खनिकर्म योजना आणि प्रत्यक्ष उत्पादन यांच्यातील खनिज उत्पादनातील तफावत :-

४.४ यामध्ये पर्यावरण मंजुरी प्रमाणपत्र, खनिकर्म योजना आणि उत्पादन यांच्यातील खनिज उत्पादनातील तफावत हा विषय आहे. ज्याप्रमाणे खनिकर्म योजना आणि उत्खननामध्ये फरक होता तर आता या तिन्हीमध्ये फरक आहे. विभागाचे जे परिमाण आलेले आहे त्यामध्ये पर्यावरण योजनेस मंजूर परिमाण आणि खनिकर्म योजनेस मंजूर परिमाण यामध्ये एक्सपेक्टेड काय केले. एकूण १ लाख ९५ हजार ८८८ मेट्रिक टन परिमाण हे पर्यावरण मंजुरीसाठी आहे. प्रत्यक्षात ७,०४,०९३ मेट्रिक टन आणि खनिकर्म योजनेचे ५ लक्ष मेट्रिक टन आहेत. काही ठिकाणी खनिकर्म योजना व पर्यावरण मंजुरीमध्ये मंजूर परिमाणापेक्षा खाण पट्टेधारकाने जास्तीचे उत्खनन केलेले आहे, याबाबत विभागाची काय भूमिका आहे किंवा यामध्ये कोणाला गृहीत धरणार आहात? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये स्पष्ट आहे की, जेवढे पर्यावरण मंजुरीमध्ये मंजूर परिमाण आहे तेवढ्यापर्यंतच त्याला खनिज उत्खननाची प्रक्रिया सीमित ठेवली पाहिजे. त्यापेक्षा जास्त उत्खनन जिथे दिसते तिथे स्पष्टपणे उल्लंघन झालेले आहे, हे मान्य करायला हवे. असे विभागीय सचिवांनी सांगितले. **(विभागाकडून प्राप्त झालेली माहिती विवरणपत्र क्र. २ मध्ये जोडण्यात आलेली आहे.)**

विभाग यावर काय निर्णय करणार आहे? पर्यावरण मंजुरीमध्ये खनिज उत्खननाचे मंजूर परिमाण १,९५,८८८ मे. टन पेक्षा प्रत्यक्ष निर्मित खनिज परिमाण ७,०४,०९३ मे.टन आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, समितीचे म्हणणे बरोबर आहे. विभागाने हे विश्लेषण केल्यानंतर अधिकाऱ्यांना सूचना सुद्धा दिल्या की, हे सर्व मान्य करण्यापेक्षा कोणताही पर्याय नाही. ज्यावेळी ईसी व्हायलेट होते त्यामध्ये एसईआयए यांच्या निदर्शनास आणणे गरजेचे आहे. एकदा निदर्शनास आणल्यानंतर नोटीस काढायची आणि उल्लंघन झाले असेल तर सर्व मायनिंग सस्पेंड करणे क्रमप्राप्त आहे. त्याप्रमाणे सूचना दिलेल्या आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे सर्व पाहण्याची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांची होती त्यांनी काहीही न पाहता उत्खनन होऊ दिले. त्या संदर्भात विभागाने त्यांच्यावर कोणती कारवाई केली? अशी विचारणा समितीने केली असता, प्रक्रिया अशी आहे की, खनिकर्म योजना आयबीएम म्हणजे इंडियन ब्युरो ऑफ माईन्स देते. फक्त ट्रान्सपोर्ट पासेस ॲडव्हान्समध्ये भरून घेण्याची प्रक्रिया होती. ती प्रक्रिया फक्त जिल्हा खनिकर्म अधिकारी करायचे म्हणजे ट्रान्सपोर्ट पास

द्यायचे. दुर्देवाने ते टॅली झालेले नाही. म्हणजे केलेले उत्खनन ई.सी. बरोबर टॅली होते की नाही याकडे लक्ष दिले गेल्याचे दिसत नाही. जास्त मायनिंग झाल्यामुळे त्यांना प्रॉसिक्युशन क्रमप्राप्त आहे. प्रॉसिक्युशनची एजन्सी केंद्र शासनाच्या ईपी ॲक्ट अन्वये पोल्युशन कंट्रोल बोर्ड असल्यामुळे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर प्रॉसिक्युशनची कारवाई पोल्युशन कंट्रोल बोर्ड करते. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Whether there is a provision for prosecution only or prosecution with fine? अशी विचारणा समितीने केली असता, पहिली प्रक्रिया प्रॉसिक्युशनची आहे. ईपी ॲक्ट अन्वये कारवाई होईल. त्या व्यतिरिक्त उत्खनन जास्त केल्यामुळे पर्यावरणाची हानी झाली आहे असे एसईआयला वाटले तर त्या संदर्भात दंडनीय कारवाई करण्याची ईपी ॲक्टमध्ये तरतूद आहे. कारण ई.सी. उल्लंघन केलेले आहे. ईपी ॲक्ट अन्वये डॅमेजेस लेव्ही करण्याची प्रक्रियासुद्धा आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे फक्त तीन खाणीच्याबाबतीत आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाने सर्वचबाबतीत कार्यवाही करायला सांगितले आहे. विभागाने टेस्ट ऑडीट केलेले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ही फक्त सन २०११-२०१२ ची आकडेवारी आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, सन २०१५ नंतर असे प्रकार होणे कठीण आहे. जर काही करायचे असेल तर ते संगनमताने होईल. अगोदर समितीस आयएलएमएसबाबत सांगितले. जेवढी मर्यादा आहे त्या मर्यादापेक्षा ट्रान्सपोर्ट पासेस इश्यू होणार नाहीत म्हणून २०१५ नंतर ती शक्यता कमी आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्यांनी काम केलेले आहे त्यांच्याकडे परवाना आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, भाडेपट्टी वैध आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले. भाडेपट्टी वैध असेल तर काम करता येते काय? विभागाने माईन्स सील केल्या की त्यांच्या मशिनरी सील केल्या? अशी विचारणा समितीने केली असता, अजून काही केलेले नाही. त्यावेळी बॉक्साईटचा आंतरराष्ट्रीय दर १३० डॉलर प्रति टन होता. तो आता घसरुन ३० डॉलरवर आलेला आहे. त्यामुळे ते किफायतशीर राहिलेले नाही. माहितीप्रमाणे सध्या खाण बंद आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कारवाई होणार, दंड आकारणार, this is not only applicable to these three mines but also to the other mines in the entire State. असे मत समितीने व्यक्त केले असता, हे फक्त लेखापरिक्षणामध्ये निदर्शनास आले असे विभागीय सचिवांनी सांगितले. पर्यावरण मंजुरीपेक्षा जास्त उत्खनन केले म्हणजे नियमाचे उल्लंघन झालेले आहे. त्यामुळे त्यांच्यावर प्रॉसिक्युशन झालेच पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामध्ये २० टक्के जादा उत्खननाची मुभा दिलेली आहे. समजा एखाद्याला १०० मे.टन पर्यंत उत्खननाची परवानगी असेल आणि १२० मे.टन पर्यंत उत्खनन केले तर ते उल्लंघन धरू नये असे विभागीय सचिवांनी सांगितले.

३६० टक्के जास्त खनिज उत्खनन केलेले आहे असे मत समितीने व्यक्त केले असता. २० हजार ४७२ मे.टन च्या अगेंस्ट २० हजार ६०० मे.टन खनिज उत्खनन केलेले आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले. विभागाने अगोदर प्रॉसिक्युशन केलेले नाही. आता जे प्रॉसिक्युशन करणार आहात ते किती कालावधीत करणार आहात अशी विचारणा समितीने केली असता समिती म्हणते त्याप्रमाणे प्रॉसिक्युशन करावयास पाहिजे होते. परंतु त्यामध्ये स्पष्टता पाहिजे. स्पष्टता आणण्यासाठी परिपत्रक काढण्यास सांगितलेले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाचे परिपत्रक उशिरा निघते म्हणून कारवाई झाली नाही. या सर्व गोष्टींवर लक्ष ठेवणारा अधिकारी जबाबदार आहे. त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे, अजून त्यांच्यावर प्रॉसिक्युशन झालेली नाही. प्रॉसिक्युशन खाण मालकाविरोधात करणार आहात काय? खरे म्हणजे या गोष्टीस अधिकारी जबाबदार आहेत तालुका खनिकर्म अधिकाऱ्यांनी या सर्व बाबी तपासणी करावयास नको काय? असे मत समितीने व्यक्त केले असता, आयबीएमचे अधिकारी सहा महिन्यांनी खाणींची तपासणी करतात. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पर्यावरणाच्या नियमाप्रमाणे काम होत नसेल तर मग पर्यावरण मंजुरीची काय आवश्यकता आहे? असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीचे मत बरोबर आहे. समजा १२ हजार मे.टन. पर्यावरण मंजुरी मिळाली आणि उत्खननाची परवानगी ४ हजार मे.टन असेल तर १२ हजार मे.टन सुधारित पर्यावरण मंजुरी घेण्याची जबाबदारी मालकाची असते. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पर्यावरण मंजुरी आणि खनिकर्म योजना हे दोन वेगवेगळे विषय आहेत. ईसीची आकडेवारी १९० आहे आणि मायनिंग प्लानची १५ लक्ष आहे. ईसीप्रमाणे उत्खनन झाले पाहिजे अशाप्रकारच्या सूचना विभागाने जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांना दिल्या होत्या काय? आपण दोन गोष्टी केल्या. एका बाजूला मायनिंग प्लान केला आणि दुसऱ्या बाजूला पर्यावरण प्लान केला. पर्यावरणाचा प्लान बेनिफीट ऑफ डाऊट करून १५ लाख पकडून चालले, असे चालले आहे. या संदर्भात अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्याची जबाबदारी विभागाची होती. त्याप्रमाणे विभागाने सूचना दिल्या होत्या काय अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सूचना दिल्या नसल्याचे सांगितले.

१ लाख ११ हजार मे.टन ऐवजी ७ लाख ४ हजार मे.टन, ७८ हजार मे.टन ऐवजी १५ लाख २६ हजार मे.टन, १२ हजार मे.टन ऐवजी १ लाख ९५ हजार मे.टन असे उत्खनन करण्यात आले त्याबाबत विभागामध्ये कोणालाच काही माहिती नाही. सचिवांनी सांगितले की, त्यांनी विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर या गोष्टीमध्ये लक्ष घातलेले आहे. हे केवळ बॉक्साईटच्याबाबतीत घडले आहे. त्यावेळचे परिच्छेद लेखापरीक्षक किंवा महालेखाकारांना तपासण्यास सांगावे बॉक्साईटचे प्रकरण हेतुपुरस्सर करण्यात आले आहे. खनिकर्म योजना करताना पर्यावरण विभागाने घातलेला निर्बंध उल्लंघन करण्याचा शासनाला काय अधिकार आहे? खरे म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयात आणि उच्च न्यायालयात उभे केले पाहिजे. पर्यावरण विभागाने सांगितले की, एवढाच माल काढायचा, त्यापेक्षा १० पटीचा वेगळा प्रांत तयार करता. हे कोणत्या आधारावर करता? त्यावेळचे जे कोणी अधिकारी असतील त्यामध्ये मग सचिव असतील, त्यांच्या खालचे अधिकारी असतील, त्यांना जबाबदार धरले पाहिजे. या प्रकरणामध्ये सरकारने एसआयटी नेमून अधिकाऱ्यांची चौकशी केली पाहिजे. हा एक मोठा गैरव्यवहार आहे. तहसीलदार, महसूल विभागाचे अधिकारी, खनिकर्म अधिकारी हे सर्व जबाबदार आहेत कारण त्यांनी यामध्ये लक्ष घातले नाही. पर्यावरण मंजुरीपेक्षा २५९ टक्के जास्त उत्खनन केलेले आहे. तेव्हा या प्रकरणी एसआयटी नेमून खनिकर्म अधिकारी याची चौकशी करावी. या प्रकरणी अजून कोणालाही कारणे दाखवा नोटीस दिलेली नाही. यामध्ये वरिष्ठ पातळीपर्यंतचे अधिकारी सामील असतात. हा ५० लाख किंवा १ कोटी रुपयांचा गैरव्यवहार नसून फार मोठ्या रकमेचा गैरव्यवहार आहे. इतका मोठा गैरव्यवहार झालेला असताना एकाही अधिकाऱ्यास निलंबित केलेले नाही. खनिकर्म अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी, महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली नाही. एका बाजूला शासनाकडून खनिकर्म योजनेला मंजुरी मिळते. दुसऱ्या बाजूने पर्यावरणाच्या योजनेला प्राधान्य आहे. पर्यावरणाच्या मंजुरीप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना खालच्या अधिकाऱ्यांना द्यावयास पाहिजे. खनिकर्म योजनेचे परिमाण उत्खनन केलेल्या परिमाणापेक्षा जास्त आहे हे पाहू नका याची स्पष्टता विभागाने आपल्या स्तरावर निर्गमित केलेली नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून कनिष्ठ स्तरापर्यंतचे सर्व अधिकारी जबाबदार आहेत. तेव्हा आपण फक्त खालच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार हे समजत नाही. विभाग खनिकर्म योजनेला देखील मंजुरी देतो, ई.सी.च्या मान्यतेला देखील गृहीत धरता. तोच मुद्दा बॉक्साईट, लाईम स्टोन आणि कोळशाचा देखील आहे. पण त्यांना बॉक्साईटमध्ये या सर्व गोष्टी आढळून आल्या आहेत. पर्यावरण मंजुरीपेक्षा जास्त उत्खनन केलेले आहे. तेव्हा या प्रकरणी जे कोणी अधिकारी मग ते वरिष्ठ पातळीवरून खालच्या अधिकाऱ्यापर्यंत जे कोणी अधिकारी जबाबदार असतील त्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांच्यावर कारवाई करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्यात सादर करावा. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गोवा राज्यात शाह आयोग नेमला होता. कर्नाटक राज्यामध्येदेखील अशाच प्रकारचा गैरव्यवहार झाला होता. या प्रकरणी शासनाने एक आयोग नेमून या प्रकरणाची तत्काळ चौकशी करावी. विभागाने महालेखाकाराकडून सर्व खाणींची तपासणी करून घ्यावी किंवा किती उत्खनन झालेले आहे आणि ईसीप्रमाणे किती मंजूर होते याची माहिती समितीला द्यावी. दोन दोन योजनेला मंजुरी आहे. कोणती योजना गृहीत धरावी हे स्पष्ट केले नाही आणि हे चुकीचे आहे. खनिकर्म योजनेपेक्षा जास्त उत्खनन करणे हे देखील चुकीचे आहे. त्याप्रकारे येथे देखील चूक झालेली आहे. तेव्हा या प्रकरणी जे कोणी अधिकारी दोषी असतील त्यांना कारणे दाखवा नोटीस इश्यू करून कारवाई प्रस्तावित करावी. आता बॉक्साईटचा दर ३० डॉलर आहे म्हणून ती खाण बंद आहे. विभागाने अजून त्यांचे लायसेन्स सस्पेंड केलेले नाहीत. विभागाने संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणी बॉक्साईट खाणीच्या चार भाडेपट्टया रद्द करण्यात आल्या आहेत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. कोणत्या कारणामुळे रद्द करण्यात आल्या? अशी विचारणा समितीने केली असता खाणकाम न केल्यामुळे बंद केल्या आहेत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

खाण बंद आहे किंवा चालू आहे तो वेगळा भाग आहे. समितीचा मुद्दा इतकाच आहे की, पर्यावरणाच्या नियमाचे उल्लंघन झालेले आहे आणि त्याबाबत कोणतीही बाब गंभीरतेने घेतलेली नाही, कोणावरही कोणतीही कारवाई केली नाही विभागाने राज्यातील बॉक्साईट खाणीसंबंधी आकडेवारी पंधरा दिवसांत समितीला सादर करावी. बॉक्साईट खाणीसंबंधी तपासणी करण्यास महालेखाकारांना विनंती करण्यात येईल. समिती हा परिच्छेद प्रलंबित ठेवला. **(विभागाकडून प्राप्त झालेली माहिती विवरणपत्र क्र. २ मध्ये जोडण्यात आलेली आहे.)**

उक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी विभागीय सचिवांची पुन्हा साक्ष घेतली. खाणकाम पट्टा, पर्यावरण मंजुरी, उत्खनन या तीनमध्ये जी तफावत आहे, त्याबाबतचा हा विषय आहे. यामध्ये विभागीय सचिवांनी सांगितले होते की, यामध्ये पूर्णपणे उल्लंघन झालेले आहे. प्रॉसिक्यूशनची प्रक्रिया पर्यावरण कायद्याप्रमाणे होईल. त्याचप्रमाणे डॅमेजेज क्लियर करण्याची प्रक्रिया ईसी यामध्ये आहे. तसेच हे कोणत्या जिल्ह्यात आहे? अशी विचारण समितीने केली असता, रायगड आणि कोल्हापूर जिल्ह्यात आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले. यामध्ये मायनिंग प्लॅनची परमिसेबल लिमिट आणि इसीची लिमिट वेगळी होती १ लाख ९० हजारच्या विरुद्ध १५ लाख मे. टन उत्खनन केलेले आहे. या सर्व बाबींबद्दल साक्ष सुरू आहे त्यामुळे या विषयावर अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली आहे याबाबत समितीस अवगत करण्यास सूचित केले असता, याबाबत समितीला अहवाल देण्याच्या दृष्टीकोनातून समितीसमोर साक्ष झाल्यानंतर दोन पातळीवर केंद्रीय परवानग्या दिल्या जातात. ५० हेक्टरपेक्षा कमी ज्या माईन्स आहेत त्यासाठी राज्य स्तरावर राज्य शासनाची इम्पॅक्ट असेसमेंट ॲथॉरिटी आहे. यामध्ये कारवाई करण्याचे अधिकारही आहेत. दिनांक १२ सप्टेंबर २०१८ रोजी या दोन्ही यंत्रणाना समितीने सूचित केल्याप्रमाणे कळविलेले आहे. यामध्ये सकृतदर्शनी उल्लंघन झालेले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कारवाई करण्याचे अधिकार केंद्र व राज्य शासन यांना क्षेत्रफळासाठी लागू होतील. ५० हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रफळासाठी केंद्र शासन आणि ५० हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रफळासाठी राज्य सरकार कारवाई करेल. हे विभागाने संबंधितांना कळविल्यानंतर विभागाची काय भूमिका होती ? उत्खनन होताना तेथील अधिकारी, त्याला दिलेले क्षेत्रफळ, त्यांनी दिलेली खनिकर्माचे परिमाण यामध्ये विभागाची काहीही भूमिका नाही, असे म्हणणे आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये १ लाख २५ हजार मे. टनचे मंजुरी दिलेली आहे. पण प्रत्यक्षात त्यांना २० हजार मे. टनचीच पर्यावरण मंजुरी मिळाली आहे. वास्तविक उत्खनन करणाऱ्यानी २० हजार मे. टनपर्यंतच सिमित ठेवायला पाहिजे होते. परंतु मायनिंग प्लॅनमध्ये त्याला जेवढी परवानगी दिलेली आहे तेवढे उत्खनन त्यांनी केलेले आहे. कितीतरी पट त्यांनी उत्खनन केले आहे. यामध्ये मुद्दा एवढाच आहे की, जर ईसीची पातळी खनिकर्म योजनेच्या वर ठेवली तर त्यांनी ईसीचे उल्लंघन केले म्हणून त्यांच्यावर कारवाई करू शकतो. दुर्दैवाने ईसी आणि खनिकर्म योजनेची सुसंगतता राहिलेली नाही. वास्तविक बघायला गेले तर आधी ते खनिकर्म योजना करतात आणि मग पर्यावरण मंजुरीसाठी जातात. पण पर्यावरण मंजुरी देताना कमी दिलेली आहे. तो ईसी मॉनिटराईज करणे गरजेचे होते पण तसे काही घडलेले नाही. संबंधितांना यावर कारवाई करण्यास सांगितले आहे. मग जे काही चुकले आहे त्यावर कोण कारवाई करणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, या विषयाची चौकशी करून समितीसमोर अहवाल सादर करतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समजा मेजरमेंटच्या एरियामध्ये दुप्पटचा फरक असला तरी समजू शकतो की, ते नजरचुकीमुळे दाखवता आले नाही. त्यामुळे यावर तर प्रत्येक दिवसाला मॉनिटरींग पाहिजे. कारण जमिनीची मालकी सरकारची आहे. त्याचे म्हणणे आहे की, तो खनिज काढून विकतो आणि त्याचे त्याला स्वामित्वधन भरायचे आहे. जर नियमीतपणे रॉयल्टी केली असेल तर याला आता दंड लागणार आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये १२ कोटी रुपयांची डिमांड रेज केली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्यांच्या चुकीमुळे एवढे मोठे उत्खनन झाले आहे त्या अधिकाऱ्यांचे दर्जे काय होते आणि यामध्ये कोणाची जबाबदारी होती आणि त्या अधिकाऱ्यांवर विभाग काय कारवाई करणार आहे हे सर्व रेकॉर्डवर आणून द्या. हे काम कोणत्या दर्जाच्या अधिकाऱ्यांनी करायला पाहिजे होते? अशी विचारणा समितीने केली असता, ईसीची मर्यादा किती असावी आणि जिल्हा खनिकर्म योजनेची मर्यादा किती असावी जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्याने हे निरीक्षण करायला पाहिजे होते पण हे सकृतदर्शनी झालेले नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे सर्व बघण्याची जबाबदारी कोणावर होती आणि विभाग त्यांच्यावर काय कारवाई करणार आहे, अशी विचारणा समितीने केली असता, समितीला आश्वासित केल्याप्रमाणे या विषयावर त्यांचा खुलासा मागवतच आहोत. खुलासा आल्यानंतर त्यावर कारवाई करू असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखाकारांनी एवढा अभ्यास करून हा परिच्छेद आणला आहे त्यासाठी साक्षीला आला आहात. लोकलेखा समितीने खुलासा कधी मागणार असे विचारल्यानंतर चौकशी करणार आहात. हा प्रश्न जेव्हा अहवालामध्ये आला आणि विधानसभेच्या पटलावर ते स्टेबल झाले तेव्हाच विभागाने काम सुरू करायला पाहिजे होते. समितीचे म्हणणे तेच आहे की, जे अधिकारी समितीला जबाबदार आहेत त्यांच्यावर जर कारवाई केली नाही तर ते खालच्या पातळीवर का कारवाई करणार आहेत ? ५० हेक्टरच्या वर आणि ५० हेक्टरच्या खाली असा जो निकष विभागाने ठेवलेला आहे तो समितीला मान्य आहे. पण खालच्या स्तरावरील लोकांनी काळजी घ्यायला पाहिजे होती. आता त्याचे मॉनिटरींग करून त्याचे काही प्रॉफिट मिळणारच नाही, असे विभागाने सांगितले आहे. अशावेळी जो EC Plan किंवा खनिकर्म योजना बनवितो त्याचे तंतोतंत पालन करणे सुद्धा बंधनकारक आहे. आपण जर झपाटयाने पासेस देत असू तर पर्यावरणीय प्लॅनची काय गरज आहे? किंवा खनिकर्म योजनेची काय गरज आहे ? खनिकर्म योजनेची परवा न करता कुठेतरी ते ही जास्त घेतले आहे. एकूण १५ लाख मे. टन एवढे खाणकाम केले आहे. खनिकर्म योजना व ईसीचे पण उल्लंघन झाले आहे तरी पण विभागाने काहीच कारवाई केली नाही. ५ वर्षांनंतर म्हणजे लोकलेखा समितीची बैठक झाल्यानंतर तरी एक महिन्यामध्ये काय अडचण झाली हे विभाग समितीला सांगतच नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, सर्वांना एक परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. त्याची प्रत समितीला सादर करतो. दूसरे असे की, या संदर्भात राज्य व केंद्र पातळीवरील समितीला कळवायचे होते ते ही कळवलेले आहे. सेक्शन ५ विरुद्ध त्यांच्या विरुद्ध प्रॉसिक्युशन करणे गरजेचे आहे. स्वामित्वधन व्यतिरिक्त त्यांनी जे खनिकर्म केले त्याची वसूली करण्यासाठी सेक्शन २१ (५) अंतर्गत १२.५ कोटी रुपये मागणी देखील रेज केली आहेत. ही मागणी देखील अंतिम होईल. या विषयामध्ये जबाबदारी निश्चित करणे आणि कोणत्या पार्श्वभूमीवर त्यांनी उत्खनन केले, याची कार्यवाही एक महिन्यामध्ये पूर्ण करू असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मागच्या बैठकीमध्ये एक महिन्याची मुदत दिली होती. आज रायगड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात खाणकाम तसेच विकास होतो. यामध्ये मूळ पर्यावरणाकडे हा विषय पाठवण्याची गरज नाही. कारण त्यात पर्यावरणाचा विषय घेतला तर १० किंवा २० लाख रुपयांची परवानगी दिली तरी त्यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी खनिकर्म अधिकाऱ्याची आहे. या ठिकाणचा तलाठी, मंडळ अधिकारी, तहसिलदार आणि प्रांत अधिकारी यांना त्यात सहभागी करणार नाही काय ? म्हणजे खनिकर्म अधिकारी काय काय बघतील कारण खनिकर्म अधिकाऱ्याला सह्या आणि बाकीची कामे करण्यासाठीच वेळ जातो. महसूल विभागामध्ये तूमची काही स्वतंत्र यंत्रणा नाही. त्यावर विभाग काय कारवाई करणार आहे, आज राज्यामध्ये

भरतशेठ कंपनीच्या दुसऱ्या खाणी सुरू आहेत. त्यांना तुम्ही थांबवले आहे काय ? या खाणकामाचा १२ कोटी रुपये हेड आहे त्यांच्या मालमत्तेवर आपण आज अटॅचमेंट ठेवली आहे काय ? ही अटॅचमेंट तुम्ही ठेवलेली नाही. याचे सॅटेलाईट हे महालेखापालाला तांत्रिक माहिती आहे असे वाटत नाही कारण ते अधिकृत आकडेवारीने सांगितले आहे. श्रीवर्धन तालुक्यातील सर्व खाणकामाची सॅटेलाईट पाहणी करून त्याचा अहवाल समितीसमोर ठेवा. मागच्या बैठकीच्या वेळी पूर्ण राज्याची माहिती द्या असे म्हटले होते कारण समितीला महालेखाकारांकडून याची पूर्ण बैठक करून घ्यायची आहे. विभागाने राज्यातील बॉक्साईट खाणीची आकडेवारी १५ दिवसांत समितीला सादर करावी. मग महालेखाकारांकडून याची तपासणी करून घेऊ. असे समितीने या परिच्छेदाच्या शेवटी म्हटले होते पण विभागाकडून ती माहिती अप्राप्त आहे. पूर्ण राज्याची माहिती मागितली होती पण सन्माननीय सदस्य यांनी तर जिल्ह्याची माहिती मागितली आहे. खाणकाम किती केले, ईसी किती केले आणि खनिकर्म योजना किती केले याबाबत समितीला अवगत करण्यास सूचित केले असता, ही सर्व माहिती जमा करणे सुरू आहे. दोन जिल्ह्याची माहिती संकलित झाली आहे. ती माहिती समितीला सादर करतो. सन्माननीय सदस्य यांनी सॅटेलाईल इमॅजरीचा जो उल्लेख केला ते करण्यास काही हरकत नाही. १२.५ कोटी रुपयाची जी मागणी रेज केली ती अजून अंतिम व्हायची आहे. जर त्यांनी हे पैसे भरले नाही तर समितीने सांगितल्याप्रमाणे कारवाई होईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे बेकायदेशीर खाणकाम आहे हे विभाग सुरूवातीला मान्यच करीत नव्हते. यासाठी त्यांनी बैठकीमध्ये वाद पण केला होता. कायदेशीर मत आल्यानंतर ते हे मान्य करीत आहेत. बेकायदा खाणकाम मध्ये कायदेशीर मताप्रमाणे काय केले पाहिजे तर It is not a matter of thousands or lakhs rupees but it is matter of crores of rupees. आधी बेकायदा खाणकामाच्या विरोधात फौजदारी प्रक्रिया पूर्ण केली पाहिजे. कारण त्यांनी एक गुन्हा केला आहे. त्यामुळे महालेखाकारांचे मत हे दूरच आहे पण कंत्राटदारांनी केलेले हे बेकायदा खाणकामाविरोधात फौजदारी गुन्हा कधी दाखल करणार आहात ? यामध्ये जो कंत्राटदार असेल किंवा ज्याने हा गुन्हा केला ती व्यक्ती असेल तसेच यामध्ये निरीक्षण करणारे जे जबाबदार आहेत त्यांच्यावर अजून कारवाई सुरूच केली नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाने एसीआयला जे पत्र दिलेले आहे ते प्रॉसिक्युशनचे आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यामध्ये जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. पूर्ण राज्यामध्ये याची तपासणी झाली पाहिजे. एक महिन्याच्या आत ही प्रक्रिया करा. असे मत समितीने व्यक्त केले असता, ही माहिती उपलब्ध करण्याची प्रक्रिया आधीच सुरू झालेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

असे जर उल्ल्घंन होत असेल तर कारवाई केलीच पाहिजे. वसुली बद्दल देखील if they go to court and obtain stay, then you should also file a caveat. कारण दहा वेळा रॉयल्टी दिली आहे त्यामध्ये सिडकोला पण एक रॉयल्टी दिली आहे तीच रॉयल्टी परत विमानतळाला दिली आणि पुन्हा तीच रॉयल्टी जेएनपीटीला दिली. असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये गैरव्यवहार झाला आहे याबाबत दुमत असण्याचे काही कारण नाही. मुद्दा एवढाच आहे की, आज आपण ज्या मायनिंगवर चर्चा करीत आहोत ते बॉक्साईट म्हणजे मेजर मिनरलचे आहे. सन्माननीय सदस्य ज्या बाबीचा उल्लेख करीत आहेत ते कदाचित मायनर मिनरलचे असावे आपल्या व्याख्येमध्ये मायनरमध्ये दगड हा सोन्याचा असला तरी माती, खडे यांना आपण मायनर मिनरल म्हणतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याची कार्यवाही आयबीएम करतील का मायनिंग ऑफिसर करतील? अशी विचारणा समितीने केली असता मायनिंग ऑफिसरच याची कार्यवाही करतील. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

लिगल ओपिनियनमध्ये आपण जो रेफरन्स दिला आहे तो त्या त्या सेक्शनप्रमाणे आला आहे की मायनिंगच्या कायद्याप्रमाणे आला आहे. जर तो रेफरन्स आयबीएम प्रमाणे आला असेल तर त्यावर त्याप्रमाणेच कार्यवाही केली पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये सामान्य ओपिनियन असे होते की, हे जर प्लॅनमध्ये असते आणि तो प्लॅन बंद केला तर ते इलिगल ठरवता येत नाही फक्त त्याची रॉयल्टी रिकव्हर करावी. त्याची परवानगीच घेतली नसेल तर त्याला इलिगल ठरवायचे आणि मग त्याच्याकडून व्हॅल्यू ऑफ मिनरल रिकव्हर करायचे..... या प्रकरणामध्ये विधी व न्याय विभागाने स्पष्ट मत दिले की, या प्लॅनच्या बाहेर थोडे जरी उत्खनन त्यांनी केले असेल तर जेवढे त्यांनी प्लॅनच्या बाहेर उत्खनन केले ते सर्व इलिगल ठरवावे आणि त्याची व्हॅल्यू त्याच्याकडून रिकव्हर करावी. ती प्रक्रिया आता सुरू केलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एक्सेस क्वांटीटी पण ही इलिगल मायनिंग आहे. १ लाख ९० हजारच्या विरुद्ध १५ लाख रुपये मायनिंग झालेली आहे तर आपल्याला त्यावर पेनॉल्टी वसूल केली पाहिजे असे समितीने सूचित केले असता, त्याप्रमाणे वसुली करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आजपासून जर पेनॉल्टी लावली तर आजपासून आपण व्याज घेऊ शकतो मागचे व्याज घेऊ शकत नाही. या संदर्भात लक्ष ठेवण्याची आवश्यकता ही आहे की, आज निर्णय दिला असेल तरी जेव्हा उत्खनन झाले होते तेव्हाचे बॉक्साईटचे तत्कालीन रेटप्रमाणे पेनॉल्टी लागेल. कारण आज बॉक्साईटचे रेट खूप कमी आहेत. असे मत समितीने व्यक्त केले असता, त्यावेळी रेटचा शेड्युल ठरला त्याप्रमाणे वसुली होईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याच विषयाला धरुन पूर्ण राज्याची "excess quantity in respect to environment clearance and mining plan" याची तफावत बघा. त्याच धरतीवर रायगड जिल्ह्यात श्रीवर्धनच्या माध्यमातून जे काही लक्षात आले त्याच धरतीवर पूर्ण राज्यात कार्यवाही करण्याची विभागाची भूमिका असली पाहिजे. दिनांक ०१ नोव्हेंबर २०१८ पर्यंत या सर्व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला द्यावी असे समितीने सूचित केले असता, माहिती सादर करतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक ७.२.२.४ पर्यावरण मंजुरी रद्द करण्यात विलंब :-

४.५ खाण मालक, वन विभाग, महसूल विभाग आणि एमपीसीबीच्या अधिकाऱ्यांनी संगनमताने बनावट कागदपत्रे तयार केली. राष्ट्रीय उद्यानाच्या एक कि.मी. पर्यंत कोणत्याही खनिकर्म प्रक्रियेची अनुमती देण्यात येऊ नये असे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असताना येथे राष्ट्रीय उद्यान आणि भाडेपट्टा क्षेत्रातील अंतर १० कि.मी.पेक्षा जास्त असल्याचे नमूद करून उत्खनन करण्यात आले. परंतु हे अंतर एक कि.मी.पेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आल्यानंतर हे उत्खनन अवैध ठरविण्यात आले. त्या संदर्भात फक्त नियमित स्वामित्वधन भरलेले आहे. संबंधितांना दंड का आकारण्यात आलेला नाही ? लेखी उत्तरामध्ये नमूद केले आहे की, उत्खनन केलेल्या खनिजाचे स्वामित्वधन जमा केले असल्यामुळे दंड व शास्ती लादण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्यांनी बनावट कागदपत्रे केली असताना त्यांना शिक्षा नाही ? त्यांनी पर्यावरण नियमाचे पूर्णपणे उल्लंघन केलेले आहे त्यामुळे त्यांच्यावर कोणतीही कारवाई न करणे योग्य नाही. ज्या वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी बनावट कागदपत्रे केली त्यांच्यावर गुन्हे का दाखल करण्यात आले नाहीत अनधिकृत काम झाले म्हणून मागील सात-आठ वर्षात या खाणी बंद केलेल्या आहेत. सात वर्षात काढलेले बॉक्साईट वैध ठरविले आहे. विभागाने त्यांच्याकडून दंड आकारलेला नाही असे मत समितीने व्यक्त केले असता. विभाग समितीच्या मताशी सहमत आहे. विभाग त्यांच्याविरुद्ध प्रॉसिक्युशन प्रस्तावित करणार आहे. केवळ स्वामित्वधन वसूल न करता ते उत्खनन केलेले आहे त्याची सर्व किंमत वसूल करावी असा अभिप्राय विधी व न्याय विभागाकडून आलेला आहे. त्याप्रमाणे कारवाई करीत आहोत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

बनावट दस्तऐवज तयार करण्यात आलेले आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता ही बाब प्रोसिक्युशनमध्ये येईल. दिनांक १४ मे २००४ रोजी चांदोली राष्ट्रीय उद्यान घोषित झाले होते. परंतु या उद्यानाला सन २००६ ला ई.सी. (इन्व्हाअरमेंट क्लिअरन्स) मिळाले आहे. म्हणजेच राष्ट्रीय उद्यानाला उद्यान घोषित झाल्यानंतर त्याला ई.सी. मिळालेली आहे. यामध्ये मिस प्रेझेंटेशन करून ई.सी. मिळविलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. खाणकामासाठी कधी मंजूरी देण्यात आलेली आहे ? अशी विचारणा केली असता, मे. स्वाती मिनरल्सला मे, १९९७ ला मंजुरी देण्यात आली आणि मे. गायकवाड यांना दिनांक १६ ऑक्टोबर १९९९ मध्ये मंजुरी मिळालेली आहे. परंतु राष्ट्रीय उद्यान घोषित झाल्यानंतर ई.सी. मिळालेली आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यावेळी असे सांगितले होते की, राष्ट्रीय उद्यानाच्या दहा किलोमीटरच्या आत या खाणी नाहीत. असे समितीने निदर्शनास आणले असता, केंद्र शासनाच्या समितीच्या निदर्शनास ज्यावेळी ही बाब लक्षात आली त्यानंतर हा प्रकल्प त्यांनी रद्द केला होता. परंतु त्यांच्या विरोधात प्रॉसिक्युशन करणे, पिनल दराने वसुली करणे राहिलेले होते असे विभागीय सचिवांनी सांगितले. सदर बाब केव्हा निदर्शनास आली होती ? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१३ ला ही बाब निदर्शनास आली होती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यानंतर खाणकाम केव्हा रद्द करण्यात आले होते ? सन २००६ ते सन २०१३ पर्यंत त्या ठिकाणी उत्खनन सुरू होते, त्यांना पासेस इश्यू केले जात होते. खाणकामासाठी परवानगी देण्यात येत होती. त्यानंतर याबाबत एका व्यक्तीने याबाबतची माहिती मिळविल्यानंतर या प्रकरणाची चौकशी झाली होती. त्यावेळी १.० हे दहा किलोमिटर नाही, असे सांगितले होते. अशा प्रकारे सहा ते सात वर्षे उत्खनन सुरू होते. या ठिकाणी ८०० ते १६०० मीटर उत्खनन करण्यात आलेले आहे, असे नमूद करण्यात आलेले आहे. सन २०१३ पर्यंत उत्खनन सुरू होते. त्यानंतर ते बंद करण्यात आले. विभागाने दिलेल्या अभिप्रायामध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की, बनावट कागदपत्रे तयार करून करण्यात आलेले प्रत्येक खाणकाम हे अवैध मानन्यात यावेत. म्हणून एम.एम.डी.आर. अधिनियमांच्या कलम २१ (५) अंतर्गत खनिजांचे मुल्य स्वामित्वधनासाह वसूल करणे आवश्यक आहे. याबाबत करण्यात आलेल्या कारवाईची माहिती लोकलेखा समितीला सादर करावी. त्या कालावधीमध्ये बोगस कागदपत्रे सादर करून किती उत्खनन केलेले आहे, त्याचे किती मुल्यमापन झालेले आहे, याच्या मोजमापासह आतापर्यंत विभागाने अशा प्रकारच्या नोटीस दिलेल्या नाहीत. यासाठी विभागाने विधि व न्याय विभागाकडे सन २०१४ ला कायदेशीर मत मागविलेले आहे. तसेच सन २०१४ पर्यंत कायदेशीर मत विभागाला प्राप्त झाले नसेल तर कायदेशीर मतासाठी विभागाने विधि व न्याय विभागाकडे केव्हा प्रस्ताव पाठविलेला होता ? अशी विचारणा समितीने केली असता, मागील बैठकीच्यावेळी विधि व न्याय विभागाचे मत मागविलेले होते असे विभागीय सचिवांनी सांगितले. **(विभागाकडून प्राप्त झालेली माहिती विवरणपत्र क्र. २ मध्ये जोडण्यात आलेली आहे.)**

याचा अर्थ सन २०१३ पासून याबाबत विभागाने कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे समितीचे असे मत आहे की, यामध्ये जे अधिकारी दोषी असतील त्यांना निलंबित केले पाहिजे. तरच या समितीच्या साक्षीला महत्त्व प्राप्त होईल. यामध्ये हेतूपुरस्सर संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित केले पाहिजे. सन २०१३ पासून या प्रकरणाबाबत विभागाने गुन्हा देखील दाखल केलेला नाही. असे जर होत असेल तर समितीचे स्पष्ट मत आहे

की, दोषी अधिकाऱ्यांना निलंबित केले पाहिजे. अन्यथा या समितीला कोणत्याही प्रकारचा अर्थ भविष्यकाळामध्ये राहणार नाही. या प्रकरणामध्ये कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार होत आहे. या सर्व प्रकरणामध्ये बनावट दस्तऐवज तयार करण्यात आलेले आहेत. सन २०१३ ते सन २०१८ पर्यंत म्हणजेच आजच्या तारखेपर्यंत याबाबत कोणत्याही प्रकारची कारवाई विभागामार्फत करण्यात आलेली नाही. त्यामुळे ही बाब अतिशय गंभीर आहे. त्याचप्रमाणे सन २०१४-१५ मध्ये महालेखापालांनी याबाबत आक्षेप उपस्थित केले होते. त्याचप्रमाणे सभागृहामध्ये देखील याबाबत अहवाल मांडण्यात आला होता. त्यानंतरही विभागाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतलेली नाही. त्यामुळे ही बाब अतिशय गंभीर आहे. सन २०१३ ला खाणकाम बंद करण्यात आलेले आहे. परंतु पाच वर्षे आता या प्रकरणाला होत आहेत. त्यामुळे प्रॉसिक्युशनला कोणत्याही प्रकारचे महत्त्व राहणार नाही. या प्रकरणाशी संबंधित असलेले अनेक अधिकारी, कर्मचारी पाच वर्षाच्या कालावधीमध्ये सेवानिवृत्त झालेले असतील. पाच वर्षापर्यंत विभागाने कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही. Nobody had taken cognizance of the Report of the A.G. विभागाने खाणकाम पट्टयासाठी विधि व न्याय विभागाकडे मत मागितले होते. परंतु या ठिकाणी आता सांगण्यात आले आहे की, नियम ३१(५) प्रमाणे शास्ती घेण्यात येईल. परंतु हा नियम येथे लागू होणार नाही. यामध्ये खाणकामाचा आराखडा तेवढाच होता. सन २०१३ ला संबंधितांविरोधात पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करावयास हवा होता. या विभागामध्ये या प्रकरणाशी संबंधित असलेल्या सचिवांना कोण जबाबदार धरणार ? याबाबतची जबाबदारी विभाग प्रमुखांची असते. यामध्ये जेवढे वरिष्ठ सनदी अधिकारी यांनी या प्रकरणाचा कार्यभार घेतला होता, त्यांची देखील चौकशी करण्यात यावी. या सर्व प्रकरणामध्ये वन विभागाचे अधिकारी, महसूल विभागाचे अधिकारी, एम.पी.सी.बी. या सर्व अधिकाऱ्यांनी बनावट दस्ताऐवज तयार केले. यामध्ये सन १९९७ पासून खाणकाम सुरू आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, सन २००६ ला ई.सी. मिळाली होती. त्यावेळी जे सादरीकरण करण्यात आले होते त्यामध्ये खाणकाम हे दहा किलोमीटरच्या बाहेर आहे, असे भासविले होते. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या प्रकरणामध्ये विभागाने दखल घ्यावयास हवी होती. असे असेल तर समितीने काय भूमिका घ्यावी. You should come before this Committee with an action taken in this subject matter. विभागाने या प्रकरणाबाबत कार्यवाही करून समितीच्या साक्षीसाठी उपस्थित राहिले पाहिजे. २६ लाख टन वजनाचे बॉक्साईट आहे. यावर अनधिकृत खाणकामाचा जो दंड आकारला जातो त्याची रक्कम काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, ३६ कोटी रुपयांची ही रक्कम आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या ३६ कोटी रुपयांच्या अगेन्स्ट किती रुपये दंड आकारला जातो ? ३६ कोटी रुपयांची रक्कम ही दंड नाही. ते केवळ स्वामित्वधन आहे. विभागाने खाणकाम करणाऱ्यांना कोणत्याही प्रकारचा दंड आकारलेला नाही. यामध्ये जवळपास पाचशे ते हजार कोटी रुपयांचे बॉक्साईट हे खनिज असेल २६ लाख टनाच्या बॉक्साईटला जर दंडाच्या पटीमध्ये मोजले तर ती रक्कम खूप जास्त होते. असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये केलेली कारवाई आणि सूचना अधिकाऱ्यांना देतो असे विभागीय सचिवांनी सांगितले. ३२ कोटी रुपयांची रक्कम ही दंड न आकारता आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी होय असे सांगितले.

दंडासह अंदाजे किती रक्कम होईल ? अशी विचारणा समितीने केली असता जवळपास १५० कोटी रुपये दंडाची रक्कम जमा होऊ शकते असे विभागीय सचिवांनी सांगितले. झालेले खाणकाम अवैध समजून यासाठी जी काही तरतूद असेल त्याप्रमाणे वसुलीची कारवाई केली पाहिजे. त्याचप्रमाणे या प्रकरणाची सर्व अधिकाऱ्यांवर जबाबदारी निर्धारित करण्यात यावी. यामध्ये दोषी अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्याची आवश्यकता राहणार नाही. कारण हे सर्व प्रकरण अतिशय स्पष्ट आहे. या सर्व प्रकरणासाठी गुन्हा दाखल करण्यात येणार काय ?अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणामध्ये ई.सी. चे उल्लंघन झालेले आहे. पर्यावरण संरक्षण कायद्यान्वये संबंधितांवर कारवाई करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे अधिकाऱ्यांची जबाबदारी चौकशीमध्ये निष्पन्न होईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अधिकाऱ्यांनी बनावट दस्ताऐवज दाखल केलेले आहेत. राष्ट्रीय अभयारण्यापासून दहा किलोमीटरच्या बाहेर ही खाण आहे, हे वन विभागाने मान्य करून तशा प्रकारचे प्रमाणपत्र दिलेले आहे. सदरहू परिसर हा दहा किलोमीटरच्या बाहेर आहे, अशा प्रकारची खोटी माहिती देण्यात आलेली आहे. यामध्ये कारणे दाखवा नोटीसमध्ये कळेल. बनावट दस्ताऐवज जर अधिकाऱ्यांनी किंवा कंपनीने केले असेल तर ते त्यामध्ये दिसून येईल. या सर्व प्रकरणामध्ये अधिकारी देखील सामील आहेत. सचिवांनी सांगितले की, कंपनीने बनावट दस्ताऐवज दाखल केलेले आहेत. त्यांच्यावर एफआयआर दाखल करण्यात येईल. परंतु या काळामधील जे अधिकारी आहेत त्यांनी चुकीचे काम केलेले आहे, ही बाब अतिशय स्पष्टपणे दिसून येत आहे. कंपनी काहीही कागदपत्रे तयार करेल. परंतु ते तपासण्याची जबाबदारी ही शासनाची आणि संबंधित अधिकाऱ्यांची आहे. राष्ट्रीय अभयारण्यापासून दहा किलोमिटरच्या बाहेर सदरहू खाण आहे, असे प्रमाणपत्र वन विभागाकडून देण्यात येतात. तसेच, यामध्ये बनावट दस्ताऐवज दिलेले आहेत, असे नमूद करण्यात आलेले आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल तपासणी करण्यात यावी. त्याचप्रमाणे ज्या कोणत्या अधिकाऱ्यांनी बनावट एन.ओ.सी. दिली असेल त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. जे जे अधिकारी या प्रकरणामध्ये समाविष्ट आहेत त्या सर्व अधिकाऱ्यांवर कारवाई आणि एफ.आय.आर.दाखल करून कारवाई झाली पाहिजे. दुसरे असे की, सन २०१३ मध्ये हा विषय निदर्शनास आल्यानंतर

या प्रकरणाबाबत ज्या अधिकाऱ्यांनी केवळ नियमित स्वामित्वधन घेऊन पुढील कोणतीही कारवाई न करणे आणि या सर्व प्रकरणावर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई न होणे याबाबत समितीच्या सर्व सदस्यांनी अतिशय गंभीर मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यामुळे जबाबदार असलेल्या सर्व संबंधितांवर पुढील पंधरा दिवसांच्या आत कारवाई प्रस्तावित करून त्याची माहिती समितीला देण्यात यावी. तसेच, परिच्छेद क्रमांक ७.२.३ हा प्रलंबित ठेवण्यात येत आहे. त्याचप्रमाणे परिच्छेद क्रमांक ७.२.४ बाबत प्रस्तावित करण्यात आलेल्या कारवाईची माहिती समितीला देण्यात यावी. उद्योग, खनिकर्म विभागाची पुढील बैठक दिनांक १८ सप्टेंबर २०१८ नंतर घेण्यात येईल. पुढील बैठकीच्या वेळी वन विभागाच्या सचिवांना समितीच्या बैठकीसाठी उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात यावे.

उक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी विभागीय सचिवांची पुन्हा साक्ष घेतली. कोल्हापूर जिल्हयातील वन विभागाचा हा विषय आहे. राष्ट्रीय उद्यानाच्या १० कि.मी. क्षेत्राच्या बाहेर खनिज उत्खनन करण्यात आले अशा प्रकारचे प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. हे उत्खनन राष्ट्रीय उद्यानाच्या आतमध्ये केलेले आहे असे नंतर निदर्शनास आले. परंतु त्या संदर्भात कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. फक्त स्वामित्वधनाची रक्कम रु. ३६ कोटी १० लाख शासन खाती जमा करण्यात आली आहे. सदरचे उत्खनन राष्ट्रीय उद्यानाच्या १० कि.मी.च्या परिसराबाहेर आहे असे प्रमाणपत्र वन विभागाने दिलेले आहे. त्यामुळे या संदर्भात तत्कालीन वन विभागाच्या अधिकाऱ्यांची भूमिका संशयातीत आहे. या प्रकरणाची सत्यता काय आहे हे सांगावे असे समितीने सूचित केले असता, बैठकीला सीसीएफ, कोल्हापूर आणि डीसीएफ, कोल्हापूर हे देखील उपस्थित आहेत. या संदर्भातील सर्व रेकॉर्ड तपासलेले आहे. त्यावरुन असे दिसते की, मे. गायकवाड आणि मे. स्वाती मिनरल्स या दोन खाणपट्टाधारकांना खाणपट्टे १० कि.मी. च्या बाहेर आहे असे कोणतेही प्रमाणपत्र वन विभागाकडून देण्यात आलेले नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

फौजदारी प्रक्रिया संहितेप्रमाणे बनावट दस्तावेज सादर केल्यामुळे त्यांच्यावर कारवाई होऊ शकते. वन विभागाने प्रमाणपत्र दिलेले नाही हा एक विषय झाला. दुसरा विषय म्हणजे राष्ट्रीय उद्यानाच्या परिसरात खनिज उत्खनन सुरू असताना वन विभागाचे अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले काय ? विभागाच्या अभयारण्यामध्ये खनिज उत्खनन सुरू असेल तर ते संगनमताने सुरू होते काय ? खनिज उत्खननास वन विभागाचे अधिकारी जबाबदार नाहीत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, सदरचे खनिज उत्खनन वन जमिनीवर करण्यात आलेले नाही किंवा ते अभयारण्याच्या आतमध्ये करण्यात आलेले नाही. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने सांगितले की, खनिज उत्खनन वन जमिनीवर करण्यात आलेले नाही. मग वन विभागाच्या प्रमाणपत्राची आवश्यकता का होती ? असे मत समितीने व्यक्त केले असता, या बाबत सांगू इच्छितो की, वन विभागाचे सचिव जे सांगत आहेत ते योग्य आहे. केंद्र शासनाचे बंधन आहे की, व्याघ्र प्रकल्पाच्या काही परिसराच्या आतमध्ये उत्खनन करु नये असे विभागीय सचिवांनी सांगितले.

राष्ट्रीय उद्यानाच्या १० कि.मी.च्या आत उत्खनन करु नये असा नियम आहे. सदरचे उत्खनन १० कि.मी. आत करण्यात आलेले नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत नमूद करु इच्छितो की, त्यात दोन खाणपट्टे १० कि.मी.च्या आत आहेत त्या सीमेपासून ८०० ते १६०० मीटरमध्ये आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रामध्ये असे नमूद केले आहे की, The lesee in their documents submitted for obtaining environment clearance to the Ministry of Environment and Forest had mentioned that the distance between the national park and the mining area is more than 10 Kms. असे समितीने निदर्शनास आणले असता, यामध्ये असे झाल्याची शक्यता आहे की, पर्यावरण विषयक क्लीअरन्स समितीसमोर सादर करताना त्यांच्या पातळीवर ती माहिती दिलेली आहे. वन विभागाकडून कोणत्याही प्रकारची माहिती देण्यात आलेली नाही.असे विभागीय सचिवांनी सांगितले.

नियमाप्रमाणे हे राष्ट्रीय उद्यानाच्या १० कि.मी. दूर अंतरावर असावे? अशी विचारणा समितीने केली असता, पर्यावरण मंजुरीच्या अनुषंगाने ते आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. अभयारण्याच्या ८०० मीटरच्या अंतरावर खनिज उत्खनन सुरू असेल तर खाणपट्टाधारकांवर कारवाई करणे अपेक्षित नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता, वन विभागाच्या जमिनीवर खनिज उत्खनन होत असेल तर वन विभागाचे अधिकारी त्याची दखल घेतातच. सदरचे क्षेत्र हे वन क्षेत्राबाहेरील आहे परंतु १० कि.मी.च्या आत आहे. ते वन क्षेत्र नसल्यामुळे कारवाई करण्यात आलेली नाही. असे विभागीय सचिवांनी सांगितले. नंतर ते काम बंद का झाले ? अशी विचारणा समितीने केली असता, ही बाब पर्यावरण व वन मंत्रालयाच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी खाणपट्टा रद्द केला. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

इतक्या गंभीर विषयाच्या बाबतीत वन विभागाचे अधिकारी जागरुक राहिलेले नाहीत. दिल्लीतील पर्यावरण व वन मंत्रालयास तक्रार आल्यानंतर त्या विभागाने कारवाई केली. परंतु अशा प्रकारे उल्लंघन होत असेल तर त्यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी वन विभागाची आहे. राष्ट्रीय उद्यानापासून १० कि.मी.च्या आत कोणत्याही प्रकारचे उत्खनन करु नये असा नियम आहे. या नियमाचे तंतोतंत पालन करण्याची जबाबदारी

वन विभागाच्या अधिकाऱ्यांची आहे आणि त्याबाबतत वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही हे स्पष्टपणे दिसते असे मत समितीने व्यक्त केले असता याबाबत सांगू इच्छितो की, अशाप्रकारचे खनिज उत्खनन सुरू आहे असे पत्र तत्कालीन मुख्य वन संरक्षक यांनी दिनांक २८ मार्च, २००५ रोजी तत्कालीन जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना पाठविले होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे उत्खनन दिनांक ७ मे, १९९७ पासून सुरू आहे हे वन विभागास माहीत होते आणि वन विभागाने दिनांक २८ मार्च, २००५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयास कळविले. त्यापूर्वी आठ वर्षापासून वन विभागाकडून कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही ही देखील वस्तुस्थिती आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, खनिज उत्खननासाठी परवानगी देण्यात येते त्यावेळी स्पष्टपणे म्हटलेले होते की, खाणकाम खाणकामाचे प्रत्यक्ष एक्झीक्युशन संदर्भात पर्यावरण मंजुरी आणि अन्य आवश्यक परवाने घेतल्यानंतरच उत्खनन करता येईल असा अर्टीमध्ये उल्लेख होता. अर्टीमध्ये असेही म्हटले होते की, मे.स्वाती मिनरल्स यांना दिनांक ६.५.१९९७ रोजी आणि मे. गायकवाड यांना दिनांक १६.१०.१९९९ रोजी परवानगी दिली असली तरी जोपर्यंत आवश्यक परवाने मिळत नाहीत तोपर्यंत खनिज उत्खनन सुरू करता येणार नाही. तरी देखील द्वत्यांनी खनिज उत्खनन सुरू केले होते. सन २००५ मध्ये ही बाब निदर्शनास आल्यानंतर त्यांना तसे कळविण्यात आले आणि जो ई.सी. क्लिअरन्स आहे तो बोगस रिप्रेझेन्ट करण्यात आला तो २००६ मध्ये झालेला आहे, ही वस्तुस्थिती आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले,

सन २००५ मध्ये हे प्रकरण निदर्शनास आले आणि पर्यावरण मंजुरी सन २००६ मध्ये प्राप्त झाली असे मत समितीने व्यक्त केले असता, वन विभागाचे कोणतेही प्रमाणपत्र नसताना त्यांच्या पातळीवर ते रिप्रेझेन्टेशन करण्यात आले असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सनन २०१३ पर्यंत उत्खनन चालू होते. वन विभाग अधिकाऱ्यांच्या ही बाब लक्षात आल्यानंतरही त्यांना कोणतीही कारवाई करणे योग्य वाटले नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता, खाणपट्टाधारकांनी पर्यावरण मंजुरी मिळविलेली होती. वन विभागाकडून कोणतेही प्रमाणपत्र देण्यात आलेले नसताना त्यांनी पर्यावरण मंजुरी कोणत्या आधारे मिळविली हे विभागाला माहीत नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

वन विभागाने प्रमाणपत्र दिलेले नसताना पर्यावरण मंजुरी मिळविलेली आहे असे संबंधित विभागाला कळविले होते काय ? सन १९९९ पासून उत्खननाचे काम सुरू होते. मग मागील सहा वर्षे वन विभागाचे अधिकारी काहीच का बोलले नाहीत ? श्री. पवार कोण आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, ते तत्कालीन जिल्हाधिकारी, कोल्हापूर होते. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

It is total fault on the part of the Collector जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना वन विभागाचे मुख्य वन संरक्षक पत्र पाठवितात. सन २००६ मध्ये खाणपट्टाधारक बनावट पर्यावरण मंजुरी प्राप्त करतात. कोणीतरी तक्रार केल्यानंतर सन २०१२ आणि सन २०१३ मध्ये पर्यावरण अनुमती रद्द करण्यात आली. पर्यावरण अनुमती रद्द झाल्यावर चुकीच्या पद्धतीने काम झालेले आहे, बनावट दस्तावेज दिलेले आहेत हे वन विभाग मान्य करते. विभागाने स्पष्टीकरणामध्ये नमूद केलेले आहे की, परिच्छेदामध्ये नमूद कालावधीत खनिपट्टा मंजूर होता व खनिपट्टा करारनाम्याच्या अटी व शर्तीनुसार स्वामित्वधन शासन जमा करून खाणकाम करणेत आले होते. सबब एमएमडीआर च्या कलम २१ (५) लागू ठरत नाही. त्यामुळे घटकाने उत्खनन केलेल्या खनिजांचे स्वामित्वधन जमा केले असल्याने दंड व शास्ती आकारण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सदरहू दोन खाणपट्टाधारक पर्यावरण मंजुरी घेऊन आले त्याबाबत पाठपुरावा करून ती रद्द करण्याची कार्यवाही न करता गप्प बसलात. त्यांना सन २००६ मध्ये पर्यावरण मंजुरी कशी काय मिळाली ? विभागाने त्याबाबत काही तपासणी केली नाही. जिल्हाधिकारी यांना कळवूनही त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. खाणपट्टाधारकांनी सन २०१३ पर्यंत २६.९७ लाख मे.टन उत्खनन केले. सन २०१२-२०१३ मध्ये पर्यावरण अनुमती रद्द करण्यात आल्यानंतर उत्खनन बंद करण्यात आले आणि आजमितीपर्यंत त्यांच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. Till now no penalty, no fine, no prosecution, no case of forgery, no action has been taken. यापैकी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. You take serious action against all of them and initiate recovery from them. तेव्हा या प्रकरणी नियमानुसार दंडाची आकारणी करावी. हे शंभर टक्के अनधिकृत उत्खनन आहे. फसवणूक करणे हा फौजदारी गुन्हा आहे. वन विभागाने फक्त पत्र पाठवून आपले कर्तव्य पूर्ण केले, It is not proper समितीचे असे मत आहे की, सन २००५ मध्ये वन विभागाने उत्खननाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयास कळविले. सन २००६ मध्ये खाणपट्टाधारकांनी पर्यावरण मंजुरी आणली. वन विभागाच्या अधिकाऱ्यांना माहीत होते की, वन विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्राशिवाय पर्यावरण मंजुरी मिळत नाही. विभागाने येथे सांगितले की, वन विभागाने ना हरकत प्रमाणपत्र दिलेले नाही. पर्यावरण मंजुरी मिळाली आणि उत्खनन सुरू होते द्वयाचा साधा आणि सरळ अर्थ असा आहे की, वन विभागाचे अधिकारी त्यांना मिळालेले आहेत. तेव्हा या संदर्भात तत्कालीन अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहात ? श्री. पवार यांचेशी बोलावे. वन विभागाच्या अधिकाऱ्यांना माहीत होते की, त्यांनी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले नाही. असे असताना त्यांनी पर्यावरण मंजुरी कशी आणली याचा तपास वन विभागाने का केला नाही ? या प्रकरणी तत्कालीन अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी सुरू करावी आणि त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी. ज्यांनी वन विभागाचे बोगस प्रमाणपत्र दाखवून पर्यावरण मंजुरी मिळविली त्याबाबत चौकशी झाली काय ? त्यांनी वन विभागाचे कोणते पत्र दाखविले, त्या बाबत कोणी खातरजमा केली ? खाणपट्टाधारकांनी पर्यावरण मंजुरी प्रमाणपत्र दाखविल्यावर वन विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळालेले नसताना पर्यावरण मंजुरी कशी

मिळाली याबाबत चौकशी करण्याची जबाबदारी वन विभागाची होती असे विभागास वाटत नाही काय ? पर्यावरण मंजुरी तरी नक्की मिळाली होती काय ? अशी विचारणा समितीने केली असता, ई.सी. मिळाली होती, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगतिले. खाणपट्टाधारकांनी रु. ३६ कोटी १० लाख इतके स्वामित्वधन भरलेले आहे त्यामुळे त्यांच्यावर कोणतीही कारवाई अपेक्षित नाही असे विभागाने स्पष्टीकरणामध्ये नमूद केलेले आहे. हे संपूर्ण अनधिकृत उत्खनन आहे. खाणपट्टाधारकांकडे पर्यावरण मंजुरी असली तरी राष्ट्रीय उद्यानाच्या १० कि.मी.च्या आत उत्खनन करता येत नाही असा नियम असताना सदरचे उत्खनन बंद करण्याबाबत वन विभागाने कारवाई का केली नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये दोन गोष्टी आहेत. पहिली गोष्ट म्हणजे यामध्ये नॅशनल पार्क, सॅनच्युरी नॅशनल पार्क, टायगर झोन आणि बफर असे चार प्रकार आहेत. सुरूवातीला चांदोली हे अभयारण्य होते. त्याबाबतची घोषणा १९८५ मध्ये झाली होती. सन २००४ मध्ये राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित करण्यात आले. त्यानंतर सन २०१२ मध्ये व्याघ्र प्रकल्प झाला म्हणून घोषित करण्यात आले. टायगर रिझर्व्हमध्ये दोन भाग आहेत. एक कोअर भाग आणि दुसरा बफर एरिया. सन २०१२ मध्ये बफर एरिया म्हणून घोषित करण्यात आला. म्हणजे खरे नियंत्रण बफरनंतर सुरू होते. समितीचे म्हणणे मान्य आहे. सन २००६ ते २०१२ पर्यंत कोणतेही डॉक्युमेंट गेले नसतानाही त्यांना ई.सी कशी मिळाली हा प्रश्न आहे. परंतु नोटिफिकेशनच्या तारखा लक्षात घेतल्या तर रिअर नियंत्रण बफर नोटीफिकेशनपासून सुरू होते आणि ते नोटीफिकेशन सन २०१२ मध्ये झालेले आहे. खनिज उत्खनन होत असलेले क्षेत्र वन जमीन नाही आणि बफर झोन घोषित झाला नसल्यामुळे वन विभागाकडून कारवाई झालेली नसेल असे कदाचित असू शकेल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

वन विभागाचे अधिकाऱ्यांनी म्हटलेले आहे की, "I hereby draw your urgent attention to the fact that I have personally visited and verified for myself that mining activity in Udgir, taluka Shahuwadi, District Kolhapur was being conducted in violation of the existing rule of the land." सन २००५ मध्ये विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितले की, उल्लंघन झालेले आहे. सन २००५ ते २०१३ पर्यंत उत्खनन सुरू होते आणि फक्त जिल्हाधिकारी कार्यालयास पत्र पाठविले, परंतु पुढे काहीच कारवाई केली नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, राष्ट्रीय उद्यानाच्या जागेत कोणालाच काही करता येत नाही. सदरचे उत्खनन हे राष्ट्रीय उद्यानाच्या बाहेरचे आहे, असे असले तरी त्यावर बंधने आहेत. वन विभागाकडून डॉक्युमेंटस गेली नसताना ईसी कशी मिळाली, त्याकडे दुर्लक्ष का झाले त्याबाबत चौकशी करून अहवाल सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या प्रकरणी जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित करावी. Because as per the letter, everything thing was in the knowledge of the forest department. आपले सन २००५ चे पत्र उद्योग विभागालादेखील द्यावे कारण वन विभागाच्या पत्रावर जिल्हाधिकारी यांनी काहीच कारवाई केली नाही. He had not taken any action and the activity was going on. विभागाने त्यांच्यावर प्रॉसीक्युशन प्रस्तावित केलेली आहे काय ? बेकायदेशीर लीज म्हणून ३६ कोटी रुपयांच्या अगेंस्ट दंड आणि शास्ती आकारली आहे काय याची समितीला माहिती द्यावी, असे समितीने सूचित केले असता, खाणकाम रद्द करण्याची नोटीस दिलेली आहे.

समितीने सूचित केले त्याप्रमाणे प्रॉसिक्युशनबाबत केंद्र सरकारला अगोदरच कळविलेले आहे. लीज अपडेट केली परंतु बनावट कागदपत्रांवर पर्यावरण मंजुरी मिळविलेली असल्यामुळे सेक्शन ५ अन्वये कारवाई करणे गरजेचे आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१२ मध्ये पर्यावरण अनुमती रद्द झाल्यावर केंद्र सरकारने कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे त्यांच्याकडून पैसे वसूल केले नाहीत. यामध्ये नुकसान शेवटी शासनाचे झालेले आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीला आश्वासन देऊ इच्छितो की, याच्यामध्ये केंद्र शासनाच्या समितीने निर्णय घेतला नाही तरीही त्यांच्याकडून ३१.५ प्रमाणे शास्तीची वसुली केलेली आहे. सेक्शन-५ अन्वये त्याविरुद्ध प्रॉसिक्यूशनची कारवाई होईल. यामध्ये बेकायदेशीर खाणकामाचा एक मुद्दा सांगतो. हे बेकायदेशीर खाणकाम आहे, असे ग्राह्य धरून दंड लावत आहोत. पर्यावरण मंजुरी दिलेली आहे, त्यांचे रेकॉर्ड बघावे लागेल की कोणत्या आधारावर दिली, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या विषयावर वन विभागानेही मदत करावी, ती जी इसी आली होती, त्यामध्ये कॅन्सलेशनची ऑर्डर विभागाकडे असते. कारण त्यांचा नेहमीचा संपर्क आहे. त्यांनी तेथे जाऊन कोणत्या आधारावर इसी घेतली, असे मत समितीने व्यक्त केले असता, याच्यामध्ये गैरव्यवहार झाला आहे, हे तर केंद्र शासनाच्या कमिटीनेही ओळखलेले आहे. सेक्शन-पाच अन्वये प्रॉसिक्यूशन केलेली नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यांनी त्यांना ऑफिशिअली सांगितली पाहिजे की, त्यांना कोणतीही एनओसी दिली नव्हती. सेक्शन फाईव्हची कारवाई होईल, तरच शास्ती नियमानुसार घेता येईल. याची कारवाई करून त्याची माहिती समितीला एका महिन्याच्या आत सादर करावी. किती रुपयांची शास्ती आकारली तेही सांगावे. मायनिंग ऑफिसर आणि महसूल खाते यासंदर्भात जागा वन विभागाची किंवा खाजगी मालकाची असेल तर तलाठी, मूळ मालक, सर्कल ऑफिसर, याबाबत तुम्ही कोणीही चर्चा करीत नाही. ती जागा वन विभागाची आहे, प्रायव्हेट आहे, शासनाची आहे, हे कोण पाहते ? हे तलाठी पाहत आहे, ही गंभीर बाब आहे. वन विभागाची जागा आहे हे कोण ठरवित आहे. मूळ मुद्याला बगल दिली जात आहे. यावर करोडो रुपयांचा कर

बुडविला जात आहे. २० मार्च, २००५ रोजी कन्झर्व्हेटर ऑफ फॉरेस्ट, कोल्हापूर वाईल्ड लाईफ यांनी २० मार्च,२००५ रोजी कळविल्यानंतर कोणती कारवाई कलेक्टरने न करणे हे सुद्धा संशयास्पद आहे. या पत्राची दखल आपण घेतलीच पाहिजे. कलेक्टर ऑफिसकडून जाब विचारला पाहिजे. शेवटी कारवाई लगेच केली पाहिजे होती. कारवाई त्यांनी का केली नाही ? या सर्व विषयांची सखोल चौकशी करून त्याबाबत योग्य ती दखल घ्यावी. आता हे श्री. मोहितेंतर निवृत्त झाले असतील. हा सर्व पूर्णपणे दुर्लक्षाचा आणि संगनमताचा भाग आहे. कन्झर्व्हेटर ऑफ फॉरेस्ट कलेक्टरला पत्र लिहितात. इतका गंभीर प्रश्न आहे, त्यावर कोणी जर लक्ष देत नसेल तर ते योग्य नाही. यावर लक्ष देऊन योग्य ती कारवाई केली पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले.

परिच्छेद क्र. ७.२.२.५ भाडेपट्टा क्षेत्रापलीकडे खनिज उत्पत्ती करणे :-

४.६ दोन्ही प्रकरणांत ॲक्सेस मायनिंग झालेले आहे, अशा प्रकारचा एक मुद्दा आहे. श्रीवर्धन तालुक्यातील बॉक्साईट खाणीचा हा मुद्दा आहे. हे दोन विषय जे आहेत, त्याचे जे उत्तर आलेले आहे, ते उत्तर टोलवाटोलवीचे आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये ज्यावेळी विभागाने रिव्ह्यू घेतला, यामध्ये जे ॲक्सेस ठरविण्यात आलेला आहे. २५१४७.१२६ मेट्रिक टन त्याची व्हॅल्यू काढलेली आहे. कारण की ज्यांनी जे फिक्स घेतलेले आहे, त्याच्यापेक्षा कितीतरी मोठ्या प्रमाणावर वाहतूक केलेली दिसत आहे. त्याचे म्हणणे असे आहे की, येथे ते फ्लोट होत आहे. आजुबाजूची जी माती असते त्याची वाहतूक केलेली आहे. ते विभागाने अमान्य केलेले असून त्याच्यावर रु. १.८० करोडची डिमांड रेज केलेली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखाकार यांनी सांगितले की, ते उत्खनन हे अनधिकृत होते. म्हणून आपण जी व्हॅल्यू म्हणत आहोत, हे जे मायनिंग आहे, ते अनधिकृत आहे. त्यावर १.८ करोडचे चार्जेस चार्ज केलेले आहे, असे आपण म्हणत आहात असे मत समितीने व्यक्त केले असता, दर्याणीच्या नावाने ती लीज आहे आणि त्याचा मालक गोराडिया आहे. तो त्या भागात राहत नाही. जेथे मायनिंग घडलेले आहे, त्या प्रत्यक्ष जागेचा मालक गोराडिया आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मायनिंग गोराडियाच्या जमिनीवर झालेली आहे. अशी विचारणा समितीने केली असता, खाणकाम गोराडियाच्या जमिनीवर झालेले असून ज्यावेळी याची नोटीस काढली, त्यावेळी याला उत्तर दिलेले नाही. विभागाने ३.९९ कोटी रुपये दंड लावलेला आहे. दर्याणीला नोटीस दिलेली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

दर्याणीच्या जागेवर उत्खनन झालेले नाही. त्याला लीज दिलेली आहे. त्या दर्याणीने बाजूच्या लॅण्डवर तेथे जो गोराडिया आहे, त्याच्या जागेवर उत्खनन करून ते तेथे टाकलेले आहे. विभागाच्या पासेसवर माल काढलेला आहे. पासेस विभागाचे आहेत, माल काढणारा दर्याणी आहे. जागा गोराडियाची आहे तो गोराडिया मुंबईला राहतो. त्याच्या जागेवर पास दिलेले आहेत. ज्या माणसाने उत्खनन केलेले आहे, त्याच्याकडून ही वसुली केली पाहिजे. तुमच्या मार्केटच्या अंतर्गत हा माल ट्रान्सपोर्टिंग झालेला आहे. तुमच्या पासेसवर त्याने त्यांच्या जागेवर उत्खनन करून टाकलेले आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, दर्याणी म्हणतो की, मी तेथे उत्खननच केलेले नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पासेसमुळे हे सिद्ध झालेले आहे. याकरिता पासेस आपल्याच विभागाने दिलेले आहेत. मालामध्येही तफावत आहे. ज्या पोर्टवरून तो माल गेला त्याचे टनेज चेक करा, येथील उत्खननाची रॉयल्टी चेक करावी. यामध्ये करोडो रुपयांचा फरक आहे. कदाचित गोराडियाचा यामध्ये काही संबंध नसणार आहे. गोराडियाच्या जागेवर दर्याणीने विभागाचे पासेस घेऊन अनधिकृत उत्खनन केलेले आहे. जमिनीचा मालकही तेथे नाही. याबाबत गोराडियाला काहीही माहिती नाही. हे तुम्ही दर्याणीला वाचविण्यासाठी करीत आहात. याचे कारणही सांगतो. तुमच्या पासेसवर माल गेलेला आहे. माल कुठे गेला ? गोराडिया उलट केस करेल, माझ्या जागेवर उत्खननाकरिता पासेस शासनाने कसे काय दिले ? यामधून कोणता माल लोकल आहे किंवा कोणता चांगला माल आहे कोणत्या मालावर किती रॉयल्टी आहे, याची माहितीही सांगावी. विभागाने दर्याणीला पास इश्यू केलेले आहेत. माल घेऊन तो गेलेला आहे. हे पास कशाच्या आधारावर राँगली इश्यू केलेले आहेत, याची तपासणी करून चौकशी अहवाल समितीला सादर करण्याकरिता पंधरा दिवसांची मुदतवाढ दिली पाहिजे. हे पासेस कोण इश्यू करते ? अशी विचारणा समितीने केली असता, हे पासेस मायनिंग ऑफिसर्स इश्यू करतात, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

गोराडियाच्या जमिनीवर उत्खननाकरिता श्री. दर्याणींना पास इश्यू केलेले आहे. हे सर्व एमएमबीच्या रेकॉर्डशी जुळते का, पर्यावरणाच्या सद्य:स्थितीशी जुळून येते का हे पाहावे लागते, असे मत विभागीय प्रतिनिधींनी व्यक्त केले.

एमएमबीचा रेकॉर्डही पाहणे आवश्यक आहे. हे पासेस तर कमी रेकॉर्ड दाखवेल. एमएमबीचा रेकॉर्ड कधीही दिशाभूल करणार नाही, असे समितीने स्पष्ट केले.

पंधरा दिवस- एक महिना ज्या अहवालाची समिती मागणी करीत आहे, ती सर्व माहिती किंवा अहवाल विहित मुदतीत सादर केली नाही तर ते योग्य ठरणार नाही. अन्यथा या विषयावर पुन्हा पुन्हा साक्ष घेऊन वेळेचा अपव्यय होईल. याबाबत विभागाच्या कार्यालयातून ज्या प्रतिक्रिया दिलेल्या आहेत, त्याची प्रत समितीकडे सादर करावी. गोराडियावर बोजा टाकला तर तो मूळ मालक असतानाही त्याला याचा त्रासच होणार आहे. बोजा टाकून पैसे मिळत नाहीत. यामुळे १६ कोटीतील ०४ कोटी रुपयेही जातील. तुम्ही कोणाच्याही नावावर बुडित खाते म्हणून द्यायचे, ते येणार नाहीत, अशी खात्री बाळगायची. लगेच त्याचा बोजा कमी करा आणि त्याचे पैसे दर्याणीकडून वसूल करा, पूर्ण दंड आणि शास्तीही वसूल करण्यात यावी. ते पत्र घ्यावे आणि त्यांच्यावर शास्ती लावण्यात यावी. वसुलीची कारवाई सुरू करण्यात यावी असे समितीने सूचित केले. **(विभागाकडून प्राप्त झालेली माहिती विवरणपत्र क्र. २ मध्ये जोडण्यात आलेली आहे.)**

परिच्छेद क्र.७.२.२.६ शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय भाडेपट्टाधिकाराचे हस्तांतरण :-

४.७ यामध्ये मुद्दा असा आहे की, पॉवर ऑफ ॲटॉर्नी ते करतात भाडेपट्टयाचे बेकायदेशीर हस्तांतरण असे गृहित धरावे, असा महालेखाकार यांचा मुद्दा आहे विभागाचे मत असे आहे की, यामध्ये एजंट अपार्टमेंट वगैरे हे ग्राह्य आहे. त्यावेळी एजंट म्हणजे त्याला केवळ काम करण्याचे अधिकार असावेत. काम करतात त्यालाच केवळ एजंटची व्याख्या समजावू शकतो. पॉवर ऑफ ॲटॉर्नी ज्यावेळी केलेली आहे, तेथे संपूर्ण अधिकार गोळा करण्याचे, इतर सर्व अधिकार दिले असतील तर ते एजंट अपार्टमेंट गृहित धरावे की ट्रान्सफर ग्राह्य धरावे यावर आजच सचिव १ विधी व न्याय विभाग यांचेकडे विचारणा केलेली आहे. यांना नोटीसही पाठविलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यामध्ये असे नमूद केले आहे की, " The Power of Attorney was given for the consideration of amount received and further comes to be received from the Power of Attorney holder to principal lessee, also there were no provision mentioned in the Power of Attorney document for salary, commission, growth rate, attrition to be paid to the agent for working as an agent." म्हणजे त्यांनी पैसे घेऊन कन्सीडरेशनने पॉवर दिलेली आहे. तो सॅलरीवर नाही, कमिशनवर नाही, ब्रोकरेजवर नाही It is total transfer of property. असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाचे तसेच मत आहे. फक्त विधि व न्याय विभागाकडून अभिप्राय घेऊन मत ठाम करून घेत आहे. त्यानंतर या सर्व लीजवर कारवाई करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले. **(विभागाकडून प्राप्त झालेली माहिती विवरणपत्र क्र. २ मध्ये जोडण्यात आलेली आहे.)**

हे पूर्णत: अनधिकृत हस्तांतरण आहे. त्यांनी रेकॉर्डवर म्हटलेले आहे की, आम्ही इतके पैसे घेतले, त्या आधारावर आम्ही तुम्हाला अधिकार देतो. म्हणजे त्यांनी भाडेपट्टा विकलेला आहे. अन्यथा त्यांनी त्यांना पगार दिला पाहिजे, ऑननरी दिला पाहिजे, कमिशन किंवा ब्रोकरेज, यापैकी काही तरी दिले पाहिजे, परंतु तसे झालेले नाही. It is a total transfer of property. विधि व न्याय विभागाकडून सल्ला घेण्याइतपत हा विषय किचकट नाही. या प्रकरणामध्ये अनधिकृत हस्तांतरण झालेले आहे हे स्पष्ट दिसून येते, असे मत समितीने व्यक्त केले असता, या संदर्भात विधि व न्याय विभागाबरोबर चर्चा झालेली आहे. ते या प्रकरणी लवकर सल्ला देणार आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या प्रकरणी ॲग्रीमेंट पार्ट, मायनिंग प्लान वगैरे सर्व बाबींचे अधिकार त्यांना दिलेले आहेत. एजंट तेव्हा असतो जेव्हा कन्सीडरेशन ऑफ अमाऊन्ट असते. या प्रकरणामध्ये पगार दिलेला नाही, ऑननरी दिलेला नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाचे फक्त एवढेच म्हणणे होते की, विधि व न्याय विभागाचे यावर मत घ्यावे लागेल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

इतक्या गंभीर विषयावर महालेखाकारांचे आक्षेप आल्यानंतर मागील पाच वर्षापासून काही कार्यवाही केली नाही. हे स्पष्ट प्रकरण आहे त्यामध्ये काही पाहण्याची आवश्यकता नाही. भाडेपट्टा हस्तांतिरत झालेला असल्यामुळे तो अनधिकृत ठरवून संबंधितांवर शास्ती आणि दंड आकारण्यात यावा, असे समितीने सूचित केले असता या प्रकरणाव्यतिरिक्त अन्य प्रकरणे देखील असू शकतील त्याचादेखील अभ्यास करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले. **(विभागाकडून प्राप्त झालेली माहिती विवरणपत्र क्र. २ मध्ये जोडण्यात आलेली आहे.)**

भाडेपट्टा हस्तांतरणाचा हा मुद्दा आहे. शाहूवाडीमध्ये आणि रायगड जिल्ह्यामध्ये अशी बरीच खाणकाम आहेत. जेथे वसुली निघत असेल तेथे काम थांबविले पाहिजे. एकीकडे त्यांच्यावर बोजा चढवित आहात आणि दुसरीकडे त्यांनाच काम देत आहात ज्यांच्यावर बोजा चढविलेला आहे त्यांच्याकडून दंडाची रक्कम वसूल करावी आणि त्यांच्याकडून वसुली झाल्याशिवाय त्यांना इतरत्र काम देऊ नये अशी विभागाने भूमिका घेतली पाहिजे. विभागाने भाडेपट्टा हस्तांतरण हे प्रकरण गांभीर्याने घेतले पाहिजे, असे मत समितीने व्यक्त केले.

परिच्छेद क्रमांक ७.२.२.७ स्वामित्वधन व भाडे यांचे निर्धारण आणि वसुली :-

(अ) स्वामित्वधनाची कमी वसुली :-

४.८ उक्त परिच्छेदाबद्दल विभागीय सचिवांचे काय मत आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने इंटीग्रेटेड लीज मॅनेजमेंट सिस्टीम अमलात आणली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करीत आहोत. या सिस्टीममुळे बरीच सुसूत्रता येणार असून पासेस देणे आणि अनियमित उत्खननावर आळा घालता येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या सात प्रकरणाची समितीला माहिती द्यावी. असे समितीने सूचित केले असता, या प्रकरणामध्ये सर्व वसुली झालेली आहे. एकूण रु. १३ कोटी ४७ लाख इतकी वसुली दाखविली होती. यामध्ये आकड्यामध्ये चूक झाली होती. मेसर्स भारतेश कन्स्ट्रक्शन कंपनीची रक्कम रु.३३ लाख ऐवजी रु. ३ कोटी ७ लाख अशी चुकीची दाखविली असल्यामुळे फरक झाला होता. तो फरक विचारात घेतला तर रु. ११ कोटी २० लाख वसुली झालेली आहे आणि ती योग्य असून तसे महालेखाकार कार्यालयास कळविले आहे. महालेखाकारांनी व्याज वसुलीबाबत सांगितले होते. या प्रकरणी पूर्ण वसुली झालेली आहे असे विभागाचे म्हणणे आहे. परंतु समितीला दिलेल्या माहितीमध्ये रु.१३ कोटी ४७ लाख अशी आकडेवारी आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, त्याबाबत अहवाल देतो. त्यामध्ये रिकन्सीलिएशन करायचे आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. **(विभागाकडून प्राप्त झालेली माहिती विवरणपत्र क्र. २ मध्ये जोडण्यात आलेली आहे.)**

(ब) व्याजाचा भरणा न होणे :-

४.९ व्याजाच्या रकमेचे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, दिनांक १३ जानेवारी २०१६ रोजी रु.२०.९० लाख इतकी व्याजाची रक्कम वसुली केलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. अन्य प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे ? रेग्युलर सिस्टीम ऑफ इंटरेस्ट नुसार वसुली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता देयक अदा करण्यास ९० दिवसांपेक्षा जास्त कालावधी झाला तर २४ टक्के दराने व्याज आकारण्याची तरतूद आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

महालेखाकार यांनी ही बाब निदर्शनास आणली नसती तर शासनाचे २० लाख रुपयांचे नुकसान झाले असते. ज्या अधिकाऱ्यांचे हे काम होते त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. त्यांना समजत नाही असे नाही, हे सर्व हेतुपुरस्सर होते तेव्हा संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. ज्या अधिकाऱ्यांनी वेळेवर पैशाची मागणी केली नाही आणि महालेखाकारांनी बाब लक्षात आणून दिल्यानंतर वसुलीची कारवाई केली. महालेखाकारांनी ही बाब निदर्शनास आणली नसती तर शासनाचे २० लाख रुपयांचे नुकसान झाले असते. तेव्हा संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करावा असे समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी अहवाल सादर करतो असे सांगितले **(विभागाकडून प्राप्त झालेली माहिती विवरणपत्र क्र. २ मध्ये जोडण्यात आलेली आहे.)**

(क) मृत भाडे आणि भूपृष्ठ भाड्याची वसुली न करणे :-

४.१० मृत भाड्यापोटी किती रक्कम वसुली करण्याचे प्रलंबित आहे अशी विचारणा समितीने केली असता, एकूण रु. ८२ लाख पैकी रु. ६२.९४ लाख रक्कम वसुली केलेली आहे. या संदर्भात वसुली केलेले स्टेटमेंट समितीस सादर करतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले. **(विभागाकडून प्राप्त झालेली माहिती विवरणपत्र क्र. २ मध्ये जोडण्यात आलेली आहे.)**

जवळपास २७ लाख रुपये बाकी आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता, मृत भाडे म्हणजे जेथे खाणी बंद आहेत तेथून वसुली करण्यात येते. यवतमाळ जिल्ह्यामध्ये एकूण २१ खाणींपैकी १४ खाणी सुरू असून ७ खाणी बंद आहेत. १४ खाणपट्टा धारकांकडून भूपृष्ठ भाडे आकारतो आणि ज्या बंद आहेत त्यांच्याकडून मृत भाडे आकारतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मृत भाडे रु. ८२.९२ लाख वसूल करावयाचे होते त्यापैकी रु.६२.९४ लाख वसूल केले. म्हणजे रु. २६.९८ लाख बाकी आहेत, त्या रकमेच्या वसुलीचे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, आता फक्त रु. ८ लाख १८ हजार इतकी वसुली बाकी आहे. त्या संदर्भातील स्टेटमेंट समितीस सादर करतो, असे विभागीय प्रतिनिंधीनी सांगितले.

सचिवांनी सांगितले की, रु. ६२.९४ लाख इतकी वसुली झाली. म्हणजे रु.२६.९८ लाख रुपये बाकी आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता, वसुलीची आकडेवारी वाढली असेल कारण मागच्या बैठकीच्या वेळी रु.६२ लाख इतकी वसुली झाली होती, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एकूण रु.८२ लाख वसुलीपैकी रु. ६२ लाख वसुली झाली हे विभागास मान्य आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, आता फक्त १८ लाख रुपये बाकी आहे. समितीस भाडेपट्टा निहाय स्टेटमेंट देतो, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ही रक्कम केव्हापर्यंत वसूल होईल ? अशी विचारणा समितीने केली असता, बऱ्याच वर्षांपासून खाणपट्टा बंद आहे त्यांना नोटीसेस दिलेल्या आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

एका महिन्यात कारवाई करून तसे समितीला कळवावे.एक महिन्यात वसुलीची कारवाई करावी. भूपृष्ठ भाड्याच्या बाबतीत सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, एकूण १४ खाणपट्टाधारकांकडून रु. ५९.८२ लाख इतकी वसुली केलेली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एकूण रु. २.१९ कोटी इतकी वसुली करावयाची आहे. महालेखाकार यांनी फक्त एका जिल्ह्याची माहिती दिलेली आहे. त्यांनी ही वसुली निदर्शनास आणून दिली म्हणून विभाग ती वसुली करीत आहे. विभागाने त्या काळातील सर्व प्रकरणे पाहिली पाहिजेत. अशी परिस्थिती सर्वच ठिकाणी आहे. विभागाने या सर्व गोष्टी तपासल्या पाहिजेत. सन २०१३ पूर्वीची ही वसुली आहे आणि आतापर्यंत पूर्णपणे वसुली झालेली नाही. फक्त २५ टक्के वसुली झालेली आहे, वसुली न होण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, समन्वयाचा मुद्दा हे महत्त्वाचे कारण आहे. खनिकर्म अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालयास अहवाल देतात. महसूल आढावा बैठकीत खनिज उत्खननाच्या वसुलीचा विषय घेतला पाहिजे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. परंतु या संदर्भात पुनरावलोकन झाले पाहिजे. असे मत विभागीय सचिवांनी व्यक्त केले असता, जरी पुनरावलोकन झाले नाही तरी ते खनिकर्म अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. ज्या खनिकर्म अधिकाऱ्यांनी वसुलीची कार्यवाही केली नाही त्यांना जबाबदार धरले पाहिजे. तसेच व्याजाचे पैसे परिगणना करून ते खनिकर्म अधिकाऱ्यांकडून वसूल करावेत असे समितीने सूचित केले असता, यावर यापुढील कालावधीकरिता सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तसे कळवितो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ही सन २०१३ ची स्थिती आहे. पूर्ण राज्यामध्ये दिनांक ३१ मार्च २०१८ पर्यंत व्याज, मृत भाडे आणि भूपृष्ठ भाडे या तिन्ही प्रकरणाची थकबाकी किती आहे आणि त्याबाबत जिल्हाधिकारी यांनी कोणती कारवाई केली याची जिल्हानिहाय माहिती समितीला द्यावी. कारण समिती समोर आलेल्या विषयाबाबत साक्ष घेत नसून ती साक्ष पूर्ण राज्याकरिता असते. The System should be improved. यामध्ये एक यंत्रणा असणे आवश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, यात सिस्टीम घालून देणे अत्यंत गरजेचे आहे आणि ते मान्य करतो. एका महिन्यात ही कार्यवाही करण्यात येईल. जिल्हाधिकारी महिन्याला किंवा काही ठराविक कालावधीनंतर आढावा घेतात त्यामध्ये हा मुद्दा घेण्याबाबत अनिवार्य करण्यात येईल जेणेकरून एखाद्याची इतकी इतकी वसुली आहे याची माहिती प्राप्त होईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या प्रकरणी राज्यासाठी सॉफ्टवेअर तयार करावे. कोणत्या जिल्ह्याची किती थकबाकी आहे, कोणत्या जिल्ह्याची काय स्थिती आहे याचे ऑनलाईन रिपोर्टींग असले पाहिजे. असे सॉफ्टवेअर करता आले तर पहावे. असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शवली.

आता सचिवांनी सांगितले हा विषय जिल्हाधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत घेण्यात येईल. समितीचे असे मत आहे की, विभागाने हा विषय शेवटी न घेता तो प्राधान्याने घेतला तर त्यास गती मिळेल. तो विषय शेवटी घेतला तर तो चर्चेला येणार नाही.असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी विषय प्राधान्याने घेतो असे सांगितले.

अभिप्राय व शिफारशी

परिच्छेद क्रमांक ७.२.१.२ "विभागाने वेळोवेळी लेखांचा ताळमेळ घालण्याची आवश्यकता"

अभिप्राय

५.१ विभागाकडे उपलब्ध आकडेवारी आणि प्रधान महालेखाकार यांचेद्वारे अंतिम केलेले लेखापरीक्षित वित्तीय लेखे यांच्यात तफावत आहे. ज्यात वित्त लेखानुसार प्रत्यक्ष जमा व खनिकर्म विभागानुसार प्राप्ती यात फरक दिसून येतो. महालेखाकारांना या तफावतीची कारणे निश्चित करता येऊ शकली नाहीत कारण विभागाने त्यांच्या आकडेवारीचा महालेखाकार कार्यालयाकडे उपलब्ध आकडेवारीसोबत ताळमेळ केला नव्हता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहे. या आक्षेपासंदर्भात अंकांचा ऑनलाइन ताळमेळ करण्याकरिता प्रयत्न करण्यात येतील जेणेकरून वित्तीय लेखे यांतील आकडेवारी आणि विभागाने सादर केलेली आकडेवारी यामधील फरक टाळता येईल असे विभागीय प्रतिनिधींनी मान्य केले.

शिफारस

५.२ महालेखाकारांनी उपरोक्त नमूद केलेले आक्षेप हे वित्तीय नियोजन व आर्थिक बाबींशी निगडीत अत्यंत मुलभूत स्वरुपाचे आक्षेप आहेत. आक्षेपात महालेखाकारांनी नमूद केलेली आकडेवारी पाहता विभागांतर्गत नियमित खर्चाचा ताळमेळ (रिकन्सीलीएशन) न केल्यामुळे ही तफावत मुलतः दिसून येते. सन २००९ ते २०१४ इतक्या ५ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीत हा ताळमेळ विभागाला जुळवता आला नाही. वित्तीय नियोजनाच्या व आर्थिक शिस्तीच्यादृष्टीने निश्चितच ही बाब अयोग्य आहे. इतकेच नव्हेतर महालेखाकारांनी सदरहू आक्षेप हे सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी नोंदविलेले आहेत. त्यानंतर तरी विभागाने या आकडेवारीचा पूर्ण ताळमेळ घालून समितीसमोर येणे अपेक्षित होते. परंतु तसेही विभागाने केले नाही व हे प्रकरण विभागाने गांभीर्याने हाताळले नाही. हा ताळमेळ जर इतक्या प्रदीर्घ कालावधीसाठी विभागाला जुळवता येत नसेल तर ही बाब गंभीर असून निश्चितच समर्थनीय नाही. अतः विभागाने अंतर्गत लेखापरीक्षण यंत्रणा अधिक सक्षम व प्रभावी करावी व या आकडेवारीचा ताळमेळ तात्काळ घालावा व भविष्यात कालबद्ध पद्धतीने आकडेवारीचा ताळमेळ नियमितरित्या करावा. जेणेकरून आकडेवारीतील तफावती वेळेत निदर्शनास येतील आणि विभागाने तयार केलेले लेखे किंवा सादर केलेली आकडेवारी शासन लेख्यांच्या जमेचे खरे चित्र दर्शवू शकेल. अतः याबाबत विभागाने कार्यवाही करावी व या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ७.२.१.३ "महसुलाची थकबाकी"

अभिप्राय

५.३ भूशास्त्र आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर (DGM) यांचेद्वारे सादर केलेल्या माहितीनुसार महसुलाची थकबाकीच्या माहितीवरुन दिसून येते की, मागील पाच वर्षांत मुख्य खनिजांच्या थकीत रकमेत १०.२५ पटीने आणि गौण खनिजांच्या थकीत रक्कमेत १.९ पटीने वाढ झाली. थकीत रकमेच्या प्रलंबनाचे महालेखाकारांनी सादर केलेल्या टप्पेवार विवरण पत्रावरुन दिसून येते की, गौण खनिजांच्या थकबाकीचा मुख्य भाग एकतर न्यायालयात प्रलंबित आहे (२७.६४ टक्के) किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रलंबित आहे (७२.३३ टक्के). तसेच, मुख्य खनिजांच्या थकबाकीचा मुख्य भाग (९९.८७ टक्के) जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रलंबित आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडे महसुली वसुली (RRC) च्या स्वरुपात प्रलंबित असलेली रक्कम वसूल करण्याकरिता पुरेसा वाव आहे. उदाहरणार्थ, चंद्रपूर मध्ये एका भाडेपट्टेदाराने २००९ पासून चुनखडी वर देय असलेल्या स्वामित्वधनाची अदायगी केली नाही. विभागाने रकमेच्या वसुली करता मे, २०१३ पर्यंत कोणतीही कारवाई केली नाही व यानंतर रु. ९.८७ कोटी रकमेचे RRC जारी केले होते. त्यानंतर, रकमेच्या वसुलीकरीता दुसरे कोणतेही उपाय करण्यात आले नाही. तसेच यवतमाळ जिल्ह्यात दुसऱ्या एका प्रकरणात लिलावातून रेती घाट वाटपाच्या बाबतीत (२०१३-१४) अटींचे पालन न केल्यामुळे रेती घाट प्राप्तकर्त्याकडून रु.९१.३६ लाख रकमेची वसुली देय होती. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी एक वर्षानंतर रेती घाट प्राप्तकर्त्याला नोटीस निर्गमित केली. त्यानंतर रकमेच्या वसुलीकरिता दुसरे कोणतेही उपाय योजण्यात आले नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहे.

सदरहू आक्षेपासंदर्भात मे.मुरली इंडस्ट्रीज लि., चंद्रपूर यांची उपलब्ध स्थावर व जंगम मालमत्ता अटकावून लिलावाद्वारे वसुलीची कार्यवाही सुरू असल्याचे विभागाने विदित केले. त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी लिलावधारक श्री. राजू सव्वालाखे यांचेकडून रक्कम वसूल करण्याकरिता त्यांच्या स्थावर मालमत्तेचा सन २०१६ मध्ये लिलाव ठेवण्यात आला. तथापि, लिलावास कोणीही उपस्थित न राहिल्याने लिलाव तहकूब करण्यात आला. लिलावास उचित प्रसिद्धी न देण्यात आल्यामुळे देखील हा लिलाव होऊ शकला नाही. त्यादरम्यान जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या दि. १७.१.२०१६ रोजीच्या आदेशाविरुद्ध लिलावधारक यांनी अपर आयुक्त, अमरावती यांच्याकडे अपील दाखल केले. ज्यांनी

अपिलार्थीकडून जमा करण्यात आलेली २० टक्के रक्कम रु.७,२६,९३० शासनजमा करणे तसेच रु.८४,०९,१३९ महसूल थकबाकी म्हणून वसूल करण्याचे आदेश रद्द केले. तथापि, अपिलार्थीकडून जमा केलेली २० टक्के रक्कम अपिलार्थीस परत करण्यात आलेली नाही. त्यानंतर विभागीय आयुक्तांनी दि. ०१ फेब्रुवारी, २०१८ ला अप्पर आयुक्तांनी दिलेले आदेशाचे पुनर्विलोकन करून सदर आदेश रद्द केले. या आदेशाविरुद्ध संबंधित व्यक्ती उच्च न्यायालयात गेली असता त्यास स्थगिती आदेश देण्यात आले आहेत असे समितीस सांगण्यात आले.

यासंदर्भात समितीने विचारणा केली असता मे. मुरली इंडस्ट्रीज लिमिटेड यांचेकडून स्वामित्वधनावरील व्याजाची थकबाकी एकूण रु. ९.८७ कोटी आहे. सदरहू कंपनीवर सद्यःस्थितीत दिवाळखोरीची कार्यवाही सुरू असून त्यामुळे आता सक्त वसुलीची कारवाई करणे शक्य नाही. या प्रक्रियेमध्ये विभागाने आपली वसुलीची मागणी नोंदविलेली असून दाव्याचा प्राधान्यक्रम ती संबंधित यंत्रणाच निश्चितच करणार असल्याचे समिती समोर सांगण्यात आले. वास्तविकतः या कंपनीविरुद्ध सन २०१३ मध्ये महसूली वसुली (Revenue Recovery) चे आदेश देण्यात आले होते. याबाबत जर विभागाने गांभीर्याने व वेळेत कारवाई केली असती तर नक्कीच ही वसुली होऊ शकली असती. सन २०१३ पासून महसुली वसुलीचे आदेश दिल्यानंतर देखील पुढील प्रक्रियेनुसार त्यांची मालमत्ता जप्त करणे अथवा लिलाव करणे अशी कोणतीही कार्यवाही विभागाने वेळेत केली नाही. ज्यामुळे संबंधित कंपनीला बचावासाठी पुरेसा कालावधी विभागाने उपलब्ध करून दिला. ती वसुली जर वेळेत केली असती तर नक्कीच आज ही परिस्थिती उद्‌भवली नसती. सदर कंपनीकडे थकीत असलेली रक्कम थोडीथोडकी नसून रु.९.८७ कोटीची थकबाकी पहाता विभागाने विषयाचे गांभीर्य वेळेत लक्षात घेणे आवश्यक होते. परंतु विभागाने ही कार्यवाही गांभीर्याने केलेली दिसून येत नाही. जर कंपनीच्या मालमत्ता जप्तीची कारवाई होऊ शकली नाही तर लिलावाची कारवाई करणे आवश्यक होते. परंतु ती देखील करण्यात आली नाही. परिणामी आता दिवाळखोरीच्या प्रक्रियेमध्ये ही सर्व वसुली अडकून पडली आहे. याचाच अर्थ या सर्व कारवाईच्या प्रक्रिया सहमतीने अथवा जाणुनबाजून सदरहू कंपनीच्या हितासाठी थांबविल्या असल्याची शंका घेण्यास पुर्ण वाव शिल्लक राहतो. सद्यःस्थितीत ही कोट्यावधीची रक्कम बुडीतच आहे व याच्या वसुलीची कोणतीही शाश्वती नाही. इतके होऊनही या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर विभागाने समितीच्या साक्षीला येईपर्यंत कोणतीही कारवाई केली नाही. वास्तविकतः इतक्या गंभीर प्रकरणी विभागीय प्रतिनिधींनी समितीच्या साक्षीला येताना संबंधितांवर कारवाई करूनच बैठकीला उपस्थित राहणे आवश्यक होते. परंतु तसे न केल्यामुळे याबाबत समितीने विचारणा केली असता, आर.आर.सी. आदेश निर्गमित केल्यानंतर ज्यांनी पुढील कारवाई करण्यात निष्काळजीपणा दाखविला त्यांचेवर १ महिन्याच्या आत जबाबदारी निश्चित करून शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले. अशाप्रकारे विभागाने या गंभीर प्रकरणी थकीत रकमेच्या वसुलीचे आदेश निर्गमित करण्याव्यतिरिक्त कोणतीही पुढील कारवाई केली नाही व ही बाब अयोग्य असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे.

शिफारशी

५.४ (१) सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी नोंदविलेले सर्व आक्षेप अत्यंत गंभीर असून यात कोट्यावधी रुपयांच्या वसुलीची प्रकरणे प्रलंबित आहेत. चंद्रपूर प्रकरणी विभागाने वसुली आदेश निर्गमित करण्यापलिकडे कोणतीही पुढील कारवाई केली नाही. विभागातील अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणा/संगनमतामुळे या प्रकरणी वसुलीची बाब विहित वेळेत पुर्ण होऊ शकली नाही. या प्रक्रियेत विभागाने अमर्याद विलंब लावल्यामुळे रु.९.८७ कोटी इतकी वसुली वेळेत होऊ शकली नाही व आता या कंपनीविरुद्ध दिवाळखोरीची प्रक्रिया सुरू असल्यामुळे ही वसुली करणे आता विभागाला शक्य नाही. इतकेच नव्हेतर या संपुर्ण प्रकरणी महालेखाकारांनी आक्षेप नोंदविल्यानंतर गत ४ ते ५ वर्षात विभागाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई केली नाही. वास्तविक समितीसमोर साक्षीसाठी येताना विभागाने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करूनच समितीसमोर येणे आवश्यक होते. परंतु तसे न करता आता साक्षीदरम्यान विभागीय प्रतिनिधी संबंधितांवर १ महिन्यात शिस्तभंगाची कारवाई करण्याचे मान्य करतात. परंतु विभागाने यासंदर्भात केलेली कारवाई समितीस अद्यापही कळविण्यात आली नाही. ही गंभीर बाब असून समिती यासंदर्भात तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. विभागाने सदरहू प्रकरणी योग्य तो पाठपुरावा करून ही संपुर्ण वसुली तातडीने वसुल करावी तसेच या प्रकरणी दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस २ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

५.५ (२) यवतमाळ प्रकरणी न्यायालयात याचिका दाखल असून त्यामध्ये उच्च न्यायालयाने वसुलीस स्थगिती दिली असल्याने विभागाने या प्रकरणाचा गुणवत्तेवर पाठपुरावा करून शासनाची योग्य बाजू मांडणेकरिता निष्णांत व जेष्ठ वकिलाची नियुक्ती करावी व प्रकरण तातडीने निकाली काढण्यात यावे व न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून आवश्यकती कारवाई तात्काळ करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस २ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

५.६ (३) शासनाने वसुलीची जी प्रकरणे जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रलंबित आहेत, अशी प्रकरणे लवकर निकाली काढण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांना जादा प्रयत्न करावयाच्या सूचना देण्यात याव्यात. कारण अशा प्रकरणांमध्ये अमर्याद विलंबामुळे कालांतराने वसुलीची शक्यता कमी होते. त्याचप्रमाणे वसुली कोणत्याही मार्गाने न होऊ शकल्यास महसूली थकबाकी (Revenue Recovery) हा अंतिम उपाय विभागाच्या स्तरावरुन अवलंबिण्यात येतो. परंतु समितीच्या असेही निदर्शनास आले की, केवळ RRC चे आदेश निर्गमित करून विभाग अशा प्रकरणी गप्प बसते व विभागाकडून अशा प्रकरणांचा पाठपुरावा गांभीर्याने होत नाही. परिणामी कोट्यावधी रुपयांची वसुली यात अडकनू पडते, ज्यामुळे शासनाच्या महसूलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. अतः अशा प्रकरणी वसुलीसंदर्भात विविध टप्पे व त्यासाठीची कालमर्यादा विहित करणेसंदर्भात तात्काळ आदेश निर्गमित करावेत व यात RRC च्या आदेशानंतर करावयाच्या कार्यवाहीची कालमर्यादा निश्चित करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ७.२.२ "मुख्य खनिजे-बॉक्साईट आणि चुनखडी"

परिच्छेद क्रमांक ७.२.२.१ "अनुज्ञप्ती आणि भाडेपट्टा प्रदानाच्या अर्जाचा निपटारा"

अभिप्राय

५.७ खनिज सवलत नियम, १९६० च्या नियम ६३ A मध्ये पुर्वेक्षण अनुज्ञप्ति (Prospecting License-PL) अर्ज आणि खनिकर्म भाडेपट्टा (ML) अर्जाचा निपटारा अनुक्रमे ९ आणि १२ महिन्यांच्या आत करण्याची तजवीज आहे. परंतु पुर्वेक्षण अनुज्ञप्ती (PL) आणि खनिकर्म भाडेपट्टा (ML) प्रदान करण्याकरिता महाराष्ट्र शासनाने २००८-०९ ते २०११-१२ दरम्यान अधिसूचना प्रकाशित करून अर्ज मागविले. विभागाने पुर्वेक्षण अनुज्ञप्ती आणि खनिकर्म भाडेपट्टा यांच्या २०११-१२ पर्यंतच्या प्रदानाकरिता अधिसुचना जारी केली होती. परंतु महालेखाकारांनी अनुज्ञप्ती आणि भाडेपट्ट्याच्या निपटाऱ्यात नोंदविलेल्या आकडेवारीवरुन मोठ्या प्रमाणात असलेले प्रलंबन निर्देशित करते की अनुज्ञप्ती आणि भाडेपट्टा बहाल करण्यास विभाग गंभीरतेने घेत नाही. यामुळे खनिकर्माकरिता नविन क्षेत्र कमी स्थापित होत असून राज्य महसूल अवरोधित होत आहे. खनिज संपत्तीचा शोध घेणे हे राज्य खनिज धोरण १९९९ च्या उद्दीष्टांपैकी एक उद्दीष्ट होते आणि विभागाद्वारे यासंदर्भात उपाय न केल्यामुळे हे उद्दीष्ट विफल ठरत होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले. यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, खाणी व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियमांमध्ये प्रस्तावित बदलांचा विचार करून अर्ज हेतूपुरस्पर प्रलंबित ठेवण्यात आले होते. जेणेकरून लागू नियमांनूसार अर्जाची प्रक्रिया केली असता होणारी महसूलाची संभवनीय हानी टाळता आली. त्यानंतर केंद्र शासन (खाण मंत्रालय) द्वारे खाण व खनिजे (विकसन व विनियमन) सुधारणा अधिनियम, २०१५ हा अधिनियम दिनांक २७ मार्च, २०१५ ला अधिसूचित करून अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. परिणामी दिनांक १२ जानेवारी, २०१५ पुर्वी शासनास प्राप्त झालेले सर्व खाणपट्टा अर्ज अपात्र ठरले आहेत. तसेच एमएमडीआर ॲक्ट २०१५ च्या कलम ८ मधील तरतुदीप्रमाणे सदर खाणपट्टे ई-लिलाव प्रक्रियेद्वारे वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचे समितीस सांगण्यात आले. त्याअनुषंगाने राज्य शासनाद्वारे प्रमुख खनिजांच्या खाणपट्ट्यांची लिलाव प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सद्यःस्थितीत प्रमुख खनिजाच्या लिलावाकरिता चार फेऱ्या पुर्ण झालेल्या असून त्याद्वारे तीन खाणपट्ट्यांचे यशस्वीरित्या सर्वोच्च बोलीधारकास वाटप करण्यात आले आहे. ई-लिलाव प्रक्रियेद्वारे राज्यात खाणपट्टा वाटपात १२५% पर्यंत अतिरिक्त अधिमुल्याची बोली प्राप्त झाली आहे. सदर अधिमुल्य स्वामित्वधनाव्यतिरिक्त प्राप्त होणार आहे. प्रस्तुत सुधारित अधिनियमापुर्वी शासनास केवळ स्वामित्वधन प्राप्त होते. यास्तव राज्य शासनाच्या महसुलात घट नसुन याद्वारे वाढ होणार आहे असेही समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस

५.८ खनिज सवलत नियम, १९६० च्या नियम ६३ A नुसार पुर्वेक्षण अनुज्ञाप्ती आणि खनिकर्म भाडेपट्टा अर्जाचा निपटारा अनुक्रमे ९ महिने आणि १२ महिन्यांच्या आत करण्याची तरतूद असून त्याची अंमलबजावणी करणे विभागावर बंधनकारक होते. परंतु महालेखाकारांनी या संदर्भात त्यांचे आक्षेपात नमूद केलेली आकडेवारी पाहता सन २००८-२००९ मध्ये पुर्वेक्षण अनुज्ञप्तीचे ४४ अर्ज व खनिकर्म भाडेपट्ट्याचे ७१ अर्ज निपटारा केल्याचे दिसून येते. परंतु सन २००९-२०१२ या कालावधीत अनेक अर्ज प्राप्त असूनही एकाही अर्जावर विचार करून निर्णय घेण्यात आला नाही. त्याचप्रमाणे २०१५ पर्यंत सर्व अर्ज जाणूनबुजून प्रलंबित ठेवण्यात आले होते. वास्तविकतः भविष्यात अधिनियमात होणाऱ्या सुधारणेच्या आधारावर त्यावेळी अस्तित्वात असलेल्या उपरोक्त तरतूदीची अंमलबजावणी स्थगित करणे कदापि समर्थनीय नाही. यामुळे सन २००९ ते २०१२ या मोठ्या कालावधीसाठी कोणताही भाडेपट्टा न दिल्यामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान तर झालेच परंतु अर्ज निकाली काढण्याच्या कार्यपद्धतीमध्ये पारदर्शकतेचा अभावही निश्चितच दिसून येतो. त्यामुळे प्रक्रियेवर शंका घेण्यास पुर्ण वाव शिल्लक राहतो. समितीने या प्रकरणाची सखोल तपासणी केली

असता असे निदर्शनास आले की, अर्ज निकाली न काढणेबाबत कोणतेही लेखी आदेश अथवा स्थगिती नव्हती. केवळ प्रक्रिया विचाराधीन असल्याच्या कारणास्तव इतकी वर्षे यावर निर्णय न घेणे ही बाब शासनाच्या आर्थिक हिताची नसून निश्चितच समर्थनीय नाही. या अगोदर अस्तित्वात असलेल्या प्रक्रियेनुसार ब्लॉक्सकरिता अर्ज घेऊन त्यावर मा. मंत्री महोदयांकडे नस्ती सादर करून व सर्व अर्जांवर विचारविनिमय, चर्चा, सुनावणी करून निर्णय घेण्यात येत असे. सन २००९-२०१० या कालावधीत आचारसंहिता व त्यानंतर उघड झालेले टूजी स्पेक्ट्रम प्रकरण यामुळे सर्व भाडेपट्टा लिलाव पद्धतीने देणेबाबतच निश्चित करण्यात आले. त्याअनुषंगाने ०१ एप्रिल, २०१० प्रमाणे प्रारुप नियम प्रकाशित झाले. या दरम्यानच्या ३-४ वर्षांच्या कालावधीत कोणताही भाडेपट्टा देण्यात आला नाही. ही निश्चितच गंभीर बाब आहे. विभागाने या भाडेपट्टयामध्ये गैरव्यवहार वा घोटाळा टाळण्यासाठी आावश्यक ती शहानिशा, खबरदारी व उपाययोजना करून ही प्रक्रिया राबविणेऐवजी ती प्रक्रियाच स्थगित केली. अशाप्रकारे प्रलंबित अर्ज ९ व १२ महिन्यांच्या आत निकाली काढण्याच्या तरतुदीचेही पुर्णपणे उल्लंघन केले आहे. सुधारित नियमांचे प्रारुप माहे एप्रिल, २०१० मध्ये प्रकाशित झाले व ही सुधारणा सन २०१५ मध्ये मान्य झाली. या प्रक्रियेला एकूण लागलेला ५ वर्षांचा प्रदीर्घ कालावधी पाहता या कालावधीत तात्पुरत्या स्वरुपात देखील कोणताही भाडेपट्टा देण्यात आला नाही. परिणामी शासनाच्या महसूलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. नविन नियम अंतिम होत नाही तोपर्यंत जुने नियमच कायम राहत असतानाही प्रलंबित अर्जांवर निर्णय न घेतल्यामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणात महसूलाचे नुकसान तर झालेच शिवाय रोजगाराच्या संधी देखील त्या कालावधीत निर्माण होऊ शकल्या नाहीत. ही बाब निश्चितच गंभीर आहे. शासनाने कोणताही निर्णय घेतेवेळी व त्याची अंमलबजावणी करतेवेळी शासनाचे आर्थिक हित जोपासणे अपेक्षित व आवश्यक आहे. त्याचप्रमाणे घेतलेला निर्णय गुणवत्तेनुसार आहे हे समजण्यासाठी प्रक्रियेत पारदर्शकता देखिल असणे हे अत्यंत आवश्यक आहे. नेमक्या ह्या दोन्ही बाबींचा या प्रकरणात निश्चित अभाव दिसून येतो असे समितीचे स्पष्ट मत आहे. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे व याची गंभीर दखल विभागाने भविष्यात घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ७.२.२.२ "खनिकर्म भाडेपट्ट्याचे नूतनीकरण"

अभिप्राय

५.९ खनिकर्म सवलत नियम, १९६० च्या नियम २४ A(६) अनुसार राज्य शासनाद्वारे जर भाडेपट्ट्यांच्या समाप्तीपूर्वी खनिकर्म भाडेपट्टयाच्या नुतनीकरण आवेदनाचा निपटारा करण्यात आला नाही तर राज्य शासन त्यावर आदेश जारी करे पर्यंत त्या भाडेपट्ट्यांचा कालावधी तेवढया काळासाठी वाढविण्यात आला असे मानन्यात यावे. परंतु चुनखडीच्या ५२ भाडेपट्ट्यांपैकी सात भाडेपट्ट्यांचा कालावधी २००४-२०१० दरम्यान संपूष्टात आला. सातही भाडेपट्टेदारांनी खनिकर्म भाडेपट्ट्याच्या मे २००४ आणि जुलै २०१० दरम्यान नूतनीकरणाकरिता अर्ज केले होते. तथापि, एकाही भाडेपट्ट्याचे नुतनीकरण झाले नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात MMDR अधिनियमातील प्रस्तावीत बदल विचारात घेऊन अर्ज हेतू पूरस्सर प्रलंबित ठेवण्यात आले असे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले. सदर कालावधीमध्ये खाणपट्टा नुतनीकरण करण्यात आले नाही. खाण व खनिजे विकसन व विनियमन (सुधारणा) अधिनियम, १९५७ च्या प्रस्तावित बदलांच्या अनुषंगाने खाणपट्टा नुतनीकरणाबाबतचे अर्ज प्रलंबित ठेवण्यात आले होते. तथापि, खाण खनिजे सुधारित अधिनियम, २०१५ च्या कलम ८ च्या तरतुदीप्रमाणे सदर खाणपट्टे ५० वर्षांकरिता मुदतवाढ देण्यात आली आहे असे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस

५.१० महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात खनिकर्म सवलत नियम, १९६० च्या नियम २४ A (६) अनुसार कारवाई न करता खनिकर्म भाडेपट्ट्यांचे नूतनीकरण प्रलंबित ठेवून सदर कालावधीमध्ये खाणपट्टा नुतनीकरण करण्यात आले नाही. खाण व खनिजे विकसन व विनियमन (सुधारणा) अधिनियम, १९५७ च्या प्रस्तावित बदलांच्या अनुषंगाने खाणपट्टा नुतनीकरणाबाबतचे अर्ज प्रलंबित ठेवण्यात आले होते. अधिनियमातील प्रस्तावित बदल विचारात घेऊन अर्ज हेतू पुरस्सर प्रलंबित ठेवल्याचे विभागीय प्रतिनिधींनी विदित केले. अधिनियमातील प्रस्तावित बदलाच्या प्रक्रियेने सन २०१० ते २०१५ दरम्यान ५ वर्षांचा कालावधी घेतला व इतक्या प्रदिर्घ कालावधीदरम्यान हे सर्व अर्ज निर्णयाविना प्रलंबित ठेवले. परंतु नंतर खाण खनिजे सुधारित अधिनियम, २०१५ च्या कलम ८ च्या तरतुदीप्रमाणे सदर खाणपट्ट्यांना ५० वर्षांकरिता मुदतवाढ देण्यात आली आहे असे समितीसमोर सांगण्यात आले. यामुळे महालेखाकारांच्या परिच्छेदातील आक्षेपांचे निराकरण होते. परंतु ही कार्यपद्धती निश्चितच समर्थनीय व शासनाच्या आर्थिक हिताची नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. विभागाने विहित तरतुदीनुसार वेळच्यावेळी निर्णय घेणेसंदर्भात भविष्यात दक्षात घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ७.२.२.३ "खनिकर्म नियोजन/खनिकर्म योजनेस मान्यता"

५.११ (अ) खनिकर्म नियोजनापेक्षा जादा/ खनिकर्म योजनेस मान्यता मिळाल्याशिवाय खनिजांचे उत्पादन

अभिप्राय

खनिज संधारण व विकास नियमांच्या नियम ९ अंतर्गत खनिकर्म आराखडा हा राज्यातील खनिकर्म कार्यासाठी पूर्वापेक्षित आहे. खनिकर्म नियोजन खाणीचे नाव, मालक, अशुद्ध धातूच्या उत्खननाचे वेळी पाळावयाचे मानदंड इत्यादी आवश्यक तपशिल निर्देशित करतो.हे भारतीय खाण ब्युरो द्वारे मान्य केले आहे. चाचणी तपासणी केलेल्या तीन जिल्ह्यांत बॉक्साईट आणि चुनखडी भाडेपट्टयाची एकूण ६९ प्रकरणे होती. त्यापैकी लेखापरिक्षेने प्रत्येक जिल्हयातून सहा प्रकरणांची चाचणी तपासणी केली असता त्यात बहाल केलेल्या सर्व १८ भाडेपट्टयांचे खनिकर्म नियोजन भारतीय खाण ब्यूरो द्वारे मान्य करण्यात आले होते.

खनिज संधारण व विकास नियमांच्या नियम १२ अनुसार भारतीय खाण ब्युरोच्या कार्यक्षेत्रांतर्गत असलेल्या खाणींचे क्षेत्रीय नियंत्रक यांना पुढील पाच वर्षाकरीता खनिकर्म नियोजनाचा आढावा आणि खाणकामाची योजना सादर करावयास पाहिजे. खनिज संधारण व विकास नियमांच्या नियम १३ नुसार खनिकर्म प्रक्रिया ही मंजूर खनिकर्म नियोजन आणि योजनेनुसार करण्यात यावी आणि त्याचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास प्राधिकृत अधिकारी सर्व किंवा कोणत्याही एखाद्या खनन उपक्रमाबाबत स्थगिती आदेश देऊ शकतात.

परंतु खनिकर्म नियोजनात असे आढळले की, चुनखडीच्या एका प्रकरणांत आणि बॉक्साईटच्या एका प्रकरणांत भाडेपट्टेदारांनी अप्रत्यक्ष उत्खनन केलेली खनिजे मंजुर खनिकर्म नियोजनात दर्शविलेल्या उत्पादनापेक्षा जास्त होती. तसेच १८ पैकी तीन भाडेपट्टयांत खनिकर्म योजना आढळली नाही. विभागाने नमूद केले कि मूल्वेलास-हर्वित-कुडगाव बॉक्साईट खाण आणि दांडगुरी-खुजारे बॉक्साईट खाणी मध्ये बॉक्साईटचे उत्खनन खनिकर्म योजनेला मंजुरी प्राप्त न करता करण्यात आले होते. तसेच गिरगाव बॉक्साईट खाणीकरता कार्योत्तर मंजुरी प्राप्त करण्यात आली होती. भारतीय खाण ब्युरोने नमूद केले की या प्रकरणांमध्ये भाडेपट्टादाराने पुढील पाच वर्षांकरीता खनिकर्म योजना सादर केली नव्हती त्यामुळे सन २०१२-१३, २०१३-१४ या वर्षाचे उत्पादनाचे लक्ष्य लेखापरिक्षेस देण्यात आले नाही. अशा प्रकारे पट्टेदाराने उत्खनन केलेल्या ४.०३ लाख मे. टन खनिजांच्या रु. ६.२३ कोटी किंमतीची MMDR अधिनियमाच्या कलम २१(५) अंतर्गत वसूली करण्यात येत्र शकते, ज्यात असे विहित आहे की कोणतीही व्यक्ती ज्याने कोणत्याही अधिकाराशिवाय खनिजांचे उत्खनन केले त्याच्याकडून स्वामित्वधन इत्यादिसह खनिजांचे रकमेची वसूली करण्यात यावी. या तरतूदीकडे विभाग आणि IBM चे दुर्लक्ष झाल्यामुळे अतिरिक्त उत्पादन रोखण्यासाठी समयोचित कारवाई करता येऊ शकली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

या प्रकरणी मानदंडाच्या उल्लंघनावर कारवाई करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी महालेखाकारांसमवेतच्या निर्गमन परिषदेत मान्य देखील केले. तथापि, या परिच्छेदावर विभागाने दिलेल्या लेखी उत्तरात मात्र असे नमूद केले की, अवैध उत्खननाच्या विदयमान परिभाषेमध्ये सदर बाब समाविष्ट होत नाही. एमएमडीआर ॲक्टच्या कलम ४ मध्ये अवैध उत्खननाची परिभाषा पुढीलप्रमाणे नमूद केली आहे.

" illegal mining means any reconnaissance or prospecting or mining operation undertaken by any person or a company in any area without holding a reconnaissance permit or a prospecting licence or as the case may be a mining lease, as required under sub-section (*1*) of section 4 of the Act ".

महालेखाकारांनी काढलेल्या आक्षेपात एकूण ०५ खनिपट्टयांपैकी रायगड जिल्हयातील मुल-वेलास-हरवीट-कुडगांव बॉक्साईट माईन्स क्षेत्र ५०.२१ हे. व दांडगुरी खुजारे बॉक्साईट माईन्स क्षेत्र ७१.४२ हे. या खाणीतील खाणकाम योजनेनुसार झालेले नसल्याचे आढळून आल्यामुळे सदर दोन्ही खाणपट्टाधारकांना भारतीय खाण ब्यूरो यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली होती. परंतु तद्नंतर दोन्ही खाणपट्टाधारकांनी आक्षेपांची पूर्तता केल्यामुळे सदर खाणपट्टयाचे निलंबन आदेश भारतीय खाण ब्यूरो कार्यालयाद्वारे दिनांक ३१.५.२०१६ चे पत्रान्वये रद्द करण्यात आले होते.

खाणकाम योजनेच्या मंजूरीच्या अनुषंगाने खाणपट्टा धारकांकडून नियमाचे पालन होत असल्याची पडताळणी करण्याची कार्यवाही Mineral Conservation and Development Rules, 1988 अंतर्गत भारतीय खाण ब्युरो यांच्याकडून करण्यात येते. सन २०१४-१५ पासून भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांनी Integrated Lease Management System उपयोगामध्ये आणली आहे. त्यान्वये खाणपट्टाधारकास वाहतूक परवाना देत असताना त्याच्या खाणकाम योजनेमध्ये मंजूर असलेल्या क्षमतेची गणना करण्यात येते. सदर ILMS प्रणाली द्वारे मंजुर खाणकाम योजनेच्या अनुषंगाने वाहतूक परवाने देण्यात येतात असेही विभागीय प्रतिनिधींद्वारे समितीस सांगण्यात आले.

महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप अतिशय गंभीर असून समितीने यावर विस्तृत चर्चा केली. या प्रकरणांची नेमकी वस्तुस्थिती समितीने विचारली असता, यात रिव्हाइव्ह ऑफ मायनिंग प्लॅन ॲन्ड मोडीफिकेशन ऑफ मायनिंग प्लॅन अशा दोन्ही बाबींना आयबीएम मंजुरी देते व त्या आधारेच आयबीएमने खाणपट्टा निलंबित करून पुन्हा ते निलंबन रद्द करण्यात आले. समितीने यावर गंभीर आक्षेप नोंदवित आयबीएम ही केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आस्थापना असून महालेखाकारांनी सदरहू आक्षेप हे राज्य शासनाच्या कार्यपद्धतीबाबत नोंदविलेले असून या प्रकरणी राज्य शासनाचा महसूल मोठ्या प्रमाणात बुडालेला आहे. अशा प्रकारे अतिरिक्त उत्खननाची प्रकरणे नंतर नियमानुकूल केल्यास उत्खननाचे परिमाण विहीत करण्यास कोणताही अर्थ राहणार नाही. किंबहूना मंजूर परिमाणापेक्षा जास्त उत्खननास अशा बाबी प्रवृत्त करणाऱ्या आहेत. परिणामी विहीत परिमाणापेक्षा अतिरिक्त उत्खनन करून ते नंतर नियमानुकूल करून घेण्याचा सोपा मार्ग विभागाने सदरहू प्रकरणाच्या माध्यमातून उपलब्ध करून दिला आहे जे अधिकच गंभीर व धोकादायक आहे. वास्तविकत: जेवढ्या उत्खननाची परवानगी दिली आहे त्यापेक्षा जास्त उत्खनन झाल्यास त्यास अनधिकृत उत्खनन समजून स्वामित्वधन व दंडाची रक्कम आकारणे त्याचप्रमाणे खाणपट्टा रद्द करण्याची कार्यवाही विभागाच्या स्तरावरुन होणे आवश्यक असताना अशा प्रकारे जर विभाग अतिरिक्त उत्खनन नियमानुकूल करीत असेल तर ही बाब भविष्यात अतिरिक्त व अनधिकृत उत्खननास निश्चितच पाठबळ देणारी असून खाणपट्टेधारकांच्या मनात कोणतेही कारवाईचे भय भविष्यात राहणार नाही जे अधिकच धोकादायक राहील. उपरोक्त प्रकरणी विभागाने फक्त स्वामित्वधनाच्या रकमेची वसूली केली. परंतु जवळजवळ कोट्यावधी रुपयांचा वसुलपात्र दंड मात्र वसूल केला नाही. खाणपट्टेधारकाला विहीत कालावधीसाठी व निश्चित परिमाणाएवढ्या उत्खननाची जर परवानगी दिली असेल व त्यांनी एखाद्या वर्षी अतिरिक्त उत्खनन केले असेल तर त्यास अनधिकृत उत्खनन न मानता भाडेपट्टयाच्या पुढील वर्षात त्या अतिरिक्त उत्खननाचे समायोजन करून ते नियमानुकूल करणे अशी कारवाई करण्याबाबतचे समर्थन विभागाच्या स्तरावरुन समितीसमोर करण्यात आले. विभागाचे हे समर्थन व स्पष्टीकरण महालेखाकारांना व समितीला मान्य नाही. मंजूर उत्खननाच्या मर्यादेपलिकडे जर अतिरिक्त उत्खनन झाले असेल तर ते अनधिकृतच असल्याची व त्याअनुषंगाने पुढील कारवाई करण्याचे महालेखाकारांचे व समितीचे स्पष्ट मत आहे व यामधून खाणपट्टेधारकाने उत्खनन केलेल्या ४,०३,००० मेट्रीक टन खनिजाचे रु.६ कोटी २३ लक्ष इतकी रक्कम वसुलपात्र असताना त्याची वसुली करण्यात आली नाही असे असतानाही विभागाने यात उल्लंघन झाल्याचे मान्य करीत नाही. जर करारनाम्यात नमूद केलेल्या परिमाणाचे पालनच विभागाला करायचे नाही व त्याचे पुढील वर्षात विभागाला समायोजन करायचे असेल तर मग ही मर्यादा विहीत करण्याचा काय उपयोग असाही प्रश्न उद्‌भवतो. विभागाला जर हे नियमानुकूलच करायचे होते तर त्यांनी करार रिव्हाइज का करून घेतला नाही हा पण प्रश्न उद्‌भवतो. कराराचा कालावधी सुरू असल्यामुळे अतिरिक्त उत्खननास अनधिकृत उत्खनन मानण्यास विभागीय प्रतिनिधी तयार नाही व विभागीय प्रतिनिधींची ही भूमिका समितीस व महालेखाकारांना मान्य नाही. अशा परिस्थितीत यासंदर्भात कायद्यात अस्तित्त्वात असलेल्या तरतूदी तसेच विभागाने सदरहू प्रकरणी केलेली कार्यवाही व महालेखापालांनी नोंदविलेल्या आक्षेपासंदर्भात विभागाने राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाकडून या प्रकरणी तात्काळ अभिप्राय घ्यावे असे समितीने निदेश दिले. त्याअनुषंगाने विधी व न्याय विभागाकडून अभिप्राय प्राप्त झाले असून त्यांनी महालेखापालांनी नोंदविलेल्या आक्षेपाचे समर्थन करत अतिरिक्त उत्खनन हे अनधिकृत उत्खनन असल्याचे अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिले आहेत. त्याचप्रमाणे अशा अतिरिक्त उत्खनन प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने देखील निर्णय दिलेला असून त्याची सुद्धा अंमलबजावणी होणे गरजेचे आहे असेही अभिप्रायात नमूद केले. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या SLP क्र.११४/२०१४ व १९४/ २०१४ चे न्यायनिर्णयाप्रमाणे प्रस्तावित आराखड्याच्या २०% जास्त उत्खनन झाल्यास अवैध ठरविण्यात आले आहे. विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायाच्या अनुषंगाने विभागाकडून कार्यवाही करण्यात येईल असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर स्पष्ट केले.

विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करून विभागाकडून, यवतमाळ जिल्ह्यातील अडेगांव डोलोमाईट आणि चुनखडी खाणी मध्ये सन २०१०-११ मध्ये खनिकर्म योजनेपेक्षा ११,९९२ मे.टन जादा उत्पादनाबाबत महालेखाकार कार्यालयांकडून काढण्यात आलेल्या आक्षेपानुसार संबंधित खाणपट्टाधारकास रु.१४,९९,०००/- खनिज मूल्य दंड आकारण्यात येऊन, त्वरित सदर रकमेचा भरणा करणेबाबत दिनांक २८/९/२०१८ अन्वये संबंधित जिल्हा खनिकर्म कार्यालयाकडून सूचित करण्यात आले आहे. संबंधितांविरुद्ध सक्तीच्या वसुलीची प्रक्रिया सुरू करणेत आली असून, मागणीच्या नोटीसीच्या ९० दिवसांच्या आंत वसुलीची प्रक्रिया पूर्ण करणेत येईल असेही समितीस सांगण्यात आले.

त्याचप्रमाणे रायगड जिल्ह्यातील मेघरे खनिपट्टयात सन २००९-१०, २०१०-११ व २०१३-१४ मध्ये उत्पादन मर्यादेपेक्षा जास्त उत्खननाबाबत महालेखाकार कार्यालयाकडून काढलेल्या आक्षेपाचे अनुषंगाने सादर करण्यात आले की, सदर खनिपट्टयाचे परिवर्तित खाणकाम आराखडा (Modified Mining plan) नुसार सन २००८-०९ ते २०१२-१३ या वर्षाकरिता मंजूर एकूण उत्पादन मर्यादा २,४०,००० मे.टन असून एकूण १,९६,२०० मे.टन उत्पादन करण्यात आले आहे. तसेच त्यापुढील सन २०१३-१४ ते २०१७-१८ करिता मंजूर आराखड्यानुसार उत्पादन मर्यादा ४,६१,८१६ मे.टन असून संबंधित खाणपट्टाधारकाकडून सदर कालावधीत एकूण ३,०९,९८० मे. टन उत्पादन करण्यात आले.

महालेखाकार कार्यालयाकडून काढण्यात आलेल्या आक्षेपानुसार काही वर्षांत मर्यादेपक्षा जास्त उत्खनन झाले असले, तरी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाप्रमाणे वरिलप्रमाणे झालेले उत्खनन हे प्रस्तावित आराखडा मर्यादेचे आतच आहे असेही समितीस कळविण्यात आले आहे. तसेच रायगड जिल्ह्यातील मुल-वेळास-हरवीट-कुडगांव बॉक्साईट माईन्स क्षेत्र ५०.२१ हे. या खाणीतील खाणकाम खनिकर्म योजनेनुसार झालेले नसल्याचे आढळून आल्याने, सदर दोन्ही खाणपट्टाधारकांना भारतीय खाण ब्यूरो कार्यालयाकडून कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली होती व तद्नंतर खाणपट्टाधारकांनी आक्षेपांची पुर्तता केल्यामुळे सदर खाणपट्टयांचे निलंबन आदेश भारतीय खाण ब्यूरो कार्यालयाद्वारे दिनांक ३१/५/२०१६ चे पत्रान्वये रद्द करण्यात येऊन, खाणपट्टे पुनर्जिवित करण्यात आलेले आहेत. तरी संबंधित खाणपट्टाधारकास अनुक्रमे रु.१,०५,४१,०००/- व रु.२,५१,४६,०००/- असे एकूण रु.३,५६,८७,०००/- इतके खनिज मूल्य दंड आकारण्यात येऊन, त्वरित सदर रकमेचा भरणा करणेबाबत दिनांक १७/१०/२०१८ अन्वये संबंधित जिल्हा खनिकर्म कार्यालयाकडून सूचित करण्यात आले आहे. संबंधितांविरुद्ध सक्तीच्या वसुलीची प्रक्रिया सुरू करणेत आली असून, मागणीच्या नोटीसीच्या ९० दिवसांपर्यंत वसुलीची प्रक्रिया पूर्ण करणेत येईल.

गिरगांव बॉक्साईट खाण मध्ये सन २०१०-२०११ व सन २०११-२०१२ या वर्षात कंपनीद्वारे अनुक्रमे १२४१३० व ४९४०० मे.टन बॉक्साईट खनिजाचे उत्खनन हे नियमानुसार आवश्यक मंजूर अधिकृत तथा मंजूर खाणकाम कार्यक्रम योजनेअभावी करण्यात आले. सदरहू बाब ही भारतीय खाण ब्यूरो, गोवा यांच्यामार्फत केलेल्या स्थळ पाहणी दरम्यान निदर्शनास आली. करिता सदर प्रकरणी MCDR १९८८ च्या नियम १३(१) चे उल्लंघन केल्याने MCDR १९८८ च्या नियम १३(२) नुसार भारतीय खाण ब्यूरो, गोवा यांचेकडील दिनांक २३/१२/२०११ च्या आदेशान्वये सदर खाणपट्टा निलंबित करण्यात आला. संबंधित खाणपट्टाधारकाकडून आवश्यक बाबींची पुर्तता झाल्यानंतर भारतीय खाण ब्यूरो, गोवा यांचेकडील दिनांक ११/४/२०१२ पत्रान्वये खाणपट्टयाचे निलंबन परत घेण्यात आले. निलंबनाच्या कालावधीमध्ये संबंधित खाणपट्टाधारकाद्वारे उत्खनन करण्यात आलेले नाही.

सदर प्रकरणी अधिकृत तथा मंजूर खाणकाम कार्यक्रम योजनेअभावी उत्खनन केल्यामुळे संबंधित खाणपट्टाधारकाविरुद्ध MCDR १९८८ च्या नियम १३(२) नुसार निलंबनाची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तरी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या SLP क्र. ११४/२०१४ व १९४/२०१४ या प्रकरणातील ऑगस्ट, २०१७ च्या आदेशातील निर्देशानुसार खनिपट्टाधारकांकडून रु. ५,३२,९५,४०१/- खनिज मुल्याची मागणीची नोटीस देणेत आली आहे. संबंधितांविरुद्ध सक्तीच्या वसुलीची कार्यवाही सुरू असून ९० दिवसांच्या आत रक्कम वसुल करणेत येईल असेही विभागीय प्रतिनिधींद्वारे समितीस आश्वासित करण्यात आले.

शिफारस

५.१२ महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप अत्यंत गंभीर असून शासनाच्या महसूलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान करणारे आहे. खनिज ही मौल्यवान नैसर्गिक संपत्ती आहे. जी सीमित असून पुनःस्थापित होऊ शकत नाही. खनिज समन्वेषण आणि विकास हे राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या विकासास जोडणारा निकटचा दुवा आहे. तथापि, ते पर्यावरण आणि सामाजिक संरचना यांचेशी जुळले असल्यामुळे स्थायी विकास साधण्याकरिता खनिजांचे संधारण आणि उत्खनन यांच्यात सुसंवाद आणि संतुलन राखणे गरजेचे आहे. खनिज संपत्तीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी केंद्र व राज्य शासन यांच्यात विभागली आहे. खनिजांचे वर्गीकरण मुख्य खनिजे (कोळसा, बॉक्साईट, चुनखडी, अशुद्ध लोखंड इ.) आणि गौण खनिजे (रेती, खडक, मुरुम, साधी माती इ.) असे करण्यात आले आहे. गौण खनिजांच्या समुपयोजना बाबत कायदे करण्याचे अधिकार राज्यास प्रदान केले आहेत. महाराष्ट्रात खाण आणि खनिजांपासून प्राप्त होणारा महसुली जमा हा व्याजप्राप्ती नंतर सर्वात मोठा महसूल आहे. याची प्राप्ती ही बहुदा भाडे, स्वामित्वधन, शुल्क, दंड आणि शास्ती इत्यादी प्रकारांपासून होते. यात खनिजांपासून होणाऱ्या प्राप्तीच्या आवर्धनाकरिता पर्याप्त नियम आणि पद्धती अवलंबिण्यात आल्या, खनिज प्राप्तीची आकारणी आणि वसुली हे वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या अधिनियम, नियम आणि आदेश यांच्या तरतूदींनुसार करण्यात आली होती, अनधिकृत उत्खननाचा योग्य वेळी शोध लावण्याकरिता आणि खनिजांच्या अवैध वाहतूकीवर आळा घालण्याकरिता एखादी यंत्रणा कार्यरत होती या बाबींची खात्री करण्याचे लेखापरिक्षणाचे उद्दिष्ट होते. असे असताना खाणपट्टेधारकाला भाडेपट्टयामधील मंजूर उत्खननाच्या परिमाणापेक्षा जास्त केलेल्या उत्खननास अवैध उत्खनन न मानता या अतिरिक्त उत्खननास पुढील आर्थिक वर्षात समायोजन करणे ही बाब अत्यंत आक्षेपार्ह असून समिती व महालेखाकार या दोहोंनी देखील यावर आक्षेप नोंदवित हे अवैध उत्खनन असल्याचे विदित केले. अशा प्रकारे अतिरिक्त उत्खननाची प्रकरणे नंतर नियमानुकूल केल्यास उत्खननाचे परिमाण विहीत करण्यास कोणताही अर्थ राहणार नाही. किंबहूना मंजूर परिमाणापेक्षा जास्त उत्खननास अशा बाबी प्रवृत्त करणाऱ्या आहेत. परिणामी विहीत परिमाणापेक्षा अतिरिक्त उत्खनन

करून ते नंतर नियमानुकूल करून घेण्याचा सोपा मार्ग विभागाने सदरहू प्रकरणाच्या माध्यमातून उपलब्ध करून दिला आहे जे अधिकच गंभीर व धोकादायक आहे. वास्तविकतः जेवढ्या उत्खननाची परवानगी दिली आहे त्यापेक्षा जास्त उत्खनन झाल्यास त्यास अनधिकृत उत्खनन समजून स्वामित्वधन व दंडाची रक्कम आकारणे त्याचप्रमाणे खाणपट्टा रद्द करण्याची कार्यवाही विभागाच्या स्तरावरुन होणे आवश्यक असताना अशा प्रकारे जर विभाग अतिरिक्त उत्खनन नियमानुकूल करीत असेल तर ही बाब भविष्यात अतिरिक्त व अनधिकृत उत्खननास निश्चितच पाठबळ देणारी असून खाणपट्टेधारकांच्या मनात कोणतेही कारवाईचे भय भविष्यात राहणार नाही जे अधिकच धोकादायक राहील. जर करारनाम्यात नमूद केलेल्या परिमाणाचे पालनच विभागाला करायचे नाही व त्याचे पुढील वर्षात विभागाला समायोजन करायचे असेल तर मग ही मर्यादा विहीत करण्याचा काय उपयोग असाही प्रश्न उद्भवतो. यासंदर्भात विधी व न्याय विभागाकडूनही अभिप्राय घेतले असता त्यांनी देखील मंजूर परिमाणापेक्षा अतिरिक्त झालेले उत्खनन हे अवैध असल्याचे अभिप्राय दिले. यासोबतच मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयात प्रस्तावित आराखड्याच्या २० टक्के पेक्षा जास्त उत्खनन झाल्यास ते अवैध ठरविण्यात आले आहे. याअनुषंगाने विभागाने सदरहू खाणपट्टेधारकांना अवैध उत्खननाच्या रकमेची वसुली संदर्भात नोटीसी बजाविण्यात आलेल्या आहेत. अशा परिस्थितीत सदरहू आक्षेपित प्रकरणांमध्ये प्रलंबित असलेली वसुलपात्र रक्कम तात्काळ वसुल करण्यात यावी. त्याचप्रमाणे महालेखाकारांनी केवळ नमुन्यादाखल केलेल्या काही प्रकरणांच्या तपासणीत या गंभीर बाबी निदर्शनास आल्या. राज्यात अन्यत्रही अतिरिक्त उत्खननाबाबतच्या सर्व प्रकरणांची विभागाने तपासणी करावी व त्याअनुषंगाने वसूलपात्र रक्कम तात्काळ वसूल करावी. या संपुर्ण प्रकरणात शासनाच्या महसूलाचे नुकसान झालेले असल्यामुळे कायदेशीर तरतूदीचा योग्य अर्थ न लावता त्याचप्रमाणे शासनाचे आर्थिक हित कशात आहे याची नियमानुसार तपासणी न केल्यामुळे शासनाचे यात मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहेत. अतः या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर विभागाने तात्काळ कारवाई करावी व या संपुर्ण प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(ब) पर्यावरण मंजुरी प्रमाणपत्र, खनिकर्म योजना आणि प्रत्यक्ष उत्पादन यांच्यातील खनिज उत्पादनातील तफावत

५.१३ भारत सरकार (GoI) द्वारे पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ अंतर्गत दिनांक १४ सप्टेंबर २००६ ला निर्गमित अधिसुचनेनुसार खनिकर्म प्रकरणांत पर्यावरण आणि वन मंत्रालय (MoEF) यांचेकडून पर्यावरण मंजुरी खनिकर्मापुर्वीच घ्यावयास पाहिजे. पर्यावरण मंजुरीत इतर गोष्टींबरोबरच विशिष्ट क्षेत्रातून उत्खनन करावयाच्या असलेल्या खनिजांचे परिमाण दर्शविले असते. परंतु भूशास्त्र आणि खनिकर्म, पर्यावरण व वन मंत्रालय आणि भारतीय खाण ब्युरो, (GoI) यांच्यात खनिजांचे अतिरिक्त उत्पादनाचा शोध घेण्यासाठी खनिज उत्खनन/ उत्पादन याबाबत कमाल मर्यादा निश्चित करण्याबाबत समन्वयन नाही. पर्यावरण मंजुरीत नमूद परिमाण, खनिकर्म योजनेत नमूद परिमाण आणि प्रत्यक्ष उत्खनन केलेले परिमाण भिन्न भिन्न होते. प्रत्यक्ष उत्पादन पर्यावरण मंजुरीपेक्षा २५९.४४ टक्क्यांने जास्त असून खनिकर्म योजनेपेक्षा ५३.८८ टक्के कमी आहे.या तफावती बाबतची कारणे दस्तावेजांत उपलब्ध नाहीत आणि विभागानेही स्पष्ट केली नाहीत असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात भारतीय खाण ब्युरोने नमूद केले कि पर्यावरण मंजुरी त्यांच्या अखत्यारित येत नाही व ते फक्त खनिकर्म नियोजन/ योजनेशी संबंधित आहेत. वरिल तथ्यांवरून असे निर्देशित होते कि विभागामध्ये आपसांत एखाद्या खाणीतून खनिज उत्खननाबाबत एकसारखे लक्ष्य निश्चित करण्याबाबत समन्वय नाही. महसूल आणि पर्यावरण यांच्या हितासाठी महाराष्ट्र शासनाने उत्खननाचे एकसारखे लक्ष्य ठरविण्याबाबतची बाब भारत सरकारकडे मांडावयास पाहिजे.

संचालनालयाद्वारे राज्यातील प्रमुख खनिजांकरीता मंजूर खाणपट्ट्यांमध्ये मान्यताप्राप्त खाणकाम कार्यक्रम योजनेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा जास्तीचे उत्खनन करणे तसेच पर्यावरण विषयक परवानगीमध्ये मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा जास्त उत्खनन व वाहतूक करणाऱ्या खाणपट्टाधारकांविरुद्ध दंडात्मक कार्यवाही करण्याचे परिपत्रकांद्वारे वेळोवेळी जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना निर्देशित करण्यात आल्याचे समितीस सांगण्यात आले. तसेच राज्य शासनाने N-code Solution, Gujarat यांचे मार्फत ILMS (एकात्मिक खाणपट्टा व्यवस्थापन प्रणाली) विकसित करून त्याद्वारे खाणकाम योजना व पर्यावरण विषयक मंजुरीपेक्षा उत्खनन जास्त होवू नये यास आळा बसविणे शक्य झालेले आहे. तसेच अवैध उत्खनन/वाहतूकीस नियंत्रण ठेवण्याकरिता ऑनलाईन वाहतूक परवाना देण्यात येत आहे असेही समितीसमोर विदित करण्यात आले.

शिफारशी

५.१४ (१) पर्यावरण मंजूरी प्रमाणपत्र, खनिकर्म योजना आणि प्रत्यक्ष उत्पादन यांच्यातील खनिज उत्पादनातील तफावत यसंदर्भात महालेखाकारांनी सदरहू आक्षेप नोंदविलेले आहेत. संचालनालयाद्वारे राज्यातील प्रमुख खनिजांकरिता मंजूर खाणपट्ट्यांमध्ये मान्यताप्राप्त खाणकाम कार्यक्रम योजनेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा जास्तीचे उत्खनन करणे तसेच पर्यावरण विषयक परवानगीमध्ये मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा जास्त उत्खनन व वाहतूक करणाऱ्या खाणपट्टा धारकांविरुद्ध दंडात्मक कारवाई करणे यासंबंधीचा मूळ आक्षेप या परिच्छेदात नोंदविला आहे. जेवढे पर्यावरण मंजूरीमध्ये मंजूर परिमाण आहे तेवढ्यापर्यंतच खनिज उत्खननाची प्रक्रिया सिमित ठेवली पाहिजे व त्यापेक्षा जास्त झालेले उत्खनन हे उल्लंघन समजून योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे परंतु तसे न केल्यामुळे सदरहू आक्षेप नोंदविण्यात आलेले आहे. ५० हेक्टरपेक्षा कमी ज्या खाणी आहेत त्यासाठी राज्य शासनाच्या स्तरावर इन्वॅक्ट असेसमेंट ॲथॉरिटी आहे. ज्यामध्ये कारवाई करण्याचे अधिकारही राज्य शासनाला आहे व ५० हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रफळासाठी केंद्र सरकारची जबाबदारी आहे. पर्यावरण विभागाच्या उत्खननाच्या परवानगीची मर्यादा, व खनिकर्म विभागाची मर्यादा व वास्तविक उत्खनन यात कुठेही सुसंगतता व समन्वय नाही, हेच उपरोक्त आक्षेपावरुन स्पष्ट होते. यात पर्यावरण विभागाची मर्यादा किती असावी व जिल्हा खनिकर्म योजनेची मर्यादा किती असावी याचे निरीक्षण खनिकर्म अधिकाऱ्याने करणे आवश्यक असताना तसे केल्याचे दिसून येत नाही. अतः या संपुर्ण प्रकरणाची तपासणी करून १ महिन्यात माहिती देण्याबाबत विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले. त्याअनुषंगाने विभागाने समितीस कळविले की, राज्यातील रायगड, कोल्हापूर, रत्नागिरी या ३ बॉक्साईट खनिज जिल्ह्यातील अभिलेख्याची तपासणी केली असता, रायगड जिल्ह्यातील १ प्रकरणी खाणकाम योजनेअभावी उत्खनन केल्याने संबंधित खाणपट्टाधारकास रु.९,०८,३६,५९४/- इतक्या रक्कमेची नोटीस बजाविण्यात आली आहे. संबंधितांविरुद्ध सक्तीच्या वसुलीची प्रक्रिया सुरू करणेत आली असून, मागणीच्या नोटीसीच्या ९० दिवसांपर्यंत वसूलीची प्रक्रिया पूर्ण करणेत येईल. बॉक्साईट खनिजाबाबत वरीलप्रमाणे नमूद ३ प्रकरणे व रायगड जिल्ह्यातील १ प्रकरण वगळता पर्यावरण अनुज्ञप्ती आणि खाणकाम योजना यांचे उल्लंघन झाल्याची प्रकरणे आढळून आलेली नाही. तरी भविष्यात अशा प्रकारची प्रकरणे आढळून आल्यास त्याबाबत नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींद्वारे समितीस सांगण्यात आले. याशिवाय बॉक्साईट वगळता इतर प्रमुख खनिपट्ट्यांबाबत अभिलेखाची तपासणी केली असता, यवतमाळ जिल्ह्यात पर्यावरण मंजूरीशिवाय खाणकाम केलेले १७ प्रकरणे आढळून आले असून एकूण रु.११.०२ कोटीचा दंड आकारण्यात आलेला आहे. त्यापैकी १ खणिपट्टाधारकाकडून रु.३६.४१ लक्ष शासन जमा करण्यात आले आहे. चंद्रपूर जिल्ह्यात पर्यावरण ना-हरकत परवानगीशिवाय खाणकाम केलेले २ प्रकरणे आढळून आले असून, संबंधित खाणपट्टाधारकांना नोटीस बजावून १००% खनिज मूल्य वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे असेही समितीस सांगण्यात आले.

गडचिरोली जिल्ह्यातील लोहखनिज खनिपट्ट्याअंतर्गत १ प्रकरणात खाणकाम योजनेपेक्षा जास्त लोहखनिजाचे उत्खनन झाल्याचे आढळले असून त्यावर कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच कोळसाबाबत नागपूर व यवतमाळ जिल्ह्यात पर्यावरण अनुज्ञप्ती आणि खाणकाम योजना यांच्या उल्लंघन झाल्याची प्रकरणे आढळून आलेली नाही. चंद्रपूर जिल्ह्यात कोळसा खनिपट्ट्यांचे अभिलेखाची तपासणीची कार्यवाही सुरू आहे असेही समितीसमोर सांगण्यात आले.

सदर आक्षेपाचे अनुषंगाने पर्यावरण अनुमती व खनिकर्म योजना मंजूरी यातील उत्पादन मर्यादेनुसार मुल-वेळास-हरविट-कुडगांव, कुरवाडे-मराळ, दांडगुरी खुजारे या ३ बॉक्साईट खाण खाणपट्टाधारकास झालेल्या (अनुक्रमे ४७६५५ मे. टन, ३२३७५० मे. टन, १३६८०० मे. टन) जादा उत्पादन/अवैध उत्खननाबाबत अनुक्रमे रु. १,२५,३६,६७१/-, रु. ७,७८,४१,५००/- व रु.३,५०,३०,१००/- इतके खनिज मूल्य दंड आकारण्यात येऊन, सदर रक्कमेचा त्वरित भरणा करण्यास संबंधित जिल्हा खनिकर्म कार्यालयाकडून दिनांक २६/९/२०१८ अन्वये नोटीस बजाविण्यात आली आहे. संबंधितांविरुद्ध सक्तीच्या वसुलीची कार्यवाही सुरू असून, ९० दिवसाच्या आत रक्कम वसूल करणेत येईल असे विभागीय प्रतिनिधींद्वारे समितीस आश्वासित करण्यात आले. त्याप्रमाणे तात्काळ वसुली करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यास देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

५.१५ (२) यात अधिक गंभीर बाब म्हणजे विहीत मर्यादेचे उल्लंघन सर्रासपणे होत असताना संबंधित कर्मचारी अधिकाऱ्यांचे याकडे दुर्लक्ष होणे किंबहुना जाणुनबुजून दुर्लक्ष करणे याचीदेखील दखल या ठिकाणी घेणे आवश्यक आहे. या सर्व बाबी नियमानुसार पाहण्याची ज्या अधिकाऱ्यांची जबाबदारी होती त्यांनी याकडे दुर्लक्ष केले. परंतु कोणत्याच

अधिकाऱ्यांवर विभागाने आजतागायत कारवाई केली नाही. महालेखाकारांनी सन २०१४-२०१५ या वर्षासाठी आक्षेप नोंदविलेले असून गत ४-५ वर्षात विभागाने या प्रकरणी कोणतीही कारवाई केली नाही. वास्तविकतः समितीच्या बैठकीला येणे पुर्वी संबंधितांवर संपुर्ण कारवाई करूनच विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर येणे आवश्यक होते. परंतु केवळ समितीने साक्ष लावल्यामुळे विभाग आता या प्रकरणी कारवाईला सुरूवात करीत आहे. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. शासनाच्या महसूलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असतानाही इतक्या गंभीर प्रकरणामध्ये देखिल विभागाची भुमिका अत्यंत उदासिन व शासनाच्या आर्थिक हिताच्या विरुद्ध व प्रशासनिक शिस्तबद्धतेच्या विरुद्ध असल्याचे समितीला दिसून येते.

महालेखाकारांनी केवळ नमुन्यादाखल काही खाणीसंदर्भात केलेल्या लेखापरीक्षणात इतके गंभीर आक्षेप नोंदविण्यात आले आहे. राज्यात सर्वत्र हीच कार्यपद्धती व परिस्थती असणार याबाबत समितीला शंका नाही. सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या आदेशामध्ये मंजूर उत्खननाच्या परिमाणात २०% पर्यंतची ज्यादा उत्पन्नाची मुभा ठेवलेली आहे. परंतु या प्रकरणांमध्ये तर जवळजवळ २५९ टक्के खनिज जास्त उत्खनन केलेले आहे, जे कोणत्याही परिस्थितीत निश्चितच समर्थनीय ठरू शकत नाही. या सर्व खाणींवर केंद्र शासनातर्फे आयबीएम व राज्य शासनातर्फे खनिकर्म विभाग व पर्यावरण विभाग असे दुहेरी नियंत्रण असतानाही इतक्या गंभीर बाबी घडू शकत नाहीत व घडणे अपेक्षितही नाही. परंतु अशाही परिस्थितीत खाणपट्टाधारकाने मुक्त हस्ते परिमाणाचे उल्लंघन करीत उत्खनन मर्यादेबाहेर सुरूच ठेवले. ही सर्व प्रकरणे पाहता वास्तविकतः या सर्व प्रकरणांची विशेष तपासणी पथकाद्वारे चौकशी करून दोषींवर कारवाई करणे आवश्यक असताना विभागाने संबंधितांवर आजतागायत कारणे दाखवा नोटीस देखील बजावली नाही. यावरुनच विभागाने या आक्षेपांना किती गांभीर्याने घेतले हे दिसून येते. अशा परिस्थितीत विभागाने आजतागायत या खाणपट्टाधारकांना तसेच संबंधित दोषी अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचे काम केले आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. अतः संपुर्ण राज्यात अशा प्रकरणाची तपासणी करण्यात यावी व खाणपट्टेधारकांवर कडक कारवाई करण्यात यावी. त्याचप्रमाणे या संपुर्ण प्रकरणात दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर देखील तात्काळ कारवाई करण्यात यावी. तसेच या वसुलींच्या नोटीस संदर्भात न्यायालयात आव्हान देवून त्यावर स्थगिती मिळविण्याचा प्रयत्न होऊ शकतो. यासाठी विभागाने अगोदरच न्यायालयात कॅव्हियेट (Caveat) दाखल करावा व तात्काळ खाणमालकांवर व अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

५.१६ (३) यात आणखी महत्त्वाची बाब म्हणजे बॉक्साईटच्या आताच्या दरामध्ये व त्यावेळेसच्या दरामध्ये खुपच तफावत आहे. त्यावेळेस बॉक्साईटचे दर हे फार जास्त होते, जे आता खुप कमी झालेले आहे. अतः वसुलपात्र, स्वामित्वधन व दंडाची रक्कमेची निश्चिती करताना तत्कालीन बॉक्साईटचा दर विचारात घेऊनच वसुलपात्र रकमेची निश्चिती करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(४) भाडेपट्टेदारांनी एकतर खनिकर्म नियोजनापेक्षा जास्त उत्खनन केले अथवा खनिकर्म योजना मंजूर झाल्याविना उत्खनन केले. खनिजांचे उत्खनन/उत्पादनासाठी एकसमान कमाल मर्यादा राखण्यासाठी संचालक, भूशास्त्र व खनिकर्म, पर्यावरण व वन मंत्रालय आणि IBM (केंद्र शासन) यांच्यात समन्वयन नव्हते. पर्यावरण मंजुरीत नमूद केलेले परिमाण, खनिकर्म योजनेत दिलेले परिमाण आणि भाडेपट्टेदाराने प्रत्यक्ष केलेले परिमाण यांच्यात तफावत होती. शासनाने खनिजांच्या उत्खननाची कमाल मर्यादा निश्चित करण्यासाठी जबाबदार असलेल्या संबंधित विभागांमध्ये समन्वय साधण्यासाठी एक पद्धती विकसित करावी आणि खनिजांच्या उत्खननासाठी एकसमान लक्ष्य निर्धारीत करावे. खनिजांचे उत्खनन मंजूर खनिकर्म नियोजन अथवा योजनेनुसार होत आहे यावर संनियंत्रण ठेवावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ७.२.२.४ "पर्यावरण मंजुरी रद्द करण्यात विलंब"

अभिप्राय

५.१७ एखादया व्यक्तीने कायदेशीर प्राधिकाराशिवाय खनिज उत्पत्ती केली असल्यास त्या व्यक्तीकडून स्वामित्वधन इत्यादीसह खनिजाच्या किंमतीची वसूली करण्याबाबतची तरतूद MMDR अधिनियमाच्या कलम २१(५) मध्ये विनिर्दिष्ट आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ४ ऑगस्ट, २००६ च्या आदेशाप्रमाणे कोणत्याही राष्ट्रीय उद्यानाच्या एक किलोमीटर पर्यंत कोणत्याही खनिकर्म प्रक्रियेची अनुमती देण्यात येवू नये. परंतु कोल्हापूर जिल्हयात डिसेंबर २००६ मध्ये बॉक्साईट कच्च्या धातूचे उत्खनन करण्याकरिता

दोन भाडेपट्टादारांना पर्यावरण व वन मंत्रालयातर्फे पर्यावरण मंजुरी प्रदान करण्यात आली. भाडेपट्टादारांनी निर्बंध प्रमाणपत्र मिळण्यासाठी पर्यावरण व वन मंत्रालयास सादर केलेल्या दस्तांवेजांत राष्ट्रीय उद्यान आणि भाडेपट्टा क्षेत्र यांच्यातील अंतर १० किलोमीटरपेक्षा जास्त असल्याचे नमूद केले होते. तथापि नंतर पर्यावरण व वन मंत्रालयास असे आढळले की चांदोली राष्ट्रीय उद्यानाची सीमा व खाणपट्टा क्षेत्र यांच्यातील अंतर ८०० मीटर ते १६०० मीटर आहे आणि या कारणावरून ऑगस्ट २०१२ आणि ऑक्टोबर २०१३ मध्ये ही पर्यावरण मंजुरी रद्द करण्यात आली होती. या प्रकरणी खनिकर्म प्रक्रिया जरी निलंबित करण्यात आली होती तरी खोट्या दस्तावेजांवरून खनिकर्म कामे करण्यासाठी कोणतीही कारवाई करण्यात आली नव्हती. खनिकर्म प्रक्रिया कालावधीत रु. ३०.०२ कोटी किमतीचे २६.९७ लाख मे. टन बॉक्साईटचे उत्खनन करण्यात आले होते. हे संपूर्ण उत्खनन अवैध म्हणून समजावयास पाहिजे होते. आणि त्या खनिजांची किंमत वसूल करावयास पाहिजे होती. याशिवाय, जे व्यक्ती खोटे दस्तावेज स्वीकारून पर्यावरण हानी पोहचविण्यास कारणीभूत ठरले, अशा व्यक्तींवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असताना विभागाने नियमानुसार केवळ भाडेपट्टा निलंबित करण्याची कारवाई केली. इतकेच नव्हेतर विभागाने पुढे असेही नमूद केले की, सदर उत्खनन अवैध खनिकर्माच्या व्याख्येत बसत नाही म्हणून खनिजांची किंमत वसूल करण्यात येऊ शकत नाही. वास्तविकतः भाडेपट्टादारांनी खोटी माहिती दिली आणि म्हणूनच त्याच्याद्वारे करण्यात आलेली खनिकर्म कामे वैध नव्हती आणि त्याकामांना अवैध घोषित करावयास पाहिजे होते आणि MMDR अधिनियमाच्या कलम २१(५) अंतर्गत शास्ती आकारावयास पाहिजे होती. ज्यात अवैधरित्या उत्खनन केलेल्या खनिजांची किंमतीची वसुली करणे विहित आहे असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यातील मौजे-उदगिरी ता. शाहुवाडी येथे राज्य शासनाद्वारे श्री. प्रकाश आनंदराव गायकवाड (गवंडी) यांना दिनांक १६/१०/१९९९ व मे. स्वाती मिनरल्स, कोल्हापूर यांना दिनांक ०६/०५/१९९७ रोजी बॉक्साईट खनिजाचे खाणपट्टे मंजूर करण्यात आले आहेत. खाणपट्टाधारकांनी सदर खाणपट्ट्यांकरिता आवश्यक केंद्रीय वन व पर्यावरण विभागाची अनुमती अनुक्रमे दिनांक २२/१२/२००६ व २०/१२/२००६ च्या आदेशान्वये प्राप्त केली होती. तथापि खाणपट्टाधारकाने चुकीची माहिती देऊन पर्यावरण अनुमती मिळविल्यामुळे दोन्ही खाणपट्ट्याची पर्यावरण अनुमती अनुक्रमे दिनांक ०६/०८/२०१२ व दिनांक १८/१०/२०१३ च्या आदेशान्वये रद्द करण्यात आली. तथापि सदर कालावधीपर्यत दोन्ही खाणपट्टाधारकांनी एकूण स्वामित्वधन रु.३६ कोटी १० लक्ष इतकी स्वामित्वधनाची रक्कम शासन जमा केलेली असून तेव्हापासून सदर खाणपट्ट्यातील खाणकाम बंद असल्याचे तसेच परिच्छेदामध्ये नमूद कालावधीत खनिपट्टा मंजूर होता व खनिपट्टा करारनाम्याच्या अटी व शर्तीनुसार स्वामित्वधन शासनजमा करून खाणकाम करणेत आले होते. सबब MMDR च्या कलम २१ (५) लागू ठरत नाही. त्यामुळे घटकाने उत्खनन केलेल्या खनिजाचे स्वामित्वधन जमा केले असल्याने दंड व शास्ती लादण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे समर्थन सदरहू प्रकरणी विभागीय प्रतिनिधींनी केले.

सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप अतिशय गंभीर असून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी खाणपट्टाधारकांचे सदरहू कृत्य फौजदारी स्वरूपाचे देखील आहे. सदरहू प्रकरणी राष्ट्रीय उद्यान आणि भाडेपट्टा क्षेत्रातील अंतर १ किलोमीटरपेक्षाही कमी असताना बनावट कागदपत्रांच्या आधारे हे अंतर १० किलोमीटरपेक्षा जास्त असल्याचे दर्शवून उत्खनन करण्यात आले. सदरहू प्रकरणी सकृतदर्शनी भाडेपट्टाधारकांनी पर्यावरणाच्या नियमांचे पुर्णपणे उल्लंघन केल्याचे स्पष्टपणे दिसून येत असतानाही महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदवेपर्यंत ही बाब विभागाच्या निदर्शनास स्वतःहून येऊ नये ही त्याहूनही अधीक गंभीर बाब आहे. याही उपर महालेखाकारांनी आक्षेप नोंदवेपर्यंत ही बाब विभागाच्या निदर्शनास स्वतःहून येऊ नये ही त्याहूनही अधिक गंभीर बाब आहे. याही उपर महालेखाकारांनी आक्षेप नोंदविल्यानंतर देखील भाडेपट्टाधारकावर व संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर विभागाने समितीची साक्ष लागेपर्यंत कोणतीही फौजदारी वा प्रशासकीय स्वरूपाची कारवाई केली नाही. वास्तविकतः विभागाने खाणपट्टाधारकांवर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा नोंदविणे आवश्यक असताना विभागाने यासंदर्भात कोणतीही कारवाई केली नाही. केवळ उत्खनन केलेल्या खनिजाचे स्वामित्वधन वसूल करून विभाग गप्प बसला व घेतलेल्या निर्णयाचे समितीसमोर समर्थन करीत आहे. याप्रकरणी केवळ स्वामित्वधन वसूल न करता जेवढे उत्खनन केले आहे त्याची संपूर्ण किंमत वसूल करून तसेच यात दंड आकारुन वसुली करणे आवश्यक होते. एवढेच नव्हे तर बनावट कागदपत्रे तयार केल्याप्रकरणी खाणपट्टाधारकावर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करणे आवश्यक होते. परंतु विभागाने हा विषय गांभीर्याने हाताळला नाही व याप्रकरणी कोणतीही कारवाई केली नाही ही अतिशय गंभीर बाब आहे. प्रकरण सकृतदर्शनी अतिशय सुस्पष्ट असतानाही व कोणत्याही चौकशीविना निष्कर्षाप्रत येऊन कारवाई करण्यायोग्य असतानाही विभागाने याची गंभीर दखल घेतली नाही. परिणामी यात दोषी असणारे संबंधित अधिकारी देखील कारवाई विना मोकळे आहे. अतः या सर्व बाबी खाणपट्टाधारक व अधिकारी यांच्या संगनमताने देखील होत असल्याची शंका घेण्यास पूर्ण वाव आहे. इतकेच नव्हेतर या प्रकरणी बनावट कागदपत्रांच्या आधारे किती अवैध उत्खनन झाले आहे याचे कोणतेही मुल्यमापन वा मोजमाप विभागाने करून वसूलपात्र रकमेची आजतागायत निश्चिती केलेली नाही. तसेच अशा कोणत्याही नोटीसदेखील संबंधितांना दिलेल्या नाहीत. वास्तविकतः याप्रकरणी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना निलंबितच केले पाहिजे. तरीही ५-५ वर्षे विभागाने यावर कोणतीही कारवाई केली नाही, ही अतिशय गंभीर बाब आहे.

सदरहू उत्खनन १९९७ पासून सुरू आहे व त्यास २००६ ला पर्यावरणाची परवानगी मिळाली होती. ही परवानगी बनावट कागदपत्रांच्या आधारे घेऊन हे खाणकाम १० किलोमीटरच्या बाहेर असल्याचे भासवले होते असे जरी असले तरी वास्तविक जर हे काम उद्यानाच्या १ किलोमीटरच्या आत इतक्या प्रदीर्घ वर्षापासून सुरू असतानाही वन विभाग, खनिकर्म अथवा पर्यावरण विभाग यांनी कोणतेही आक्षेप न घेता हे काम सुरूच ठेवले. उद्यानाच्या १ किलोमीटरच्या आत असे काम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या माहितीशिवाय व संगनमताशिवाय सुरूच राहू शकत नाही. हे सर्व संबंधितांना माहिती असतानाही याची कोणतीही गंभीर दखल विभागाने घेतली नाही. या संपूर्ण प्रकरणी वसूलपात्र रकमेची अंदाजे रक्कम ही १५० कोटींपेक्षाही जास्त असू शकते. शासनाच्या इतक्या मोठ्या महसुलाचे नुकसान झालेले असतानाही विभागाची भूमिका अद्यापही अत्यंत मवाळ, निष्काळजीपणाची व उदासीन आहे. केवळ समितीची साक्ष लागल्यामुळे व या प्रकरणी समितीने अतिशय तीव्र व कडक भूमिका घेतल्यामुळे या प्रकरणी कारवाई करण्याचे आश्वासन विभागीय प्रतिनिधींद्वारे समितीस देण्यात आले. हीदेखील बाब अत्यंत गंभीर व आक्षेपार्ह आहे. समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

वन विभागाद्वारे समितीसमोर असेही विदित करण्यात आले की, वन विभागाकडून या व्यक्तींना कोणतेही ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले नव्हते. तसेच हे उत्खनन वन विभागाच्या जागेवर सुरू नसल्यामुळे संबंधितांवर वन विभागाद्वारे कारवाई करणे अपेक्षित नव्हते तसेच विभागास अधिकारही नव्हते. अशा प्रकारे कोणत्याही अडथळ्याशिवाय हे काम राज्यात प्रदीर्घ कालावधीसाठी सुरूच राहिले. सदरहू प्रकरणी अधिक गंभीर बाब म्हणजे अशा अनधिकृत उत्खननाबाबत केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाकडे तक्रार दाखल झाली असता, त्याची दखल केंद्र शासनाने घेऊन या प्रकरणाची छाननी केली असता या सर्व गंभीर बाबी निदर्शनास येणे व आता मात्र समितीसमोर हा विषय चर्चेला आल्यानंतर विभागीय प्रतिनिधी या प्रकरणी कारवाई न केल्याचे मान्य करते. यासंदर्भात अशा प्रकारे खनिज उत्खनन सुरू असल्याचे पत्र तत्कालीन मुख्य वन संरक्षक, कोल्हापूर यांनी दिनांक २८ मार्च, २००५ रोजी तत्कालीन जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना दिले होते. वन विभागाच्या विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर असे विदीत केले. सदरहू उत्खनन हे सन १९९७ पासून सुरू असल्याचे वन विभागास माहिती असताना वन विभागाने तब्बल ८ वर्षानंतर म्हणजेच सन २००५ मध्ये हे जिल्हाधिकाऱ्यांना कळविले. त्यानंतरदेखील या प्रकरणी कोणतीही कारवाई झाली नाही. इतकेच नव्हे तर वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी उपरोक्त पत्र दिले म्हणजे त्यांची जबाबदारी संपली अशा पद्धतीची सोईस्कर व सुरक्षित भूमिका स्वीकारली. समितीने या उत्खननाप्रकरणी केलेल्या करारातील अटी-शर्ती संदर्भात विचारणा केली असता, खाणकामाचे प्रत्यक्ष उत्खनन पर्यावरण मंजुरी व अन्य परवाने घेतल्यानंतरच खाणपट्टाधारकास उत्खनन करता येईल. जोपर्यंत आवश्यक ते परवाने मिळत नाही तोपर्यंत खनिज उत्खनन सुरू करता येणार नाही असेही यात स्पष्टपणे नमूद असताना सन १९९७ मध्येच हे उत्खनन कोणत्याही आवश्यक परवान्याविना व शहानिशेविना सुरू झाले व सन २००५ मध्ये ही बाब निदर्शनास आली. त्यानंतर सन २००६ मध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे पर्यावरण मंजुरी घेण्यात आली व सन २०१३ पर्यंत उत्खनन सुरूच राहिले.

वास्तविकतः उत्खनन राष्ट्रीय उद्यानापासून १ किलोमीटरच्या आत इतक्या प्रदीर्घ कालावधीसाठी सुरू असताना सन २००६ मध्ये देण्यात आलेल्या पर्यावरणाच्या परवानगीची वैधताच तपासण्याची आवश्यकता आहे. वन विभागाकडून कोणतेही ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले नसतानाही कशाच्या आधारे पर्यावरण विभागाने परवानगी दिली हादेखील चौकशीचा भाग आहे व याची सखोल तपासणी होणे आवश्यक आहे. या प्रकरणी बनावट कागदपत्रांच्या आधारे ही परवानगी दिल्याचे निदर्शनास आल्यानंतर सन २०१२ व सन २०१३ मध्ये पर्यावरण अनुमती रद्द करण्यात आली व उत्खननाचे काम थांबविण्यात आले. परंतु सन १९९७ ते २०१३ पर्यंत झालेल्या अनधिकृत उत्खननाबाबत विभागाने कोणतीही दंडात्मक कारवाई अद्यापही केली नाही. याउपर खाणपट्टा मंजूर होता व खाणपट्टा कराराच्या अटी व शर्तीनुसार स्वामित्वधन शासन जमा करून खाणकाम केल्यामुळे एमडीआरचा कलम २१(५) लागू ठरत नाही. परिणामी दंड व शास्ती आकारण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असे विभागीय प्रतिनिधी समितीसमोर विदित करतात, ही अतिशय आक्षेपार्ह व गंभीर बाब आहे.

शिफारस

५.१८ महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप अत्यंत गंभीर असून या प्रकरणी केवळ अनधिकृत उत्खनन एवढ्यापुरताच गैरव्यवहाराची व्याप्ती मर्यादित नसून बनावट कागदपत्रांच्या आधारे शासनाची परवानगी मिळवून शासनाची फसवणूक करणे व शासनाच्या महसुलाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान करणे अशा फौजदारी गुन्ह्याच्या स्वरूपातील कृत्यदेखील केलेले आहे. तरीही अद्यापही विभाग याप्रकरणी केवळ कागदोपत्री कारवाई करण्यातच समाधानी दिसून येते. वन विभागालादेखील हे माहीत होते की, वन विभागाच्या ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय पर्यावरण विभागाची परवानगी मिळू शकत नाही व असे कोणतेही ना-हरकत प्रमाणपत्र वन विभागाने दिलेले नसतानाही या प्रकरणी पर्यावरण विभागाची

परवानगी कशी मिळू शकते व तेथे इतक्या अमर्याद वर्षांकरिता उत्खनन कसे सुरू राहू शकते या बाबींची किमान छाननी देखील वन विभागाने केली नाही. मुख्य वन संरक्षक अधिकारी, कोल्हापूर यांनी केवळ दि. २८ मार्च, २००५ रोजी तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून असे उत्खनन सुरू असल्याचे निदर्शनास आणले व त्यानंतर प्रकरणाचा कोणताही पाठपुरावा केला नाही. त्याचप्रमाणे तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी या पत्रावर कोणतीही कारवाई नियमानुसार केली नाही. परिणामी अनधिकृत उत्खननाचे काम विनाअडथळा वर्षानुवर्षे सुरूच राहिले. याही उपर खनिकर्म विभागाने समितीला सादर केलेल्या आश्वासित माहितीमध्ये असे कळविण्यात आले की, मुख्य वन संरक्षक, कोल्हापूर यांनी दिनांक २८/३/२००५ रोजी तत्कालीन जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना लिहिलेले पत्र कार्यालयाच्या अभिलेख्यामध्ये तपासले असता, दिसून आले नाहीत ही तर अधिकच गंभीर बाब आहे. इतक्या गंभीर विषयांमध्ये विभागाच्या स्तरावर असलेल्या ताळमेळाचा व समन्वयाचा अत्यंत अभाव शासन स्तरावर असून व्यवस्था किती कमकुवत आहे ज्याचा फायदा इतक्या सहजतेने खाणपट्टेधारकांना स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी घेता येऊ शकतो. त्यातच शासकीय कामकाज करताना शासनाचे हित जोपासण्यासंदर्भात यंत्रणा किती उदासीन व औपचारिक आहे, हेदेखील या प्रकरणातून सिद्ध होते. किंबहुना शासनातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने व सहमतीनेच हा गैरप्रकार सुरू राहिल्याचे या प्रकरणी स्पष्टपणे दिसून येते. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी समितीसमोर स्पष्टपणे मान्य केले की, त्यांनी या उत्खननाच्या ठिकाणी स्वतः भेट देऊन तपासणी केली असता, या प्रकरणी नियमांचे उल्लंघन झाले आहे. अतः याप्रकरणी सखोल छाननी करून समितीस १ महिन्याच्या आत माहिती देण्याबाबत समितीस आश्वासित करण्यात आले व त्याअनुषंगाने समितीस पुढीलप्रमाणे कळविण्यात आले :—

कोल्हापूर जिल्ह्यातील मौजे-उदगिरी, ता. शाहूवाडी येथील राज्य शासनाद्वारे श्री. प्रकाश गायकवाड यांना मंजूर २५४.५१ हे. व मे.स्वाती मिनरल्स यांना मंजूर ७७६.७८ हे. खनिपट्ट्याबाबत पर्यावरण अनुमती प्राप्त करून घेताना, खनिपट्टाधारकाने सादर केलेली चुकीची माहिती पर्यावरण विभागाच्या निदर्शनास आली असता, केंद्रीय वन व पर्यावरण विभागाकडून अनुक्रमे दि. ६/८/२०१२ व दि. १८/११/२०१३ अन्वये अनुमती रद्द करण्यात आली. त्यानुसार खनिपट्टाधारकास उत्पादन बंद करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात येऊन तेव्हापासून सदर खनिपट्टे बंद स्थितीत आहे. पर्यावरण अनुमती प्राप्त करून घेताना खनिकर्म कार्यालयाचा कुठेही थेट संबंध येत नसून, यामध्ये वन विभाग, वन्यजीव विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा मुख्यतः संबंध असतो. त्यामुळे वन्यजीव विभागाने सदरहू बाब ही जनसुनावणी दरम्यान किंवा तदनंतर परस्पर केंद्रीय वन व पर्यावरण विभागास परस्पर निदर्शनास आणून देणे आवश्यक होते.

उपरोक्त नमूद दोन्ही खाणपट्टाधारकांनी चुकीची माहिती देऊन पर्यावरण अनुमती मिळवल्याने याबाबत चौकशी होऊन संबंधितांविरुद्ध नियमानुसार कार्यवाही करणेची मागणी मुख्यसंरक्षक, वन्यजीव, कोल्हापूर यांनी दि. १५/२/२०१४ च्या पत्रान्वये केली. सबब, नमूद सर्व बाबी विचारात घेता सदरचे खनिपट्टे खनिज सवलत नियम २०१६ चे नियम १२(९) अन्वये रद्द करणेपूर्वी संबंधित खाणपट्टाधारकास सुनावणीची संधी देण्याची शिफारस शासनास दि. १४/९/२०१८ व दि. १/९/२०१८ चे पत्रान्वये खनिकर्म संचालनालयाकडून करण्यात आली आहे.

सदर दोन्ही प्रकरणी अनुक्रमे रु. ८,८१,२२,१२२/- व रु. ५७,२३,०५,८००/- खनिज मूल्य वसुलीच्या मागणीची नोटीस बजावण्यात आली असून, सक्तीच्या वसुलीची कार्यवाही प्रस्तावित करणेत येत आहे. तसेच सदर दोन्ही प्रकरणी खाणपट्टाधारकास सुनावणीची संधी देऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच सदर प्रकरणी तत्कालीन संबंधित तलाठी, मंडल अधिकारी, संबंधित तहसीलदार इ. यांना नोटीस बजावून खुलासा सादर करणेबाबत सूचित करण्यात येईल व तद्नुषंगाने प्राप्त खुलाशानुसार शासनास अहवाल सादर करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे असे विभागाकडून समितीस कळविण्यात आले.

उपरोक्त प्रस्तावित कारवाईवरून अद्यापही विभाग इतक्या गंभीर प्रकरणी कारवाईसंदर्भात गंभीर नाही व केवळ अवैध उत्खननासंदर्भात खनिजमूल्य वसुली प्रस्तावित करणेपलीकडे कोणतीही कारवाई करण्यास तयार नाही. बनावट कागदपत्रांच्या आधारे शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी या खाणपट्टेधारकांवर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करणे आवश्यक असताना व समिती यासंदर्भात आग्रही असताना विभाग याबाबत स्तब्ध आहे. याचाच अर्थ आताही विभाग या खाणपट्टेधारकांना अभय देत असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. अतः सदरहू प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता विभागाने खाणपट्टेधारकांकडून तात्काळ वसुलपात्र रक्कम कालबद्ध पद्धतीने वसूल करावी व विहित मर्यादेत ती रक्कम वसूल न झाल्यास सक्त वसुली तसेच महसुली थकबाकी स्वरूपात ही वसुली तात्काळ करण्यात यावी. तसेच शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी त्यांचेवर

फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात यावे. मुख्य वन संरक्षक, कोल्हापूर यांनी दि. २८/०३/२००५ रोजी तत्कालिन जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना सदरहू अवैध उत्खननासंदर्भात कळविले होते. या पत्राकडे दुर्लक्ष करणाऱ्या तत्कालिन जिल्हाधिकाऱ्यांवर देखील कारवाई करण्यात यावी. तसेच याप्रकरणी पर्यावरण विभाग, वन विभाग व खनिकर्म विभागामधील संबंधित अधिकाऱ्यांवर त्या-त्या संबंधित विभागाद्वारे तात्काळ कडक कारवाई करण्यात यावी. इतकेच नव्हे तर महालेखाकारांनी आक्षेप नोंदविल्यानंतर देखिल आजतागायत इतक्या गंभीर आक्षेपांची साधी दखलही विभागाने घेऊन संबंधितांवर कारवाई न केल्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर देखिल कारवाई करण्यात यावी व या प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी. तसेच भविष्यासाठी विभागाने अशी पद्धती आखावी ज्यावरून भाडेपट्टा अथवा पर्यावरण मंजुरी प्रदान करावयासाठी भाडेपट्टादारांनी केलेल्या अर्जामध्ये अथवा इतर कुठे नमूद तपशील योग्य असल्याची पडताळणी करता येईल अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ७.२.२.५ "भाडेपट्टा क्षेत्रापलीकडे खनिज उत्पत्ती करणे"

अभिप्राय

५.१९ महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (MLR संहिता) च्या नियम ४८ (७) प्रमाणे एखादी व्यक्ती जर कायदेशिर प्राधिकाराशिवाय कोणत्याही खनिजाचे उत्खनन, वहन, एकत्र करणे, दुसऱ्या जागी नेणे, विल्हेवाट लावणे यापैकी काही करत असेल तर राज्य शासनाने अशा उत्खनन केलेल्या, हलविलेल्या, विल्हेवाट लावलेल्या इ. खनिजांच्या बाजार मूल्याच्या तिप्पटीपेक्षा जास्त नसलेली रक्कम शास्ती म्हणून वसूल करावयास पाहिजे. संचालक, भूशास्त्र आणि खनिकर्म / उप-संचालक, कोल्हापूर येथील निरिक्षण अहवालांच्या पडताळणीत असे निदर्शनास आले की दोन प्रकरणांत (मार्च २०११ / एप्रिल २०१४) १.४१ लाख मे. टन बाक्साईचे उत्खनन भाडेपट्टा बाहेरील क्षेत्रातून करण्यात आले जे अवैध होते. या दोन प्रकरणांपैकी एका प्रकरणात भाडेपट्टादाराला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली जेव्हा की दुसऱ्या प्रकरणांत कोणतीही कारवाई करण्यात आल्याचे दिसून आले नाही. भाडेपट्टादारांनी रु.५.८० कोटी शास्ती अदा करावयास पाहिजे होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

सदरहू आक्षेपात रायगड जिल्ह्यातील शेखाडी बॉक्साईट खाण व मेघरे बॉक्साईट खाणीत खाणक्षेत्राबाहेर खनिज उत्खनन केल्याचा गंभीर आक्षेप नोंदविण्यात आला आहे. यासंदर्भात विभागाने दि. ४/४/२०१४ रोजीच्या तपासणी अहवालाच्या अनुषंगाने मौजा-शेखाडी, ता.श्रीवर्धन येथील बॉक्साईट खाणपट्टयात संबंधित खाणपट्टाधारक यांनी २५,१४७.१२६ मे. टन अवैध खनिजाचे उत्खनन/वाहतूक केल्या प्रकरणी त्याच्याकडून रु.७५,४४,१००/- इतकी रक्कम वसूल करण्याबाबत आक्षेप नोंदविण्यात आला होता. सदरहू अहवालानुसार सदर क्षेत्रात १४०५२.८७४ मे. टन इतके खनिजाचे उत्खनन झाल्याचे दिसून आले. तथापि संबंधित खाणपट्टाधारक यांचेकडील वार्षिक/ त्रैमासिक/मासिक विवरणानुसार त्यांनी सदर क्षेत्रात एकूण ३९,२०० मे. टन इतके खनिजाचे उत्पादन वाहतूक व निर्यात केले होते. सबब, संबंधित खाणपट्टाधारक यांनी निर्यात केलेले खनिजाचे परिमाण व मोजणीनुसार निदर्शनास आलेले खनिजाचे परिमाण यामध्ये सुमारे २५,१४७ मे. टन इतकी तफावत येत असल्याने तपासणी पथकाकडून संबंधित खाणपट्टाधारकाने खनिपट्टयाच्या बाहेरील अथवा इतरत्र क्षेत्रातून २५,१४७ मे. टन इतके अवैधपणे उत्खनन करून खनिजाचे वाहतूक/निर्यात केल्याचा निष्कर्ष काढण्यात आला.

त्याचप्रमाणे मे. मनोहर वेन्सीमल दर्यानानी यांचे मौजे-मेघरे, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील बॉक्साईट खाणपट्टयाची दि. ४/ ३/२०११ रोजी केलेल्या तपासणी दरम्यान मे.मनोहर वेन्सीमल दर्यानानी यांनी मंजूर नसलेल्या व त्यांच्या खाणपट्टाक्षेत्रालगत असलेल्या गट क्र. २६ व ४६ मध्ये मोजमापे घेतली असता सुमारे ९३,५५० मे.टन इतके बॉक्साईटचे अवैध उत्खनन झाल्याचे आढळून आले. अवैध उत्खनन झालेले क्षेत्र हे मनोहर वेन्सीमल दर्यानानी यांचे उपरोक्त मंजूर खाणपट्टयालगतचे असल्याने सदर अवैध उत्खनन त्यांनीच केल्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे गृहीत धरून मे. मनोहर दर्यानानी यांना खाणपट्टाक्षेत्राबाहेर ९३,५५० मे. टन इतके बॉक्साईटचे अवैध उत्खनन केल्याप्रकरणी शासनाकडून नोटीसा देण्यात आल्या. परंतु श्री. दर्यानानी यांनी स्वतः उत्खनन केल्याचे अमान्य केले. त्यामुळे विभागाने सदर प्रकरणी सं.नं.२६ व ४६ मध्ये ९३,५५० मे. टन इतके बॉक्साईटचे अवैध उत्खनन करणाऱ्या व्यक्ती/कंपनी/ जमीन मालक यांचा शोध घेऊन त्यांच्यावर दंडनीय कारवाई करण्याचे निर्देश देऊन सदर प्रकरणात कसुरदार यांचेकडून अवैध उत्खनन केल्यापोटी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतूदीनुसार दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत दि. ३०/१०/२०१५ रोजी सूचना दिल्या. त्यानुसार सदर अवैध बॉक्साईट खनिज उत्खननासंदर्भात तहसिलदार, श्रीवर्धन यांनी संबंधित जमीन मालक श्री. नितिन नागीनदास गोराडिया व श्रीमती वंदना नितिन गोराडिया यांस दिनांक १८/६/२०१८ रोजी थकबाकीची मागणीची नोटीस बजावली असून महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ मधील तरतूदीनूसार उपरोक्त मौजा मेघरे ता. श्रीवर्धन गट नं २६ व ४६ या मिळकतीच्या ७/१२ च्या इतर अधिकारात रु. ३,९९,९१,१५८/- इतक्या रकमेच्या बोजाची नोंद व फेरफार नोंद क्र.३६५ अन्वये ठेवली आहे. तसेच प्रस्तुत अवैध खाणकामाबाबत अज्ञात व्यक्तिबाबत गुन्हा दाखल होणेबाबत सुचना दिल्या.

सदरहू दोन्ही प्रकरणात अतिरिक्त उत्खनन झाल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्य केले. यातील मौजा शेखाडी, ता. श्रीवर्धन येथील अवैध उत्खनन त्या खाणपट्टाधारकाने केल्याचे सुस्पष्ट आहे. मौजे मेघरे, ता. श्रीवर्धन येथील अवैध उत्खनन प्रकरणी उत्खननाची परवानगी श्री. दर्यानानी यांच्या नावावर असून वस्तुतः उत्खनन मात्र श्री. गोराडीया यांच्या जमिनीवर झालेले आहे. विभागाने यासंदर्भात श्री. दर्यानानी यांचा खुलासा ग्राह्य धरून श्री. गोराडीया यांच्या जमिनीवर बोजा चढविला. वास्तविकतः श्री. गोराडीया यांना त्यांच्या जमिनीवरील या उत्खननाबाबत कोणतीही माहिती नसल्याची पुर्ण शक्यता आहे. उत्खननाचे पासेस श्री. दर्यानानी यांच्या नावावर असताना विभागाने दंड मात्र श्री. गोराडीया यांच्या नावावर लावलेला आहे. वास्तविकतः सकृतदर्शनी दर्यानानी यांनी स्वतःच्या नावावर असलेल्या पासेसच्या आधारे श्री. गोराडीया यांच्या जमिनीवर अनधिकृतरित्या उत्खनन केल्याचे सकृतदर्शनी स्पष्टपणे दिसून येते. अशा परिस्थितीत श्री. गोराडीया यांच्या नावे चढविलेला बोजा अन्यायकारक ठरु शकतो. त्यामुळे उपरोक्त वस्तुस्थितीच्या अनुषंगाने विभागाने अधिक सखोल चौकशी करून समितीस अहवाल सादर करावा असे निदेश समितीने दिले असता, त्याअनुषंगाने समितीस सादर केलेल्या अहवालात मौजे शेखाडी व मेघरे या २ प्रकरणी संबंधित खाणपट्टाधारकास दिनांक १०/१०/२०१८ चे पत्रान्वये अनुक्रमे रु. १,८०,३०,४८५/- व रु. ३,९९,९१,१५८/- दंडाची नोटीस बजाविण्यात आलेल्या आहेत व सक्तीच्या वसुलीची कार्यवाही सुरू आहे. तसेच मे.मनोहर व्हेन्सीमल दर्यानानी यांनी बंदरातून निर्यात केलेल्या खनिजाबाबत माहिती सादर करण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना संबंधित जिल्हा खनिकर्म कार्यालयाकडून दिनांक १०/१०/२०१८ व दिनांक १६/१०/२०१८ चे पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदरची माहिती प्राप्त होताच तात्काळ सादर करण्यात येईल. त्याचप्रमाणे मौजे मेघरे, ता. श्रीवर्धन येथील ग.नं.२६ व ४६ या मिळकतीच्या ७/१२ च्या इतर अधिकारात ठेवलेली बोजाची नोंद कमी/रद्द करण्यासंदर्भात तहसिलदार श्रीवर्धन यांस कळविण्यात आले असल्याचे समितीसमोर सादर करण्यात आले.

शिफारस

५.२० सदरहू प्रकरणी महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप अत्यंत गंभीर असून मौजे शेखाडी व मेघरे, ता.श्रीवर्धन या दोन्ही ठिकाणी मंजूर खाणपट्टा क्षेत्राबाहेर उत्खनन झालेले असल्याचे विभागाने समितीसमोर मान्यच केले. तसेच दि.१०/१०/२०१८ च्या पत्रान्वये अनुक्रमे रु.१,८०,३०,४८५/- व रु.३,९९,९१,१५८/- दंडाची नोटीस बजाविण्यात आली असून सक्तीच्या वसुलीची कार्यवाही सुरू असल्याचे समितीसमोर सादर करण्यात आले. सदरहू प्रकरणी उत्खननाचा पास श्री.दर्यानानी यांचे नावावर आहे. तसेच श्री.दर्यानानी यांनीच श्री.गोराडीया यांच्या जमिनीवर अवैध उत्खनन केल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. तरीही या अवैध उत्खननाचा बोजा मात्र श्री.गोराडीया यांच्या नावे चढविण्यात आला आहे. श्री.गोराडीया यांना मात्र या अवैध उत्खननाची कोणतीही माहिती देखील नसल्याची पुर्ण शक्यता आहे. अशा परिस्थितीत श्री.गोराडीया यांचेवर चढविण्यात आलेला बोजा अन्यायकारक ठरु शकतो. यासाठी हे उत्खनन श्री.दर्यानानी यांनीच केले असल्याची पुर्ण शक्यता आहे. परंतु हे प्रथमतः सिद्ध करणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्वांगाने या प्रकरणाची सखोल चौकशी विभागाने करावी. त्यात श्री.दर्यानानी यांचे नावावर असलेल्या उत्खननाच्या परवान्याद्वारे बंदरातून निर्यात केलेल्या खनिजाबाबतची देखील चौकशी करण्यात यावी. या आक्षेपासंदर्भात महालेखाकारांकडे देखील अनेक महत्वाचे व या प्रकरणाशी निगडीत दस्तावेज व पुरावे उपलब्ध आहेत. त्याची देखील मदत घेणेसाठी महालेखाकार कार्यालयाशी देखील या प्रकरणी समन्वय साधावा आणि ही चौकशी व संबंधितांवर आवश्यकती पुढील कारवाई कालबद्ध पद्धतीने तात्काळ करण्यात यावी व वसुलीची कारवाई दोषी व्यक्तीकडून करण्यात यावी. त्याचप्रमाणे इतक्या प्रदीर्घ कालावधीसाठी व इतक्या मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन होत असताना स्थानिक अधिकारी/कर्मचाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे या अतिरिक्त/अनधिकृत उत्खननाबाबत संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर देखील तात्काळ कारवाई करण्यात यावी व या संदर्भात केलेल्या कारवाईबाबतची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ७.२.२.६ "शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय भाडेपट्टाधिकाराचे हस्तांतरण"

अभिप्राय

५.२१ MC नियम, १९६० च्या नियम ३७ अनुसार भाडेपट्टादाराने, राज्य शासन/केंद्र शासनाच्या लिखित परवानगी शिवाय खनिकर्म भाडेपट्टा अभिहस्तांकित करू नये किंवा कुठलेही अधिकार, हक्क अथवा त्यातील हितसंबंध किंवा कोणतीही व्यवस्था, करार अथवा जबाबदारीत सामिल होऊ नये अथवा करार करू नये, ज्यात भाडेपट्टादारास प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष भरीव भांडवल पुरवण्यात येईल अथवा आले किंवा ज्या अंतर्गत भाडेपट्टेदाराचे कार्य अथवा उपक्रम भाडेपट्टेदाराव्यतिरिक्त दुसऱ्या व्यक्ती अथवा व्यक्तींच्या गटाने भरिवरित्या नियंत्रित करण्यात येणार असेल अथवा आली असेल. तरीही कोल्हापूर येथील भाडेपट्टामध्ये माहे नोव्हेंबर, १९९४

ते २००६ दरम्यान तीन जिल्ह्यातील ६ भाडेपट्टादारांनी रद्द न करण्याजोगा मुखत्यारनामा आणि विकास करारनाम्याद्वारे (दि.१०.११.१९९४, २१.०९.२००१ आणि २६.०२.२००६ रोजी) भाडेपट्टाधिकार अभिकर्त्याला खनिकर्म कार्य इत्यादी चालवणे आणि व्यवस्था पाहण्यासाठी हस्तांतरित केले. तसेच यासाठी शासनाद्वारे मंजुरी प्राप्त करण्यात आली नव्हती. भाडेपट्टा हक्कांच्या हस्तांतरणाबाबत त्यांच्या कार्यालयास यासंदर्भात कोणतीही माहिती नव्हती. शासनाच्या परवानगी शिवाय भाडेपट्टा हक्क हस्तांतरित करणे अनियमित होते आणि म्हणूनच या भाडेपट्टादारांच्या अभिकर्त्याने रु. ६०.८३ कोटी किमतीचे ३२.९७ लाख मे. टन खनिजाचे कायदेशीर प्राधिकाराशिवाय उत्खनन केले, ज्याची वसुली करणे आवश्यक आहे असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

यासंदर्भात विभागाने विदित केले की, खाणपट्टयातील खाणकामासंदर्भात मुखत्यारनामाद्वारे (Power of Attorney) प्रतिनिधीस अधिकार देणे ही बाब खनिज सवलत नियम १९६० चे नियम ३७ चा भंग झाल्याचे म्हणता येणार नाही. एकूण ६ प्रकरणांत Power of Attorney Act, 1882 नुसार कार्यवाही झालेली आहे. Mines Act, 1952 च्या कलम २ (c) मध्ये "व्याख्या" अंतर्गत पुढीलप्रमाणे नमूद केले आहे :—

'agent', when used in relation to a mine, means every person, whether appointed as such or not, who, acting or purporting to act on behalf of the owner, takes part in the management, control, supervision or direction of the mine or of any part thereof ; त्यामुळे सदर प्रकरणे खनिज सवलत नियम १९६० चे नियम ३७ मधील तरतुदीच्या अनुषंगाने खनिपट्टा हस्तांतरणाच्या कक्षेत येणार नाहीत असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस विदित केले.

समितीने या प्रकरणाची सखोल छाननी केली असता सदरहू प्रकरणी पॉवर ऑफ अटर्नी दिलेल्या व्यक्तीला एजंट म्हणून ग्राह्य धरावे की हे भाडेपट्टयाचे बेकायदेशीर हस्तांतरण ग्राह्य धरावे हा मूळ मुद्दा आहे. पॉवर ऑफ अटर्नी व एजंट संदर्भात उपरोक्त तरतूद स्वयंस्पष्ट आहे. यात कोणतेही दुमत नाही. परंतु अशा प्रकरणी एजंटला द्यावयाच्या ब्रोकरेज, कमिशन किंवा सॅलरी देण्याचे कुठेही उपलब्ध कागदपत्रात नमूद नाही. त्यामुळे हे भाडेपट्टयाचे हस्तांतरणच समजण्यात यावे असे समितीचे स्पष्ट मत आहे. तरीही या प्रकरणी विधी व न्याय विभागाकडून अभिप्राय घेऊन त्यानंतरच या प्रकरणी कारवाई करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. वास्तविक इतक्या गंभीर विषयावर महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदवून जवळजवळ ५ वर्षांपेक्षा जास्त कालावधी उलटून गेलेला असतानाही मध्यंतरीच्या काळात विभागाने या प्रकरणाची व महालेखाकारांच्या आक्षेपाची साधी दखलही घेतली नाही किंवा यातील संभ्रम देखिल दूर केला नाही. केवळ समितीने आता साक्ष लावल्यामुळे विधी व न्याय विभागाकडून अभिप्राय घेण्याची भूमिका विभाग घेत आहेत. ही सर्व चौकशी व कायद्यातील स्पष्टता विभागाने या अगोदरच करून घेणे आवश्यक होते. तसेच महालेखाकारांनी केवळ नमुन्यादाखल केलेल्या तपासणीत उपरोक्त प्रकरण निदर्शनास आले. संपुर्ण राज्यात अशी अन्य प्रकरणे देखील नक्कीच अस्तित्वात असणार त्याचा देखील अभ्यास विभागाने करावा असेही समितीने निदेशित केले असता त्याचा देखिल अभ्यास करण्यात येईल असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले.

याअनुषंगाने समितीला आश्वासित केल्याप्रमाणे सदर प्रकरणी संबंधित ३ खाणपट्टेधारकांस शासनाची पुर्वपरवानगी प्राप्त होईपर्यंत त्यांच्या खाणपट्टयात स्वामित्वधनाचा नियमित भरणा व त्याअनुषंगाने वाहतूक पासेस निर्गमित करण्यास संबंधित जिल्हा खनिकर्म कार्यालयाकडून प्रतिबंधित करण्यात आले आहे. तरी सदर ६ प्रकरणी अंतिम निर्णय देण्यापूर्वी संबंधित खाणपट्टा धारकांना सुनावणीची संधी देण्यात यावी असा प्रस्ताव शासनास सादर केल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच उपरोक्त आक्षेपित प्रकरणांव्यतिरिक्त मौजे वेळास व साखरी, ता. मंडणगड (९१.१० हे.) खणिपट्टयात शासनाचे पूर्व परवानगी शिवाय भाडेपट्टयाचे हस्तांतरण झाल्याचे निदर्शनास आले. तरीही सदर प्रकरणी अंतिम निर्णय देण्यापूर्वी संबंधित खाणपट्टा धारकांना सुनावणीची संधी देण्यात यावी असे शासनास सादर करण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

समितीच्या असेही निदर्शनास आले की, एकीकडे ह्या सर्व खाणपट्टाधारकांकडून वसुली निघत असताना व ती होऊ न शकल्यामुळे त्यांच्या मालमत्तेवर बोजा चढवून दुसरीकडे त्याच व्यक्तींना पुन्हा कामाचे प्रदान करण्यात येत असल्याचे समितीला दिसून आले. ही देखिल बाब अत्यंत आक्षेपार्ह आहे. विभागाने हे भाडेपट्टा हस्तांतरणाचे प्रकरण गांभिर्याने घेतले पाहिजे. त्यांचेकडून वसूलपात्र रक्कम पुर्णपणे वसूल झाल्याशिवाय त्यांना इतरत्र काम देऊ नये अशी समितीची स्पष्ट भूमिका आहे.

शिफारस

५.२२ वास्तविकतः लेखा परिक्षणामध्ये उपस्थित प्रकरणांमध्ये, खाणपट्टाधारकाने दिलेल्या मोबदल्याच्या अनुषंगाने भाडेपट्टयाचा विकास आणि खाणव्यवसायासाठी पॉवर ऑफ ॲटर्नी धारकास रद्द न करता येण्याजोगी (Non-revocable) मुखत्यारनामा दिला आहे. म्हणून यास भाडेपट्टयाच्या अधिकाराचे हस्तांतरण मानले जावे. खनिज सवलत नियमाच्या नियम

३७ अन्वये शासनाकडून खाणपट्ट्याच्या अधिकाराच्या हस्तांतरणाबाबत परवानगी घेणे बंधनकारक आहे. सदर प्रकरणी खाणपट्टाधारकांनी शासनाची परवानगी घेतली नसल्याने सदरील अवैध खनिज उत्खननाच्या अनुषंगाने खाणपट्टाधारकांकडून दंड व इतर शासकीय देणी वसूल केली पाहिजेत असे समितीचे व महालेखाकारांचे स्पष्ट मत आहे. तरीही उपरोक्त प्रकरणांमध्ये मुख्यत्यारनामाद्वारे नियुक्त प्रतिनिधीस एजंट म्हणून ग्राह्य धरावे की भाडेपट्ट्याचे हस्तांतरण ग्राह्य धरावे या बाबत विधि व न्याय विभागाचे तात्काळ अभिप्राय घेऊन त्यानुषंगाने आवश्यक ती कार्यवाही विना विलंब व तातडीने करण्यात यावी तसेच विभागाने अशा प्रकाराची पुनरावृत्ती भविष्यात घडू नये यासाठी अधिक प्रभावी कार्यपद्धती विहित करावी व या संदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ७.२.२.७ "स्वामित्वधन व भाडे यांचे निर्धारण आणि वसुली"

(अ) स्वामित्वधनाची कमी वसुली

अभिप्राय

५.२३ MC नियम, १९६० च्या नियम ६४ (D) (१) (i) आणि (iv) मध्ये विहित सूत्रानुसार स्वामित्वधनाचे दर काढण्यात येतात. स्वामित्वधनाचे दर कच्च्या धातूतील अल्युमिनियम धातूच्या आतील द्रव्य, डॉलर-रुपया विनिमय दर, बॉक्साईट / ॲल्यूमिनियमची विक्री किंमत इत्यादीवर आधारीत असते. सात पट्टेदारांच्या वार्षिक विवरणाच्या पडताळणीत रु. ६.५४ कोटी स्वामित्व-धन कमी अदा केल्याचे आढळले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात विभागाने सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात मे.आशापुरा माईनकेम लि. यांचे रत्नागिरी जिल्ह्यातील रोवले बॉक्साईट खाणीची स्वामित्वधनाची रक्कम रु. २,१५,००,००० (रु. दोन कोटी पंधरा लक्ष) व उंबरशेत बॉक्साईट खाणीचे खाणकामासंदर्भात स्वामित्वधन रक्कम रु. १,९०,००,००० (एक कोटी नव्वद लक्ष) चा भरणा करण्यात आलेला आहे. तसेच रायगड जिल्ह्यातील मनोहर दर्यानानी यांचे मेघरे बॉक्साईट माईन्स, मे.अलतगे स्टोन क्रशिंग इंडस्ट्रीज यांचे दांडा-बागमंडल-सायगांव बॉक्साईट खाण व कुरवळे-मारळ येथील बॉक्साईट खाणीचे खाणकामाबाबत एकूण फरकाची रक्कम रु. ३१,९५,२२८ वसूल करण्यात आलेली आहे असे समितीसमोर विदित केले.

शिफारस

५.२४ MCD नियमाच्या नियम ४५ अंतर्गत प्रत्येक भाडेपट्टेदाराने मासिक / वार्षिक उत्पादन, निपटारा आणि उत्खनन केलेल्या खनिजावर प्रदान केलेले स्वामित्वधन या बाबी दर्शविणारे मासिक व वार्षिक विवरण फाईल करावयास पाहिजे. परंतु विभागाने ते नुसतेच विवरण स्वीकारले आहेत आणि भाडेपट्टादारांनी सादर केलेल्या विवरणाची पडताळणी करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. यामूळे विवरण सादर करण्यामागचा उद्देश्यच विफल ठरला. शिखर स्तरावर भाडेपट्टादाराने सादर केलेल्या आकडेवारीच्या अचूकतेची खातरजमा करण्यासाठी कोणतेही कार्यतंत्र नाही. लेखापरिक्षणेने वार्षिक विवरणाची पडताळणी केली असता त्यात स्वामित्वधन व भाड्याची कमी वसुली/वसुली न करणे अथवा विलंबाने वसुली केल्याचे दिसून आले. त्याअनुषंगाने सदरहू प्रकरणात स्वामित्वधनाची कमी वसुली झाल्याचे आक्षेप सदरहू परिच्छेदात नोंदविण्यात आलेले आहेत.

समितीने यासंदर्भात विचारणा केली असता, विभागाने आता इंटीग्रेटेड मॅनेजमेंट सिस्टीम अंमलात आणलेली असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत असल्यामुळे यात या सिस्टीममुळे बरीच सुसूत्रता येणार असून पासेस देणे व अनियमित उत्खननावर आळा घालणे यामुळे निश्चितच शक्य होणार आहे. तसेच या परिच्छेदासंदर्भात संबंधित सर्व खाणपट्टाधारकांकडून देय ठरणारी रु. ११,२०,४३,२४२ रकमेची वसुली करण्यात आल्याचेही समितीस सांगण्यात आले. महालेखाकारांनी केवळ नमुन्यादाखल केलेल्या तपासणीमध्ये या गंभीर बाबी समितीच्या निदर्शनास आल्या आहेत. राज्यात अन्य ठिकाणी देखील अशी प्रकरणे निश्चितच अस्तित्वात असण्याची शक्यता आहे. अतः विभागाने सर्व विवरणे तपासण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी व त्याअनुषंगाने वसूल केलेल्या स्वामित्वधनाच्या अचूकतेची पडताळणी कालबद्ध पद्धतीने करावी. तसेच सदरहू प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेली कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(ब) "व्याजाचा भरणा न होणे"

अभिप्राय

५.२५ MC नियम, १९६० च्या नियम ६४A अनुसार स्वामित्वधनाचा भरणा विलंबाने झाला असल्यास, २४ टक्के दराने व्याज वसुली योग्य असते. विभागाने स्वामित्वधनाचा वेळेवर भरणा झाला आहे याची खातरजमा करण्याकरिता दस्तावेज योग्य प्रकारे जतन केलेले नाही. दस्तावेजांच्या अभावी लेखापरीक्षेस स्वामित्वधनाचा भरणा वेळेवर झाला आहे याबाबत सर्व प्रकरणांत खात्री करता आली नाही, केवळ एका प्रकरणात सर्व दस्तावेज आढळले. ज्यात भाडेपट्टेदाराने भरणा ३ दिवस ते ११३ दिवसांच्या विलंबाने केला आणि तो एकूण रु.१४.३८ कोटी स्वामित्वधनाचा विलंबाने भरणा केल्यामुळे रु.२०.९१ लाख व्याज देणे लागत होता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

सदर आक्षेप विभागीय प्रतिनिधींनी मान्य केले व सदर मुद्दांच्या अनुषंगाने मे. भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी, कोल्हापूर यांना व्याजाची रक्कम भरण्याबाबत नोटीस बजावण्यात येऊन संबंधितांकडून संपूर्ण रक्कम रु. २०,९०,६२२ (रुपये वीस लाख नव्वद हजार सहाशे बावीस) वसूल करण्यात आले आहे असेही समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस

५.२६ महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात व्याजाचा भरणा न करणेबाबत आक्षेप नोंदविलेले आहेत. स्वामित्वधनाचा भरणा ९० दिवसांपेक्षा जास्त विलंबाने झाल्यास २४% दराने व्याज आकारण्याची तरतूद आहे. खनिपट्ट्यातील स्वामित्वधनाचा हिशोब प्रत्येक तिमाही नंतर करण्यात येतात. बॉक्साईटचे दर आयबीएमद्वारा प्रकाशित करण्यात येतात. हे दर प्रकाशित करण्यास विलंब झाल्यास, परिणामी हिशोब तपासणी व फरकाच्या रकमेच्या वसुलीत विलंब संभवतो. सदर प्रकरणी संपूर्ण रक्कम रु. २०,९०,६२२ संबंधित खाणपट्टाधारकांकडून वसूल करण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. वास्तविकतः महालेखाकारांनी उपरोक्त आक्षेपात नमूद केलेल्या बाबी व रकमेची तूट विभागाच्या अधिकाऱ्यांच्या स्वतःच्या किंवा अंतर्गत लेखापरीक्षणादरम्यान लक्षात येणे आवश्यक असताना कमकुवत अंतर्गत लेखापरिक्षणामुळे कित्येक वर्ष विभागाचे याकडे दुर्लक्ष झालेले आहे. इतकेच नव्हेतर स्वामित्वधन भरावयास लागलेल्या विलबांचा प्रकरणनिहाय तपशील देखील विभागाने तयार केला नाही ही देखील बाब निश्चितच समर्थनीय नाही. महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविले नसते तर लाखो रुपयांच्या महसूलाचे शासनाचे नुकसान झाले असते. अतः या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी. तसेच हे आक्षेप फक्त लेखापरिक्षेस सादर करण्यात आलेल्या कार्यकाळातील विवरणांच्या संदर्भात होते. विभागाने यासंदर्भातील सर्व प्रकरणे कालबद्ध पद्धतीने तपासावी व वसुलपात्र रकमेची अचूकरित्या पडताळणी करावी. तसेच विभागाने भविष्यात अशा प्रकरणांचा दस्तावेज ठेवावा व जिथे स्वामित्वधन विलंबाने भरण्यात येत आहे तेथे व्याजाची आकारणी करावी व भविष्यात असे आक्षेप टाळावेत व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(क) "मृत भाडे आणि भूपृष्ठ भाड्याची वसुली न करणे"

अभिप्राय

५.२७ MMDR अधिनियमाच्या कलम ९A (१) अनुसार खनिकर्म भाडेपट्ट्याच्या प्रत्येक भाडेपट्टादाराने दर वर्षी संपूर्ण वर्षासाठी अनुसूची III मध्ये विहित दरानुसार अग्रिम मृत भाडे भरावयास पाहिजे. MC नियम १९६० च्या नियम २८(१) मध्ये विनिर्दिष्ट आहे की खनिकर्म प्रक्रिया भाडेपट्टा निष्पादित झाल्याच्या तारखेपासून एका वर्षात सुरू न झाल्यास अथवा खनिकर्म प्रक्रिया सुरू झाल्यानंतर निरंतर एक वर्षाच्या कालावधीसाठी निष्क्रिय असेल तर महाराष्ट्र शासनाने खनिकर्म भाडेपट्टा रद्द होण्याबाबत घोषणा करावयास पाहिजे आणि भाडेपट्टादारास तसे सूचित करावयास पाहिजे. शिवाय, MC नियम १९६० च्या नियम २७(१) (d) प्रमाणे भाडेपट्टेदाराने खनिकर्म प्रक्रियेसाठी वापरलेल्या जमिनीच्या क्षेत्रावर जमीन महसूलापेक्षा जास्त नसेल एवढ्या दराने, भूपृष्ठ भाडे म्हणून अदा करावयास पाहिजे. परंतु, यवतमाळ आणि कोल्हापूर येथे जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्याने २६ भाडेपट्ट्याचे, जे १ ते १६ वर्षे इतक्या कालावधीसाठी निष्क्रीय होते, रु. ८२.९२ लाख मृत भाडे वसूल केले नव्हते व शासनाद्वारे भाडेपट्टे देखील रद्द करण्यात आले नाही. यवतमाळ जिल्ह्यातील २१ प्रकरणांत MC नियम १९६० च्या नियम २७(१) (d) अंतर्गत भाडेपट्टेदाराने रु. २.१९ कोटी भूपृष्ठ भाडे अदा केले नाही व जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्याने त्याची मागणीही केली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

उपरोक्त मृत भाडे संदर्भात एकूण रक्कम रु. ८२.९२ लाख रकमेपैकी कोल्हापूर जिल्ह्यातील ७ बॉक्साईट खाणपट्टाधारकाद्वारे मृतभाटकाची एकूण रक्कम रु. ५५,३२,४०४ पैकी एकूण २२,०७,७४० रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. उर्वरीत रक्कम वसूल करून शासनजमा करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे. तसेच यवतमाळ जिल्ह्यातील एकूण ८ खाणपट्टाधारकांकडून रुपये १४.७७ लक्ष ची वसुली करण्यात आलेली आहे. इतर रकमांची वसुलीची कार्यवाही सुरू आहे. तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण ०७ खाणपट्टाधारकांकडून रु.१३.१५ लक्ष एवढी मृतभाटक रकमेची वसुली झालेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

तसेच भूपृष्ठ भाडे संदर्भात यवतमाळ जिल्ह्यातील २१ प्रकरणांत भाडेपट्टेदाराने रु.२.१९ कोटी भूपृष्ठ भाडे अदा केले नसल्याचे महालेखाकार कार्यालयाने आक्षेप नोंदविले आहे. तथापि सदर २१ प्रकरणांमध्ये मृतभाटक रक्कम प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा देखील समावेश करण्यात आला. खनिज सवलत नियम, १९६० चे नियम २७ (ड) प्रमाणे भुपृष्ठधारक (Surface Rent) वसुलीची तरतूद आहे. मृतभाटकाच्या रकमा खाणपट्ट्यातील खाणकाम बंद असल्यास वसूल करण्याची तरतूद आहे. यवतमाळ जिल्ह्यातील एकूण ०५ खणिपट्टा धारकाकडे भूपृष्ठ भाटकाची रक्कम प्रलंबित असून एकूण १४ खाणपट्टाधारकांकडून रु. ३५.४९ लक्ष एवढी भूपृष्ठभाटकाच्या रकमेची वसूली करण्यात आलेली आहे. उर्वरित खनिपट्टा धारकांकडून वसुलीची कार्यवाही सुरू असल्याचे समितीस सांगण्यात आले.

सदरहू प्रकरणी वसुली संदर्भात केलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती समितीने विचारली असता, महालेखाकार कार्यालयांनी नमूद केलेल्या रकमेबाबतचे विनियोजन करणे आवश्यक असून सदर प्रकरणी महालेखाकार यांनी खनिपट्टाच्या पूर्ण क्षेत्रावर मृतभाटक व भूपृष्ठभाटकाची आकारणी केली आहे. मृतभाटक संपूर्ण क्षेत्रावर व भूपृष्ठ भाटक एकूण वापरण्यात आलेल्या क्षेत्रावर आकारणी करणे आवश्यक आहे.

याप्रमाणे मृतभाटकाची महालेखाकार कार्यालयाकडून काढण्यात आलेल्या आक्षेपानुसार रु. ८२.९२ लक्ष रकमेपैकी कोल्हापूर जिल्ह्यातील ६ खणिपट्टाधारकांकडून रु. ५५,३२,४०४ पैकी रु. ३६,५३,०२६ इतकी मृतभाटकाची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. यवतमाळ जिल्ह्यातील ८ खणिपट्टाधारकांकडून रु. १५.२८ लक्ष इतकी मृतभाटकाची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. एकूण रु. ५१.८१ लक्ष रकमेची वसुलीची कार्यवाही झाली असून, कोल्हापूर जिल्ह्यातील १ व यवतमाळ जिल्ह्यातील ११ असे एकूण १२ प्रकरणांमध्ये अनुक्रमे रु. १६.४७ लक्ष व रु. ८.१८ लक्ष (एकूण रु. २४.६५ लक्ष) उर्वरीत रक्कम वसुलीची कार्यवाही सुरू आहे. तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील ६ खाणपट्टाधारकांकडून रु. १३.१५ लक्ष मृतभाटकाची वसुली करण्यात आलेली आहे.

महालेखाकार कार्यालयाच्या आक्षेपानुसार भूपृष्ठभाडेबाबत यवतमाळ जिल्ह्यातील २१ प्रकरणांमध्ये रु.१.६१ कोटी थकबाकी पैकी ११ प्रकरणांमध्ये खाणपट्टाधारकाने वापरण्यात आलेले क्षेत्रावर भूपृष्ठभाटकाची देय ठरणारी रक्कम रु.३५.०४ लक्ष वसूल करण्यात आलेले आहे. उर्वरित १० प्रकरणांमध्ये महालेखाकार कार्यालयाच्या आक्षेपानुसार रु.५८.०० लक्ष थकबाकी आहेत. परंतु सदर रक्कम संपूर्ण मंजूर क्षेत्रावर आकारण्यात आलेली आहे. सदर खनिपट्टे मागील १०-१२ वर्षापासून बंद आहेत. करिता खनिपट्टाधारकाकडून खाणकामाकरिता वापरण्यात आलेले क्षेत्र (Area under operation) घोषित केलेल्या क्षेत्रावर भूपृष्ठ भाडे आकारणी करून वसूल करण्यात येईल असे समितीस सांगण्यात आले.

शिफारस

५.२८ महालेखाकारांनी सदरहू प्रकरणी नोंदविलेले आक्षेप गंभीर असून विभागाने मृत भाडे व भूपृष्ठ भाडे यांची आकारणी कमी केल्यासंदर्भात यात नमूद आहे. विभागाने या आक्षेपानंतर मृत भाडे व भूपृष्ठ भाडे यांची फेरआकारणी केली व वसुलपात्र रक्कमेची निश्चिती केली व त्यातील काही रक्कम वसूल करण्यात आली असून उर्वरित रक्कम वसुल करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे समितीस सांगण्यात आले. विभागाने समितीस उपरोक्तपणे कळविल्याप्रमाणे या सर्व प्रकरणी तात्काळ वसूलपात्र रकमेची नियमानुसार निश्चिती करावी व ती कालबद्ध पद्धतीने वसूल करावी. त्याचप्रमाणे महालेखाकारांनी नमुन्यादाखल केलेल्या काही चाचणी परिक्षणामध्ये ही प्रकरणे निदर्शनास आली. राज्यात अन्यत्रही अशी अनेक प्रकरणे अस्तित्वात असणार, त्याची देखिल चौकशी करून वसूलपात्र रकमेची कालबद्ध पद्धतीने निश्चिती करून ती वसूल करण्यात यावी. इतकेच नव्हे तर उपरोक्तपणे कळविण्यात आलेली वसुली ही सन २०१३ पूर्वीपर्यंतची आहे. आजतागायत ही वसुली न झाल्यामुळे त्यावर व्याजाची देखील आकारणी वसूलपात्र ठरते. अशाप्रकारे या वसूलपात्र रकमेची गणना केली तर ही रक्कम अधिकच वाढण्याची शक्यता आहे. त्याअनुषंगाने देखील वसूलपात्र रकमेची निश्चिती व वसुली करण्यात यावी. तसेच ज्या संबंधित अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे ही वसुली वेळेत होऊ शकली नाही. त्यांचेवर तात्काळ कारवाई करण्यात यावी. तसेच वसुली न झाल्यास व्याजाची रक्कम त्या अधिकाऱ्यांकडून वसूल करण्यात यावी. त्याचप्रमाणे भविष्यात

असे आक्षेप टाळण्यासाठी यंत्रणा सक्षमीकरण करणे आवश्यक आहे. अतः संपूर्ण राज्यातील अशा प्रकरणांचा आढावा घेऊन ३१ मार्च २०१८ पर्यंत व्याज मृत भाडे व भूपृष्ठ भाडे या तिन्ही प्रकरणांची थकबाकीच्या रकमेचे विवरणपत्र तयार करावे. त्यावर आजतागायत जिल्हाधिकाऱ्यांनी कोणती कारवाई केली याचा देखील तपशील नमूद करावा व त्याअनुषंगाने वसुलीची सद्यःस्थिती निश्चित करून वसुली करावी व जबाबदारी निश्चित करावी. तसेच भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळण्यासाठी जिल्हाधिकारी स्तरावरून नियमित आढावा घेणे अनिवार्य करणेबाबत तात्काळ सूचना निर्गमित करण्यात याव्यात. त्याचप्रमाणे हे काम अतिशय जलद, अचूक व पारदर्शकरित्या होण्यासाठी अशा प्रकरणांसाठी राज्यात सॉफ्टवेअर तयार करण्यात यावे. ज्यात कोणत्या भाडेपट्टेधारकाची किती थकबाकी आहे व कोणत्या जिल्ह्याची काय स्थिती आहे याचे ऑनलाईन रिपोर्टिंग उपलब्ध असले पाहिजे त्याअनुषंगाने आवश्यक ती संगणकीय प्रणाली विकसित करण्यात यावी व या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत कळविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ७.२.३ "गौण खनिज"

परिच्छेद क्रमांक ७.२.३.१ "गौणखनिज साधनसंपत्तीचे व्यवस्थापन"

(अ) रेती व्यतिरिक्त गौण खनिजांची केंद्रीकृत माहिती (data) आणि धोरणाचा अभाव

(*i*) बहुमोल दगड/निमरत्न

अभिप्राय

५.२९ इंटरनेट शोधात (www.mindat.org. www.iRocks.com) दिसून आले की तहसील हवेली, जिल्हा पुणे येथील वाघोळी मध्ये कॅवानसाईट (Cavansite), पेन्टॅगोनाईट सारखे दगड/निम रत्न उपलब्ध आहेत. विभागाने सूचित केले की त्यांना बहूमोल दगड/निम्नरत्न असण्याबाबत माहिती नाही. यावरून दिसून येते की, येथे गौण खनिजांच्या पूर्वेक्षणाचा अभाव आहे असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत. यासंदर्भात भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण (Geological Survey of India, Pune) यांनी मौजे वाघोली, ता. हवेली, जि. पुणे येथील कॅवानसाईट, पेन्टॅगोनाईट सारखे बहुमोल दगड/निम्नरत्न निदर्शनास आलेले नाही, ह्या प्रकारच्या खनिजाचा आढळ तुरळक प्रमाणात असतो, त्यामुळे या खनिजाचे साठे सिद्ध करणे शास्त्रीयदृष्ट्या शक्य नाही. तसेच, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालयाने सन २०१५ मध्ये केलेल्या निरीक्षणात सदर भागात अर्धमौल्यवान रत्न असल्याचे निदर्शनास आले नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर विदित केले.

शिफारस

५.३० सदरहू आक्षेपासंदर्भात समितीसमोर सांगण्यात आले की, महालेखाकारांनी इंटरनेटवरून माहिती घेऊन उपरोक्त आक्षेप नोंदविलेले आहे. भूवैज्ञानिक सर्वेक्षण संस्था यांचेकडून सुद्धा याबाबत कोणीही कधीही असा अहवाल दिलेला नाही व तिथे अशा प्रकारचे समकक्ष दगड आहेत. परंतु आक्षेपात नोंदविल्याप्रमाणे बहुमोल/निमरत्न दगड नाहीत. महाराष्ट्रात ७५% दगड बेसॉल्ट आहे. त्यामुळे महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपासंदर्भात विभागाने अधिकृतरित्या दिलेले स्पष्टीकरण ग्राह्य धरण्यास हरकत नाही. परंतु महाराष्ट्र शासनाकडे गौण खनिजांच्या (रेती शिवाय) परिमाणाची व ठिकाणांची केंद्रीकृत माहिती नाही, परिणामी गौण खनिजांचे व्यवस्थापन प्रभावीपणे संनियंत्रित करता येऊ शकले नाही. त्याअनुषंगाने समितीसमोर सांगण्यात आले की, खनिजांसाठी एक डेटाबेस स्थापित करण्याच्या अनुषंगाने भारतीय खाण ब्यूरो व विप्रो यांच्या मध्ये MOU स्वाक्षरी करण्यात आला आहे व त्यात महाराष्ट्रासह इतर १२ राज्यांचा सहभाग आहे. अतः याअनुषंगाने आवश्यकती कारवाई व केंद्र शासनाकडे पुढील पाठपुरावा राज्य शासनाकडून करण्यात यावा व यासदंर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(*ii*) डोंगर कापणी दरम्यान काढण्यात आलेले दगड

अभिप्राय

५.३१ विभागाने डोंगर कापणी दरम्यान काढण्यात आलेल्या खनिजांची कुठलीही माहिती जतन करून ठेवली नाही. त्याचप्रमाणे डोंगर कापणीवर कुठल्याही प्रकारचे प्रतिबंध घालण्यात आलेले नाही, असे प्रतिबंध निश्चित करावयास पाहिजे होते. जिल्ह्यांत दगडखाणींचे, गौण खनिजांच्या राखीवांचे कोणतेही निश्चित रेखांकन नाही, खनिज साधनांच्या विवेकपूर्ण उपयोगासाठी योजनाबद्ध आराखडा नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे आक्षेपात नमूद केले आहे.

याअनुषंगाने विभागाद्वारे जिल्हा स्तरावर दगडखाणी चिन्हांकित करण्यात येईल, त्याचप्रमाणे डोंगरी भागांत खनिकर्मासाठी कोणतेही धोरण नाही, यासाठी योग्य धोरण तयार करण्यात येईल आणि खनिकर्माच्या उद्देश्याने करण्यात येणाऱ्या डोंगरी भागाच्या खोदकामासाठी सीमा निश्चित करण्याबाबत व समन्वेषणाबाबत नियम विनिर्दिष्ट करण्यात येईल असे विभागाद्वारे विदित करण्यात आले.

शिफारस

डोंगरी भागात द्यावयाचे खाणपट्टे, उत्खनन व डोंगर कापणी दरम्यान कापण्यात आलेले दगड यासंदर्भात कोणतेही धोरण राज्य शासनाकडे आज अस्तित्वात नाही. विभागाने यासंदर्भात संचालक, जिओलॉजी व मायनिंग यांचेशी चर्चा केली असून त्यांच्या प्राथमिक सूचनेनुसार डोंगरी भागातील इकोलॉजीकल सेंसेटीव्ह एरियामध्ये अजिबात खाणकाम करु नये. त्या व्यतिरिक्त उर्वरीत भागात काही अटी शर्तीच्या अधीन राहून याबाबत विचार करता येऊ शकेल असे त्यांचे प्राथमिक मत आहे. यासंदर्भात सविस्तर सूचना प्राप्त झाल्यास विभागास त्या आधारे धोरण ठरविणे शक्य होईल असेही विभागाने समितीसमोर विदित केले. अतः राज्याने खनिकर्म उत्खनन तसेच डोंगरी भागात करावयाचे उत्खनन यासंदर्भात केंद्र शासनाशी सुसंगत व सर्व समावेशक धोरण तातडीने निश्चित करावे व या संदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(iii) खाण पट्टा आणि खनिकर्म परवान्याचे मोजमापन

अभिप्राय

५.३२ जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यास खनिज उत्खनन आणि त्यावर अदा केलेल्या स्वामित्वधनाचे तिमाही विवरण सादर करण्यात येते. तथापि, जिल्हा खनिकर्म अधिकारी कार्यालयात प्रत्यक्ष उत्खनन केलेल्या परिमाणाचे विवरणात दर्शविलेल्या परिमाणासोबत पडताळणी करण्यासाठी कोणतीही पद्धत नाही. खाणीतून उत्खनन केलेल्या खनिजांचे मोजमापन करण्यासाठी जरूरी असलेली उपकरणे जसे इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन्स (ETS) विभागाकडे उपलब्ध नाही. तसेच विभागाने खाणींचे नियमित निरीक्षण केले आहे असे मापदंड दिसून येत नाही.

अवैध उत्खननाचा तपास लावण्याकरीता खाणींची तपासणी उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार (सप्टेंबर २०१४) करण्यात आली. या निर्देशाप्रमाणे विभागाने रु.३६.२८ कोटी स्वामित्वधनाची आकारणी केली ज्यात ७५१ प्रकरणांतील शास्ती अंतर्भूत होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

शिफारशी

५.३३ (१) **गौण खनिजासाठी जर असे धोरण आखले गेले ज्यात इतर गोष्टींबरोबर खाणींचे नियमित निरीक्षण, खाण क्षेत्राचे वेळोवेळी मोजमापन आणि स्वामित्वधनाचे निर्धारण यांचा समावेश असेल तर ते महसूलाच्या दृष्टीने हितावह ठरेल.**

यांसदर्भात गौण खनिजाच्या उत्खननाचे ETS मशिनद्वारे मोजणी करणे तसेच गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्याच्या दृष्टीने गौण खनिजाच्या उत्खनन स्थळांची वेळोवेळी पाहणी करून केलेल्या उत्खननाची मोजणी करण्याच्या सूचना दिल्याचे, त्याचप्रमाणे महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील नियम ४६ मध्ये क्रच्च मशीनद्वारे खाणपट्टयातील उत्खननाची वार्षिक मोजणी करण्याची तरतूद करण्याचे प्रस्तावित असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

यासंदर्भात समितीने विचारणा केली असता, ईटीएसद्वारे वार्षिक मोजमाप करण्याबाबतची तरतूद नियमात केली जाईल. तसेच महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम २०१३ मधील नियम ४६ मध्ये ईटीएस मशिनद्वारे खाणपट्टयातील उत्खननाची वार्षिक मोजणी करण्याची तरतूद करण्याचे प्रस्तावित असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. स्थळ पाहणी करून मोजमाप करण्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले आहे. परंतु नियमामध्ये अद्यापही काही अंतर्भूत केलेले नाही असेही समितीसमोर सांगण्यात आले. अतः विभागाने तात्काळ उपरोक्त प्रस्तावित कारवाईचा पाठपुरावा करून त्यासंदर्भातील तरतूद करण्याची कारवाई मंजूर करून तातडीने अंमलात आणावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

५.३४ (२) महाराष्ट्र शासनाने गौण खनिजांचे (रेती व्यतिरिक्त) परिमाण आणि उपलब्धता, स्थान याबाबत केंद्रीकृत माहिती न ठेवल्यामुळे बहुमोल दगड/निमरत्न यांसारख्या गौण खनिजांचे व्यवस्थापन, डोंगर कापणी, खाण पट्टयांचे मोजमापन इत्यादींचे प्रभावीपणे संनियंत्रण करता आले नाही. गौण खनिजांचे परिमाण आणि त्यांचे ठिकाण याची माहिती (databank) शासनाद्वारे राखण्यात आलेली नाही. वाटप केलेल्या खाणी आणि रेती घाटांचे नियतकालिक मोजमाप करण्याची पद्धत नसल्यामुळे खनिज उत्खननाच्या प्रमाणाची आणि त्यावर अदा करण्यात आलेल्या स्वामित्वधनाची पडताळणी करता आली नाही. अतः गौण खनिज क्षेत्र आणि त्यात अभिप्रेत असलेले गौण खनिजांचे परिमाण निर्देशित करण्यासाठी शासनाने एक डेटाबेस/डेटाबँक तात्काळ तयार करावा. खाणी व रेती घाटांचे वाटप झाल्यानंतर त्यांचे नियतकालिक मोजमाप व्हावे यासाठी शासनाने एक पद्धती तयार करावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ७.२.३.२ "स्वामित्वधनाची कमी वसुली/वसुली न करणे"

अभिप्राय

५.३५ महसूल व वन विभागाने (फेब्रुवारी, २०१०) बंधारे, रस्ते व इमारती यांच्या बांधकामात भरणा अथवा सपाटीकरण करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या साधारण मातीच्या स्वामित्वधनाच्या दरात सुधारणा करून हे दर रु. १०० प्रति ब्रास वरून रु. २०० प्रति ब्रास वाढविले. परंतु रायगड जिल्ह्यात कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, कोलाड यांनी (जून २०१०) कंत्राटदार मेसर्स एफ.ए. इंटरप्रायजेस, मुंबई यांचेकडून बाळगंगा नदी मध्यम प्रकल्पांचे कामावर रुपये ६.८८ कोटी ऐवजी ३.४४ लाख ब्रास वर जुन्या दराने रु. ३.४४ कोटी स्वामित्वधन वसूल केले. यामुळे रु. ३.४४ कोटी स्वामित्वधनाची कमी वसुली झाली. याशिवाय, फक्त रु. १ कोटी स्वामित्वधन शासन जमा झाले आणि रु. ५.८८ कोटी रक्कमेची वसुली प्रलंबित आहे. त्याप्रमाणे नाशिक जिल्ह्याच्या निफाड तहसील मध्ये गाव तलावाच्या २२ कामांचे २०१०-११ या कालावधीचे रु. ४१.२६ लाख जुन्या दराने स्वामित्वधन वसूल करण्यात आले आणि ही रक्कम महाराष्ट्र जल संवर्धन महामंडळ, औरंगाबाद (MWCC) यांचेकडे ठेवलेली होती. नवीन वाढविलेल्या दरानुसार वसुलीयोग्य स्वामित्वधन रुपये ८२.५२ लाख होते. महसूल प्राधिकाऱ्यांनी महाराष्ट्र जल संवर्धन महामंडळ, औरंगाबाद यांचेकडून योग्य दराने स्वामित्वधन वसुलीसाठी प्रयत्न करावे आणि त्यास कोषागारात जमा करावे. तसेच तीन तहसिलांमध्ये (दौंड, कर्जत आणि वसई) सन २०११-१२ ते २०१३-१४ वर्षासाठी रु. १.४५ कोटी स्वामित्वधन कंत्राटदारांकडून निष्पादन करणाऱ्या एजन्सीनी वसूल केल्यानंतरही ते शासन जमा केले नाही. आणि महसूल प्राधिकारी, जे वसुलीसाठी जबाबदार आहेत, त्यांनी याची मागणीही केली नाही असे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

रायगड संदर्भात स्वामित्वधनाची फरकाची रक्कम अदा करण्याचे कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड यांनी मान्य केले आहे. त्यानुसार त्यांनी अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे यांचेकडे रु. ५.८८ कोटी एवढी रकमेची मागणी केली आहे.

तहसिलदार निफाड यांनी फरकाची रक्कम रु. ४१.२६ लाख जमा करणेबाबत कार्यकारी अभियंता लघुसिंचन (जलसंधारण विभाग) विभाग नाशिक यांना तसेच मुख्य लेखा व लेखापरिक्षण अधिकारी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ औरंगाबाद यांना कळविण्यात आले आहे. प्रकरणी पाठपुरावा सुरू असून रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे समितीस सांगण्यात आले.

तहसिल दौंड कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, पुणे यांनी दौंड तालुक्यातील झालेल्या गौण खनिजाचे स्वामित्वधनाची रक्कम रु. ६१,०१,०७१, दि. २४.६.२०११ रोजीच्या धनादेशाद्वारे तहसिलदार दौंड यांचेकडे जमा केली आहे.

तहसिल कर्जत कार्यकारी अभियंता रायगड पाटबंधारे विभाग कोलाड यांचेकडून जमीन महसूलाची रक्कम रू १.१९ कोटी वसूल करण्याबाबत तहसिलदार कर्जत यांनी वेळोवेळी पत्रान्वये तसेच नोटीसीद्वारे कळविले होते. तथापि, तहसिलदार, कर्जत यांना सदर रकमेची वसूली होणार नाही असे निदर्शनास आल्याने त्यांनी जिल्हाधिकारी रायगड यांना सदर प्रकरणी महसूल वसुली प्रमाणपत्र करून पाठविले. सदर प्रकरणी वसुलीची कार्यवाही सुरू आहे. तहसिल वसई कार्यकारी अभियंता, सांर्वजनिक बांधकाम विभाग क्र. १, ठाणे यांनी सन २०११-१२ व २०१३-१४ मधील वसई तालुक्यातील गौण खनिजाची रक्कम दि. २०.३.२०१५ रोजी ५,००,०००/- व रु. ५,४६,६७२/- इतकी रक्कम तहसील कार्यालय, वसई येथे जमा केली आहे असे समितीसमोर सांगण्यात आले.

या प्रकरणी समितीने वस्तुस्थितीदर्शक माहिती समितीस सादर करणेसंदर्भात कळविले असता समितीस विभागाकडून पुढीलप्रमाणे कळविण्यात आले.

बाळगंगा नदी प्रकल्प, ता.पेण, जि.रायगड निविदा प्रक्रिया सन २००९ मध्ये पूर्ण करण्यात आलेली असून प्रत्यक्ष कामास दि. १८/०१/२०१० रोजी सुरूवात करण्यात आली होती. सदरचा प्रकल्प हा सिडको, नवी मुंबई यांच्यावतीने ठेव तत्त्वावर कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांच्यावतीने करण्यात येत असून सदर प्रकल्पाचा संपूर्ण खर्च हा सिडको, नवी मुंबई यांचेकडून होत आहे.

ज्यावेळी या प्रकल्पाच्या धरण बांधकामासाठीची निविदा झाली, त्या निविदेमध्ये धरणाच्या बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याच्या स्वामित्व शुल्कासाठी निविदेत रु.१०० प्रतिब्रास (रु. ३५.३४/घमी) इतका दर विचारात घेण्यात आला होता. क्षेत्रिय कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेख्यावरून असे दिसून येते की, प्रकल्पाच्या झालेल्या कामांची मोजमापे ही दि. २८/०४/२०१० ते ३०/०४/२०१० या कालावधीत नोंदविण्यात आलेली असून त्याप्रमाणे सदरच्या कालावधीत एकूण १० चालू देयके अदा करण्यात आलेली आहेत. या नोंदविण्यात आलेल्या विविध घटकांच्या परिमाणांचा एकत्रित विचार करून आणि निविदेमध्ये स्वामित्व शुल्काची रक्कम रु.१४,६२,२४,१२७/- इतकी येत आहे. त्यांपैकी काही चालू देयकांतून विभागीय कार्यालयाने कपात करून रक्कम रु. ८,३१,७९,४१३/- प्रत्यक्षामध्ये महसूल विभागाला स्वामित्व शुल्कापोटी वेळोवेळी जमा केलेली आहे आणि उर्वरित स्वामित्व शुल्काची रक्कम रु.६,३०,४४,७१४/- महसूल विभागाकडे जमा करावयाचे प्रलंबित आहे.

या प्रकल्पाच्या निविदा शर्त व निविदा अटींमध्ये खालीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे :—

(१) Clause 36—All quarry fees, royalties, Octroi dues and ground rent for stacking materials, construction materials if any should be paid by contractor.

(२) Special Condition 145—Page 155—The contractor shall, however, obtain permission from Revenue and other authorities, before removing the material and shall pay royalty and other taxes. Octroi, Duty, Essort fess, if any for sand. Contractor shall have to make his own enquiries regarding legal right and attend to the aspect of payments due etc. for the operation of the quarries.

(३) Special Condition 44—Page 180—The contract should utilizes material due available from the excavated stuff for backfilling Royalty charges for all construction materials are included in estimate at the rate of Rs.35.54/cum. Any increase or decrease in the rates will have effect its payment/recovery on submission of valid documents *i.e.* Challan etc.

वर नमूद निविदा शर्त व अटींचा विचार करता, स्वामित्व शुल्काची रक्कम महसूल विभागाकडे जमा करणेची जबाबदारी ही संबंधित ठेकेदाराची होती. तसेच संबंधित ठेकेदाराकडून स्वामित्व शुल्काची रक्कम वेळोवेळी वसूल करण्याची जबाबदारी ही तत्कालिन अधिकाऱ्यांची होती. असे असतानासुद्धा जलसंपदा विभागाच्या प्रचलित पद्धतीनुसार जलसंपदा विभागाच्या तत्कालिन अधिकाऱ्यांनी ठेकेदाराच्या चालू देयकातून रु. १४.६२ कोटी स्वामित्व शुल्कापोटी रु. ८.३१ कोटी स्वामित्व शुल्क वसूल करून महसूल विभागाकडे जमा केलेले आहेत. ज्यावेळी बाळगंगा प्रकल्पाच्या कामासाठीची निविदा कार्यवाही पूर्ण झाली, त्यावेळी स्वामित्व शुल्काचे दर हे रु.३५.३४/घमी असे होते. त्यानंतर दि. ११/०२/२०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार स्वामित्व शुल्काचे दर सुधारित होऊन रु. ७०.७०/ घमी असे झाले. या स्वामित्व शुल्कांच्या सुधारित दरांचा विचार करता, अभिलेख्यामध्ये नमूद केलेल्या परिमाणांसाठी साधारणपणे रु.२९,२४,४८,२५४/- एवढी वसूली होणे अपेक्षित आहे. यांपैकी वसुल झालेली स्वामित्व शुल्काची रक्कम रु. ८,३१,७९,४१३/- वजाती केली असता आणखी रु. २०,९२,६८,८४१/- स्वामित्व शुल्क म्हणून ठेकेदाराकडून वसूल होणे आवश्यक आहे. या रु.२०,९२,६८,८४१/- पैकी ठेकेदाराच्या देयकातून रक्कम रु. ६,३०,४४,७१४/- वसूल करावी लागेल, तर उर्वरित रक्कम रु.१४,६२,२४,१२७/- स्वामित्व शुल्कापोटी सिडकोकडून या कार्यालयास उपलब्ध होणे आवश्यक आहे. सदरची रक्कम त्वरीत उपलब्ध करून देण्यासाठी सिडको, नवी मुंबई यांच्याकडे लेखी पत्राद्वारे पाठपुरावा केला असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

तसेच सदरच्या बाळगंगा नदी प्रकल्पाचे काम माहे मे,२०१२ पासून बंद आहे. या प्रकल्पाचे ठेकेदार यांनी त्यांनी केलेल्या कामाचे प्रलंबित देयक मिळण्यासाठी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये सदर प्रकरणी ५ सदस्यीय लवाद (Arbitration Tribunal) स्थापन करण्यात आला असून आतापर्यंत सदर लवादाच्या सुमारे २५ बैठका झालेल्या असून लवादाची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. तसेच सदर प्रकल्पाची चौकशी ए.सी.बी.मार्फत सुरू असून सद्यःस्थितीत ठेकेदाराचे कोणतेही देयक अदा करू नये अशा लेखी सुचना त्यांनी त्यांचे दि. २१/१०/२०१५ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या आहेत. त्यामुळे सदर प्रकरण हे न्यायप्रविष्ट आणि चौकशीमध्ये असल्याने या प्रकल्पासाठी सद्यःस्थितीत सिडको, नवी मुंबई यांनी निधी वितरित करण्यास

त्यांच्या दि. ३१/०१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये असमर्थता दर्शविलेली आहे. त्यामुळे यापुढे जेव्हा या प्रकल्पासाठी ठेकेदाराने केलेल्या कामाचे देयक अदा करण्यासाठी निधी उपलब्ध होईल तेव्हा प्रथम प्राधान्याने स्वामित्व शुल्काची रक्कम ठेकेदाराच्या देयकामधून वसूल करून महसूल विभागाकडे जमा करण्याची दक्षता घेण्यात येईल. तसेच कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे कार्यालयाच्या वतीने दि. २३/०२/२०१८ अन्वये मा.जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांना कळविण्यात आले आहे तसेच वेळोवेळी क्षेत्रिय तहसीलदार, पेण यांना कळविले असल्याचेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारशी :

५.३६ (१) सदरहू परिच्छेदातील मूळ मुद्दा शासनाच्या दि. ११.२.२०१० रोजीच्या निर्णयानुसार बंधारे, रस्ते व इमारती यांच्या बांधकामात भरणा अथवा सपाटीकरण करण्यासाठी वापरात येणाऱ्या साधारण मातीचे स्वामित्वधनाचे दर १०० रुपयांवरुन २०० रुपये केले होते. त्यामुळे ही वसुली २०० प्रमाणे होणे आवश्यक होते. परंतु कार्यकारी अभियंता यांनी १०० रुपयांप्रमाणे कंत्राटदारांकडून वसुली केल्यामुळे फरकाची रक्कम वसूलपात्र ठरते असा महालेखाकारांचा आक्षेप आहे. ही वसुली नियमानुसार का करण्यात आली नाही याबाबत समितीने विचारणा केली असता, यात खाणीचे कार्यादेश, प्रशासकीय मंजुरी, अंदाजपत्रक, निविदा या ११.२.२०१० पुर्वीच्या होत्या. त्यामुळे ही वसुली केली नसल्याचे सांगण्यात आले. यावर समितीने आक्षेप नोंदवित प्रत्यक्षात काम मात्र दि.११.२.२०१० नंतर झालेले आहे. त्यामुळे ज्या तारखेस उत्खनन झालेले आहे त्या तारखेचे स्वामित्वधन वसूल केले पाहिजे असे नमूद केले. ही बाब मान्य करून त्यावेळी ही रक्कम वसूल करु शकलो नाही. परंतु आता कंत्राटदाराकडे ही मागणी केली असता तो कंत्राटदार निघून गेलेला आहे. कंत्राटदाराने कार्यकारी अभियंत्याचा एजंट म्हणून हे उत्खनन केलेले आहे. त्यामुळे कंत्राटदार ही जबाबदारी पार पाडत नसेल तर कार्यकारी अभियंत्यावर ही जबाबदारी येते. त्यामुळे ही रक्कम आता विभागाने भरावयाची आहे. परंतु विभागाकडे आता यासंदर्भात निधीची तरतूद तसेच परवानगी दोन्ही नाही असे समितीस सांगितले.

या संदर्भात तहसीलदार, पेण यांनी कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग यांचे एसबीआय, रोहा या बँकेतील बँक खाते गोठविण्याचे आदेश पारित केले. तसेच त्यांचे वाहनही जप्त केले होते. मात्र ते नंतर सोडण्यात आले असेही समितीस सांगण्यात आले. रु. १०० प्रतिब्रास या दराप्रमाणे रु. ३.४४ कोटी ही मूळ रक्कम होती व रु. २०० प्रमाणे ती रु. ६.८८ कोटीइतकी होते. परंतु विभागाने फक्त रु. १.०० कोटी वसुल केले आहेत. याचा अर्थ रु. १०० प्रमाणेदेखील कंत्राटदाराने रक्कम पूर्ण भरलेली नाही. ही तर अधिकच गंभीर बाब आहे. या प्रकरणी विस्तृत अहवाल समितीस सादर करणेबाबत समितीने निदेशित केले असता विभागीय प्रतिनिधींनी उपरोक्त अभिप्रायात नमूदप्रमाणे समितीस कळविले. त्याप्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. तसेच महसूल सचिवांनी या सर्व विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत एकत्रित बैठक घेऊन या रकमेची अंतिमतः जबाबदारी निश्चित करून कोणत्याही परिस्थितीत स्वामित्वधन, व्याज व दंडाची संपूर्ण रक्कम वसूल करावी. त्याचप्रमाणे ज्या अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे ही आकारणी कमी झाली आहे त्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व या संदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(२) उर्वरित आक्षेपासंदर्भात दौंड व वसई येथे रकमेची वसूली झालेली आहे. परंतु निफाड व कर्जत येथे वसुलीची संपूर्ण रक्कम प्रलंबित असून ज्यावेळी देयकाची रक्कम कंत्राटदारास अदा केली जाईल. तेव्हा ही स्वामित्वधनाची रक्कम देखील वसूल केली जाईल असे समितीसमोर सांगण्यात आले. ही संपूर्ण वसुलपात्र रक्कम तात्काळ वसूल करण्यात यावी. तसेच जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून येणे असलेल्या रकमेसंदर्भात हे दोन्ही शासकीय विभाग असल्यामुळे त्या त्या विभागाच्या सचिवांशी समन्वय साधून वसूली करणेसंदर्भात आवश्यक ती कारवाई विभागाने तात्काळ करावी. वास्तविकतः अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे या बाबी घडलेल्या आहेत. विभागाने सुधारीत दराने ही वसूली करणे अभिप्रेत व आवश्यक होते परंतु अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केले. या सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व वसुलपात्र रक्कम तात्काळ वसूल करण्यात यावी. तसेच भविष्यात असे आक्षेप टाळण्यासाठी आवश्यक ते आदेश शासनस्तरावरून निर्गमित करण्यात यावेत व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ७.२.३.३ "शास्ती कमी वसुली/वसुली न करणे"

अभिप्राय :

५.३७ महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या नियम ४८(७) प्रमाणे अवैधरित्या काढलेल्या अथवा विल्हेवाट लावलेल्या खनिजाच्या बाजारमूल्याच्या तिप्पटीपेक्षा जास्त नसेल इतकी रक्कम शास्ती म्हणून आकारावयास पाहिजे. परंतु कोल्हापूर आणि ठाणे जिल्ह्यात विभागाने केलेल्या निरीक्षणात १.१६ लाख ब्रास माती अवैधरित्या खोदण्याची ४६ प्रकरणे शोधली. जिल्हा दर अनुसचीत नमूद असलेल्या खनिजाच्या दरानुसार शास्ती वसूल करावयास पाहिजे होती. परंतु ठाण्यात पाच प्रकरणांत रु. २.०८ कोटी स्वामित्वधन आणि रु. ६.३५ कोटी शास्तीसुद्धा वसूल करण्यात आली नाही व कोल्हापूरमध्ये स्वामित्वधन वसूल करण्यात आले परंतु वसुलीयोग्य रु.५८.५९ लाख शास्तीऐवजी रु.१३.९९ लाख शास्ती आकारून वसूल करण्यात आली. परिणामी, रु. ४४.६० लाख शास्तीची कमी वसुली झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

ठाणे येथील ५ प्रकरणांमध्ये पुढीलप्रमाणे कारवाई केल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

(१) मे. अभिराज ॲग्रो फार्म या कंपनीने मौजे ससूनवघर येथे अनधिकृत उत्खनन केलेबाबत दंडाची वसूली न झाल्याने सदर रकमेचा बोजा ७/१२ व इतर हक्कात चढविण्यात आला.

(२) श्री. देवेंद्र गुलाब जोशी यांनी उप विभागीय अधिकारी, भिवंडी, यांच्या आदेशाविरूद्ध उप जिल्हाधिकारी (अपिले), ठाणे यांचेकडे अपील दाखल केले होते. उप जिल्हाधिकारी (अपिले), ठाणे यांनी उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांचे आदेश रद्द करून फेरतपासणी आदेश दिले. त्या अनुषंगाने मूळ परवान्यांची तपासणी केली असता, १२३ परवान्यांमध्ये खाडाखोड असल्याने २४६ ब्रास मातीचा भराव अनधिकृतरित्या केल्याचे सिद्ध झाले. त्या अनुषंगाने रु.३,४४,४००/- दंड आकारण्यात येवून कसूरदार यांचेकडून सदर रकमेचा भरणा दि. १४/१०/२०१४ रोजी करण्यात आला आहे.

(३) मे. इंडिया शिप ॲण्ड गोट ट्रेडिंग कंपनी- तहसिलदार, वसई यांनी पारीत केलेल्या आदेशाच्या विरूद्ध संबंधित कंपनीने उप विभागीय अधिकारी, वसई यांचेकडे अपील दाखल केले. उपविभागीय अधिकारी, वसई यांनी दि. १६/०६/२०१६ रोजी सदर अर्ज अंशतः मान्य केला व तहसिलदार, वसई यांचे आदेश रद्द करून संबंधितांकडून रु. २४,४८,०००/- रक्कम वसूलीचे आदेश पारित केले.

(४) मो. हाजी आदम- तहसिलदार, वसई यांनी श्री.आदम यांना माती व दगडाचा अनधिकृतरित्या भराव केल्यामुळे रु.१,४०,६१,१३८/- एवढा दंड आकारला त्या अनुषंगाने कसूरदार यांचे ७/१२ वर उक्त रकमेचा बोजा चढविण्यात आला आहे.

(५) श्री. श्रीकांत पाटील.—संबंधितांना नोटीस बजावण्यात आली असून वसुलीची कार्यवाही सुरू आहे. त्याचप्रमाणे कोल्हापूर जिल्ह्यातील मौजे कोथळी, मौजे उदगांव व मौजे चिंचवाड येथील ४१ व्यक्तींनी मंजूर परिमाणापेक्षा जादा उत्खनन केल्यामुळे त्यांचेवर नियमानुसार एकूण १२२१० ब्रास उत्खननाकरीता स्थानिक बाजारमुल्याच्या एक पट दंडाची रक्कम रु. १४,०२,२७५/- स्वामित्वधनाची रक्कम रु. ९,७६,८००/- व भूपृष्ठ भाडे रक्कम रु. ४१००/- अशी एकूण रक्कम रु.२३,८५,१७५/- वसूल करून शासनजमा करणेत आलेली आहे. त्याचप्रमाणे शासन अधिसूचना दि. १५/४/२०१७ अन्वये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्याकरीता गौण खनिजाच्याबाजार मुल्याच्या पाचपटीपर्यंत शास्तीची रक्कम आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतुदीनुसार शास्ती आकारण्याची कारवाई करताना एकाच प्रकारच्या अनियमिततेच्या प्रकरणांत वेगवेगळी शास्तीची रक्कम आकारली जाणार नाही. तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांना भेदभाव करण्यास वाव राहू नये याकरीता शासन परिपत्रक दि.१४/६/२०१७ रोजी गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत शास्तीची कारवाई करण्यासंबंधी दिशादर्शक निर्देश देण्यासंबंधीच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारशी :

५.३८ (१) सदरहू परिच्छेदात शास्ती कमी वसुली/वसुली न करणे असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे. यातील ठाणे जिल्ह्यातील पाच प्रकरणांपैकी मे.अभिराज ॲग्रोफार्म तसेच मो.हाजी आदम या दोन्ही प्रकरणी फक्त सातबारावर नोंद केली गेली व केवळ समितीची साक्ष लागली म्हणून आता विभागाने दोन्ही प्रकरणांत महसूली वसुलीची (RRC) कारवाई सुरू करून लिलावाची प्रक्रियादेखील सुरू केली, ही अतिशय गंभीर बाब असून केवळ सातबाऱ्यावर नोंद करून इतकी वर्षे विभाग शांत बसला. वास्तविकतः सातबाऱ्यावर बोजा चढविल्यानंतर किती दिवसांत

आरआरसी केली गेली पाहिजे याचेदेखील नियम व कालमर्यादा विहित करणे आवश्यक आहे. समितीने साक्ष लावली नसती तर विभागाने अशा गंभीर प्रकरणी कोणतीही पुढील कारवाई केली नसती. तसेच श्री. देवेंद्र गुलाब जोशी यांचे प्रकरणात तर पावत्यांमध्ये खाडाखोड केलेली आहे. जवळजवळ १३० पावत्यांमध्ये ही खाडाखोड झालेली आहे. या प्रकरणी सुनावणी व अपिल अशी सर्व प्रक्रिया झाल्यानंतर हे पासेस चुकीचे होते त्यांच्याकडून वसुली केली असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. यावर समितीने तीव्र आक्षेप नोंदवीत या प्रकरणी शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी विभागाने संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता असताना केवळ वसुली व्यतिरिक्त कोणतीही कारवाई विभागाने केली नाही. बनावट पावत्या तयार करायच्या व अशी प्रकरणे उघडकीस आल्यास रक्कम शासनखाती जमा करायची इथपर्यंतच विभागाने ही कार्यवाही मर्यादित ठेवणे अत्यंत अयोग्य व धोकादायक आहे. संबंधितांवर शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी फौजदारी कारवाई करावी असे समितीने सांगितले असता त्यास विभागीय प्रतिनिधींनी सहमती दर्शविली. वास्तविकतः अशाप्रकारे अवैध उत्खनन इतक्या अमर्याद कालावधीकरिता स्थानिक कर्मचारी/अधिकाऱ्यांच्या संगनमत वा सहमतीशिवाय सुरूच राहू शकत नाही. ही बाब अतिशय गंभीर असून याची विभागाने तात्काळ दखल घेऊन या संपूर्ण प्रकरणी वसूलपात्र पुर्ण रक्कम वसूल झाल्याची खात्री करावी व बनावट कागदपत्रे सादर करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी पट्टेधारकाविरुद्ध फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात यावी. तसेच सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करून या संपुर्ण प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

५.३९ (२) मे.इंडिया शीप ॲन्ड बोट ट्रेडिंग कंपनी यांचे त्याअनुषंगाने रु. २४,४८,००० इतक्या वसुलीचे आदेश काढले होते. त्यानंतर ६,०३० ब्रासचा मूळ पंचनामा करण्यात आला होता. त्याची रक्कम रु. २६,८४,००० इतकी होती. त्यानंतर प्रकरणाचे रिव्हीजन झाले व फेर तपासणी अंती ५,०१० ब्रासची परवानगी आणि मूळ पावत्या आढळून आल्या. त्याअनुषंगाने अंतिम रिव्हाईज ऑर्डर काढण्यात आली. परंतु कंपनी हे पैसे भरण्यास तयार नसल्यामुळे आरआरसीची कार्यवाही सुरू करण्यात आली असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. अतः ही संपुर्ण रक्कम दंड व व्याजासह तात्काळ वसूल करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

५.४० (३) श्री. श्रीकांत पाटील यांचे संदर्भात त्यांचेकडे मुंबई एअरपोर्ट ते उपनगर असे ट्रान्सपोर्ट पासेस देण्यात आलेले होते. परंतु त्यामध्ये थोडा फरक आढळलेला असून ऑर्डर तपासून वसुलीची कारवाई करू असे समितीस सांगण्यात आले. यावर समितीने आक्षेप नोंदवित सदरहू प्रकरण २०११ चे असताना सन २०१८ पर्यंत विभागाने अद्यापही हा विषय मार्गी लावला नाही. केवळ समितीची साक्ष लागली म्हणून ही कारवाई आता सुरू करणे कदापीही योग्य नाही. समिती या संदर्भात तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. या प्रकरणी तात्काळ १५ दिवसात कारवाई करून त्यांच्याकडून काही दंड येणे असल्यास त्याअनुषंगाने कारवाई करून समितीस अहवाल देण्यात यावा असे निदेश समितीने दिले. त्या अनुषंगाने सादर केलेल्या परवान्यापैकी अनधिकृत भराव केलेल्या ४३४ ब्रास मातीचे २१७ परवाने मुदतबाह्य असल्याचे आढळून आले. त्यामुळे सदर मुदतबाह्य २१७ परवान्याकरिता एकूण दंडनीय रक्कम रु. ६,०७,६०० दिनांक १८/०६/२०१८ रोजी शासन जमा केली असल्याने दंडात्मक रकमेच्या वसुलीची कार्यवाही पुर्ण झालेली असल्याचे समितीस कळविण्यात आले. अतः यात वसुलीची कार्यवाही पुर्ण झालेली आहे त्यामुळे या प्रकरणी दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर देखील कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(४) कोल्हापूर प्रकरणी झालेल्या कमी वसूली संदर्भात समितीने विचारले असता, ४१ व्यक्तींनी मंजूर परिमाणापेक्षा जास्त उत्खनन केल्यामुळे ते अतिरिक्त उत्खनन व त्याच्या १ पट दंडाची रक्कम असे रु. १४,०२,२७५ व रु. ९,७६,८०० भूपृष्ठ भाडे असे एकूण रु. २३,८५,१७५ शासनाकडे जमा करण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. महालेखापालांनी त्यांच्या आक्षेपात रु. ५८.५९ लक्ष इतकी वसूल पात्र रकमेची निश्चिती केली असताना विभागाने निश्चित केलेल्या रकमेमध्ये तफावत असल्याचे कारण समितीने विचारले असता, या व्यक्तींनी सर्रास विना परवाना उत्खनन केलेले नव्हते. परवानगी घेऊन मंजूर परिमाणापेक्षा जास्त उत्खनन केल्यामुळे तीन पट दंड न आकारता एक पट दंड आकारण्यात आला असे समितीसमोर सांगण्यात आले. यासंदर्भातील कायद्यातील कलम ४८(७) मध्ये आता पाच पटींची तरतूद आहे. ती पुर्वी तीन पट होती व तीन पटीपर्यंत दंड आकारण्याची मुभा होती. त्यामुळे प्रकरणनिहाय किती टक्के दंड आकारावा हा निर्णय घेण्याचा अधिकार संबंधित महसूल अधिकाऱ्याला होता. पुर्वी यासंदर्भात नियम नव्हता परंतु दिनांक १४.६.२०१७ रोजी शासन परिपत्रक काढून गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत शास्तीची कारवाई करण्यासंबंधी दिशा निर्देश

देण्यासंबंधीच्या सूचना देण्यात आल्याचे समितीस सांगण्यात आले. यासंदर्भात या प्रकरणांमध्ये वसुली करण्यात आल्याचे समितीस सांगण्यात आले. वास्तविकतः अशा प्रकरणांमध्ये आकारावयाच्या दंडाचे प्रमाणे सर्वच प्रकरणांसाठी समान असणे आवश्यक आहे व या तरतुदींची अंमलबजावणी सर्वांसाठी समानरित्या होणे अभिप्रेत आहे. परंतु एकाला १८ टक्के व दुसऱ्याला ३ टक्के दंड आकारणे ही बाब निश्चितच समर्थनीय नाही. जर असा स्वेच्छाधिकार वापरायचा असल्यास विभागाने शासनाच्या आर्थिक हिताचा विचार करून निर्णय घेणे अभिप्रेत होते असे समितीचे स्पष्ट मत आहे. अतः या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

५.४१ परिच्छेद क्रमांक ७.२.३.४ "भूई भाडे आणि प्रतिपूर्ति अथवा कब्जेहक्क किंमत"

(शिफारस नाही)

परिच्छेद क्रमांक ७.२.३.५ "शिखर स्तरावर माहितीचा अभाव"

५.४२ (अ) रेती घाटांची माहिती आणि लिलाव

अभिप्राय व शिफारस

लेखापरीक्षेने संकलित केलेली नऊ जिल्ह्याच्या रेती घाटांच्या माहितीची आणि लिलावांची स्थिती पाहता सन २०१०-१४ दरम्यान ३,०९६ रेती घाट लिलावासाठी चिन्हांकित करून ठेवण्यात आले होते जे विभागीय स्तरावर प्रशंसनीय आहे. परंतु यापैकी लिलाव झालेल्या रेती घाटांची संख्या व निकाली काढण्यात न आलेल्या रेती घाटांची संख्या यात मोठी तफावत दिसून आली. सन २०१२-१३ आणि सन २०१३-१४ मध्ये रेती घाटांच्या संख्येत घट एक किलोमिटर अंतरामधील जवळ-जवळ असणाऱ्या घाटांचा एकत्रीकरण करून एकच घाट तयार केल्यामुळे झाली आहे असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत. अतः विभागाने रेती घाटांची अद्ययावत व तपशिलवार माहिती तयार करावी व घाटांचा लिलाव विनाविलंब व गुणवत्तेवर लावण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(ब) रेती घाटांचे लिलाव न होणे

अभिप्राय

५.४३ ५२ टक्के रेती घाटांची निर्गती करण्यात आली नाही. या घाटांची निश्चित केलेली धारणा किंमत रु. ९९४.९० कोटी होती. एवढ्या मोठ्या प्रमाणात घाटांचा लिलाव न केल्यामुळे राज्य महसुलावर प्रतिकूल प्रभाव पडत आहे. विभागाने घाटांच्या लिलावाच्या पद्धतीचा आढावा घेऊन अशी पद्धती अंमलात आणावयास पाहिजे ज्यात जास्तीत जास्त घाटांचा लिलाव संभव होऊ शकेल. तसचे बरेच रेती घाट लिलावासाठी चिन्हांकित करून ठेवण्यात आले होते. परंतु त्यांचा लिलाव होऊ शकला नाही असेही आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

शिफारस

५.४४ महालेखाकारांनी उपरोक्त परिच्छेदांमध्ये नोंदविलेले सदरहू आक्षेप अत्यंत महत्त्वाचे असून ५२% रेती घाटाचे लिलाव होऊ शकले नाही. ही बाब देखिल गंभीर आहे. परिणामी शासनाच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. यामागील कारणमिमांसा समितीने विचारली असता काही ठिकाणी लिलावास प्रतिसाद मिळाला नाही असे सांगण्यात आले. जिल्ह्यात निश्चित केलेले वाळू घाट ४,२२१ होते. त्यातील १,५४१ इतक्या वाळू घाटांना पर्यावरण विभागाची मान्यता होती. ३,६२७ घाटांचा लिलाव करण्यात आला. यावर समितीने आक्षेप नोंदवत पर्यावरणाचे नियम सन २०१३-२०१४ नंतर लागू करण्यात आले. विभागाने सन २०१०-२०१४ पर्यंत पर्यावरणाचे कारण दाखवून फक्त १५०० घाटांचे लिलाव केले. यासंदर्भात समितीसमोर सांगण्यात आले की, विभागाकडून ३,६२७ वाळू गट ठेवले होते. त्यापैकी १,९४० वाळू गट प्रत्यक्ष लिलावात गेले व १,८७२ वाळू गट लिलावात गेले नाही. त्यापैकी ५७ घाटांचा फेरलिलाव केल्यानंतरही ते गेले नाहीत. उर्वरीत घाट रस्ता उपलब्ध नसणे, ग्रामसभेचा ठराव प्राप्त न होणे अशा विविध कारणांमुळे हे रेती घाट लिलावात काढले गेले नाही. यावर समितीने आक्षेप नोंदवत जर रेती घाटाकडे जायला रस्ताच उपलब्ध नाही. तर त्यांचा लिलावच का करण्यात आला हा देखिल प्रश्न उद्भवतो. वास्तविकतः रस्ते असल्याशिवाय रेती घाटाचा लिलावच करणे अयोग्य आहे.

विभागाने या प्रकरणी धोरण निश्चित करून त्याची तात्काळ अंमलबजावणी करून रेती घाटांचा लिलाव नियमित व पारदर्शकरित्या करण्यात येऊन शासनाचा महसूल वाढविण्यात यावा. निविदाकाराने रक्कम विहीत मुदतीत न भरल्यास तो लिलाव मुदतीत रद्द करून तात्काळ फेरनिविदा मागविणे संदर्भात कारवाई विभागाने करावी कोणत्याही परिस्थितीत रेती घाट लिलावाशिवाय राहता कामा नये याची काळजी विभागाने घ्यावी व अशा आक्षेपांची पुनरावृत्ती भविष्यात टाळावी अशी समितीची शिफारस आहे.

(क) लिलावासाठी पर्यावरण मंजुरी

अभिप्राय

५.४५ रेती घाट निर्गती विषयीच्या १२ मार्च, २०१३ च्या शासन निर्णयाप्रमाणे रेती घाटाचे सर्वेक्षण आणि त्यांना चिन्हांकित करून ठेवणे १५ ऑक्टोबर पर्यंत पूर्ण व्हावयास पाहिजे. त्यानंतर पर्यावरण मंजुरी प्राप्त करावयास पाहिजे, ज्यासाठी धोरणांतर्गत कोणतीही कालमर्यादा निश्चित केलेली नाही. कोल्हापूर आणि नागपूर जिल्ह्यात २०१२-१४ दरम्यान १२२ रेती घाटांचे लिलाव होऊ शकले नाही. कारण रेतीची आणि पाण्याची खोली, सेक्शन पंप वापरण्याची मंजुरी, गट क्षेत्र आणि समूहातील अंतर आणि पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन मधील तफावती, जिल्हाधिकाऱ्याद्वारे पर्यावरण विभागास सादर केलेला सर्वेक्षण अहवाल असे आवश्यक तपशील सादर न केल्यामुळे पर्यावरण मंजुरी वेळेत मिळाली नाही. याखेरीज, नागपूर च्या १६ प्रकरणांमध्ये पर्यावरण विभागाने या प्रक्रियेत आणखी तीन महीने विलंब केला. परिणामी, १२२ रेती घाटांतून रु. २४.८८ कोटी महसूल वसूल होऊ शकला नाही.

त्याचप्रमाणे राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाने गाळ उपसणी संबंधात पर्यावरण आघात निर्धारण (Environment Impact Assessment-EIA) करावयास पाहिजे आणि त्यावरील अहवाल रेती घाटांच्या लिलावाकरिता जिल्हाधिकाऱ्यास द्यावयास पाहिजे. ठाणे जिल्ह्यात ११ रेती घाटांपैकी नऊ रेती घाटांत गाळ उपसणी द्वारे रेती उत्खनन करण्याचे ठरले होते (फेब्रुवारी २०१३). पर्यावरण आघात निर्धारणाचे काम एका खाजगी संस्थेला, "फाईन एन्वायरोटेक इंजीनिअर्स (गाळ उपसणीचे अधिकृत पर्यावरण संमंत्रक)" एप्रिल २०१३ मध्ये देण्यात आले. परंतु या संस्थेने आजपर्यंत (जून २०१५) अहवाल सादर केला नाही आणि घाटांचा लिलाव होऊ शकला नाही. या रेती घाटांतील २०१२-१४ कालावधीचा रु. ७२.२५ कोटी संभाव्य महसूल प्राप्त होऊ शकला नाही असे आक्षेप महालेखकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

लिलावासाठी पर्यावरण मंजुरी संदर्भात समितीस सांगण्यात आले की, नागपूर, कोल्हापूर बाबतीत रेती घाटापर्यंत जाण्यासाठी झुडपी जंगलातून रस्ता जात असल्याकारणाने वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांनी तो बंद केला होता. या संदर्भात पर्यायी रस्ता उपलब्ध होऊ शकला नाही त्यामुळे रेती उत्खनन करता आले नाही. परिणामी ईएमडीची रु.१३,१८,१५० इतकी रक्कम परत करण्याबाबतचे आदेश मा.महसूल मंत्र्यांनी दिले.

शिफारस

५.४६ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप महत्वाचे असून रेती घाट चिन्हांकीत करण्यापासून लिलाव, करार, उपसा, वाहतूक, पर्यावरण मंजुरी इ. सर्व प्रक्रिया दरम्यानच्या काळात पार पाडाव्या लागतात. त्यातही रेती उपसा करण्याचा कालावधी निश्चित असतो. अशावेळी उपरोक्त सर्व तांत्रिक प्रक्रिया व पर्यावरण मंजुरी कालबद्ध पद्धतीने व विहित मुदतीत पार पाडणे अत्यावश्यक आहे. जेणेकरून पावसाळ्याआधी रेती उपसा करणे कंत्राटदारास शक्य होईल. परंतु समितीच्या निदर्शनास आले की, ही संपुर्ण प्रक्रिया राबविताना ऋतु व कालावधी हा घटक प्राधान्याने विचारातच घेतले जात नाही. याहीउपर यासाठी लागणाऱ्या परवानग्या देखील अमर्याद विलंबाने देण्यात येतात. ही कार्यपद्धती योग्य नसून यामुळे ही प्रक्रिया अमर्याद कालावधीसाठी सुरूच राहते जे उचित नाही. या संपूर्ण प्रक्रियेसाठी विभागाने कालमर्यादा विहित करावी व त्याचे पालन करण्यात यावे. त्याचप्रमाणे भविष्यात या रेतीघाटांसाठी पर्यावरण मंजुरी वेळेत प्राप्त करणेसंदर्भात कार्यवाही विभागाने कालबद्ध पद्धतीने करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(ड) मूलभूत सुविधांचा अभाव

अभिप्राय

५.४७ "रेती धोरणा" बाबत महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार (ऑक्टोबर २०१०) जिल्हाधिकाऱ्याने रेती घाट चिन्हांकित करून ठेवते वेळी रेती घाटासाठी पोच रस्ते उपलब्ध आहेत याबाबत खात्री करावयास पाहिजे. परंतु नागपूर येथील दोन रेतीघाटांचे सन २०१२-१३ मध्ये रु.१.७६ कोटीत लिलाव करण्यात आले होते. परंतु भाडेपट्टेदाराने सूचित केले की रेती वाहतुकीसाठी प्रस्तावित मूळ रस्ता राखीव वनातून जेथून जाण्यावर बंदी आहे, जात असल्यामुळे रेतीचे उत्खनन करण्यात येऊ शकले नाही.

दस्तावेजांनुसार जरी दुसरा रस्ता खाजगी व्यक्तिद्वारे देऊ करण्यात आला होता, तरी तो भाडेपट्टेदारास रेतीच्या उत्खननाकरिता उपलब्ध करण्यात आला नव्हता. परिणामी, शासन स्वामित्वधनावरील रु. १.७६ कोटी महसूल प्राप्त करू शकले नाही. तसेच नाशिक येथे सन २०११-१२ मध्ये रु.९६.७९ लक्ष रकमेवर लिलाव करण्यात आलेल्या पाच रेती घाटांचे लिलाव बोलीदाराने बोली रक्कम जमा न केल्यामुळे रद्द करण्यात आले. रेती घाटांचे पुन:लिलाव करण्यात आले नव्हते. त्यामुळे अनुज्ञप्तिधारकाद्वारे आधीच भूगतान करण्यात आलेल्या रु. २१.९२ लक्ष समायोजित केल्यानंतर रु. ७६.८० लक्षचे महसूल उत्पन्न होऊ शकले नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

नागपूर जिल्ह्यातील साहोली अ-१ आणि अ-२ या वाळूगटाचे लिलाव अनुक्रमे रु. १,०९,३९,३३७ व रु. ६६,६६,००० अशा एकूण रु. १,७६,०५,३३७ इतक्या सर्वोच्च बोलीस मंजूर करण्यात आले होते. सदर रेतीघाटापर्यंत जाणारा रस्ता झुडपी जंगलातून जात असल्याने वन परिक्षेत्र अधिकारी पारशिवणी यांनी वाळू वाहतूकीसाठी बंद केला होता. त्यामुळे तहसिलदार पारशिवनी यांनी दि. २४ जानेवारी २०१३ रोजी सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्याच्या उपस्थितीत स्थळ निरीक्षण व पंचनामा करून स.क्र.५ हा खाजगी मालकीचा असून त्या जमीन मालकाने तात्पुरता रस्ता रेती घाटाकरीता देण्यास संमती दिली होती. परंतु वनपरिक्षेत्र अधिकारी पारशिवनी यांनी सदर रेती घाटापर्यंत जाणारा रस्ता हा झुडपी जंगलातून जात असल्याने सदर रस्ता रेती घाटासाठी बंद केला. उपलब्ध रस्ता हा संरक्षित वनक्षेत्रातून जात असल्यामुळे निश्चितच वन कायदा भंग होण्याची शक्यता होती. वाळू वाहतूकीसाठी रस्ता उपलब्ध होत नसल्याने संबंधित लिलावधारकाने लिलावाची रक्कम शासनजमा केली नसल्याने लिलावधारकास वाळू उत्खननास परवानगी देता आली नाही. वन कायदा अंतर्गत रेतीघाट बंद ठेवण्याशिवाय पर्याय नव्हता. वाळू वाहतुकीसाठी रस्ता उपलब्ध होऊ न शकल्याने सदर रेतीघाटांतून रेतीचे उत्खनन झाले नाही.

नाशिक जिल्ह्यात सन २०११-१२ मध्ये वाळूलिलावाची मुदत दि.३१/०७/२०१२ पर्यंत होती. ५ रेतीघाटांपैकी २ रेतीघाटांमध्ये माहे मे व जून २०१२ मध्ये वाळू लिलावाची रक्कम जप्त करण्यात येऊन संबंधितांना काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. तसेच लिलावात न गेलेल्या वाळूगटांकरीता २५ टक्के अपसेट प्राईज कमी करून दि.९/१/२०१२ रोजी फेरलिलाव आयोजित करण्यात आला होता. तथापि सदर फेरलिलावास प्रतिसाद न मिळाल्याने पुढील लिलावाची प्रक्रिया बंद केलेली आहे.

उर्वरीत तीन प्रकरणांमध्ये लिलाववर्ष संपल्यानंतर म्हणजे दि.३१/०७/२०१२ नंतर त्या ठेकेदाराच्या लिलावाच्या रकमा जप्त करून त्यांना काळ्या यादीत टाकण्याचे आदेश दि.३/०८/२०१२ रोजी निर्गमित करण्यात आल्याने उक्त तीन प्रकरणांमध्ये फेरलिलाव करण्यात आले नाहीत असे विभागाने समितीसमोर विदित केले.

शिफारस

५.४८ नाशिकमध्ये पाचही रेती घाटांचा लिलाव झाला मात्र ५ रेती घाटांपैकी २ रेती घाटांमध्ये वाळू लिलावाची रक्कम जप्त करण्यात येऊन संबंधितांना काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. तसेच लिलावात न गेलेल्या वाळुगटांकरिता २५ टक्के अपसेट प्राईस कमी करून फेरलिलाव आयोजित करण्यात आला होता. परंतु त्यालाही प्रतिसाद मिळाला नाही. उर्वरीत रक्कम न भरल्यामुळे त्यांनी जमा केलेली १/४ रक्कम जप्त करण्यात आली व उर्वरीत ३ प्रकरणांमध्ये लिलाव वर्ष संपल्यानंतर म्हणजे दि.२१.०७.२०१२ नंतर त्या ठेकेदाराच्या लिलावाच्या रकमा जप्त करून त्यांना काळ्या यादीत टाकण्यात आले. त्यामुळे उक्त ३ प्रकरणांमध्ये फेरलिलाव करण्यात आले नाहीत. ही रक्कम कधी जप्त करण्यात आली अशी विचारणा समितीने केली असता, मूळ लिलाव डिसेंबर २०११ या कालावधीत झाला असून ऑगस्ट २०१२ मध्ये ती जप्त केली. त्यामुळे फेरलिलाव देखील या प्रकरणी होऊ शकला नाही. ही तर अधिकच गंभीर बाब आहे. रेती काढण्याचा कालावधी साधारणत: मे-जून पर्यंत असतो. परंतु या संपूर्ण प्रक्रियेमुळे ८ महिन्यांपर्यंत वाट बघत बसण्याशिवाय विभागाने काही केले नाही व केवळ १/४ रक्कम जप्त करून विभाग समाधानी झाला. वास्तविकत: रेती उत्खननाचा लिलाव करण्याचा आदर्श कालावधी हा साधारणत: ऑक्टोबर असतो जो विभागाने डिसेंबरमध्ये केला. तसेच विभागाने कालांतराने दि. १२ मार्च २०१३ च्या शासन निर्णयाप्रमाणे रेती घाटाचे सर्वेक्षण व त्यांना चिन्हांकीत करून ठेवण्याची प्रक्रिया १५ ऑक्टोंबर पर्यंत पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. हाच निर्णय व कालमर्यादा विभागाने अगोदरही स्वविवेकाने पाळणे अत्यावश्यक होते. परंतु त्याचे पालन विभागाने केले नाही. यासाठी पैसे भरण्याची मर्यादा १ महिन्याची असते जर त्या कालावधीत कंत्राटदाराने पैसे भरले नाही. तर हा लिलाव रद्द करून तात्काळ फेर निविदा मागवून कारवाई करणे आवश्यक होते. परंतु तसे न करता पूर्ण हंगाम जाईपर्यंत विभाग वाट पाहत बसला. परिणामी दुसऱ्या कोणालाही ही निविदा देता आली नाही व केवळ १/४ रक्कम मिळाल्यामुळे महसूलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. याहीउपर त्या कालावधीत

रेती उत्खनन अनधिकृतरित्या झाले असल्याची देखील शक्यता आहे. अतः या प्रकरणी झालेल्या नुकसानीची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर १ महिन्याच्या आत निश्चित करावी व कारवाई करून समितीस अवगत करावे असे निदेश समितीने दिले असता, विभागाने त्यास सहमती दर्शविली. त्याअनुषंगाने ५ रेती घाटांसंबंधी संबंधित तहसिलदारांना व जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांना नोटीस देण्यात आली असून व त्यांचेकडून खुलासा प्राप्त झालेला आहे व त्यांचेवर आता शिस्तभंगाची कारवाई करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे समितीस सांगण्यात आले. अतः या प्रकरणी संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ७.२.३.६ "रेती घाटाचे वाटप झाल्यानंतर प्रत्यक्ष उत्खनन केलेल्या रेतीचे प्रमाण ठरविण्यासाठी पद्धतीचा अभाव"

अभिप्राय

५.४९ रेती निर्गतीविषयी असलेल्या शासन निर्णयाप्रमाणे भूजल सर्वेक्षण आणि विकास अभिकरण (GSDA), जिल्हा खनिकर्म अधिकारी आणि संबंधित तहसीलदार यांनी रेतीचे प्रमाण आणि घाटाच्या जवळपासच्या भागातील जल स्तरावर त्याचा परिणाम या बाबत संयुक्त सर्वेक्षण करावयास पाहिजे. या धोरणात रेती घाटाच्या वाटपाच्या वेळी वाळूच्या उपलब्ध परिमाणाबाबत उल्लेख आहे, परंतु त्यात वाटप केल्यानंतर रेतीच्या उत्खननावर नियंत्रण ठेवण्याबाबत काहीही उल्लेख नाही. या उणीवेमुळे अवैध उत्खनन झाले होते. तीन जिल्ह्यांकरीता ३७ प्रकरणात रेती घाट प्राप्तकर्त्याने रेतीचे अतिरिक्त वहन केल्याबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालयाने डिसेंबर २०११ ते जुलै २०१४ दरम्यान सूचित केले होते. या प्राप्तकर्त्यांवर जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या ट्रांझिट पासपेक्षा अधिक प्रमाण ट्रकमध्ये वाहून नेल्यामुळे शास्ती आकारण्यात आली होती. त्यांनी दिलेल्या रेती घाटातून अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त उत्खनन करण्याची अथवा इतर रेती घाटांवर अतिक्रमण करण्याबाबतची शक्यता नाकारता येत नाही. तसेच नागपूर जिल्ह्यातील दोन प्रकरणांत तहसीलदार सावनेरने ज्यांना रेती घाट वाटप केले आहे, त्यांच्याद्वारे अतिरिक्त परिमाणाचे उत्खनन केल्याचे निदर्शनास आणले आणि त्यांच्यावर उल्लंघन केल्यामुळे शास्ती आकारण्यात आली व त्यांना वसुलीबाबत नोटिस पाठविण्यात आली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

सुरूवातीलाच रेती घाटातील रेतीचे प्रमाण जाणून घेण्याची पद्धती शास्त्रोक्त नाही कारण यात बाह्य रेषांवर जमणारी रेती विचारात घेण्यात येऊ शकत नाही म्हणूनच शासन रेती घाटांचे मोजमापन हस्तांतरण करतेवेळी शास्त्रोक्त पद्धतीने करण्याबाबत प्रस्ताव मांडत आहे आणि रेती घाटांवर विडिओ संनिरीक्षण यंत्र बसविण्याचे प्रस्तावित करीत आहे, त्याचप्रमाणे लिलावाकरिता वाळूगटाची निश्चिती व उपलब्ध वाळूसाठा याचे परिमाण ठरविण्याबाबत शासनाने वाळू/रेती निर्गती धोरण विहित करण्यात येत असून त्यामध्ये सविस्तर तरतुदी प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.त्यामुळे रेतीच्या अतिरिक्त/अवैध उत्खननाच्या बाबीचेही निरसन होईल असे विभागीय प्रतिनिधीद्वारे सांगण्यात आले.

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाची अधिसूचना दि.१५/०१/२०१६ मधील परिशिष्ट १२ मध्ये ५ हेक्टरवरील वाळूगटांवर सीसीटीव्ही कॅमेरा बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी यांना कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या असल्याचेही समितीसमोर विदित करण्यात आले.

शिफारस

५.५० रेती घाटाचे वाटप झाल्यानंतर प्रत्यक्ष उत्खनन केलेल्या रेतीचे प्रमाण ठरविण्यासाठी पद्धतीचा अभाव असे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे. सदरहू आक्षेपासंदर्भात समितीने विचारणा केली असता, वाळू गटांवर व्हिडीओ संनियंत्रण यंत्र बसविणेबाबत SMATS ही प्रणाली दिनांक २६.१२.२०१४ च्या शासन निर्णयानुसार संपूर्ण राज्यात लागू केली होती. मात्र केंद्र शासनाने दिनांक १५.१.२०१६ च्या अधिसूचनेद्वारे वेगळी प्रणाली लागू करण्याच्या सूचना केल्यानंतर या प्रणालीचा वापर बंद करण्यात आला. आता नवीन प्रणाली लागू करण्यात येत असून त्यात बारकोडेड ट्रान्झीट पास देण्यात येणार असून केंद्र शासनाने ही प्रणाली देशभर लागू केलेली असून ही अत्यंत प्रभावी प्रणाली असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. एकाच रॉयल्टी पासवर अनेक फेऱ्या करणे या सद्यःस्थितीत अस्तित्वात असलेल्या पासेसच्या दुरुपयोगावर या नवीन प्रणालीमुळे बरेच निर्बंध येणार आहेत. या बारकोडेड ट्रान्झीट पासमध्ये अनेक टेक्नीकल स्पेसीफिकेशन दिलेले असून त्याचा मल्टीपल वापर होऊ नये यासाठी त्याचा ओरिजीन, डेस्टीनेशन, पास इश्यू करण्याची

वेळ व वैधतेचा कालावधी तसेच ट्रकचा क्रमांक इ. सर्व बाबी त्यात नमूद करण्यात येतात. एखाद्या ट्रकला पकडल्यास त्याचा टीपी चेक करण्यात येतो. ज्यावरुन पासची वैधता तपासणे शक्य होते. समितीने यासंदर्भात विदित केले की, एकाच रॉयल्टी पासवर अनेक फेऱ्या करणे या बाबी सद्यःस्थितीत घडत आहेत. अशा परिस्थितीत ही प्रणाली इतकी प्रभावी पाहिजे की इश्यू केलेल्या पासवरती दुहेरी किंवा तिहेरी ट्रीप करण्याची कोणतीही संधी उपलब्ध होता कामा नये. यावर विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले की, ट्रकची भौतिक तपासणी केल्याशिवाय व तो ट्रक थांबवून त्याचा टीपी तपासल्याशिवाय ही तपासणी पूर्ण होऊ शकत नाही. त्यासाठी ठिकठिकाणी चेक पोस्टही तयार केलेले आहेत असे समितीसमोर सांगण्यात आले.

उपरोक्त वस्तुस्थिती पाहता या अस्तित्वात असलेल्या प्रणालीमध्ये अवैधरित्या वाळूचे उत्खनन व त्याची वाहतूक यावर पूर्ण प्रतिबंध येण्याची शक्यता कमी आहे. या सर्व तपासण्या व नियंत्रण या संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून मानवी हस्तक्षेप विरहीत पद्धतीने होत असेल तरच ती प्रणाली प्रभावी व यशस्वी म्हणता येईल. जर ट्रकच्या वाहतूकीची भौतिक तपासणी केल्याशिवाय या बाबी निदर्शनास येत नसतील तर अशा वेळी पुन्हा त्यात अनियमितता होण्याची पूर्ण शक्यता कायम राहते. शासनाचे कायदे, नियम व कार्यपद्धती संदर्भात पूर्ण पळवाटा काढण्याचे उपाय या वाळू माफियांकडे तयार असतात. ज्याच्या माध्यमातून वाळू माफीया अनेक पर्याय यातून शोधून काढतात. स्थानिक स्तरावरील सर्व अधिकाऱ्यांचे देखील यात संगनमत असते. वाळू माफियांच्या सर्व पळवाटा बंद केल्याशिवाय तसेच या कार्यपद्धतीवर मानवी नियंत्रण जवळजवळ संपविल्यानंतरच यावर काही प्रमाणात वचक बसणे शक्य आहे. अशा अनुषंगाने ही प्रणाली अधिक प्रभावी करण्यास वाव असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. सद्यःस्थितीत जिल्हाधिकारी आपापल्या स्तरावर काही खाजगी एजन्सीकडून निरनिराळ्या सॉफ्टवेअर प्रणालीचा अवलंब करून ही कार्यवाही अधिकाधिक परिपूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. परंतु ती सामाईकरित्या संपूर्ण राज्यभर अवलंबिण्याची आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने एक सामायिक केंद्रीय यंत्रणा राज्यस्तरावर अवलंबून त्यामध्ये जीपीएस तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा. तसेच टीपीची वैधता ऑनलाईन तपासण्याच्या प्रणालीचा त्यात अंतर्भाव करण्यात यावा व यासंदर्भात सुरू असलेली प्रक्रिया व निविदा तात्काळ पूर्ण करून एक सामाईक प्रणालीचा अवलंब करण्यात यावा. तसेच या नवीन प्रणालीमध्ये मोबाईल ॲपच्या माध्यमातून पावतीदेखील स्कॅन करून पहाता येईल ज्यावरुन पावतीचा कालावधी व वैधता ही योग्य पद्धतीने वापरली जात आहे याची पूर्ण तपासणी करणे शक्य होईल व ज्या ठिकाणी याचे उल्लंघन होताना दिसले तर संबंधितांवर कारवाई करण्याचे पर्यायही विभागाकडे उपलब्ध राहतील. अतः या प्रकरणी प्रणाली अधिकाधिक अद्ययावत व आधुनिक करण्यात यावी. आवश्यकता असल्यास केंद्राच्या प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्यासंदर्भात राज्यशासनामार्फत केंद्राकडे शिफारसही करण्यात यावी जेणेकरून या अवैध वाळूच्या उत्खननावर आळा बसविणे राज्य शासनाला निश्चितच शक्य होईल. कालबद्ध पद्धतीने ही कार्यवाही पूर्ण करावी तसेच रेतीचे अवैध उत्खनन रोखण्यासाठी वेळोवेळी मोजमापन होण्याची आवश्यकता आहे आणि शासनाने रेती घाटांचे नियतकालिक मोजमापन करण्यासाठी शास्त्रोक्त पद्धती आखावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ७.२.३.७ "महसूल विभाग, प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि पोलीस यांच्यात समन्वयनाचा अभाव- खनिजांच्या अवैध वाहतूकीची प्रकरणे"

अभिप्राय

५.५१ महसूल व वन विभागाने दिलेल्या आदेशानुसार (जून, २००२) एखादी व्यक्ति जर अवैध वाहतूक कामात गुंतलेली असेल तर त्याविरुद्ध FIR नोंदविला जाऊ शकते, ट्रक चालकाचे लायसेन्स रद्द केल्या जाऊ शकते व वाहनांवर सहा महिन्यांसाठी वाहतूक करण्यास बंदी घालण्यात येऊ शकते आणि बाजार मुल्याच्या तिप्पट अथवा रु.३०००/- प्रति ब्रास शास्ती अशा प्रकारे अवैधरित्या वाहून नेलेल्या खनिजावर आकारण्यात येऊ शकते. महसूल व वन विभागाने अवैध उत्खनन आणि रेतीची वाहतूक याविरुद्ध कडक कारवाई करण्याच्या आणि अशा प्रकारच्या घटना प्रादेशिक परिवहन विभाग, पोलिस आणि महसूल विभाग यांनी एकमेकास सूचित करण्याच्या सूचना दिल्या. (फेब्रुवारी, २०११). त्याचप्रमाणे रेती धोरणाच्या खंड C २८ मध्ये विनिर्दीष्ट केल्याप्रमाणे एखादे खनिज वाहतूक करणारे वाहन जर अनुज्ञात परिमाणापेक्षा जास्त परिमाण वहन करीत असेल तर त्या संपूर्ण परिमाणास अवैध समजण्यात यावे. परंतु नऊ जिल्ह्यांत संबंधित प्रादेशिक परिवहन विभागांकडून अतिरिक्त भार लादून खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांची माहिती, जेथे उपलब्ध/पूर्ण होती, गोळा करण्यात आली. त्या माहितीची जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माहितीशी उलट तपासणी करण्यात आली आणि RTO/पोलिसांनी जिल्हाधिकाऱ्यांस सूचित केलेली अवैध उत्खनन/वाहतूकीची प्रकरणे पडताळण्यात आली. त्यात समन्वयनाचा अभाव होता अथवा गौण खनिजांची अवैध वाहतूक रोखण्यासाठी/प्रतिबंधित करण्यासाठी या तीन विभागांत समन्वयन नव्हते. यामुळे राज्यातील महसूल वसुलीची हानी झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यातील जास्त भार लादण्याची प्रकरणे जिल्हाधिकाऱ्यास सूचित करण्याच्या पद्धतीसंदर्भात सात जिल्ह्यात RTO द्वारे नोंदविलेली १५७ प्रकरणे संबंधित जिल्हाधिकाऱ्यास सूचितच करण्यात आली नव्हती. या प्रकरणातील संपूर्ण ७५८.५० ब्रास खनिजाचे प्रमाण रेती धोरणांच्या परिच्छेद क्र. C २८ प्रमाणे अवैध खनिकर्म म्हणून घोषित करावयास पाहिजे होते. परंतु, ही प्रकरणे जिल्हाधिकाऱ्यास सूचित करण्यात आली नसल्यामुळे त्यांच्याद्वारे स्वामित्वधन आणि शास्ती आकारण्यासाठी कारवाई करण्यात येऊ शकली नाही. अशाप्रकारे, RTO आणि जिल्हाधिकारी यांच्यातील समन्वयाच्या अभावापायी रु. २४.२७ लाख शास्तीची आकारणी झाली नाही. तसेच अतिरिक्त भार वाहतूकीची प्रकरणे RTO ला सूचित करण्याच्या पद्धतीसंदर्भात चंद्रपूर खनिज वाहून नेणाऱ्या अवैध वाहतूक करणाऱ्या १० ट्रकांवर महसूल प्राधिकाऱ्यांनी शास्ती आकारली होती. परंतु ही प्रकरणे अतिरिक्त भार लादल्यामुळे कारवाई करण्यासाठी RTO ला सूचित करण्यात आली नव्हती असेही आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

यवतमाळ जिल्ह्यात अतिरिक्त भार लादण्याची प्रकरणे जिल्हाधिकाऱ्यास सूचित करण्याची त्या जादाभारित वाहनांवर शास्ती आकारण्याची पद्धती अवलंबण्यात येत आहे. रायगड येथील RTO द्वारे जिल्हाधिकाऱ्यास कोणतेही प्रकरण सूचित करण्याबाबत दस्ताऐवजांत उल्लेख नाही. RTO रायगड ने खनिकर्म कामांतील जादाभारित वाहनांबाबत कुठलीही माहिती दिली नाही, त्यामुळे आकारणीयोग्य शास्तीचा अंदाज बांधता आला नाही.

तसेच RTO/पोलीसांद्वारे माहिती न देणेसंदर्भात चार महसूल प्राधिकाऱ्यांनी ११४ ट्रक ट्रांझिट पास शिवाय अथवा ट्रांझिट पासपेक्षा जादा गौण खनिज वाहून नेत असण्याच्या प्रकरणांचा तपास लावला. तथापि, ट्रक पळून जाण्यात सफल झाले. परंतु या ट्रकांच्या नोंदणी क्रमांकाची नोंद घेऊन ती संबंधित RTO ला त्या रेती वाहून नेणाऱ्या वाहन मालकांची नावे आणि पत्ते काढण्यासाठी पाठविण्यात आली. परंतु, RTO ने संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास माहिती पाठविली नाही. याशिवाय जिल्हाधिकाऱ्यांनी RTO ला प्रकरणे कळविल्यानंतर परत त्याबाबतीत माहिती मिळविण्यासाठी त्याचा पाठपुरावा केला नाही. नाशिकमध्ये एका प्रकरणात पोलीस विभागाने ४.४१ ब्रास जादा भार रेती वाहून नेण्याचे प्रकरण मोटर वाहन अधिनियमानुसार शास्ती आकारण्यासाठी RTO ला कळविले (जानेवारी, २०११) RTO, नाशिकने पोलीस विभागास स्वामित्वधन आणि शास्ती वसूल करण्यासाठी महसूल प्राधिकाऱ्यांसोबत समन्वयन साधण्याची विनंती केली. मात्र RTO व पोलीसांनी महसूल प्राधिकाऱ्यांस ही बाब कळविली नाही आणि म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारे कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

तसेच एका सामाजिक कार्यकर्त्याने अवैधपणे रेती उत्खनन करून वाहून नेणाऱ्या १,०३३ ट्रकांची सूची जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिली. ही सूची RTO ठाणे, नवी मुंबई आणि वसई येथे मार्च, २०१३ मध्ये ट्रक मालकांची नावे आणि पत्ते माहिती करण्यासाठी पाठविण्यात आली. यापैकी RTO ठाणे ने फक्त ३१८ ट्रक मालकांचे तपशील दिले. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी ट्रक मालकांना "कारणे दाखवा" नोटीस पाठविल्या. परंतु पुढे केलेली कारवाई कळविण्यात आली नाही. तथापि, उरलेल्या दोन RTO ने मागविलेली माहिती कळविली नाही आणि जिल्हाधिकाऱ्यांनी त्याचा पाठपुरावाही केला नाही. तसेच पोलीस विभागाने २४ ट्रकांद्वारे रेतीच्या अवैध वाहतूकीबाबत तहसीलदार हवेली, पुणे यांना कळविले (ऑगस्ट, २०१३) त्यानंतरही तहसीलदाराद्वारे कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

इतर जिल्हा/राज्यातून रेतीच्या अवैध वाहतूकीसंदर्भात नमुना चाचणी केलेल्या दोन जिल्ह्यात RTO कडून घेतलेल्या माहितीवरुन असे आढळले की, RTO द्वारे नोंदविलेली खनिजांच्या अवैध वाहतूकीची २४ प्रकरणे इतर जिल्हे/राज्यांशी संबंधित होती. ही प्रकरणे संबंधित जिल्ह्यांच्या /राज्याच्या जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यास, ज्यांनी ट्रांझिट पास दिली होती, रेती घाट ज्यांना देण्यात आले होते व ट्रांझिट पास दिले होते त्यांचेविरुद्ध कारवाई करण्यासाठी कळविण्यात आली नव्हती.

त्याचप्रमाणे अलिबागमध्ये तहसीलदाराने २८८.४४ ब्रास रेती अवैध उत्खननामुळे कार्यस्थळावरच जप्त केली होती (जानेवारी, २०१३). विभागाने रेतीच्या अवैध उत्खनन प्रकरणी गुंतलेल्या व्यक्ति जाणून घेण्यासाठी कोणतीही कारवाई केली नाही आणि FIR सुद्धा फाईल केले नाही असे अनेक महत्त्वाचे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

गौण खनिजाचे अवैध उत्खनन/वाहतूकीस प्रभावी आळा घालणे तसेच सर्व संबंधित विभागाचा परिणामकारक समन्वय साधून त्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने शासन निर्णय, दि. ५ डिसेंबर, २०१५ अन्वये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा पोलीस अधीक्षक/पोलीस आयुक्त, प्रादेशिक परिवहन अधिकारी व जिल्हा खनिकर्म अधिकारी यांची समिती गठीत करण्यात आलेली आहे. तसेच शासन परिपत्रक, दि. १४ जून २०१७ अन्वये सदर समितीची बैठक स्थानिक पातळीवर गौण खनिजाची चोरी रोखण्यासाठी नेमण्यात आलेल्या भरारी पथकांमध्ये महसूल/पोलीस व परिवहन या तिन्ही विभागातील कर्मचाऱ्यांचा समावेश करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत असे समितीस सांगण्यात आले.

शिफारस

५.५२ महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप अत्यंत गंभीर असून या संपुर्ण प्रशासकीय प्रणाली व यंत्रणेवरच प्रश्नचिन्ह उभे करणारे आहेत. अवैध रेती उत्खनन व वाहतूक व त्याअनुषंगाने करावयाची कारवाई व त्या माध्यमातून उद्‌भवणारी कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती पाहता हे विषय महसूल, गृह व परिवहन अशा तीन विभागांच्या माध्यमातून योग्य समन्वय व नियोजन ठेवून हाताळणे व संबंधितांवर त्या त्या विभागामार्फत कारवाई करणे आवश्यक असताना या विभागांतर्गत माहितीचे योग्य देवाण घेवाण न होणे वा त्याची दखल विभागांद्वारे न घेण्यात येणे. परिणामी एका विभागाने कारवाई करूनही त्याची अंमलबजावणी प्रभावीरित्या अन्य विभागाकडून न झाल्यामुळे या अवैध रेती उत्खनन व वाहतूकीवर कोणतीही प्रभावी नियंत्रण होऊ शकले नाही ही गंभीर बाब आहे. ७ जिल्ह्यात आरटीओची १५७ प्रकरणे संबंधित जिल्हाधिकाऱ्यास सूचित करण्यात आली नसल्यामुळे त्यांच्याद्वारे स्वामित्वधन व शास्ती आकारण्यासाठी कारवाई करण्यात येऊ शकली नाही. परिवहन विभाग, पोलीस विभाग व महसूल विभाग यांचेमध्ये माहितीचे आदान प्रदान प्रभावीपणे न होणे, तसेच प्राप्त माहितीच्या आधारे त्या विभागाने करावयाच्या कारवाईचे कोणतेही समन्वयन विभागांमध्ये आढळून न येणे ही अत्यंत गंभीर बाब तर आहेच. परंतु अवैध रेती उत्खननास निश्चितच उत्तेजन देणारीही बाब आहे व अशा अवैध उत्खनन करणाऱ्या व्यक्तींवर प्रभावी कारवाई करण्यास विभाग समन्वय व पाठपुराव्याअभावी उदासीन व असमर्थ असल्याचे दिसून येते. तसेच या बाबी अधिकाऱ्यांच्या संगनमताने देखील होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे एका विभागाने जर कारवाई केली असेल तर त्याची माहिती त्वरित अन्य संबंधित विभागाला दिली जात नाही. खनिजांची अवैध वाहतूक नियंत्रित करण्यासाठी व रोखण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पोलिस आणि महसूल विभाग यांच्यात समन्वयनाचा अभाव होता. परिणामी मोठ्या प्रमाणात शासनाचे आर्थिक नुकसान तर होतेच परंतु अवैध कार्यपद्धतीवर आळा बसविणे विभागाला शक्य होत नाही व रेतीचे अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्या व्यक्तींना अभय देण्यात येते व ते कारवाईविना अशी कामे पुढे सुरूच ठेवतात. खनिजांची अवैध वाहतूक नियंत्रित करण्यासाठी आणि त्याबाबतची प्रकरणे तत्परतेने सोडविता येण्यासाठी शासनाने प्रादेशिक परिवहन कार्यालय, पोलिस आणि महसूल विभाग यांच्यात बळकट समन्वय साधण्यासाठी निर्देश निर्गमित करावयास पाहिजे. रेती आणि इतर खनिजांचे अवैध उत्खनन आणि वाहतूक रोखण्याकरीता महसूल प्राधिकारी, RTO आणि पोलीस विभाग यांच्यात समन्वयनाची अत्यंत आवश्यकता आहे. विभागाने इतर विभागांसोबत या बाबींचा विचार करून त्यांचे सोबत समन्वय साधण्यासाठी योग्य ती पद्धती विकसित करावी. विभागाने जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक/पोलीस उपायुक्त व आरटीओ यांचा समावेश असलेली समन्वय समिती स्थापन केली असून या समितीमार्फत अशा आक्षेपित प्रकरणांसंबंधात योग्य ते नियंत्रण, समन्वय, ताळमेळ, सुसुत्रता व माहितीचे आदान-प्रदान वेळेवर करण्यात यावे. तसेच या समितीमार्फत प्रत्येक महिन्याला सर्व प्रलंबित प्रकरणांचा नियमित आढावा घेणे अनिवार्य करण्यात यावे व कोणत्याही परिस्थितीत समन्वयाअभावी व पाठपुराव्याअभावी ही प्रकरणे कारवाईविना राहू नये याची पुर्ण दक्षता विभागाने घ्यावी. तसेच याप्रकरणी आक्षेपित केल्याप्रमाणे समन्वयाच्या अभावासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी. तसेच खनिजांची आंतर-राज्यीय वाहतूक संदर्भात देखील नियमात स्पष्ट तरतूद नाही. शासनाने यासंदर्भात सुस्पष्ट नियम तयार करावेत, जेणेकरून संबंधित विभागांना दोषींवर कारवाई करणे शक्य होईल व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ७.२.३.८ "रेती घाटाची लिलाव रक्कम परत करणे"

अभिप्राय

५.५३ "रेती धोरण" याबाबतच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार (मार्च, २००३) रेती लिलाव रक्कमेचे रेती घाटातील खनिकर्म रद्दबातल असण्याच्या अथवा त्यावर बंदी असण्याच्या कालावधीसाठी प्रमाणशीर परतावे अनुज्ञेय आहेत.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार एका रेती घाटात खनिकर्म प्रक्रिया दि. २३.९.२०१० ते २८.१०.२०१० पर्यंत ३६ दिवस निलंबित होती आणि त्यानंतर खनिकर्म प्रक्रिया सुरू करण्यात आली. विभागाने परताव्याची रक्कम चुकीची रु. ४६.५० लाख काढली आणि तेवढीच रक्कम परत केली. या काम बंद असण्याच्या दिवसांचा परतावा फक्त रु. ११.३५ लाख अनुज्ञेय होता. अशाप्रकारे रु.३५.१५ लाख रक्कम चुकीने परत केले गेले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

सन २०१०-११ या वर्षाकरिता मौजा ईटान, ता. लाखांदूर, जि. भंडारा हा ३३४७७ ब्रासचा वाळूगट मो. इक्बाल जॉन मोहम्मद यांना १,०१,२१,००० इतक्या सर्वोच्च बोलीस मंजूर करण्यात आला होता. त्याअनुषंगाने लिलावधारकाने सर्व रक्कम शासनजमा केली. तथापि, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी सदर वाळूगटातून २१,२०० ब्रास वाळू उत्खननाची शिफारस केली. त्यानुसार लिलावधारकास २१,२०० ब्रास रेती उचल व वाहतूक करण्यास अनुमती दिली.

सदर वाळूगटातील ३३४७७ ब्रास वाळूचा लिलाव केला होता. मात्र लिलावधारकास २१,२०० ब्रास वाळू उत्खननास अनुमती दिली. त्यामुळे लिलावधारकास १२,२७७ ब्रास इतक्या रेतीच्या स्वामित्वधनाचा परतावा करणे क्रमप्राप्त होते. लिलावधारकाने लिलावाच्या कालावधीत उत्खननास परवानगी दिलेल्या २१,२०० ब्रास वाळूपैकी १८,०९७ ब्रास इतक्या रेतीचे उत्खनन केले. मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ४८३०/२०१० मध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने दि. २३.९.२०१० ते २८.१०.२०१० या कालावधीत राज्यात वाळू/ रेती उत्खननावर बंदी घातली होती.

ही वस्तुस्थिती विचारात घेऊन लिलावधारकास उत्खननास परवानगी दिलेल्या वाळूपैकी उत्खनन न करता आलेल्या ३१०३ ब्रास व उत्खननास परवानगी न दिलेल्या १२,२७७ ब्रास अशा एकूण १५३८० ब्रास वाळूसाठ्याची प्रमाणशीर रक्कम शासन मान्यतेने दि. ३०/०३/२०१३ च्या ज्ञापनान्वये अदा करण्यास मान्यता देण्यात आली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

५.५४ रेती घाटाची लिलाव रक्कम परत करणे असे आक्षेप सदरहू परिच्छेदात नमूद केले आहेत. न्यायालयाच्या स्थगितीमुळे जवळजवळ ३६ दिवस रेती उत्खननाचे काम कंत्राटदाराला करता आले नाही. त्यामुळे लिलावधारकास १२,२७७ ब्रास इतक्या रेतीचे स्वामित्वधनाचे परतावे केलेले आहे व रेती उत्खननाच्या दिनांक २५/१०/२०१० च्या धोरणामध्ये परतावा देण्याबाबतची निश्चित तरतूद आहे असेही समितीसमोर सांगण्यात आले. पैसे परत देण्यापेक्षा लिलावधारकास वेळ वाढवून देणे, अतिरिक्त यंत्रसामुग्री वापरुन मंजूर परिमाणाचे उत्खनन करणे असे अन्य पर्याय देखिल विभागाला वापरता आले असते. त्याचा विभागाने विचार करण्याची आवश्यकता होती अशी समितीने विचारणा केली असता यासंदर्भात विभागाने स्पष्ट केले की, दिनांक ३ जानेवारी २०१८ च्या धोरणामध्ये तशी तरतूद करण्यात आलेली आहे. मात्र पूर्वी ही तरतूद नव्हती त्यामुळे परतावा करण्यात आला. समितीच्या असेही निदर्शनास आले की, न्यायालयाच्या स्थगितीचा कालावधी दि. २३/९/२०१० ते दि. २८/१०/२०१० हा होता. सदरहू कालावधी हा पावसाळ्याचा असल्यामुळे या कालावधीत बंदी नसती तरीही रेतीचे उत्खनन करणे शक्य नाही. अशा परिस्थितीत केवळ न्यायालयाची स्थगिती होती त्याआधारे लिलावधारकास दिलेला परतावा सकृतदर्शनी जरी योग्य असला तरीही समर्थनीय ठरतो काय हा देखील प्रश्न उद्‌भवतो. तसेच बंदी उठवल्यानंतर लिलावधारकाने रेतीचे अतिरिक्त उत्खनन देखील केले असल्याची शक्यता नाकारता येणार नाही. समितीसमोर ही आकडेवारी उपलब्ध नसल्यामुळे तशी तपासणी करणे आता शक्य नाही. परंतु लिलावधारकास दुहेरी लाभ झाला किंवा कसे याचीही विभागाने तपासणी करावी त्याचप्रमाणे परताव्याची निश्चिती करताना रेतीचे जे परिमाण ग्राह्य धरण्यात आले त्याची देखील पुन्हा एकदा तपासणी करून वस्तुतः त्या घाटातील केलेले रेतीचे उत्खनन याच्या एकंदरीत प्रमाणाच्या तुलनेत परतावा निश्चिती योग्य होती किंवा कसे याची पुन्हा एकदा तपासणी करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती महालेखापालांची मान्यता घेऊन ३ महिन्यात समितीस सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ७.२.३.९ "खनिजांच्या उत्खननासाठी निष्पादित केलेल्या संलेखावर मुद्रांक शुल्काची वसूली न करणे"

अभिप्राय

५.५५ महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या अनुच्छेद ३६ अनुसार जर एखादा भाडेपट्टा पाच वर्षांपेक्षा कमी कालावधीसाठी असल्याचे अभिप्रेत असेल तर त्याबाबतीत बाजार मूल्याच्या दहा टक्क्यांच्या तीन टक्के दराने मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य आहे. मुद्रांक शुल्क आकारण्याकरिता भाडेपट्ट्याची बोली किंमत बाजार मूल्य म्हणून धरण्यात येते.

परंतु सहा जिल्ह्यांत २०१२-१३ ते २०१३-१४ या कालावधीच्या रेती घाटांच्या लिलावासंबंधीच्या दस्तावेजांत आढळले की, ४४८ रेती घाट रु. १०६.१३ कोटी बोली रकमेवर भाडेपट्याने देण्यात आले ज्यावर रु. ३१.८४ लाख मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य होते. तथापि, हे मुद्रांक शुल्क आकारण्यात आले नाही व भरणा सुद्धा करण्यात आले नाही. तसेच दोन जिल्ह्यांत गौण खनिजांच्या १३ भाडेपट्टा प्रकरणांत भाडेपट्टा निष्पादनासाठी रु.८.३२ कोटी बाजार मूल्यावर रु.२.५० लाख मुद्रांक शुल्क आणि रु.०.८३ लाख नोंदणी फी भरण्यात आली नाही. नागपूरमध्ये गौण खनिजाच्या १४ भाडेपट्टा प्रकरणांत रु. १,३६१.७५ लाख बाजार मूल्यावर भाडेपट्टानिष्पादनासाठी रु. ४०.१८ लाख मुद्रांक शुल्क आणि रु. ५.२७ लाख नोंदणी फी कमी आकारण्यात आली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियमातील तरतूदीनुसार वाळू लिलावधारकासोबत करण्यात येणाऱ्या करारनाम्यावर रु. १० लाखापर्यंतच्या लिलावाच्या रकमेवर ०.१ टक्के मुद्रांक शुल्क आकारण्याच्या सूचना दि.१८/०३/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

५.५६ खनिजाच्या उत्खननासाठी निष्पादित केलेल्या संलेखावर मुद्रांक शुल्काची वसुली न करणे असे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नोंदविलेले आहेत. विभागीय प्रतिनिधींनी सदरहू आक्षेप समितीसमोर मान्यच केले व दिनांक १८/३/२०१७ रोजी किती दराने मुद्रांक शुल्क वसूल करावा याबाबत सबंधितांना निर्देश देण्यात आल्याचे व त्याअनुषंगाने कार्यवाही होत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. यावर समितीने आक्षेप नोंदवित विभागाने केलेली कार्यवाही ही भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. परंतु महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नोंदविलेल्या आक्षेपासंदर्भात प्रथम विभागाने काय कारवाई केली हे समितीसाठी अधिक महत्त्वाचे आहे. ६ जिल्ह्यात एकूण १०६.१३ कोटी रकमेवर एकूण ३१.८४ लक्ष मुद्रांक शुल्क आकारणी योग्य होते. त्याच्या वसूलीसंदर्भात समितीने विचारणा केली असता, ही वसुली अद्यापही पूर्ण झालेली नसल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. एवढेच नव्हे तर महालेखाकारांनी केवळ नमुन्यादाखल राज्यातील केलेल्या काही जिल्ह्यांच्या तपासणीत ही गंभीर प्रकरणे समोर आलेली आहेत व हे आक्षेप नोंदविण्यात आले. राज्यात अन्य जिल्ह्यांमध्ये देखील निश्चितच हीच परिस्थिती कायम असणार त्यामुळे त्याची देखील विभागाने तपासणी करून एकूण वसूलपात्र रकमेची निश्चिती करावी व महालेखाकारांनी आक्षेपित केलेली व राज्यात अन्य ठिकाणी आढळून आलेली अशी संपुर्ण वसुली तात्काळ करण्यात यावी. तसेच मुद्रांक शुल्काच्या सदोष आकारणी व वसुलीसंदर्भात जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर विभागाने तात्काळ कारवाई करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ७.२.३.१० "पर्यावरणाचा अभाव"

(अ) EIA अभ्यास न करता उत्खननाची परवानगी देणे

अभिप्राय

५.५७ पर्यावरण आघात निर्धारण (Environment Impact Assessment-EIA) ही एक प्रक्रिया असून याचा उपयोग एखाद्या प्रकल्पाबाबत निर्णय घेण्यापूर्वी त्या प्रकल्पाचे पर्यावरण, सामाजिक आणि आर्थिक परिणाम जाणून घेण्यासाठी करण्यात येतो. प्रकल्पाचे नियोजन आणि योजना आखतांना प्रारंभीच त्या प्रकल्पाचा पर्यावरणावर होणारा आघात आधीच आगाऊ वर्तविणे, प्रतिकूल परिणाम कमी करण्यासाठी मार्ग आणि साधने शोधणे, स्थानिय पर्यावरणाशी अनुरूप प्रकल्प आखणे आणि निर्णयकर्त्यांस भविष्याबाबत भाकीत आणि पर्याय पुरविणे हा EIA चा उद्देश्य आहे. EIA मध्ये योजनाबद्ध पद्धतीने प्रस्तावित प्रकल्पाचे लाभदायक आणि प्रतिकूल दोनही परिणाम तपासून प्रकल्प योजनेत या आघातांचा विचार करण्यात येईल याची खात्री करण्यात येते. पर्यावरणावरील परिणाम आणि प्रकल्प नियोजनाच्या प्रारंभीच त्या परिणामांचे सौम्यकरण केल्यास, त्याचे अनेक लाभ आहेत, जसे पर्यावरणाचे संरक्षण, साधनसंपत्तीचे अनुकूलतम उपयोजन आणि प्रकल्पाचा वेळ व पैसा यात बचत. पर्यावरण व वन मंत्रालयाने निर्गमित केलेल्या (जानेवारी २०११) समुद्र तट विनियमन क्षेत्र (CRZ) अधिसूचनेद्वारे जमीन लागवडी खाली आणणे, बांध बांधणे अथवा पर्यावरण आघात निर्धारण अभ्यासावर आधारित जल मार्ग, पात्र आणि बंदरांचा रखरखाव अथवा साफ करणे व्यतिरीक्त CRZ खालील सागरी जलाच्या प्राकृतिक गतिस अडथळा आणणे, अशा कामांवर प्रतिबंध घातला आहे.

ठाणे जिल्ह्यात २०११-१२ मध्ये महालक्ष्मी इंडस्ट्रीयल मॅन्युफॅक्चरर को-ऑपरेटीव सोसायटीस पर्यावरण आघात निर्धारण अभ्यास केल्याविना रु. २०.५६ कोटी स्वामित्वधनाच्या अदायगी व ३.४८ लाख ब्रास रेती किंवा रेती मिश्रीत माती, सक्शन पंप वापरून यांत्रिकी पद्धतीने उत्खननाचा परवाना दिला. अशा प्रकारच्या मोठ्या प्रमाणाच्या म्हणजेच ३.४८ लाख ब्रास रेतीच्या उत्खननाचा पर्यावरणावरील आघाताचा अंदाज परवाना देण्यापूर्वी बांधण्यात आला नाही, हे समुद्र तट विनियमन क्षेत्र अधिसूचनेचे उल्लंघन होते.

शासन पत्र दि.३/०८/२०११ अन्वये श्री महालक्ष्मी औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थेस पालघर, वसई व वाडा तालुक्यातील खाडी नदीक्षेत्रातील गाळ व गाळमिश्रीत रेती परवाना पद्धतीने यांत्रिक सहाय्याने उत्खनन करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यामध्ये पर्यावरण विभागाने त्यांचे दि.२५/०१/२०१० अन्वये दिलेल्या नाहरकत पत्रातील अटी व शर्तींचे पालन करण्याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार श्री महालक्ष्मी औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थेस पर्यावरण विभागाने दिलेल्या अटी व

शर्तीनूसार गाळ व गाळमिश्रीत रेतीचे उत्खनन करताना कोस्टल रेग्यूलेशन झोन अधिसूचनेचा भंग होणार नाही याबाबत कळविण्यात आले होते. सदर संस्थेकडून पर्यावरण विभागाने दिलेल्या अटी व शर्तीचा भंग झाल्याचे आढळून आलेले नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

जिल्हाधिकारी ठाणे यांनी दि. २०.४.२०१३ च्या पत्रान्वये ठाणे जिल्हयातील खाडी/नदीपात्राचा पर्यावरण विषयक अभ्यास व पर्यावरण आघात मूल्यांकन (EIA) करण्याकरिता अधिस्विकृतीधारक पर्यावरण सल्लागार मे. फाईन इनव्हायरोटेक इंजिनियर्स मुंबई (Accredited Environment Consultant in Dredging) यांची नियुक्ती करण्यात आली होती. पश्चात EIA चा अभ्यास पूर्ण करण्यात आला. त्यामुळे समुद्र तट विनियमन क्षेत्र अधिसूचनेचे उल्लंघन झाले अशी बाब नाही.

त्याचप्रमाणे शासन निर्णय दि. २१/०५/२०१५ अन्वये सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातील नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळूचे उत्खनन करण्यासंबंधीचे धोरण विहीत केले आहे. त्यामध्ये वाळू उत्खननापूर्वी पर्यावरण अनुमती घेण्याची तरतुद आहे असेही विभागाद्वारे विदित करण्यात आले.

शिफारस

५.५८ महालेखाकारांनी सदरहू नोंदविलेले आक्षेप गंभीर असून पर्यावरण आघात निर्धारण (Environment Impact Assessment-EIA) न करता उत्खननाची परवानगी देण्यात आली होती. विभागाने सन २०१३ मध्ये पर्यावरण आघात निर्धारण केले. परंतु सदरहू प्रकरणी उत्खनन हे सन २०१० मध्ये झालेले आहे. अशा परिस्थितीत सन २०१३ चे निर्धारण सदरहू प्रकरणी लागू होऊ शकत नाही असे समितीसमोर सांगण्यात आले. समितीने यासंदर्भात विस्तृत तपासणी केली असता, उत्खननापुर्वी पर्यावरण विभागाची मान्यता घेण्यात आली होती व तीच ग्राह्य धरण्यात आली. पर्यावरण विभागाची परवानगी व सीआरझेड पर्यावरण आघात निर्धारण ह्या दोन्ही बाबी स्वतंत्र असून त्या स्वतंत्ररित्या बंधनकारक आहेत. समितीने पर्यावरण विभागाने दिलेल्या अटी शर्तीची तपासणी केली असता, त्यात स्पष्टपणे पुढील अटी शर्ती नमूद आहेत.

(१) अर्जदाराकडून आगाऊ स्वामित्वधनाची रक्कम वसूल करण्यात यावी.

(२) जिल्हाधिकारी यांनी अर्जदाराला परवाना देण्यापुर्वी संबंधित विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात आल्याची खातरजमा करण्यात यावी.

(३) अर्जदाराने उत्खनन केलेल्या गौण खनिजाची योग्य ती नोंद व यादी ठेवावी.

(४) जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांनी विहीत कालावधीमध्ये त्या ठिकाणी सुरू असलेल्या उत्खनन क्षेत्रास प्रत्यक्ष भेट द्यावी व उत्खनन केलेल्या गौण खनिजाची नोंद करावी.

(५) तहसिलदार व उप विभागीय अधिकारी यांनी कामावर देखरेख ठेवावी.

उपरोक्त अटी शर्तीसह गाळ व गाळ मिश्रीत रेतीचे उत्खनन करताना समुद्र तट विनियमन क्षेत्र (सीआरझेड) अधिसूचनेचा भंग होणार नाही याबाबतही कळविण्यात आले होते. उपरोक्त अटी शर्तीवरून हे सुस्पष्ट होते की, जरी पर्यावरणाची परवानगी असली तरी सीआरझेडची परवानगी आवश्यकच होती. समितीचे असे स्पष्ट मत आहे की, जोपर्यंत सीआरझेडची परवानगी मिळत नाही. तोपर्यंत पर्यावरण विभागाने परवानगी देणे योग्यच नाही. उपरोक्त अट क्र.२ मध्ये देखील असे स्पष्टपणे ध्वनीत होते की, संबंधित विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात आल्याची खातरजमा केल्याशिवाय उत्खनन करू देता कामा नये. यावरुन सुस्पष्ट होते की, सीआरझेडची परवानगी घेणे बंधनकारक होते तसेच त्याचा भंग होणार नाही हे पाहण्याची जबाबदारी देखील विभागाचीच होती. केवळ पर्यावरण विभागाची परवानगी दिल्याने अन्य सर्व परवानग्या विभागाने गृहीत धरल्या व कोणत्याही छाननीविना हे उत्खनन करण्यात आले. संस्थेला परवानगी देतेवेळी सीआरझेडची परवानगी का घेण्यात आली नाही व त्याचेशिवाय शासनस्तरावरून परवानगी कशाप्रकारे देण्यात आली याची समितीने विचारणा केली असता, ही नस्ती सन २०१२ पूर्वीची असून ती आता उपलब्ध होत नसल्याचे समितीला सांगण्यात आले. यावर समितीने अधिक सुस्पष्टरित्या विचारले ही नस्ती मंत्रालयीन आगीत जळाली काय यावर विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर स्पष्ट केले की, ही नस्ती आता सापडत नाही. त्यामुळे नेमक्या कशाच्या आधारे ही परवानगी देण्यात आली हे स्पष्टपणे सांगता येणार नाही. वास्तविकतः सीआरझेड कायद्याच्या अधिन राहून ही परवानगी दिलेली असून

उत्खननाच्यावेळी याचे उल्लंघन झाले किंवा कसे हे पाहण्याची जबाबदारी देखिल संबंधित यंत्रणेची होती. विभागाने सदरहू संस्थेस पुन्हा २०१८ च्या पत्रान्वये मुदतवाढ दिली. ज्यात केवळ स्वामित्वधनाची रक्कम आगाऊ वसूल करण्यात यावी एवढी एकच अट नमूद होती. याचा अर्थ उर्वरीत सर्व अटींची पूर्तता ही अगोदरच करणे अभिप्रेत, आवश्यक व बंधनकारक होते. अतः या प्रकरणी देण्यात आलेल्या परवानग्या, बंधनकारक असतानाही न घेतलेल्या परवानग्या, नियमानुसार झालेल्या रेतीचे उत्खनन, विहीत मर्यादेचे झालेले उल्लंघन या संपूर्ण बाबींची चौकशी करून पट्टाधारकावर कारवाई करून केलेल्या कारवाईसह अहवाल महालेखाकारांच्या मान्यतेने समितीस ३ महिन्यांत सादर करावा. तसेच सदरहू संस्थेस सन २०१८ मध्ये पुन्हा दिलेल्या मुदतवाढीच्यावेळी या सर्व परवानग्या घेतलेल्या काय, याची देखील शहानिशा करण्यात यावी. त्याचप्रमाणे या प्रकरणी दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(ब) जिल्हा खनिकर्म नियोजनाशिवाय तात्पुरता परवाना देणे

अभिप्राय

५.५९ अल्पावधी खाण परवाना जिल्हा खनिकर्म नियोजनानुसार द्यावयास पाहिजे होता. चार जिल्ह्यांत नोव्हेंबर २०१३ ते जानेवारी २०१५ दरम्यान १२६ तात्पुरते परवाने ७.२९ लाख ब्रास गौण खनिज उत्खननासाठी जिल्हा खनिकर्म योजनेत नसतांनाही देण्यात आले जे अयोग्य होते. चंद्रपूर आणि रायगड च्या जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा खनिकर्म नियोजन तयार करण्याबाबत व त्यानुसार तात्पुरते परवाने जारी करण्याबाबत माहिती दिली नव्हती.

यासंदर्भात नागपूर जिल्हयात जिल्हा खाणकाम आराखड्यात समाविष्ट क्षेत्रातूनच नोव्हेंबर २०१३ ते डिसेंबर २०१५ कार्यालयीन अभिलेखाची तपासणी केली असता सदर कालावधीत नागपूर जिल्हयात जिल्हा खाणकाम आराखड्यात समाविष्ट क्षेत्रातूनच तात्पुरते परवाने निर्गमित करण्यात आलेले आहेत. सातारा जिल्हयात नोव्हेंबर २०१३ ते जानेवारी २०१५ या कालावधीत जिल्हा खाणकाम आराखड्याशिवाय तात्पुरते परवाने देण्यात आले होते. जिल्हाधिकारी सातारा यांनी जिल्हा खाणकाम आराखडा तयार करून गौण खनिजाचे तात्पुरते परवाने देण्याची दक्षता घेतली आहे.

पुणे जिल्ह्यात माहे नोव्हेंबर २०१३ ते जानेवारी २०१५ या दरम्यान गौण खनिज उत्खननासाठी तात्पुरते परवाने दिले आहेत. तद्नंतर पुणे जिल्ह्याचा खाणकाम आराखडा तयार करणेत आला असून जिल्हा खाणकाम आराखड्यानुसार तात्पुरते परवाने देण्यात येत आहेत.

ठाणे जिल्ह्यात नोव्हेंबर २०१३ ते जानेवारी २०१५ या कालावधीत जिल्हा खाणकाम आराखड्याशिवाय तात्पुरते परवाने देण्यात आले होते. तथापि, जिल्हा खाणकाम आराखडा तयार करण्यासाठी जिल्हास्तरीय समितीचे गठन करण्यात आले असून, तालुकानिहाय खाणकाम आराखडा जिल्हास्तरीय समितीकडून मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. मंजूर खाणकाम आराखड्यानुसार गौण खनिजाचे तात्पुरते परवाने देण्याची दक्षता घेतली जाईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस

५.६० सदरहू प्रकरणी चार जिल्ह्यात १२६ तात्पुरते परवाने ७.२९ लाख ब्रास गौण खनिज उत्खननासाठी जिल्हा खनिकर्म योजनेत नसतानाही देण्यात आले. यापैकी नागपूर सोडून अन्य ठिकाणी उल्लंघन झाल्याचे विभागाने समितीसमोर मान्य केले व दिलेली परवानगी नियोजनाशिवाय असल्याचेही विदीत केले. परंतु त्यावर कोणतीही कारवाई केली नाही. नियमाच्या बाहेर जाऊन व नियोजनाशिवाय परवानगी देण्याचे विभागाला कोणतेही कारण नव्हते. नियमानुसार अल्प कालावधीसाठी परवानगी देताना जिल्हा खाणकाम आराखडा देणे आवश्यक आहे. नागपूरमध्ये तसा खाणकाम आराखडा अस्तित्वात होता. परंतु सातारा, पुणे, ठाणे येथे असा आराखडाच अस्तित्वात नव्हता व तात्पुरते परवाने देण्यात आले. ठाणे व पुणे संदर्भात तात्पुरती परवानगी ही विकासकामांमध्ये पाया उत्खननासाठी देण्यात आली होती. मात्र सातारा येथे खाणकामासाठी परवानगी दिली होती. त्यामुळे यासंदर्भात ठाणे व पुणे विभागाने दिलेले स्पष्टीकरण एकवेळ मान्य करण्यायोग्य आहे. मात्र साताऱ्याबाबतची बाब अतिशय गंभीर असून त्याबाबत संबंधितांवर निश्चितच कारवाई होणे आवश्यक आहे व समितीच्या या भूमिकेस विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्यता देखील दिली. वास्तविकतः महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप हे फार वर्षापुर्वीचे असून समितीसमोर येतानाच विभागाने संबंधितांवर कारवाई करून समितीसमोर येणे आवश्यक असताना अशी कोणतीही कारवाई विभागाने केली नाही व आता समितीसमोर मात्र अधिकाऱ्यांनी खाणकाम

आराखड्याचा विचार करणे आवश्यक होते असे मान्य करणे निश्चितच समर्थनीय नाही. विभागाने केवळ भविष्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करून या प्रकरणात चालणार नाही. तर संबंधितांवर (ते कितीही वरिष्ठ दर्जाचे अधिकारी असले तरीही) तात्काळ जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(क) पर्यावरण उपकराची कमी वसुली

अभिप्राय

५.६१ रेतीच्या विल्हेवाटीसंबंधीचा दिनांक २५/१०/२०१० चा शासन निर्णय आणि महसूल आणि वन विभागाचे पत्र दिनांक १४/१/२०११ यात असे विनिर्दिष्ट आहे की लिलाव रक्कमेच्या दोन टक्के दराने रेती घाटाच्या यशस्वी बोलीदाराकडून उपकर महसूल करावयास पाहिजे.

मात्र सन २०११-१३ दरम्यान रेती घाटांच्या लिलावावर वसूल केलेल्या रु.३९०.६५ कोटी रक्कमेवर रु.७.८१ कोटी पर्यावरण उपकर वसुलीयोग्य होता. परंतु यासाठी केवळ रु.६.०२ कोटी पर्यावरण उपकर वसूल करण्यात आला. ज्यामुळे रु.१.७९ कोटी कमी वसुली झाली. कमी वसुलीचे एक कारण असेही आढळले की पुणे जिल्ह्यात उपकराची आकारणी रेती घाटातील लिलाव रकमेवर न करता घाटातील परिमाणावर स्वामित्वधन दर रु.२०० प्रती ब्रास प्रमाणे करण्यात आली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासदंर्भात पुणे जिल्ह्यात सन २०११-१२ मधील वाळू लिलावामध्ये लिलावधारकांकडून स्वामित्वधनावर दोन टक्के पर्यावरण शुल्क घेण्यात आले आहे. महालेखापाल कार्यालयाने उपस्थित केल्यानुसार दोन टक्के रक्कम सर्वोच्च बोलीवर शासनजमा करण्याकरीता तहसिलदार जुन्नर, आंबेगाव, मावळ, शिरूर, खेड व दौंड यांना फरकाची रक्कम वसूल करण्याबाबत कळविण्यात आले असून त्यानुसार वसुलीची कार्यवाही सुरू असल्याचे समितीस सांगण्यात आले.

शिफारस

५.६२ पर्यावरण उपकराची कमी वसुली या आक्षेपासंदर्भात समितीने विचारणा केली असता, उपकरापोटी रु. १३,८७,५९१ इतक्या वसूलपात्र रकमेपैकी रु.३,५१,००० वसूल करण्यात आले असून उर्वरीत रकमेची वसूली प्रक्रिया सुरू असल्याचे समितीस सांगण्यात आले. महालेखाकारांनी वसुलीची निश्चित केलेली रक्कम व विभागाने निश्चित केलेली रक्कम यामध्ये मोठी तफावत असण्याची कारणे समितीने विचारली असता, पर्यावरणाचा उपकर २% प्रमाणे वसूल करावयाचा असतो. परंतु विभागाने मूळ स्वामित्वधनाच्या रकमेवर ही वसुली केली. त्यामुळे आता तफावतीची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही पुणे जिल्ह्यात सुरू असल्याचे समितीस सांगण्यात आले. परंतु रकमेतील तफावत रु. १३,८७,५९१ नसून रु. १.७९ कोटी इतकी असल्याचे महालेखाकारांनी नमूद केले असून हा संपुर्ण राज्याच्या वसुलीचा आकडा आहे. त्याप्रमाणे संपूर्ण राज्याची वसुली ही रु. १.७९ कोटी बाकी असल्याचेही समितीसमोर सांगण्यात आले. अतः विभागाने राज्यात विशेष मोहीम हाती घेऊन संपूर्ण वसुलीची कार्यवाही पूर्ण करावी. त्याचप्रमाणे ही आकारणी सदोषरित्या करणेसंदर्भात संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ७.२.३.११ "भूपृष्ठ भाडे वसूल न करणे"

अभिप्राय

५.६३ महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियम १९५५ च्या कलम १८ (iii) अनुसार भाडेपट्टेदाराने त्याचेद्वारे दगडखाण/ खनिकर्मसाठी वापरण्यात येणाऱ्या भूपृष्ठ जागेसाठी जमिनीवरील जमीन महसूल आणि उपकर यांच्यापेक्षा जास्त नसेल अशी रक्कम भूपृष्ठ भाडे म्हणून अदा करावयास पाहिजे. परंतु पुणे जिल्ह्यात ६६ भाडेपट्टेदारांकडून ऑगस्ट, २००९ ते जुलै, २०१४ या कालावधीसाठी रु. ७८.२७ लाख भूपृष्ठ भाडे वसूल करण्यात आले नाही. जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्याने याची मागणी केली नव्हती. तसेच ठाणे जिल्ह्यात शहर आणि औद्योगिक विकास महामंडळाने (CIDCO) अतिरीक्त जिल्हाधिकारी, ठाणे यांना त्याचेद्वारे ८६ खाणींच्या भाडेपट्टेधारकांकडून CIDCO च्या जमीनीवर काम केल्यामुळे ऑक्टोबर, २००६ ते सप्टेंबर, २०१६ पर्यंतच्या कालावधीचे भूपृष्ठ भाडे वसूल करण्यात आल्याचे कळविले (मे, २०१५). CIDCO ने वसुलीची रक्कम सूचित केली नाही आणि ती कोषागारात जमा केली नाही. जिल्हाधिकाऱ्यांनीही या रक्कमेची मागणी केली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात पुणे येथे भुपृष्ठ भाडेबाबत एकूण ७८.२७ लाख रकमेपैकी रक्कम रु.७ लाख ९७ हजार वसूल करण्यात आलेले आहेत. उर्वरीत रक्कम वसूल करणेकामी संबंधितांना नोटीस देण्यात आलेल्या असून रक्कम रु.७०.३० लाख संबंधितांकडून त्वरीत वसूल करण्याची दक्षता घेतली जात आहे असे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच ठाणे संदर्भातील माहिती अप्राप्त होती. परंतु त्यासंदर्भात सिडकोबरोबर चर्चा करून योग्य ती भूमिका घेणेबाबत निश्चित करण्यात आले.

शिफारशी

५.६४ (१) सदरहू परिच्छेदात भूपृष्ठ भाड्याची वसुली न करणे यासंदर्भात महालेखाकारांनी गंभीर आक्षेप नोंदविलेले असून पुणे जिल्ह्यात रु. ७८.२७ लक्ष भूपृष्ठ भाडे वसुलीपैकी रु. ७.९७ लक्ष वसूल करण्यात आले आहे व उर्वरीत वसुलीची कार्यवाही सुरू असल्याचे समितीस सांगण्यात आले. ठाणे जिल्ह्यात एकूण रु. ६०,०८,८०८ इतक्या भूपृष्ठ भाडेपैकी पूर्वी रु. १२,५०,०९६ इतकी वसूली करण्यात आली होती. आता उर्वरीत वसूली व त्यावरील व्याज रु. ५४,७२,५१९ एवढी रक्कम वसूल करावयाची आहे. पुढे त्यापैकीही रु. ३७,०८,४९३ इतकी रक्कम वसूल करण्यात आली असून रु. १७,६४,०२६ इतकी रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे सांगण्यात आले. सदरहू प्रकरणी वसूलपात्र रक्कम तात्काळ वसूल करण्यात येवून या प्रकरणी सदोष आकारणी संदर्भात संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

५.६५ (२) तसेच विभागाने त्यांचे उत्तरात सिडको प्राधिकरणाकडून वेळोवेळी माहिती मागविली असता, ती अप्राप्त असल्याचे नमूद करण्यात आले आहे व त्यानंतर सिडकोद्वारे स्पष्ट करण्यात आले की, सिडकोनी जी वसुली केलेली आहे. ती भूपृष्ठ भाडे नसून ती लीज रेंट आहे. वास्तविक पाहता शासनाने ८६ खाणीचे भाडेपट्टे हे सिडकोच्या नावे करून दिले. या मागील मूळ संकल्पना अशी होती की, म्हाडा व सिडको यांनी स्वतःहून आर्थिकदृष्ट्या मागास व गरीब लोकांसाठी शहरात इमारती बांधाव्यात. सिडकोला खाणपट्टीचे स्वामित्वधन भरण्यासाठी वारंवार महसूल विभागाकडे जावे लागू नये म्हणून हे अधिकार त्यांना दिले होते. परंतु आता ज्यासाठी या खाणींमधील उत्खननाच्या मटेरियलचा त्यांना उपयोग करता येईल. परंतु आता सिडको घरे न बांधता प्लॉट विकून टाकते. अशा परिस्थितीत या महसूली बाबी आता शासनाने स्वतःच्या अखत्यारीत घेतल्या पाहिजेत. या प्रक्रियेत सिडकोला वगळले तर अधिक योग्य होईल. अशा परिस्थितीत खाणींचा भाडेपट्टा हा सिडकोकडे न ठेवता शासनाने तो स्वतःकडे घेणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे. त्याअनुषंगाने विभागाने या संपुर्ण बाबींचा पुर्ण आढावा घ्यावा व त्याअनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही शासनस्तरावरुन करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिशिष्ट-अ

विवरणपत्र क्र. १

महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्र. २२०४८२४७ E-MAIL:- dokh.rfd@maharashtra.gov.in

क्रमांक : गौखनि १०/१०१७/प्र.क्र.४५७/ख,
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :२१/०६/२०१८.

प्रति,

अँवर सचिव, (ड-१)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई -३२.

विषय : लोकलेखा समितीचा सन २०१४-१५ मधील महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा परिच्छेद क्र.७.२.३.७

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, लोकलेखा समितीची दि.१३/०६/२०१८ रोजी झालेल्या साक्षीमध्ये परिच्छेद क्र.७.२.३.७ च्या अनुषंगाने महसूल, पोलीस व परिवहन विभागाच्या समन्वय समितीच्या बैठकीच्या इतिवृत्ताच्या प्रती लोकलेखा समितीस उपलब्ध करून देण्यात येतील असे सांगण्यात आले आहे. त्याअनुषंगाने या पत्रासोबत राज्यातील जिल्ह्यांकडून प्राप्त झालेल्या उक्त समन्वय समितीच्या बैठकीच्या इतिवृत्ताच्या प्रती उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

(दिनेश चव्हाण)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

एचबी २८६--२१

परिच्छेद क्र.७.२.३.७

जिल्हास्तरीय समिती

E:\Bansode ref\Lokshahi din sandarbh\Forwarding letter.docx

8 ठाणे

इतिवृत्त

ठाणे जिल्हयात गौण खनिजाच्या मोठया प्रमाणात होत अरालेल्या चोऱ्यांना आळा घालणेसाठी करावयाच्या उपाय योजनांबाबत दिनांक २५/०७/२०१७ रोजी दुपारी १२:३० वा घेण्यांत आलेल्या बैठकीचे इतिवृत्त..

शासनाचे महसुल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय क्र .गौखनि.१०/०६१५/ प्र.क्र.२८७/ख,दि.५/१२/२०१५ नुसार गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतुकीस आळा घालणेसाठी जिल्हास्तरावर खालील प्रमाणे समिती गठीत करणेत आलेली आहे.

१.जिल्हाधिकारी	-	अध्यक्ष
२.जिल्हा पोलिस अधिक्षक/पोलीस आयुक्त	-	सदस्य
३.प्रादेशिक परिवहन अधिकारी	-	सदस्य
४.जिल्हा खनिकर्म अधिकारी	-	सदस्य सचिव

सदर समितीची बैठक दि.२७/०७/२०१७ रोजी दुपारी १२:३० वा मा. निवासी उपजिल्हाधिकारी ठाणे यांचे दालनात घेण्यांत आली.

सदर सभेत खालीलप्रमाणे कर्मचारी उपस्थित होते.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	पदनाम व कार्यालयाचे नाव
१	श्री. प्रविण पवार	पोलीस उपायुक्त, नवी मुंबई
२	श्री. कल्याणजी घेटे	वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, ठाणे शहर
३	श्री. संजय डोळे	उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नवी मुंबई
४	श्री. जितेंद्र पाटील	प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
५	श्री. नंदकिशोर नाईक	उप प्रादेशिक परिवहन अधिकारी , ठाणे
६	श्री. राजन विसे	पोलस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांचे प्रतिनिधी

मा. जिल्हाधिकारी हे शासकिय कामानिमित्ताने बाहेर असल्याने सदर सभा मा. निवासी उपजिल्हाधिकारी /तहसिलदार रेतीगट यांचे उपस्थितीत घेणेत आली.

सर्व प्रथम उपस्थित अधिकारी यांचे मा. निवासी उपजिल्हाधिकारी यांनी स्वागत केले.

तदनंतर सदर सभेमध्ये शासन निर्णय दिनांक ५ डिसेंबर २०१५ नुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत संबंधितास अवगत करणेत आले.वाळूची मागणी व पुरवठा यात असमतोल निर्माण झाला असल्याने वाळूचे उत्खनन व वाहतूक या क्षेत्रामध्ये काही अपप्रवृत्ती निर्माण झाल्या आहेत व त्यामुळे वाळू व इतर गौण खनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतूकी संदर्भात बऱ्याचशा तक्रारी शासनाकडे प्राप्त आहेत. या तक्रारीची प्रत्यक्ष तपासणी करून सर्व संबंधित विभागाचा परिणामकारक समन्वय साधून त्याचे निराकरण करणे तसेच गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीशी संबंधित अप्रवृत्तीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. त्यादृष्टीकोनातून गौण खनिजाच्या अवैध/वाहतुकीस आळा घालण्यासाठी महसूल विभाग, पोलीस विभाग व परिवहन विभागातील अधिकाऱ्यांचा समतोल अरालेली जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

मुंबई शहराला लागून ठाणे जिल्ह्याची हद्द असल्यामुळे मुंबईस गौण खनिजाचा पुरवठा हा ठाणे जिल्ह्यातून जात असलेल्या हमररस्त्यातूनच होत असतो. जिल्ह्यामध्ये वाळूचे लिलाव झालेले नाही त्यामुळे अनाधिकृत गौण खनिज उत्खनन व वाहतुक होत असते. जिल्हाधिकारी कार्यालयातील दक्षता पथक व जिल्हामधील उप विभागीय अधिकारी / तहसिलदार यांचे कार्यालयाकडून नेमणूक करणेत आलेल्या दक्षता पथकाकडून वेळोवेळी अनाधिकृत उत्खनन व .

वाहतुक प्रकरणी कारवाई केली जाते. सदर क्षेत्रामध्ये काही अपप्रवृत्ती निर्माण झालेल्या आहेत. अशा वेळी या कार्यालयास नागरिक/ लोकप्रतिनिधी यांचेकडूनही तक्रारी प्राप्त होत असतात.

गौण खनिजाचे अनाधिकृत उत्खनन व वाहतुक प्रकरणी अचानकपणे कारवाई करणेचे दृष्टीने या कार्यालयाकडून करणेत येत असलेल्या कारवाई कामी पुरेसा पोलीस बंदोबस्त तातडीने उपलब्ध करुन देणेबाबत आपले अधिनस्त पोलीस स्टेशन यांना कळविणेत यावे व कारवाईचे वेळी जिल्हा पोलीस कार्यालयाकडूनही पुरेसा पोलीस बंदोवस्त उपलब्ध करुन देणेबाबत सूचना देणेत आल्या.

तदनंतर सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

क्र. रेतीगट/ गौ.ख/टे-४/इतिवृत्त-०७/२०१७
दिनांक-२७/७/२०१७

तहसिलदार (रेतीगट)
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे

प्रत :- १. सर्व संबंधितास माहितीसाठी
२. कार्यालयीन संचिका

Gmail

Retigat Thane <retigat.thane@gmail.com>

Your letter dated 14/5/2018 about Para 7.2.3.7

1 message

Retigat Thane <retigat.thane@gmail.com> Mon, May 21, 2018 at 12:32 PM
To: rajesh sarode <rajeshsarode74@gmail.com>, dokh.rfd@maharashtra.gov.in

Respected Sir,

Pl see the attachment

Para 7.2.3.7.pdf
1600K

पालघर

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पालघर यांचे कार्यालय

(रेतीगट शाखा)

पार्श्वनाथ -९, बिडको नाका,पालघर ४०१४०४

फोन-०२५३५-२५३११९ Email-collectorpalghar@gmail.com

क्र. रेतीगट/ गौ.ख./ टे.१/कावि-३५१/१७ दि.०६/०७/२०१७

वाचा :- १) शासन निर्णय क्रमांक:गौखनि-१०/०६१५/प्र.क्र.२८७/ख दि.०५ डिसेंबर २०१५
२) कार्यालयीन मंजूर टिपणी दि.०६/०७/२०१७

आदेश :-

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांक:गौखनि-१०/०६१५/प्र.क्र.२८७/ख दि.०५ डिसेंबर २०१५ अन्वये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूक या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने सर्व संबंधित विभागांचा परिणामकारक समन्वय साधण्यासाठी आणि अनधिकृत उत्खनन व वाहतूकीशी संबंधित अपप्रवृत्तींवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालिलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे.

अक्र.	जिल्हास्तरीय समिती मधील सदस्य	समिती मधील पद
१	जिल्हाधिकारी	अध्यक्ष
२	जिल्हा पोलीस अधिक्षक / पोलीस आयुक्त	सदस्य
३	प्रादेशिक परिवहन अधिकारी	सदस्य
४	जिल्हा खनिकर्म अधिकारी	सदस्य सचिव

सही- XXX
जिल्हाधिकारी पालघर

प्रत :- जिल्हास्तरीय समितीचे सदस्य यांना [illegible] साठी अग्रेषित

स्थळप्रति मा. जिल्हाधिकारी पालघर सो
स्वाक्षरी असे

जिल्हाधिकारी पालघर करिता

गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूक या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारींच्या ने सर्व संबंधित विभागांचा परिणामकारक समन्वय साधण्यासाठी आणि अनधिकृत ...न व वाहतूकीशी संबंधित अपप्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या ...मितीचे बैठकीचे इतिवृत्त .

दिनांक २७/०७/२०१७ रोजी दुपारी ०२.०० वा. मा. जिल्हाधिकारी पालघर यांचे अध्यक्षतेखाली मा.मुख्य सचिव (महाराष्ट्र शासन) महोदय यांचेकडे दि.२०/०८/२०१६ रोजी झालेल्या सभेत दिलेल्या सुचनेनुसार करावयाच्या कारवाई संदर्भात तसेच दि.१०/०४/२०१७ च्या बैठकीबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आलेली होती सदर बैठकीस खालील प्रमाणे अधिकारी प्रतिनिधी उपस्थित होते.

अ. क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	पद	कार्यालयाचे नाव	स्वाक्षरी
१	मा.डॉ.श्री. प्रशांत नारनवरे	मा. जिल्हाधिकारी पालघर	जिल्हाधिकारी कार्यालय पालघर	सही/-XXX
२	श्री. मंजूनाथ शिंगे	पोलीस अधिक्षक	पोलीस अधिक्षक कार्यालय पालघर	सही/-XXX
३	श्री. विवेक घूले	जिल्हा खनिकर्म अधिकारी	जिल्हाधिकारी कार्यालय पालघर	सही/-XXX
४	श्री. भोसले	एआरटीओ	उ. प्रा. प. कार्यालय वसई	सही/-XXX

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांक:गौखनि-१०/०६१५/प्र.क्र.२८७/ख दि.०५ डिसेंबर २०१५ अन्वये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूक या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने सर्व संबंधित विभागांचा परिणामकारक समन्वय साधण्यासाठी आणि अनधिकृत उत्खनन व वाहतूकीशी संबंधित अपप्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या बैठकी मध्ये खालील प्रमाणे चर्चा करण्यात आलील.

अ.क्र	करावयाची कार्यवाही	कार्यवाही करणारे विभाग/ अधिकारी
१	२	३
१.	पालघर जिल्हयात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी दोषींवर महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८ चे (७) (८) , MPDA १९८१ , भारतीय रेल्वे कायदाचे कलम १५१, पर्यावरण संरक्षक अधिनियम १९८६ मधील कलम ५, भारतीय दंड संहिताचे कलम ३७९, CRZ कायदा, भारतीय वन जमिन अधिनियम १९२७ अन्वये गुन्हे दाखल करण्यात यावेत.	महसूल विभाग पोलीस विभाग
२.	पालघर जिल्हयात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हयातील महत्वाच्या नाक्यांवर CCTV कॅमेरे लावण्यात यावेत सदर CCTV चे आउटपूट महसूल व पोलीस , परीवहन विभागाला दयावे.	पोलीस विभाग महसूल विभाग परिवहन विभाग

रायगड ८०

अवैध खनिज उत्खननास प्रतिबंध करण्यासाठी स्थापन केलेल्या जिल्हास्तरीय समितीची दि.२२/०९/२०१७ रोजी आयोजित केलेल्या बैठकीचे इतीवृत्त

गौण खनिजाचे अवैध उत्खननासंबधी आढावा घेणे, उपाय योजना आखणे व अवेध उत्खनन प्रकरणी कार्यवाही करण्यासाठी सर्व संबधित विभागाचे सहकार्य तत्परतेने मिळण्याच्या दृष्टीने तसेच समन्वय साधण्याचे दृष्टीने शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभागाकडील निर्णय क्र.एमएनजी-१००५/ प्र.क्र. ८६७/ उदयोग-९, दि.२७ जुलै, २०१० अन्वये दिलेल्या निर्देशानुसार दि.२७/०९/२०१० नुसार गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीचे दि. २२/०९/२०१७ रोजी आयोजित केलेले बैठकिस खालील प्रमाणे जिल्हास्तरीय समितीचे सदस्य/त्यांचे प्रतिनीधी उपस्थित होते.

१) श्री. अनिल पारस्कर, जिल्हा पोलिस अधिक्षक, रायगड
२) श्री. किरण पाणबुडे, निवासी उप जिल्हाधिकारी, रायगड
३) श्री. राजेश सरक, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पेण
४) श्री. मनिष कुमार, उप वनसंरक्षक अलिबाग
५) श्री. व्ही. बी.सुर्यवंशी, उप वनसंरक्षक, रोहा
६) श्रीम.अफरोज उस्मान बेग, जिल्हा खनिकर्म अधिकारी, रायगड

सर्वप्रथम मा.जिल्हाधिकारी रायगड तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन बैठकिच्या कामकाजास सुरुवात केली. सदर बैठकित अवैध उत्खननास प्रतिबंध करणे, या विषयासंदर्भात चर्चा होऊन त्यासमोर नमूद केल्या प्रमाणे कार्यवाही करण्याचे ठरले.

अ.क्र.	चर्चेचे मुददे	झालेली चर्चा व करावयाची कार्यवाही
१.	संबधीत विभागाचे सहकार्य मिळणे व समन्वय साधणे	रायगड जिल्हयात अवैध उत्खनन व वाहतुकीवर कारवाई करण्याबाबत या कार्यालयाकडील दिनांक ६/२/२०१७ च्या आदेशान्वये क्षेत्रीय स्तरावर तपासणी चेकपोस्ट कार्यान्वीत करुन अवैध वाहतुकीवर कारवाई करण्याबाबत, F.I.R. दाखल करणेबाबत सर्व क्षेत्रीय महसुल अधिकारी व पोलीस विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना निर्देशीत करण्यात आले आहे. सर्व संबधित विभागाने समन्वयाने कामकाज करावे.
२	तपासणी पथक तयार करणे	रायगड जिल्हयातील अवैध गौण खनिज उत्खनन व वहातुकीस पूर्णत: प्रतिबंधात्मक उपाय व्हावा म्हणून या संबधी प्रभावीपणे कारवाई करण्यासाठी या कार्यालयाचे आदेश दि.६/२/२०१७ अन्वये सर्व संबधीत तहसिलदार / पोलिस निरीक्षक यांनी २१ तालुक्यातील ३५ तिकाणी १. तलाठी / महसुल कर्मचारी, २. पोलिस कर्मचारी, ३. कोतवाल / शिपाई, ४. होमगार्ड यांची तीन स्वतंत्र पथके प्रत्येकी ८ तास कालावधीसाठी (सकाळी ८.०० ते संध्याकाळी ४.००, संध्याकाळी ४.०० ते रात्री १२.००, रात्री १२.०० ते सकाळी ८.०० वाजेपर्यंत) दि. कार्यान्वीत करण्याबाबत आदेशीत केले आहे. सदर तपासणी नाके दि.७/२/२०१७ पासून तीन shift /कालाव्यांमध्ये कार्यान्वीत करण्यात आलेले आहेत. त्या प्रमाणे सर्व विभागांनी एकत्रीतपणे कार्यवाही करावी. जेणेकरुन रायगड जिल्हयातील अवैध गौण खनिज उत्खनन व वहातुकीस पूर्णत: प्रतिबंध होइल.
३	पथकाची कार्य व कार्यपध्दतीची अंमलबजावणी	ज्या मंडळाच्या कार्यक्षेत्रात तपासणी नाके स्थापन करण्यात येणार आहेत, त्या संबंधित मंडळ अधिकारी सनियंत्रण अधिकारी म्हणून काम पहावयाचे आहे. तपासणी पथकाने खालीलप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षीत आहे. १) वाळू वाहतुक करणा-या वाहन चालकांकडून वाळू वाहतुकीबाबतचा वाहतूक पास तपासण्यात यावा. २) तपासणी अंती जर वाळूची अधिकृतपणे वाहतुक होत असल्याचे निदर्शनास आल्यावर त्याचे पंचनामे करण्यात यावा.

		वाहनाची तपासणी करताना/ गौण खनिज पंचनामा करताना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १०० प्रमाणे कार्यपध्दती पार पाडावी. अनधिकृत गौण खनिजाचे वजन नजीकच्या वजन काट्यावर करण्यात यावे. व त्याबाबतचा पंचनामा तसेच ट्रक चालकाचा जबाब घेण्यात यावा. ३) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४८ अन्वये व महाराष्ट्र जमिन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश २०१५ च्या कलम २ अन्वये कारवाई/ कार्यवाही करण्यात यावी. ४) अनिधिकृत रेती उत्खनन करत असल्याचे तपासणी अंती निष्पन्न झाल्यास खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम १९५७ च्या कलम २१ अन्वये गुन्हा तपासणी पथकातील संबंधीत तलाठी यांनी अवैध वाळू उत्खनन करणा-या व्यक्ती विरुध्द, ट्रक चालक/ ज्याच्या साठी वाळूची वाहतूक करण्यात येत आहे, ट्रक मालक, ज्यांनी अशा वाळूचे अवैध उत्खनन केलेले आहे त्यांच्या विरुध्द, खाण व खनिज (विकास व विनियम) अधिनियम १९५७ कलम २१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात यावा. ५) गुन्हा दाखल करण्यासाठी संबंधीत अधिकारी/ तलाठी यांना त्यांच्या अधिकारितेतील क्षेत्रात महसूल व वन विभागाच्या कलम २२ खालील दिनांक १० नोव्हेंबर २०१६ च्या अधिसूचनेद्वारे प्राधिकृत करण्यात आलेले आहे. ६) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४८ अन्वये गौण खनिजावर राज्य शासनाचा हक्क आहे. राज्य शासनाने गौण खनिजावरील हक्क कोणत्याही व्यक्तीला प्रदान केल्याशिवाय व त्याबाबतचे स्वामित्व शुल्क भरल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला अशा गौण खनिजाचे उत्खनन व वाहतूक करता येत नाही. अनधिकृतपणे गौण खनिजाचे उत्खनन करणे, वाहतूक करणे किंवा साठवणूक करणे, शासनाच्या मालकीची वस्तू/ विनाहक्क चोरी केल्यासारखी आहे. त्यामुळे अशा सर्व व्यक्ती विरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३७९ अन्वये चोरीचा गुन्हा दाखल करण्यात यावा. ७) मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम ११३ अन्वये क्षमतेपेक्षा अधिक भार (माल वाहतुक) वाहतुक करणा-या वाहनांना प्रतीबंध करण्यात आलेला आहे. मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १९४ अन्वये क्षमतेपेक्षा अधिक वाहन चालविल्यास दंडात्मक तरतुद करण्यात आलेली आहे. तपासणीमध्ये वाहनामधून क्षमतेपेक्षा जास्त गौण खनिजाची वाहतुक होत असल्याचे निदर्शनास आल्यावर संबंधित उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाला दुरध्वनी/ लेखी पत्राने (ई-मेल द्वारे) कळविण्यात यावे. उरण, पनवेल, कर्जत, खालापूर - उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल तसेच उर्वरित तालुके उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पेण यांना दुरध्वनीद्वारे माहिती देण्यात यावी. (२ Axle (सहा चाके) वाहनाची वाहन क्षमता १० टन (निव्वळ वजन) (अंदाजे २ ब्रास) तर ३ Axle(१० चाके) ची वाहन क्षमता १६ टन (अंदाजे ३ ब्रास पेक्षा जास्त))

वरील प्रमाणे बैठकिचे कामकाज पूर्ण होऊन बैठक समाप्त करण्यात आली.

जिल्हाधिकारी रायगड
तथा अध्यक्ष, अवैध उत्खनन प्रतिबंध
जिल्हास्तरिय समिती, रायगड-अलिबाग

१) शासन, महसूल व वन विभागाकडील वाळू/रेती निर्गतीबाबत धोरण, शासन निर्णय क्रमांक गौखनि-१०/२०१४/प्र.क्र.५००/ख दिनांक २१ म. २०१५
२) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४८
३) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार दि.१२/०६/२०१५
४) मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग मुंबई यांजकडील पत्र क्र.मशा/कार्या-९/गौखनि/यांत्रिक रेती लिलाव/२०१६-१७ दि.२५ जानेवारी २०१७
५) कार्यालयीन मंजूरी टिपणी. दिनांक ४/२/२०१७

क्र.खशा/गौख्र/अ.रेती उत्ख.वाह./पथक/२०१७
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड,
अलिबाग. दिनांक ६/२/२०१७

आदेश

रायगड जिल्हयातील अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीवर नियंत्रणासाठी क्षेत्रीय स्तरावर तपासणी नाके, भरारी पथके स्थापन करुन अवैध उत्खनन व वहातुकीवर कठोर कारवाई करण्याबाबत सर्व क्षेत्रीय महसुल व पोलिस अधिकारी यांना या कार्यालयाकडून वेळोवेळी सुचना देण्यात आलेल्या होत्या.

तथापि, जिल्हयातील अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक अदयापही चालू असल्याबाबत शासनाकडे, व वरिष्ठ स्तरावर विविध तक्रारी प्राप्त होत आहेत. रायगड जिल्हयात विशेषत: सावित्री नदी-बाणकोट खाडी, रेवदंडा खाडी-कुंडलिका नदी, काळ नदी नागांव- आक्षी, धरमतर, राजपूरी, दादर-रावे-वशेणी खाडी या पात्रामध्ये बहुतांशी ठिकाणी सक्शनपंपाव्दारे अवैध रेती उत्खनन होत असल्याच्या तक्रारी व वृत्तपत्रातुन बातम्या प्रसिध्द होत आहेत. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीमुळे शासनाच्या महसूलाचे मोठया प्रमाणात नुकसान होते. तसेच जनसामान्यांत यामुळे असंतोष निर्माण होऊन प्रशासनास जनतेच्या तीव्र नाराजीला सतत सामोरे जावे लागत आहे.

खाण व खनिज (विकास व विनियम) अधिनियम १९५७ च्या कलम २३ क (१) अन्वये राज्य शासनास अनधिकृत गौण खनिज उत्खनन वाहतूक व साठवणुक यावर प्रतिबंध करण्यासाठी नियम बनविण्याचे अधिकार आहेत. या नियमातर्गत अनधिकृतपणे उत्खनन केलेल्या गौण खनिजांच्या वाहतुकीला निबंध घालण्यासाठी तपासणी नाके स्थापन करणे संदर्भात नियम करण्याची तरतूद आहे.

रायगड जिल्हयातील अवैध गौण खनिज उत्खनन व वहातुकीस पूर्णत: प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून या संबधी प्रभावीपणे कारवाई करण्यासाठी संबधीत तहसिलदार/पोलिस निरीक्षक यांनी ११

तालुक्यातील खालील ठिकाणी तपासणी नाके दि.७/२/२०१७ पासून तीन shift /पाळ्यांमध्ये कार्यान्वीत करावेत.

अ.क्र.	तालुक्याचे नांव	तपासणी नाक्याचे ठिकाण
१.	महाड	टोळ बु.
२.	पोलादपूर	शिवाजी चौक
३.	म्हसळा	ओतेत
४.	रोहा	वाकण फाटा
५.	माणगांव	लोणेरे फाटा
६.	खालापूर	पाली फाटा
७.	अलिबाग	रेवदंडा बायपास
८.	पेण	वडखळ
९.	पनवेल	आपटेफाटा, गव्हाण, उलवे-ओवळे
१०.	कर्जत	कळंब, चार फाटा
११.	उरण	करळ फाटा, जासई

अ) तपासणी नाक्यांवर तपासणी करिता खालील संरचने प्रमाणे स्वतंत्र पथकांची नियुक्ती करावी.

१. तलाठी/ महसुल कर्मचारी, २. पोलिस कर्मचारी, ३. कोतवाल/शिपाई, ४. होमगार्ड

ब) सदर तपासणी नाक्यांवर तीन स्वतंत्र पथके प्रत्येकी ८ तास कालावधीसाठी (सकाळी ८.०० ते संध्याकाळी ४.००, संध्याकाळी ४.०० ते रात्री १२.००, रात्री १२.०० ते सकाळी ८.०० वाजेपर्यंत) कार्यान्वीत करण्यात यावीत.

क) उपविभागीय अधिकारी, तहसिलदार व संबंधीत मंडळ अधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील तपासणी नाके/पथकाचे संनियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहण्याचे आहे.

तपासणी पथकाने खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१) गौण खनिज वाहतुक करणा-या वाहन चालकांकडून वाहतुकीबाबतचा वाहतूक पास तपासण्यात यावा.

२) तपासणी अंती जर गौण खनिजाची अनधिकृतपणे वाहतुक होत असल्याचे निदर्शनास आल्यावर त्याबाबतचा पंचनामा करण्यात यावा. वाहनाची तपासणी करताना/ गौण खनिज पंचानामा करताना फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ च्या कलम १०० प्रमाणे कार्यपध्दती पार पाडावी. अनधिकृत गौण खनिजाचे वजन नजीकच्या वजन काट्यावर करण्यात यावे. व त्याबाबतचा पंचनामा तसेच ट्रक चालकाचा जबाब घेण्यात यावा.

३) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४८ अन्वये व महाराष्ट्र जमिन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश २०१५ च्या कलम २ अन्वये कारवाई/ कार्यवाही करण्यात यावी.

४) अनाधिकृत गौण खनिज उत्खनन करत असल्याचे तपासणी अंती निष्पन्न झाल्यास, खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम १९५७ च्या कलम २१ अन्वये गुन्हा, तपासणी पथकातील संबंधीत तलाठी यांनी अवैध गौण खनिज उत्खनन करणा-या व्यक्ती विरुध्द, ट्रक चालक/ ज्याच्या साठी गौण खनिज वाहतूक करण्यात येत आहे, ट्रक मालक, ज्यांनी अशा गौण खनिजांचे अवैध उत्खनन केलेले आहे त्यांच्या विरुध्द, खाण व खनिज (विकास व विनियम) अधिनियम १९५७ कलम २१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात यावा.

५) गुन्हा दाखल करण्यासाठी मंडळ अधिकारी/ तलाठी यांना त्यांच्या अधिकारितेतील क्षेत्रात महसूल व वन विभागाच्या कलम २२ खालील दिनांक १० नोव्हेंबर २०१६ च्या अधिसूचनेद्वारे प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

६) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४८ अन्वये गौण खनिजावर राज्य शासनाचा हक्क आहे. राज्य शासनाने गौण खनिजावरील हक्क कोणत्याही व्यक्तीला प्रदान केल्याशिवाय व त्याबाबतचे स्वामित्व शुल्क भरल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला अशा गौण खनिजाचे उत्खनन व वाहतूक करता येत नाही. अनाधिकृतपणे गौण खनिजाचे उत्खनन करणे, वाहतूक करणे किंवा साठवणूक करणे, शासनाच्या मालकीची वस्तू/ मिळकत चोरी केल्यासारखी आहे. त्यामुळे अशा सर्व व्यक्तींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३७९ अन्वये चोरीचा गुन्हा दाखल करण्यात यावा.

७) मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम ११३ अन्वये क्षमतेपेक्षा अधिक भार (माल वाहतुक) वाहतुक करणा-या वाहनांना प्रतीबंध करण्यात आलेला आहे. मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १९४ अन्वये क्षमतेपेक्षा अधिक वाहतुक केल्यास दंडात्मक तरतुद करण्यात आलेली आहे.

तपासणीमध्ये वाहनामधून क्षमतेपेक्षा जास्त गौण खनिजाची वाहतुक होत असल्याचे निदर्शनास आल्यावर संबंधित उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाला दुरध्वनी/ लेखी पत्राने (ई-मेल द्वारे) कळविण्यात यावे.

उरण, पनवेल,कर्जत, खालापूर, - श्री. आनंद पाटील, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल मो.नं. ७७९८३८४८४८ तसेच उर्वरीत तालुके उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पेण-श्री नवाब मुजावर, मो.नं. ८८८८५४४४११ यांना दुरध्वनीद्वारे माहिती देण्यात यावी.

(२ Axle (सहा चाके) वाहनाची वाहन क्षमता १० टन (निव्वळ वजन) (अंदाजे २ ब्रास) तर ३ Axle (१० चाके) ची वाहन क्षमता १६ टन (अंदाजे ३ ब्रास पेक्षा जास्त))

८) उपरोक्त कामात निष्काळजीपणा, दुलर्क्ष केल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतूदीनुसार शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केली जाईल.

९) वरील प्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दुस-या दिवशी सकाळी ११.०० वाजेपर्यंत या कार्यालयात दररोज सादर करावा.

(पी.डी.मलिकनेर)
अपर जिल्हाधिकारी रायगड

प्रत:- मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचेकडे माहिती व नियमोचित कार्यवाहीस्तव सादर.
प्रत:- मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडे माहितीसाठी सादर.
प्रत:- प्रत:- मा.पोलीस अधिक्षक, रायगड - अलिबाग यांचेकडे नियमोचित कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत:- प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल, यांचेकडे माहितीसाठी व नियमोचित कार्यवाहीसाठी.
प्रत:- उप प्रादेशिक परिवहन अधिकारी पेण, पनवेल यांचेकडे माहितीसाठी व नियमोचित कार्यवाहीसाठी
प्रत:- समादेशक, होमगार्ड, अलिबाग गोंधळपाडा यांचेकडे नियमोचित कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत:- उप विभागीय अधिकारी (सर्व) यांचेकडे नियमोचित कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत:- तहसिलदार (सर्व) यांचेकडे नियमोचित कार्यवाहीसाठी रवाना.
२/- सदर आदेशानुसार तपासणी पथक तातडीने कार्यान्वित करुन सदर आदेशाप्रमाणे अनुपालन अहवाल सादर करावा.

अपर जिल्हाधिकारी रायगड करीता

रत्नागिरी

जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे कार्यालय
तळ मजला (खनिकर्म शाखा), जयस्तंभ, रत्नागिरी ४१५६१२
फोन नं. ०२३५२-२२३६०२ फॅक्स नं. ०२३५२-२२६२५०
email - dmocortn@yahoo.com

क्र.खनिकर्म-२/लोकलेखा समिती/०५/२०१८
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी.
दिनांक :- १९/०५/२०१७

प्रति,
मा. प्रधान सचिव (महसूल)
महसूल व वनविभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

विषय :- लोकलेखा समितीचा सन २०१४-१५ मधील महसूली क्षेत्रावरील लेखापरिक्षा अहवालातील परिच्छेद क्रमांक ७.२.३.६, ७.२.३.७, ७.२.३.९

संदर्भ :- आपले पत्र क्र. गोखनि-१०/१०१७/प्र.क्र.४५७/ख दिनांक १४/०५/२०१८

महोदय,

उपरोक्त विषयान्वये लोकलेखा समितीने सन २०१४-१५ या वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालातील उपस्थित केलेल्या परिच्छेद क्रमांक ७.२.३.६, ७.२.३.७ व ७.२.३.९ च्या अनुषंगाने रत्नागिरी जिल्हयातील मुद्देनिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	परिच्छेद क्र.	महालेखापाल यांचे अभिप्राय	स्पष्टीकरण
१	७.२.३.७	As envisaged in GR dated 05/12/2015, whether Committee under the Chairmanship of Collector is formed in every District? The details of meeting conducted along with minutes of meetings may be furnished to PAC.	शासन निर्णय दिनांक ०५.१२.२०१५ च्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी व जिल्हा खनिकर्म अधिकारी यांची समिती गठीत करण्यात आलेली नाही. परंतु यापूर्वी शासन उदयोग व

			उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक २७/०७/२०१० अन्वये जिल्हास्तरीय समिती गठीत करणेत आलेली होती. सोबत दिनांक १६/०७/२०१४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त सादर करीत आहे.
२	७.२.३.६	1. Whether Sand Mining Approval and Tracking System (SMATS) has been implemented in the entire State? 2. Whether it has been ascertained that the SMATS is effective in detecting illegal/excess excavation of minor minerals. 3. Number of cases of illegal/excess excavation of minor minerals through SMATS may be intimated.	१. शासनाने दिलेल्या निर्देशानुसार रत्नागिरी जिल्हयामध्ये SMATS प्रणाली अवलंबण्यात आलेली नाही. तथापि त्याच धर्तीवर आधारीत इतर बारकोड युक्त व इतर सुरक्षा वैशिष्टे असलेले वाहतूक परवाने वापरण्यात येतात.
३	७.२.३.६	Government of India, Ministry of Environment, Forest and Climate Change vide its Notification dated 15.01.2016 had prescribed procedure for monitoring sand mining or river bed mining in Appendix-XII (ref. para 10 (iv). In this connection kindly state. 1. Whether the security features of Transport permit was implemented. 2. Whether the routes of vehicles from source to destination are being tracked through GPS	सन २०१४-१५ मध्ये रत्नागिरी जिल्हयात वाळू उत्खनन परवानगी देण्यात आलेली होती वाहतुकीसाठी परवानाधारकांना बारकोडयुक्त वाहतुक पासेस देणेत आलेले होते सदर वाहतुक पासची तपासणी करणेसाठी प्रत्येक तालुक्यात वाहतुक मार्गावर तपासणी करणेसाठी ०५ व्हेरिफिकेशन ऑफीसर नेमणेत आलेले होते. - नाही.
४	७.२.३.६	In respect of large size plots (more than 5 hectare), Kindly state. 1. How many lease sites were sanctioned	सन २०१७-१८ या कालावधीकरीता रत्नागिरी जिल्हयात सागरी किनारपट्टी

		wherein plot size is more than 5 hectares. 2. In how many of above sites CCTV camera. PC, Internet connection, power back-up etc. has been provided	क्षेत्रातील वशिष्टी नदी/दाभोळ खाडी, शास्त्री नदी/जयगड खाडी पात्रामध्ये महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी निश्चित केलेल्या खाडीपात्रातील वाळू/रेती गटापैकी यांत्रिकी पध्दतीने एकूण ०३ गटांना तसेच हातपाटी पध्दतीने वाळू उत्खननास मंजूरी देणेत आलेली आहे. वाळू/रेती वाहतुकीच्या मार्गावर एकूण १७ ठिकाणी चेकपोष्ट नाके, २४ X ७ CCTV Flood lights, Computer बसविणेत आलेले आहेत.
५	७.२.३.९	Action Taken on the cases of non -payment of stamp duty pointed out in the para may be stated to PAC	महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक १८.०३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार रत्नागिरी जिल्हयातील वाळूलिलावधारक/ हातपाटीधारक यांच्याकडून मुद्रांक शुल्काची आकारणी करणेत आलेली आहे.

उपरोक्त मुद्दयाची माहिती व संबधीत दस्तावेज पुढील कार्यवाहीस्तव सोबत सादर करीत आहे.

सहपत्र- वरीलप्रमाणे

१३.०५.१८

अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी करिता

प्रत - मा. विभागीय आयुक्त, कोकण भवन, नवी मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर

रत्नागिरी जिल्ह्यातील अवैध उत्खननास प्रतिबंध करण्यासाठी स्थापन केलेल्या जिल्हास्तरीय समितीची दिनांक १६/०७/२०१४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

रत्नागिरी जिल्ह्यातील अवैध उत्खननास प्रतिबंध करण्यासाठी स्थापन केलेल्या जिल्हास्तरीय समितीची बैठक मा. आर जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १६/०७/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात आली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

१) श्री. एस.एस. पाटील पोलीस उप अधिक्षक गृह यांचे प्रतिनिधी
२) श्री. सावंत एच.एम. बंदर अधिकारी रत्नागिरी यांचे प्रतिनिधी
३) श्री. ए.ए. लाड. विभागीय वन अधिकारी चिपळूण यांचे प्रतिनिधी
४) श्री. विनोद कुमार कृष्णण उपप्रादेशि परिवहन अधिकारी यांचे प्रतिनिधी
५) श्री. व्ही.बी. साळवे जिल्हा खनिकर्म अधिकारी रत्नागिरी

सर्व प्रथम जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी सभेकरीता उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांचे स्वागत करुन बैठकी विषयीची प्रस्तावना केली. तदनंतर मा.अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी मा. हरित न्यायाधिकरण पुणे यांचेकडील दिनांक २९/०५/२०१४ रोजी झालेल्या निर्णयाचे वाचन करुन त्यानुसार संबंधित विभागाने करावयाची कामे या विषयी सविस्तर माहिती दिली.

मुख्यत: सीआरझेड क्षेत्रातुन रेती/वाळूचे अनधिकृतपणे होणारे उत्खनन थांबविण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करणेचे बंदर अधिकारी रत्नागिरी यांचे प्रतिनिधीना सूचना देणेत आल्या. त्यानुसार मा. हरित न्यायाधिकरण पुणे यांनी दिलेल्या निर्णयानुसार तसेच त्यात नमुद केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. याबाबत बंदर अधिकारी रत्नागिरी यांना वरिष्ठ कार्यालयास सुधारणा प्राप्त करुन घेणे तसेच काही अडचणी असल्यास त्या याबाबत सविस्तर अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविणे व त्याची प्रत या कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक आहे जेणेकरुन या कार्यालयाकडुन शासनाकडे पाठपुरावा करणे शक्य होईल असे मा. अध्यक्षांनी सांगितले.

तसेच मा. हरित न्यायाधिकरण पुणे यांनी दिलेल्या निर्णयानुसार पोलीस विभागाने सीआरझेड क्षेत्रामध्ये होत असलेल्या अवैध उत्खननाबाबत आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने एफ.आय.आर दाखल करुन घेणे आवश्यक आहे अशी सुचना उप अधिक्षक गृह रत्नागिरी यांचे प्रतिनिधी यांना सूचना दिल्या.

गौणखनिज वाहतुक करणाऱ्या वाहनामध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात वाहतुक होत असेल त्या वाहनावर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत दंडात्मक कारवाई करणेत यावी तसेच सदर वाहनाचे लाडप्पांने आच्छादित केलेले नसल्यास योग्य ती कार्यवाही करणेबाबत मा. अध्यक्षांनी उपप्रादेशिक परिवहन यांचे प्रतिनिधी यांना सुचना दिल्या.

तसेच अवैध गौणखनिज उत्खनन/वाहतुकीवर महसुल विभागाकडे कार्यवाही करताना पोलीस विभाग व उपप्रादेशि परिवहन विभाग यांनी सहकार्य करावे. त्याचप्रमाणे दिनांक २३/०८/२०१३ रोजीच्या बैठकीमध्ये जी मुद्देनिहाय चर्चा झाली त्याच मुद्दयावर खनिजाचे अवैध उत्खनन/वाहतूक प्रकरणी समन्वयाने कार्यवाही करण्याचे योजिले. उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे निर्णय घेण्यात आले व सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे मा. अध्यक्षांनी जाहिर केले.

अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी

क्र. खनिकर्म/२/अवैध उत्खनन/बैठक/०७/२०१४
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
दिनांक: १६/०७/२०१४

सिंधुदुर्ग

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग
मुख्य प्रशासकीय इमारत, तळ मजला, दालन क्र. १२२, खनिकर्म शाखा, आरोस, सिंधुदुर्गनगरी- ४१६८१२
e-mail ID- misindhudurg@gmail.com

खनि/१३/२/२०१५

सिंधुदुर्गनगरी, दि. १७/१२/२०१५

प्रति,

१) मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग

२) मा. प्रादेशिक परिवहन अधिकारी, सिंधुदुर्ग

विषय- गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्याबाबत.

संदर्भ- महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग याचेकडील शासन निर्णय क्र. गौखनि-१०/०६१५/प्र.क्र.२८७/ख, दि. ०५/१२/२०१५

महोदय,

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी संदर्भिय शासन निर्णयान्वये गौण खनिजाचे अवैध उत्खनन ववाहतूकया संदर्भात प्राप्त तक्रारींच्या अनुषगाने सर्व संबंधित विभांचा परिणामकारक समन्वय साधण्यासाठी आणि अनधिकृत उत्खनन व वाहतूकीशी संबंधित अपप्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे. सदर समितीची रचना खालील प्रमाणे आहे.

१) जिल्हाधिकारी - अध्यक्ष
२) मा. जिल्हा पोलीस अधिक्षक - सदस्य
३) मा. प्रादेशिक परिवहन अधिकारी - सदस्य
४) जिल्हा खनिकर्म अधिकारी - सदस्य सचिव

सदर समितीची प्रथम बैठक शनिवार दि. १९/१२/२०१५ सायंकाळी ४.०० वा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे दालनात आयोजीत करण्यात आलेली आहे. तरी सदर बैठकीस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

जिल्हा खनिकर्म अधिकारी, सिंधुदुर्ग

सोमवार दि. २१/१२/२०१५ रोजी गौण खनिज अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी झालेल्या जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. गौखनि-१०/०६१५/प्र.क्र.२८७/ख, दि. ०५/१२/२०१५ अन्वये मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठित करण्यात आलेली आहे. सदर समितीची प्रथम बैठक सोमवार दि. २१/१२/२०१५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे दालनात पार पडली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

१) मा. जिल्हाधिकारी	- अध्यक्ष
२) मा. जिल्हा पोलीस अधीक्षक	- सदस्य
३) मा. प्रादेशिक परिवहन अधिकारी	- सदस्य
४) जिल्हा खनिकर्म अधिकारी	- सदस्य सचिव

वरील उपस्थित सर्वांचे स्वागत करून बैठकीच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली. त्यामध्ये जिल्ह्यातील अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील यावर चर्चा करण्यात आली. तसेच सद्यस्थितीत प्राप्त असलेल्या अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीबाबतच्या तक्रारी, निवेदने यांचा आढावा घेण्यात आला. अवैध गौण खनिज वाहतुकीस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने वाहतुकीचे अतिरिक्त नियन, अटी व शर्ती प्रस्तावित करण्याबाबत ठरविण्यात आले. तसेच एखाद्या वाळूने भरलेल्या गाडीचे वजन नजीकच्या उपलब्ध वजनकाट्यावर तपासण्याबाबत ठरविण्यात आले. एखाद्या प्रकरणात गाडीचे वजन १० टनापेक्षा जास्त आढळल्यास प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना कळवण्यात यावे व त्यानुसार त्यांचेकडून पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल. वाहनाची तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना तपासणीची कार्यवाही करताना कोणीही अडथळा आणल्यास त्यावर मा. जिल्हा पोलीस अधीक्षक यांना कळवण्यात यावे व त्यानुसार त्यांचेकडून पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल असे ठरविण्यात आले. तसेच अवैध वाहतूक प्रकरणी गाडी पकडल्यावर महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचेकडील दि. १२/०६/२०१५ रोजीच्या अधिसूचनेन्वये व महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचेकडील दि. २१/०५/२०१५ रोजीच्या वाळू/रेती निर्गती धोरणानुसार कार्यवाही करावी. वाहतूकदाराने योग्य त्या दंडाची रक्कम शासनजमा केल्यावर वाहन तात्काळ सोडून देण्यात यावे असे बैठकीमध्ये ठरविण्यात आले.

ठिकाण- ओरोस, सिंधुदुर्गनगरी
दिनांक- २२/१२/२०१५

(अनिल अंडारी)
जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग

प्रत- १) मा. जिल्हा पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांजकडे.
२) मा. प्रादेशिक परिवहन अधिकारी, सिंधुदुर्ग यांजकडे.

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग
मुख्य प्रशासकीय इमारत, तळ मजला, दालन क्र. १२२, खनिकर्म शाखा, ओरोस, सिंधुदुर्गनगरी- ४१६८१२
E-mail ID- misindhudurg@gmail.com

दि. २/९/२०१६ रोजी जिल्ह्यातील प्रमुख खनिजाच्या वाहतुकीमुळे उद्भवणाऱ्या समस्यांवर तोडगा काढण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग येथे मा. जिल्हाधिकारी महोदय यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रमुख खनिजाच्या वाहतुकीमुळे वाढत्या अपघातांचे प्रमाण, स्थानिक लोकांच्या तक्रारी तसेच भविष्यात उद्भवू शकणाऱ्या संभाव्य धोक्यांचा विचार करून सदर परिस्थितीस आळा घालण्यासाठी दि. २/९/२०१६ रोजी मा. जिल्हाधिकारी महोदय यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग येथे बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

1) मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग -अध्यक्ष
2) मा. पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग -सदस्य
3) मा.उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सिंधुदुर्ग -सदस्य
4) जिल्हा खनिकर्म अधिकारी -सदस्य सचिव

सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून बैठकीस सुरुवात करण्यात आली. सभेमध्ये आरोंदा, रेडी, कळणे, बांदा, साटेली तर्फ सातार्डा, मळगाव, मळेवाड या भागातून होणाऱ्या खनिज वाहतुकीवर निर्बंध आणणेच्या दृष्टीने व अपघातांचे प्रमाण कमी होऊन स्थानिक जनतेस, ग्रामस्थांस उपद्रव होणार नाही या दृष्टीने करावयाच्या उपाययोजनाबाबत अडावा घेणेत आला, तसेच स्थानिक लोकांकडून प्रमुख खनिजाच्या वाहतुकीवर प्राप्त झालेल्या तक्रार अर्जावर तसेच इतर संबंधित बाबींवर चर्चा करण्यात आली व चर्चेअंती खाली नमूद केलेल्या अटीच्या अधीन राहून प्रमुख खनिजाची वाहतूक करणेबाबतच्या सूचना अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

1) प्रत्येक खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनाचा/ डंपरचा वेग ताशी ४० कि.मी. ठेवणे बंधनकारक आहे.
2) सर्व खाणपट्टाधारकांनी प्रत्येकी १ स्पीडगन याप्रमाणे एकूण ४ स्पीडगन उपलब्ध करून द्याव्यात.
3) सर्व खाणपट्टाधारक यांनी त्यांचे खाणपट्ट्यातील वाहतूक करणाऱ्या वाहनांची/ वाहनचालकांची योग्य माहिती R.T.O. कार्यालयात देणे बंधनकारक आहे.
4) खनिज वाहतूकीच्या वेळेबाबत रात्री ~~८.००~~ १०.०० ते सकाळी ~~६.००~~ ७.०० या कालावधीमध्ये वाहतूक ही पूर्णतः बंद ठेवणेत यावी.
5) खनिजवाहतूक मार्गावरील सर्व शाळा/ महाविद्यालये यांचा सर्व्हे करून शाळा भरण्याची व सुटण्याची वेळ याबाबत माहिती संकलीत करून घ्यावी व त्यानुसार शाळा भरण्याच्या अगोदर अर्धा तास व शाळा सुटल्यावर अर्धा तास या मार्गावरील खनिज वाहतूक पूर्णतः थांबविण्यात यावी.

6) वाहतूक करणारे डंपर हे खनिजाची ओव्हरलोड वाहतूक करणार नाहीत याकडे जातीनिशी लक्ष पुरवावे.
7) खाणपट्टाधारक यांनी वाहतूक करणारे वाहन हे क्लिनींग करून वाहतूकीस उपलब्ध करून द्यावे.
8) पेशर हॉर्न वाहनांवर वसवू नयेत. मोटार वाहन कायद्यातील तरतूदीनूसार हॉर्नचा वापर करावा.
9) मुख्यत्वेकरून शाळा/ महाविद्यालये असलेल्या ठिकाणी स्पीडब्रेकर बसवावे व त्यास रात्रकालीन मार्कींग करणेत यावे.
10) सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांवर सूचना दर्शविणारे फलक ठिकठिकाणी उभारावेत व त्यांची निगा राखावी.
11) महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ मधील रोखशन २४९ नुसार प्रत्येक गाडीचालकावरोबर किमान १ क्लीनर (Attendant) असणे बंधनकारक आहे.
12) खनिजवाहतूक मार्गावरील सर्व शाळा/ महाविद्यालये भरण्याच्या व सुटण्याच्या वेळेच्या दृष्टीने सोमवार ते शुक्रवार पर्यंत सकाळी १० ते १०.४५ व सायंकाळी ४.३० ते ५.१५ तसेच शनिवारी सकाळी ७ ते ८.४५ व सकाळी १०.१५ ते ११ या कालावधीत वाहतूक पूर्णत: बंद ठेवावी.

वरील प्रमाणे घालून दिलेल्या नियमांची तातडीने नोंद घेवून त्याचे काटेकोरपणे पालन करणेची दक्षता सर्व संबंधित यंत्रणेनी तसेच सर्व प्रमुख खाणपट्टेधारकांनी घ्यावी. सदर बाबींचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग

प्रत-
1) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सिंधुदुर्ग यांना माहितीसाठी.
2) पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग यांना माहितीसाठी.
3) उपविभागीय अधिकारी (महसूल), सावंतवाडी यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
4) उप विभागीय पोलीस अधिकारी, सावंतवाडी यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
5) तहसिलदार सावंतवाडी , वेंगुर्ला व दोडामार्ग यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
6) पोलीस निरीक्षक वाहतूक शाखा, पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
7) पोलीस स्टेशन सावंतवाडी/वेंगुर्ला/दोडामार्ग प्रतिनिधी यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

Signature valid
Digitally signed by Uday G Chaudhari
Date: 2016.11.09 12:04:07 IST
Reason: Approved

नाशिक

मा.जिल्हाधिकारी,नाशिक यांचे अध्यक्षतेखाली गौणखनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

स्थळ :- जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक दिनांक ४/२/२०१६ वेळ सकाळी ११:०० वा.

महसूल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.गौखनि/१०/०६१५/प्र.क्र.२८७/ख दि.५ डिसेंबर २०१५ अन्वये जिल्हास्तरावर अवैध गौणखनिजाच्या वाहतुकीस आळा घालण्यासाठी समिती गठीत करण्यात आली असुन सदर समितीची बैठक मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली अवैध गौणखनिज वाहतुक संदर्भात आज दि.४/२/२०१६ रोजी सकाळी ११:०० वा. बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस जिल्हाधिकारी कार्यालयातील श्री.कान्हुराज बगाटे, अपर जिल्हाधिकारी नाशिक, श्री.गणेश राठोड, जिल्हा खनिकर्म अधिकारी, उपस्थित होते तसेच इतर विभागाचे खालील प्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

अ.क्र.	उपस्थित अधिकारी	कार्यालयाचे नांव
१	श्री.जी.आर.चौधरी,सहा.पोलीस आयुक्त,	पोलीस आयुक्त, कार्यालय नाशिक
२	श्री.दुर्गेश तिवारी, सहा.पोलीस निरीक्षक	जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक
३	श्री.जी.डी.डगळे, सहा.प्रादेशिक परिवहन अधिकारी	प्रादेशिक परिवहन कार्यालय नाशिक
४	श्री.पी.आर.चांदोरकर, सहा.सरकारी अभियोक्ता	नाशिक जिल्हा सरकारी अभियोक्ता, कार्यालय नाशिक

१) अनाधिकृत गौणखनिज उत्खनन व वाहतुकी संदर्भातील गुन्हा दाखल झालेले वाहने न्यायालयातुन सुटतात. अशी वाहने कोणत्या सबबी खाली न्यायालयातुन सुटतात, याबाबत जिल्हा सरकारी वकील यांनी खात्री करुन अहवाल सादर करावा.

२) ज्या गौणखनिजाच्या केसेसचे निकाल शासनाच्या विरुध्द गेले आहेत. अशा केसेस बाबत न्यायालयात पुर्नविलोकन अर्ज दाखल करावेत. सदर केसेस कोणत्या मुद्दा अभावी दाखकुवत होतात याबाबतची माहिती व सदर केसेस कशा प्रकारे परिपुर्ण होतील याबाबत तरतुदी तपासून तसा अहवाल स.सरकारी वकील यांनी सादर करावा.

३) अनाधिकृत गौणखनिजाची वाहने पकडल्यास सदर वाहन चालकांचे परवाने प्रादेशिक परिवहन विभागाने निलंबीत करणे आवश्यक आहे.

४) एकदा पकडलेले वाहन पुन्हा दुस-यांदा पकडले तर सदर वाहनाचे वाहन नोंदणी (Vehicle Registration) रद्द करावे.

५) नवीन गाडी विनाक्रमांकाची रस्त्यावर येते. तसेच विनाक्रमांकाच्या व-याच गाड्या अनाधिकृत गौणखनिज वाहतुक करतात. अशा विना क्रमांकाच्या वाहनावर परिवहन विभागाकडुन कार्यवाही होत नाही. तरी अशी वाहने शोधुन अशा वाहनांच्या बाबतीत तात्काळ योग्य ती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

६) शहरात व शहराबाहेर जिल्हयात बरेचसे जुने ट्रक आहेत. या जुन्या ट्रक बाबत परिहवन विभागाने तात्काळ सर्वे करुन जुन्या ट्रक बाबत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

७) वरील बाबतची कार्यवाही परिवहन विभागाने वेबसाईटवर व वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करावी.

८) पिंपळगांव बसवंत येथे ११ वाहने अनाधिकृत गौणखनिजाच्या बाबतीत पोलीस स्टेशनला जमा केलेली असुन सदर वाहनांच्या बाबतीत प्रादेशिक परिवहन विभागास या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-१५/गौखनि/२१/१६ दि.२३/१/२०१६ अन्वये योग्य ती कार्यवाही करुन अहवाल सादर करणे बाबत कळविले होते. परंतु सदर विभागाकडुन वेळेवर अहवाल प्राप्त न झाल्याने मा.पिंपळगांव न्यायालयात सदर वाहनांच्या बाबत अहवाल सादर करता आला नाही. तरी परिवहन विभागाने सदरचा अहवाल तात्काळ सादर करावा.

९) मौजे सारुळ ता.जि.नाशिक येथील गुन्हयातील यंत्रसामुग्री गुन्हा दाखल झाल्याने पोलीस स्टेशनच्या अधिकारी/कर्मचारी यांनी पोलीस स्टेशनला घेऊन जाणेबाबत पोलीस अधीक्षक, ग्रामीणचे प्रतिनीधी यांना सांगीतले. त्याच प्रमाणे यापुढे दाखल गुन्हयातील मुद्देमाल पोलीसांनी तात्काळ ताब्यात घेणे आवश्यक आहे.

१०) गौणखनिजाच्या भरारी पथकास वेळोवेळी पोलीस बंदोबस्त मागणीप्रमाणे पुरविण्यात यावा.

इत्यादी विषय तसेच सदरची कार्यवाही प्रभावीपणे होणेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच समितीची पुढील आढावा बैठक दि.१२/२/२०१६ रोजी दुपारी ४:०० वा. घेण्यात येईल असे मा.जिल्हाधिकारी यांनी समितीमधील सर्व सदस्यांना सांगीतले. व सभा संपल्याचे जाहीर केले.

जिल्हाधिकारी नाशिक करीता

(स्थळप्रतिवर मा.जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे)

जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक
क्र.कक्ष-१५/२/कावि/३२ /२०१६
नाशिक दिनांक ८ /२/२०१६

प्रती :- १) पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त कार्यालय नाशिक
२) जिल्हा पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक
३) प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय नाशिक
४) सरकारी अभियोक्ता, नाशिक जिल्हा सरकारी अभियोक्ता कार्यालय नाशिक

जिल्हाधिकारी नाशिक करीता

(स्थळप्रतिवर मा.जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे)

मा.जिल्हाधिकारी,नाशिक यांचे अध्यक्षतेखाली गौणखनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

स्थळ :- जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक दिनांक १२/२/२०१६ वेळ दुपारी ४:०० वा.

मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली महसूल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.गौखनि/१०/०६१५/प्र.क्र.२८७/ख दि.५ डिसेंबर २०१५ अन्वये जिल्हास्तरावर गौणखनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्याबाबत आज दि.१२/२/२०१६ रोजी दुपारी ४:०० वा. बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस जिल्हाधिकारी कार्यालयातील श्री.कान्हुराज बगाटे, अपर जिल्हाधिकारी नाशिक, उपस्थित होते तसेच इतर विभागाचे खालील प्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

अ.क्र.	उपस्थित अधिकारी	कार्यालयाचे नांव
१	श्री.जी.आर.चौधरी,सहा.पोलीस आयुक्त,	पोलीस आयुक्त, कार्यालय नाशिक
२	श्री.बी.डी.कळसकर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी	प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय नाशिक
३	श्री.किशोर नवले, वरीष्ठ पो.निरीक्षक	स्थानिक गुन्हे अन्वेषन शाखा, नाशिक
४	श्री.एम.एन.पाटील,पोलीस निरीक्षक	वाहीव-हे पोलीस स्टेशन
५	श्री.पी.आर.चांदोरकर, सहा.सरकारी अभियोक्ता	नाशिक जिल्हा सरकारी अभियोक्ता, कार्यालय नाशिक

दि.४/२/२०१६ रोजी झालेल्या विषयाबाबत आढावा घेण्यात आला, त्यानुसार प्रादेशिक परिवहन विभागाने काय कार्यवाही केली याबाबत माहिती तसेच डंपर/टिप्पर प्रकारातल्या वाहनांची दि.११/२/२०१६ पर्यंत यादी सादर केली तसेच सहाय्यक सरकारी वकील यांनी अर्ज क्रमांक १६/२०१६ C.R.No.५/१६ वाडीव-हे पोलीस स्टेशनला दाखल झालेल्या गुन्हयाबाबत सविस्तर माहिती दिली.

अनाधिकृत अवैध उत्खनन व वाहतुक रोखण्यासाठी वरील सर्व यंत्रणा यांनी एकत्रितपणे कार्यवाही करणे अपेक्षित असले बाबत मा.जिल्हाधिकारी यांनी सांगीतले. तसेच अशा केसेस मध्ये महसूल यंत्रणा, पोलीस यंत्रणा व परिवहन विभाग यांची प्रत्येक खात्याची संकेतीत अनाधिकृत वाहतुक करणा-या व्यक्तीवर व वाहनावर ठोस कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने गुन्हे दाखल करतांना परिपुर्ण पंचनाम्यानुसार एफआयआर दाखल करणे तसेच अशा कामी पोलीस विभागाने सहकार्य करावे. जेणेकरुन भविष्यात केसेस शासनाच्या विरुध्द जाणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. कारण यापुर्वी असे निदर्शनास आले आहे की, गुन्हे दाखल करुनही व अनाधिकृत गौणखनिजाची वाहने असतांनाही कोर्टाकडुन अशी वाहने सोडुन दिलेली आहेत. तसेच शासनाच्या विरुध्द निकाल गेलेले आहेत. भविष्यात अशा केसेस शासनाच्या विरुध्द जाणार नाहीत याबाबत

संबंधीत सर्व यंत्रणांनी परिपुर्ण कायदेशिर कार्यवाही करण्याची दक्षता घेतली पाहीजे. जेणेकरुन अनाधिकृत वाहतुक करणा-या वाहनावर, व वाहनाच्या मालकावर तसेच वाहन चालकावर सुध्दा कार्यवाही झाली पाहीजे. याबाबत दक्ष राहण्याबाबत सुचना देण्यात आल्या. तसेच सारुळ मधील दि.१०/१/२०१६ रोजी दाखल झालेल्या FIR No.१३/२०१६ मधील कोर्टाने सोडलेल्या ट्रक बाबत अपील दाखल करणेबाबत सरकारी वकील यांना निर्देशित करण्यात आले.

गौणखनिज कायद्यामध्ये पोलीस विभागाने अवैध गौणखनिज वाहतुकीच्या संदर्भात कार्यवाही करावी. असे असतांना पोलीस विभागाकडुन पाहिजे तशी कार्यवाही होत नाही. पोलीस विभागाने अशी कार्यवाही करणे अपेक्षित आहे. त्यानुसार गौणखनिजाच्या वाहनांची कशी तपासणी करावी याबाबत व दंडात्मक कार्यवाही बाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच अनाधिकृत गौणखनिजाची वाहने ताब्यात घेतल्यानंतर शहरातील ब-याच पोलीस स्टेशनला वाहने उभी करण्यासाठी पुरेशी जागा नसल्याने पोलीस आयुक्त कार्यालयाशेजारी असलेली मोकळी जागा सदर वाहने उभी करण्यासाठी देण्यात यावी असे सुचविण्यात आले.

गौणखनिजाच्या गाडयांना जीपीएस व आरएफआयडी यंत्रणा बसविणे आवश्यक आहे. जी.पी.एस.यंत्रणा व आरएफआयडी यंत्रणा वाहनांना बसविल्यास अनाधिकृत उत्खनन व वाहतुकीस आळा बसण्यास मदत होईल. त्याप्रमाणे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

अनाधिकृत गौणखनिजाचे वाहने तपासणी केल्यानंतर काही पथकांच्या असे निदर्शनास आले आहे की, वाहनांवर अपुर्ण क्रमांक असतात ब-याच वेळा वाहनांवर क्रमांक नसतात वाहन नंबर प्लेट काढुन टाकलेली असते. अशा वाहनांच्या बाबतीत, तसेच ओव्हरलोड गौणखनिज वाहतुक करणा-या वाहनांच्या बाबतीत प्रादेशिक परिवहन विभागाने कार्यवाही करण्याबाबत सुचना देण्यात आल्या तसेच दगड, माती, मुरुम,खडी,रेती इत्यादी गौणखनिज वाहतुक करणा-या वाहनांची माहिती परिवहन विभागाने शोध घेऊन सादर केल्यास अशी वाहने वारंवार गौणखनिज वाहतुक करतांना आढळल्यास अशा वाहनांच्या बाबत वाहन जप्त करणे, व वाहनाचा लिलाव करणे इत्यादी कारवाई करता येईल. त्यादृष्टीने परिवहन विभागाने सदरची माहिती सादर करावी.

तसेच जिल्हयातील प्रत्येक टोल नाक्यावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविलेले आहेत. त्यादृष्टीने संबंधीत टोलनाके कंपनीच्या अधिका-यांची बैठक घेण्यात येऊन सीसीटीव्ही कॅमेरे कव्हरेज पुरविण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याबाबत सुचित करण्यात आले. यामुळे गौणखनिजाची वाहतुक करणारी वाहने दिसुन येतील व त्यांची तपासणी करुन अवैध वाहतुक निदर्शनास आल्यावर संबधीतांवर कारवाई करणे सोईस्कर होईल.

अनाधिकृत गौणखनिजाच्या बाबत गुन्हे दाखल करतांना पोलीस स्टेशनला ब-याचवेळा तलाठी,मंडळ अधिकारी यांना बसुन रहावे लागते त्यामुळे गुन्हे दाखल करण्याच्या कार्यवाहीमध्ये वेळ वाया जातो. तरी यापुढे गुन्हे दाखल करतांना पोलीस विभागाने तलाठी, मंडळ अधिकारी यांना

सहकार्य करावे, याबाबत पोलीस विभागाने त्यांचे अधिनस्त जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनला सुचना द्याव्यात.

अनाधिकृत गौणखनिज उत्खनन व वाहतुकीबाबत संयुक्त कारवाई व दाखल झालेल्या केसेस शासनाच्या विरुध्द जाणार नाहीत त्यापध्दतीने गुन्हे दाखल करुन परिपुर्ण कायदेशीर कारवाई करण्याबाबत सुचना देण्यात आल्या. व सदरची मोहिम अधिक कार्यक्षम करण्याबाबत निर्णय घेण्यात येऊन सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

जिल्हाधिकारी नाशिक

जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक
क्र.कक्ष-१५/२/कावि/ /२०१६
नाशिक दिनांक /२/२०१६
प्रती :-

प्रती :- १) पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त कार्यालय नाशिक
२) जिल्हा पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक
३) प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय नाशिक
४) सरकारी अभियोक्ता, नाशिक जिल्हा सरकारी अभियोक्ता कार्यालय नाशिक
५) पोलीस निरीक्षक, वाहीव-हे पोलीस स्टेशन

जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे शासन निर्णय मकसूल व वनविभाग/गौखणि१८/२०१५/प्र.क्र. [illegible] दिनांक २६ जुन २०१५ व दिनांक १२ जुन २०१५ रोजीचा अध्यादेश तसेच तसतदारांना [illegible] वाहतुकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा दक्षता समिती तयार करणेत आली आहे. सदर समितीची दिनांक १५/७/२०१५ रोजीचे बैठकीचे इतिवृत्त.

स्थळ - जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक — १२/७/२०१५

जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी जिल्हा दक्षता समिती बैठक दिनांक १५/७/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता बैठक घेणेत आली. सदर बैठकीस अपर जिल्हाधिकारी नाशिक ,निवासी उपजिल्हाधिकारी नाशिक ,उपविभागीय (मुंढे) पोलिस निरीक्षक ,उपप्रादेशिक परीवहन अधिकारी नाशिक, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नाशिक यांचे प्रतिनिधि ,आयुक्त महानगरपालिका मा.नगरसेवक क.अभियंता , उपआयुक्त म.न.पा.नाशिक जिल्हाखनिकर्म अधिकारी उपस्थित होते.पोलिस अधिक्षक ग्रामीण,अपर जिल्हाधिकारी भारोसंगठ व अपर बैठकीस अनुपस्थित होते.

अपर जिल्हाधिकारी नाशिक यांनी शासन निर्णय मकसूल व वनविभाग/गौखणि१८/२०१५/प्र.क्र.२५८/ख दिनांक १५ जुन २०१५ व दिनांक १२ जुन २०१५ रोजीचा अध्यादेश अन्वये अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा दक्षता समिती तयार करणेत आली असुन सदरची समिती प्रभावी करण्यासाठी व येणाऱ्या अडचणी इत्यादीवर खालीलप्रमाणे चर्चा करणेत आली.

१) महापालिकेच्या कार्यक्षेत्रात सिंहस्थाची कामे चालु आहेत तसे कामांसाठी गौणखनिज वाहतुक करणा-या वाहनांवर सिंहस्थाचे काम बोर्ड लावुन वाहतुक केली जाते. अशावेळी वाहन त्यांच्या खाणगी कामासाठी सुद्धा गौणखनिजाची वाहतुक करतात. तरीस आदेशाचा गैरवापर वाहनांवर सुरुवात सिंहस्थाचे काम असा बोर्ड लावुन वाहतुक चालु असल्याचे आढळुन आल्यास जिल्हाधिकारी यांनी सांगितले.त्याचप्रमाणे आळा घालण्यासाठी महानगरपालिकेने व ठेकेदाराने ज्या ज्या कार्यक्षेत्रात काम चालु आहे त्या कार्यक्षेत्रास वेगळा तहसील कार्यालयाकडुन वाहतुक पासेस घ्यावेत व त्याचप्रमाणे वाहतुक करणारी वाहनांवर सुरुवात आल्या.तरीस किती वाहन कामासाठी किती रॉयल्टी वसुल झाली याबाबत महानगर पालिकेस अहवाल सादर करणेस सांगितले.

२) अनाधिकृत उत्खनन वाहतुकीबाबत परीवहन विभाग व महसुल विभाग या दोघांनी जिल्हास्तरावर कार्यवाही करणेबाबत शासनाचे आदेश आहेत. परीवहन विभागाने वाहन जप्तीबाबतची कार्यवाही चेतल्यानंतर त्यांची कार्यवाही करुन महसुल विभागाची माहितीसाठी वाहन मुख्य कार्यालयात पाठवुन दंड वसुल करणेस सांगितले. महसुल विभागाने अनाधिकृत वाहतुकीबाबत दोन वाहनांची कार्यवाही सुरु केलेली आहे.त्याप्रमाणे परीवहन विभागाने वाहने आरटीए कायदयानुसार जप्त केली त्याबर उपप्रादेशिक परीवहन अधिकारी यांनी आपली कार्यवाही चालु आहे. वाहने ठेवण्यासाठी जागेची अडचण असल्याचे सांगितले. त्यावर वाहने ठेवण्यासाठी जागा कमी आहे. आम्हाला जागा उपलब्ध करुन देण्याबाबत सांगितले.त्याबर वाहने ठेवी करण्यासाठी एस.टी. डेपोच्या जागेचा वापर करणेबाबत सुचना देणेत आल्या.

३) जिल्हा भरारी पथकाने वाहने ताब्यात घेतल्यानंतर पोलिसस्टेशनकडे जमा करावयाची असल्यास पोलिसस्टेशन सहकार्य करतात. परंतु डिझेलची ऑनपोस्टचे कर्मचारी व खाजगी पोलिसस्टेशन सहकार्य करतात. त्या पोलिसस्टेशनच्या हद्दीतील वाहने पोलिसांनी त्याच पोलिस स्टेशनला पाठवुन जमा करावीत वाहने ताब्यात घेण्यास नकार देतात.वाहने ही ज्या जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी निदर्शनास आणुन दिली त्यावर पोलिस उपयुक्त (मुंढे) यांचे प्रतिनिधी यांनी सदरबाबत सर्व पोलिसस्टेशनला सुचना देण्यात येतील असे सांगितले.

४) जिल्हा भरारी पथकावरोबर प्रादेशिक परीवहन कार्यालयातील एक अधिकारी नेमता येईल.

C:\Documents and Settings\Jai\Desktop\trainmasik tapasani.doc

निवासी उपजिल्हाधिकारी यांनी सुचविले परंतु उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी वाहनधारक/ अधिकारी देणे शक्य होणार नाही कारण आपले परिवहन निरीक्षक यांनी [illegible] ज्या वेळी भरारी पथकाचा फोन देईल त्यावेळी आपण अधिकारी म्हणून सहकार्य करणेबाबत सांगितले व संयुक्त कार्यवाही करण्याबाबत सुचना दिल्या.

५) उ प्रादेशिक परीवहन अधिकारी यानी वाहन ताब्यात घेतल्यानंतर ओव्हरलोडच्याबाबतीत आपली काय तपासण्या कराव्यात यावाबत निश्चित स्वरुपाची माहिती देणेबाबत सांगितले त्याबरोबर वाहतुक पास,Smsids प्रणाली नुसार टोकन क्रमांकाची खात्री तसेच वाहतुक परवान्यावर [illegible] इत्यादीबाबत खात्री करावी अशा सुचना देणेत आल्या त्याबर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यानी त्यानुसार आम्ही वाहने तपासण्याची कार्यवाही करु असे सांगितले.

अवैध उत्खनन व वाहतुकीसदर्भात महसुल , पोलिस व परीवहन विभागाचा आपसात समन्वय ठेवुन कार्यवाही करण्याबाबत सुचना दिल्या सदरची बैठक ही खनीज [illegible] बैठकीच्या वेळी नविन्यपुरात काय कार्यवाही झाली यावाबतच्या अहवालाबाबत सुचना देवुन अपर जिल्हाधिकारी नाशिक यानी सभा संपल्याचे जाहीर केले.

अपर जिल्हाधिकारी नाशिककरीता

जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक
क्र.कवा१५/गौख/कापि ८४/२०१५
दिनांक २४/७/२०१५.

प्रत :- १.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नाशिक
२.पोलिस अधिक्षक नाशिक ग्रामीण
३.पोलिस उपआयुक्त (मुख्य) नाशिक
४.उपप्रादेशिक परीवहन अधिकारी नाशिक
५.अपर जिल्हाधिकारी मालेगांव/नाशिक
६.आयुक्त म.न.पा.मालेगांव
७.उपायुक्त म.न.पा.नाशिक
[illegible]

अपर जिल्हाधिकारी नाशिककरीता

अहमदनगर

जिल्हाधिकारी कार्यालय , अहमदनगर

(गौण खनिज शाखा)

Email Address - ah.mngdmo@gmail.com Phone No.0241 - 2344002

क्र.गौख /कार्या 4क/722/2018.

अहमदनगर, दि. 18/05/2018

प्रति,

मा.अवर सचिव,
महसुल व वनविभाग,
मंत्रालय, मुंबई 32.

विषय: - लोकसेवा समितीचा सन 2014-2015 मधील महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवालातील परिच्छेद क्र.7,2,3,7.

संदर्भ - महसुल व वनविभाग मुंबई यांचेकडील पत्र क्र.गौखनि10/1017/सं.क्र.457/ख दिनांक 14/05/2018.

महोदय,

वरील विषयान्वये सविनय सादर करणेत येते की, संदर्भात नमुद पत्रान्वये सुचित करण्यात आलेल्या परिच्छेद क्र.7,2,3,7 माहीती खालीलप्रमाणे सादर करीत आहोत.

जिल्हयातील अवैध उत्खननास प्रतिबंध करण्यासाठीची समिती शासनाकडील उदयोग ऊर्जा व कामगार शासन निर्णय क्र.एमएनजी1005/प्र.क्र./867 ऊदयोग9 मंत्रालय मुंबई दिनांक 27/07/2010 अन्वये अहमदनगर जिल्हयाकरिता जिल्हास्तरीय समिती खालीलप्रमाणे स्थापन करण्यात आलेली आहे.

1. जिल्हाधिकारी - अध्यक्ष
2. जिल्हा पोलिस अधिक्षक - सदस्य
3. उपप्रादेशिक परीवहन अधिकारी नगर - सदस्य
4. उपप्रादेशिक परीवहन अधिकारी श्रीरामपूर - सदस्य
5. जिल्हा खनिकर्म अधिकारी - सदस्य सचिव

सदरच्या समितीची शेवटची बैठक दि. 26 फेब्रुवारी 2018 रोजी सपन्न झाली असुन सदर बैठकीचे ईतीवृत समवेत सादर केले आहे.

तसेच जिल्हयातील अनधिकृत उत्खनन व वाहतूकीवर महसूल पोलिस उपप्रपादेशिक परीवहन अधिकारी यांच्या संयुक्त पथकाने कारवाई करणेबाबत या कार्यालयाचे परीपत्रक क्र.गौख/4क/1428/2015 दि.26/11/2015 अन्वये पारीत करण्यात येउन त्या अनुषंगाने संयुक्त कारवाई करण्यात येत आहे.

आपला विश्वासु

सोबत - सहपत्र.

(राजेंद्र वाघ)

निवासी उपजिल्हाधिकारी अहमदनगर

शासन संदर्भ

P

दिनांक 1/04/2017 ते 31/3/2018 या कालावधीतील गौणखनिज स्वामित्वधन वसुली

तालुका	सन 2017-18 करीता उद्दिष्ट	माहे फेब्रुवारी 2018 अखेरची वसुली	माहे मार्च 2018 मधील वसुली	माहे मार्च 2018 अखेरची वसुली	टक्केवारी	बुक ॲडजस्टमेंट	एकुण
1	2	3		5	6	7	
नगर	1022.00	1365.46	5.47	1370.93	134.14	191.10	1562.03
नेवासा	460	305.42	42.40	347.82	75.61	174.50	522.32
पाथर्डी	460	233.30	1.12	234.42	50.96	76.59	311.01
शेवगांव	613	91.40	11.55	102.95	16.79	69.34	172.29
श्रीगोंदा	716	532.65	116.35	649.00	90.64	127.30	776.30
पारनेर	716	230.92	89.22	320.14	44.71	140.22	460.36
संगमनेर	1337	576.73	258.07	834.80	62.44	122.00	956.80
अकोले	511	247.45	2.47	249.92	48.91	159.91	409.83
कोपरगांव	818	207.27	282.73	490.00	59.90	77.00	567.00
राहाता	409	287.14	1.20	288.34	70.50	64.67	353.01
श्रीरामपूर	614	112.81	112.31	225.12	36.66	40.19	265.31
राहूरी	920	280.64	242.67	523.31	56.88	86.17	609.48
कर्जत	302	115.96	101.42	217.38	71.98	102.00	319.38
जामखेड	302	202.34	33.24	235.58	78.01	102.35	337.93
एकूण एकंदर	9200.00	4789.49	1300.22	6089.71	66.19	1533.34	7623.05

महसूल अधिकारी बैठक टिपणी माहे एप्रिल 2018

मुद्दा क्र 18

अवैध वाळू चोरी प्रकरणातील कारवाई व वसुली दिनांक 1/04/2017 ते दिनांक 31/03/2018

तालुका	माहे फेब्रुवारी 18 अखेर पकडलेली एकुण वाहने	माहे फेब्रुवारी 18 अखेर एकुण वसुली	माहे मार्च 2018 मध्ये पकडलेली वाहने	माहे मार्च 2018 मधील वसुली	माहे मार्च 2018 अखेर पकडलेली एकुण वाहने	माहे मार्च 2018 अखेर एकुण वसुली	पोलिस केसेस प्रकरणे	आरटीओ प्रकरणे
नगर	69	44.63	2	2.76	71	47.39	0	66
नेवासा	24	13.25	8	5.98	32	19.23	3	2
पाथर्डी	39	10.88	0	0	39	10.88	1	6
शेवगांव	38	13.9	1	0.51	39	14.41	3	9
श्रीगोंदा	137	61.33	5	7.01	142	68.39	34	0
पारनेर	71	56.47	6	17.99	77	74.46	5	0
संगमनेर	172	53.12	0	0	172	53.12	21	0
अकोले	16	9.24	6	2.46	22	11.7	1	0
कोपरगांव	67	48.81	5	0	72	48.81	62	72
राहाता	39	18.7	2	1.52	41	20.22	3	41
श्रीरामपूर	39	13.18	15	2.27	54	15.45	0	0
राहूरी	104	28.73	4	8.49	108	37.22	6	18
कर्जत	51	34.3	0	0	51	34.3	0	0
जामखेड	23	7.56	1	0	24	7.56	0	0
एकूण एकंदर	889	414.15	55	48.99	944	463.14	139	214

विषय - जिल्ह्यातील अनाधिकृत गौणखनिज उत्खनन व वाहतूकीवर महसूल / पोलीस / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांची संयुक्त जबाबदारीबाबत.

वाचले - 1) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, 1966 चे कलम 48
2) उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय, दि.27 जुलै, 2010.

जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर
परिपत्रक,
गौख/4क/1428/2015, दि.26/11/2015

जिल्ह्यातील अनाधिकृत गौणखनिज उत्खनन व वाहतूकीवर प्रभावीपणे कार्यवाही होत नसल्याचे दिसून आलेले आहे. याबाबत शासनाने वेळोवेळी महसूल, पोलीस व उप प्रादेशिक परिवहन यांनी संयुक्त कार्यवाही करणेकामी आदेशीत केलेले आहे. याबाबत शासन निर्णय, दि.27 जुलै, 2010 मध्ये अनाधिकृत गौणखनिजाचे उत्खनन व वाहतूक रोखणेकामी जिल्हास्तरीय समितीची रचना करण्यात आलेली आहे. त्यामध्ये महसूल, पोलीस, परिवहन अधिकारी आणि वन अधिकारी यांचा समावेश करण्यात येऊन या समितीने / विभागाने अनाधिकृत गौणखनिजाचे उत्खनन व वाहतूक रोखणेकामी संयुक्तीक जबाबदारीने काम करणे आवश्यक असल्याचे नमुद केलेले आहे. तथापी, महसूल, पोलीस आणि उप प्रादेशिक परिवहन हे एकत्रितपणे अनाधिकृत गौणखनिज उत्खनन व वाहतूकीवर कार्यवाही करीत नसल्याने गौणखनिजाची चोरी करणेचे धाडस मोठयाप्रमाणावर होत असल्याचे दिसून आलेले आहे.

अनाधिकृत गौणखनिजाचे उत्खनन व वाहतूक होत असलेचे अनेक तक्रारी जिल्हास्तरावर येतात, अनाधिकृत गौणखनिजाचे उत्खनन व वाहतूकीबाबत अनेक गोष्टी समोर आलेल्या आहेत. तथापी, संयुक्तीकपणे कार्यवाही न झालेने भूजलावर परिणाम होणे तसेच कायदा व सुव्यवस्थेवर त्याचा विपरीत परिणाम झालेला दिसून येत आहे. यामध्ये असेही दिसून आले आहे की, हेतूपुरस्कर रित्या कारवाई करणेचे टाळणे, जबाबदारी टाळल्याचे दिसून आलेले आहे.

उपरोक्त सर्व बाबींचे अवलोकन केले असता, महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, 1966 चे कलम 48, शासन निर्णय, दि.27 जुलै, 2010, शासन अध्यादेश, दि.12 जुन, 2015 इ. मध्ये दिलेल्या निर्देशानुसार, या परिपत्रकान्वये खालीलप्रमाणे कार्यवाही करणेबाबत सुचित करण्यात येत आहे.

1) अनाधिकृत गौणखनिज उत्खनन व वाहतूक रोखणेची जबाबदारी ही प्रत्येक विभागाच्या क्षेत्रिय अधिकारी यांची असून त्यामध्ये कोणीही हलगर्जीपणा केलेचे आढळून आलेस संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द प्रचलित नियमानुसार तसेच, शासकिय मालमत्तेची चोरीमध्ये सहभाग असल्याचे गृहीत धरण्यात येऊन शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

सदर अध्यादेशाचे पालन करणे आवश्यक आहे. (म्हणजेच दंडात्मक कार्यवाही करतांना पात्र पट दंडात्मक कार्यवाही करावी.)

3) गौणखनिज वाहतूकीचे वाहन पकडले गेलेनंतर सदरचे वाहनावरील कार्यवाही पुर्ण झालेनंतर सदरचे वाहनावर महसूल विभागामार्फत दंडात्मक कार्यवाही करणेसाठी सुपुर्त करावे.

4) महसूल विभागाने अनाधिकृत गौणखनिज वाहतूकीचे वाहन पकडले गेलेनंतर सदरचे वाहनावर प्रचलित नियमानुसार कार्यवाही करणेसाठी संबंधित अधिकारी यांनी पोलीस विभागाचे ताब्यात वाहन दिलेनंतर सदर वाहन पळून जाऊ नये, याची खबरदारी पोलीस विभागाने घ्यावी.

5) महसूल, पोलीस, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी समन्वय ठेवून प्रत्येक पंधरवाडयाला (दि.15 तारखेपर्यंतचा अहवाल दि.17 तारखेपर्यंत आणि 30 तारखेपर्यंतचा अहवाल दि.02 तारखेपर्यंत) त्यांनी त्यांचे विभागामार्फत केलेली कार्यवाहीबाबतचा अहवाल खालील प्रपत्रामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा.

दिनांक	वाहन क्रमांक	गौणखनिजाचा प्रकार (माती/मुरुम/दगड/वाळू)	गौणखनिजाचे परिमाण (ब्रास)	केलेली कार्यवाही (महसूल - दंड व जातमुचलका रक्कम/ पोलीस कारवाई / आरटीओ - दंड)

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नगर

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपूर

पोलीस अधीक्षक, अहमदनगर

जिल्हाधिकारी, अहमदनगर

प्रति,

1) पोलीस अधीक्षक, अहमदनगर,
2) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नगर,
3) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपूर,
4) उपविभागीय अधिकारी, सर्व,
5) तहसिलदार सर्व

2/- यांना सुचित करणेत येते की, सदरचे परिपत्रक आपले अधिकार कक्षेतील सर्व क्षेत्रिय अधिकारी यांना उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित करुन त्या संबंधिताचा अहवाल उपरोक्त प्रपत्रामध्ये नमुद केलेनुसार या कार्यालयाकडे सादर करावा.

जिल्हाधिकारी, अहमदनगर

जळगांव

दिनांक २०/०१/२०१५ रोजी जिल्हा परिवहन प्राधिकरण, जळगांव यांची ७ वी बैठक मा.अध्यक्ष जिल्हा परिवहन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी, जळगांव,यांचे दालनात बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीचे इतिवृत्त खालील प्रमाणे आहे.

सभेच्या अध्यक्षस्थानी मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा परिवहन प्राधिकरण जळगाव हे होते. सभेत अवैध गौण खनिज वाहतुक करणा-या वाहनांवर कारवाई करणेबाबत ठराव मंजुर करुन मा.अध्यक्षांनी पुढील प्रमाणे बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता दिली.

ठराव क्रमांक :- १) अवैध गौण खनिज वाहतुक करतांना आढळल्यास वाहनांवर मोटार वाहन कायदा १९८८ अधिनियम ८६ व ५३(१)(ब) नुसार विभागीय कारवाई करणेबाबत सभेत पुढील प्रमाणे ठराव मंजुर करण्यात आला.

अ.क्र	वाहनाचा प्रकार	विभागीय कारवाई		
		पहिला गुन्हा	दुसरा गुन्हा	तिसरा गुन्हा
१	ट्रॅक्टर / ट्रेलर व परिवहनेतर वाहने	६० दिवस नोंदणी निलंबन (वाहन जप्त केलेल्या जागेवर)	१२० दिवस नोंदणी निलंबन (वाहन जप्त केलेल्या जागेवर)	नोंदणी रद्द (वाहन जप्त केलेल्या जागेवर)
२	ट्रक ट्रेलर/डी व्हॅन/पी व्हॅन व परिवहन वाहने	६० दिवस परवाना निलंबन (वाहन जप्त केलेल्या जागेवर)	१२० दिवस परवाना निलंबन (वाहन जप्त केलेल्या जागेवर)	परवाना रद्द

निर्णय :- उपरोक्त ठरावास मान्यता दिली.

ठराव क्रमांक :- २) अवैध गौण खनिज वाहतुक करतांना विना नोंदणी आढळल्यास वाहनांवर मोटार वाहन कायदा १९८८ अधिनियम ८६ व ५३(१)(ब) नुसार विभागीय कारवाई करणेबाबत सभेत पुढील प्रमाणे ठराव मंजुर करण्यात आला.

अ.क्र	वाहनाचा प्रकार	विभागीय कारवाई		
		पहिला गुन्हा	दुसरा गुन्हा	तिसरा गुन्हा
१	ट्रॅक्टर / ट्रेलर व परिवहनेतर वाहने	१२० दिवस नोंदणी निलंबन (वाहन जप्त केलेल्या जागेवर)	१२० दिवस नोंदणी निलंबन (वाहन जप्त केलेल्या जागेवर)	नोंदणी रद्द (वाहन जप्त केलेल्या जागेवर)
२	ट्रक/ट्रेलर/डी व्हॅन/पी व्हॅन व परिवहन वाहने	१२० दिवस परवाना निलंबन (वाहन जप्त केलेल्या जागेवर)	१२० दिवस परवाना निलंबन (वाहन जप्त केलेल्या जागेवर)	परवाना रद्द

निर्णय :- उपरोक्त ठरावास मान्यता दिली.

ठराव क्रमांक :- ३) अवैध गौण खनिज वाहतुक करतांना बेकायदेशीर रित्या जोडणी (फॅब्रीकेशन) ट्रॅक्टर वाहतुक करतांना आढळल्यास वाहनांवर मोटार वाहन कायदा १९८८ अधिनियम ८६ व ५३(१)(ब) नुसार विभागीय कारवाई करणेबाबत सभेत पुढील प्रमाणे ठराव मंजुर करण्यात आला.

अ.क्र	वाहनाचा प्रकार	विभागीय कारवाई
१	ट्रेलर	वाहन भंगार करुन ताब्यात देणे

निर्णय :- उपरोक्त ठरावास मान्यता दिली.

21/11/15

शासकीय सदस्य
जिल्हा प्रादेशिक परिवहन प्राधिकरण
तथा पोलीस अधीक्षक, जळगांव

अध्यक्ष
जिल्हा प्रादेशिक परिवहन प्राधिकरण,
तथा जिल्हाधिकारी, जळगांव

सदस्य सचिव
जिल्हा प्रादेशिक परिवहन प्राधिकरण
तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
जळगांव

परिशिष्ट-2

अहमदाबाद जिल्हा-तालुकावार माहे 31 मार्च - 2015 अखेर जप्त करण्यात आलेल्या अवैध उत्खनन व वाहतुकीचे मासिक वसुलीचे माहिती.

अ. क्र.	तालुका	मागील महिन्यातील प्रलंबित वसुली (फेब्रुवारी- 2015)										चालू महिन्यात झालेली वसुली (31 मार्च - 2015 अखेर)										चालू महिना अखेर झालेली एकूण वसुली (31 मार्च - 2015 अखेर)									
		रेती		माती		खनिज		मुरूम		दंडाची		रेती		माती		खनिज		मुरूम		दंडाची		रेती		माती		खनिज		मुरूम		दंडाची	
		प्र.सं.	रक्कम	प्र.सं.	रक्कम	प्र.सं.	रक्कम	प्र.सं.	रक्कम	प्र.सं.	रक्कम	प्र.सं.	रक्कम	प्र.सं.	रक्कम	प्र.सं.	रक्कम	प्र.सं.	रक्कम	प्र.सं.	रक्कम	प्र.सं.	रक्कम	प्र.सं.	रक्कम	प्र.सं.	रक्कम	प्र.सं.	रक्कम	प्र.सं.	रक्कम	प्र.सं.	रक्कम
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13	14	15	16	17	18	19	20	21	22	23	24	25	26	27	28	29	30	31	32
1	अहमदाबाद	10	64000	39	223540	146	1930950	75	258450	279	2476940	0	0	2	6400	52	531900	2	12000	56	550300	19	64000	41	229940	198	2462850	77	268450	325	3025330
2	धोलेरा	8	30920	3	7320	77	1028500	14	69150	102	1136890	0	0	0	0	20	416000	0	0	20	416000	8	30920	3	7320	97	1444500	14	69150	122	1551890
	दस्क्रोइ अहमदाबाद	27	94920	42	230860	223	2959450	89	327600	381	3610830	0	0	2	6400	72	947900	2	12000	76	966300	27	94920	44	237260	295	3907350	91	337600	457	4577730
3	सणंदमां	22	196000	11	34750	75	1270300	9	50400	117	1551450	0	0	0	0	11	196000	1	3200	12	199200	22	196000	11	39700	86	1467050	10	53600	129	1756350
4	एंडोल	7	50732	6	18500	78	2134747	26	147460	117	2351439	1	3200	0	0	16	247200	0	0	17	250400	8	53932	6	18500	94	2381947	26	147460	134	2601839
5	धनेरा	7	17000	42	116000	58	1071190	58	138200	165	1342890	0	0	1	3200	13	237650	1	6200	16	247050	7	17000	43	119260	101	1308840	59	144960	190	1589940
	दस्क्रोइ एंडोल	36	258332	59	174200	241	4476347	73	316660	409	5225429	1	3200	1	3200	40	681400	2	9400	44	697200	37	251532	60	177400	281	5157747	75	323960	453	5922639
6	मुलायढ	25	290206	65	236565	40	803500	18	132790	148	1463061	0	0	6	80000	12	234200	0	0	18	314200	25	290206	71	316565	52	1037700	18	132790	166	1777261
7	ढोलका	12	40380	0	0	2	21400	6	89895	20	151675	0	0	0	0	0	0	0	0	0	0	12	40380	0	0	2	21400	6	89895	20	151675
8	मुन्नार	6	21600	26	86710	35	178580	18	66680	85	353570	7	97600	0	0	0	0	3	66000	10	163600	13	119200	26	86710	35	178580	21	132680	93	517170
	दस्क्रोइ धुलायढ	43	352186	91	323275	77	1003480	42	289565	253	1968306	7	97600	6	80000	12	234200	3	66000	28	477800	50	449786	97	403275	89	1237680	45	355365	281	2446106
9	राजा	9	59000	160	775000	216	945000	41	293000	465	2072000	0	0	23	105000	13	840000	2	13000	38	958000	9	59000	222	875000	229	1028880	43	308000	503	2234880
10	देत्रोज	8	82710	136	459150	34	577800	18	198310	196	1318270	1	3230	7	29010	3	40460	0	0	11	81700	9	85940	143	488400	37	622260	18	198310	207	1399970
	दस्क्रोइ फैजपुर	17	141710	355	1252450	250	1522800	59	493310	681	3390270	1	3230	30	134010	16	133460	2	13000	49	283700	18	144940	365	1386460	266	1656260	61	506310	710	3673970
11	अमरेली	18	98900	10	50000	113	1273400	42	322000	183	1750300	0	0	0	0	15	157500	25	122000	40	279500	18	98900	10	50000	128	1431000	67	444000	223	2029900
12	बगसरा	28	166800	89	453500	122	1105500	6	44200	245	1771200	1	10200	5	21900	10	72000	0	0	16	104100	29	176800	94	475400	132	1177500	6	80200	261	1875300
	दस्क्रोइ अमरेली	46	265500	99	503600	235	2378900	48	366200	428	3521500	1	10200	5	21900	25	229600	25	122000	56	383800	47	275700	104	531400	260	2608860	73	420260	484	3836300
13	धारी	7	185290	34	108590	71	1145950	26	87600	138	1527970	0	0	4	12880	8	94920	8	25800	20	133600	7	185290	38	120590	79	1240850	34	113520	158	1661350
14	खांभा	4	9020	0	0	98	1810000	65	198000	165	2017020	3	14000	24	130000	32	420000	5	19000	64	583000	8	23020	24	123000	130	2210000	65	217000	230	2573020
	दस्क्रोइ धारी	11	194290	34	108590	169	2955950	89	285600	303	3544970	3	14000	28	142880	40	514920	13	44800	84	716600	15	208290	62	243890	209	3450850	102	330520	388	4231350
15	40 गाम	36	413660	25	153300	89	1495350	68	344420	218	2406730	2	6400	0	0	17	298630	15	60020	34	365050	38	420060	25	153300	106	1793980	83	404440	252	2771780
	दस्क्रोइ 40 गाम	36	413660	25	153300	89	1495350	68	344420	218	2406730	2	6400	0	0	1	298630	15	60020	34	365050	38	420060	25	153300	106	1793980	83	404440	252	2771780
	एकूण	215	1723598	485	2751675	1184	15792257	468	2433143	2352	23700673	16	136630	78	561310	222	3036110	62	327280	378	5061330	232	1858228	737	5112985	1506	19818367	530	2750395	3025	27539975

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन 2014-15 या वर्षाच्या महसुली क्षेत्रावरील लेखापरिक्षण अहवाल जिल्हा धुळे

अ. क्र.	सन	परिच्छेद	महालेखापाल यांचे अभिप्राय	स्पष्टीकरण
1.	2014-15	7.2.3.7	1. As envisaged in GR dated 05/12/2015 whether Committee under the Chairmanship of Collector is formed in every district? 2. The details of meetings conducted along with minutes of meeting may be furnished to PAC.	महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र.गौखनि/10/0615/प्र.क्र.287/ख दि. 5/12/2015 अन्वये जिल्हाधिकारी, धुळे यांचे अध्यक्षतेखाली गौण खनिजाचे अवैध उत्खनन/वाहतूक व गौण खनिज अनधिकृतपणे साठवणुकी बाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने सर्व संबंधित विभागांचा परिणामकारक समन्वय साधण्यासाठी आणि अनधिकृत उत्खनन व वाहतुकीशी संबंधित अपप्रवृत्तीवर नियत्रंण ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली धुळे जिल्हयात समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर समितीची जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दि. 28/12/2017 रोजी बैठक घेण्यात आली असून सदर बैठकीचे इतिवृत्त यासोबत सादर करण्यात आलेले आहे.

(डॉ. अरविंद अंतुलीकर)
प्र. अपर जिल्हाधिकारी, धुळे

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन 2014-15 या वर्षाच्या महसुली क्षेत्रावरील लेखापरिक्षण अहवाल जिल्हा धुळे

अ. क्र.	सन	परिच्छेद	महालेखापाल यांचे अभिप्राय	स्पष्टीकरण
1.	2014-15	7.2.3.9	1. Action Taken on the cases of non-payment of stamp duty pointed out in the para may be stated to PAC.	महाराष्ट्र मद्रांक अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक 18/03/2017 रोजीच्या शासन निर्णयानुसार धुळे जिल्हयातील वाळू लिलावधारक यांच्याकडून मुद्रांक शुल्काची आकारणी करण्यात आलेली आहे.

(डॉ. आरविंद अंतुलीकर) 21/5/17
प्र. अपर जिल्हाधिकारी, धुळे

RRR

जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे

(गौणखनिज शाखा)

Email :- chitnis.dhule@gmail.com

दुरध्वनी क्रमांक :- ०२५६२-२८८७११, १२, १३ फॅक्स क्रमांक :- ०२५६२-२८८७१५

क्रं. गौ.ख./कावि/०३/१८ धुळे दि. ०३/०१/२०१८

विषय :- अवैध वालू उत्खनन, वाहतुक व साठवणुकीस प्रतिबंध करणेकामी दि. २८/१२/२०१७ रोजी मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.

महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र.गौखनि-१०/०६१५/प्र.क्र.२८७/ख दि. ५ डिसेंबर, २०१५ अन्वये जिल्हा स्तरीय गठीत समितीची गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतूकीस आळा घालण्यासाठी दि. २८/१२/२०१७ रोजी दु. ४.०० वाजता मा. जिल्हाधिकारी, धुळ यांचे अध्यक्षतेखाली सातपुडा सभागृहात बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

अ.क्र	नाव / पदनाम	
१	जिल्हाधिकारी, धुळे	अध्यक्ष
२	जिल्हा पोलीस अधिक्षक, धुळे	सदस्य
३	प्रादेशिक परिवहन अधिकारी, धुळे	सदस्य
४	जिल्हा खनिकर्म अधिकारी, धुळे	सदस्य सचिव

१	अपर जिल्हाधिकारी, धुळे
२	उपविभागीय अधिकारी, धुळे
३	उपविभागीय अधिकारी, शिरपूर
४	तहसिलदार, शिरपूर
५	तहसिलदार, धुळे (ग्रा.)
६	तहसिलदार, धुळे (श.)

सदर बैठकीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतूकीस व साठवणुकीस आळा घालण्यासाठी खालील मुद्दयावर चर्चाकरुन संबंधित विभागाच्या अधिका-यांना मा. जिल्हाधिकारी, धुळे यांनी सूचना दिल्या आहेत.

अ. क्र.	मुद्दा	संबंधित विभागाने करावयाची कार्यवाही
१.	सन २०१७-१८ मधील लिलावात मौजे उप्परपिंड ता. शिरपूर येथील वालू घाटांचा लिलाव झालेला असून सदर लिलाव देणेबाबत ग्रामपंचायत सरपंच, उप्परपिंड व इतर आजूबाजूच्या ग्रामपंचायतीचा तसेच स्थानिक गावक-याचा विरोध होत असून तक्रारी प्राप्त होत आहेत.	मौजे उप्परपिंड ०१ व ०२ ता. शिरपूर येथील वालू घाटांच्या लिलावाबाबत तक्रारीच्या अनुषंगाने मौजे उप्परपिंड क्र. ०१ व ०२ या वालू घाटाचा लिलाव न झालेल्या वर्षी व वालू घाटाची मुदत संपल्यानंतरच्या कालावधीत उपविभागीय अधिकारी, शिरपूर व तहसिलदार, शिरपूर यांनी त्यांचे स्तराबरुन सदर वालू घाटातून अवैधरित्या होणा-या वालूचे उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध घालाणेकामी कोणत्या उपायोजना केल्या व किती दंडात्मक कारवाया केल्या आहेत याबाबचा अहवाल इकडेस सादर करावा.
२.	मौजे उप्परपिंड ता. शिरपूर गावातील वालू वाहतुक करणा-या ट्रक्टर बाबत	प्रादेशिक परिवहन अधिकारी, धुळे व तहसिलदार शिरपूर यांनी उपविभागीय अधिकारी शिरपूर यांचे मार्गदर्शनाखाली मौजे उप्परपिंड ता. शिरपूर या गावात अवैध वालू वाहतुकीच्या संदर्भात वातावरण निर्मिती करण्याराठी दिनांक २९/१२/२०१७ रोजी अचानक अवैध वालू वाहतुकीच्या वाहनांची (ट्रक्टर) तपासणी करुन विना नंबर असलेली वाहने तात्काळ प्रादेशिक परिवहन अधिकारी, धुळे यांनी निलंबित करण्याची कारवाई करावी.

३.	गौण खनिजाचे अवैध उत्खनन करतांना किंवा अधिक क्षमतेने वाहतुक करतांना वाहन सापडल्यास करावयाची कारवाई	सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसिलदार यांनी गौण खनिजाचे अवैध उत्खनन करतांना वाहन सापडल्यास शासन परिपत्रक क्रमांक गौखनि१०/०३१६/प्र.क्र.२६९/ख दि. १४/६/२०१७ मधील तरतुदीचा आवलंब करुन शास्तीची कारवाई करण्यात यावी. तसेच एकाच वाहनावर पूर्वी अवैध वाहतुकीच्या शास्तीची कारवाई झालेली असेल व तेच वाहन परत अवैध गौण खनिजाची वाहतुक करतांना सापडल्यास वाहन जप्त करुन घेवून वाहन मालकाकडून वाहनाच्या रकमे इतका ठरावीक रकमेच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र करुन घ्यावे.
४.	अधिक क्षमतेने अवैध गौण खनिजाची होणारी वाहतुक रोखण्याबाबत.	प्रादेशिक परिवहन अधिकारी, धुळे यांनी अवैध गौणखजाची वाहनाच्या मंजूर क्षमतेपेक्षा अधिक क्षमतेने वाहतुक होत असल्याने वाहनांना वाहतुक बॉडीच्यावर १ ते १.५० फुट पर्यंत लावण्यात आलेले फालके काढण्याबाबत वाहन धारकास प्रथम ०७ दिवसांची सुचना देवून सदर संधीनंतर देखील वाहन मालकाने फालके काढली नाहीतर दुरा-यांदा संधी न देता सदरचे वाहन जप्त करुन वाहनाचे रजिस्ट्रेशन रद्द करावे. तसेच अधिक क्षमेतेने अवैध गौण खनिजाची होणारी वाहतुक पुर्ण पणे बंद करावी.
५.	नंदुरबार जिल्हयातून साक्री तालुक्यातील दहिवेल मार्गे वाळू या गौण खनिजाची अवैध वाहतुक सुरु असले बाबत.	उपविभागीय अधिकारी, धुळे व तसलिदार, साक्री यांनी भरारी पथक स्थापन करुन नंदुरबार जिल्हयातून साक्री तालुक्यातील दहिवेल मार्गे वाळू या गौण खनिजाची अवैध वाहतुक रोखण्यासाठी तात्काळ पोलीस विभागाची मदत घेवून पथक स्थापन करावे. सदर पथका मार्फत अवैध वाळू वाहतुकीच्या वाहनांवर कडक कारवाई करावी.
६.	अवैध गौण खनिजाचे उत्खननास प्रतिबंध घालण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या पथकास तंबू, बॅटरी इ. साहित्य उपलब्ध करुन देणे बाबत.	अवैध गौण खनिजाचे उत्खननास प्रतिबंध घालण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या पथकास तंबू, बॅटरी इ. साहित्य पुरविणेकामी आपत्ती व्यवस्थापन शाखा, जि. का. धुळे यांचेकडेस उपलब्ध असलेले तंबू, बॅटरी इ. साहित्य तहसिलदार, शिरपूर/शिंदखेडा व उपविभगीय अधिकारी शिरपूर यांना पुरविणेबाबत निवासी उपजिल्हाधिकारी, धुळे यांनी तात्काळ कार्यवाही करावी.
७.	सन २०१७-१८ मध्ये लिलावात प्रस्तावित घाटांपैकी जे वाळू घाट लिलावात जाणार नाहीत त्याबाबत करावयाची कार्यवाही.	संबंधित तहसिलदार, उपविभागीय अधिकारी यांनी सन २०१७-१८ मध्ये लिलावात प्रस्तावित घाटांपैकी जे वाळू घाट लिलावात जाणार नाहीत त्या वाळू घाटांच्या रस्त्यापासून मुख्य रस्त्यापर्यंत येणारा मार्ग यांत्रिक साधनाच्या मदतीने बंद केल्यास त्या वाळू घाटांमधून अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध घालता येवू शकतो.
८.	तालुका स्तरावरुन स्थापन करण्यात आलेल्या पथकात पोलीस कर्मचारी व प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे कर्मचारी वेळेवर उपलब्ध राहत नाहीत.	महसूल विभागामार्फत स्थापन करण्यात आलेल्या पथकात मार्फत अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकी बाबत कारवाई करतांना पोलीस कर्मचारी व प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे कर्मचारी वेळेवर उपलब्ध होत नसल्याने पथकारा गौक्याच्या ठिकाणी ब-याच अडचणींना सामोरे जावे लागते. तरी पोलीस कर्मचारी व प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे कर्मचारी वेळेवर पथकास सहकार्य करण्यास उपलब्ध शाल्यास गौक्याच्या ठिकाणी योग्य प्रकारे वातावरण निर्मिती होवून पथकास दंडात्मक कार्यवाही करणे सोपे होईल याबाबत सचूना देण्यात आल्या आहेत.

९.	अवैध गौण खनिज वाहतुक करतांना सापडलेल्या वाहनांवर गुन्हा दाखल करणे बाबत.	अवैध गौण खनिज वाहतुक करतांना सापडलेल्या वाहनांवर गुन्हा दाखल करतांना तहसिलदार यांनी खाण व खनिज अधिनियम १९५७ मधील कलम २१ (४) व (५) अन्वये गुन्हा दाखल करणे आवश्यक आहे. तसेच तहसिलदार यांनी गुन्हा दाखल केलेल्या वाहनाच्या बाबतीत प्रचलीत शासन नियमानुसार दंडात्मक वसुली करणे देखील आवश्यक आहे.
९.	अवैध गौण खनिजाच्या वाहतुकीचे वाहन महसुल विभागामार्फत पकडण्यात आल्यास पोलीस संरक्षण तात्काळ उपलब्ध करुन देणे बाबत.	महसूल विभागामार्फत ज्यावेळेस अवैध गौण खनिजाच्या वाहतुकीचे वाहन ज्या हद्दी पकडले जाते त्या हद्दीतील नजकीच्या पोलीस स्टेशनला दुरध्वनीव्दारे पोलीस उपलब्ध करून देणेबाबत महसूल पथकाडून मागणी आल्यास तात्काळ पोलीस कर्मचारी उपलब्ध करुन देणेसाठी प्रत्येक पोलीस स्टेशन मधील एक पोलीस इन्सपॅक्टर प्राधिकृत करुन त्याच्यावर जबाबदारी देवून त्याने तात्काळ मौक्याच्या ठकाणी १५ ते २० मिनीटात पोलीस कर्मचारी उपलब्ध होईल याची दक्षता पोलीस विभागाने घ्यावी.
१०.	वालू घाट सुरु झाल्यानंतर करावयाची कार्यवाही बाबत	उपविभागीय अधिकारी यांचे मार्फत घाटावर नेमण्यात आलेल्या पथकाने आपत्ती व्यवस्थापन शाखेमार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेले तंबू लिलावात गेलेल्या वाळू घाटांवर स्थापीत करुन प्रत्यक्ष होत असलेल्या वाळू उत्खननावर लक्ष ठेवून संबंधित ठेकेदार प्रत्येक वाहनास बारकोड असलेली पावती देवून ईनव्हॉईस नंबर नमुद करुनच वाहतुक करीत आहे किंवा नाही याची खातरजमा करणेकामी तहसिलदार यांनी तलाठयांना सूचना द्याव्यात. तसेच मंजूर साठयापैकी प्रत्यक्ष उत्खनन केलेल्या साठयाचा वेळोवेळी हिशोब ठेवावा. तसेच पोलीस विभाग व परिवहन विभागाने त्यांचे कार्यालयातील प्रत्येकी एक कर्मचारी यांना जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे येथे घेण्यात येणा-या माहा मायनिंग या सॉफ्टवेअरच्या ऑनलाईन प्रशिक्षणासाठी उपस्थित राहणेबाबत सूचना दिल्यास त्या कर्मचा-यांचा मोबाईल नंबर सदर सॉफ्टवेअर मध्ये समाविष्ठ करणे शक्य होईल. तसेच सदर कर्मचा-यांची चेक नाक्यावरील पथकात नियुक्ती करुन प्रत्येक वाळू वाहनाची पावती चेक करुन ईनव्हॉइस नंबर तपासणे शक्य होईल.

स्वाक्षरीत/---
(डॉ. दिलीप पांढरपट्टे)
जिल्हाधिकारी, धुळे

प्रत :- मा. विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस माहितीसाठी सविनय सादर.
प्रत :- मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, धुळे यांचेकडेस माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रत :- उपविभागीय अधिकारी, धुळे भाग यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत :- उपविभागीय अधिकारी, शिरपूर भाग यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत :- प्रादेशिक परिवहन अधिकारी, धुळे यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत :- तहसिलदार, धुळे (ग्रा.) / साक्री / शिंदखेडा / शिरपूर यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत :- अपर तहसिलदार, धुळे (श.) / पिंपळनेर / दोंडाईचा यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

स्थळ प्रतीवर मा.जिल्हाधिकारी,
यांची स्वाक्षरी असे.

(राजेंद्रकुमार पाटील)
उपजिल्हाधिकारी (प्रशासन)
जिल्हाधिकारी धुळे, करिता

नंदुरबार

File No.-1301/1/2015-COLL-MIN

जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार
गौण खनिज शाखा
☎ (02564)210011 fax : (02564)210041

वाचले:- महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : गौखनि-10/0512/प्र.क्र.300/ ख- दिनांक 12/03/2013

क्रमांक/2015/गौखनि/कावि/ 265 नंदुरबार दिनांक22/07/2015

-: आदेश :-

वाळू निर्गती धोरणाबाबत दिनांक 25/10/2010 चा शासन निर्णय अधिक्रमीत करुन शासनाने दिनांक 12/03/2013 रोजीच्या शासन निर्णयानुसार नविन सुधारीत वाळू निर्गती धोरण निश्चीत केलेले आहे. त्यानुसार सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.16 मध्ये नमुद केलेनुसार तक्रारी संदर्भात करावयाची कार्यवाही नमुद केलेली आहे. त्यानुसार शासनाने विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार निश्चित करण्यात आलेल्या स्थळावरुन यांत्रीकी साधनाने रेती/वाळु स्थळातून लिलावांच्या अटी व शर्तींचे उल्लघंन करुन वाळू उत्खनन होते. अवैध / निकषांच्या वाळु उत्खननामुळे नदी काठच्या गावातील पिण्याचा व शेतीच्या पाण्यावर विपरीत परिणाम होतो. वाळू वाहतुकीमुळे नदी काठच्या शेतीची / रस्त्यांची हानी होते, अशा स्वरुपाच्या तक्रारी संदर्भात जिल्हा स्तरीय समिती स्थापन करण्याबाबत निर्देश आहेत. त्याअनुषंगाने खालील प्रमाण जिल्हा स्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे. यापुढे वेळोवेळी होणाऱ्या तक्रारी संदर्भात जिल्हा स्तरीय समिती तक्रारीची सविस्तर चौकशी करण्याची कार्यवाही करेल.

जिल्हा स्तरीय समिती		
1	अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार	पदसिध्द अध्यक्ष
2	मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नंदुरबार	पदसिध्द सदस्य
3	कार्यकारी अभियंता, ना.बां.विभाग, नंदुरबार / शहादा	पदसिध्द सदस्य
4	भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचा जिल्ह्यातील किंवा यथास्थिती विभागातील वरिष्ठ अधिकारी	पदसिध्द सदस्य
5	महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचा अधिकारी	पदसिध्द सदस्य
6	जिल्हा खनिकर्म अधिकारी, नंदुरबार	पदसिध्द सदस्य सचिव

स्वाक्षरीत/xxxx
अपर जिल्हाधिकारी नंदुरबार

प्रति: मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नंदुरबार यांचेकडेस माहिती व पुढील कार्यवाहीसाठी
प्रति: कार्यकारी अभियंता, ना.बां.विभाग, नंदुरबार यांचेकडेस माहिती व पुढील कार्यवाहीसाठी
प्रति: वरिष्ठ भुवैज्ञानिक अधिकारी भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा नंदुरबार यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी
प्रति: महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ अधिकारी, धुळे यांचेकडेस माहिती व पुढील कार्यवाहीसाठी
प्रति: जिल्हा खनिकर्म अधिकारी, नंदुरबार यांचेकडेस माहिती व पुढील कार्यवाहीसाठी

अवलोकनार्थ सादर

अपर जिल्हाधिकारी नंदुरबार

जिल्हा स्तरीय दक्षता समितीचे दिनांक 09/04/2018 रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त

नंदुरबार जिल्ह्यातील वाळू/रेतीच्या अवैध उत्खनन व वाहतूकीबाबत तक्रारी, निवेदने व त्यासंबंधात करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेकामी जिल्हास्तरीय दक्षता समितीची बैठक दिनांक 09/04/2018 रोजी रंगावली सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार येथे ठिक 05.30 वाजता मा. जिल्हाधिकारी, नंदुरबार यांचे अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत खालीलप्रमाणे समितीचे सदस्य उपस्थित होते.

अ.क्र	अधिकारी/कर्मचारी नाव	समितीतील पद	उपस्थित
1	मा. जिल्हाधिकारी, नंदुरबार	अध्यक्ष	उपस्थित
2	मा. पोलीस अधिक्षक, नंदुरबार	सदस्य	उपस्थित
3	मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. नंदुरबार	सदस्य	उपस्थित (प्रतिनिधी)
4	मा. अपर जिल्हाधिकारी नंदुरबार	सदस्य	उपस्थित
5	मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, नंदुरबार	सदस्य	उपस्थित (प्रतिनिधी)
6	जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख, नंदुरबार	सदस्य	उपस्थित

सर्वप्रथम जिल्हास्तरीय दक्षता समितीतील सदस्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय दिनांक 03 जानेवारी 2018 चे वाचन केले व त्यानुसार स्थापन जिल्हास्तरीय दक्षता समितीची रचना व समितीच्या कार्याबाबत चर्चा करण्यात आली.

वाळू/रेतीच्या अवैध उत्खनन व वाहतूकी तक्रारी, निवेदने यावर चर्चा करण्यात आली. अवैध गौण खनिज वाहतुकीबाबत तक्रारीबाबत संबंधित तहसिलदार यांचेकडेस कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्याची माहिती समितीसमोर मांडण्यात आली. अवैध उत्खनन व वाहतुक प्रकरणे तसेच अवैध उत्खननावर प्रभावीपणे आळा घालणेकामी सविस्तर चर्चा करण्यात आली.

वाळू साठा असलेल्या परिसरात वाळू वाहतुकीची अत्यंत प्रभावीपणे तपासणी करणेकामी व अवैध वाहतूकीवर नियंत्रण ठेवणेकामी तालुकास्तरावर, जिल्हास्तरावर गस्ती पथक/भरारी पथक महसूल खात्याकडून स्थापन करण्यात आली असुन सदर पथकामध्ये पोलीस व परिवहन खात्यातील अधिकारी / कर्मचारी समावेश करण्यात यावा याबाबत जिल्हाधिकारी यांनी सूचना दिल्या.

मा. पोलीस अधिक्षक, नंदुरबार यांनी सदर तालुका स्तरीय भरारी पथकांनी गस्तीच्या वेळेस संबंधित तालुका पोलीस स्टेशन येथून पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन घेणेबाबत सूचित केले आहे. तसेच संबंधितांना याबाबत सूचित करण्यात येईल असे सूचित केले आहे. भरारी पथकांनी गस्तीच्या वेळेत चौकात उभे राहणाऱ्या संशिय व्यक्तीचे व्ही.डी. ओ. रेकॉर्डींग करण्यात यावे असे सूचित केले आहे.

Scanned by CamScanner

मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी परिवहन खात्यातील अधिकारी/कर्मचारी तालुकास्तरीय भरारी पथक व जिल्हास्तरीय भरारी पथक यात सहभागी करुन घेणेकामी संबंधित अधिकारी /कर्मचारी यांना कळविण्यात येऊन सदर पथकास परिवहन खात्याचा सहभागाबाबत कळविण्यात येईल.

याप्रमाणे पुढील दक्षता समितीची बैठक घेण्यात येईल अशी सूचित करुन समितीपुढे इतर विषय नसलेने सर्व सदस्यांचे आभार मानुन बैठक संपल्याचे घोषीत करण्यात आले.

क्रमांक/2018/गौखनि/कादि- २५२
नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालय,
नंदुरबार दि.११ /04/2018

जिल्हा खनिकर्म अधिकारी तथा
सदस्य सचिव
जिल्हा दक्षता समिती नंदुरबार

जिल्हाधिकारी तथा
अध्यक्ष
जिल्हा दक्षता समिती नंदुरबार

प्रत :- मा. पोलीस अधिक्षक, नंदुरबार यांचेकडेस माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, नंदुरबार यांचेकडेस माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- अपर जिल्हाधिकारी नंदुरबार यांचेकडेस माहितीसाठी
प्रत :- सहाय्यक जिल्हाधिकारी नंदुरबार /तळोदा भाग यांचेकडेस माहितीस्तव
प्रत :- उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा यांचेकडेस माहितीस्तव
प्रत :- तहसिलदार नंदुरबार/शहादा/नवापूर/तळोदा/अक्कलकुवा/अक्राणी
प्रत :- उपविभागीय पोलीस अधिकारी नंदुरबार/शहादा/ अक्कलकुवा
प्रत :- नंदुरबार शहर पोलीस स्टेशन/उपनगर पोलीस स्टेशन
प्रत :- तालुका पोलीस स्टेशन नंदुरबार/शहादा/नवापूर/अक्कलकुवा/तळोदा/अक्राणी

जिल्हा खनिकर्म अधिकारी तथा
सदस्य सचिव
जिल्हा दक्षता समिती नंदुरबार

जिल्हा स्तरीय दक्षता समितीचे दिनांक 07/05/2018 रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त

नंदुरबार जिल्ह्यातील वाळू/रेतीच्या अवैध उत्खनन व वाहतूकीबाबत तक्रारी, निवेदने व त्यासंबंधात करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेकामी जिल्हास्तरीय दक्षता समितीची बैठक दिनांक 07/05/2018 रोजी रंगावली सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार येथे दुपारी 01.30 वाजता मा. जिल्हाधिकारी, नंदुरबार यांचे अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत खालीलप्रमाणे समितीचे सदस्य उपस्थित होते.

अ.क्र	अधिकारी/कर्मचारी नाव	समितीतील पद	उपस्थित
1	मा. जिल्हाधिकारी, नंदुरबार	अध्यक्ष	उपस्थित
2	मा. पोलीस अधिक्षक, नंदुरबार	सदस्य	उपस्थित
3	मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. नंदुरबार	सदस्य	उपस्थित (प्रतिनिधी)
4	मा. अपर जिल्हाधिकारी नंदुरबार	सदस्य	उपस्थित
5	मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, नंदुरबार	सदस्य	उपस्थित
6	जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख, नंदुरबार	सदस्य	उपस्थित (प्रतिनिधी)
7	जिल्हा खनिकर्म अधिकारी, नंदुरबार	सदस्य सचिव	उपस्थित

सर्वप्रथम जिल्हास्तरीय दक्षता समितीतील सदस्यांचे स्वागत श्री. प्रमोद हिले, जिल्हा खनिकर्म अधिकारी, नंदुरबार यांनी केले. यानंतर मागील महिन्यात झालेल्या दिनांक 06/04/2018 रोजीच्या बैठकीत नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यात वाळू/रेतीच्या अवैध उत्खनन व वाहतूकीबाबत तक्रारी अर्ज समितीपुढे सादर करण्यात आला होता. सदर तक्रारी अर्जातील मुद्दयाची चौकशी करुन अहवाल सादर करणेकामी तहसिलदार शहादा यांना कळविण्यात आले असल्याचे जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी सांगितले.

मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, नंदुरबार यांनी सांगितले की, नंदुरबार तालुक्यात गौण खनिजाची अत्यंत प्रभावीपणे तपासणी करणेकामी व अवैध वाहतूकीवर नियंत्रण ठेवणेकामी नंदुरबार तालुक्यातील उपप्रादेशिक कार्यालयासमोरील पथक करण चौफुली येथे स्थापन केल्यास नंदुरबार तालुक्यात येणाऱ्या अवैध गौण खनिज वाहतूकीवर आळा बसेल असे सांगितले. यावर समितीतील सदस्यांची चर्चा होऊन चर्चेअंती सदर पथक करण चौफुली येथे स्थापन करणेबाबत तहसिलदार नंदुरबार यांना कळविण्यात येईल असे जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी सांगितले.

मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, नंदुरबार यांनी परिवहन खात्यातील अधिकारी/कर्मचारी यांचे अवैध गौण खनिजावर नियंत्रण ठेवणेकामी स्वतंत्ररित्या भरारी पथक स्थापन करण्यात आले असल्याचे सांगितले.

याप्रमाणे पुढील दक्षता समितीची बैठक घेण्यात येईल असे सूचित करुन समितीपुढे इतर विषय नसलेने सर्व सदस्याचे आभार मानून बैठक संपल्याचे घोषीत करण्यात आले.

क्रमांक/2018/गौखनि/कावि- ३२३
नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालय,
नंदुरबार दि.१८/०५/2018

स्वाक्षरीत/-
जिल्हा खनिकर्म अधिकारी तथा
सदस्य सचिव
जिल्हा दक्षता समिती नंदुरबार

स्वाक्षरीत/-
जिल्हाधिकारी तथा
अध्यक्ष
जिल्हा दक्षता समिती नंदुरबार

प्रत :- मा. पोलीस अधिक्षक, नंदुरबार यांचेकडेस माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, नंदुरबार यांचेकडेस माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रत :- अपर जिल्हाधिकारी नंदुरबार यांचेकडेस माहितीसाठी
प्रत :- सहाय्यक जिल्हाधिकारी नंदुरबार /तळोदा भाग यांचेकडेस माहितीस्तव
प्रत :- उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा यांचेकडेस माहितीस्तव
प्रत :- तहसिलदार नंदुरबार/शहादा/नवापूर/तळोदा/अक्कलकुवा/अक्राणी

जिल्हा खनिकर्म अधिकारी तथा
सदस्य सचिव
जिल्हा दक्षता समिती नंदुरबार

कोल्हापूर

बैठकीचे इतिवृत्त

गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक यासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने वाळू व इतर गौण खनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतूक यासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सर्व संबंधित विभागांचा परिणामकारक समन्वय साधण्यासाठी आणि अनाधिकृत उत्खनन व वाहतुकीशी संबंधित अपप्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय समिती स्थापन करणेची तरतुद आहे. त्यानुसार महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.गौखनि- १०/ ०६१५/ प्र.क.२८७/ख, दिनांक ५/१२/२०१५ रोजीच्या पत्रात नमुद केलेप्रमाणे जिल्हास्तरावर अधिका-यांचा समावेश असलेली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

शासन निर्णयातील तरतुदीनुसार गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक यासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने वाळू व इतर गौण खनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतूकीबाबत जिल्हास्तरावर घ्यावयाची आढावा बैठक दिनांक २९/२/२०१६ रोजी दुपारी १-०० वाजता घेण्यात आली. सदर बैठकीला खालील अधिकारी उपस्थित होते.

१. मा. जिल्हाधिकारी	-- अध्यक्ष
२. जिल्हा पोलीस अधिक्षक कोल्हापूर	-- सदस्य
३. अप्पर जिल्हाधिकारी	-- सदस्य
४. प्रादेशिक परिवहन अधिकारी कोल्हापूर	-- सदस्य
५. उपजिल्हाधिकारी (महसूल)	-- सदस्य
६. जिल्हा खनिकर्म अधिकारी	-- सदस्य सचिव

बैठकीमध्ये खालील मुद्दयांवर चर्चा करण्यात येवून निर्णय घेणेत आले.

१. वाळू व इतर गौणखनिज उत्खनन व वाहतुकीवर नियंत्रण -

शासनाच्या दिनांक १२/३/२०१३ च्या नवीन वाळू/रेती धोरणानुसार सन २०१५ - २०१६ मध्ये जिल्हयातील २९ वाळू/रेती गटांचे लिलाव मंजूर करण्यात येवून तसे आदेश पारीत करण्यात आले आहेत. सदर २९ लिलावधारकांपैकी २५ वाळू/रेती लिलावधारकांनी सक्शन पंपाचा वापर करुन वाळू/रेती उत्खनन व वाहतूक केलेची बाब निदर्शनास आली. तेव्हा सदरहू लिलावधारकांविरुध्द तहसिलदार शिरोळ, हातकणंगले, आजरा, भुदरगड, पन्हाळा, कागल, गडहिंग्लज यांच्या व्दारे वापरण्यात येणारे सक्शन पंप जप्त करुन त्यांचेविरुध्द IPC कलम १८८ अंतर्गत फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत.

या संदर्भात बैठकीत चर्चा होवून भविष्यात अवैध वाळू उत्खनन व वाहतूकीवर प्रभावीपणे नियंत्रण राखणेच्या दृष्टीकोनातून घालून दिलेल्या अटी व शर्तीचा भंग केलेमुळे उक्त नमुद २५ लिलावधारकांना मंजूर लिलाव रद्द करण्यात येवून त्यांनी जमा केलेली रक्कम तसेच अनामत रक्कम, बँक गॅरंटी जप्त करुन शासन जमा करणेचा निर्णय घेणेत आला.

अवैध वाळू/रेती उत्खनन विरुध्द प्रभावीपणे कार्यवाही करणेच्या दृष्टीकोनातून वारंवार असे कृत्य करणा-या म्हणजेच ज्या व्यक्ती विरुध्द दोन वेळा फौजदारी गुन्हे दाखल झाले आहेत. त्यांचेविरुध्द MPDA कायद्यांअतर्गत कार्यवाही करणेचा निर्णय घेणेत आला. याकरीता जिल्हा खनिकर्म अधिकारी

यांनी संबंधित तहसिलदार यांचेकडून माहिती संकलित करुन तसा प्रस्ताव तहसिलदार यांचेकडून प्राप्त करुन घ्यावा. प्राप्त माहितीच्या पुढील अनुषंगिक कार्यवाही करीता जिल्हाधिकारी/पोलीस अधिक्षक यांचेकडे प्रस्ताव जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी आवश्यक माहिती सादर करावी.

भविष्यात वाळू लिलावधारकाने केलेल्या उत्खननावर नियंत्रण राखणेकरीता सर्व लिलावधारकांनी त्यांचे उत्खननाच्या ठिकाणी CCTV कॅमेरे बसवणेची सक्ती करावी, व संबंधित लिलावधारकांने Unedited केलेली Recording असलेली CD/DVD संबंधित तहसिलदार तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचेकडे सादर करावी अशा प्रकारचा निर्णय घेणेत आला.

जिल्हयात वाळू/रेती लिलावाकरीता १२९ गट प्रस्तावित करण्यात आले होते. सद्यस्थिती ३८ वाळू/रेती गटांचे लिलाव झाले असून उर्वरीत गटाकरीता प्रतिसाद लाभलेला नाही. तेव्हा लिलाव न झालेल्या गटामध्ये अवैध उत्खनन होवू नये याची सर्वस्वी दक्षता संबंधित तहसिलदार यांनी घ्यावी. त्याचप्रमाणे सदर गटामधून अवैध उत्खनन /वाहतूक होवू नये याकरीता चर खोदण्याची कार्यवाही करावी.

गौणखनिज विशेषत: वाळू/रेती, काळादगड, खडी यांचा उपयोग करणा-यामार्फत साठा केला जातो. सदर साठ्याची तपासणी करुन अवैध साठा आढळून आलेस त्यांचेविरुध्द दंडात्मक कार्यवाही करणेच्या सूचना सर्व तहसिलदार यांना देणेच्या सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या.
(कार्यवाही - तहसिलदार सर्व)

२. चेक पोस्ट नाका बसविणे

जिल्हयातील अवैध गौणखनिज उत्खनन/वाहतूक प्रभावीपणे रोखणेकरीता जिल्हयातील सर्व तालुक्यात विशेषत: शिरोळ, हातकणंगले, करवीर, गडहिंग्लज, चंदगड, कागल, या तालुक्यात ज्या ठिकाणी मोठया प्रमाणात गौणखनिजाची वाहतूक होते त्या ठिकाणी Check Post तयार करणेसंदर्भात निर्णय घेणत आला. Check Post ची जागा व संख्याबाबत सबंधित तहसिलदार यांनी त्याच्या जवळपासच्या तहसिलदारासमवेत चर्चा करुन अंतिम निर्णय घेवून तसे या कार्यालयास कळवावे.

Check Post नाक्यावर पोलीस कर्मचारी सुध्दा नियुक्त करावा, त्याकरीता तालुका स्तरावर पोलीस कर्मचा-यांची मागणी करावी, या कामी आवश्यक पोलीस कर्मचारी उपलब्ध करुन देण्याची हमी पोलीस अधिक्षक यांनी दिली.
(कार्यवाही - पोलीस अधिक्षक कोल्हापूर व तहसिलदार सर्व)

३. वाहन निलंबन -

मागील ४ महिन्यामध्ये जिल्हयात अवैध गौणखनिज वाहतूक करणा-या १२१ वाहनांचे निलंबन परिवहन कार्यालयाकडून केलेले आहेत. तथापि निलंबन काळात सदरच्या वाहनाच्या स्थितीबाबत परिवहन विभागास माहिती नसते. तेव्हा जिल्हयातील निलंबीत केलेले वाहन निलंबन काळात एका विशिष्ट क्षेत्रावर पार्क करुन ठेवणेसंबंधी निर्णय घेणेत आला. याकरीता जिल्हयातील करवीर, इचलकरंजी, गडहिंग्लज, हे तीन ठिकाणे अंतिम करण्यात आली.

अप्पर जिल्हाधिकारी यांनी सदर ठिकाणी वाहने पार्कीग करणेकरीता नेमक्या जागेचा निर्णय संबंधित तहसिलदार यांचे समवेत चर्चा करुन घ्यावा व तो निर्णय परिवहन कार्यालयास कळवावा असे सांगितले.
(कार्यवाही - अप्पर जिल्हाधिकारी कोल्हापूर)

४. प्राप्त तक्रारी -

(अ) सदस्य सचिव यांनी मौजे उचगांव ता करवीर येथे वाळू वाहतूक करणारे ट्रक रस्त्यावर उभे राहतात व सदर ठिकाणी वाळू धुण्याचे कार्य केले जाते, त्यामुळे वाहतूकीस अडथळा व पाण्यामुळे अपघात होत असल्याची तक्रार प्राप्त झाल्याचे सांगितले. तेव्हा याबाबत तहसिलदार करवीर यांना उचित कार्यवाही करणेसंदर्भात याअगोदरच कळविण्यात आले असून सदर प्रकरणी रस्त्यावर वाहने उभे केलेने रहदारीस होत असलेल्या अडथळयाबाबत परिवहन विभागामार्फत तात्काळ कार्यवाही करणेच्या सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या.
(कार्यवाही - परिवहन अधिकारी कोल्हापूर व वाहतूक शाखा पोलीस विभाग, कोल्हापूर)

(ब) विज्ञान प्रबोधिनी, पर्यावरण मित्र, संघटनेमार्फत मा. जिल्हाधिकारी यांना जिल्हयातील बॉक्साईट उत्खननाबाबत तक्रार वजा निवेदन देण्यात आले. याबाबत मा. अध्यक्षांनी समिती गठीत करुन त्यामार्फत पाहणी व पडताळणी करणेत येईल, असे सांगितले.
(कार्यवाही - जिल्हा खनिकर्म अधिकारी)

तरीत्र मुद्दांबाबत चर्चा होवून सदस्य सचिव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपलेचे जाहिर केले.

स्थळ प्रतिवर मा.जिल्हाधिकारी यांची
स्वाक्षरी आहे.

जिल्हा खनिकर्म अधिकारी
कोल्हापूर
(सदस्य सचिव)

पुणे

इतिवृत्त

अवैध गौण खनिज वाहतूक बाबत दिनांक २७/७/२०१६ रोजीची बैठक

मा. जिल्हाधिकारी पुणे यांचे अध्यक्षते खाली दिनांक २७/०७/२०१६ रोजी विधान भवन, पुणे येथील मिटींग हॉल क्र.१ येथे सकाळी १०.३० वा. सभेस खालील प्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

१) मा. श्री. सौरभ राव, जिल्हाधिकारी पुणे
२) मा. श्री जय जाधव, जिल्हा पोलिस अधिक्षक, पुणे,
३) मा. श्री रमेश काळे, अपर जिल्हाधिकारी, पुणे
४) मा. जितेंद्र पाटील, प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे,
५) मा. राजेंद्र मुठे, निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे
६) श्री. तानाजी चिखले, अतिरिक्त जिल्हा पोलिस अधिक्षक, बारामती,
७) श्री. राजकुमार शिंदे, अतिरिक्त जिल्हा पोलिस अधिक्षक, पुणे,
८) श्री. उप प्रादेशिक परिवहन अधिकरी, बारामती,
९) श्री. संतोष जाधव, उपविभागीय अधिकारी बारामती-इंदापूर,
१०) श्री. समिर शिंगटे, उपविभागीय अधिकारी दौंड-पुरंदर
११) श्री बापू दांगट, उपविभागीय पोलीस अधिकारी, बारामती
१२) श्री मितेश घट्टे, उपविभागीय पोलीस अधिकारी, खेड
१३) श्री राजेंद्र मोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, दौंड
१४) श्रीमती वैशाली कडूकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, हवेली
१५) श्री अशोक भरते, उपविभागीय पोलीस अधिकारी, भोर
१६) श्री विवेक पानसरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, देहू
१७) श्री विनायक ढाकणे उपविभागीय पोलीस अधिकारी, लोणावळा
१८) श्री. सुयोग जगताप, जिल्हा खनिकर्म अधिकारी, पुणे
१९) श्री. महेश पाटील, समन्वय जिल्हा खनिकर्म अधिकारी, पुणे
२०) श्री. दशरथ काळे, तहसिलदार हवेली

सदर सभेत अवैध गौण खनिज वाहतूकीवर आळा घालणेचे दृष्टीकोनातून खालील प्रमाणे चर्चा करणेत आली आहे.

सभेची सुरुवातीस मा. अध्यक्ष यांनी सर्वांचे स्वागत केले. तसेच सांगितले की, पुणे जिल्हयातील इंदापूर व दौंड तालुक्यातील नदीपात्रातून मोठ्याप्रमाणात अवैध वाळू उत्खनन होत आहे. सदर चोरीच्या वाळूची वाहतूक सोलापूर-पुणे महामार्गावरून पुणे शहराकडे होत आहे. सदरचे अवैध वाहतूकीस आळा घालणे करीता भिगवण तालुका इंदापूर येथे तपासणी नाका तयार करणेत आला असून, त्याकरीता महसूल अधिकारी / कर्मचारी, पोलीस कर्मचारी तसेच परिवहन विभागाचे कर्मचारी यांचे संयुक्त पथक तयार करणेबाबत यापूर्वी आदेश देण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सर्व तहसिल कार्यालय व इतर शाखे मधील अधिकारी / कर्मचारी यांची नेमणूकी बाबत आदेश काढणेत आलेले आहेत. तसेच परिवहन विभागाकडून ही कर्मचारी यांची नियुक्ती आदेश पारीत केलेले आहेत. पोलीस विभागाकडून सद्यस्थितीत दोन पोलीस देण्यात आलेले असून तपासणी नाक्याच्या कालावधी

Scanned by CamScanner

करीता नेमणूक केलेले पोलीस कर्मचारी यांचे आदेश प्राप्त नाहीत. सबब पोलीस विभागाने दिवसा व रात्री चार शस्त्रधारी पोलीस कर्मचारी नेमणूक करणेबाबत सुचना दिल्या. जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी सद्या राज्यामध्ये पोलीस उप निरीक्षक या पदाच्या खात्याअंतर्गत परीक्षा जाहीर झाल्या असून बरेचसे पोलीस कर्मचारी हे सुट्टीवर आहेत. मात्र अतिरीक्त पोलीस अधिक्षक बारामती व पुणे यांनी समन्वय साधून सदरच्या पथकासाठी दिवसा दोन व रात्री चार असे पोलीस कर्मचारी उपलब्ध करून देण्या संदर्भात सुचना केल्या.

जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी भिगवण चेक पोस्ट तसेच इतर ठिकाणी अवैध गौण खनिज वाहतूक करतांना जप्त केलेली वाहने ही यवत / भिगवण येथील शासकीय विश्राम गृह या ठिकाणी लावणेत यावी. तसेच या ठिकाणी जागा अपुरी पडत असल्यास उर्वरित वाहने दौंड तहसिल कार्यालय याठिकाणी लावणेत यावीत. यवत व भिगवण शासकीय विश्राम गृह या ठिकाणी महसूल व पोलीस यांचा बंदोबस्त नेमणेत यावा. व सदर बंदोबस्ताचा येणारा खर्च हा संबंधीत वाहनमालक यांचेकडून वसूल करावा. तसेच पुणे शहराच्या लगत जप्त केलेली वाहने ही पोलिस मुख्यालय, पाषाण पुणे येथील आवारात लावण्यात यावी असे ठरले. पोलिस मुख्यालय पाषाण येथील उपलब्ध जागेत अनधिकृत गौण खनिज वाहतूक दरम्यान जप्त केलेली अनधिकृत वाहने लावणे संदर्भात पोलिस उप अधिक्षक (गृह) श्री मुजावर यांचेशी मोबाईल (९६८९७७०७७७) वर संपर्क करून पुढिल कारवाई करणेत यावी अशा सुचना दिल्या.

मा. अध्यक्ष यांनी पथकाने जप्त केलेल्या वाहनाच्या क्षमतेपेक्षा जास्त गौण खनिज आढळून आलेस तसेच वाहनचालकाकडे अधिकृत वाहतूक परवाना असलेस मात्र वाहन परवान्यापेक्षा जास्त गौण खनिज आढळून आलेल्या संपूर्ण गौण खजिनावर दंडात्मक कारवाई करावी. तहसिलदार, उपविभागीय अधिकारी यांनी त्यामध्ये कोणतीही सवलत देवू नये. महसूल विभागाने दंड केले नंतर आरटीओ यांनी क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक केल्यामुळे ओव्हरलोडसाठी तसेच अवैध वाहतूकी संदर्भात जिल्हा समितीने ठरवून दिल्या प्रमाणे दंडात्मक कारवाई करावी अशा सुचना दिल्या.

मा. निवासी उपजिल्हाधिकारी सो, यांनी सभेस कळविले की, सदरचे चेक पोस्ट हे दिनांक २८/०८/२०१६ पर्यंत असून येथून पुढे कायमस्वरूपी जिल्हारतरावर पथक नेमणे गरजेचे आहे. सदर पथकात दोन पोलिस कर्मचारी यांची नेमणूक करावी असे सुचित केले त्यावर मा. जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी सहमती दर्शवून आवश्यक तो बंदोबस्त उपलब्ध करून देण्यास मान्यता दर्शविली.

उपविभागीय अधिकारी दौंड-पुरंदर यांनी कळविले की, नदीपात्रात मोठया फायबरच्या बोटी अढळून येतात त्या बोटींवर कारवाई करतांना मोठया अडचणी येतात. उदा. बोटी उचलणेसाठी मोठया क्रेनची आवश्यकता असते व त्यादेखेस क्रेन उपलब्ध होत नाही. तसेच अनधिकृत बोटी या नदी पात्रात सोडणेकरीता क्रेन ऑपरेटर मदत करतात यावर नियंत्रण आणनेचे निर्देश मा. जिल्हाधिकारी पुणे यांनी मा. प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांना सुचित केले. तसेच आपणाकडून दौंड तालुक्यातील क्रेन मालकांची सभा घेणेत यावी व त्यांना कळविणेत यावे की, अशा कारवाई दरम्यान प्रशासनास मदत करावी. त्यावर प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांनी क्रेन ऑपरेटर यांची बैठक घेवून योग्य निर्देश देण्याचे नमुद केले.

उपविभागीय अधिकारी बारामती-इंदापूर यांनी कळविले की, वाहनांवर कारवाई केली जाते त्यादेखी वाहनचालक वाहन सोडून पळून जातात. तसेच वाहने नादुरुस्त करतात. त्यामुळे सदरची वाहने नियोजित ठिकाणी नेणेस अडचण येतात. त्याकरीता मेकॅनिक व वाहनचालक यांची आवश्यकता असते. ते स्थानिक स्तरावरून उपलब्ध होणे करीता निधीची आवश्यकता आहे. सदर बाबत मा. अध्यक्ष यांनी अशा

Scanned by CamScanner

वाहनावर दंडात्मक कारवाई करताना सदर वाहनास नियोजित ठिकाणी नेणे करीता आलेला खर्च महसूल अधिनियमांतर्गत वसूल करावा असे निर्देश दिले.

तालुका मुळशी येथील ताम्हीणी घाटातून अवैध रित्या वाळू वाहतूक होत असले बाबत मा. अध्यक्ष यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले. याबाबत जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी संबंधीत उपविभागीय पोलीस अधिकारी यांना सदर घाटामध्ये तपासाणी नाका लावणेबाबत सुचना दिल्या.

उपविभागीय अधिकारी यांनी महसूल कर्मचारी ज्यावेळी पोलीस स्टेशन मध्ये अवैध वाळू वाहतूकी बाबत वाहनावर गुन्हा दाखल करणेबाबत जातात त्यावेळी गुन्हा दाखल करून घेतला जात नाही. त्याना बराच वेळ थांबवून ठेवले जाते. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे मानसिक खच्चीकरण होते असे निदर्शनास आणून दिले. तसेच अशी प्रकरणे फक्त कलम ३७९ खाली दाखल करून घेतले जातात त्यामुळे अनधिकृत वाहतूक करणाऱ्यावर जरब बसत नाही. याबाबत जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी अशा प्रकारचे गुन्हे दाखल करणेपूर्वी उपविभागीय अधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी समन्वय साधून गुन्हा दाखल करणाऱ्या कर्मचाऱ्यास ठोस स्वरूपाची कारवाई होणेचे दृष्टीने योग्यते मार्गदर्शन करावे.

मा. अध्यक्ष यांनी अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकी संदर्भातील जिल्हास्तरीय समितीची आढावा बैठक प्रत्येक महिन्याला आयोजित करावी. सदरची बैठक ही लोकशाही दिन या दिवशी आयोजित करावी अशा सुचना दिल्या.

मा. जिल्हाधिकारी यांची परवानगी घेवून निवासी उपजिल्हाधिकारी यांनी सर्वांचे आभार मानुन सभा संपल्याची जाहिर केले.

जिल्हाधिकारी पुणे

सातारा

वाचले : महाराष्ट्र शासन,महसूल व वनविभाग,शासन निर्णय क्रमांक:गौखनि-10/0615/ प्र.क्र.289/ख, दिनांक 03/01/2018

जिल्हाधिकारी कार्यालय सातारा
क्रमांक:गौणखनिज-2018/कावि-७८७
सातारा दि.०८/ 02 / 2018

आदेश

महाराष्ट्र शासन,महसूल व वनविभाग,शासन निर्णय क्रमांक:गौखनि-10/0615/ प्र.क्र.289/ख,दिनांक 03/01/2018 अन्वये, वाळू / रेती निर्गती बाबत शासनाने सुधारीत धोरण विहीत केलेले आहे. शासन निर्णयातील अ.नं.17 अ (1) येथे, सूचीत केलेनुसार गौणखनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या तक्रारीच्या पडताळणीसाठी खालीलप्रमाणे सातारा जिल्हास्तरीय समितीचे गठण करण्यात येत आहे.

अ.नं.	पदनाम / कार्यालय	समितीमधील पद
01	जिल्हाधिकारी,सातारा	अध्यक्ष
02	जिल्हा पोलीस अधिक्षक,सातारा	सदस्य
03	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा	सदस्य
04	अपर जिल्हाधिकारी,सातारा	सदस्य
05	प्रादेशिक परिवहन अधिकारी,सातारा	सदस्य
06	जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख,सातारा	सदस्य
07	जिल्हा खनिकर्म अधिकारी,सातारा	सदस्य सचिव

जिल्हाधिकारी सातारा

२६/०२/२०१८

प्रति,

(सर्व संबंधित) ----------

माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

७/३/१८

अधीक्षक भूमि अभिलेख
सातारा

७/३/१८

तहसीलदार सातारा करीता

Scanned by CamScanner

मा.जिल्हाधिकारी सातारा यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 13/01/2018 रोजी सकाळी ठिक 11.00 वाजता,अवैध वाळू व इतर गौणखनिज उत्खननावर कारवाई करणेसाठी जिल्हा व उपविभागीय अधिकारी यांचे स्तरावर पथक स्थापन करणेचे अनुषंगाने व पथकामार्फत परिणामकारक अंमलबजावणी करणेचे अनुषंगाने झालेल्या बैठकीचा **इतिवृत्तांत**.....

उपस्थिती.

1. मा.जिल्हाधिकारी, सातारा
2. मा.पोलीस अधिक्षक,सातारा
3. मा.अपर जिल्हाधिकारी,सातारा
4. उपविभागीय अधिकारी,कराड उपविभाग कराड
5. उपविभागीय अधिकारी,माण-खटाव उपविभाग दहिवडी
6. उपविभागीय अधिकारी, फलटण यांचे प्रतिनिधी तहसिलदार फलटण
7. नायब तहसिलदार कूळकायदा शाखा,जि.अ.कार्यालय, सातारा
8. अ.का.गौणखनिज शाखा,जि.अ.कार्यालय,सातारा
9. लिपीक,गौणखनिज शाखा,जि.अ.कार्यालय,सातारा

बैठकीत खालील मुद्यांवर चर्चा करणेत आली.

1/- <u>जिल्हास्तरावर व उपविभागीय अधिकारी यांचेस्तरावर दक्षता पथके तयार करणे</u> -

उपविभागीय अधिकारी यांनी तालूकास्तरावर तहसिलदार यांचे अधिपत्याखाली 01 दक्षता पथक तयार करावे आणि सदर दक्षता पथकाचे अंतर्गत 01 मंडलाधिकारी, 02 तलाठी, 04 कोतवाल, 02 पोलीस कर्मचारी व 02 होमगार्ड यांचा समावेश असलेली एकूण 04 उपपथके तयार करावीत. यामध्ये प्रामुख्याने, 1.कराड 2.माण 3.फलटण 4.खटाव या तालूकेत अवैध वाळू उत्खनन व वाहतूकीवर परिणामकारक कारवाई होणेचे दृष्टिने 24 तास दक्षता पथके कार्यरत ठेवावीत. सदरच्या पथकामध्ये प्रामाणिकपणे व गोपनिय काम करणा-या कर्मचारी यांचा समावेश असावा. त्यांनी केलेली प्रत्येक कारवाई यशस्वीरित्या पार पाडली पाहिजे. कारवाई झाली नाही असे होवू नये.

तालूकास्तरावरील 04 दक्षता पथकाचे नियंत्रण उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.) जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांचेकडे राहील. त्यांचे अधिपत्याखाली दक्षता पथक अखंड कार्यरत ठेवणेचे आहे.

तसेच जिल्हास्तरावर 02 दक्षता पथके प्रस्तावित करणेच्या सूचना दिल्या.

2/- <u>अवैध वाळू व इतर गौणखनिज उत्खनन व वाहतूकीवर कारवाई</u> -

1) मा.पोलीस अधिक्षक, यांनी अशा प्रकरणी कारवाई केलेवर संबंधितावर आय.पी.सी.कलम 392,395 अन्वये गुन्हे दाखल करावेत,जेणेकरुन संबंधितास जामीन मंजूर होणार नाही व त्याची परिणामकारक अम्मलबजावणी होवू शकेल असे सांगितले.

2) महसूल अधिकारी / कर्मचारी व पोलीस अधिकारी /कर्मचारी यांचा समावेश असलेले पथक उपविभागीय अधिकारी यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेशी चर्चा करुन तयार करावीत असे सूचीत केले.

3) ज्याठिकाणी रात्री-अपरात्री वाळूची चोरी होते अशी ठिकाणे निश्चीत करावीत.त्याचा प्लॅन तयार करावा.त्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी यांना द्यावी.अशा ठिकाणी तात्काळ कारवाईसाठी पोलीस कर्मचारी उपलब्ध करुन देता येतील.

4) [illegible] तसेच दिनांक 03/01/2018 रोजी झालेल्या वाळू / वेळी मिळाली गोपन विशेष केलेनुसार तहसिलदार / उपविभागीय अधिकारी स्तरावर होणा-या दक्षता समितीचे बैठकीस पोलीस अधिकारी यांनाही निमंत्रित करणेत यावे म्हणजेच महसूल व पोलीस यांचेकडून संयुक्तरित्या करणेत येणा-या कारवाईवर नियंत्रण ठेवणे शक्य होईल असे सांगितले.

5) वाळू माफीया गुन्हेगार प्रवृत्तीचे असतात. यातील काही व्यक्तींवर मोक्का अंतर्गत कारवाई केली जात आहे.यापुढेही तशी कारवाई होत राहील.काही व्यक्तींवर एमपीडीए ॲक्ट खाली गुन्हे दाखल आहेत. त्यामूळे कारवाई महसूल व पोलीस अशी संयुक्तरित्या झाली पाहीजे.कोणत्याही महसूल अधिकारी व कर्मचारी यांनी पोलीस कर्मचारी यांचेशिवाय कोणत्याही ठिकाणी अचानकपणे जावून कारवाई करणेचा प्रयत्न करु नये अशा सूचना दिल्या.पोलीस कर्मचारी अशा कारवाईसाठी 24 तास उपलब्ध होतील असे सांगितले.

Scanned by CamScanner

6) कारवाई करताना पोलीस अधिक्षक यांचे पोलीस निरिक्षक यांनी नाव घेतलेस मला संबंधित तहसिलदार / उपविभागीय अधिकारी, यांनी तात्काळ अवगत करावे असे सूचित केले.

7) तहसिलदार / उपविभागीय अधिकारी, यांनी अशा ठिकाणांचा रुट फायनल करुन तो संबंधित पोलीस स्टेशनला दिलेस राजगस्त पथकामार्फतही याबाबीवर आळा घालता येईल असे सांगितले.

8) अवैध उत्खनन व वाहतूकीचे ठिकाणी वाहनांची संख्या 50 पेक्षा जास्त असलेस संबंधित उपविभागीय अधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी एकत्रित कारवाई करावी आणि 10 किंवा 10 पेक्षा जास्त वाहनांची संख्या असलेस तहसिलदार व पोलीस निरिक्षक यांनी संयुक्तपणे कारवाई करावी असे सूचित केले. यामध्ये वाहनांवर कारवाई करताना अशा कारवाईत जरुरीप्रमाणे आय.पी.सी.कलम 307 प्रमाणे संबंधितावर गुन्हा दाखल करणेत यावा असे सांगितले.

3/- <u>अवैध वाळू उत्खनन व वाहतूकीची ठिकाणे निश्चीत करणे</u> - उपविभागीय अधिकारी कराड / माण-खटाव व तहसिलदार फलटण यांनी गावनकाशानुसार अशी ठिकाणे कोणती आहेत याचा समजूतीचा नकाशा तयार केला. तसेच गाव नकाशावर सदरची ठिकाणे कोणती आहेत हे अनुबंधित करुन दाखविले.त्याची प्रत जिल्हाधिकारी कार्यालय व मा.पोलीस अधिक्षक यांना देणेत आली.

उपविभागीय अधिकारी कराड : यांनी कराड तालूकेत प्रामुख्याने 1.येरवळे 2.कालगाव 3.खराडे 4.चचेगाव 5.वारुंजी 6.कोरेगाव 7.उंब्रज व 8.कराड येथील त्रिवेणीसंगमाचे ठिकाणी रात्रीचे वेळी वाळूची चोरी होवू शकते, अशी माहिती दिली.

तहसिलदार फलटण : यांनी 1.वाघरी 2.वाठार निंबाळकर 3.तावडा 4.दुधेबावी 5.जावली 6.कुरवली 7.भाडळी 8.सासकल 9.दालवडी 10.कोराळे 11. जिती याठिकाणी वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक होवू शकते अशी माहिती दिली.

उपविभागीय अधिकारी,माण-खटाव : यांनी माण तालूकेत-1.आंधळी 2.बिदाल 3.पिंगळी तलाव 4.दहिवडी 5.म्हसवड 6.देवापूर 7.पळशी 8.राजेवाडी तलाव तसेच,खटाव तालूकेत-1.भुरकवडी 2.नेरतलाव 3.येरळवाडी 4.अंबवडे 5.चितळी 6.निमसोड 7.मायणी याठिकाणी रात्रीचे वेळी अवैध वाळू उत्खनन व वाहतूक होवू शकते अशी माहिती दिली. मा.जिल्हाधिकारी,यांनी वरीलप्रमाणेच यामध्ये पथकामार्फत परिणामकारक कारवाई करणेच्या सक्त सूचना दिल्या.

मा.जिल्हाधिकारी,यांनी त्रिवेणीसंगम -कराड येथे 24 तास देखरेख ठेवणेच्या सूचना दिल्या.याठिकाणी जाणारा रस्ता चर काढून रस्ता बंद केला आहे असे उपविभागीय अधिकारी,कराड यांनी सांगितले. याप्रमाणे इतर ठिकाणीही अशी बाब होत असेल तर अशा ठिकाणावर जाणारे रस्ते जेसीबीचे सहाय्याने चर काढून वाहतूकीस जाणे-येणेस कायमचे बंद करावेत असे सूचित केले. अवैध उत्खनन व वाहतूकीवर संबंधित तहसिलदार यांचे नियंत्रण न आल्यास संबंधित तहसिलदार यांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरले जाईल असेही सुचीत केले. मा.पोलीस अधिक्षक,यांनी मंगळवार दिनांक 16/01/2018 रोजी होणा-या महसूल अधिकारी यांचे बैठकीचे वेळी सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी यांना उपस्थित राहणेच्या सूचना देत असून या बैठकीचेवेळी सर्व तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांचे समवेत या विषयावर चर्चा करणेस वेळ मिळावी अशी विनंती केली असता मा.जिल्हाधिकारी,यांनी यासाठी मान्यता दिली.

मा.अपर जिल्हाधिकारी, यांनी सातारा जिल्हयाचा मायनिंग प्लॅन मंजूर करावा लागेल.सर्व तहसिलदार यांनी याबाबतचा आराखडा तात्काळ तयार करुन जिल्हास्तरावर सादर करणेच्या सूचना दिल्या.

वरीलप्रमाणे बैठकीत चर्चा होवून बैठकीचे कामकाज संपलेचे जाहीर करणेत आले.

Scanned by CamScanner

सोलापूर

दि. २७/०७/२०१६ रोजी मा.जिल्हाधिकारी सो सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतूकीस आळा घालण्यासाठी जिल्हा स्तरावर समिती सभेचा इतिवृत्तांत.

-----XXX-----

जिल्हास्तरीय गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतूकीस आळा घालण्यासाठी गठित समितीच्या सभेस उपस्थित अधिकारी.

१. मा. जिल्हा पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचे प्रतिनिधी

२. मा. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांचे प्रतिनिधी

३. मा.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर याचे प्रतिनिधी

४. उपजिल्हाधिकारी (महसूल), सोलापूर

५. जिल्हा खनिकर्म अधिकारी , सोलापूर

प्रथमत: उपजिल्हाधिकारी महसूल सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन सदर सभेस सुरुवात केली. मा.जिल्हाधिकारी सो यांनी सर्व सदस्यांना शासन निर्णयातील तरतूदी प्रमाणे कार्यपध्दतीची माहिती सांगितली.

उपजिल्हाधिकारी महसूल यांनी गौण खनिज अवैध उत्खनन वाहतूकीस आळा घालण्यासाठी तहसिलदार यांचे मार्फत कार्यवाही होत असून त्यास पोलीस व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने योग्य ती मदत करुन पोलीस बदोबस्त पुरविणे आवश्यक असलेबाबत सांगितले. त्याविषयी मा.जिल्हाधिकारी यांनी जालुका स्तरावर महसूल , पोलीस व आरटीओ यांचे पथक गठित करून त्यास सूचना, आदेश निर्देशीत केल्यास समन्वय साधला जाणार आहे व कार्यवाही करणे सोयीचे होईल असे सांगितले. तसेच तहसिलदार कार्यवाहीसाठी जातील तेव्हा त्यांचे सोबत पोलीस असणे आवश्यक असून दाखल केलेल्या गुन्हाबाबत वेळेवर कार्यवाही करणेचे निर्देश दिले.

याबाबत पोलीस आयुक्त सोलापूर यांचे प्रतिनिधी यांनी तहसिलदार यांनी कार्यवाही बाबत आधी कळविणे आवश्यक असून तसे कळविल्यास तात्काळ मदत करता येईल व पथकामध्ये पोलीसांचे प्रतिनिधी रात्रादिवस असतील असे सांगितले.त्यानुसार मा.जिल्हाधिकारी यांनी तहसिलदार यांच्या कार्यवाहीवेळी पथकामध्ये पोलीसाच्या प्रतिनिधी मागणी केल्याबर तातडीने उपलब्ध करुन देणेबाबत सूचना दिल्या.

अवैध वाहतूकीबाबत वाहन जप्त केल्यानंतर एफ.आय.आर दाखल केला तर मा. न्यायालयाचे आदेशान्वये पोलिस स्टेशनकडून वाहन सोडण्यात येते व त्यामुळे अवैध वाहनावर MLRC नुसार दंड व अन्य कारवाई करण्यात तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांना अडचण येत असलेबाबत उपजिल्हाधिकारी महसूल यानी सांगितले. त्यादाबत मा.जिल्हाधिकारी यांनी जरी मा.न्यायालयाने अवैध वाहने सोडणेबाबत आदेश दिले तरी महसूल विभागाची कार्यवाही प्रलंबित आहे किंवा पूर्ण झाली याबाबत खात्री करुनच वाहन सोडावे किंवा नाही याबाबत तहसिलदार यांचेशी समन्वय ठेवून संबंधित पोलीस अधिकारी यांनी कार्यवाही करावयाची आहे असे सांगितले. त्याचप्रमाणे मा.न्यायालयाचे आदेश असतील तर अवैध वाहतूकीचे वाहन सोडावे लागत असलेबाबत पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांचे प्रतिनिधी यांनी

E:\My Document\Illegal Mining Meeting.doc

Scanned by CamScanner

मा.जिल्हाधिकारी यांना सांगितले. त्याअनुषंगाने मा. न्यायालयाने विचारणा केल्यास महसूल विभागाची कार्यवाही सुरु असल्याने वाहने सोडले नसल्याबाबत न्यायालयास पोलिस यंत्रणेने अवगत करावे अशा सूचना मा.जिल्हाधिकारी यांनी दिल्या. अवैध वाहन बाबत जमा करुन घेणे अथवा सोडणेबाबत सर्व अभिलेख नोद घेऊनच कार्यवाही होत असलेबाबत मा.जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

सद्यस्थितीमध्ये पुढील वर्षासाठी होणा-या लिलावापर्यंत व तदनंतर शासनाकडून गौण खनिज अवैध उत्खनन वाहतूकीस आळा घालण्यासाठी महसूल विभाग, पोलीस विभाग शहर व ग्रामीण आणि सपप्रादेशिक परिवहन विभाग यांनी मिळून कार्यवाही करणे आवश्यक असलेबाबत मा.जिल्हाधिकारी यांनी सांगितले. आधी वाहन लिलावबाबत परवानगी नव्हती पण सद्या वन विभागाच्या धर्तीवर महसूल विभागास वाहन लिलाव करणे, अवैध गौण खनिज वाहतूकीस पाच पट दंड आकारणी करणेबाबत शासनाने सुधारणा करुन परवानगी दिली असलेबाबत सांगितले.मा.जिल्हाधिकारी यांनी याबाबतच्या लेखी सूचना त्यांच्या अधिनस्त विभागास देण्याचे सूचना दिल्या.

गौण खनिज अवैध उत्खनन वाहतूकीस आळा घालण्यासाठी कार्यवाही ही नियमित करण्यात यावी यामध्ये कोणत्याही प्रकारचा विलंब होऊ नये याबाबत दक्षता घेणेस मा.जिल्हाधिकारी यांनी सूचना दिल्या. जिल्हातील अवैध उत्खनन वाहतूकीस आळा बसणे आवश्यक असून सदर कालावधीत कार्यवाही न झाल्यास त्याचे परिणाम वाळू चोरी होणे व लिलाव प्रक्रियेवर होणार असून त्याबाबत महसूल, पोलिस व परिवहन विभागाने दक्ष राहणेच्या सूचना मा.जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

मा.जिल्हाधिकारी यांनी उपस्थित सर्व सदस्यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

(रणजीत कुमार , भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी सोलापूर

जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर,
(गौण खनिज शाखा),
क.मशा/कार्या-२/गौख/आरआर/२१०३/२०१६
दि.२७/०७/२०१६

प्रति,

Scanned by CamScanner

दि.१९.०३.१८ रोजी मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतूकीस आळा घालण्यासाठी बैठक आयोजित केल होते, उक्त बैठकीचे इतिवृत्तांत खालीलप्रमाणे.

जिल्हास्तरीय गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतूकीस आळा घालण्यासाठी गठीत समितीच्या सभेस उपस्थित अधिकारी खालीलप्रमाणे

१. जिल्हा पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचे प्रतिनिधी.
२. उपजिल्हाधिकारी (महसूल), सोलापूर.
३. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांचे प्रतिनिधी.
४. जिल्हा खनिकर्म अधिकारी, सोलापूर.

प्रथमत: मा.जिल्हाधिकारी सोलापूर यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन सदर सभेस सुरुवात केली.

प्रथमदर्शनी जिल्हा खनिकर्म अधिकारी, सोलापूर यांनी बार्शी, अक्कलकोट, उत्तर सोलापूर या तालुक्यातील अवैध वाळू उत्खनन/वाहतूक याबाबत तक्रारी जास्त असल्याचे सांगितले.

शासन निर्णय दिनांक ०५ डिसेंबर १५ मध्ये नमूद केलेप्रमाणे किती परवानगी दिली, वाळू लिलाव धोरण / वाळूची मागणी/ परवडता/ अपूरती/ तक्रारी किती प्राप्त झाल्या, तपासणी किती केली आदि बाबत चर्चा विचारणा केली तसेच अनाधिकृत गौण खनिज उत्खनन व वाहतूकीसंदर्भात कारवाई मध्ये पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक (सोलापूर ग्रामीण), उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांनी समन्वय संदर्भात सदरची बैठक आयोजित केली असलेबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांना सांगितले.

तहसीलदार यांचेकडुन साप्ताहिक, मासिक अहवाल संकलित करणेबाबत जिल्हाधिकारी यांनी सूचीत केले. मा.जिल्हाधिकारी यांना सोलापूर तालुक्यात किती तक्रारी प्राप्त आल, प्राप्त झालेल्या तक्रारीवर काय कारवाई केली या बद्दल विचारणा केली असता खनिकर्म अधिकारी, सोलापूर यांनी दिनांक ०१ मार्च २०१८ ते १७.०३.१८ पर्यंत १२ तक्रारी प्राप्त झाले असून सदरच्या तक्रार संबंधित तहसीलदार यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविले असलेले सांगितले. त्यावर ३ दिवसात संबंधित तहसीलदार यांचेकडुन तक्रारीबाबत अहवाल प्राप्त होणेबाबत सांगितले.

मा.जिल्हाधिकारी यांनी ग्रामीण पोलीसांचे अक्कलकोट व मंगळवेढा येथे मोठया प्रमाणात अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतूक याबद्दल कारवाई केला आहे त्याबाबत त्यांचे अभिनंदन केले आहे.

पोलीस अधीक्षक
सोलापूर ग्रामीण

D.Y.S.P. Solapur City

3.4.18
आवक विभाग
पोलीस आयुक्तालय
सोलापूर

Scanned by CamScanner

रात्रीच्या वेळेस अवैध उत्खनन जास्तीत जास्त होत आहे, त्यावर महसूल अधिकारी या ठिकाणी पोलीस बंदोबस्त मागत आहे त्यावर तात्काळ त्यांना पोलीस बंदोबस्त देणेबाबत आपल्या स्तरावरुन अधिनस्त असलेल्या पोलीस उपअधीक्षक यांना सांगणेबाबत मा.जिल्हाधिकारी यांनी सुचीत केले. जेणेकरुन अनाधिकृत उत्खनन व वाहतुकीला आळा बसेल.

जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी कर्नाटक हद्दीतील लोकांकडुन महाराष्ट्र हद्दीत चोरी होत आहे ज्यावेळी कारवाई करणेसाठी गेले असता सदरचे लोक कर्नाटक हद्दीत प्रवेश केल्यानें कारवाई करता येत नसल्याचे सांगितले असता त्यावर मा.जिल्हाधिकारी यांनी संबंधित राज्याच्या पोलीस प्रशासनाला पोलीस अधीक्षक ग्रामीण यांनी त्यांचे स्तरावरुन कळविणेबाबत सुचीत केले.

ज्या ठिकाणी वारंवार कर्मचाऱ्यांवर हल्ले होतात तो भाग संवेदनशील म्हणुन पोलीस प्रशासनाने घोषीत करावे, तसेच मोक्का कायदा, पर्यावरण संरक्षण अधिनियम, मुंबई पोलीस कायदा, आणि हद्दपार यासारखे कारवाई जास्तीत जास्त करणेचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

पोलीस प्रशासनामार्फत त्यांनी केलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल देणत यावे, तसेच उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांनी जप्त केलेली वाहनांचा परवाना निलंबित करणेचे सूचना जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दिले.

वाहने जप्त केली जातात तो त्या ठिकाणी ठेवली जातात नंतर मा.न्यायालय यांचेकडुन आदेश आल्यानंतर ती सोडली जातात. त्यावर पुढील होणाऱ्या बैठकीस सरकारी वकील यांनाही बोलविणेबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी सुचीत केले.

पोलीसमार्फत वातावरण निर्मिती करणे गरजेचे आहे. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर जप्त केलेल्या वाहनांचा परवाना निलंबित करणेत यावा, तसेच तलाठयांना ज्या ठिकाणी कारवाई करता येत नाही, मात्र माहिती घेऊन तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, पोलीस प्रशासन यांनी संयुक्तरित्या कारवाई करणेबाबत जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

अवैध उत्खनन/वाहतुकीवर पुढील महिन्यात कालबध्द तपासणी लावावे व यावर अपर जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी सनियंत्रण ठेवावे, व प्रत्येकांना तपासणी करणेबाबतचे उद्दिष्ट देणेत यावे, दक्षता पथकाने प्रत्येक ठिकाणी धाडी घालणेचे सूचना जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दिले, व याचा आढावा पुढील महिन्यात होणाऱ्या बैठकीत घेणेबाबतचे सूचना मा.जिल्हाधिकारी यांनी दिले.

Scanned by CamScanner

तालुक्यात तहसीलदार यांना अवैध उत्खनन/वाहतूक यावर नोंदवही ठेवणेत यावे व उपविभागीय अधिकारी यांनी त्यावर ओढावा घेतला पाहिजे. जी प्रकरणे उघडकीस आलेली त्यावर जास्तीत जास्त कारवाई केली पाहिजे.

उपजिल्हाधिकारी, महसूल, सोलापूर यांनी अक्कलकोट तहसीलदार यांना अवैध उत्खनन मधील वाहने पोलीस स्टेशन जमा करणेबाबत गेले असता अक्कलकोट मधील पोलीस निरीक्षक दक्षिण व उत्तर यांनी दोन्ही हा आमचा भाग येत असल्याने वाहने जमा करुन घेतले नसलेबाबत सांगितले. तसेच ज्यावेळी महसूल प्रशासन बंदोबस्त मागेल त्यावेळी पोलीसांनी त्यांना तात्काळ बंदोबस्त देणेबाबतच सुचना देणेबाबत सूचीत केले.

(डॉ. राजेंद्र भोसले भा.प्र.से)
जिल्हाधिकारी, सोलापूर

क्र.मशा/काम-१/गौख/आरआर-१६९८/१८ दि. २६/०३/२०१८

प्रति,

पोलीस आयुक्त, सोलापूर शहर

पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण

उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर

उपविभागीय अधिकारी विभाग (सर्व)

तहसीलदार (सर्व)

Scanned by CamScanner

सांगली

दिनांक 17/7/2017 रोजी झालेल्या आढावा सभेचे इतिवृत्त.

गौणखनिज अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध घालण्यासाठीची सभा दिनांक 17/7/2017 रोजी संध्याकाळी 7.30 वाजता मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली मा. जिल्हाधिकारी यांच्या कक्षात संपन्न झाली. सभेला खालील प्रतिष्ठानचे सदस्य अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

1. मा. जिल्हाधिकारी, सांगली
2. मा. अपर जिल्हाधिकारी , सांगली
3. मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, सांगली
4. मा. उपप्रादेशीक परिवहन अधिकारी, सांगली
5. उपजिल्हाधिकारी (महसूल) सांगली
6. जिल्हा खनिकर्म अधिकारी, सांगली.

सभेच्या सुरुवातीस मा. जिल्हाधिकारी यांनी सभेकरीता उपस्थित असलेल्या असलेल्या सर्व अधिकारी यांचे स्वागत करून सभेला सुरुवात करण्यात आली. सर्वप्रथम अपर जिल्हाधिकारी यांनी वाळूची होणारी अवैध वाहतूकीबाबत गठित केलेल्या समिती घेतलेल्या निर्णयाची माहिती खालीलप्रमाणे मा. जिल्हाधिकारी यांना दिली.

तालुका समितीमध्ये तहसिलदार, पोलीस निरीक्षक , मोटार वाहन निरीक्षक, महसूल नायब तहसिलदार यांचा समावेश असेल. तहसिल पातळीवर मंडळ अधिकारी, तीन तलाठी, दोन कोतवाल, एक शस्त्रधारी कॉन्स्टेबल यांचा समावेश आहे.

अवैध उत्खनन रोखण्यासाठी खालील उपायांची चर्चा झाली.

1. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ४८ (७) व (८) अन्वये करावाई करणे.
2. कलम १७८ प्रमाणे सक्तीने वसुली करावी व सात-बारा पत्रकी बोजा दाखल करणे.
3. MPDA १९८१ चे कलम ३(२) अन्वये स्थानबध्द करणे.
4. मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम ११३ व १९४ वाहन व वाहन मालकावर कारवाई तसेच १९८८ चे कलम १९ व केंद्रिय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम २१ नुसार वाहन चालकाच्या अनुज्ञप्ती तीन महीने निलंबीत केली जाते.
5. मुंबई पोलीस अधिनियम कलम ५५ व ५६ प्रमाणे तडीपार
6. फौजदारी प्रक्रिया संहिता चॅप्टर केस/ सराईत गुन्हेगार कलम १०७ व ११० ची कारवाई/ बॉन्ड घेणे
7. वाळू माफिया सदस्य किवा सरपंच असल्यास ग्रामपंचायत अधिनियम चे कलम १४ व १६ प्रमाणे अपात्र ठरविणे
8. ETS मोजणी यंत्रणा, वाहनासाठी जॅमर, प्रशिक्षीत मॅकेनीक, सुरेक्षेच्या कारणासाठी पथकामध्ये हत्यार असलेले किंवा हत्याराशिवाय माजी सैनीकाच्या सेवा घेणेसाठीची आर्थीक तरतुद.
9. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीच्या अपराधांबद्दल दोषी ठरलेल्या व्यक्तींना मुंबई पोलीस अधिनियम - १९५१ कलम ५५, ५६ अन्वये तडीपार करणे.
10. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीच्या अपराधांबद्दल दोषी ठरलेल्या व्यक्तींना जामीनदारासह किंवा जामीनदाराविना शांतता राखण्याकरीता फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चॅप्टर केस/ सराईत गुन्हेगार कलम १०७ व ११० अंतर्गत बंधपत्र करुन घेणे.

मा. जिल्हाधिकारी यांनी वाळू तस्करावर नियोजन करून बंदोबस्त करू अशी सूचना दिली. प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना अवैध वाळू वाहतूक करणा-यांचा वाहनधारकांचा वाहतूक परवाना रद्द करणेबाबत सूचना दिली.

मा. जिल्हाधिकारी यांनी सर्व सूचना देऊन सर्वांचे आभार मानले व सभा संपल्याचे जाहीर केले.

जिल्हा खनिकर्म अधिकारी सांगली तथा
सदस्य सचिव गौण खनिज अवैध
उत्खनन व वाहतूक प्रतिबंधक समिती

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
गौण खनिज अवैध उत्खनन व
वाहतूक प्रतिबंधक समिती, सांगली

वाचले- महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक: गौखनि-10/0615/प्र.क्र.287/ख, दिनांक 5 डिसेंबर 2015

क्र.मह/3/खनिज/आरआर/ १८१७ /2015
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली
दिनांक-15/12/2015

आदेश

जिल्हास्तरावर गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक यासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सर्व संबंधित विभागांचा परिणामकारक समन्वय साधण्यासाठी आणि अनाधिकृत उत्खनन व वाहतूकीशी संबंधित अपप्रवृतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मी शेखर गायकवाड, जिल्हाधिकारी सांगली वरील वाचले नुसार खाली नमुद केलेप्रमाणे सांगली जिल्हयातील गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करणेसाठी समितीची नेमणूक करीत आहे.

समितीची रचना

अ.क्र.	अधिकारी	समितीमधील पद
1	जिल्हाधिकारी	अध्यक्ष
2	जिल्हा पोलीस अधीक्षक	सदस्य
3	प्रादेशिक परिवहन अधिकारी	सदस्य
4	जिल्हा खनिकर्म अधिकारी	सदस्य सचिव

सदर समिती आदेशाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत अस्तीत्वात राहील.

(शेखर गायकवाड)
जिल्हाधिकारी, सांगली

प्रति,

1) समितीचे अध्यक्ष, सदस्य व सदस्य सचिव यांना माहितीसाठी
2) उपविभागीय अधिकारी, ----------
3) तहसिलदार, ----------

प्रत- 1) मा. विभागीय आयुक्त सो. पुणे, विभाग पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.
2) मा. कक्ष अधिकारी (ख), महसूल व वन विभाग मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

जिल्हाधिकारी सांगली कार्यालय

दि.22/12/2015 रोजी गौण खनिज अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध घालण्यासाठी जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीचा इतीवृतांत

दिनांक 22/12/2015 रोजी अनाधिकृत गौण खनिज उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध घालण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची बैठक मा.जिल्हाधिकारी सांगली यांचे अध्यक्षतेखाली घेणेत आली. सदर सभेस खालीलप्रमाणे अधिकारी/समितीचे सदस्य उपस्थित होते-

1) जिल्हा पोलीस अधिक्षक, सांगली
2) अपर जिल्हाधिकारी
3) प्रादेशिक परिवहन अधिकारी
4) जिल्हा खनिकर्म अधिकारी
5) उपजिल्हाधिकारी महसूल
6) उपविभागीय अधिकारी, मिरज
7) तहसिलदार आटपाडी
8) तहसिलदार तासगाव

अनाधिकृत गौण खनिज उत्खनन व वाहतूकीस आळा घालणेबाबत जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक, अपर जिल्हाधिकारी, आरटीओ, जिल्हा खनिकर्म अधिकारी या समितीने सर्व प्रश्नांवर चर्चा करुन खालीलप्रमाणे निर्णय घेतले-

1) शासनाने ही जी समिती नेमली आहे, या समितीची पहिली बैठक आज दिनांक 22/12/2015 रोजी घेणेत आली व त्यामध्ये गेले काही महिन्यामध्ये जिल्हयामध्ये झालेल्या सर्व कारवाया व त्याबाबत वेगवेगळया विभागाने आरटीओ, पोलीस, महसूल विभागाकडून केलेल्या कारवाईबाबत एकत्रीत माहिती संकलीत करावी.
2) जिल्हा समिती प्रमाणेच तालुका समिती सुध्दा गठीत करण्याचा निर्णय जिल्हा समितीने घेतला. या तालुका समितीमध्ये तहसिलदार, पोलीस निरीक्षक, मोटार वाहन निरीक्षक, महसूल नायब तहसिलदार हे असतील.
3) तहसिल पातळीवर अवैध वाळू उत्खननाबद्दल धाडी टाकताना खालीलप्रमाणे पथक निर्माण करावे.
   अ) मंडळ अधिकारी (स्वतःचे मंडळ सोडून)
   ब) तीन तलाठी
   क) दोन कोतवाल
   ड) एक शस्त्रधारी कॉन्स्टेबल (ज्याचे आदेश महिन्याला पोलीस निरीक्षक काढतील व दर आठवडयाला वेगवेगळा शस्त्रधारी कॉन्स्टेबल राहील)

4) आतापर्यंत गेल्या 3 वर्षात झालेल्या अवैध उत्खननाशी संबंधित गुन्हे दाखल झालेल्या गंभीर गुन्हेगार विरुध्द हद्दपारीचे प्रस्ताव ताबडतोब तयार करावेत.

5) अवैध उत्खननाशी संबंधित गुन्हे दाखल झालेल्या व्यक्ती विरुध्द फौजदारी संहिता कायद्यानुसार (Cr.P.C) प्रतिबंधात्मक स्वरुपाची कारवाई करावी व सक्षम बंधपत्र घ्यावे.

6) पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगरपालिका, महानगरपालिका व कोणतेही शासकीय विभाग यांनी त्यांची कामे करताना तसेच ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद व पाटबंधारे विभाग या सर्वांनी अधिकृत लिलावधारकाकडूनच खरेदी व रॉयल्टीची पावती असल्याशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तीकडून वाळू खरेदी करु नये. केवळ रॉयल्टी शासनाला भरणा करणे एवढेच शासकीय अधिका-यांचे कर्तव्य नसून अधिकृत लिलावधारकाकडूनच वाळू घेतली किंवा नाही व अनाधिकृत उत्खननातील चोरीचे गौण खनिज आले आहे काय? हे पाहणे सुध्दा संबंधित विभागाचे काम आहे. तसेच अनाधिकृत गौण खनिज वापर केल्यास वाळू गुन्हेगारास मदत केल्यासारखे होईल, ही बाब लक्षात घ्यावी.

7) पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता यांना तालुका समितीमध्ये घ्यावे.

8) अधिक्षक अभियंता पाटबंधारे, टेंभू, म्हैशाळ व कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांना जिल्हा समितीमध्ये घेण्याच्या सूचना मा.जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

9) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कार्यालयाकडून व्हेईकल सस्पेन्शनचा आढावा घेणेच्या सूचना दिल्या. प्रत्येक मासिक सभेमध्ये निलंबित वाहनांवर पुढील काय कारवाई झाली याचा आढावा घेणेत यावा, असे सूचित केले.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने अनाधिकृत वाळू उत्खनन करणारे यांनी motor vehicle act, कायदा व नियमाचे उल्लंघन केले आहे काय याबाबत खात्री करावी त्यामध्ये खालील मुद्दयांचा समावेश करावा.

1) अनोंदणीकृत वाहन/ वाहन परवाना.
2) .परवाना नुतनीकरण
3) प्रमाणापेक्षा जास्त वजन
4) गाडीचे कागदपत्र
5) टॅक्सेशन

10) दंड वसूलीसाठी बॉडमध्येच (बंधपत्र) शासकीय दंड येणेवर अशा 7/12 ला नोंदी करावयाला हरकत नाही असे लिहून घ्यावे.

तहसिलदार तासगांव, आटपाडी यांनी जप्त वाहने लावण्यास अडचण असलेचे सांगितले.

11) अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतूकी संदर्भातील गुन्हे व त्याची माहिती तहसिलदार यांचेकडून खनिकर्म अधिकारी यांनी एकत्र करावी अशा सूचना मा.जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

सुरक्षेसाठी शस्त्रधारी माजी सैनिक, होम गार्ड किंवा महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडल यांचेकडून कर्मचारी उपलब्ध करुन घ्यावे असे पोलीस अधिक्षक सांगली यांनी सांगितले. मा. जिल्हाधिकारी यांनी उक्त प्रकरणी दंडाचा आदेश करताना रॉयल्टीची रक्कम अधिक सिक्युरिटी चार्जेस चीही आकारणी करता येईल का? हे गौण खनिज अधिकारी यांनी तपासावे.

12) जिल्हास्तरावर उपजिल्हाधिकारी रो.ह.यो. जिल्हा पुनर्वसन अधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे मार्फत भरारी पथके नेमुन कार्यवाही करावी.

शासनाने वेळोवेळी काढलेली परिपत्रके, व कायदयाचे तरतुदी यांचे आधारावरुन अनाधिकृत गौण खनिज उत्खनन व वाहतूकीवर जिल्हाभर प्रतिबंध करणेचे व शासकिय महसूल जास्तीत जास्त वाढविणेस प्रयत्न करणे व सर्व शासकीय विभागांनी समन्वयाने व एकजिनसीपणाने कारवाई करणेचे सर्वानुमते ठरले.

जिल्हा खनिकर्म अधिकारी
(सदस्य सचिव)

जिल्हाधिकारी (अध्यक्ष)
सांगली

औरंगाबाद

याचा - महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.गौखनि-10/0615/प्र.क्र.287/ख दिनांक 05 डिसेंबर 2015

जा.क्र.2015/मशाका-2/गौख/कावि-
जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद.
दिनांक 04 जानेवारी 2016

प्रति,

1. मा.पोलीस आयुक्त, औरंगाबाद.
2. मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, औरंगाबाद.
3. प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद.
4. जिल्हा खनिकर्म अधिकारी, औरंगाबाद.

विषय - गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतूकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तररावर समितीची बैठक दिनांक 05.01.2016 रोजी सकाळी 11.00 वाजता.

संदर्भ - 1. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.गौखनि-10/0615/प्र.क्र.287/ख दिनांक 05 डिसेंबर 2015
2. या कार्यालयाचे आदेश दिनांक 14.12.2015

महोदय,

उपरोक्त विषयी सादर करण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णय दिनांक 05/12/2015 अन्वये या कार्यालयाचे आदेश दिनांक 14.12.2015 अन्वये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतूकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तररावर समितीची दर महिन्यातून एकदा किंवा आवश्यकतेनुसार अधिक वेळा बैठक घेऊन खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी, निवेदने व त्यासंबंधात करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घ्यावा व अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी करावयाच्या उपाययोजना विषयी संबंधितांना निर्देश द्यावेत असे निर्देश आहेत.

त्यानुषंगाने गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतूकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तररावर समितीची बैठक दिनांक 05.01.2015 रोजी मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे दालनात सकाळी 11.00 वाजता आयोजित केली आहे.

तरी सदर बैठकीस आपण स्वतः उपस्थित रहावे. ही विनंती.

मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे मान्यतेने))

जिल्हाधिकारी औरंगाबाद करीता

वाचा - महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.गौखनि-10/0615/प्र.क्र.287/ख दिनांक 05 डिसेंबर 2015

जा.क्र.2016/महाका-2/गौख/कावि-
जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद.
दिनांक 04 जानेवारी 2016

आदेश

ज्याअर्थी उपरोक्त शासन निर्णयान्वये गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक यासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने सर्व संबंधित विभागांचा परिणामकारक समन्वय साधण्यासाठी आणि अनाधिकृत उत्खनन व वाहतुकीशी संबंधित अपप्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करावी म्हणुन शासनाने निर्णय घेतला आहे.

जिल्हाधिकारी यांनी सदर समितीची दर महिन्यातून एकदा किंवा आवश्यकतेनुसार अधिक वेळा बैठक घेऊन खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी, निवेदने व त्यासंबंधात करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घ्यावा व अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी करावयाच्या उपाययोजना विषयी संबंधितांना निर्देश द्यावेत असे निर्देश आहेत.

त्याअर्थी औरंगाबाद जिल्हयाकरीता खालील प्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

1. जिल्हाधिकारी	-	अध्यक्ष
2. पोलीस आयुक्त	-	सदस्य
2. जिल्हा पोलीस अधिक्षक	-	सदस्य
3. प्रादेशिक परिवहन अधिकारी	-	सदस्य
4. जिल्हा खनिकर्म अधिकारी	-	सदस्य सचिव

तरी उपरोक्त समितीने संदर्भीय शासन निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

स्थळ प्रतिवर मा.जिल्हाधिकारी
यांची स्वाक्षरी असे.))

स्वाक्षरीत/-
जिल्हाधिकारी औरंगाबाद

प्रतीलीपी -

1. मा.उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव.
2. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
3 संबंधीतास अनुपालनास्तव.

जिल्हाधिकारी औरंगाबाद करीता

संदर्भ : महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.गौखनि 10/0615/प्र.क्र.287/ख दि.5.12.2015

बैठक प्राधान्य

जा.क्र.2017/मशाका2/गौख/कावि /SG
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद
दिनांक : 21.01.2017

प्रति,

1. मा. पोलिस आयुक्त, औरंगाबाद
2. मा.जिल्हा पोलिस अधिक्षक, औरंगाबाद
3. प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद
4. जिल्हा खनिकर्म अधिकारी, औरंगाबाद

विषय : गौणखनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालणेसाठी जिल्हास्तरावर समितीची बैठक
बैठक दि.25.01.2017 दुपारी 12.30 वा.

उपरोक्त विषयी सादर करण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णयान्वये या कार्यालयाचे आदेश दि.14.12.2015 अन्वये गौणखनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी जिल्हा स्तरावर समितीची बैठक दरमहिन्यातून एकदा किंवा आवश्यकतेनुसार अधिक वेळा बैठक घेवून खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी, निवेदने व त्यासंबंधात करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घ्यावा व अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी करावयाच्या उपाययोजना विषयी संबंधितांना निर्देश दयावेत असे निर्देश आहेत.

त्याअनुषंगाने गौणखनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालणेसाठी जिल्हास्तरावर समितीची बैठक **बुधवार दि.25.01.2017 रोजी दुपारी 12.30 वा.** मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे दालनात आयोजित केली आहे.

बैठकीसाठी अदययावत माहितीसह उपस्थित रहावे ही विनंती.

जिल्हाधिकारी औरंगाबाद करीता

मा.जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने

21 JAN 2017

desktop/letter.doc file 433

Scanned by CamScanner

वाचा - महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.गौखनि-10/0615/प्र.क्र.287/ख दिनांक 05 डिसेंबर 2015

जा.क्र.2016/मशाका-2/गौख/कावि- 63
जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद.
दिनांक 20 फेब्रुवारी 2016

प्रति,
1. मा.पोलीस आयुक्त, औरंगाबाद.
2. मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, औरंगाबाद.
3. प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद.
4. जिल्हा खनिकर्म अधिकारी, औरंगाबाद.

विषय - गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतूकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरावर समितीची बैठक दिनांक 05.01.2016 रोजी सकाळी 11.00 वाजता.

संदर्भ - 1. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.गौखनि-10/0615/प्र.क्र.287/ख दिनांक 05 डिसेंबर 2015
2. या कार्यालयाचे आदेश दिनांक 14.12.2015

महोदय,

उपरोक्त विषयी सादर करण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णय दिनांक 05/12/2015 अन्वये या कार्यालयाचे आदेश दिनांक 14.12.2015 अन्वये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतूकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तररावर समितीची दर महिन्यातून एकदा किंवा आवश्यकतेनुसार अधिक वेळा बैठक घेऊन खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी, निवेदने व त्यासंबंधात करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घ्यावा व अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी करावयाच्या उपाययोजना विषयी संबंधितांना निर्देश द्यावेत असे निर्देश आहेत.

त्यानुषंगाने गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वास्तूकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरावर समितीची बैठक दिनांक 22.02.2016 रोजी मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे दालनात सकाळी 11.30 वाजता आयोजित केली आहे.

तरी सदर बैठकीस आपले कडील माहितीसह आपण स्वतः उपस्थित रहावे, ही विनंती.

अपर जिल्हाधिकारी औरंगाबाद

20.2.16
Sujesh Bodkhe
PC-60

20/2/16

OM 20/2/16

अधिक्षक
प्रादेशिक परिवहन कार्यालय,
औरंगाबाद-431001

Scanned by CamScanner

वाचा : महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.गौखनि 10/0615/प्र.क्र.287/ख दि.5.12.2015

बैठक प्राधान्य

जा.क्र.2017/मशाका2/गौख/कावि ५६
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद
दिनांक : 21.01.2017

प्रति,

1. मा. पोलिस आयुक्त, औरंगाबाद
2. मा.जिल्हा पोलिस अधिक्षक, औरंगाबाद,
3. प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद
4. जिल्हा खनिकर्म अधिकारी, औरंगाबाद

विषय : गौणखनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालणेसाठी जिल्हास्तरावर समितीची बैठक
बैठक दि.25.01.2017 दुपारी 12.30 वा.

उपरोक्त विषयी सादर करण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णयान्वये या कार्यालयाचे आदेश दि.14.12.2015 अन्वये गौणखनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी जिल्हा स्तरावर समितीची बैठक दरमहिन्यातून एकदा किंवा आवश्यकतेनुसार अधिक वेळा बैठक घेवून खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी, निवेदने व त्यासंबंधात करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घ्यावा व अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी करावयाच्या उपाययोजना विषयी संबंधितांना निर्देश दयावेत असे निर्देश आहेत.

त्याअनुषंगाने गौणखनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालणेसाठी जिल्हास्तरावर समितीची बैठक **बुधवार दि.25.01.2017 रोजी दुपारी 12.30 वा.** मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे दालनात आयोजित केली आहे.

बैठकीसाठी अदययावत माहितीसह उपस्थित रहावे ही विनंती.

मा.जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने

जिल्हाधिकारी औरंगाबाद करीता

desktop/letter.doc file 433

Scanned by CamScanner

जा.क्र.२०१८/सशाखा/गौ.ख./कावि ६११
जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद
दिनांक - २१/०५/२०१८

प्रति,
०१. मा. पोलिस आयुक्त औरंगाबाद
०२. मा. जिल्हा पोलिस अधिक्षक (ग्रा.)/ औरंगाबाद
०३. प्रादेशिक परिवहन अधिकारी औरंगाबाद
०४. जिल्हा खनिकर्म अधिकारी औरंगाबाद

विषय - गौणखनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा
घालण्यासाठी जिल्हास्तरावर समिती स्थापन करण्याबाबत
संदर्भ - शासन निर्णय क्रमांक गौखनि-१०/०६१५/प्रक्र.२४७/ख दिनांक ०५/१२/२०१५

उपरोक्त विषयी संदर्भीय शासन निर्णयानुसार वाळू व इतर गौणखनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतूकी संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने सर्व संबंधीत विभागांचा परिणामकारक समन्वय साधण्यासाठी आणि अनधिकृत उत्खनन व वाहतूकीशी संबंधीत अपप्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४/०५/२०१८ रोजी ठीक १ :३० वाजता बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. "

त्यानुसार आपणास कळविण्यात येते की, उक्त बैठकीस आपण स्वतः उपस्थित रहावे.

मा.जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने

जिल्हाधिकारी औरंगाबाद करीता

प्रतिलीपी
०१. अपर जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना माहितीस्व
०२. निवासी उपजिल्हाधिकारी औरंगाबाद यांना माहितीस्तव.

जिल्हाधिकारी औरंगाबाद करीता

अतुल आठवले शाखा
जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद
दिनांक
23 MAY 2018
802

Scanned by CamScanner

अवैध गौणखनिजाच्या उत्खनन व वाहतुकीस आळा घालणेबाबत जिल्हास्तरावर समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

शासन निर्णय दि.05.12.2015 मधील निर्देशानुसार आज दि.25.01.2017 रोजी मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. सदरील बैठकीस शासन निर्देशित केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते :-

अ.क्र.	समिती पदाधिकारी	पदनाम	फोन नंबर	समितीवरील पदनाम
1	श्री पी.एल. सोरमारे	जिल्हाधिकारी औरंगाबाद	9921699981	मा.अध्यक्ष
2	श्री सर्जेराव शेळके	प्रादेशिक परिवहन अधिकारी औरंगाबाद	9011988286	सदस्य
3	श्री जी.डी. कोळेकर	मा.पोलिस आयुक्त औरंगाबाद यांचे प्रतिनिधी	9890957878	सदस्य
4	श्री यशवंत जाधव	मा.जिल्हा पोलिस अधिक्षक औरंगाबाद यांचे प्रतिनिधी	9823112155	सदस्य
5	श्री कांबळे	जिल्हा खनिकर्म अधिकारी औरंगाबाद	9405203321	सदस्य सचिव

उपस्थित सर्व समिती सदस्यांचे यावेळी मा.निवासी उपजिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी स्वागत केले.

सर्वप्रथम निवासी उपजिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी शासन निर्णय दि.5.12.2015 मधील निर्देशानुसार सदर समितीच्या स्थापनेमागचा हेतु विशद केला व आतापर्यंत झालेल्या कारवाईबाबतची माहिती सांगितली. त्याचप्रमाणे गौणखनिज म्हणजे नेमके काय व गौणखनिजामध्ये समाविष्ठ होणा-या गौणखनिजांबाबतची माहिती दिली व जिल्हयामध्ये असलेल्या एकूण वाळूघाटांपैकी सर्वेक्षणाअंती पात्र ठरलेल्या वाळूघाटांची संख्या जाहिरातीनुसार व वाळूघाट लिलाव कार्यक्रमानुसार जिल्हास्तरावरील 38 व संयुक्त औरंगाबाद बीड जिल्हयातील 02 मिळून एकूण 40 वाळूघाट लिलावासाठी ठेवण्यात आले होते असे सांगून त्यापैकी 09 जिल्हास्तरावरील वाळूघाट पहिल्या टप्प्यातील वाळूघाट लिलावामध्ये गेले असल्याचे नमूद करुन वाळूघाट लिलाव दुस-या टप्प्यामध्ये एकही वाळूघाट लिलावात गेला नसल्याचे समिती पदाधिका-यांना यावेळी सांगितले. तथापि औरंगाबाद शहरात व तालुक्याच्या ठिकाणी मोठया प्रमाणात बांधकामे चालू असून त्याठिकाणी मोठयाप्रमाणावर वाळू वापरल्या जात आहे त्याकरिता अवैधरित्या गौणखनिज उत्खनन करुन वाहतूक होत असल्याचे नमूद करुन अशा अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी बैठक आयोजित केली असल्याचे व अशा अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत नेमके काय करता येईल याबाबत समिती सदस्यांना आपल्या सूचना मांडण्यासाठी सूचित केले.

त्यावर पोलिस निरीक्षक श्री.यशवंत जाधव यांनी बैठे पथक स्थापन करुन कारवाई करणे योग्य होईल अशी सूचना केली.

तसेच श्री.कोळेकर यांनीही शहरात येणा-या रस्त्यांची नाकाबंदी करणे योग्य होईल अशी सूचना केली.

तसेच श्री.शेळके प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी अशा अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत संबंधित वाहनांवर पथकाने वाहन ताब्यात घेतल्यावर व त्याबाबत परिवहन कार्यालयास सूचना केल्यास 2 तासांचे आत त्यांचेकडील पथकामार्फत नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल असे आश्वासित केले.

त्याचप्रमाणे संबंधित वाहनांवर भा.दं.वि.379 मधील तरतुदीनुसार संबंधित वाहनाचे चालक व मालकावर गुन्हे दाखल करण्याची कारवाई पोलिस विभागामार्फत तसेच गहसुल विभागाकडून म.ज.म.अ.1966 मधील कलम 48(7) 48(8) नुसार करण्यात येईल असे सांगितले.

अशा अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतूकीबाबत M.P.D.A.1981 अंतर्गत कारवाई करावी अशाही सूचना देण्यात आल्या.

अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतुक रोखण्यासाठी रात्रीची गस्त घालून नाकाबंदी करावी. वैजापूर, गंगापूर, पैठण,पाचोड रोड या रस्त्यांकडून मोठ्याप्रमाणात शहराकडे येणारी अशी वाहतूक होत असते त्यासाठी आपले कार्यालयीन स्तरांवर पथकाची स्थापना करुन कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दैनंदिनरित्या या कार्यालयास गौणखनिज शाखेमध्ये सादर करावा.

मा.अपर जिल्हाधिकारी यांनी आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीचा आढावा विचारणा केली असता

0) श्री कोळेकर, यांनी त्यांचे कार्यालयामार्फत 2016 मध्ये 8 प्रकरणांमध्ये 18 आरोपी अटक केली असल्याचे सांगितले.

0) श्री यशवंत जाधव यांनी त्यांचे कार्यालयामार्फत 2016 मध्ये 164 गुन्हे व 180 आरोपी अटक केले असल्याचे तसेच सन 2017 मध्ये आतापर्यंत 10 गुन्हे व 20 आरोपी अटक केले असल्याचे सांगितले.

यावरुन मा.अपर जिल्हाधिकारी यांनी अशा सूचना केल्या की, बैठे पथक स्थापन करा किंवा फिरते पथक स्थापन करा परंतु शहरात कोणत्याहीप्रकारे अवैध वाहतुकीची वाहने येणार नाही व अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतूक पूर्णतः बंद होईल यादृष्टीने कठोर कारवाई करावी असे सूचित केले.

शेवटी सर्वसंमतीने खालीलप्रमाणे (5) बाबींवर एकमत होवून निर्णय घेण्यात आला :-

0. शहरात येणारी चोरटी / अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतुक करणा-या वाहनांवर कठोर कारवाई करावी व त्यासाठी (5) पथकांची नियुक्ती करावी.

ही (5) पथके पैठण रोडवरील कांचनवाडी पोलिस चौकी,. वितेपिंपळगाव, लिंबेजळगाव (तुर्काबादखराडी रोडलगत), पैठण, वीरगाव -वैजापूर रोड या भागात पथकांची गस्त ठेवण्यात यावी.

2. ज्या भागातून संबंधित अवैध गौणखनिजाची वाहतुक होत असेल त्या पोलिस स्टेशनचे संबंधित पोलिस निरीक्षक व संबंधित तहसिलदार यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल असे कळवावे.

3. नदीकाठच्या गावांमध्ये विनाक्रमांकाची असलेल्या ब-याच वाहनांवर प्रादेशिक परिवहन अधिकारी व पोलिस अधिकारी यांनी कारवाई करावी.

4. अवैध गौणखनिज वाहतुकीबाबतकेलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल दैनंदिनरित्या जिल्हाधिकारी कार्यालयास (गौणखनिज शाखा) सादर करावा.

5. नदीकाठच्या गावात ज्याठिकाणी इतर जिल्हयाची हदद लागून येते त्याठिकाणी संबंधित जिल्हयातून अवैध उत्खनन व वाहतूक होत असल्यास तसे या कार्यालयास कळवावे जेणेकरुन संबंधित जिल्हयाचे पथक सोबत घेवून संयुक्त कारवाई करता येईल.

शेवटी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे मा.अध्यक्षांचेवतीने जाहिर करण्यात आले.

(मा.अध्यक्ष)

(मा.सदस्य सचिव)

जालना

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी कार्यालय जालना

(गौण खनिज विभाग)

दुरध्वनी क्र. (०२४८२) २२५५०२
संकेतस्थळ: www.jalna.nic.in

फॅक्स क्र. (०२४८२) २२५५२६
e mail: rdcjalna@gmail.com

जा.क्र.२०१८/गौ.ख./लो.ले.स./७.२.३.७/कावि-

दिनांक: १५/०७/२०१८

प्रति,
मा.अवर सचिव,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई

विषय: **लोकलेखा समितीचा सन २०१४-१५ मधील महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवालातील परिच्छेद क्र.७.२.३.७ बाबत.**

संदर्भ: आपले पत्र क्र.गौखनि १०/२०१७/प्र.क्र.४५७/ख, दि.१४/०९/२०१८ (प्राप्त दि.१५/०५/२०१८)

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्राचे अनुषंगाने सादर करण्यात येतो की, शासन निर्णय दि.०७/१२/२०१५ मधील निर्देशानुसार जालना जिल्ह्यात मा.जिल्हाधिकारी जालना यांचे अध्यक्षतेखाली मा.जिल्हा पोलीस अधिक्षक जालना, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी जालना व जिल्हा खनिकर्म अधिकारी जालना या सदस्यांचा समावेश असलेली समिती या स्थापन करण्यात आलेली आहे. तसेच शासन परिपत्रक दि.१४/०६/२०१७ मधील निर्देशांची अमलबजावणी करुन गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीविरुध्द नियंत्रण ठेवण्यासाठी वेळोवेळी कार्यवाही करण्यात येत आहे.

याबाबत समितीच्या बैठकीचे इतिवृत्तात माहितीस्तव सादर करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी जालना करिता

सोबत: वरिलप्रमाणे

प्रतिलिपी:
मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.

जिल्हाधिकारी जालना करिता

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी कार्यालय,जालना
प्रशासकीय इमारत स.न.488 जालना

दुरध्वनी क्रमांक 02482(225552) Email ID- adcjalna1@gmail.com	फॅक्स क्रमांक 02482 (225326) Website - www.jalna.nic.in

जा.क्र.2017/गौ.खा/इतिवृत्त/कावि/ , दिनांक 07/08/2017

मा.अपर जिल्हाधिकारी,जालना यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 7 ऑगस्ट 2017 रोजी अवैध गौण खनिज उत्खनन प्रतिबंधात्मक उपाययोजनेबाबत आढावा बैठक

दिनांक 07 ऑगस्ट 2017 रोजी मा.अपर जिल्हाधिकारी जालना जिल्हा यांचे अध्यक्षतेखाली जिल्हयातील अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने बैठक घेण्यात आली सदर बैठकीस खालील प्रमाणे दर्शविण्यात आलेले अधिकारी उपस्थित होते.

1. ना.श्री पी.बी.खपले — अपर जिल्हाधिकारी जालना
2. श्री ए.बी.देशपांडे — पोलीस उपअधिक्षक (गृह)
3. श्री ए.ए.खान — उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,जालना

अ. क्र.	चर्चिलेला मुद्दा	करावयाची कारवाई / दिलेल्या सूचना	कार्यान्वयीन यंत्रणा
1	प्रास्ताविक	मा.अपर जिल्हाधिकारी जालना यांनी आढावा बैठकीसाठी आलेल्या अधिका-यांचे स्वागत करुन बैठकीस प्रारंभ केला.	ना.पोलीस अधिक्षक, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी
2	अवैध व परिमाणापेक्षा जास्त गौणखनिज वाहतूक करणारी वाहने जिल्हाधिकारी /संबंधित / तहसील कार्यालयाकडे पाठविणेबाबत	1. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयामार्फत अवैध व परिमाणापेक्षा जास्त गौणखनिज वाहतूक केल्यामुळे सदरील वाहनावर नियमाप्रमाणे दंड वसूल करुन ते सोडून देण्यात येते परंतु अशा प्रकारची अवैध वाहतूक व परिमाणापेक्षा जास्त गौण खनिज वाहतूक करणा-या वाहनावर कार्यवाहीसाठी सदरील वाहने संबंधित तहसील कार्यालय किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे हस्तांतरीत करणे आवश्यक आहे परंतु अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही होत असल्याचे दिसून येत नाही. ज्यामुळे त्यांचेविरुध्द महसुली दंडाची आकारणी करणे शक्य होत नाही असे मा.अपर जिल्हाधिकारी जालना यांनी नमुद केले व यापुढे अशी वाहने ही संबंधित तहसील कार्यालय अथवा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्याची कारवाई करण्याच्या सूचना उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांना दिल्या. 2. अंबड व घनसावंगी तालुक्यामध्ये मोठया	उपप्रादेशिक परिवहन अधिकारी

		प्रमाणावर अवैध उत्खनन व परिमाणापेक्षा जास्त वाहतूकीची प्रकरणे आढळून येतात, परंतु सदरील वाहनावर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली दिसून येत नाही त्यामुळे अंबड व घनसावंगी तालुक्यातून वाळू/गौणखनिज वाहतूक करणा-या प्रत्येक वाहनाची आपले कार्यालयामार्फत तपासणी होणे आवश्यक आहे, उपरोक्त वाहनावर वाहन नंबर आहे अथवा नाही,उपलब्ध असलेला वाहन नंबर तोच आहे किंवा नाही, वाहनाची वाहतूक क्षमता व वाहनामध्ये असलेला वाळूसाठा याबाबतची सविस्तर तपासणी करण्याच्या सूचनाही सर्वसंबंधितास देण्यात आल्या. 3. गौणखनिज वाहतूक करणा-या अनेक वाहनावर वाहन नंबर आढळून येत नाही तसेच काही वाहनांवर चुकीचे वाहन क्रमांक टाकले असल्याचे यापूर्वी आढळलेले आहेत, यामुळे सदरील वाहने गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक करताना आढळून आल्यास त्यावर कार्यवाही करण्यास व तात्पुरता जाब देण्यास अडचणी येतात त्यामुळे बराचसा वेळ खर्च होतो, यामुळे अशाप्रकारे विनावाहन नंबर वाहतूक करणा-या वाहनाचे परमीट रद्द करुन त्यावर कठोर कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. 4. घनसावंगी तालुक्यातील मा.राजाटाकळी ,जांग्लादेवी,भादली,अंबड तालुक्यातील गोंदी येथे मोठ्या प्रमाणावर तसेच जिल्ह्यात इतरही ठिकाणी ट्रॅक्टरमार्फत अवैध गौण खनिजाचे उत्खनन व वाहतूक होण्याची प्रकरणे निदर्शनास आलेली आहेत, परंतु प्रत्यक्षात कृषि प्रयोजनासाठी मंजूर असलेले ट्रॅक्टर अवैधरित्या गौण खनिजाचे वाहतूक करताना आढळून येतात त्यामुळे अशा ट्रॅक्टर विरोधात नियमानुसार कार्यवाही होणे गरजेचे असल्याचे अपर जिल्हाधिकारी जालना यांनी बैठकीत सबंधितास सक्त सूचित केले. 5. तहसील निहाय गौण खनिजाची वाहतूक करणा-या वाहनाची उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयामार्फत तपासणी करुन वाहनाची नियमानुसार नोंदणी केलेली आहे अथवा नाही याबाबतची तपासणी करुन तसा अहवाल संबंधित तहसीलदार यांना सादर करण्यात यावा. वाहनाच्या वाहन नंबरमध्ये काही खाडाखोड अथवा बनावट वाहन नंबर आढळून आल्यास त्यावर नियमानुसार कडक कार्यवाही करण्यात यावी. वाहनावरील नंबर चुकीचा, बनावट अथवा वाहन नंबर नसल्यास याबाबत वाहनाचे नोंदणी रद्द करुन संबंधित वाहनमालकांवर दंडात्मक कार्यवाही करण्याबाबत सर्वसंबंधितास सूचित केले.	
3	एम.पी.डी.ए.कायदया	1. जिल्ह्यामध्ये होणा-या अवैध गौण खनिज	मा.पोलीस

	अंतर्गत कार्यवाही करणेबाबत	उत्खनन व वाहतूक यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी महसूल, पोलीस प्रशासन व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय यांची आहे.यानुळे महसूल प्रशासनामार्फत कार्यवाही करते वेळेस पोलीस प्रशासन यांनी उपरोक्त कार्यवाहीस मदत करणे आवश्यक आहे. परंतु अनेक प्रकरणांमध्ये असे आढळून येते की, महसूल प्रशासनामार्फत एखादी कार्यवाही करण्यात येऊन वाहने जप्त करण्यात आल्यास जागेवरच पोलीस प्रशासन वेळेवर उपस्थित होत नाही किंवा बऱ्याच कालावधीनंतर उपस्थित होतात त्यामुळे बरेचवेळा संबंधित वाहन चालक व त्यांचे सहकारी यांचेकडून महसूल प्रशासनावर जाणीवपूर्वक दबाव आणतात,त्यांना शिवीगाळ व धक्काबुक्की करतात तसेच वाहने पळवून नेण्याचा प्रकार करतात असे प्रकार अलीकडच्या काळात भोकरदन तालुक्यात दि.1.7.2017 रोजी तहसीलदार भोकरदन यांचेमार्फत मौ.हसनाबाद तसीफपूर येथे कार्यवाही करताना आढळून आलेला आहे. महसूल प्रशासनामार्फत अवैध उत्खनन व वाहतुकीची कार्यवाही करताना पोलीस प्रशासनाने विहित कालावधीत सहकार्य करणे आवश्यक आहे. 2. सदरील अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीशी संबंधित अनेक गुन्हे संबंधित पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात येतात, परंतु सदरील गुन्हयामध्ये पुढे कोणती कार्यवाही होते याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध होत नाही, यामुळे अशा प्रकारच्या गुन्हयामध्ये पारदर्शकता तात्काळ कार्यवाही होणे अतिआवश्यक आहे जेणेकरुन वाळुचोरांना धाक निर्माण होईल असे अपर जिल्हाधिकारी जालना यांनी सूचित केले. 3. शासन परिपत्रक दि.1.12.2015 नुसार एम.पी.डी.ए. कायदयांतर्गत कार्यवाही करणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात यावा तसेच या कार्यालयामार्फत सादर करण्यात आलेल्या श्री. रामधान आर्ड या व्यक्तीविरुध्दचा एम.पी.डी.ए. कायदयांतर्गतचा प्रस्तावाबाबत तात्काळ चौकशी करुन तसा अहवाल या कार्यालयास तातडीने सादर करण्याच्या सूचना संबंधितास दिल्या. 4. ज्या ज्या ठिकाणी अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीची प्रकरणे मोठया प्रमाणावर होतात,अशा ठिकाणी पोलीस चौकी उभारुन सदरील अवैध उत्खननावर नियंत्रण ठेवण्यात यावे. तसेच जिल्हयात काही ठिकाणी पोलीस चौकी असूनही मोठया प्रमाणात गौण खनिजाच्या चोरीची प्रकरणे सर्रास घेत आहेत अशा ठिकाणी संबंधित दोषीविरुध्द कठोर कार्यवाही होणे आवश्यक आहे.	जालना

		जेणेकरुन अवैध उत्खनन होण्यास पायबंद होऊ शकेल. जिल्ह्यातील अवैध गौण उत्खनन व वाहतूक तसेच परिमाणापेक्षा जास्त गौण खनिज वाहतूकीस आळा घालण्याकरिता वरील दर्शविलेप्रमाणे उपाययोजना करण्याबाबत सूचित करुन बैठक संपल्याचे घोषित केले.	

अपर जिल्हाधिकारी,जालना

प्रति,

1. मा.पोलीस अधिक्षक, जालना यांना माहितीस्तव सादर.
2. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,जालना यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
3. उपविभागीय अधिकारी, (सर्व) जिल्हा जालना
4. तहसीलदार, (सर्व) जिल्हा जालना

अपर जिल्हाधिकारी,जालना

परभणी

वाचाः शासन निर्णय क्रः गौखनि-१०/०६१५/प्र.क्र.२८७/ख दि.५ डिसेंबर, २०१५

जा.क्र.२०१५/महसूल/गौ.ख/कावी- ३७२
जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
दिनांकः ०४/१२/२०१५

आदेश

ज्याअर्थी गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक यासंर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या आनुषंगाने सर्व संबंधित विभागांचा परिणामकारक समन्वय साधण्यासाठी आणि अनधिकृत उत्खननाच्या वाहतुकीशी संबंधित अपप्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तराव जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

त्याअर्थी जिल्हाधिकारी, परभणी यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

१.	जिल्हाधिकारी	- अध्यक्ष
२.	जिल्हा पोलीस अधीक्षक/पोलीस आयुक्त	- सदस्य
३.	प्रादेशिक परिवहन अधिकारी	- सदस्य
४.	जिल्हा खनिकर्म अधिकारी	- सदस्य सचिव.

सदर समितीची दर महिन्यातून एकदा किंवा आवश्यकतेनुसार अधिक वेळा बैठक घेऊन गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी, निवेदने व त्यासंबधात करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घ्यावा व अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी करावयाच्या उपाययोजना विषयी संबंधितांना निर्देश द्यावेत.

सदर आदेशाची तात्काळ अमलबजावणी करावी.

जिल्हाधिकारी परभणी
१४.१२.१५

प्रतिलिपी,
१.स्विय सहायक, जिल्हाधिकारी, परभणी
२.जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी
३.अपर जिल्हाधिकारी, परभणी
४.प्रादेशिक परिवहन अधिकारी, परभणी.
५.जिल्हा खनिकर्म अधिकारी, परभणी
६.आदेश संचिका.

जिल्हाधिकारी परभणी
१४.१२.१५

शासन निर्णय क्रः गौखनि-१०/०६१५/प्र.क्र.२८७/ख दि.५ डिसेंबर, २०१५ गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतुकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तराव समितीची बैठक. दि.१६.१२.२०१५ सकाळी १०.४५ मि

इतिवृत्त

मा.जिल्हाधिकारी, परभणी यांचे अध्यक्षतेखाली दि.१६.१२.२०१५ रोजी परभणी जिल्हयातील अवैध गौणखनिज उत्खननास/वाहतूकीस आळा घालण्यासाठी बैठक घेण्यात येवून जिल्हयातील गौण खनिज उत्खननाबाबत व वाहतूकीबाबत घ्यावयाची दक्षता व उपाययोजना बाबत आढावा घेण्यात आला. सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१.जिल्हा पोलीस अधीक्षक,परभणी - सदस्य
२अपर जिल्हाधिकारी, परभणी - विशेष निमंत्रीत
३.प्रादेशिक परिवहन अधिकारी,परभणी - सदस्य
४.जिल्हा खनिकर्म अधिकारी, परभणी - सदस्य सचिव.

बैठकीच्या सुरुवातील जिल्हा खनिकर्म अधिकारी तथा सदस्य सचिव यांनी परभणी जिल्हयातील माहे एप्रिल ते नोव्हेंबर २०१५ या कालावधीतील गौणखनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक बाबत दंड करण्यात आलेल्या २६२ प्रकरणातून ४४ लाख ४५ हजार एवढा दंड वसूल केल्याबाबत माहिती दिली.

अवैध उत्खनन व वाहतूकीचे सर्वात जास्त प्रकरणे ता.गंगाखेड, ता.सोनपेठ व ता.पाथरी मध्ये होत असल्याबाबत अपर जिल्हाधिकारी, परभणी यांनी नमुद केले.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, परभणी यांचे समवेत अवैध गौण खनिज वाहतूकी बाबत चर्चाकरुन त्यांचे कार्यपध्दतीबाबत विचारना केली.

परभणी जिल्हयातील अवैध गौणखनिज उत्खननास/वाहतूकीस आळा घालण्यासाठी खालील सुचना करण्यात आल्या.

१.शासन परीपत्रक. दि.२७ फेब्रूवारी २००१ उत्खनन केलेल्या गौण खनिजाची वाहतुक करतांना एका ट्रक मध्ये गौण खनिजाचे परिमाण २ ब्रास पेक्षा अधिक असू नये, तसेच अन्य वाहनात त्याच्या क्षमतेपेक्षा (उदा. टॅक्ट्रर, ट्रेलर १.५ ब्रास) असून नये.

२.तसेच वाळूची वाहतूक करतांना, वाळू प्लास्टीक पेपरने आच्छादीत करण्यात यावी, जेणेकरुन वाळूच्या वाहतूकी दरम्यान वाळू रस्त्यावर सांडल्याने होणा-या वाहनांच्या अपघातांना आळा बसेल.

३.परवानाधारक त्याला मंजूर केलेल्या रेती घाटातून मंजूर केलेल्या परीमाणात उत्खनन करीत आहेत किंवा कसे याबाबत वेळोवेळी अकस्मातपणे निरिक्षण करण्यात यावे व सदर निरिक्षणात परवानाधारक यांच्याकडून अटी व शर्तीचे उल्लंघन झाले असल्यास त्यांच्यावर नियमातील तरतूदीनुसार दंडात्मक कारवाई करण्यात यावी तसेच सदर अटीचे गौणखनिजांचे उत्खनन करणा-याकडून उल्लघन होणार नाही याची योग्य ती खबरदारी न घेणा-या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी.

वरील मुददयावर सविस्तर चर्चा होऊन परभणी जिल्हयात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत तसेच दर महीण्याच्या लोकशाही दिन या दिवशी बैठक घेण्याच्या श्री.अध्यक्ष महोदय यांनी सुचना केल्या. सदस्य सचिव तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी उपस्थितांचे आभार मानून श्री.अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने बैठक संपन्न झाली असे जाहीर केले.

जिल्हाधिकारी परभणी

प्रतिलिपीः (आवश्यक कार्यवाहीस्तव)

१.जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी
२.अपर जिल्हाधिकारी, परभणी
३.प्रादेशिक परिवहन अधिकारी, परभणी.
४.उपविभागीय अधिकारी परभणी/सेलू/पाथरी/गंगाखेड
५.जिल्हा खनिकर्म अधिकारी, परभणी
६ तहसिलदार परभणी/जिंतूर/सेलू/मानवत/पाथरी/पूर्णा/गंगाखेड/पालम/सोनपेठ
७.स्थिय सहायक, जि.अ. परभणी

जिल्हाधिकारी परभणी

14 27/12/2015
जिल्हाधिकारी कार्यालय परभणी

-3-

शासन निर्णय, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक १२ मार्च २०१३.

जा.क्र.२०१५/महसूल/गौ.ख/कावी- 318
जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
दिनांक: २२/१२/२०१५

आदेश

परभणी जिल्हयातील अवैध रेती,दगड,मुरुम ई.गौण खनिजाचे उत्खनन / वाहतूकी बाबत तक्रारी प्राप्त होत आहेत. तसेच याबाबत वर्तमानपत्रातून वेळोवेळी बातम्या प्रसिध्द होत आहेत. जिल्हयातून अवैध रेती,दगड,मुरुम ई.गौण खनिजाचे उत्खनन वाहतूक शासकीय मोजणीपेक्षा अधिक वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करण्याकरीता तसेच नदीपात्रातील रेतीस्थळांची , अवैध रेतीसाठयाची तपासणी करण्याकरीता खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय भरारी पथक तयार करण्यात येत आहे.

पथकातील नियुक्त अधिकारी कर्मचारी यांचे नांव		
१	निवासी उपजिल्हाधिकारी, परभणी	पथक प्रमुख
२	जिल्हा खनिकर्म अधिकारी, परभणी	सह पथक प्रमुख
३	सतिश रेड्डी, अ.का. गौण खनिज शाखा, परभणी	सदस्य
४	गोपाळ डमरे, करमणूक कर निरिक्षक, परभणी	सदस्य
५	पि.एस.शिंदे, करमणूक कर निरिक्षक, परभणी	सदस्य
६	डि.एस.बिनापट्टे, करमणूक कर निरिक्षक, परभणी	सदस्य
७	दशरथ बोटचाटे, लिपीक, गौण खनिज शाखा, परभणी	सदस्य
८	रवी कवडे, लिपीक, आस्थापना शाखा, परभणी	सदस्य
९	माधव वडजे, लिपीक, आस्थापना शाखा, परभणी	सदस्य
१०	सशस्त्र पोलीस गार्ड -२	सहायक

गठीत पथकाने परभणी जिल्हयातील रेतीस्थळे, अवैध उत्खनन व वाहतूकी बाबत तक्रारी च्या आनुषंगाने अचानक भेट देवून तपासण्या कराव्यात तसेच अवैध उत्खनन व वाहतूकीचे प्रकरणे

निर्देशनास आल्यास त्याबाबत महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८ (७) व (८) अन्वये कार्यवाही करावी. सदर आदेशाची तात्काळ अमलबजावणी करावी.

जिल्हाधिकारी परभणी

प्रतिलिपी,

१.पोलीस अधिक्षक, परभणी यांना देवून कळविण्यात येते की, त्यांनी उपरोक्त अरारी पथकासाठी दोन सशस्त्र पोलीस गार्ड मुख्यालयाच्या ठिकाणाहून उपलब्ध करुन द्यावेत.

२.निवासी उपजिल्हाधिकारी, परभणी यांना अनुपालनास्तव

३.उपविभागीय अधिकारी,----------जि.परभणी

४.जिल्हा खनिकर्म अधिकारी, परभणी

५.तहसिलदार----------जि.परभणी

६.संबधीतास अनूपालनास्तव

जिल्हाधिकारी परभणी

१.शासन निर्णय, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक १२ मार्च २०१३,
२.शासन निर्णय महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंब,दि.०५ डिसेंबर २०१५

जा.क्र२०१५/महसुल/गौ.ख/कावी - ३५८
जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
दि. २८ /१२/२०१५

आदेश

परभणी जिल्ह्यातील अवैध रेती,दगड,मुरुम इ.गौण खनिजाचे उत्खनन / वाहतूकी बाबत तक्रारी प्राप्त होत आहेत. तसेच याबाबत वर्तमानपत्रातून वेळोवेळी बातम्या प्रसिध्द होत आहेत. जिल्ह्यातून अवैध रेती,दगड,मुरुम इ.गौण खनिजाचे उत्खनन वाहतूक भारक्षमतेपेक्षा अधिक वाहतूक करणा-या वाहनांची तपासणी करण्याकरीता तसेच नदीपात्रातील रेतीस्थळांची, अवैध रेतीसाठ्याची तपासणी करण्याकरीता खालीलप्रमाणे तालुकास्तरावर भरारी पथक गठीत करण्यात येत आहे.

अ.क्र	तालुका	पथक प्रमुख तथा नियंत्रण अधिकारी	भरारी पथकातील नियुक्त अधिकारी/कर्मचारी
१	परभणी	उपविभागीय अधिकारी परभणी	१.संबंधित तहसिलदार
			२.संबंधित पोलीस निरिक्षक
			२.नायब तहसिलदार (महसुल)
			३.पी.एस.आय/ए.एस.आय. व सोबत पोलीस बंदोबस्त
			४.मंडळ अधिकारी
			५.तलाठी
२	सेलू	उपविभागीय अधिकारी, सेलू	१.संबंधित तहसिलदार
			२.संबंधित पोलीस निरिक्षक
			२.नायब तहसिलदार (महसुल)
			३.पी.एस.आय/ए.एस.आय. व सोबत पोलीस बंदोबस्त
			४.मंडळ अधिकारी
			५.तलाठी
३	पालम	उपविभागीय अधिकारी, सेलू	१.संबंधित तहसिलदार
			२.संबंधित पोलीस निरिक्षक
			२.नायब तहसिलदार (महसुल)
			३.पी.एस.आय/ए.एस.आय. व सोबत पोलीस बंदोबस्त
			४.मंडळ अधिकारी
			५.तलाठी
४	पुर्णा	उपविभागीय अधिकारी, सेलू	१.संबंधित तहसिलदार
			२.संबंधित पोलीस निरिक्षक
			२.नायब तहसिलदार (महसुल)

			३.पी.एस.आय/ए.एस.आय. व सोबत पोलीस बंदोबस्त
			४.मंडळ अधिकारी
			५.तलाठी
	सोनपेठ	उपविभागीय अधिकारी, पाथरी	१.संबंधित तहसिलदार
			२.संबंधित पोलीस निरिक्षक
			२.नायब तहसिलदार (महसुल)
			३.पी.एस.आय/ए.एस.आय. व सोबत पोलीस बंदोबस्त
			४.मंडळ अधिकारी
			५.तलाठी
	मानवत	उपविभागीय अधिकारी, पाथरी	१.संबंधित तहसिलदार
			२.संबंधित पोलीस निरिक्षक
			२.नायब तहसिलदार (महसुल)
			३.पी.एस.आय/ए.एस.आय. व सोबत पोलीस बंदोबस्त
			४.मंडळ अधिकारी
			५.तलाठी
	पाथरी	उपविभागीय अधिकारी, पाथरी	१.संबंधित तहसिलदार
			२.संबंधित पोलीस निरिक्षक
			२.नायब तहसिलदार (महसुल)
			३.पी.एस.आय/ए.एस.आय. व सोबत पोलीस बंदोबस्त
			४.मंडळ अधिकारी
			५.तलाठी
	सेलू	उपविभागीय अधिकारी, सेलू	१.संबंधित तहसिलदार
			२.संबंधित पोलीस निरिक्षक
			२.नायब तहसिलदार (महसुल)
			३.पी.एस.आय/ए.एस.आय. व सोबत पोलीस बंदोबस्त
			४.मंडळ अधिकारी
			५.तलाठी
	जिंतूर	उपविभागीय अधिकारी, सेलू	१.संबंधित तहसिलदार
			२.संबंधित पोलीस निरिक्षक
			२.नायब तहसिलदार (महसुल)
			३.पी.एस.आय/ए.एस.आय. व सोबत पोलीस बंदोबस्त
			४.मंडळ अधिकारी
			५.तलाठी

वरील भरारी पथकातील पथक प्रमुख यांनी पथकातील अधिकारी/कर्मचारी यांचे स्वतंत्र नाजाने आदेश काढावेत, तसेच पोलीस अधिकारी यांचे बाबत संबंधीत पोलीस स्टेशन यांचे कडून माहिती प्राप्त करुन घेवून त्यांचे आदेश काढावेत व त्या बाबतच्या प्रती या कार्यालयास सादर कराव्यात.

Scanned by CamScanner

मागील वेळेच्या पथकामार्फत आपल्या कार्यक्षेत्रातील / तालुक्यातील सर्व रेती स्थळांच्या ठिकाणी स्वतः अचानक एकदा भेट देवून तपासणी करावी. तसेच अवैध गौण खनिजाचे उत्खनन संबंधित प्राप्त झालेल्या आनुषंगाने चौकशी व तपासणी मार्गात पथकामार्फत करावी. अवैध उत्खनन व वाहतूकीचे आलेले निदर्शनास आल्यास त्याबाबत महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८ (७) व (८) अन्वये फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करावी.

परभणी जिल्ह्यात अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतूक होणार नाही याची दक्षता घेवून झालेल्या आलेल्या कार्यवाहीचा अहवाल दर सोमवारी या कार्यालयास खालील विवरणात सादर करावा.

अ.क्र	तालुका	अवैध उत्खनन/वाहतूक प्रकरणे	दंडात्मक रक्कम	दाखल गुन्हे	अटक आरोपी	सहकारी अधिकारी/कर्मचारी सांघेजोरीत झाले

अवैध उत्खनन/ वाहतुकीची घटना वा प्रकरण ज्या महसुल व पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांच्या कार्यक्षेत्रात उपस्थितीत येईल त्यावर संदर्भिय शासन निर्णयामधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

जिल्हाधिकारी परभणी

प्रतिलिपी,

१.पोलीस अधिक्षक, परभणी यांना देवून कळविण्यात येते की, संबंधीत पोलीस ठाणेला यांना आपल्या स्तरावरुन मुबलक पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देण्याबाबत सुचना देण्यात याव्यात.

२उपविभागीय अधिकारी., परभणी/सेलू/पाथरी/गंगाखेड परभणी.जि-

३उप विभागीय पोलीस अधिकारी परभणी शहर/ग्रामीण, पूर्णा,गंगाखेड, सेलू, जिंतूर, यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.

४.संबंधीत पोलीस निरिक्षक यांना कार्यवाहीस्तव (मार्फतः पोलीस अधिक्षक, परभणी)

५.तहसिलदार परभणी/पुर्णा/गंगाखेड/पालम/सोनपेठ/मानवत/सेलू/जिंतूर/पाथरी यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.

६.उप प्रादेशिक परिवहन अधिकारी परभणी यांना आवश्यक कार्यवाहीस्तव

७.स्विय सहायक, जि.अ., परभणी

जिल्हाधिकारी परभणी

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
उप प्र.प.का., प्रशासकीय इमारत, परभणी
Email-mh22@mahatransco
02452-224400

शासन निर्णय क्रः गौखनि-१०/०६१५/प्र.क्र.२८७/ख दि.५ डिसेंबर, २०१५ गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतुकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तराव समितीची बैठक. दि.०४.०१.२०१६ सकाळी १२.३० मि

इतिवृत्त

1.जिल्हाधिकारी, परभणी यांचे अध्यक्षतेखाली दि.०४.०१.२०१६ रोजी परभणी जिल्हयातील अवैध गौणखनिज उत्खननास/वाहतूकीस आळा घालण्यासाठी बैठक घेण्यात येवून जिल्हयातील गौण खनिज उत्खननाबाबत व वाहतूकीबाबत द्यावयाची दक्षता व उपाययोजना बाबत आढावा घेण्यात आला. सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१.जिल्हा पोलीस अधीक्षक,परभणी - सदस्य
२.निवासी उपजिल्हाधिकारी, परभणी - विशेष निमंत्रीत
३.प्रादेशिक परिवहन अधिकारी,परभणी - सदस्य
४.जिल्हा खनिकर्म अधिकारी, परभणी - सदस्य सचिव.

बैठकीच्या सुरुवातील जिल्हा खनिकर्म अधिकारी तथा सदस्य सचिव यांनी परभणी जिल्हयातील गौणखनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक रोकण्यासाठी जिल्हास्तरीय तसेच तालुकास्तरीय भरारी पथक निर्माण केले आहेत. तसेच जिल्हयातील सर्व नदीपात्रातील रेतीघाटांना फौ.दं.स.१९७३ चे कलम १४४ लागू केल्याबाबत माहिती दिली.

परभणी जिल्हयातील अवैध गौणखनिज उत्खननास/वाहतूकीस आळा घालण्यासाठी खालील सुचना करण्यात आल्या

प्रादेशिक परिवहन अधिकारी, परभणी यांचे समवेत अवैध गौण खनिज वाहतूकी बाबत चर्चाकरुन त्यांचे कार्यपध्दतीबाबत विचारना केली असता अवैध गौण खनिज वाहतूक करतांना पकडण्यात आलेले वाहन शासन अध्यादेश दि.१२ जुन २०१५ नुसार संबधीत उपविभागीय अधिकारी यांना सोडण्याचे अधिकार असतांना उप प्रादेशिक परिवहन अधिकारी परस्पर दंड वसुल करुन वाहन सोडून देतात. सबब, प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी अवैध गौणखनिज वाहतूक करतांना पकडण्यात आलेले वाहन सोडण्यासाठी महसुल विभागाकडे पाठवावे असे जिल्हाधिकारी, परभणी यांनी सुचित केले.

पोलीस अधिक्षक, परभणी यांनी अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतुक मध्यरात्री होत असल्याबाबत सांगितले. सदर अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतुकीवर प्रतिबंद करण्यासाठी गठीत पथकामार्फत कडक कारवाई करण्याबाबत अध्यक्षांनी सुचना दिल्या. जेणेकरुन परभणी जिल्हयात अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतुक होणार नाही.

वरील मुद्दयावर सविस्तर चर्चा होऊन परभणी जिल्हयात गौण खनिजाची अवैध उत्खनन व वाहतूक होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत अध्यक्ष महोदय यांनी सुचना केल्या. सदर या परवानगीने बैठक संपन्न झाली असे जाहीर केले.

स्वाक्षरीत/-

जिल्हाधिकारी परभणी

प्रतिलिपीः (आवश्यक कार्यवाहीस्तव)

१.जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी
२.अपर जिल्हाधिकारी, परभणी
३.प्रादेशिक परिवहन अधिकारी, परभणी.
४.उपविभागीय अधिकारी परभणी/सेलू/पाथरी/गंगाखेड
५.जिल्हा खनिकर्म अधिकारी, परभणी
६.तहसिलदार परभणी/जिंतूर/सेलू/मानवत/पाथरी/पूर्णा/गंगाखेड/पालम/सोनपेठ
७.स्विय सहायक, जि.अ. परभणी

जिल्हाधिकारी परभणी

शासन निर्णय दि.०५.१२.२०१५ गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहुकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरावर समिती मासिक बैठक दि.१३.०९.२०१७

इतिवृत्त

आज दि.०५.०८.२०१७ रोजी मा.जिल्हाधिकारी परभणी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे शासन निर्णय दि.०५.१२.२०१५ गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहुकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरावर समितीची मासिक बैठक दि.१३.०९.२०१७ पार पाडली. सदर बैठकीस खालील अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

१.जिल्हाधिकारी परभणी	- अध्यक्ष
२.जिल्हा पोलीस अधिक्षक	- सदस्य
३.निवासी उपजिल्हाधिकारी परभणी	- विशेष निमंत्रीत सदस्य
४.उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी परभणी	- सदस्य
५.उपविभागीय अधिकारी परभणी	- विशेष निमंत्रीत सदस्य
६.उपविभागीय अधिकारी पाथरी	- विशेष निमंत्रीत सदस्य
७.जिल्हा खनिकर्म अधिकारी, परभणी	-समिती सदस्य सचिव

सर्व प्रथम सदस्य सचिव तथा जिल्हाखनिकर्म अधिकारी यांनी समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी परभणी यांना समितीबाबतचा शासन निर्णय तसेच समितीमधील सदस्य यांची ओळख करून दिली. त्या नंतर सदर बैठकीमध्ये खालील मुद्दयावर चर्चाकरण्यात येवुन त्या बाबत निर्णय घेण्यात आला.

अ.क्र.	बैठकीतील सुचना	निर्णयाची अनलबजावणी
१.	उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी,परभणी यांनी अवैध गौण खनिज उत्खनन/ वाहतुक प्रकरणात पकडण्यात आलेल्या वाहनाचे कागदपत्रे तपासणी करुन क्षमतेपेक्षा जास्त गौण खनिजाची वाहतुक केली असल्यास त्या बाबत नियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.	उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी परभणी
२	उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी/कर्मचारी मार्फत अवैध गौण खनिज वाहतूक प्रकरणात पकडण्यात आलेल्या वाहनांवर संबधीत तहसिलदार यांचे शाहरकत घेतल्याशिवाय वाहन सोडण्यात येवू नये	उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी परभणी
३	पोलीस विभाग व परिवहन विभाग मार्फत अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा दर महा प्रकरणनिहाय(वाहन निहाय) अहवाल दिलेल्या विवरणपत्रात जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा	पोलीस अधिक्षक,परभणी उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी परभणी

Processing 2016

४.	अवैध गौण खनिज वाहतूकीवर आळा घालण्यासाठी मौ.पेठशिवणी ता.पालम व मौ.चुडावा ता.पुर्णा येथे पोलीस पोस्ट गठीत करावे	पोलीस अधिक्षक परभणी
५.	अवैध गौण खनिज उत्खनन / वाहतुक प्रकरणी गुन्हा नोंद करते वेळी भा.द.वी कलम ३७९ व महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४८ (७) व (८) कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात यावा.	पोलीस अधिक्षक परभणी संबंधीत उपविभागीय अ संबंधीत तहसिलदार
६.	पालम व गंगाखेड तालूक्यातील मा.जिल्हाधिकारी यांनी पकडण्यात आलेल्या वाहनावर गुन्हयाच्या तपासाची पुढे खोलवर चौकशी पोलीस अधिक्षक परभणी यांनी व्यक्तीशः लक्ष घालून करावी	पोलीस अधिक्षक परभ
७.	अवैध गौण खनिज उत्खनन/वाहतूक/साठवणूक बाबत पंचनामा करत असतांना त्यामध्ये जागेचा नकाशा जोडण्यात यावा	सर्व उपविभागीय अधिकारी सर्व तहसिलदार परभणी
८.	अवैध गौण खनिज उत्खनन / वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी महसुल व पोलीस अधिकारी यांचे गठीत करण्यात आलेल्या पथकाद्वारे अवैध गौण खनिज उत्खननास प्रतिबंध करण्यात यावा. सदर पथकाने उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेशी समन्वय ठेवावा. ज्या ठिकाणी मोठया प्रमाणात अवैध गौण खनिज उत्खनन/वाहतुक आढळुन येईल तसेच अवैध रेती साठे आढळुन आले अशा ठिकणी सदर पथकाने तपासणी व भेट देण्याची दक्षता घ्यावी. तसेच या बाबतीत कायदयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.	पोलीस अधिक्षक परभ जिल्हा खनिकर्म अधिक उप-प्रादेशिक परिवहन अ परभणी सर्व उपविभागीय अधिकारी सर्व तहसिलदार परभणी
९.	अवैध गौण खनिज उत्खनन / वाहतुक प्रकरणात दाखल असलेल्या गुन्हयामध्ये पोलीस अधिक्षक यांनी पाठपुरावा करून त्या बाबत योग्य ती कार्यवाही कारण्यात यावी. दाखल केलेलया गुन्हया बाबत सदयस्थीती बाबत माहिती जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावी.	पोलीस अधिक्षक,परभणी
१०.	पोकलेन मशिनचा मालक कसा शोधावा तसेच संबधीत पोकलेन मशिनची चेसीस नंबरची कुठे नोंद होते या बाबत माहिती सादर करावी	उप-प्रादेशिक परिवहन अ परभणी
११.	पुढील बैठकीसाठी सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी यांना उपस्थीतीत राहण्याबाबत सुचना देव्यात.	पोलीस अधिक्षक,परभणी सर्व उपविभागीय अधिकारी सर्व तहसिलदार परभणी जिल्हा खनिकर्म अधिकारी

बैठकीच्या वेळी फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ अधीन कलमान्वये प्रभावी अमलबजावणी करणे, जिल्ह्यात पोलीस पोस्ट/चेक पोस्ट कार्यान्वीत करुन तया द्वारे अवैध गौण खनिज उत्खनन/ वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्या बाबत बैठकीच्या वेळी चर्चा करण्यात आली.

शेवटी सदस्य सचिव तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी यानी उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

जिल्हाधिकारी परभणी

प्रतिलिपीः (आवश्यक कार्यवाहीस्तव)

१.पोलीस अधिक्षक, परभणी

२.उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी, परभणी

३.जिल्हा खनिकर्म अधिकारी, परभणी.

४.उप विभागीय अधिकारी परभणी/गंगाखेड/पाथरी/जिंतूर जि.परभणी.

५.तहसिलदार सर्व जिल्हा परभणी.

जिल्हाधिकारी परभणी

शासन निर्णय दि.०५.१२.२०१५ गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहुकीस आळा घालण्यासाठी
जिल्हास्तरावर समिती मासिक बैठक दि.०५.०८.२०१७

इतिवृत्त

आज दि.०५.०८.२०१७ रोजी मा.जिल्हाधिकारी परभणी यांचे अध्यखेतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे शासन निर्णय दि.०५.१२.२०१५ गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहुकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरावर समितीची मासिक बैठक पार पाडली. सदर बैठकीस खालील अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

१.जिल्हाधिकारी परभणी	- अध्यक्ष
२.अपर जिल्हाधिकारी परभणी	- विशेष निमंत्रक
३.जिल्हा पोलीस अधिक्षक	- सदस्य
४.उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी परभणी	- सदस्य
५.जिल्हाखनिकर्म अधिकारी, परभणी	-समिती सदस्य सचिव
६.सहाय्यक संचालक अभियोक्ता,परभणी	- विशेष निमंत्रक
७.विधी अधिकारी,जि.अ.का.परभणी	- विशेष निमंत्रक

सर्व प्रथम सदस्य सचिव तथा जिल्हाखनिकर्म अधिकारी यांनी समितीचे अध्यक्ष-जिल्हाधिकारी परभणी यांना समितीबाबतचा शासन निर्णय तसेच समितीमधील सदस्य यांची ओळख करुन दिली.

त्या नंतर सदर बैठकीमध्ये खालील मुद्दयावर चर्चाकरण्यात येवुन त्या बाबत निर्णय घेण्यात आला.

अ.क्र.	बैठकीतील सुचना	निर्णयाची अमलबजावणी
१.	अवैध गौण खनिज उत्खनन / वाहतुक प्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाही मधील वाहन सोडण्यापुर्वी संबंधीत तहसिलदार यांचे लेखी अभिप्राय घेण्यात यावेत त्यानंतर प्रकरणात पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.	पोलीस अधिक्षक,परभणी संबंधीत तहसिलदार, संबंधीत उपविभागीय अधिकारी
२.	अवैध गौण खनिज उत्खनन / वाहतुक प्रकरणी गुन्हा नोंद करते वेळी भा.द.वी कलम ३७९ व महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४८ (७) व (८) कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात यावा.	पोलीस अधिक्षक,परभणी संबंधीत उपविभागीय अधिकारी संबंधीत तहसिलदार
३.	अवैध गौण खनिज उत्खनन / वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी महसुल व पोलीस अधिकारी यांचे संयुक्त जिल्हास्तरीय पथक गठीत करण्यात येवुन सदर पथकादवारे	पोलीस अधिक्षक,परभणी जिल्हा खनिकर्म अधिकारी,परभणी उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी,

	अवैध गौण खनिज उत्खननास प्रतिबंध करण्यात यावा. सदर पथकाने उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेशी समन्वय ठेवुन ज्या ठिकाणी मोठया प्रमाणात अवैध गौण खनिज उत्खनन/वाहतुक आढळुन येईल तसेच अवैध रेती साठे आढळुन आले अशा ठिकणी सदर पथकाने तपासणी व भेट देण्याची दक्षता घ्यावी. तसेच या बाबतीत कायदयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.	परभणी
३.	सहा.संचालक अभियोक्ता तसेच शासकीय अभियोक्त यांनी अवैध गौण खनिज उत्खनन / वाहतुक प्रकरणातील दाखल गुन्ह्यामध्ये मा.न्यायालयास परिच्छेद निहाय उत्तर दाखल करतेवेळी अशा प्रकरणात दंड आकारण्याबाबत उल्लेख करुन मा.न्यायालयास दाखल करण्यात यावीत.	सहा,संचालक अभियोक्ता,परभणी जिल्हा सरकारी वकील,परभणी
४.	अवैध गौण खनिज उत्खनन / वाहतुक प्रकरणात दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये पोलीस अधिक्षक यांनी पाठपुरावा करुन त्या बाबत योग्य ती कार्यवाही कारण्यात यावी.	पोलीस अधिक्षक,परभणी
५.	उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी,परभणी यांनी अवैध गौण खनिज उत्खनन/ वाहतुक प्रकरणात पकडण्यात आलेल्या वाहनांची व कागदपत्रे तपासणी करुन क्षमतेपेक्षा जास्त गौण खनिजाची वाहतुक केली असल्यास त्या बाबत नियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्याता यावी.	उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी परभणी

बैठकीच्या वेळी फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ मधील कलमान्वये प्रभावी अमलबजावणी करणे, जिल्हयात चेक पोस्ट कार्यान्वीत करुन तया द्वारे अवैध गौण खनिज उत्खनन / वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्या बाबत बैठकीच्या वेळी चर्चा करण्यात आली. \

शेवटी सदस्य सचिव तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

स्वाक्षरीत/-
जिल्हाधिकारी परभणी

प्रतिलिपी: (आवश्यक कार्यवाहीस्तव)
१.पोलीस अधिक्षक, परभणी
२.उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी, परभणी
४.उप विभागीय अधिकारी परभणी/गंगाखेड/पाथरी/जिंतूर
५.तहसिलदार सर्व जिल्हा परभणी.

जिल्हाधिकारी परभणी करिता

हिंगोली

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, हिंगोली.

दुरध्वनी क्र.(02456)221450 (खनिकर्म विभाग) फॅक्स क्र.(02456)-222400

जा.क्र.2016/गौ.ख/अवैध वाह./कावा- दिनांक :-11 /08/2017

वाचा - १. महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक ०५/१२/२०१५
२. महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक १४/०६/२०१७

विषय:- गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने समिती गठित करणे बाबत.

आदेश

ज्याअर्थी संदर्भीय शासन निर्णय अन्वये राज्यात नागरिकरण, इतर राज्यातील नागरीकण पेक्षा फारच कमी होत असल्याने, वाळूची मागणी फार वाढत आहे. वाळूची मागणी व पुरवठा यातील असमतोल निर्माण झाला असुन्याने वाळूच्या उत्खनन व वाहतुक क्षेत्रामध्ये काही अपप्रवृत्ती निर्माण झालेल्या आहेत त्यामुळे वाळू व इतर गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकी संदर्भात बऱ्याचशा तक्रारी होत असतात.या तक्रारीची प्रत्यक्ष तपासणी करुन तसे संबंधित विभागांचा परिणामकारक समन्वय साधून त्यांचे निराकरण करणे तसेच गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतुकीशी संबंधित अपप्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीकोनातून आणी गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतुकीस आळा घालण्यासाठी महसुल विभाग, पोलीस विभाग व परिवहन विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश असलेली समिती गठीत करण्याचे निर्देश आहेत.

त्याअर्थी संदर्भ क्र २ मधिल परिच्छेद क्र (iii) नुसार खालील प्रमाणे गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने समिती गठित करण्यात आलेली आहे. सदर समितीची रचना खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	नामनिर्देशित पद	समितीतील स्थान
१	जिल्हाधिकारी	अध्यक्ष
२	पोलीस अधिक्षक, हिंगोली	सदस्य
३	प्रादेशिक परिवहन अधिकारी, हिंगोली	सदस्य
४	जिल्हा खनिकर्म अधिकारी	सदस्य-सचिव

त्यानुसार वरील प्रमाणे नियुक्त असलेल्या समिती मधिल सदस्य यांनी या कार्यालयात वेळोवेळी जिल्हा स्तरिय समिती ची आयोजीत केलेल्या बैठकीस विषयांकित प्रकरणा बाबतच्या माहिती सह उपस्थित राहावे.

स्वाक्षरीत

जिल्हाधिकारी हिंगोली

प्रत:-
१. पोलीस अधिक्षक, हिंगोली यांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
२. प्रादेशीक परिवहन अधिकारी, हिंगोली यांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
३. उप विभागीय अधिकारी, हिंगोली/कळमनुरी/वसमत यांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
४. तहसिलदार, हिंगोली/सेनगाव/कळमनुरी/वसमत/औंढा ना यांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव

11.08.17

जिल्हाधिकारी हिंगोली

महाराष्ट्र शासन

http://maharashtra.gov.in

क्रमांक : गौखनि २१अ/१२१५/प्र.क्र.६५१/ख.
महसूल व वन विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय मुंबई ४०० ०३२,
दिनांक: ०७/०१/२०१६.

सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी.

विषय : गौण खनिज -- संकीर्ण
वाळू/रेती निर्गतीकरीता बारकोड वाहतूक पासेसचा वापर करण्याबाबत.

शासनाने पत्र महसूल व वन विभाग समक्रमांक दि. २९/१२/२०१५ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी महाऑनलाईन लिमिटेड यांना सन २०१५-२०१६ या वर्षाकरिता राज्यातील सर्व जिल्हयात वाळू/रेती वाहतूकीकरीता SMATS प्रणाली अंतर्गत दिनांक ३१ मार्च, २०१६ अखेरपर्यंत टोकन नंबर देण्याची कार्यवाही तात्काळ सुरु करण्याबाबत विनंती करण्यात आली होती. तथापि, महाऑनलाईन कडून अद्यापही SMATS प्रणाली अंतर्गत वाळू/रेती वाहतूकीकरीता टोकन नंबर देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आलेली नाही.

राज्यात सन २०१५-१६ या वर्षाकरीता वाळू/रेती गटाचे लिलाव झाले असून, वाळू/रेतीच्या वाहतुकीसाठी, SMATS प्रणाली अंतर्गत वाळू/रेती वाहतूकीकरीता टोकन नंबर देण्याची कार्यवाही सुरू होईपर्यंत बारकोडींग केलेली पावती पुस्तके वापरण्यात यावी.

आपला,

(ह. वा. पन्हाते)
कक्ष अधिकारी

महाराष्ट्र शासन

तात्काळ

क्रमांक : गौखनि ३१ अ/१२१६/प्र.क्र. ५९/ख,
महसूल व वन विभाग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: ०३/०२/२०१६.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी.

विषय :गौण खनिज -- संकीर्ण
वाळू/रेती निर्गतीकरीता बारकोड वाहतूक पासेसचा वापर करण्याबाबत.

संदर्भ : शासन पत्र क्र. गौखनि ३१ अ/१२१५/प्र.क्र. ६५१/ख
दि. ०७.०१.२०१६

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्रान्वये सन २०१५-१६ या वर्षाकरिता वाळू/रेतीच्या वाहतुकीसाठी, SMATS प्रणालीअंतर्गत टोकन नंबर देण्याची कार्यवाही सुरू होईपर्यंत बारकोडींग असलेले पावती पुस्तके वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

२. तथापि, श्री. मनोज दादासाहेब मोरे यांनी याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे जनहित याचिका क्र. १५/२०१५ दाखल केली आहे. मा. न्यायालयाने दि. २७.०१.२०१६ रोजी सदर याचिकेच्या सुनावणीमध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने संदर्भांकित शासन पत्र स्थगित करण्यात येत आहे.

आपला,

(ह. व्यं. पन्हाते)
कक्ष अधिकारी

महाराष्ट्र शासन

ई-मेल- dokh.rfd@maharashtra.gov.in

क्रमांक : गौखनि १०/०२१६/प्र.क्र.१५८/ख,
महसूल व वन विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २२/०३/२०१६.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी

विषय : गौण खनिज- संकीर्ण
वाळू वाहतूकीसाठी वाहतुक पास छापण्याबाबत.

संदर्भ: १) शासनपत्र समक्रमांक दिनांक २४/०२/२०१६

२) शासनपत्र क्र गौखनि १०/१०१४/प्र.क्र. ४९८/ख, दि. २२/०२/२०१६

३) केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक काआ १४१ (अ), दि. १५/०१/२०१६

संदर्भाधीन क्रमांक ३ येथिल केंद्र शासनाच्या दिनांक १५/०१/२०१६ च्या अधिसूचनेमधील तरतूदीनुसार गौण खनिज उत्खननासाठी पर्यावरण अनुमतीचे प्रस्ताव विहीत नमून्यात जिल्हास्तरीय समितीसमोर सादर करणे, सदर अधिसूचनेसोबतच्या परिशिष्ट १० मध्ये विहित केल्यानुसार नदीपात्रातील वाळू उत्खननासाठी तसेच इतर गौण खनिजासाठी जिल्हा सर्वेक्षण अहवाल तयार करणे व परिशिष्ट १२ मध्ये विहित केल्यानुसार नदीपात्रातील वाळू उत्खननाबाबत सनियंत्रणाची प्रक्रिया राबविणे याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना वरील विषयासंबंधीच्या संदर्भाधीन क्रमांक १ येथील पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

तसेच संदर्भाधीन क्रमांक २ येथील पत्रान्वये, सन २०१५-२०१६ या वर्षाकरीता वाळू वाहतूकीसाठी महाऑनलाईन लिमीटेड या शासनप्रणीत कंपनीने विकसीत केलेली SMATS प्रणालीअंतर्गत दिनांक ३१/०३/२०१६ पर्यंत टोकन नंबर देण्याच्या सूचना महाऑनलाईन लिमीटेड कंपनीस देण्यात आल्या आहेत.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, मला आपणास असे कळविण्याचे निदेश आहेत की, दिनांक ०१/०४/२०१६ पासून वाळूच्या वाहतुकीसाठी केंद्र शासनाच्या उक्त दिनांक १५०/१ २०१६/रोजीच्या अधिसूचनेसोबतच्या परिशिष्ट १२ मधील अनुक्रमांक १ मध्ये दिलेल्या सुरक्षा वैशिष्ट्यानुसार शासनाच्यावतीने वाहतुक पास (Transport Permit) छापून

घेण्याराठी शासनाने जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी वाळूच्या वाहतूकीसाठी आवश्यक तेवढया वाहतुक पास छापून घेऊन संबंधित लिलावधारकास टप्याटप्याने वापरण्यास द्याव्यात. लिलावधारकाने त्यांना प्राप्त झालेल्या वाहतुक पास वापरल्यासंबंधीचा अहवाल सादर केल्यानंतरच पुढील वाहतुक पास देण्यात याव्यात. तरोच, वाउतुक पासच्या वापरावर नियमानुसार संनियंत्रण ठेवावे, ही विनंती.

(माधव काळे)
उप सचिव

हिंगोली

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, हिंगोली.

दुरध्वनी क्र.(02456)221450 फॅक्स क्र.(02456)-222400

दिनांक 01.01.2018 रोजी मा. जिल्हाधिकारी हिंगोली यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या गौण खजिन अवैध उत्खनन व वाहतुक समितीच्या बैठकीचा कार्यवृतांत

सदर बैठकीस खालील प्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

1. पोलीस अधिक्षक हिंगोली.
2. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हिंगोली.
3. जि. खनिकर्म अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली.

बैठकीच्या सुरवातीस सर्व उपस्थित अधिकारी यांना नविन वर्षाच्या शुभेच्छा देवुन व त्यांचे स्वागत करुन खालील विषयावर चर्चा करण्यात आली.

अ.क्र.	विषय	कार्यवाही करणारे अधिकारी
1.	महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग अधिसूचना दिनांक 10 नोव्हेंबर 2016 अन्वये गौण खनिज अवैध उत्खनन व साठा या गुन्हयांच्या संदर्भात जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, जिल्हा खनिकर्म अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी यांना त्यांच्या अधिकार क्षेत्रातील संबंधित न्यायालया समोर खान व खनिजे (विकास व विनियमन) अधिनियम 1957 चे कलम 22 अन्वये लेखी फिर्याद दाखल करण्याकरीता प्राधिकृत करण्यात आले आहे. त्यानुसार संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांनी कार्यवाही करणे बाबत सूचना देण्यात आल्या	जिल्हा खनिकर्म अधिकारी, उपविभागीय अधिकारी सर्व , तहसिलदार सर्व व त्यांचे अधिनस्त अधिकारी/ कर्मचारी जि. हिंगोली,
2.	जिल्हयातील ज्या रस्त्याने गौण खनिज वाहतुक होत असेल अशा रस्त्यावर मोक्याचे ठिकाण निश्चित करुन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाचे मदतीने चेक्‌ पोस्टचे स्थान (जसे की, जिंतुर नाका, नर्सि नाका, नांदेड नाका, झिरो फाटा, माळेगाव, बासंबा, इत्यादी) निश्चित करुन चेक पोस्ट तयार करुन गौण खनिजाची वाहतुक होत असल्याचे निदर्शनास आल्यास असे वाहने तपासणी करुन अवैध रित्या वाहतुक होत असल्यास संबधित वाहन चालक व वाहन मालकावर म.ज.म.1966 चे कलम 48 (7) व (8) अन्वये कार्यवाही करणे बाबत सूचना देण्यात आल्या.	पोलीस अधिक्षक हिंगोली, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हिंगोली, संबंधित उपविभागीय अधिकारी, तहसिलदार जि. हिंगोली.

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, हिंगोली.

दुरध्वनी क्र.(02456)221450 फॅक्स क्र.(02456)-222400

3.	लिलावात न गेलेल्या रेती घाटातुन अवैध रेती उत्खनन होणार नाही या करिता सदर क्षेत्रात C.R.P.C कलम 144 लागु करावे. तसेच वारंवार गौण खनिज चोरी करतांना वाहन आढळुन आल्यास सदरील वाहनावर प्रतिबंध करण्यासाठीचे प्रस्ताव संबंधित विभागाने /कार्यालयाने वेळीच उप प्रादेशिक परिवहन कार्यालयास पाठवावे.	पोलीस अधिक्षक हिंगोली सर्व उपविभागीय विभागीय अधिकारी, सर्व तहसिलदार जि. हिंगोली.
4.	जिल्हयाते सांयकाळी 06.00 ते सकाळी 06.00 पर्यत रेतीचे उत्खनन व वाहतुक होणार नाही या बाबत कलम C.R.P.C कलम 144 लागु करण्यात यावे	जि. पोलीस अधिक्षक हिंगोली.
5.	जिल्हयात अवैध गौण खजिन वाहतुक होणार नाही व असे निदर्शनास आल्यास संबंधितावर कार्यवाही करणे साठी जिल्हा .खनिकर्म अधिकारी यांनी जिल्हा स्तरावर तसेच उपविभाग व तहसिल स्तरावर पथकाची नियुक्ती करावी.	जिल्हा खनिकर्म अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार सर्व हिंगोली जिल्हा.
6.	गौण खनिज वाहतुकी करीता निर्गमित करण्यात आलेल्या बारकोड युक्त वाहतुक पासेस व S.M.S. यांची तपासणी करावी. असे प्रकरण निदर्शनास आल्यास अवैध गौण खनिज वाहतुकीवर दंडात्मक व फौजदारी कार्यवाही करुन जप्त केलेले वाहने संबधित परिसरातील पोलीस स्टेशन मध्ये जमा करावी. व त्या बाबत मा. जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी वा जिल्हा खनिकर्म अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली यांना कळवावे.	सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार हिंगोली जिल्हा.

सदस्य सचिव
जिल्हा स्तरीय अवैध गौण खनिज वाहतुक समिती
तथा
जिल्हा खनिकर्म अधिकारी हिंगोली.

अध्यक्ष
जिल्हा स्तरीय अवैध गौण खनिज वाहतुक समिती
तथा
जिल्हाधिकारी हिंगोली.

गौण खनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड

विषयः- वाळू/रेती अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत जिल्हास्तरीय दक्षता समितीची पहिली बैठक.

दिनांकः- 26/03/2018, सायंकाळी- 5.30 वा. स्थळः- जिल्हाधिकारी, कार्यालय, नांदेड

उपस्थिती पट

अ. क्र	उपस्थित अधिकारी यांचे नांव	कार्यालयीन पदनाम	समितीतील पदनाम	ई-मेल आय.डी.	स्वाक्षरी
1	श्री.अरुण डोंगरे	जिल्हाधिकारी, नांदेड	अध्यक्ष	Collector.Nanded@maharashtra.gov.in	
2	श्री चंद्रकिशोर मीना	पोलिस अधिक्षक, नांदेड	सदस्य	Sp.nanded@gmail.com	
3	श्री अशोक शिनगारे	मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नांदेड	सदस्य	zpnanded@gmail.com	
4	श्री संतोष पाटील	अपर जिल्हाधिकारी, नांदेड	सदस्य	adcnanded@gmail.com	
5	श्री. राहुल क्ष. जाधव	सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड	सदस्य	mh26@mahatranscom.in	
6	ना.ए.पि.पाटील तहसिलदार, प्रतिनिधी	जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख, नांदेड	सदस्य	slrnanded@yahoo.in	
7	श्री विजय अवधाने	प्र. जिल्हा खनिकर्म अधिकारी, नांदेड	सदस्य सचिव	dmonanded1@gmail.com	

मा.जिल्हाधिकारी, नांदेड यांचे अध्यक्षतेखाली दि.26 मार्च, 2018 रोजी घेतलेल्या दक्षता समितीच्या बैठकीचे इतिवृत्तांत

दि.26 मार्च, 2018 रोजी मा.श्री.अरुण डोंगरे, जिल्हाधिकारी, नांदेड यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे निजी कक्षामध्ये दक्षता समितीच्या सर्व सदस्यांची बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी, प्रतिनिधी उपस्थित होते.

अ.क्र.	उपस्थित अधिकारी/प्रतिनिधीचे नाव व पदनाम	कार्यालयाचा पत्ता
1	श्री.अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी	जिल्हा परिषद, नांदेड
2	श्री.संतोष पाटील, अपर जिल्हाधिकारी	जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
3	श्री.जयराज कारभारी, निवासी उपजिल्हाधिकारी	जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
4	श्री.राहुल अ. जाधव, सहा.प्रादेशिक परीवहण अधिकारी	प्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेड
5	श्री.ना.ह. पिंपळगांवकर, शिरस्तेदार	जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, नांदेड
	श्री.विजय अवधाने, जिल्हा खनिकर्म अधिकारी	जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

सर्वप्रथम मा.जिल्हाधिकारी महोदयांनी नांदेड जिल्ह्यातील अवैध उत्खनन व वाहतुकीच्या अनुषंगाने प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने आढावा घेतला. तद्नंतर त्यांचे निराकरण करणेसंदर्भात खालीलप्रमाणे सुचना देण्यात आल्या आहे.

अ.क्र.	विषय	बैठकीस दिलेले निर्देश
1	सर्व उपविभागीय अधिकारी, जिल्हा नांदेड	• गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतूकीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य व्हावे, यासाठी सर्व उपविभागीय अधिकारी यांनी उपविभागीय स्तरावर स्वतंत्र दक्षता पथक व भरारी पथक गठीत करण्यात यावी. सदरील पथकाचा मासिक अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात यावा. • शासन निर्णय दि.03/01/2018 मधील 17 (अ(3)) मधिल गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या तक्रारीच्या पडताळणीसाठी उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समिती गठीत करण्यात यावी. सदरील समितीची दरमहा बैठकीचे आयोजन करुन बैठकीचे इतिवृत्त जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावे.
2	सर्व तहसिलदार, जिल्हा नांदेड	• गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतूकीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य व्हावे, यासाठी सर्व उपविभागीय अधिकारी यांनी तहसिल स्तरावर स्वतंत्र दक्षता पथक व भरारी पथक गठीत करण्यात यावे. सदरील पथकाचा मासिक अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात यावा. • शासन निर्णय दि.03/01/2018 मधील 17 (अ(3) मधिल गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या तक्रारीच्या पडताळणीसाठी तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समिती गठीत करण्यात यावी. सदरील समितीची दरमहा बैठकीचे आयोजन करुन बैठकीचे इतिवृत्त जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावे. • शासन निर्णय दि.03/01/2018 मधील 17 (अ(4) नुसार ग्रामस्तरावर

		ग्राम दक्षता समिती गठीत करण्याबाबत संबंधीत तलाठी यांना सुचना द्याव्यात. तसेच त्यांचे दरमहिन्याचे बैठकीचे आयोजन करुन तहसिल स्तरावर इतिवृत्त मागविण्यात यावेत. • तहसिलदार यांनी अवैध रेती वाहतुकीमध्ये जप्त केलेली वाहनामध्ये जी वाहने क्षमतेपेक्षा जास्त वाहतुक करीत असतील अशा वाहने प्रादेशिक परिवहन विभागाकडे मोटार वाहन कायद्यान्वये कार्यवाही करणेसाठी वर्ग करण्यात यावी. • तसेच लिलावात निर्गत रेतीघाटाच्या दर महिन्याला ईटीएस मशीनव्दारे मोजणी करुन अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा. • रात्रीच्या वेळी उत्खननाबाबत तसेच निर्गत घाटातुन यंत्राच्या सहाय्याने वाळु उत्खनन होत असल्याने विविध वर्तमानपत्रातुन बातम्या येत आहेत. त्याची खातरजमा करुन कार्यवाही करावी. • सर्व स्टॅटीक व भरारी पथकांना बारकोड तपासणीच्या ॲप बाबत प्रशिक्षण द्यावे. भरारी व स्टॅटीक पथकांना बारकोड ॲपव्दारे तपासलेल्या पावत्याचे रजिष्टर ठेवावे व त्या नोंदी व वाहन याची पडताळणी करण्यात यावी. • दि.03/01/2018 च्या शासन निर्णय व फेब्रु-2006 चा पर्यावरण विषयक अधिसुचनेतील तरतुदीचे तंतोतंत पालन होते याची दक्षता घ्यावी.
3	पोलिस अधिक्षक, नांदेड	• उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांच्या आवश्यकतेनुसार कार्यवाहीसाठी पोलिस संरक्षण देण्यात यावे.
4	प्रादेशिक परीवहन अधिकारी, नांदेड	• परिवहन विभागाने त्यांचे स्तरावर परिवहन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे पथक गठीत करुन जिल्हयात क्षमतेपेक्षा जास्त रेती वाहतुक करणा-या वाहनांवर कार्यवाही करणेसाठी आदेशित करण्यात यावे. तसेच तहसिल कार्यालयाकडुन अशा प्रकारची वाहने वर्ग करण्यात आल्यास मोटार वाहन कायद्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

वरील इतिवृतात नमुद केल्यानुसार सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना कार्यवाही करणेसंदर्भात सुचना देण्यात याव्यात असे निवासी उपजिल्हाधिकारी यांनी दिल्या. मा.जिल्हाधिकारी महोदयांचे परवानगीने आजची बैठक संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

जिल्हाधिकारी, नांदेड

बीड

दिनांक 25.07.2017 रोजी मा.जिल्हाधिकारी बीड यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या गौण खनिज अवैध उत्खनन व वाहतूक संदर्भात आयोजीत करण्यात आलेल्या सभेचे इतिवृत्तांत.

आज दिनांक 25.07.2017 रोजी दुपारी 01.00 वाजता वाजता जिल्हायातील रेती व इतर गौण खनिज उत्खननावर व वाहहतूकीवर आळा बसावण्याकरीता उपाययोजना आखण्याकरीता स्थापित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीची बैठक आयोजित करण्यात आली.

सदर बैठक मा.जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. बैठकीस खालील सदस्य, सदस्य सचिव उपस्थित होते.

1.जिल्हा पोलीस अधिक्षक, बीड
2.उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड
3.अपर जिल्हाधिकारी, बीड
4.जिल्हा खनिकर्म अधिकारी, बीड

जिल्हयातील रेती/ गौणखनिज अवैध उत्खनन/वाहतूकीवर आळा बसवण्याकरीता जिल्हा स्तरावर पथक स्थापन करुन पथक प्रमुख म्हणून जिल्हा खनिकर्म अधिकारी, महसूल शाखेतील नायब तहसीलदार, परिवहन उप निरिक्षक, पोलीस शिपाई यांच्या समवेत राहिल.

तसेच तालुका स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या पथका बरोबर तहसीलदार यांनी संबधित पोलीस स्टेशनशी संपर्क साधून पथकास पोलीस शिपाई यांना पथकासोबत द्यावे.

जिल्हयातील त्या रस्त्याने रेती/ खनिजाची वाहतूक अधिक प्रमाणात आहे. अशा गेवराई, माजलगाव, गडी, नामलगावफाटा या बाबत बीड तालुक्यातील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या मदतीने चेकपोस्ट ची स्थाने निश्चित करुन चेकपोष्ट तयार करावे. प्रत्येक चेकपोष्ट वर तालुका कार्यालयातील कमीत कमी दोन कर्मचारी, एक परिवहन निरिक्षक व संबधित तालुक्यतील पोलीस स्टेशनचा एक पोलीस शिपाई पथकात समावेश करुन संबधित उपविभागीय अधिकारी यांनी तहसीलदार यांच्या समवेत चर्चा करुन निश्चित करावे

उपविभागीय अधिकारी, तहसील कार्यालय यांनी तक्रार राजिस्टर ठेवावे व प्रत्येक तक्रारीची नोंद घ्यावी व तक्रार निकाली निघाली याबाबत खात्री करुन घ्यावी तक्ररीची शहनिशा करण्याकरीता स्थळावर एकत्रित पणे कार्यवाही पुर्ण करावी अवैध उत्खनन व वाहनाच्या दंडात्मक कार्यवाहीचे देखील नोंदवहीमध्ये नोंदी ठेवाव्यात. वांरवार रेती लिलावात न गेलेले व बंद खाणी क्षेत्रातून कोणतेही उत्खनन व वाहतूक होणार नाही या करीता सदर क्षेत्रात CRPC 144 कलम जारी करावे.वांरवार गोणखनिजाची चोरी करतांना वाहन आढळून आल्यास सदरील वाहन प्रतिबंध करण्या बाबतचे प्रस्ताव परिवहन विभागास संबधित विभागाने / कार्यालयाने पाठवावे.

जिल्हयात सांयकाळी / सकाळी नियमित रेतीचा वाहतूक / उत्खनन करीता सर्व रती स्थळावर CRPC 144 लावण्याचे ठरविण्यात आले.

वरील प्रमाणे कायवाही करण्यावावत सर्वानुमते ठरविण्यात आले. व शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर करण्यात आले.

25.7.17

सदस्य सचिव,
तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी, बीड

प्रतिलिपी,

1.मा.जिल्हा पोलीस अधिक्षक यांना माहितीस्तव सादर.
2.अपर जिल्हादंडाधिकारी बीड यांना आवश्यकत्या कार्यवाहीस्तव सादर.
3.उप प्रादेशिक परिवहन अधिकारी बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
4.सर्व उपविभागीय अधिकारी जिल्हा बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

25.7.17

सदस्य सचिव,
तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी, बीड

उस्मानाबाद

जिल्हाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(गौण खनिज विभाग)

दुरध्वनी क्र.02472-225618 फॅक्स क्र.02472-228018

Email- ID rdc1osmanabad@gmail.com

2018/मह./गौ.ख./सिआर-02

दिनांक :- 19.05.2018

प्रति,

श्री.दिनेश चव्हाण,
अवर सचिव,महसूल व वन विभाग,
मंत्रालय,मुंबई.

विषयः- लोकलेखा समितीचा सन 2014-15 मधील महसूली क्षेत्रातील लेखापरीक्षा अहवालातील परिच्छेद क्र.7.2.3.7.

संदर्भः- आपले पत्र क्र.गौखनि10/1017/प्र.क्र.457/ख दि.14/05/2018.

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन 2014-15 या वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालातील उक्त परिच्छेद क्र. 7.2.3.7. मध्ये उपस्थित विषयाबाबत अभिप्राय कळविणे बाबत सुचीत केले होते

त्यानुसार उस्मानाबाद जिल्हयाचे अभिप्राय खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहेत.

- परिच्छेद 7.2.3.7

अ.क्र.	मुद्दा	अभिप्राय
1	As envisaged in GR dated 05/12/2015 ,whether Committee under the Chairmanship of Collector is formed in every district?	होय उस्मानाबाद जिल्हयात शासन निर्णय 05/12/2015 प्रमाणे समिती स्थापन झालेली आहे.
2	The details of meetings conducted along with minutes of meetings may be furnished to may be Furnished to PAC.	दि. 29.06.2017च्या बैठकीचे इतिवृत्त यासोबत सादर करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी उस्मानाबाद
करीता

प्रत- मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

जिल्हाधिकारी उस्मानाबाद
करीता

जिल्हाधिकारी कार्यालय उस्मानाबाद

(गौण खनिज शाखा)

फोन नंबर 02472/225618 फॅक्स क्रं.02472/228018

ईमेल आयडी - rdc1osmanabad@gmail.com

गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतूकीस आळा घालण्यासाठी मा.जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीचे इतिवृत्तांत .

आज दिनांक 29.06.2017 रोजी दुपारी 12.00 वाजता जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांच्या अध्यक्षतेखाली गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतूकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची संबंधीत सदस्य व सदस्य सचिव यांची आढावा बैठक घेण्यात आली सदर बैठकीस खालील प्रमाणे उपस्थित होते.

1.पोलीस अधीक्षक उस्मानाबाद तथा सदस्य

2.अपर जिल्हाधिकारी उस्मानाबाद

3.प्रादेशिक परिवहन अधिकारी, उस्मानाबाद तथा सदस्य

4.जिल्हा खनिकर्म अधिकारी उस्मानाबाद तथा सदस्य सचिव

अपर जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी प्रथम शासन निर्णय क्रं. गौखनि-10/0615/प्र.क्र.287 दिनांक 5 डिसेंबर 2015 व शासन परिपत्रक क्रं. गौखनि 10/0316/प्र.क्र.204/ दिनांक 14/06/2017 मधील सूचनेनुसार गौण खनिज च्या अवैध वाहतूक उत्खननाला आळा घालण्याच्या उपाय योजनेबाबत चर्चा केली.

उस्मानाबाद जिल्हयामध्ये गौण खनिज अवैध वाहतूक उत्खनन जे होते त्या मध्ये बहुतांश परंडा तालुक्यातील सीना नदीच्या काठावर सोलापूर व उस्मानाबाद जिल्हयाची जी सीमा आहे तेथे उत्खननाच्या व वाहतूकीच्या तक्रारी मोठया प्रमाणावर प्राप्त होतात त्यामध्ये परंडा तालुक्यामध्ये सीना नदी पात्रातून जे उत्खनन व वाहतूक होते त्या बाबत विशेष लक्ष देणेबाबत विचार करण्यात आला व सूचना देण्यात आल्या. वाशी तालुक्यातील मौ. फक्राबाद येथून मांजरा नदीच्या पात्रातून काही प्रमाणावर गौण खनिज वाळू चे उत्खनन होते व त्याची वाहतूक केल्याबाबत काही तक्रारी प्राप्त झाल्या त्यावरही चर्चा करण्यात आली. येत्या कालावधीमध्ये कळंब शहरा नजीक असलेल्या मांजरा नदी पात्रातुन जुना अनुभव लक्षात,घेता गौण खनिज अवैध वाहतूक उत्खनन होण्याची शक्यतेबाबत चर्चा करण्यात आली.

या तीन ही ठिकाणच्या उत्खननावर विशेष लक्ष देण्याचे निर्देश अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी दिले. परंडा तालुकयातील सीना नदीच्या पात्रातून होणारे उत्खनन व वाहतूक यासाठी पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे परंडा यांनी एक पथक गठीत करावे व त्या पथकामध्ये उप विभागीय अधिकारी यांचे समंतीने एक मंडळ अधिकारी दयावा. सदर पथकासाठी उप विभागीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे असलेले वाहन वापरावे व गौण खनिज उत्खनन व वाहतूक यावर नियंत्रण ठेवावे असे निर्देश देण्यात आले. मौ. फकराबाद येथे नियमित भेटी देवून उत्खननाबाबत महसूल व पोलीस अधिकारी यांनी नियंत्रण ठेवावे. कळंब येथे मांजरा नदी पात्रातून होणारे उत्खनना बाबत नियंत्रण ठेवणेबाबत निर्देशीत करण्यात आले.

कळंब , फक्राबाद येथून होणारे अवैध उत्खननावर नियंत्रण ठेवण्यासाठी उप विभागीय अधिकारी कळंब यांनी एक पथक गठीत करुन दोन पोलीस कर्मचारी यांचा समावेश करावे व वेळोवेळी तपासण्या कराव्यात. यापुर्वी गौण खनिज अवैध वाहतूकीसंदर्भात जे गुन्हे घडले आहेत त्यामध्ये काही व्यक्ती वारंवार समाविष्ट होत असल्यास त्यांच्या विरुध मोक्का, MPDA अंतर्गत कार्यवाहीसाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावे असे निर्देश जिल्हाधिकरी तथा अध्यक्ष यांनी दिले.

यापुर्वी वाळू वाहतूकीच्या गुन्हयामध्ये असे निदर्शनास आले आहे की, एखाच व्यक्तीने एमएच-25 1713 या क्रमांकाना वेगवेगळया सिरीज मध्ये अनेक वाहनांच्या नोंदी घेतल्या व पास वर एम एच-25 एम.एच-1713 उल्लेख करुन वेळोवेळी सर्वांची दिशाभूल केली त्यामुळे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी उस्मानाबाद यांना यापुढे 1713 क्रमांक अवजड वाहनांना देण्यात येवू नये असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले. गौण खनिज अवैध वाहतूकीमध्ये जी वाहने गुंतली आहेत व त्यावर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 48 (7) (8) अन्वये दंडाची कार्यवाही केली आहे अशी वाहन मालकाने संबधीत तहसिलदार अथवा उपविभागीय अधिकारी यांचेकडे बंधपत्र दिले आहे अशा सर्व वाहनाची यादी सर्व उपविभागीय अधिकारी , सर्व तहसिलदार यांनी संबधीत नोंदणी प्राधिकारी यांना कळवावे असे वाहन हस्तांतरण न करणेबाबत उप प्रादेशिक अधिकारी उसमानाबाद यांनी कार्यवाही करावे असे निर्देश देण्यात आले.

गौण खनिज वाळूची अवैध वाहतूक करताना जी वाहने या पुढे आढळतील ती महसूल विभाग अथवा पोलीस विभाग यांनी त्यांची विभागीय कार्यवाही करताना अशी वाहने बंधपत्र घेवून सोडून देणेबाबत उप प्रादेशीक परिवहन अधिकारी यांना कळवून मोटार वाहन अधिनियम अंतर्गत दंड होत असल्यास ती कार्यवाही करावी असे निर्देशीत करण्यात आले. उप प्रादेशीत परिवहन अधिकारी यांनी त्यांचे अरारी पथकासाठी गौण खनिज वसुलीची अवैध वाहतू करताना जी वाहने आढळतील त्यावर मोटार वाहन अधिनियम अंतर्गत कार्यवाही करावी अशी

वाहने नजीकचे तहसिलदार, उपविभागीय अधिकारी यांना माहिती कळवावे व वाहनाची कार्यवाही करणेबाबत आवश्यक ती माहिती दयावी.

सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

जिल्हाधिकारी, उस्मानाबाद
क्र.2017/मह/गौख/सीआर-34
दिनांक- 29/06/2017

प्रत माहिती कार्यवाही व अनुपालनास्तव
1.पोलीस अधीक्षक उस्मानाबाद.
2.अपर जिल्हाधिकारी उस्मानाबाद
3.निवासी उपजिल्हाधिकारी उस्मानाबाद
4.प्रादेशिक परिवहन अधिकारी उस्मानाबाद
5.जिल्हा खनिकर्म अधिकारी उस्मानाबाद
6.उपविभागीय अधिकारी उस्मानाबाद,उमरगा,भूम,कळंब.
7.तहसिलदार उस्मानाबाद,तुळजापूर,उमरगा,लोहारा,भूम,परंडा,कळंब,वाशी.

जिल्हाधिकारी, उस्मानाबाद

जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय

लातूर

(गौण खनिज/ विभाग)

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक गौखनि१०/०६१५/प्र.क्र.२८७/ख दिनांक ५ डिसेंबर २०१५

क्रं.२०१५/गौणखनि/गौणखजिरा/कावि- दिनांक 30/4/2018

आदेश

गौणखनिजाच्या अवैध उत्खनन वाहतूकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरावर समिती स्थापन करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक गौखनि१०/०६१५/प्र.क्र.२८७/ख दिनांक ५ डिसेंबर २०१५ च्या तरतुदीनुसार लातूर जिल्हयाकरिता गौणखनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक यासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुशंगाने सर्व संबधित विभागाचा परिणामकारक समन्वय साधण्यासाठी आणि अनाधिकृत उत्खनन व वाहतूकीशी संबधित अपप्रवृती नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालिलप्रमाणे समिती स्थापन करण्यांत येत आहे.

अ.क्र.	अधिका-याचे नाव	पदनाम
१	जिल्हाधिकारी	अध्यक्ष
२	जिल्हा पोलिस अधिक्षक /पोलिस आयुक्त	सदस्य
३	प्रादेशिक परिवहन अधिकारी	सदस्य
४	जिल्हा खनिकर्म अधिकारी	सदस्य सचिव

(श्री.जी.श्रीकांत)
जिल्हाधिकारी लातूर

तिलीपिः- १.मा.अपर मुख्य सचिव,महसूल व वन विभाग,मंत्रालय मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर
२.मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर
३.समितीचे सदस्य ---------- यांना माहितीस्तव सादर
४.उपविभागीय अधिकारी लातूर/औसा-रेणापूर/निलंगा/उदगीर/ अहमदपूर माहितीस्तव सादर
५. तहसिलदार लातूर / औसा /निलंगा/ रेणापूर /शिरुर अंनतपाळ /देवणी/ उदगीर/अहमदपूर/जळकोट चाकूर माहितीस्तव सादर

जिल्हाधिकारी लातूर

अकोला

क्र. कक्ष 29/खनिकर्म//कावि-1151 /2018
जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला
दिनांक 19 मे, 2018

प्रति,

मा. सचिव,
महसूल व वन विभाग, (ख)
मंत्रालय,
मुंबई 400 032

विषय :- लोकलेखा समितीचा सन 2014-15 मधील महसूली क्षेत्रावरील लेखापरिक्षा अहवालातील परिच्छेद क्र. 7.2.3.7

संदर्भ :- शासन पत्र क्र. गौखनि 10/1017/सं.क्र.457/ख, दिनांक 14 मे, 2018

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयानुसार, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन 2014-15 या वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्र. 7.2.3.7 मध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयानुसार महालेखापाल यांनी सादर केलेल्या अभिप्रायाबाबतची अकोला जिल्ह्याची माहिती खालील प्रमाणे-

1. शासन निर्णय दिनांक 5 जानेवारी, 2015 नुसार अकोला जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गौणखनिजाच्या अवैध उत्खनन वाहतुकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरावर समितीची स्थापना करण्यांत आलेली आहे.

2. जिल्हास्तरीय समितीने घेतलेल्या सभेचे इतिवृत्त या सोबत अवलोकनार्थ संलग्न करण्यांत येत आहे.

उपरोक्त प्रमाणे मुद्देनिहाय माहिती पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव सविनय सादर.

सहपत्र :- वरील प्रमाणे

आपला विश्वासु
Approved
जिल्हा खनिकर्म अधिकारी,
अकोला

प्रतिलिपी :- मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहितीकरिता सविनय सादर.

जिल्हा खनिकर्म अधिकारी,
अकोला

DATE 11 | 01 | 2016 PAGE

गौणखनिजाच्या अवैध उत्खनन वाहतुकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरावर समिती स्थापन करण्याबाबत....

शासन निर्णय दि. 5 डिसेंबर, 2016 चे अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गौणखनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारींचे अनुषंगाने सर्व संबंधित विभागांचा परिणामकारक समन्वय साधण्यासाठी आणि अनधिकृत उत्खनन व वाहतूकीशी संबंधीत अपप्रवृत्तींवर नियंत्रण ठेवण्यासाठी खालील प्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

(1) जिल्हाधिकारी, अध्यक्ष

(2) जिल्हा पोलीस अधीक्षक, सदस्य

(3) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सदस्य

(4) जिल्हा खनिकर्म अधिकारी, सदस्य सचिव

वरील प्रमाणे समिती स्थापन्याकरीता आज दि. 11 जानेवारी, 2016 रोजी मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली सभेचे आयोजन करण्यात आले.

सदर सभेला वरील प्रमाणे सदस्य उपस्थित होते

DATE | | PAGE

① अरविंद पाटील
पोलिस उपअधीक्षक (मुख्यालय) — Absent
9702744555

② राजेंद्र वाघोले
प्र.अ.प्रा.पं.अ. (आर.)

③ डॉ. आर. जी. फुटी
जिल्हा खनिकर्म अधिकारी

शासन निर्णयामध्ये अभिप्रेत असलेल्या बाबींवर चर्चा करण्यात आली. त्यावर मा. जिल्हाधिकारी यांनी अवैध गौणखनिजाची चोरी रोखण्यासाठी पोलीस विभाग व परिवहन विभाग यांची संयुक्त जबाबदारी असून विशेषत: रात्रीच्या वेळी तपासणी पथक/गस्त पथक पोलीस विभाग यांचेकडून कार्यवाही होणे अपेक्षित असले या समन्वे कार्यवाही होण्यासाठी आपले अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांना सक्त निर्देश देण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विभागाची बैठकीमध्ये द्यावा.

यापुढे प्रति महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी समितीची बैठक नियमाने मा. जिल्हाधिकारी यांनी निर्देश दिले व सभा संपल्य झाल्या करण्यात आली.

वाशिम

जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम
काटा रोड वाशिम
दूरध्वनी ०७२५२-२३३६५३/२३४२३८ फॅक्स ०७२५२-२३२८५८
ईमेल : rdc_washim@rediffmail.com,वेबसाईट http://www.washim.nic.in

क्र.कक्ष-६/गौखनि/कावि-१५५/२०१५ दिनांक:- २३/०२/२०१५

प्रती,

उपसचिव,
महसुल व वन विभाग,
जागतीक व्यापार केंद्र
कफ परेड, मुंबई ४०० ००५

विषय :- सन 2014-2015 या वर्षाच्या वाळु /रेती लिलाव.
SMATS प्रणालीच्या वापरामध्ये येत असलेल्या अडचणी बाबत.

उपरोक्त विषयांस अनुसरुन शासनाने सन 2014-2015 या वर्षाकरीता रेती वाहतुकीकरीता SMATS प्रणालीचा वापर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार या कार्यालयाने सदर बाबतीत कार्यवाही सुरु केली आहे. परंतु SMATS प्रणालीचा वापर करतेवेळी खालील अडचणी येत आहेत.

Verification SMS पाठविल्यानंतर टोकन नंबरची माहीती प्राप्त होत नाही. त्याऐवजी खालील प्रमाणे SMS येतो

1. Invalid request time expired
2. Departmenrt service is not available
3. Blank (Empty)असा SMS येतो.
4. SMS Verification करीता Request पाठविली असता सदर प्रणालीचा SMS ब-याचदा उशिराने (अर्धा तास) प्राप्त होतो. किंवा ब-याचदा प्राप्त होत नाही.

वरील अडचणीमुळे तपासणीमध्ये वाहतूकीच्या ट्रकचा मोठया प्रमाणावर खोळंबा होतो तसेच वाहतुक करणारे ठेकेदार व तपासणी अधिकारी यांच्यात विनाकारण वादाचे प्रसंग होत आहेत. या अडचणीमुळे वाळू लिलावाच्या पुढील फे-यांमध्ये लिलावासाठी ठेकेदार उत्सुक दिसून येत नाही. तरी या प्रणालीमध्ये तातडीने तांत्रीक सुधारणा होणे आवश्यक आहे तसेच या प्रणालीसोबत वाहतुक पास देण्याची व्यवस्था सुरु करणे आवश्यक आहे.

२/२/१५

अपर जिल्हाधिकारी
वाशिम

कार्यालय
अपर जिल्हाधिकारी कार्यालय
वाशिम

जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम
काटा रोड वाशिम
दूरध्वनी ०७२५२-२३३६५३/२३४२३८ फॅक्स ०७२५२-२३२८५८
ईमेल : rdc_washim@rediffmail.com,वेबसाईट http://www.washim.nic.in

क्र.कक्ष-६/गौखनि/कावि-१२८१/२०१६ दिनांक:- ९/०२/२०१६

प्रती,

१. जिल्हा पोलीस अधिक्षक वाशिम
२. प्रादेशिक परीवहन अधिकारी वाशिम

विषय :- गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतुकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरावर समिती स्थापन करणे बाबत.

संदर्भ :- महसुल व वन विभाग यांचे शासन निर्णय क्र गौखनि-१०/०६१५/प्र.क्र.२८७/ख दि. ५ डिसेंबर १५

उपरोक्त शासन निर्णयात नमुद केल्यानुसार गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुपंगाने सर्व संबधित विभागाचा परिणामकारक समन्वय साधण्यासाठी आणि अनधिकृत उत्खनन व वाहतुकीशी संबधित अपप्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती स्थापन केलेली आहे.

1. जिल्हाधिकारी - अध्यक्ष
2. जिल्हा पोलीस अधिक्षक - सदस्य
3. प्रादेशिक परिवहन अधिकारी - सदस्य
4. जिल्हा खनिकर्म अधिकारी - सदस्य सचिव

2. सदर समितीची दर महीण्यातुन एकदा किवा आवश्यक्तेनुसार अधिक वेळा बैठक घेउन गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी, निवेदने व त्यासंबधात करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात येईल व अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी करावयाच्या उपाययोजना विषयी मा. जिल्हाधिकारी महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 11/02/2016 रोजी दुपारी 1.00 वाजता सभा आयोजीत केली आहे.सदर सभेकरीता आपण मा. जिल्हाधिकारी महोदयांच्या कक्षात उपरोक्त दिनांकास उपस्थित रहावे ही विनंती.

सहपत्र :- शासन निर्णय

जिल्हा खनिकर्म अधिकारी
वाशिम

प्रतिलिपी

मा. जिल्हाधिकारी महोदयांचे स्विय सहायक, यांना माहीती करीता

जिल्हा खनिकर्म अधिकारी
वाशिम

जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम
काटा रोड वाशिम
दूरध्वनी ०७२५२-२३३६५३/२३४२३८ फॅक्स ०७२५२-२३२८५८
ईमेल : rdc_washim@rediffmail.com,वेबसाईट http://www.washim.nic.in

क्रा.क.१९७/१६ दि.३१/१/१६

दि.११/०२/२०१६ रोजी अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुक रोखण्याकरीता आयोजीत केलेल्या
जिल्हास्तरीय समिती सभेचे इतीवृत्त
स्थळ - जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम

महसुल व वन विभाग शासन निर्णय दिनांक ०५/१२/२०१५ नुसार जिल्हयातील अवैध उत्खनन व वाहतुक या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीचे अनुषंगाने सर्व संबधित विभागाचा परीणामकारक समन्वय साधण्यासाठी आणि अनधिकृत उत्खनन व वाहतुकीशी संबधित अपप्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठन करण्यात आले आहे. दिनांक ११/०२/२०१६ रोजी १.०० वाजता मा. जिल्हाधिकारी महोदयांचे अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली.सदर समिती सभेस जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे प्रतिनिधी, प्रादेशिक परीवहन अधिकारी वाशिम यांचे प्रतिनिधी, जिल्हा खनिकर्म अधिकारी वाशिम, उपविभागीय अधिकारी वाशिम हे उपस्थित होते.

सर्वप्रथम जिल्हयातील अवैध उत्खनन व वाहतुक या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीचा आढावा घेण्यात आला आज रोजी जिल्हास्तरावर रेती /वाळु तसेच अवैध गौण खनिज संदर्भात तक्रार प्राप्त झाली नसल्याचे जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी सांगीतले. दिनांक ०५/०२/२०१६ रोजी वाशिम तहसिल कार्यालयातील कर्मचा-यावर झालेल्या हल्याबाबत आढावा घेण्यात आला. त्यामध्ये सदर बाहनाचा रजिस्ट्रेशन रद्द करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी महोदयांनी उपप्रादेशिक परीवहन अधिकारी यांना निर्देश दिलेत. तसेच सदर वाहन मालक तसेच चालकावर एम.पी.डि.ए. लावण्याबाबत जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे प्रतिनिधी यांना निर्देश दिलेत. तसेच सदर वाहन जप्त करुन त्याचा लिलाव करुन सदर रक्कम शासन जमा करण्याबाबत उपविभागीय अधिकारी वाशिम यांना मा. महोदयांनी निर्देश दिलेत.

जिल्हयात विना वाहतुक परवाना असलेल्या वाहनांना जास्तीत जास्त दंड आकारणी करण्यात यावी असे निर्देश मा. महोदयांनी दिलेत. वाशिम जिल्हयातील जे रेती घाट लिलावात गेलेले नाहीत त्या रेती घाटाच्या क्षेत्रात कलम १४४ नुसार वाहन प्रवेश करण्यात आलेली आहे. त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत मा. महोदयांनी पोलीस विभाग तसेच उप प्रादेशिक परीवहन अधिकारी याना निर्देश दिलेत.

तसेच जिल्हयातील अवैध उत्खनन व वाहतुक रोखण्याकरीता रात्रीचे वेळेस पोलीस विभागाचे दोन कर्मचारी, महसुल विभागाचे कर्मचारी तसेच प्रादेशिक परीवहन कार्यालयाचे कर्मचारी यांचे पथक तयार करुन सर्व उपविभागीय अधिकारी यांनी तात्काळ कार्यवाही करण्याबाबत चे निर्देश मा. जिल्हाधिकारी महोदयांनी दिलेत.

स्वा/-
जिल्हाधिकारी वाशिम

प्रतिलीपी :

१.जिल्हा पोलीस अधिकारी, वाशिम यांना माहीती व उचित कार्यवाहीस्तव.
२. प्रादेशिक परीवहन अधिकारी वाशिम यांना माहीती व उचित कार्यवाहीस्तव.
३. उपविभागीय अधिकारी वाशिम यांना माहीतत व उचित कार्यवाहीस्तव.

जिल्हाधिकारी वाशिम करीता

4-3-16

बुलडाणा

जा. क. 969 /अभि/खनिकर्म/उप प्रादेशिक/बुल/१७

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, यांचे कार्यालय.

बुलडाणा.

दि. २२/०२/२०१७

प्रति,

मा.जिल्हाधिकारी.

बुलडाणा.

विषय :- अवैध गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनांची आर.सी बुकमध्ये नोंद घेऊन अहवाल सादर करणे बाबत.

संदर्भ :- आपले कार्यालयाचे पत्र क. काबि /कक्ष खनिकर्म/१८२६/ दि.३०.१२.१६

उपरोक्त विषया बाबत विनंती करण्यात येते की, अवैध गौण खनिज वाहतूक करणारे वाहने महसूल विभागाने पकडल्या नंतर सदर वाहनांबाबत माहिती या कार्यालयाचे मोटार वाहन निरिक्षक यांना कळविण्यात यावी. या कार्यालयाची कारवाई होई पर्यंत वाहने सोडण्यात येवू नये या बाबतचे निर्देश संबधीतांना देण्यात यावे ही नम्र विनंती.

या कार्यालयास संपर्क करण्या करिता दुरध्वनी क. 07262242244, email :- mh28@mahatranscom.in व मोटार वाहन निरिक्षक श्री. कैलास भरकाडे यांचे भ्र.क 8692917776 असे आहे.

माहिती करिता सविनय सादर.

(उप.प्रा.प. अं यांचे निर्देशानुसार)

for उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,

बुलडाणा.

① उपविभागिय अधिकारी ..... यांना माहिती करिता,

प्रत :② तहसिलदार ..... यांना माहिती करिता,

निर्गमीत क्र. ची
२२.२.१७.
सहायक लिपिक
जिल्हाधिकारी कार्यालय,
बुलडाणा

O/C

प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, बुलडाणा

जिल्हा प्रादेशिक परिवहन प्राधिकरण बुलडाणा यांच्या दिनांक ०२/०२/२०१६रोजी मा.अध्यक्ष तथा मा.जिल्हाधिकारी यांच्या दालनात संपन्न झालेल्या आठव्या सभेचे इतिवृत्त.

सदर सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

१.मा श्री.डॉ.विजय झाडे (भा.प्र.से.) जिल्हाधिकारी,बुलडाणा	अध्यक्ष
२.मा.श्री.ओमप्रकाश माने पोलीस उपअधिक्षक(गृह) पोलीस अधिक्षक,बुलडाणा यांचे प्रतिनिधी	सदस्य
३. अर्चना गायकवाड उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,बुलडाणा	सचिव

बाब क्रमांक १. :-

विषय :- प्रादेशिक परिवहन प्राधिकरण,बुलडाणा यांच्या दिनांक १०/९/२०१५ रोजी झालेल्या सातव्या सभेचे इतिवृत्त कायम करणेबाबतचा प्रस्ताव.

निर्णय :-दिनांक १०/९/२०१५ रोजी झालेल्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या सातव्या सभेचे इतिवृत्त प्राधिकरणाने कायम केले.

बाब क्रमांक २

विषय :- नुतणीकरण झालेल्या ऑटोरिक्षा परवान्याबाबत.

ज्या ऑटोरिक्षा परवान्यांची विधीग्राहयता संपून सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे अशा ऑटोरिक्षा परवान्यांना प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांनी रदद् व व्यपगत ठरविलेले आहे.परंतू महाराष्ट्र शासन निर्णय क्रं.एमव्हिआर ०८१५/प्र.क्र.३८७/परि-२ दिनांक १/१०/२०१५ व्यपगत किंवा रदद् झालेल्या परवान्यांचे नुतणीकरण करण्याकरिता परवाना धारकांना दिनांक १६/१२/२०१५ पर्यंत एक संधी म्हणून मुदत देण्यात आलेली होती. शासनाने दिनांक १६/१२/२०१५ पर्यंत दिलेल्या मुदतीपर्यंत या कार्यालयात ८७४ परवानाधारकांनी अर्ज करुन परवानगी नुतणीकरण करुन घेतले परवानाधारकाकडून मो.वा. कर व दंडस्वरुपात ७२,७३,१३२/- इतका महसूल जमा झालेला आहे.
करिता प्राधिकरणाच्या माहितीकरिता व अवलोकनार्थ सादर.

RTA-4

निर्णय :- मा.अध्यक्ष महोदयांनी ऑटोरिक्षा परवाना नुतणीकरणासंबधी केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेतला.

बाब क्रंमाक ३
विषय :- ज्या मालाच्या वाहतूकीसाठी शासकीय परवानगी आवश्यक असते अशा मालाची (गौण खनिज)ची विना परवाना/विना पास वाहतूक करताना आढळल्यास मोटार वाहन कायदा १९८८ अधिनियम ८६ व ५३(१)(ब) नुसार कारवाई करणेबाबत.

दिनांक १७/०६/२०१३ रोजी जिल्हा प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या सभेत बाब क्रंमाक ६/१३ नुसार घेतलेल्या ठरावानुसारअवैध गौण खनिजाची वाहतूक करणा-या वाहनाच्या परवान्याविरुध्द मोटार वाहन कायदा १९८८ चे अधिनियम ८६ नुसार सध्या पुढीलप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.

अ. क्र.	वाहनांचे स्वरुप	गुन्हा क्र.	दंडसूची	
			परवाना निलंबन दिवस	निलंबन ऐवजी दंड
१	ट्रॅक्टर ट्रेलर,हलक मालवाहतूक करणारे वाहन	१	३०	२०००
		२	४०	३०००
		३	५०	४०००
२	मध्यम मालवाहतूक करणारे वाहन १६२००कि.ग्र.पर्यंत	१	३०	३०००
		२	४०	४०००
		३	५०	५५००
३	मोठे अवजड वाहन १६२००कि.ग्र.पासून पुढे	१	३०	४५००
		२	४०	५५००
		३	५०	७०००

प्रस्ताव :- ज्या मालाच्या वाहतूकीसाठी संबधित विभागाकडे रॉयल्टी अगर शुल्क भरुन विशेष परवाना / पास प्राप्त करणे आवश्यक असतांना देखील (उदा. जसे मुरूम,गिटटी,रेती, माती,दगड तसेच इत्यादी) यांची अवैध(बेकायदेशीर) वाहतूक केल्याची बाब संबधित विभागाकडून उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या निर्दशनास आणून दिल्या जाईल.अशा वाहनांच्या परवानाधारकाविरुध्द तसेच नोदंणीप्रमाणपत्राविरुध्द पुढील प्रमाणे कारवाई प्रस्तावित करण्यात येत आहे.

अ.क्र.	वाहनाचा प्रकार	प्रस्तावित कारवाई		
१.		पहिला गुन्हा	दुसरा गुन्हा	तिसरा गुन्हा
	ट्रॅक्टर/ट्रेलर व परिवहनेत्तर वाहने	४५ दिवस नोंदणी निलंबन (वाहन जप्त केलेल्या जागेवर)	९० दिवस नोंदणी निलंबन (वाहन जप्त केलेल्या जागेवर)	नोंदणी रद्द (वाहन जप्त केलेल्या जागेवर)
२.	ट्रक/ट्रेलर/डी.व्हॅन/ पी.व्हॅन व परिवहन वाहने	४५ दिवस परवाना निलंबन (वाहन जप्त केलेल्या जागेवर)	९० दिवस परवाना निलंबन (वाहन जप्त केलेल्या जागेवर)	परवाना रद्द

सदर दंड हा सध्या अस्तित्वात असलेल्या ओव्हरलोड वाहनांचा विभागीय दंडांच्या व्यतीरिक्त असेल.

निर्णय :- प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या सभेत सार्वजनिक मालमत्तेचे होत असलेले नुकसान व त्यामुळे होणारे पर्यावरणाचे नुकसान या बाबत विचार करता पुढील प्रमाणे कारवाई करण्याबाबत एकमत होवून कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. संबंधित तहसिलदार /उपविभागीय अधिकारी यांनी अशा प्रकारे गौण खनिज अवैधकरित्या वाहतूक करणारे वाहन आढळल्यास त्यावर महसूल विभागाची कारवाई पूर्ण करून उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडे मोटार वाहन कायदा १९८८मधील कलम ८६च ५३(१)(ब) प्रमाणे कारवाई साठी प्रकरण आवश्यक माहितीसह पाठवावे.उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी त्वरीत परवानाधारकास,वाहनमालकास कायदेशीर नोटीस पाठवून ७ दिवसांत आपले म्हणणे मांडण्याची सूचना दयावी. ७ दिवसात संबधितानी आपला खुलासा सादर न केल्यास त्वरीत कारवाई करून त्याची प्रत संबधित तहसिलदार/उप विभागीय अधिकारी व पोलीस निरीक्षक यांना पाठवावी व सबंधितानी या आदेशाची कडक अंमलबजावणी करावी व नोटीस आदेश परवाना धारकांस/वाहनमालकांस बजावून अंमलबजावणी करावी.या कारवाई अंतर्गत रोख स्वरुपात दंड न करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी खालीलप्रमाणे सूची असावी असे ठरविण्यात आले.या निर्णयाची अंमलबजावणी दिनांक २०/०२/२०१६ पासून करण्यात येईल.

अ.क्र.	वाहनाचा प्रकार	प्रस्तावित कारवाई		
१.		पहिला गुन्हा	दुसरा गुन्हा	तिसरा गुन्हा
	ट्रॅक्टर/ट्रेलर व परिवहनेत्तर वाहने	९० दिवस नोंदणी निलंबन (वाहन जप्त केलेल्या जागेवर)	९० दिवस नोंदणी निलंबन (वाहन जप्त केलेल्या जागेवर)	नोंदणी रद्द (वाहन जप्त केलेल्या जागेवर)
२.	ट्रक/ट्रेलर/डी.व्हॅन/ पी.व्हॅन व परिवहन वाहने	९० दिवस परवाना निलंबन (वाहन जप्त केलेल्या जागेवर)	९० दिवस परवाना निलंबन (वाहन जप्त केलेल्या जागेवर)	परवाना रद्द

सदर दंड हा सध्या अस्तित्वात असलेल्या ओव्हरलोड वाहनांचा विभागीय दंडांच्या व्यतिरिक्त असेल.

सचिव
प्रादेशिक परिवहन प्राधिकरण
तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी
बुलडाणा

सदस्य
प्रादेशिक परिवहन प्राधिकरण तथा
पोलीस अधिक्षक, बुलडाणा

अध्यक्ष
प्रादेशिक परिवहन प्राधिकरण तथा
जिल्हाधिकारी, बुलडाणा

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा
खनिकर्म विभाग

Website :- www.buldhana.nic.in | E-mail :- rdc_buldhana@rediffmail.com, dmobul@gmail.com
Phone No.:- (07262) 242969/242411 | Fax No. - (07262) 242289

क्र. कावि/वक्षा खनिकर्म/ /२०१६
दिनांक ३० डिसेंबर,२०१६

प्रति,
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
बुलडाणा

विषय:- अवैध गौण खनिजाची वाहतूक करणा-या वाहनाच्या आर. सी. बुकमध्ये नोंद घेऊन अहवाल सादर करण्याबाबत.

***

जिल्हयातील १३ तालुक्यामध्ये तहसिलदार यांनी अवैध गौण खनिजाची वाहतूक करतांना ट्रक, टिप्पर, ट्रक्टर इत्यादी वाहने पकडली आहे. त्यांची तालुकानिहाय यादी सोबत जोडली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तालुक्याचे नाव	प्रकरणे	दंड
१	बुलडाणा	४०	९७३५००
२	चिखली	२२	६१३५००
३	मेहकर	२९	४३८०००
४	लोणार	२०	७७४२००
५	दे.राजा	१७	९३२२००
६	सि.राजा	४५	६५८२००
७	खामगांव	३०	२८१८७०
८	शेगांव	४४	४६६२३६०
९	मलकापूर	४७	५१५२६५
१०	मोताळा	अप्राप्त	
११	नांदुरा	३९	३७७९००
१२	जळगांव जा.	१५	२०२५२०
१३	संग्रामपूर	अप्राप्त	

उपरोक्त विषयानुसार आपणांस मा. जिल्हाधिकारी यांनी दिनांक २७/१२/२०१६समेमध्ये कडक कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहे. सोबत यादीमध्ये नमूद केलेल्या वाहन क्रमांकाच्या सर्व वाहनाच्या आर. सी. बुकमध्ये दंडाबाबतची नोंद घ्यावी. त्यावर अवैध गौण खनिजाच्या वाहतूक म्हणजे चोरी करतांना पकडल्यामुळे त्याच्यावर महाराष्ट्र मोटर वाहन कायदानुसार नियमानुसार दंडात्मक व वाहन प्रतिबंधात्मक कार्यवाही करावी, आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसाच्या आंत मा. जिल्हाधिकारी यांना सपक्ष सादर करावा.

सहपत्र:- यादी

जिल्हाधिकारी बुलडाणा करिता

प्रतिलिपी:-
१) मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहितीकरिता सादर.
२) स्विय सहाय्यक, मा. जिल्हाधिकारी बुलडाणा यांना माहितीसाठी सादर.
३) उपविभागीय अधिकारी, ---------- यांना माहितीकरिता अग्रेषित.
४) तहसिलदार, ---------- यांना माहितीकरिता अग्रेषित.

Scanned by CamScanner

यवतमाळ

ई मेल:collectorate.yavatmal@gmail.com

क्र/कार्या/खनिकर्म/भौ.मा.प्र.सहा./२०१८/३०१
जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ
दिनांक १५ मे,२०१८

प्रति,

श्री.दिनेश चव्हाण,
अवर सचिव,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय,मुंबई - ३२

विषय : लोकलेखा समितीचा सन २०१४-२०१५ मधील महसुली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवालातील परिच्छेद क्र. ७.२.३.७.

संदर्भ : आपले कार्यालयीन पत्र क्र.गौखनि-१०/२०१७/प्र.क्र.४५७/ख,दिनांक १४.५.२०१८

भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालातील उक्त परिच्छेद क्र. ७.२.३.७. मध्ये उपस्थित विषयाबाबत महालेखापाल यांनी उपस्थित केलेली मुद्देनिहाय माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१. शासन निर्णय,महसूल व वन विभाग,मंत्रालय मुंबई यांचे निर्णय क्र.गौखनि-१०/०६१५/प्र.क्र.२८७/ख,दिनांक ५.१२.२०१५ मधील तरतुदीनुसार गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक या संदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सर्व संबंधित विभागाचा परिणामकारक समन्वय साधण्यासाठी आणि अनधिकृत उत्खनन व वाहतुकीशी संबंधित अपप्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर दिनांक १९.१२.२०१५ रोजीचे आदेशान्वये जिल्हाधिकारी,यवतमाळ यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली.सदर समितीमध्ये जिल्हा पोलिस अधीक्षक,उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचा समावेश आहे. सदर समिती ची बैठकांच्या इतिवृत्ताचे प्रती सोबत सादर करण्यात येत आहे. (प्रत संलग्न)

सहपत्र : वरीलप्रमाणे

(चंद्रकांत जाजू)
अपर जिल्हाधिकारी,यवतमाळ

आवक जावक लिपीक
जिल्हाधिकारी कार्यालय,यवतमाळ

Scanned by CamScanner

क्रमांक/अशुनि/गौखनि/कावि/ 2594 /२०१५
जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ
दिनांक :- १९/१२/ २०१५

वाचा :- मा.उप सचिव,महसूल व वनविभाग,मंत्रालय, मुंबई शासन निर्णय दि.५.१२.२०१५

आ दे श

उपरोक्त शासन निर्णयामध्ये दिलेल्या निर्देशानुसार गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक यासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सर्व संबंधित विभागांचा परिणामकारक समन्वय साधण्यासाठी आणि अनधिकृत उत्खनन व वाहतुकीशी संबंधित अपप्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

1) जिल्हाधिकारी - अध्यक्ष
2) जिल्हा पोलीस अधिक्षक - सदस्य
3) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी - सदस्य
4) जिल्हा खनिकर्म अधिकारी - सदस्य सचिव

जिल्हाधिकारी, यवतमाळ

प्रतिलोपी :- माहीती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता

1) जिल्हा पोलीस अधिक्षक, यवतमाळ
2) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, यवतमाळ
3) जिल्हा खनिकर्म अधिकारी, यवतमाळ

जिल्हाधिकारी, यवतमाळ

Scanned by CamScanner

दिनांक 25.01.2016 रोजी मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली आलेल्या गौण खनिज अवैध उत्खनन व वाहतुक संदर्भात आयोजित सभेचे इतीवृत्त

आज दिनांक 25.1.2016 रोजी सकाळी 11.30 वाजता जिल्ह्यातील रेती व इतर गौण खनिज उत्खननावर व वाहतुकीवर आळा बसविण्याकरीता उपाययोजना आखण्याकरीता स्थापित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीची बैठक आयोजित करण्यात आली.

सदर बैठक मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

1) जिल्हा पोलीस अधिक्षक, यवतमाळ
2) उप प्रादेशिक अधिकारी, यवतमाळ
3) अपर जिल्हाधिकारी यवतमाळ
4) जिल्हा खनिकर्म अधिकारी, यवतमाळ

जिल्ह्यातील रेती / गौणखनिज अवैध उत्खनन / वाहतुकीवर आळा घालण्याकरीता जिल्हा स्तरावर पथक स्थापन करुन पथक प्रमुख म्हणुन जिल्हा खनिकर्म अधिकारी, महसूल शाखेतील नायब तहसिलदार, राजस्व शुल्क निरीक्षक, परिवहन उप निरीक्षक, पोलीस शिपाई यांच्या समावेश राहील.

तसेच तालुका स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या पथकाबरोबर तहसिलदार यांनी संबंधित पोलीस स्टेशनशी संपर्क साधून पथकास पोलीस शिपाई यांना पथकासोबत द्यावे.

जिल्हास्तरीय पथकाने पूर्वसुचना देऊन पोलीस विभागाच्या Nodal Officer / Home Dy.S.P. किंवा PSI यांच्याशी संपर्क साधून पथकासमवेत पोलीस शिपायांची मागणी करावी.

जिल्ह्यातील ज्या रस्त्याने रेती / खनिजाची वाहतुक अधिक प्रमाणात आहे, अशा कळंब, राळेगांव, वणी, वाघुळगांव, आर्णी तालुकात उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या मदतीने चेकपोस्ट ची स्थापने निश्चीत करुन चेकपोस्ट स्थापन करावे. प्रत्येक चेकपोस्ट वर तालुका कार्यालयातील कमीत कमी दोन कर्मचारी, एक परिवहन निरिक्षक, व संबंधित तालुक्यातील पोलीस स्टेशनचा एक पोलीस शिपाई पथकाला समावेश करुन संबंधित ठाणेदार अधिकारी यांनी तहसिलदार यांच्या सल्लाने चर्चा करुन निश्चीत करावे.

जिल्हा खनिकर्म शाखा, उपविभागीय अधिकारी, संबंधित कार्यालय यांनी तक्रार रजिस्टर ठेवावे व प्रत्येक तक्रारीची नोंद घ्यावी व तक्रार निकाली निघाली याबाबत खात्री करुन घ्यावी. तक्रारीची शहनिशा करण्याकरीता स्थळावर पथकाद्वारे एकत्रितपणे कार्यवाही पूर्ण करावी.

रेती लिलावात न गेलेले व बंद खाणी क्षेत्रातून कोणतेही उत्खनन व वाहतुक होणार नाही या करीता सदर क्षेत्रात CRPC 144 कलम जारी करावे. वारंवार गौणखनिजाची चोरी करतांना वाहन आढळून आल्यास सदरील वाहन प्रतिबंधीत करण्याबाबतचे प्रस्ताव परिवहन विभागास संबंधित विभागाने कार्यान्वीत करावे.

जिल्ह्यात सार्वजनीक / सरकारी नियमित रेतीची वाहतुक / उत्पादन करीता ज्या रेती स्थळावर CRPC 144 लावण्याचे ठरविण्यात आले.

वरील प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले. या सेवेसी सभा उपस्थितांचे आभार मानुन सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

जिल्हाधिकारी यवतमाळ

प्रतिलीपी :- माहीती तथा आवश्यक कार्यवाही अग्रेषित

1) जिल्हा पोलीस अधिक्षक यवतमाळ
2) अपर जिल्हा दंडाधिकारी, यवतमाळ
3) उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, यवतमाळ
4) उपविभागीय अधिकारी / तहसिलदार, ----------

जिल्हाधिकारी यवतमाळ

Scanned by CamScanner

दिनांक २९.०९.२०१६ रोजी मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली आलेल्या गौण खनिज अवैध उत्खनन व वाहतुक संदर्भात आयोजित सभेचे इतिवृत्त

दिनांक २९.९.२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर आळा घालण्याबाबत उपाययोजना आखण्याकरीता आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय सभेचा वृत्तांत आयोजित करण्यात आला आहे. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) मा.जिल्हाधिकारी, यवतमाळ

२) जिल्हा पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांचे प्रतिनिधी

३) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, यवतमाळ

४) जिल्हा खनिकर्म अधिकारी, यवतमाळ

दिनांक ३०.६.२०१६ रोजी झालेल्या मागील सभेच्या इतिवृत्तावर सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर इतिवृत्तामध्ये नमूद केलेल्या मुद्यांवर आजपर्यंत कार्यवाही झालेली नसल्यामुळे त्याअनुषंगाने तात्काळ कार्यवाही करण्याबाबत संबंधित विभागास सूचना देण्यात आल्यात. तसेच खालील प्रमाणे सर्वसंमतीने उपाययोजना करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्यात.

अ.क्र.	विषय	कार्यवाही करणारे अधिकारी
१	तालुका स्तरावर ज्या ठिकाणी जास्त प्रमाणात गौण खनिजाचा वाहतूक होते, त्या ठिकाणी गुड्स रेल्वेवर तात्पुरती नाके (चेक पोस्ट) ची स्थापना करणे व त्याठिकाणी महसूल व पोलीस विभागाचे कर्मचारी यांची नियुक्ती करणे.	जिल्हा पोलीस अधिक्षक, यवतमाळ सर्व उपविभागीय अधिकारी सर्व तहसिलदार
२	रेती व खाणपट्टेधारकांना जारीत करण्यात आलेल्या परवान्यावर वाहनाचा क्रमांक व SMS ची तपासणी करून अवैध रित्या वाहतुकीवर दंडात्मक कार्यवाही करणे.	जिल्हा पोलीस अधिक्षक, यवतमाळ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यवतमाळ सर्व उपविभागीय अधिकारी सर्व तहसिलदार जिल्हा खनिकर्म अधिकारी यवतमाळ
३	अवैध गौण खनिजाची वाहतुक करणारे वाहने जप्त करणे, त्यावर दंडात्मक कार्यवाही करणे, व २४८ वाहनाचा परवाना निलंबित	जिल्हा पोलीस अधिक्षक, यवतमाळ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यवतमाळ सर्व उपविभागीय अधिकारी सर्व तहसिलदार जिल्हा खनिकर्म अधिकारी यवतमाळ
४	उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी ओव्हरलोड वाहतुक प्रकरणात जिल्हा खनिकर्म अधिकारी, यवतमाळ यांचेकडे पत्र क्रं.८ दिलेल्या कार्यवाही व्यतिरिक्त वाहन सोडले न करणे.	उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यवतमाळ
५	तालुक्यात न आलेल्या रेतीघाटांचे अवैध उत्खनन / वाहतुक / साठवणुक, याबाबत कलम १४८ अन्वये केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल सादर करणे.	जिल्हा पोलीस अधिक्षक, यवतमाळ सर्व उपविभागीय अधिकारी सर्व तहसिलदार जिल्हा खनिकर्म अधिकारी यवतमाळ जिल्हा खनिकर्म अधिकारी यवतमाळ
६	जिल्हास्तरीय पथकाची पुनर्रचना करणे, त्यामध्ये जिल्हाधिकारी यांच्यास्तरावरील एक तहसिलदार, उपप्र.परिवहन अधिकारी यांचे प्रतिनिधी व एक पोलीस अधिकारी (पोलीस निरीक्षक) यांची नियुक्ती करणे.	

वरील प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले व सभेची सांगता झाली.

सदर सभेचे इतिवृत्त तयार करण्यात आले.

(डी.एन.हाके)
उपजिल्हाधिकारी (महसूल)
यवतमाळ

Scanned by CamScanner

प्रति :- माहीती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता

१) जिल्हा पोलीस अधिक्षक, यवतमाळ

२) उपविभागीय अधिकारी,----------.(सर्व)

३) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यवतमाळ

४) तहसिलदार, ---------- (सर्व)

५) जिल्हा खनिकर्म अधिकारी यवतमाळ

जिल्हाधिकारी यवतमाळ

Scanned by CamScanner



Scanned by CamScanner

८	अकोला पोलीस क्षेत्रातील वाहतूकीसंदर्भात जिल्हा कार्यालयाकडून इतर प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडे पाठविण्यात येणाऱ्या प्रकरणात संबंधित न्यायालयाचे आदेशापर्यंत वाहनांची नोंदणी परवाना निलंबित ठेवण्याबाबत	उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अकोला/वाशिम
९	जिल्हा स्तरावर महसूल व पोलीस विभागाच्या संयुक्त पथकाचे गठण करुन त्यामध्ये तहसिलदार / नायब तहसिलदार तसेच पोलीस निरीक्षक / उप पोलीस निरीक्षक व परिवहन विभागातील निरीक्षक यांची नियुक्ती करुन भरारी पथकांनी प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत	जिल्हा पोलीस अधिक्षक, पोलीस उपविभागीय अधिकारी, सर्व तहसिलदार, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
१०	जिल्हास्तरीय पथकाची पुनर्नियुक्ती करुन त्यामध्ये जिल्हा अधिकारी व त्यांचेसोबत पोलीस निरीक्षक / उपनिरीक्षक व परिवहन विभागाचे निरीक्षक यांची नेमणूक करुन प्रभावीपणे कार्यवाही करणे	जिल्हा पोलीस अधिक्षक, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी व जिल्हा खनिकर्म अधिकारी

बरहुकूम (वरीलप्रमाणे) सदर सर्वांना अधिकारी यांनी तालुका कार्यवाही करणेबाबत मा.जिल्हाधिकारी यांनी निर्देश दिले. तेव्हा सर्व उपस्थितांचे जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

(सचिन्द्र प्रताप सिंह)
जिल्हाधिकारी, अकोला

प्रतिलिपी :- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता

१) जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला

२) उपविभागीय अधिकारी, ---------- (सर्व)

३) सहा.पोलीस निरीक्षक, परिवहन अधिकारी, अकोला

४) तहसिलदार, ---------- (सर्व)

५) जिल्हा खनिकर्म अधिकारी, अकोला

18/9/2017 2-30 PM

आपला जाबता लिपीक
जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला

Scanned by CamScanner

अमरावती

जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

खनिकर्म विभाग

कॅम्प, अमरावती - ४४४६०२

दुरध्वनी : ०७२१-२६६२५२२/२६६२०२५ ई मेल : dmoamravati1@gmail.com

क्र. खनिज/अशुनि/कावि-४६०/२०१८ दिनांक :- /०५/२०१८.

प्रति,

मा. अवर सचिव,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई

विषय :- लोकलेखा समितीचा सन २०१४-१५ मधील महसूली क्षेत्रावरील लेखापरिक्षा अहवालातील परिच्छेद क्र. ७.२.३.७

संदर्भ :- शासन पत्र क्र. गौखनि-१०/१०१७/प्र.क्र.४५७/ख, दि. १४/०५/२०१८.

महोदय,

लोकलेखा समितीचा सन २०१४-१५ या वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालातील प्रस्तुत परिच्छेद क्र. ७.२.३.७ मध्ये उपस्थित विषयाचे अनुषंगाने अमरावती जिल्ह्याची माहिती पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

1) As envisaged in GR dated 05/12/2015, Whether Committee under Chairmanship of Collector is formed in every District ?

Yes, In Amravati District vigilance Committee is formed under the Chairmanship of Collector, The Vigilance Committee is as follows.

1.	District Collector	-	Chairperson
2.	Police Commissioner	-	Member
3.	District Supritendent of Police	-	Member
4.	Regional Transport Officer	-	Member
5.	District Mining Officer	-	Member Secretary.

2) The details of meetings conducted along with minutes of meetings may furnished to PAC.

Meeting of above vigilance committee conducted on 26.09.2016.

सहपत्र :- वरीलप्रमाणे

अपर जिल्हाधिकारी, अमरावती, कटीना

प्रतिलिपी :- मा.विभागीय आयुक्त, अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.

अपर जिल्हाधिकारी, अमरावती, कटीना

General Letter 15

क्र. खनिज/कावि-१६१ / २०१६
जिल्हाधिकारी कार्यालय,अमरावती
दिनांक - ०४/०२/२०१६

वाचा :- महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. गौखनि-१०/०६१५/प्र.क्र.२८७/ख दिनांक ०५ डिसेंबर, २०१५

:: आदेश ::

गौण खजिनाचे अवैध उत्खनन व वाहतूक या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सर्व संबंधीत विभागाचा परिणामकारक समन्वय साधण्यासाठी आणि अनधिकृत उत्खनन व वाहतूकीशी संबंधीत अपप्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरावरील खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

१.	जिल्हाधिकारी	:	अध्यक्ष
२.	पोलीस आयुक्त, अमरावती शहर	:	सदस्य
३.	जिल्हा पोलीस अधिक्षक अमरावती ग्रामीण	:	सदस्य
४.	प्रादेशिक परिवहन अधिकारी	:	सदस्य
५.	जिल्हा खनिकर्म अधिकारी	:	सदस्य-सचिव

सदर समितीची दर महिन्यातून एकदा किंवा आवश्यकतेनुसार अधिक वेळा बैठक घेण्यात येऊन गौण खजिनाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी, निवेदने व त्यासंबंधात करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात येईल. तसेच अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी करावयाच्या उपाययोजना समितीचे बैठकीमध्ये निश्चित करण्यात येतील.

(किरण गित्ते)
जिल्हाधिकारी, अमरावती

प्रत :- माहिती व उचित कार्यवाहीकरीता.

१. पोलीस आयुक्त, अमरावती शहर
२. जिल्हा पोलीस अधिक्षक अमरावती ग्रामीण
३. प्रादेशिक परिवहन अधिकारी
४. जिल्हा खनिकर्म अधिकारी

गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक संदर्भात प्राप्त तक्रारीबाबत दर महिन्यात वरीलप्रमाणे समितीची बैठक आयोजीत करावी.

जिल्हाधिकारी, अमरावती

नागपूर

जिल्हाधिकारी, कार्यालय नागपूर

गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची सभा,

बैठकीचे इतिवृत्त

सभेचे अध्यक्ष	:-	मा.श्री. सचिन कुर्वे जिल्हाधिकारी, नागपूर.
सभेचे स्थळ	:-	छत्रपती शिवाजी सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर.
सभेचा दिनांक	:-	दिनांक 17/10/2016 दुपारी 03.00 वाजता

नागपूर जिल्हयातील गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सर्व संबंधित विभागांचा परिणामकारक समन्वय साधण्यासाठी आणि अनधिकृत उत्खनन व वाहतुकीशी संबधित उपप्रवृत्ती वर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची आयोजीत करण्यात आलेली होती.

बैठकीमध्ये खालील प्रमाणे अधिकारी / सदस्य उपस्थित होते.

१) पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रा.
२) प्रादशिक परिवहन अधिकारी, नागपूर शहर
३) प्रादशिक परिवहन अधिकारी, नागपूर ग्रा.
४) जिल्हा खनिकर्म अधिकारी, नागपूर.

बैठकीमध्ये खालील विषयावर चर्चा करण्यात आली.

शासन निर्णय क्रमांक गौखनि-10/0615/प्र.क्र.287/ख दिनांक 5 डिसेंबर, 2015 नुसार बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये जिल्हयात अवैध उत्खननावर आळा बसविण्याकरीता महसुल, पोलीस, परिवहन विभागाने समन्वय साधुन कार्यवाही करणे याबाबत चर्चा करण्यात आली.

त्याअनुषंगाने सर्व पथकासोबत पोलीस शिपाई नेमणुक करण्याकरीता संबंधित क्षेत्राातील पोलीस ठाण्याव्दारे पोलीस शिपाई पुरविण्यात यावा. त ा जिल्हा मुख्यालयाने सर्व पोलीस ठाण्यांना कळवावे. महसुल, पोलीस व परिवहन यांच्या सर्व जिल्हा व तालुका स्तरावील अधिका-याचे फोन नंबर मोबाईल नंबरपुरविण्यात यावे. जेणेकरून कार्यवाही करतांना अडचणीमध्ये मदत होईल.

तसेच शासन निर्णय नुसार कार्यवाही करण्याकरीता शासन निर्णयाची प्रत देण्यात यावी असा अध्यक्षांनी निर्णय घेतला.

मा. अध्यक्षांचे अनुमतीने सर्व उपस्थित सदस्याचे आभार व्यक्त करून सभा संपल्याचे समिती सचिवांनी जाहीर केले.

जिल्हाधिकारी
नागपूर.

महत्वाचे /प्राधान्यान

क्र. आरथा/कक्ष–21/खनिकर्म/कावी 453 /2016

जिल्हाधिकारी नागपूर यांचे कार्यालय

नागपूर. दिनांक :– 15/07/2016

प्रति,

1.———————————

2.———————————

3.———————————

4.———————————

विषयः– गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतुकीस आळा घालण्यासाठी जिल्हा स्तरावर समिती स्थापन करण्याबाबत.

संदर्भ :– महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक /गौखनि–10/ 0615/प्र.क.287/ख, दिनांक 5 डिसेंबर 2015

उपरोक्त शासन निर्णयान्वये गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सर्व संबधीत विभागांचा परिणाम कारक समन्वय साधण्यासाठी आणि अनधिकृत उत्खनन व वाहतुकीशी संबधीत अपप्रवृत्ती नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा स्तरीय समितीची रचना खालीलप्रमाणे तयार करुन समिती स्थापन करण्यात येत आहे.

1.	समितीचे नांव	–	गौण खनिजाच्या अवैध उत्खनन आळा घालण्यासाठी जिल्हास्तरीय समिती
2.	समितीचे अध्यक्ष	–	मा.जिल्हाधिकारी
3.	समितीचे सदस्य	–	जिल्हा पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त
4.	समितीचे सदस्य	–	प्रादेशिक परिवहन अधिकारी,
5.	सदस्य सचिव	–	जिल्हा खनिकर्म अधिकारी

(श्री सचिन कुर्वे)
जिल्हाधिकारी,नागपूर

नागपूर

महत्वाचे /प्राधान्यान

क्र. आरथा/कक्ष–21/खनिकर्म/कावी 453 /2016
जिल्हाधिकारी नागपूर यांचे कार्यालय
नागपूर. दिनांक :– 15/07/2016

प्रति,

1.———————————
2.———————————
3.———————————
4.———————————

विषयः– गौण खनिजाच्या अवैध उत्खनन वाहतुकीस आळा घालण्यासाठी जिल्हा स्तरावर समिती स्थापन करण्याबाबत.

संदर्भ :– महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग यांचे शासन निर्णय कमांक /गौखनि–10/ 0615/प्र.क.287/ख, दिनांक 5 डिसेंबर 2015

उपरोक्त शासन निर्णयान्वये गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक या संदर्भात प्राप्त झालेल्या तकारीच्या अनुषंगाने सर्व संबधीत विभागांचा परिणाम कारक समन्वय साधण्यासाठी आणि अनधिकृत उत्खनन व वाहतुकीशी संबधीत अपप्रवृत्ती नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा स्तरीय समितीची रचना खालीलप्रमाणे तयार करुन समिती स्थापन करण्यात येत आहे.

1.	समितीचे नांव	–	गौण खनिजाच्या अवैध उत्खनन आळा घालण्यासाठी जिल्हास्तरीय समिती
2.	समितीचे अध्यक्ष	–	मा.जिल्हाधिकारी
3.	समितीचे सदस्य	–	जिल्हा पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त
4.	समितीचे सदस्य	–	प्रादेशिक परिवहन अधिकारी,
5.	सदस्य सचिव	–	जिल्हा खनिकर्म अधिकारी

	अवैध गौण खनिजाची विना रॉयल्टी व अधिक भार (रेती) विना परवाना तसेच जड वाहतुक करणाऱ्या वाहन चालकाच्या अनुज्ञप्तीवर कारवाई करणे (ट्रॅक्टर/ट्रेलर, HGV)	१	३०
		२	६०
		३	९०

अवैध गौण खनिजाची विना रॉयल्टी व अधिक भार (रेती) विना परवाना परिवहन व परिवहनेत्तर तसेच जड वाहतुक करणाऱ्या वाहनाविरुध्द पोलिस विभाग तसेच महसुल विभागामार्फत करण्यात आलेल्या कारवाईसंबंधात उप प्रादेशिक परीवहन कार्यालयाकडे कळविण्यात यावे व यासंबंधाने उप प्रादेशिक परिवहन अधिकारी तथा सचिव प्रादेशिक परिवहन प्राधिकरण भंडारा यांनी मोटर वाहन अधिनियम १९८८ चे कलम ८६ तसेच मोटर वाहन अधिनियम १९८८ चे कलम ५३ व कलम २१ नुसार केलेल्या कारवाईचा एकत्रित विभागवार अहवाल मा. अध्यक्ष प्रादेशिक परिवहन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी भंडारा यांना दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत अहवाल सादर करण्यात येणार आहे.

करीता याद्वारे आपणास आदेशीत करण्यात येते की, महसुल विभागामार्फत रेतीची तपासणी करतांना दोषी आढळलेले वाहनाची माहिती उपलब्ध असलेल्या कागदपत्रासह तात्काळ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, भंडारा यांना कळविण्यात यावी व त्यांची कारवाई पूर्ण होईपर्यंत वाहन सोडू नये.

अध्यक्ष
प्रादेशिक परिवहन प्राधिकरण
तथा जिल्हाधिकारी
भंडारा

क्र. कली/प्र-1 /कावि/१३२३/2017
तहसिलदार पवनी यांचे कार्यालय
दिनांक : ९/08/2017

आदेश

विषय : अनधिकृत गौणखनिज वाहतुकी विरुध्द कार्यवाही करणेबाबत.

संदर्भ : 1. मा. उपविभागीय अधिकारी, भंडारा यांचे कार्यालयीन पत्र क्र. कलि/खनिज/उविअभं/कावि/ 1168/2015 दि. 18/09/2015.

पवनी तालुक्यात अवैध गौण खनिज तसेच क्षमतेपेक्षा अधिक वाहतुक करणा-या वाहनांची तपासणीकरीता व अवैधरीत्या गौण खनिजाची (रेती, गीट्टी, मुरुम, दगड, माती) वाहतुकीवर आळा घालण्याचे दृष्टीने खालीलप्रमाणे एस. टी. डेपो पवनी जवळील चेकपोष्ट वर तपासणी करीता स्थाई पथक म्हणून मंडळ अधिकारी, तलाठी, तसेच कोतवाल यांची विहीत प्रपत्रात नमुद केल्याप्रमाणे नियुक्ती करण्यात येत आहे. नेमणुक करण्यात आलेल्या मंडळ अधिकारी, तलाठी व कोतवाल यांनी तालुक्यातील एस. टी. डेपो पवनी जवळील चेकपोष्ट येथे नेमुन दिलेल्या वेळेत उपस्थितीत राहुन अवैध वाहतुक करणा-या तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतुक करणा-या वाहनांवर नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल रोज सकाळी 08.00 वाजता पुर्वी तहसिलदार तसेच 08.30 वा. पुर्वी मा. उपविभागीय अधिकारी, यांना दुरध्वनिव्दारे सादर करण्यात यावा. तालुका पवनी येथील काही रेतीघाटाचे लिलाव करण्यात आलेले आहे व काही रेतीघाटाचे लिलाव झालेला आलेले नाही त्यामुळे प्रत्येक वाहनाची तपासणी करुन नियमानुसार दंडात्मक तसेच फौजदारी कार्यवाही करण्यात यावी. महिला तलाठी यांनी सकाळी 08.00 ते सायंकाळी 06.00 वा. पर्यंत चेकपोस्ट वर हजर राहुन कर्तव्य पार पाडावे

संबंधित पथकातील सदस्यांनी नेमुन दिलेल्या दिवशी व नेमुन दिलेल्या वेळेत चेकपोस्ट/ तपासणी नाक्यावर वाहनाची तपासणी करुन विहीत नमुन्यात तात्काळ नोंदणी करावी व अहवाल या कार्यालयास सादर करावे.

सहपत्र : वरीलप्रमाणे.

तहसिलदार पवनी

प्रतिलीपी : ✓1. मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांना माहितीस सविनय सादर.
2. मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, भंडारा यांना माहितीस सविनय सादर.
3. मा. उपविभागीय अधिकारी भंडारा यांना माहितीस सविनय सादर.
4.उपप्रादेशिक परीवहन अधिकारी भंडारा यांना माहितीस तथा वरील आदेशानुसार नमुद केलेल्या दिवशी व वेळेवर आपले अधिनस्त कर्मचारी यांची पथक निहाय नियुक्ती करुन नियुक्ती केल्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यास अग्रेषित.
5. पोलीस निरीक्षक, पवनी यांना माहितीस तथा वरील आदेशानुसार नमुद केलेल्या दिवशी व वेळेवर आपले अधिनस्त पिएसआय/एएसआय व दोन पोलीस यांची पथक निहाय नियक्ती करुन नियुक्ती केल्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यास अग्रेषित.
6. श्री नायब तहसिलदार यांना माहिती तथा अवैध रेती तपासणी बाबत दररोज अद्यावत अहवाल सादर करण्यास अग्रेषीत
7. श्री _____ मंडळ अधिकारी / तलाठी /अ.का/क. लि./कोतवाल यांना माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

कली / रवी.
अवैध गौन खनीज प्रकरणा बाबतच्या नस्तीमध्ये संकलीत करावा..

तहसिलदार पवनी करीता

८२९५
३/८/२०१६
(1)

11/8/2017

अ.क्र.	दिनांक	वेळ	स्थळ	नियुक्त अधिकारी व कर्मचारी
1.	9/8/2017 19/8/2017 29/8/2017 8/9/2017 18/9/2017 28/9/2017	सकाळी 8.00 ते रात्री 8.00	बस स्टॉन्ड पवनी चे समोर चेकपोस्ट	श्री ए. आर. शेंडे तलाठी विरली खंदार कु. एन. एस. मानवेवे तलाठी चिखली श्री आर. डी. धारगांवे कोतवाल श्री मुकुंदा गजभीये कोतवाल
		रात्री 8.00 ते सकाळी 8.00		श्री आर एस बांबोडे तलाठी तिर्री श्री एस. एस. उपासे तलाठी अडयाळ श्री पी. आर. बोरकर तलाठी चिचाळ श्री डी. जि. भोवते कोतवाल श्री टी. बी. वासनिक कोतवाल
2.	10/8/2017 20/8/2017 30/8/2017 9/9/2017 19/9/2017 29/9/2017	सकाळी 8.00 ते रात्री 8.00	बस स्टॉन्ड पवनी चे समोर चेकपोस्ट	कु. आय. डी. रामटेके तलाठी पिंपळगांव श्री एस आर इंगळे तलाठी पाथरी श्री पी. बी. चव्हान कोतवाल श्री जी. बी. गोंडाने कोतवाल
		रात्री 8.00 ते सकाळी 8.00		श्री एस. एस. रामटेके तलाठी कुर्झा श्री पी. टि. सतदेवे तलाठी आकोट श्री एस. एम. खान तलाठी कोसरा श्री संदेश मेश्राम कोतवाल श्री. आर. बी. तेलमासरे कोतवाल श्री विलास मेश्राम कोतवाल
3.	11/8/2017 21/8/2017 31/8/2017 10/9/2017 20/9/2017 30/9/2017	सकाळी 8.00 ते रात्री 8.00	बस स्टॉन्ड पवनी चे समोर चेकपोस्ट	कु एस. एस. श्रृंगारपवार तलाठी बाम्हणी श्री वि. ए. वासनिक तलाठी पालोरा श्री सुमित गिरडकर कोतवाल श्री मंगलमुर्ती चोपकर कोतवाल
		रात्री 8.00 ते सकाळी 8.00		श्री एस. एस. मोटघरे तलाठी कोंढा श्री जे. डी. कुंभारे तलाठी भावड श्री एम. टि. जुमळे तलाठी भंडारा श्री गुरुदेव दिघोरे कोतवाल श्री अमोल पंचभाई कोतवाल
4.	12/8/2017 22/8/2017 1/9/2017 11/9/2017 21/9/2017 1/10/2017	सकाळी 8.00 ते रात्री 8.00	बस स्टॉन्ड पवनी चे समोर चेकपोस्ट	कु. पी. ए. गायकवाड तलाठी आसगांव श्री ए. डब्लु. मानकर तलाठी सिंदपुरी श्री विनोद मेंढे कोतवाल श्री ज्ञानेश्वर दहिवले कोतवाल
		रात्री 8.00 ते सकाळी 8.00		श्री टि. वि. पाटिल तलाठी बघि श्री पी. ए. तांबट तलाठी बोरगांव श्री वि. ए. सय्यम तलाठी खापरी श्री सचिन धनगुळे कोतवाल श्री गोपाल कांबळे कोतवाल श्री दयाशंकर धनविजय कोतवाल
5.	13/8/2017 23/8/2017 2/9/2017 12/9/2017 22/9/2017 2/10/2017	सकाळी 8.00 ते रात्री 8.00	बस स्टॉन्ड पवनी चे समोर चेकपोस्ट	कु. ए. एस. बुरडकर तलाठी शेडी सोमनाळा कु. एम एस ठवकर तलाठी बेटाळा श्री आर. जे सव्वालाखे तलाठी मांगली श्री एम. एम. कन्नाके कोतवाल
		रात्री 8.00 ते सकाळी 8.00		श्री एम. डी. इणर तलाठी पवनी श्री आर. एफ. कुरकटे तलाठी मेंढेगांव श्री सहदेव तलाठी भुयार श्री विष्णु तुरसकर केतवाल

अ.क्र.	दिनांक	वेळ	स्थळ	नियुक्त अधिकारी व कर्मचारी
6.	14/8/2017 24/8/2017	सकाळी 8.00 ते रात्री 8.00	बिस स्टॉन्ड पवनी चे समोर चेकपोस्ट	श्री आर एस बांबोडे तलाठी तिरी श्री एम. एस. [illegible] तलाठी [illegible]
	3/9/2017 13/9/2017 23/9/2017 3/10/2017			कु. एन. एस. नागदेवे तलाठी चिखली श्री डी. जि. भोवते कोतवाल श्री टी. बी. वासनिक कोतवाल
		रात्री 8.00 ते सकाळी 8.00		श्री ए. आर. शेंडे तलाठी घिरली खंदार श्री एन. जे. मसराम तलाठी आमगांव श्री आर. डी. धारगांवे कोतवाल श्री मुकुंदा गजभीये कोतवाल
7.	15/8/2017 25/8/2017 4/9/2017 14/9/2017 24/9/2017 4/10/2017	सकाळी 8.00 ते रात्री 8.00	बस स्टॉन्ड पवनी चे समोर चेकपोस्ट	श्री पी. टि. सतदेवे तलाठी आकोट श्री एस. एम. खान तलाठी कोसरा श्री. आर. बी. तेलमासरे कोतवाल श्री विलास मेश्राम कोतवाल
		रात्री 8.00 ते सकाळी 8.00		श्री पी. आर. बोरकर तलाठी चिचाळ श्री एस आर इंगळे तलाठी पाथरी श्री पी. बी. चव्हान कोतवाल श्री जी. बी. गोंडाने कोतवाल
8.	16/8/2017 26/8/2017 5/9/2017 15/9/2017 25/9/2017 5/10/2017	सकाळी 8.00 ते रात्री 8.00	बस स्टॉन्ड पवनी चे समोर चेकपोस्ट	श्री एस. एस. मोटघरे तलाठी कोंडा श्री जे. डी. कुंभारे तलाठी भावड श्री एम. टि. जुमळे तलाठी भोंडारा श्री गुरुदेव दिघोरे कोतवाल श्री अमोल पंचभाई कोतवाल
		रात्री 8.00 ते सकाळी 8.00		श्री एस. एस. रामटेके तलाठी कुझा श्री वि. ए. वासनिक तलाठी पालोरा श्री सुमित गिरडकर कोतवाल श्री मंगलमुर्ती चोपकर कोतवाल श्री संदेश मेश्राम कोतवाल
9.	17/8/2017 27/8/2017 6/9/2017 16/9/2017 26/9/2017 6/10/2017	सकाळी 8.00 ते रात्री 8.00	बस स्टॉन्ड पवनी चे समोर चेकपोस्ट	श्री पी. ए. तांबट तलाठी बोरगाव श्री वि. ए. सय्यम तलाठी खापरी श्री गोपाल कोंबळे कोतवाल श्री दयाशंकर धनविजय कोतवाल
		रात्री 8.00 ते सकाळी 8.00		श्री ए. डब्लु. मानकर तलाठी सिंदपुरी श्री विनोद मेंढे कोतवाल श्री ज्ञानेश्वर दहिवले कोतवाल श्री प्रदिप भुरे कोतवाल
10	18/8/2017 28/8/2017 7/9/2017 17/9/2017 27/9/2017 7/10/2017	सकाळी 8.00 ते रात्री 8.00	बस स्टॉन्ड पवनी चे समोर चेकपोस्ट	श्री एम. डी. इष्पर तलाठी पवनी श्री आर. एफ. कुरकटे तलाठी मेंढेगांव श्री सहदेव तलाठी भुयार श्री विष्णु तुरसकर केतवाल
		रात्री 8.00 ते सकाळी 8.00		श्री दुरुगवार तलाठी निमगांव श्री टि. वि. पाटिल तलाठी बघिड श्री सचिन धनजुळे कोतवाल श्री आर. जे सव्वालाखे तलाठी मांगली श्री एम. एम. कन्नाके कोतवाल

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी मोहाडी यांचे कार्यालय

Email ID :- tahsildarmohadi@gmail.com कार्यालयीन फोन क्र.-07197-241130,241142

क्र कलि/प्ररतु-1 /तहमो /कावी- /०११ /2017
दिनांक - 05/08/ 2017

//आदेश //

विषय :- मौजा सातोना व मौजा बेटाळा येथे अवैध गौण खनिज वाहतुकीवर आळा घालण्याकरीता स्थिर पथक नेमण्याबाबत.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मोहाडी तालुक्यातील अवैध गौण खनिज वाहतुकीवर आळा घालण्याकरीता वाहन तपासणी करणे, व अवैध गौण खनिज वाहतुक करणा-या वाहनांवर दंडात्मक कार्यवाही करणे करीता याव्दारे दिनांक :-05/08/2017 ते 30/09/2017 पर्यंतचे कालावधीकरीता मौजा सातोना चेक पोस्ट व मौजा बेटाळा चेक पोस्ट वर स्थिर पथक तयार करण्यात येत आहे.

खाली रकाना क्रमांक 2 मध्ये नमुद कर्मचारी यांनी त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्र. 4 मध्ये दिलेल्या दिवशी रकाना क्रमांक 5 मध्ये नमुद वेळेत मौजा सातोना येथील, मोहदुरा- भंडारा- नेरी या चौरस्त्यावर चेकपोस्टवर व मौजा बेटाळा येथील रेतीघाटावरील चेकपोस्टवर हजर राहण्याबाबत.

अ.क.	नेमुण दिलेले चेकपोस्ट	पथकातील अधिकारी / कर्मचारी	नेमुण दिलेले वार	नेमुण दिलेली वेळ
१	मौजा बेटाळा रेतीघाटा लगत चेक पोस्टवर	१. श्री.प्रशांत पावडे तलाठी जाब २. श्री.निखील गजभिये तलाठी ३. उमाशंकर पडोळे, कोतवाल दहेगाव	प्रत्येक मंगळवार व शुक्रवार	सकाळी ८.०० ते रात्री ८.००
२		१. श्री.बिरणवार तलाठी २. श्री.दिपक घोडीचोर कोतवाल ३. श्री.अजय लेणेकर कोतवाल	प्रत्येक मंगळवार व शुक्रवार	रात्री ८.०० ते सकाळी ८.००
३		१. श्री. तितिरमारे, तलाठी वडेगाव २. श्री.पकंज घोडेस्वार तलाठी ३. श्री.राकेश ठवकर कोतवाल मोहाडी	प्रत्येक सोमवार व शनिवार	सकाळी ८.०० ते रात्री ८.००
४		१.श्री.पोरड्डीवार तलाठी दहेगाव २.श्री.एन.सेलोटे तलाठी ३श्री.गणेश ठवकर कोतवाल	प्रत्येक सोमवार व शनिवार	रात्री ८.०० ते सकाळी ८.००
५		१. श्री.उईनवार, तलाठी २. श्री.अकुंश धांदे तलाठी ३. रुपेश सलाम कोतवाल नवेगाव	प्रत्येक बुधवार व रविवार	सकाळी ८.०० ते रात्री ८.००
६		१. श्री.प्रविण साठकर तलाठी २. श्री.वैभव ठाकरे तलाठी ३. श्री.हेमंत गराडे कोतवाल	प्रत्येक बुधवार व रविवार	रात्री ८.०० ते सकाळी ८.००
७		१. श्री.आशिष टेकाम तलाठी २. कु.विद्या समरीत तलाठी ३. जयप्रकाश गजभिये, कोतवाल नेरी	प्रत्येक गुरुवार	सकाळी ८.०० ते रात्री ८.००
८		१. श्री.व्हि.ए.काबळे तलाठी २. श्री.देवराज मरस्कोल्हे तलाठी ३. श्री.नंदन नंदनवार कोतवाल टांगा	प्रत्येक गुरुवार	रात्री ८.०० ते सकाळी ८.००

सोबत रवाना.
अवैध उत्खनन नसीला लावणे

258

DUTY check post

24/8/2017

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी मोहाडी यांचे कार्यालय

Email ID :- tahsildarmohadi@gmail.com कार्यालयीन फोन क्र.-07197-241130,241142

अ. क.	नेमुण दिलेले चेकपोस्ट	पथकातील अधिकारी /कर्मचारी	नेमुण दिलेले दिनांक	नेमुण दिलेली वेळ
१	मौजा सातोना चेक पोस्ट	१. कु. अडकिने तलाठी सालई बु. २. कु. अमृते तलाठी ३. श्री. लोणारे, कोतवाल खुटसावरी	प्रत्येक मंगळवार व शुक्रवार	सकाळी ८.०० ते रात्री ८.००
२		१. श्री. उके तलाठी धुसाळा २. श्री.एस.आंबाके तलाठी ३. श्री.मोहनकर कोतवाल धोप	प्रत्येक मंगळवार व शुक्रवार	रात्री ८.०० ते सकाळी ८.००
३		१. श्री. उरकुडे, तलाठी आंधळगाव २. कु. अमृते तलाठी नवेगाव धु. ३. श्री. छगन मेहर कोतवाल	प्रत्येक सोमवार व शनिवार व गुरुवार	सकाळी ८.०० ते रात्री ८.००
४		१. श्री. के. तिजारे तलाठी उसर्रा २. श्री. जे.कढव तलाठी ३. श्री. जयदेव मेश्राम कोतवाल	प्रत्येक सोमवार व शनिवार व गुरुवार	रात्री ८.०० ते सकाळी ८.००
५		१. श्री.ए.टी.देशभ्रतार तलाठी २. कु.एन.मदनकर तलाठी ३. श्री.दादु रामटेके कोतवाल	प्रत्येक बुधवार व रविवार	सकाळी ८.०० ते रात्री ८.००
६		१. श्री.अशोक मेश्राम तलाठी २. श्री.श्रीमंत मौदेकर तलाठी ३. श्री.जगदिश हटवार कोतवाल	प्रत्येक बुधवार व रविवार	रात्री ८.०० ते सकाळी ८.००

वरील चेकपोस्टवर मा.जिल्हाधिकारी भंडारा,मा.उपविभागीय अधिकारी,तुमसर तसेच भरारी पथक अचनाक भेटी देतील. वरील चेकपोस्टवर तपासणीचे बुक/हजेरीपट ठेवण्यात यावे. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दररोज या कर्यालयास सादर करावा. आपण चेक पोष्टला उपस्थित राहत नसल्याची तक्रार पोलीस विभाग यांचेकडुन प्राप्त झाल्यास किंवा भेटीदरम्यान आपण चेक पोस्टवर हजर नसल्यास आपणा विरूध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी, करीता आपण आपले दिवशी वळेवर चेक पोष्ट ला हजर राहावे.

(सुर्यकांत पाटील)
तहसिलदार,मोहाडी

प्रतीलीपी – १. मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांना माहिती करीता सविनय सादर.
२. मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, भंडारा यांना माहिती करीता सविनय सादर.
३. मा. उपविभागीय अधिकारी, तुमसर यांना माहितीकरीता सविनय सादर.
४. मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, भंडारा/तुमसर यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीस सादर.
५. श्री. ——————————यांना माहिती तथा वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यास अनोपित.
६. पोलीस स्टेशन अधिकारी, मोहाडी / वरठी यांना वरील पथकाशी संपर्क साधुन वरील ठिकाणी पथकात सशस्त्र पोलीस शिपायाची नियुक्ती करण्यात यावी. ०

१५/०४/०८
(सुर्यकांत पाटील)
तहसिलदार,मोहाडी
तहसिलदार मोहाडी

जिल्हादंडाधिकारी कार्यालय, भंडारा

अधिसूचना

क्र.अका/01-16/दंड/कावि- 1456 /17
जिल्हादंडाधिकारी कार्यालय भंडारा
दिनांक :- 01 /08/2017

वाचा :- 1) पोलीस अधिक्षक, भंडारा यांचे क्र.कक्ष-16/रेती घाट/कार्य/1012/17, दिनांक 28/06/2017
2) जिल्हा खनिकर्म अधिकारी, भंडारा यांचे क्र.आसन-14/खनिज/कली/कावि-643/17, दिनांक 16/08/2017

(फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144)

ज्याअर्थी, पोलीस अधिक्षक, भंडारा यांनी माझ्या असे निदर्शनास आणुन दिले की, भंडारा जिल्ह्यातील मोहरणा तहसील पवनी, निलज तालुका मोहाडी, बेटाळा तालुका मोहाडी अंतर्गत रेतीघाट असून सदर रेतीघाटातून रात्रीचे वेळी मोठ्या प्रमाणात अवैध रेती वाहतुक होत असते. यामुळे भंडारा जिल्ह्यात अनेक वेळा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. या अनुषंगाने पो.स्टे. करडी येथे अप. क्र. 12/17 कलम 379 भादवि तसेच पो. स्टे. पवनी येथे रेतीचे टिप्परव्दारे मुलीला झालेल्या अपघतासंबंधाने अप. क्र. 240/17 कलम 279, 304(अ) भादवि सहकलम 134/177, 184 मोवाका अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

तरी उपरोक्त रेतीघाटाचे परिसरात रात्रीचे वेळी सायंकाळी 06.00 ते सकाळी 06.00 वाजतापर्यंत रेती घाटामध्ये वाहने येण्यास प्रतिबंध करण्यासाठी सीआरपीसी कलम 144 प्रमाणे आदेश जारी करण्याची शिफारस पोलीस अधिक्षक, भंडारा यांनी केली आहे.

व ज्याअर्थी, जिल्हा खनिकर्म अधिकारी, भंडारा यांनी भंडारा जिल्ह्यातील सन 2016-17 मध्ये लिलावात न गेलेल्या रेतीघाटाचे क्षेत्रामध्ये अवैध रेती उत्खनन व अवैध रेती वाहतुकीबाबतीत स्थानिक नागरिकांकडून तक्रार व वर्तमानपत्रामध्ये बातम्या प्रकाशीत होत असतात व सदर सर्व रेतीघाटामध्ये कोणत्याही प्रकारचे रेती उत्खनन व वाहतुकीस बंदी आहे, अशा सर्व रेतीघाटामध्ये माहे सप्टेंबर 2017 अखेर पर्यंत सीआरपीसी कलम 144 लागु करण्याबाबत विनंती केलेली आहे.

त्याअर्थी मी, **सुहास दिवसे, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**, भंडारा म्हणून मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांतर्गत फौजदारी प्रक्रीया संहिता 1973 चे कलम 144 अन्वये खालील नमूद रेतीघाटावर मनाई आदेश जारी करीत आहे.

अ.क्र.	तालुका	रेतीघाटाचे नाव	नदीचे नाव
1	भंडारा	खमारी, वडेगांव रिठी, कोथुर्णा, टाकळी	वैनगंगा नदीपात्र
2	मोहाडी	पाचगांव, नेरी, मोहगांव देवी, रोहा, मुंढरी बुज	सूर नदीपात्र वैनगंगा नदीपात्र
3	तुमसर	देवनारा, आष्टी (आंजनविहीर), आष्टी (ब्राम्हणी)	बावनथडी नदीपात्र
4	पवनी	पवनी,येनोडा,जुनोना, गुडेगांव, खातखेडा, शिवनाळा	वैनगंगा नदीपात्र
5	लाखांदूर	गवराळा	वैनगंगा नदीपात्र

(6)

Law & order

53

कली/खनी.
अवैध वाहतुक/उत्खनन
नदीमध्ये संकलीत करावे.
6/8/17

सदर अधिसूचना दिनांक 01---/09/2017 ते 30/09/2017 रोजी पर्यंत उपरोक्त रेतीघाटाचे परिसरात सायंकाळी 06.00 ते सकाळी 06.00 वाजतापर्यंत रेती घाटामध्ये वाहने येण्या-जाण्यास प्रतिबंध करीत आहे.

सदर अधिसूचना माझे सही व शिक्यानिशी आज दिनांक 01--- /09/2017 रोजी निर्गमित करण्यात येत आहे.

(सुहास दिवसे)
जिल्हाधिकारी तथा
जिल्हादंडाधिकारी, भंडारा

प्रतिलीपी :-1) पोलीस अधिक्षक,भंडारा यांना माहिती तथा योग्य कार्यवाहीकरीता अग्रेषित.
त्याना निर्देशित करण्यात येते की, सदर अधिसूचनेची प्रत आपले अधिनस्त संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी/ठाणेदार यांना परस्पर रवाना करण्यात यावी व या अधिसूचनेची काटेकोरपणे अमलबजावणी करण्याचे निर्देश आपल्या स्तरावरुन देण्यात दयावे. तसेच सदर अधिसूचनेच्या अंमलबजावणीचा सविस्तर अहवाल वेळोवेळी जिल्हा खनिकर्म अधिकारी व या कार्यालयास सादर करावा.

2) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपूर यांना शासनाचे राजपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी रवाना.

3) उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, भंडारा/साकोली/तुमसर

4) तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी भंडारा/मोहाडी/तुमसर/पवनी/लाखांदुर यांना आवश्यक कार्यवाहीकरिता.

5) जिल्हा माहिती अधिकारी,भंडारा यांना सदर अधिसूचना जिल्हयातील सर्व वृत्तपत्रातुन प्रसिध्दी करिता रवाना. त्यांनी प्रसिध्द केलेल्या वृत्तपत्राचे कात्रणे अवलोकनार्थ सादर करावयात.

6) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी , भंडारा यांना माहिती तथा योग्य कार्यवाहीकरीता अग्रेषित.

7) खनिकर्म अधिकारी , जि.का. भंडारा यांना माहिती तथा योग्य कार्यवाहीकरीता अग्रेषित.

जिल्हादंडाधिकारी, भंडारा

उपविभागीय अधिकारी कार्यालय, साकोली.

फॅक्स नं. ०७१८६ – २३६१३६ ई–मेल .sdmsakoli@gmail.com

जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा

महत्वाचे. शाखा – खनिज
नोंदणी –
का.वि. –

क.उविअ/सिरस्तेदार/कावि/15'16/२०१७
उपविभागीय अधिकारी कार्यालय, साकोली
दिनांक :– ०४/०९/२०१७

प्रति, जिल्हाधिकारी/निवासी/अधिक्षक
तहसिलदार,
साकोली/लाखनी/लाखांदुर.

7 SEP 2017

विषय :- अवैध गौण खनिज प्रकरणात नियमानुसार कडक कार्यवाही करण्याबाबत.

उपरोक्त विषयाच्याअनुषंगाने, साकोली उप विभागात अवैध गौण खनिज प्रकरणात कडक कार्यवाही करण्याचे आपणास व मं.अ. / तलाठी यांना वेळोवेळी सभेत निर्देश देण्यात आले. तरी वर्तमान पत्रात नेहमी अवैध गोध खनिज बाबत बातम्या येत आहेत आणि महसूल विभाग याकडे हेतुपुरस्पर लक्ष देत नाही. यावरुन या कामाकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे.

करीता सर्व महसूल यंत्रणेची सभा घेवून सर्व कोतवाल, पोलीस पाटील, मंडळ अधिकारी व तलाठी यांना नियमानुसार कार्यवाही करीता निर्देश देण्यात यावे. तसेच प्रत्येक तहसिलदार, मं.अ, तलाठी यांना १ एप्रिल २०१७ पासून किती प्रकरणात कार्यवाही केली त्यांच्या नावासह माहीती अविलंब सादर करावी. या बाबत वरिष्ठ अधिकारी व इतर लोक विचारना करत असतात याबाबत आपणास जानिव आहे. या कामाकडे प्रत्येक्ष लक्ष देण्यात यावे. आणि जे कर्मचारी या कामाकडे हेतू पुरस्पर लक्ष देत नाही त्यांच्या वर विहीत नियम / अधिनियम/शासन सुचना व महसूल नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ नुसार कार्यवाही प्रस्तावित करावी.

उपविभागीय अधिकारी,
साकोली.

प्रतिलीपी :- मा. जिल्हाधिकारी भंडारा यांना माहिती करीता सादर.

412 साकोली/लाखनी.

उपविभागीय अधिकारी,
साकोली.

15/9/17

क्रमांक कली/प्रस्तु-१/कावि/ 9928 /२०१७
तहसिलदार साकोली यांचे कार्यालय
दिनांक :- १६/९/२०१७

आदेश,

विषय :- साकोली तालुक्यातील गौणखनिजाची चोरी होवु नये म्हणुन खबरदारी घेण्याबाबत.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने साकोली तालुक्यातील अवैध्यरित्या रेतीची व अन्य गौण खनिजाची चोरी होवु नये यादृष्टीकोणातुन खालीलप्रमाणे नमुद केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांची नेमणुक करण्यात येत असुन त्यांनी आपले पथकासोबत तालुक्यातील अवैधरित्या होत असलेल्या गौणखनिजाचे वाहतुकीवर आळा घालण्याचे दृष्टीने अनाधिकृत गौणखनिज उत्खनन ,वाहतूकव साठा बाबत महाराष्ट्र जमिन महसुल सहित १९६६ चे कलम ४८ (७)व (८) अन्वये आवश्यक कार्यवाही करुन कार्यवाहीचा दैनदिन अहवाल सादर करावा . नेमुन दिलेल्या दिवसा व्यतिरीक्त कार्यवाही केल्यास ती वैध असेल या कामात कोणतीही हयगय होणार नाही याची संपुर्ण दक्षता घ्यावी .सदर आदेश पुढिल आदेशापर्यंत कार्यान्वीत राहील.

अ.क्र	पथक प्रमुख यांचे नांव व पद	कर्मचारी यांचे नाव व पद	दिवस
१	श्री.बी.आर.मडावी नायब तहसिलदार साकोली	१.श्री.एन.पी.चवळे तलाठी चांदोरी २.व्हि.के.मेश्राम तलाठी वडेगांव ३ श्री.टि.डी.मेश्राम तलाठी सेंदुरवाफा ४.कु.मनिषा एन.उईके पिंडकेपार	प्रत्येक आठवडयाचे सोमवार व बुधवार
२	श्री. मोहतुरे मंडळ अधिकारी सकंल ऐकोडी	१.श्री.एस.जी.कासराळे तलाठी गोंडउमरी २.श्री.एन.जी.खोब्रागडे तलाठी सानगडी ३.श्री.जी.डब्लु.सिडाम तलाठी कुंभली ४.कु.एम.एस.साखरवाडे तलाठी विर्शी	मंगळवार व गुरुवार
३	श्री.एस.के.कारेमोरे मंडळअधिकारी सानगडी	१.श्री.एन.जी.खोब्रागडे तलाठी सानगडी २. श्री.व्हि.टी.हटवार तलाठी शिवणीबांध ३.श्री.गणवरी तलाठी ४.कु.एम.आर.कारेमोरे तलाठी किन्ही	शुक्रवार व शनिवार
४.	श्री.ए.आर.पवार नायब तहसिलदार सानगडी	श्री.एस.एस.ठाकरे तलाठी एकोडी श्री.डी.एस.शिंदे तलाठी परसोडी श्री.एन.सी.मदनकर तलाठी साकोली श्री.एन.पी.बिसेन तलाठी वळद श्री.व्हि.टी.हटवार तलाठी शिवणीबांध	रविवार

तहसिलदार,साकोली

प्रतिलिपी :- १)मा.जिल्हा खनिकर्म अधिकारी भंडारा यांना माहिती करिता सविनय सादर.
२) मा.उपविभागीय अधिकारी साकोली यांना माहिती करिता सविनय सादर.
३)श्री.---------- नायब तहसिलदार /मंअ/तलाठी यांना माहिती करिता तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषीत.

तहसिलदार साकोली
16.09.17

२७
क्र.कार्या-१४/खनिज/ कलि/कावि/ /१७
जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा.
दिनांक :- २८/१२/२०१७

// आदेश //

भंडारा जिल्हयातील रेती व इतर गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीवर आळा घालणेसाठी जिल्हास्तरावर खालीलप्रमाणे भरारी पथके तयार करण्यात येत आहे.

अ. क्र.	नियुक्ती केलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचे नाम व पदनाम
भरारी पथक क्र. १	१. श्री थोरवे, नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, लाखनी - पथक प्रमुख २. श्री सोनवाने मंडळ अधिकारी, शहापूर ता. भंडारा ३. श्री. नेवारे, तलाठी, बेला ता. भंडारा ४. श्री. निमजे, तलाठी, शहापूर ता. भंडारा ५. श्री विशाल गुल्हाने, अ.का. जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा ६. दोन पोलीस शिपाई (शस्त्रधारी)
भरारी पथक क्र. २	१. श्री एम.यु. वाकलेकर नायब तहसिलदार, तह.कार्यालय भंडारा - पथक प्रमुख २. श्री. चवळे, अ.का. तहसिल कार्यालय, भंडारा ३. श्री. राघोर्ते, क.लि. जिल्हा खनिकर्म शाखा, जि. का. भंडारा ४. श्री कावठे, मंडळ अधिकारी, कांद्री तह. कार्यालय मोहाडी ५. श्री. उमक, तलाठी सिल्ली, तह. कार्यालय भंडारा ६. दोन पोलीस शिपाई (शस्त्रधारी)

वरील प्रमाणे तयार करण्यात आलेल्या भरारी पथकाने भंडारा जिल्हयात उभारण्यात आलेल्या चेकपोस्ट व पोलीस चौक्यांची अचानक तपासणी करावी व त्या योग्यरित्या सुरु असल्याबाबत खात्री करावी. तसेच कोणत्याही रेतीघाटातून रेतीचे अवैध उत्खनन व वाहतूक होणार नाही याची तपासणी करावी. भरारी पथक प्रमुखांनी धाडी टाकण्यापुर्वी त्याबाबतची पुर्व सुचना जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांना देण्यात यावी व सोबत पोलीस मुख्यालयातून पोलीस बंदोबस्त घेण्यात यावा. भरारी पथक प्रमुखानी भरारी करीता आवश्यक वाहनाबाबत जिल्हा खनिकर्म

अधिकारी यांच्याशी संपर्क साधावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल खनिकर्म शाखेस सादर करावा; सदर धाडी गोपनिय राहील याबाबत आपल्या स्तरावरुन योग्य तो निर्णय घ्यावा. अवैध उत्खनन व वाहतूकीचे प्रकरण आढळून आल्यास महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८ नुसार वाहनाचा जप्तीनामा तयार करण्याकरिता पथक प्रमुखांना प्राधीकृत करण्यात येते व पुढील कार्यवाही करिता सदर प्रकरण संबंधित तहसिलदार यांचेकडे सुपुर्द करण्यात यावे. व त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करावा. भरारी पथक प्रमुखांनी सदर कामात कोणतीही हयगय होणार नाही याची नोंद घ्यावी.

जिल्हाधिकारी भंडारा

प्रतिलीपी :-. यांना माहिती तथा उचित कार्यवाही करीता अग्रेषित.

१. पोलीस अधिक्षक , भंडारा आपण वरील प्रमाणे तयार करण्यात आलेल्या भरारी पथकाला वेळोवेळी तात्काळ पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देण्यात यावा.
२. प्रभारी अधिकारी ---------- विभाग जि. का. भंडारा
३. श्री. ----------
४. उपविभागीय अधिकारी, भंडारा /तुमसर/साकोली .
५. उपविभागीय पोलीस अधिकारी , भंडारा/ तुमसर/ पवनी /साकोली.
६. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, भंडारा
७. तहसिलदार, भंडारा/ मोहाडी/पवनी /तुमसर /साकोली/ लाखनी/लाखांदूर आपण अवैध उत्खनन व वाहतुकीचे भरारी पथकाद्वारे सुपुर्द केलेल्या प्रकरणात कार्यवाहीचा अहवाल दररोज सादर करावा.
८. पोलीस निरीक्षक,पोलीस स्टेशन,भंडारा शहर /कारधा ग्रामीण / जवाहरनगर/ तुमसर / गोबरवाही / मोहाडी/पवनी /अडयाळ/ लाखनी /पालांदूर/ साकोली /लाखांदूर / दिघोरी मोटी
९. श्री. ---------- मोटर वाहन निरीक्षक, भंडारा.

जिल्हाधिकारी भंडारा

गडचिरोली

जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय
Email :- mininggad@gmail.com
क्रं.कार्या-2/अ.का.खनिज/कावि/४७/2018
दिनांक :- १५ मे, 2018

प्रति,

मा. श्री. दिनेश चव्हाण,
अवर सचिव, महसुल व वनविभाग,
म.शा. मंत्रालय, मुंबई-32

विषय - लोकलेखा समितीचा सन 2014-15 मधील महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवालातील परिच्छेद क्र. 7,2,3,7

संदर्भ - आपले पत्र क्र. गौखनि 10/1017/प्र.क्र.457/ख, दि. 14.5.2018

महोदय,

संदर्भीय पत्रान्वये प्राप्त निर्देशानुसार लोकलेखा समितीच्या विषयांकीत परिच्छेदावर मा. महालेखापाल यांचे अभिप्रायानुसार खालीलप्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे.

अ.क्र.	सन	परिच्छेद क्र.	महालेखापाल यांचे अभिप्राय	या कार्यालयाची माहिती
1	2014-15	7,2,3,7	1. As envisaged in GR dated 5.12.2015 whether Committee under chairmanship of Collector is formed in every district? 2. The details of meetings conducted along with minutes of meeting may be furnished to PAC	1. दिनांक 5.12.2015 च्या शासन निर्णयानुसार मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती या जिल्हयात गठीत करण्यात आलेली नाही. तथापी, दिनांक 12.3.2013 चे शा.नि. दर्शविल्यानुसार दिनांक 8 ऑगस्ट, 2016 रोजी जिल्हा स्तरीय तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली आहे. जिल्हयात असे तक्रार अर्ज प्राप्त झालेली नसल्यामुळे सदर समितीची सभा घेण्यात आलेली नाही. 2. दिनांक 6 जून, 2016 रोजीचे आदेशान्वये संपूर्ण जिल्हयामध्ये प्रत्येक तालुका स्तरावर उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली महसुल व पोलीस विभागाचे संयुक्त भरारी पथक स्थापन करुन संबंधीत परिवहण अधिकारी यांची यामध्ये मदत प्राप्त करुन जिल्हयात होणाऱ्या अवैध गौण खनिज व रेतीचे प्रकरणात रात्रीचे वेळी धाडी घालण्यासाठी पथक स्थापन केलेले होते. (प्रत संलग्न करण्यात येत आहे)

आपला विश्वासू

जिल्हा खनिकर्म अधिकारी,
गडचिरोली

प्रतिलीपी - मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

जिल्हा खनिकर्म अधिकारी,
गडचिरोली

जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय
Email :- mininggad@gmail.com
क्रं.कार्या-2/अ.का.खनिज/कावि/486 /2016
दिनांक :- 8 ऑगस्ट, 2016

वाचा :- महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक गौखनि-10/0512/प्र.क्र.300/ख दिनांक 12 मार्च, 2013.

आदेश :-

गडचिरोली जिल्हयातील रेतीघाट विषयक तक्रारी बाबत शासनाने विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार लिलाव करण्यात आलेल्या स्थळाबाबत कालांतराने रेती/ वाळू स्थळातुन लिलावाच्या अटी/ शर्तीचे उल्लंघन करुन वाळूचे उत्खनन होते, अवैध/ नियमबाहय वाळू उत्खननामुळे नदी काठच्या गावातील पिण्याच्या व शेतीच्या पाण्यावर विपरीत परिणाम होतो, वाळूच्या वाहतुकीमुळे नदी काठच्या शेतीची/ रस्त्यांची हानी होते, अशा स्वरुपाच्या तक्रारी विविध व्यक्ती व संस्थाकडून करण्यात येतात. अशा तक्रारीची दखल घेऊन त्या संदर्भात चौकशी करुन चौकशीच्या निष्कर्षानुसार कार्यवाही करण्यासाठी उपरोक्त शासन निर्णयातील ब (16) नुसार अपर जिल्हाधिकारी/जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुढील अधिकाऱ्यांचा समावेश असलेली जिल्हा स्तरीय समीती स्थापन करीत आहे.

1. अपर जिल्हाधिकारी :- अध्यक्ष
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली :- सदस्य
3. कार्यकारी अभियंता, सार्वजनीक बांधकाम विभाग, गडचिरोली :- सदस्य
4. वरीष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, गडचिरोली :- सदस्य
5. उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ चंद्रपुर :- सदस्य
6. जिल्हा खनिकर्म अधिकारी, गडचिरोली :- सदस्य / सचिव

लिलावात दिलेल्या वाळू गटातुन लिलावधारकांस उत्खनन करण्यांस विरोध झाल्यास किंवा नैसर्गीक किंवा लिलावधारकाच्या नियंत्रणाबाहेरील सबळ कारणांमुळे उत्खनन होवू शकले नाही तर लिलावधारकाने जिल्हा स्तरीय समिती यांच्या निदर्शनास आणावी.

जिल्हयातील एखादया रेती/ वाळू गटासंदर्भात वरील स्वरुपाच्या लेखी तक्रारी प्राप्त झाल्यास उपरोक्त समिती अशा रेती/वाळू स्थळाना प्रत्यक्ष भेट देऊन, त्या रेती/वाळू स्थळाचे पुनश्च: सर्वेक्षण करील तसेच तक्रारीतील अन्य मुद्दयांबाबत स्थानीक चौकशी करील व समितीच्या बैठकीत त्यावर विचार विनिमय करुन त्याबद्दलच्या निष्कर्षाचा अहवाल शिफारशीसह संबधीत अपर जिल्हाधिकारी/जिल्हाधिकारी यांना सादर करील. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, संबधीत रेती/वाळू गटातुन वाळूचे उत्खनन चालू ठेवण्याविषयी किंवा ते बंद करण्याबाबत अपर जिल्हाधिकारी/जिल्हाधिकारी निर्णय घेईल.

(महेश आव्हाड)
अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली.

प्रतिलीपी :-

1. मा. विभागीय आयुक्त, नागपुर विभाग, नागपुर यांना माहीतीस सविनय सादर.
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली
3. कार्यकारी अभियंता, सार्वजनीक बांधकाम विभाग, गडचिरोली.
4. वरीष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, गडचिरोली
5. उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ चंद्रपुर
6. जिल्हा खनिकर्म अधिकारी, गडचिरोली

अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली.

जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय
क्रे.कार्या-2/अ.का.खनिज/कावि/३१५ /16
Email :- mininggad@gmail.com
दिनांक :- ६ जून , 2016

वाचा:- फौजदारी रिट याचीका क्रमांक 374/2015 मा.न्यायालयाचे आदेश दिनांक 29.3.2016

आदेश :-

फौजदारी रिट याचीका क्रमांक 374/2015 अनिल श्यामसुंदर आग्रे आणि अन्य विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर या प्रकरणांत मा.उच्च न्यायालय मुंबई, नागपुर खंडपीठ, नागपुर यांचे आदेश दिनांक 29.3.2016 मध्ये गडचिरोली जिल्हयामध्ये रात्रीचे वेळी रेतीचे व इतर गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक होत असल्याचे नमुद करुन त्याविरुद्ध कार्यवाही करण्यास्तव पोलीस विभाग व महसुल विभागाची समिती स्थापन करुन गडचिरोली जिल्हयात कार्यवाही करण्याबाबत आदेशीत केले असून अहवाल मा.विभागीय आयुक्त, नागपुर विभाग, नागपुर यांचे मार्फत मा. उच्च न्यायालय मुंबई, नागपुर खंडपीठ, नागपुर यांना सादर करावयाचा आहे.

त्याअनुषंगाने खालील अधिकाऱ्यांची रात्रीचे वेळी गडचिरोली जिल्हयामध्ये रेतीचे व इतर गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत धाडी घालणे व त्या विरुद्ध कार्यवाही करण्यास्तव खालीलप्रमाणे समितीमध्ये नियुक्ती करण्यात येत आहे.

अ.क्र	विषय	अधिकाऱ्यांचे नाव पदनाम	शेरा
1	गडचिरोली व धानोरा या तालुक्यात येणारे रेतीघाट व इतर गौण खनिज	1.उप विभागीय अधिकारी, गडचिरोली 2.उप विभागीय पोलीस अधिकारी, गडचिरोली 3.तहसिलदार, गडचिरोली. 4. तहसिलदार, आरमोरी 5. पोलीस निरीक्षक, गडचिरोली. 6. पोलीस निरीक्षक, धानोरा	
2	चामोर्शी व मुलचेरा या तालुक्यात येणारे रेतीघाट व इतर गौण खनिज	1.उप विभागीय अधिकारी, चामोर्शी 2.उप विभागीय पोलीस अधिकारी, घोट कॅम्प चामोर्शी 3.तहसिलदार, चामोर्शी 4. तहसिलदार, मुलचेरा 5. पोलीस निरीक्षक, चामोर्शी 6. पोलीस निरीक्षक, मुलचेरा	
3	अहेरी व सिरोंचा तालुक्यात येणारे रेतीघाट व इतर गौण खनिज	1.उप विभागीय अधिकारी, अहेरी 2.उप विभागीय पोलीस अधिकारी, अहेरी 3. उप विभागीय पोलीस अधिकारी, सिरोंचा 4.तहसिलदार, अहेरी 5. पोलीस निरीक्षक, अहेरी. 6. पोलीस निरीक्षक, सिरोंचा 7. पोलीस निरीक्षक, आसरअली	
4	एटापल्ली व भामरागड तालुक्यात येणारे रेतीघाट व इतर गौण खनिज	1.उप विभागीय अधिकारी, एटापल्ली 2.उप विभागीय पोलीस अधिकारी, एटापल्ली 3.तहसिलदार, एटापल्ली 4. तहसिलदार, भामरागड 4. पोलीस निरीक्षक, एटापल्ली 5. पोलीस निरीक्षक, रेपनपल्ली	

		6. पोलीस निरीक्षक, जिमलगट्टा 7. पोलीस निरीक्षक, भामरागड	
5	देसाईगंज व आरमोरी तालुक्यात येणारे रेतीघाट व इतर गौण खनिज	1.उप विभागीय अधिकारी, देसाईगंज 2.उप विभागीय पोलीस अधिकारी, कुरखेडा कॅम्प देसाईगंज 3.तहसिलदार, देसाईगंज 4. तहसिलदार, आरमोरी 5. पोलीस निरीक्षक, देसाईगंज 6. पोलीस निरीक्षक, आरमोरी	
6	कुरखेडा व कोरची तालुक्यात येणारे रेतीघाट व इतर गौण खनिज	1.उप विभागीय अधिकारी, कुरखेडा 2. तहसिलदार, कुरखेडा 3.तहसिलदार, कोरची 4. पोलीस निरीक्षक, कुरखेडा 5. पोलीस निरीक्षक, पुराडा 6. पोलीस निरीक्षक, मालेवाडा	

वरील समितीत नियुक्त अधिकाऱ्यांनी गडचिरोली जिल्हयातील लिलाव झालेल्या व लिलाव न झालेल्या रेतीघाटांची दिवस/ रात्रीचे वेळी आकस्मीक तपासणी करावी. तसेच अवैधरित्या रेतीचे व इतर गौण खनिजाचे उत्खनन व वाहतुक होत असल्यास संबधीतांची यंत्रसामुग्री (पोकलँड मशीन, जेसीबी, ट्रक, ट्रक्टर इत्यादी वाहने) जप्त करुन संबधीताविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करावा, दंडात्मक कार्यवाही करावी. या कार्यवाहीत आपले अधिनस्थ कर्मचाऱ्यांचा समावेश करुन घ्यावा. उप विभागीय अधिकारी समितीचे अध्यक्ष राहतील. मा.उच्च न्यायालयात उपरोक्त समितीचा अहवाल सादर करावयाचा असल्यामुळे समितीचे घटनेने केलेल्या कार्यवाही बाबत उप विभागीय अधिकारी यांनी अहवाल दर पंधरा दिवसांनी न चुकता सादर करावा.

उपरोक्त कार्यवाही करीत असताना उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेशी समन्वय साधून क्षमतेपेक्षा अधिक वाळू वाहतुक करणारे वाहनांवर कारवाई करणेबाबत सुचित करावे.

अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली.

प्रतिलिपी :-

1. पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषीत. आपण संबधीत उप विभागीय पोलीसअधिकारी आणि ठाणेदार यांना या आदेशाच्या प्रती पाठवून आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सुचित करावे.
2. अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली/अहेरी यांना माहीतीस तथा उचीत कार्यवाहीस अग्रेषीत.
3. अतिरीक्त शासकीय अभियोक्ता, उच्च न्यायालय मुंबई, नागपुर खंडपीठ, नागपुर यांना माहीतीकरीता.
4. उपविभागीय अधिकारी,---------- यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषीत.
5. पोलीस उप विभागीय अधिकारी,---------- यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषीत.
6. तहसिलदार.---------- यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषीत.
7. पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे---------- यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषीत.
8. आदेश नस्ती.

अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली.

चंद्रपूर

जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे कार्यालय
क्र.साशा/कार्या-11/टे.4/रे.लि./2018/269
दिनांक :- 21/04/2018

प्रति,

विषय :- गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या जिल्हास्तरीय दक्षता समिती मध्ये पदसिध्द सदस्य म्हणून नियुक्ती करण्याबाबत.

संदर्भ :- महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र.गौखनि/10/0615/प्र.क्र.289/ख, दि. 03/01/2018

महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र.गौखनि/10/0615/प्र.क्र.289/ख, दि. 03/01/2018 मधील मुद्दा क्रमांक 17 (अ) (2) नुसार चंद्रपूर जिल्ह्यातील गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय दक्षता समितीची स्थापना करण्यात येत असून सदर समिती मध्ये आपली खालील प्रमाणे सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

जिल्हास्तरीय दक्षता समिती :-

अ.क्र.	सभासदाचे नांव व पदनाम	हुद्दा
1	मा. श्री. आशुतोष सलिल, जिल्हाधिकारी, चंद्रपूर	अध्यक्ष
2	मा. श्रीमती नियती ठाकर, पोलीस अधिक्षक, चंद्रपूर	सदस्य
3	मा. श्री. जितेंद्र पापडकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.चंद्रपूर	सदस्य
4	मा. श्री. सचिन कलंत्रे, अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर	सदस्य
5	श्री. व्ही. एन. शिंदे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर	सदस्य
6	श्री. अभय जोशी, जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, चंद्रपूर	सदस्य
7	डॉ. गजानन डी. कामडे, जिल्हा खनिकर्म अधिकारी, चंद्रपूर	सदस्य सचिव

सदस्य सचिव तथा जिल्हा खनिकर्म
अधिकारी, चंद्रपूर

जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे कार्यालय
क्र.साशा/कार्या-11/टे.4/रे.लि./2018/ 270
दिनांक :- 21/04/2018

प्रति,

विषय :- वाळू/रेती उत्खननातील अडचणी व तक्रारीसंदर्भात जिल्हास्तरीय समिती मध्ये पदसिध्द सदस्य म्हणून नियुक्ती करण्याबाबत.

संदर्भ :- महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र.गौखनि/10/0615/प्र.क्र.289/ख. दि. 03/01/2018

महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र.गौखनि/10/0615/प्र.क्र.289/ख, दि. 03/01/2018 मधील मुद्दा क्रमांक 19 नुसार चंद्रपूर जिल्ह्यातील लिलाव झालेल्या वाळू/रेती गटातून उत्खननासाठी लिलावधारकास येणाऱ्या तक्रारीसंदर्भात चौकशी करुन चौकशीच्या निष्कर्षानुसार कार्यवाही करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात येत असून सदर समिती मध्ये आपली खालील प्रमाणे सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

वाळू/रेती उत्खननातील अडचणी व तक्रारीसंदर्भात जिल्हास्तरीय समिती :-

अ.क्र.	सभासदाचे नांव व पदनाम	हुद्दा
1	मा. श्री. सचिन कलंत्रे, अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर	अध्यक्ष
2	मा. श्री. जितेंद्र पापडकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.चंद्रपूर	सदस्य
3	श्री. मनोज एम. जैस्वाल, कार्यकारी अभियंता, सां.बा. विभाग, वि.क्र. 2, चंद्रपूर	सदस्य
4	श्री. विश्वास जे. वालदे, वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, चंद्रपूर	सदस्य
5	श्रीमती हेमा देशपांडे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर	सदस्य
6	डॉ. गजानन डी. कामडे, जिल्हा खनिकर्म अधिकारी, चंद्रपूर	सदस्य सचिव

सदस्य सचिव तथा जिल्हा खनिकर्म
अधिकारी, चंद्रपूर

गोंदिया

आदेश :-

शासन परिपत्रक क्रमांकवाय(ए.2005/प्र.क्र.45/य दिनांक [illegible] शासनाकडून मंत्र्यांच्यासाठी प्राप्त झालेल्या मुक्कामानुसार रेती व इतर गौण खनिजाच्या साठ्याच्या प्रमाणात होत असलेल्या चोरीला आळा घालण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर भरारी पथके स्थापन करण्याच्या सूचना आहेत. सदर भरारी पथकात महसूल, पोलिस व परिवहन या विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश करुन रेती व इतर गौण खनिजाच्या चोरीची प्रभावीपणे निरसीत करुन त्या ठिकाणी अचानक धाडी टाकण्यात रेती व इतर गौण खनिजाचे अवैध उत्खनन अथवा वाहतूक होत असल्याचे आढळून, तेथे सक्षमपणे पंचनामा करुन कारवाई करावी व त्यांच्या कडून नियमानुसार स्वामित्वधन अधिक दंडाची रक्कम वसूल करावी, तसेच संबंधित विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात यावा, अशा सूचना आहेत.

गोंदिया जिल्ह्यात रेती व इतर गौण खनिजाची चोरी रोखण्यासाठी जिल्हास्तरावर खालीलप्रमाणे भरारी पथकांची नेमणूक करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकारी/कर्मचाऱ्याचे पदनाम	कार्यक्षेत्र	शेरा
1.	निवासी उपजिल्हाधिकारी पथक प्रमुख	गोंदिया जिल्हा	
2	जिल्हा खनिकर्म अधिकारी	गोंदिया जिल्हा	
3	उपप्रादेशिक परिवहन अधिकारी/त्यांचे प्रतिनिधी	गोंदिया जिल्हा	
4	जिल्हा पोलिस मुख्यालयाचे पोलिस निरीक्षक व त्यांचे प्रतिनिधी	गोंदिया जिल्हा	
5	श्री असरकर, (अधिक्षक), श्री सहारे (सहायक अधिक्षक महसूल), श्री जांभुळे, (सहायक अधिक्षक ग.वा.) जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया	गोंदिया जिल्हा	
6	श्री [illegible] (खनिकर्म)/श्री [illegible] (उपप्रादेशिक परिवहन अधिकारी)/श्री [illegible] (सहायक पोलिस निरीक्षक)	गोंदिया जिल्हा	



E´E´E®hE{EjE Gò.2

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,

२७, "खनिज भवन", सिमेंट रोड, शिवाजी नगर, नागपूर - ४४० ०१०

दूरध्वनी क्र. ०७१२-२२२०७५५ फॅक्स क्र. ०७१२-२२२५६९४ ई-मेल : director@mahadgm.gov.in, dgm@mahadgm.gov.in

पत्र क्र.सांख्यिकीपीएसी/९१२/भाग-४/२०१४/६६८/२/२०१३/ २५९८ दिनांक ----/१०/२०१८

20 OCT 2018

प्रति,

प्रा. अतिरिक्त मुख्य सचिव (उद्योग),
महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

DS(1)
May be submitted to PAC for compliance

विषय :- मा.लोकलेखा समिती महाराष्ट्र राज्य, विधान मंडळ, महाराष्ट्र यांचेकडील दि.०३/१०/२०१८ ची साक्ष.

संदर्भ :- १) आपले पत्र क्र. क्र.लोलेस/०८१८/प्र.क्र.५१/उद्योग-९, दि.०४/१०/२०१८
२) संचालनालयाचे पत्र क्र.एसटीसी/सांख्यिकी/पर्या/७७४/२/२०१८/२३८२, दि.०४/१०/२०१८ व समक्रमांकाचे पत्र दि.१२/१०/२०१८

महोदय,

लोकलेखा समिती विधीमंडळ महाराष्ट्र राज्य यांचेसमक्ष दि.०३/१०/२०१८ रोजी झालेल्या साक्षी दरम्यान व आपले संदर्भांकित पत्रातील सुचनांनूसार मुद्देनिहाय माहिती व प्रस्तावित कार्यवाही संबंधित जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन संकलित करणेत आली आहे.

महालेखाकार यांनी नमूद केलेल्या प्रकरणाव्यतिरिक्त इतर प्रमुख खनिज खनिपट्टयांमध्ये आढळून आलेल्या त्रुटी व प्रस्तावित केलेल्या कार्यवाहीचा तपशील यासोबत संलग्न करणेत येत आहे.

वेस्टर्न कोल फिल्ड लि. द्वारा कोळसा उत्खननात खाणकाम योजना व पर्यावरण नाहकती व्यतिरिक्त उत्खनन झालेले आहे किंवा कसे ? याबाबत देखील माहिती संकलित करणेत आली आहे.

उपरोक्त मुद्यांबाबत या व्यतिरिक्त अतिरिक्त माहिती आढळल्यास सत्वर शासनास/संचालनालयास सादर करणेच्या सूचना निर्गमित करणेत आलेल्या आहेत. तसेच खाणकाम योजना/पर्यावरण नाहरकत दाखल्याखेरीज खाणकामाची प्रकरणे आढळून आल्यास नोटीस बजाविण्यात यावे, अंतिम आदेश पारित करून संबंधित न्यायालयात कॅव्हेट दाखल करण्याची कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले.

मुद्देनिहाय अहवाल व माहिती पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.

सहपत्र :- वरिलप्रमाणे
१. अहवाल (पृष्ठ क्र. १ ते ७)
२. संबंधित सहपत्रे (पृष्ठ क्र. १ ते ~~९१२~~ 912)

(मा. संचालकांनी मान्य केलेले प्रारुप)

आपला,

(रो.रा.मेश्राम)
वरिष्ठ भूवैज्ञानिक,
भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन, नागपूर

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-१५ च्या महसूली क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र.७.२

अ.क्र.	सादर करावयाची माहिती/अहवाल	केलेली कार्यवाही
१	**परिच्छेद क्र.७.२.२.३(अ) खनिकर्म योजनेपेक्षा जादा उत्पादन**	
	१. अडेगांव (डोलोमाईट आणि चुनखडी) २. मेघरे (बॉक्साईट)	
	सदर प्रकरणी खाणपट्टा धारकांविरुद्ध करण्यात आलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल	यवतमाळ जिल्हयातील अडेगांव डोलोमाईट आणि चुनखडी खाणी मध्ये सन २०१०-११ मध्ये खनिकर्म योजनेपक्षा ११९९२ मे.टन जादा उत्पादनाबाबत महालेखाकार कार्यालयांकडून काढण्यात आलेल्या आक्षेपानूसार संबंधित खाणपट्टाधारकास रु. १४,९९,०००/- खनिज मूल्य दंड आकारण्यात येऊन, त्वरित सदर रकमेचा भरणा करणेबाबत दि. २८/०९/२०१८ अन्वये संबंधित जिल्हा खनिकर्म कार्यालयाकडून सूचित करण्यात आले आहे. संबंधितांविरुद्ध सक्तीच्या वसुलीची प्रक्रिया सुरु करणेत आली असून, मागणीच्या नोटीसीच्या ९० दिवसांच्या आंत वसुलीची प्रक्रिया पूर्ण करणेत येईल. (सहपत्र - पृष्ठ क्र. ४५) रायगड जिल्हयातील मेघरे खनिपट्टयात सन २००९-१०, २०१०-११ व २०१३-१४ मध्ये उत्पादन मर्यादेपेक्षा जास्त उत्खननाबाबत महालेखाकार कार्यालयाकडून काढलेल्या आक्षेपाचे अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, सदर खनिपट्टयाचे परिवर्तित खाणकाम आराखडा (Modified Mining plan) नूसार सन २००८-०९ ते २०१२-१३ या ५ वर्षाकरिता मंजूर एकूण उत्पादन मर्यादा २,४०,००० मे.टन असून एकूण १,९६,२०० मे.टन उत्पादन करण्यात आले आहे. तसेच त्यापुढील सन २०१३-१४ ते २०१७-१८ करिता मंजूर आराखडयानूसार उत्पादन मर्यादा ४,६१,८१६ मे.टन असून संबंधित खाणपट्टाधारकाकडून सदर कालावधीत एकूण ३,०९,९८० मे.टन उत्पादन करण्यात आले. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या SLP क्र. ११४/२०१४ व १९४/२०१४ चे न्यायनिर्णयाप्रमाणे प्रस्तावित आराखडयाच्या २०% जास्त उत्खनन झाल्यास अवैध ठरविण्यात आले आहे. महालेखाकार कार्यालयाकडून काढण्यात आलेल्या आक्षेपानूसार काही वर्षात मर्यादेपेक्षा जास्त उत्खनन झाले असले, तरी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाप्रमाणे वरिलप्रमाणे झालेले उत्खनन हे प्रस्तावित आराखडा मर्यादेचे आतच आहे. (सहपत्र - पृष्ठ क्र. २१)

अ.क्र.	सादर करावयाची माहिती/अहवाल	केलेली कार्यवाही
२	**खनिकर्म योजना मंजूरीशिवाय खनिजांचे उत्पादन**	
	१. मुळ -वेळास-हारविट-कुडगांव (बॉक्साईट) २. दांडगुरी खुजारे (बॉक्साईट) ३. गिरगांव - बॉक्साईट खाण	
	सदर प्रकरणी खाणपट्टा धारकांविरुद्ध करण्यात आलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल	रायगड जिल्हयातील मुल-वेलास-हरवीट-कुडगांव बॉक्साईट माईन्स क्षेत्र ५०.२१ हे. व दांडगुरी खुजारे बॉक्साईट माईन्स क्षेत्र ७१.४२ हे. या खाणीतील खाणकाम खनिकर्म योजनेनूसार झालेले नसल्याचे आढळून आल्याने, सदर दोन्ही खाणपट्टाधारकांना भारतीय खाण ब्यूरो कार्यालयाकडून कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली होती व तद्नंतर खाणपट्टाधारकांनी आक्षेपांची पुर्तता केल्यामुळे सदर खाणपट्टयांचे निलंबन आदेश भारतीय खाण ब्यूरो कार्यालयाद्वारे दि.३१/०५/२०१६ चे पत्रान्वये रद्द करण्यात येऊन, खाणपट्टे पुर्नजिवित करण्यात आलेले आहेत. तरी संबंधित खाणपट्टाधारकास अनुक्रमे रु. १,०५,४१,०००/- व रु. २,५१,४६,०००/- असे एकूण ३,५६,८७,०००/-इतके खनिज मूल्य दंड आकारण्यात येऊन, त्वरित सदर रकमेचा भरणा करणेबाबत दि. १७/१०/२०१८ अन्वये संबंधित जिल्हा खनिकर्म कार्यालयाकडून सूचित करण्यात आले आहे. संबंधितांविरुद्ध सक्तीच्या वसुलीची प्रक्रिया सुरु करणेत आली असून, मागणीच्या नोटीसीच्या ९० दिवसापर्यंत वसुलीची प्रक्रिया पूर्ण करणेत येईल. (सहपत्र - पृष्ठ क्र. २९) गिरगांव बॉक्साईट खाण मध्ये सन २०१०-२०११ व सन २०११-२०१२ या वर्षात कंपनीद्वारे अनुक्रमे १२४१३० व ४९४०० मे. टन बॉक्साईट खनिजाचे उत्खनन हे नियमानूसार आवश्यक मंजूर अधिकृत तथा मंजूर खाणकाम कार्यक्रम योजनेअभावी करण्यात आले. सदरहू बाब ही भारतीय खाण ब्यूरो, गोवा यांच्या मार्फत केलेल्या स्थळ पाहणी दरम्यान निदर्शनास आली. करिता सदर प्रकरणी MCDR १९८८ च्या नियम १३(१) चे उल्लघंन केल्याने MCDR १९८८ च्या नियम १३(२) नूसार भारतीय खाण ब्यूरो, गोवा यांचेकडील दि.२३/१२/२०११ च्या आदेशान्वये सदर खाणपट्टा निलंबीत करण्यात आला. संबंधित खाणपट्टाधारकाकडून आवश्यक बाबींची पुर्तता झाल्यानंतर भारतीय खाण ब्यूरो, गोवा यांचेकडील दिनांक ११/०४/२०१२ पत्रान्वये खाणपट्टयाचे निलंबन परत घेण्यात आले. निलंबणाच्या कालावधीमध्ये संबंधित खाणपट्टाधारकाद्वारे उत्खनन करण्यात आलेले नाही. सदर प्रकरणी अधिकृत तथा मंजूर खाणकाम कार्यक्रम योजनेअभावी उत्खनन केल्यामुळे संबंधित खाणपट्टाधारकाविरुद्ध MCDR १९८८ च्या नियम १३(२) नूसार निलंबणाची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तरी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या SLP क्र.११४/२०१४ व १९४/२०१४ या प्रकरणातील ऑगस्ट, २०१७ च्या आदेशातील निर्देशानूसार खनिपट्टाधारकांकडून रु. ५,३२,९५,४०१/- खनिज मुल्याची मागणीची नोटीस देणेत आली आहे. संबंधितांविरुद्ध सक्तीच्या वसुलीची कार्यवाही सुरू असून, ९० दिवसाच्या आंत रक्कम वसुल करणेत येईल. (सहपत्र - पृष्ठ क्र. ४०)

अ.क्र.	सादर करावयाची माहिती/अहवाल	केलेली कार्यवाही
३	**परिच्छेद क्र.७.२.२.३ (ब)** **पर्यावरण मंजूरी प्रमाणपत्र, खनिकर्म योजना आणि उत्पादन यांच्यातील खनिज उत्पादनातील तफावत**	
	१. मुळ-वेळास-हारविट-कुडगांव(बॉक्साईट) २. कुरवाडे-मारल (बॉक्साईट) ३. दांडगुरी खुजारे (बॉक्साईट)	
	१) सदर प्रकरणी खाणपट्टा धारकांविरुद्ध करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल	सदर आक्षेपाचे अनुषंगाने पर्यावरण अनुमती व खनिकर्म योजना मंजूरी यातील उत्पादन मर्यादेनूसार मुल-वेळास-हरविट-कुडगांव, कुरवाडे-मराळ, दांडगुरी खुजारे या ३ बॉक्साईट खाण खाणपट्टाधारकास झालेल्या (अनुक्रमे ४७६५५ मे.टन, ३२३७५० मे.टन, १३६८०० मे.टन) जादा उत्पादन/अवैध उत्खननाबाबत अनुक्रमे रु. १,२५,३६,६७१/-, रु. ७,७८,४१,५००/- व रु. ३,५०,३०,१००/- इतके खनिज मूल्य दंड आकारण्यात येऊन, सदर रक्कमेचा त्वरित भरणा करण्यास सबंधित जिल्हा खनिकर्म कार्यालयाकडून दि.२६/०९/२०१८ अन्वये नोटीस बजाविण्यात आली आहे. संबंधितांविरुद्ध सक्तीच्या वसुलीची कार्यवाही सुरू असून, ९० दिवसाच्या आंत रक्कम वसुल करणेत येईल. (सहपत्र-पृष्ठ क्र. २३)
	२) संपूर्ण राज्यातील बॉक्साईट या खनिजाच्या खाणपट्टयांबाबत पर्यावरण अनुज्ञप्ती आणि खाणकाम योजना यांच्या उल्लंघणाबाबतचा अहवाल	राज्यातील रायगड, कोल्हापूर, रत्नागिरी या ३ बॉक्साईट खनिज जिल्हयांतील अभिलेखाची तपासणी केली असता, रायगड जिल्हयातील १ प्रकरणी खाणकाम योजनेअभावी उत्खनन केल्याने संबंधित खाणपट्टाधारकास रु. ९,०८,३६,५९४/- इतक्या रक्कमेची नोटीस बजाविण्यात आली आहे. संबंधितांविरुद्ध सक्तीच्या वसूलीची प्रक्रिया सुरु करणेत आली असून, मागणीच्या नोटीसीच्या ९० दिवसांपर्यंत वसूलीची प्रक्रिया पूर्ण करणेत येईल. (सहपत्र - पृष्ठ क्र. २५) बॉक्साईट खनिजाबाबत वरीलप्रमाणे नमूद ३ प्रकरणे व रायगड जिल्हयातील १ प्रकरण वगळता पर्यावरण अनुज्ञप्ती आणि खाणकाम योजना यांच्या उल्लंघण झाल्याची प्रकरणे आढळून आलेली नाही. तरी भविष्यात अशा प्रकारची प्रकरणे आढळून आल्यास त्याबाबत नियमानूसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल. याशिवाय बॉक्साईट वगळता इतर प्रमुख खनिपट्टयांबाबत अभिलेखाची तपासणी केली असता, यवतमाळ जिल्हयात पर्यावरण मंजूरीशिवाय खाणकाम केलेले १७ प्रकरणे आढळून आले असून एकूण रु. ११.०२ कोटीचा दंड आकारण्यात आलेला आहे. (सहपत्र - पृष्ठ क्र. ४६ ते ४७) त्यापैकी १ खणिपट्टाधारकाकडून रु. ३६.४१ लक्ष शासनजमा करण्यात आले आहे. चंद्रपूर जिल्हयात पर्यावरण नाहकत दाखल्याखेरीज खाणकाम केलेले २ प्रकरणे आढळून आले असून, संबंधित खाणपट्टाधारकांना नोटीस बजावून १०० % खनिज मूल्य वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे. गडचिरोली जिल्हयातील लोहखनिज खनिपट्टयाअंतर्गत १ प्रकरणात खाणकाम योजनेपेक्षा जास्त लोहखनिजाचे उत्खनन

अ.क्र.	सादर करावयाची माहिती/अहवाल	केलेली कार्यवाही
		झाल्याचे आढळले असून त्यावर कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच कोळसाबाबत नागपूर व यवतमाळ जिल्हयात पर्यावरण अनुज्ञप्ती आणि खाणकाम योजना यांच्या उल्लंघण झाल्याची प्रकरणे आढळून आलेली नाही. चंद्रपूर जिल्हयात कोळसा खणिपट्टयांचे अभिलेखाची तपासणीची कार्यवाही सुरु आहे. (सहपत्र - पृष्ठ क्र.६३)
३	**परिच्छेद क्र.७.२.२.४ - पर्यावरण मंजूरीकरिता खोटी कागदपत्रे सादर**	
	१) सदर प्रकरणी खाणपट्टा धारकांविरुद्ध करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल	कोल्हापूर जिल्हयातील मौजे-उदगिरी, ता.शाहूवाडी येथील राज्य शासनाद्वारे श्री.प्रकाश गायकवाड यांना मंजूर २५४.५१ हे. व मे.स्वाती मिनरल्स यांना मंजूर ७७६.७८ हे. खनिपट्टयाबाबत पर्यावरण अनुमती प्राप्त करून घेताना, खनिपट्टाधारकाने सादर केलेले चुकीची माहिती पर्यावरण विभागाच्या निदर्शनास आली असता, केंद्रीय वन व पर्यावरण विभागाकडून अनुक्रमे दि. ०६/०८/२०१२ व दि. १८/११/२०१३ अन्वये अनुमती रद्द करण्यात आली. त्यानूसार खनिपट्टाधारकास उत्पादन बंद करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात येऊन तेव्हापासून सदर खनिपट्टे बंद स्थितीत आहे. पर्यावरण अनुमती प्राप्त करुन घेतांना या कार्यालयाचा कुठेही थेट संबंध येत नसून, यामध्ये वनविभाग, वन्यजीव विभाग, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचा मुख्यत: सबंध असतो. त्यामुळे वन्यजीव विभागाने सदरहू बाब ही जनसुनावणी दरम्यान किंवा तद्नंतर परस्पर केंद्रीय वन व पर्यावरण विभागास परस्पर निदर्शनास आणून देणे आवश्यक होते. उपरोक्त नमूद दोन्ही खाणपट्टाधारकांनी चुकीची माहिती देवून पर्यावरण अनुमती मिळवल्याने याबाबत चौकशी होऊन संबंधिताविरुद्ध नियमानूसार कार्यवाही करणेची मागणी मुख्यसंरक्षक, वन्यजीव, कोल्हापूर यांनी दिनांक १५/०२/२०१४ च्या पत्रान्वये केली. तेव्हा सदरहू दोन्ही खनिपट्टे हे राज्यशासनामार्फत मंजूर केले असल्याने, सदरहू बाब ही जिल्हा खनिकर्म कार्यालयाचे पत्र क्र.कार्या/६अ/आरआर/५१३/२०१४, दि. २५/०२/२०१४ नूसार कळविण्यात आलेले आहे. सबब, नमुद सर्व बाबी विचारात घेता सदरचे खनिपट्टे खनिज सवलत नियम-२०१६ चे नियम १२(९) अन्वये रद्द करणे पूर्वी संदंधित खाणपट्टाधारकास सुनावणीची संधी देण्याची शिफारस शासनास दिनांक १४/०९/२०१८ व दिनांक ०१/०९/२०१८ चे पत्रान्वये या संचालनालयाकडून करण्यांत आली आहे. सदर दोन्ही प्रकरणी अनुक्रमे रु. ८,८१,२२,१२२/- व रु. ५७,२३,०५,८००/- खनिज मूल्य वसुलीच्या मागणीची नोटीस बजावण्यात आली असून, सक्तीच्या वसुलीची कार्यवाहा प्रस्तावित करणेत येत आहे. (सहपत्र - पृष्ठ क्र. ४१ ते ४२) तसेच सदर दोन्ही प्रकरणी खाणपट्टाधारकास सुनावणीची संधी देऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

अ.क्र.	सादर करावयाची माहिती/अहवाल	केलेली कार्यवाही
	२) सदर प्रकरणी संबधित तलाठी, मंडल अधिकारी, संबंधित तहसिलदार इ. नी दुर्लक्ष कले असल्याचे दिसून येते. त्याबाबतचा खुलासा	सदर प्रकरणी तत्कालीन संबधित तलाठी, मंडल अधिकारी, संबंधित तहसिलदार इ. यांना नोटीस बजावून खुलासा सादर करणेबाबत सूचित करण्यात येईल व तद्नुषंगाने प्राप्त खुलाशानूसार शासनास अहवाल सादर करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे.
	३) मुख्य वनसंरक्षक, कोल्हापूर यांनी पत्राद्वारे तत्कालीन जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना कळविले होते. सदर पत्राच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल	सदर प्रकरणी मा.मुख्य वनसंरक्षक, कोल्हापूर यांनी त्यांचेकडील दि. २८/०३/२००५ अन्वये तत्कालीन जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना लिहीलेले पत्र या कार्यालयाचे अभिलेखामध्ये तपासले असता दिसून येत नाही.
४	**परिच्छेद क्र. ७.२.२.५ मंजूर खाणपट्टा क्षेत्राबाहेर अवैध उत्खनन**	
	१) सदर प्रकरणी खाणपट्टा धारकांविरुद्ध केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल	शेखाडी व मेघरे या २ प्रकरणी संबंधित खाणपट्टाधारकास संबंधित जिल्हा खनिकर्म कार्यालयाकडून दिनांक १०/१०/२०१८ चे पत्रान्वये अनुक्रमे रु. १,८०,३०,४८५/- व रु. ३,९९,९११५८/- दंडाची नोटीस बजाविण्यात आलेल्या आहेत व सक्तीच्या वसुलीची कार्यवाही सुरू आहे. (सहपत्र - पृष्ठ क्र. १५ ते १८)
	२) श्री.दर्यानानी यांच्याद्वारे सदरील कालावधीमध्ये निर्यात केलेल्या खनिजाबाबतची महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्याकडील माहिती	मे.मनोहर व्हेन्सीमल दर्याननी यांनी बंदरातून निर्यात केलेल्या खनिजाबाबत माहिती सादर करण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना संबंधित जिल्हा खनिकर्म कार्यालयाकडून दि. १०/१०/२०१८ व दि. १६/१०/२०१८ चे पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदरची माहिती प्राप्त होताच तात्काळ सादर करण्यात येईल.
	३) तसेच संबंधित जमीनमालकाच्या ७/१२ उताऱ्यावरील बोजा कमी करण्याच्या अनुषंगाने करण्यात आलेली कार्यवाही	मौजे-मेघरे,ता.श्रीवर्धन येथील ग.नं. २६ व ४६ या मिळकतीच्या ७/१२ च्या इतर अधिकारात ठेवलेली बोजाची नोंद कमी/रद्द करण्यासाठी जिल्हा खनिकर्म कार्यालयाकडून दिनांक १०/१०/२०१८ चे पत्रान्वये तहसिलदार श्रीवर्धन यांस कळविण्यात आले आहे.
५	**परिच्छेद क्र.७.२.२.६ - शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय भाडेपट्टाधिकारांचे हस्तांतरण**	
	१) सदर प्रकरणी खाणपट्टा धारकांविरुद्ध करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल	सदर प्रकरणी संबंधित ३ खाणपट्टाधारकांस शासनाची पूर्वपरवानगी प्राप्त होईपर्यंत त्यांच्या खाणपट्टयात यापुढे स्वामित्वधनाचा नियमित भरणा व त्याअनुषंगाने वाहतूक पासेस निर्गमित करण्यास संबंधित जिल्हा खनिकर्म कार्यालयाकडून दिनांक ११/१०/२०१८ चे पत्रान्वये प्रतिबंध करण्यात आले आहे. तरी सदर ६ प्रकरणी अंतिम निर्णय देण्यापूर्वी संबंधित खाणपट्टाधारकांना सुनावणीची संधी देण्यात यावी असे शासनास दि. १४/०९/२०१८ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आले आहे. (सहपत्र - पृष्ठ क्र. १५ ते १८)

अ.क्र.	सादर करावयाची माहिती/अहवाल	केलेली कार्यवाही
	२) राज्यातील अशा प्रकारचे साधर्म्य असणाऱ्या सर्वच प्रकरणांची माहिती व त्यानुषंगाने करावयाच्या कारवाईबाबतचे प्रस्ताव सादर करावेत.	मौजे वेळास व साखरी ता.मंडणगड (९१.१० हे.) खणिपट्टयात शासनाचे पूर्व परवानगीशिवाय भाडेपट्टयाचे हस्तांतरण झाल्याचे निदर्शनास आले. तरी सदर प्रकरणी अंतिम निर्णय देण्यापूर्वी संबंधित खाणपट्टाधारकांना सुनावणीची संधी देण्यात यावी असे शासनास दि. १९/१०/२०१८ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. . (सहपत्र - पृष्ठ क्र. १२)
६	**परिच्छेद क्र.७.२.२.६(अ) - स्वामित्वधनाची कमी वसूली**	
	स्वामित्वधनाच्या वसूलीबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल	महालेखाकार कार्यालयाकडून काढण्यात आलेल्या स्वामित्वधनाच्या कमी वसूलीबाबत रु. १३,४७,८२,०५९/- इतक्या रकमेचे अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, संबंधित सर्व खाणपट्टाधारकांकडून देय ठरणारी रु. ११,२०,४३,२४१/-रकमेची वसूली करण्यात आलेली आहे.
७	**परिच्छेद क्र.७.२.२.७ (ब) - व्याजाचा भरणा कमी होणे**	
	तत्कालीन अधिकाऱ्यांनी व्याजाची रक्कम का आकारली नव्हती याबाबतचा खुलासा आणि व्याजाचा भरणा करण्याबाबत करण्याच्या अनुषंगाने करण्यात आलेली कार्यवाही	खनिपट्टयातील स्वामित्वधनाचा हिशोब प्रत्येक तिमाही नंतर करणेत येतात. बॉक्साईट चे दर IBM द्वारा प्रकाशित करणेत येतात. बॉक्साईट चे दर प्रकाशित करणेत विलंब झाल्यास परिणामी हिशोब तपासणी व फरकाच्या रकमेच्या वसुलीत विलंब संभवतो. सदर प्रकरणी संपूर्ण रक्कम रु. २०,९०,६२२/- संबंधित खाणपट्टाधारकाकडून वसुल करणेत आली आहे.
८	**परिच्छेद क्र.७.२.२.७(क) मृत भाडे व भूपृष्ठ भाडयाची वसूली न करणे**	
	मृत भाडे व भूपृष्ठ भाडयाची वसूली करण्याच्या अनुषंगाने करण्यात आलेली कार्यवाही	महालेखाकार कार्यालयांनी नमूद केलेली रक्कमेबाबतचे विनियोजन करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी महालेखाकार यांनी खनिपट्टयाच्या पूर्ण क्षेत्रावर मृतभाटक व भूपृष्ठभाटकाची आकारणी केली आहे. मृतभाटक संपूर्ण क्षेत्रावर व भूपृष्ठ भाटक एकूण वापरण्यात आलेल्या क्षेत्रावर करणे आवश्यक आहे. याप्रमाणे मृतभाटकाची महालेखाकार कार्यालयाकडून काढण्यात आलेल्या आक्षेपानूसार रु. ८२.९२ लक्ष रक्कमेपैकी कोल्हापूर जिल्हयातील ६ खणिपट्टाधारकांकडून रु. ५५,३२,४०४/- पैकी रु. ३६,५३,०२६/- इतकी मृतभाटकाची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. यवतमाळ जिल्हयातील ८ खणिपट्टाधारकांकडून रु. १५.२८ लक्ष इतकी मृतभाटकाची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. रु. ५१.८१ लक्ष रक्कमेची वसूलीची कार्यवाही झाली असून, कोल्हापूर जिल्हयातील १ व यवतमाळ जिल्हयातील ११ असे एकूण १२ प्रकरणांमध्ये अनुक्रमे रु. १६.४७ लक्ष व रु. ८.१८ लक्ष (एकूण रु. २४.६५ लक्ष) उर्वरीत रक्कम वसूलीची कार्यवाही सुरु आहे. तसेच चंद्रपूर जिल्हयातील ६ खाणपट्टाधारकांकडून रु. १३.१५ लक्ष मृतभाटकाची वसूली करण्यात आलेली आहे. महालेखाकार कार्यालयाच्या आक्षेपानूसार भूपृष्ठभाडेबाबत यवतमाळ जिल्हयातील २१ प्रकरणांमध्ये रु. १.६१ कोटी थकबाकी पैकी

अ.क्र.	सादर करावयाची माहिती/अहवाल	केलेली कार्यवाही
		११ प्रकरणांमध्ये खाणपट्टाधारकाने खाणकामाकरिता वापरण्यात आलेले क्षेत्रावर भूपृष्ठभाटकाची देय ठरणारी रक्कम रु. ३५.०४ लक्ष वसूल करण्यात आलेले आहे. उर्वरित १० प्रकरणांमध्ये महालेखाकार कार्यालयाच्या आक्षेपानूसार रु. ५८.०० लक्ष थकबाकी आहेत. परंतू सदर रक्कम संपूर्ण मंजूर क्षेत्रावर आकारण्यात आलेली आहे. सदर खनिपट्टे मागील १०-१२ वर्षांपासून बंद आहेत. करिता खनिपट्टाधारकाकडून खाणकामाकरिता वापरण्यात आलेले क्षेत्र (Area under mining operation) घोषित केलेल्या क्षेत्रावर भूपृष्ठ भाडे आकारणी करून वसूल करण्यात येईल.

पत्र क्र. एमएलआर-६८५/२०१८/२२३८
भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन, २७, खनिज भवन,
शिवाजी नगर, नागपूर-४४० ०१०
दिनांक:- 14 SEP 2018

प्रति,

मा. अतिरिक्त मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

विषय:- मौजे उदगिरी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथील २५४.५१ हेक्टर क्षेत्रावर बॉक्साईट खनिजाकरिता श्री. प्रकाश आनंदराव गायकवाड ऊर्फ गवंडी यांना मंजूर खनिपट्टयाबाबत.

संदर्भ:- १) केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. J-११०१५/१६७/२००६-IAII (M), दिनांक ०६/०८/२०१२ (प्रत संलग्न).
२) जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचे पत्र क्र. कार्या/६अ/आरआर/१७०७/२०१८, दि. ०३/०९/२०१८ (ई-मेलद्वारे प्राप्त) (प्रत संलग्न).

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, विषयांकित प्रकरणी जिल्हा खनिकर्म अधिकारी, कोल्हापूर यांनी संदर्भ क्र. २ वरील पत्रान्वये संचालनालयास सादर केलेल्या अहवालानुसार विषयांकित खनिपट्टयाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे:-

श्री. प्रकाश आनंदराव गायकवाड ऊर्फ गवंडी यांना शासनाकडील क्र. एमएमएन-१६९६/५०९७१/७१९३/डेस्क-४, दिनांक १६/१०/१९९९ रोजीच्या आदेशान्वये मौजा उदगिरी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथील २५४.५१ हेक्टर क्षेत्रावरील बॉक्साईट खनिजाकरिता खाणपट्टा मंजूर करण्यात आलेला आहे. सदर खनिपट्टयाचा कालावधी दि. ३०/०९/२००० ते २९/०९/२०२० आहे. तथापि, सदर खाणपट्टा हा चांदोली राष्ट्रीय अभयारण्याच्या लगत असून पर्यावरण अनुमती प्राप्त करुन घेताना खनिपट्टाधारकाने चुकीची माहिती सादर करुन पर्यावरण विभागामार्फत आवश्यक पर्यावरण अनुमती प्राप्त करुन घेतली, सदरहू बाब पर्यावरण विभागाच्या निदर्शनास आली असता केंद्रीय वन व पर्यावरण विभागाकडील संदर्भ क्र. १ वरील आदेशान्वये विषयांकित खाणपट्टयाची पर्यावरण अनुमती रद्द करण्यात आली आहे. त्यानुसार खनिपट्टाधारकास उत्पादन बंद करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात येवून

ऑगस्ट-२०१२ पासून खाणकाम बंद करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत खाणीमध्ये उत्पादन बंद असून खाण बंद स्थितीत आहे.

खनिपट्टाधारकाने संदर्भ क्र. १ वरील केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांचे दि. ०६/०८/२०१२ रोजीचे आदेशाविरुध्द मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, नवी दिल्ली येथे अपील क्र. ६२/१०१२ अन्वये दावा दाखल केलेला होता. सदर अपीलामध्ये सुनावणी होऊन दि. १४/१२/२०१२ रोजी न्यायालयाने आदेश पारित केलेला असून आदेशामध्ये खनिपट्टाधारकाने मागणी केलेप्रमाणे दाखल केलेले अपील मागे घेण्यास मान्यता दिली असून खनिपट्टाधारक यांना पुनश्च: पर्यावरण दाखला मिळण्याकरिता अर्ज दाखल करण्यास परवानगी दिली आहे. त्या अनुषंगाने खनिपट्टाधारक यांनी भारत सरकार पर्यावरण व वन विभाग, नवी दिल्ली यांचेकडे जानेवारी-२०१३ मध्ये १.२ लाख टन प्रती वर्ष (TPA) बॉक्साईट उत्खननाकरिता अर्ज दाखल केलेला आहे. पर्यावरण मुल्यांकन समिती मार्फत दोनवेळा बैठक झाली असून सद्यस्थितीत प्रकरण समितीकडे पुढील कार्यवाहीकरिता प्रलंबित असल्याचे दिसून येते.

सदर खाणपट्टयाचे उपसंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, कोल्हापूर यांनी दि. २०/०५/२०१२ रोजी स्थळ निरीक्षण केले असून त्यांचेकडील दि. २२/०७/२०१३ च्या अहवालानुसार खाणपट्टा क्षेत्रात एकुण ३७ बॉक्साईट खनिजाचे Stacks (ढीग) असल्याचे स्पष्ट करणेत येवून त्यामध्ये १२००७.५ मे.टन (६००३.७५ क्यू. मि x २) साठा असल्याचे नमूद आहे. असे असले तरी, खोट्या कागदपत्राच्या आधारे पर्यावरण नाहरकत प्राप्त केलेमुळे परवानगी दरम्यान (२००६ ते २०१२ पर्यंत) केलेले उत्खनन अवैध ठरवून त्यावर MMDR Act च्या कलम २१ (५) नुसार दंडनीय कार्यवाही करणेबाबत महालेखाकार यांनी सूचित केले आहे. सदर खनिपट्टयाबाबत निर्णय घेणेपूर्वी खनिपट्टाधारक श्री. प्रकाश गायकवाड यांना खनिज सवलत नियम-१९६० नुसार सुनावणीची संधी देणे आवश्यक राहील.

कृपया, आपले माहिती व पुढील यथोचित कार्यवाहीस्तव सादर.

सहपत्रे:- वरिलप्रमाणे.

आपली,

(प्र. रा. चाफले)
कनिष्ठ भूवैज्ञानिक,
भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन,नागपूर

(मा. संचालकांनी मान्य केलेले प्रारुप)

एचबी २८६--४६अ

पत्र क्र. एमएलआर-४४३/२०१७/२३८९
भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन, २७, खनिज भवन,
शिवाजी नगर, नागपूर-४४० ०१०
दिनांक :- 21 SEP 2018

प्रति,

मा. अतिरिक्त मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

विषय:- मौजे उदगिरी ता.शाहूवाडी जि.कोल्हापूर येथील ७७६.७८ हे. क्षेत्रावर बॉक्साईट खनिजाकरीता मे.स्वाती मिनरल्स् यांचा खनिपट्टा नामंजुर करण्याबाबत.

संदर्भ: १) केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालय , भारत सरकार यांचे पत्र क्र -J-११०१५/८४/२००६-IAII (M) दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ (प्रत संलग्न).
२) जिल्हा खनिकर्म अधिकारी,कोल्हापूर यांचे पत्र क्र. कार्या/६अ/आर आर/१२१०/२०१८ दिनांक २२/०६/२०१८ (प्रत संलग्न).

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यांत येते की , विषयांकीत प्रकरणी जिल्हा खनिकर्म अधिकारी,कोल्हापूर यांनी संदर्भ क्रमांक २ वरील पत्रान्वये संचालनालयास सादर केलेल्या अहवालानुसार मे.स्वाती मिनरल्स् कोल्हापूर या कंपनीस पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थान समितीकडील व शासनाकडील क्र.एमएमएन-२८९४/२२५३०/(६६९३)/आयएनडी-९ दिनांक ०९/०५/१९९७ रोजीच्या आदेशान्वये मौजा उदगिरी ता.शाहूवाडी येथील ७७६.७८ हे.आ.क्षेत्रावर बॉक्साईट खनिजाकरीता २० वर्ष मुदतीकरीता खाणपट्टा मंजुर करण्यात आलेला आहे. तथापी सदर खाणपट्टा हा चांदोली राष्ट्रीय अभयारण्याच्या लगत असून पर्यावरण अनुमती प्राप्त करुन घेतांना खाणपट्टाधारकांनी चुकीची माहिती सादर करुन पर्यावरण विभागामार्फत आवश्यक पर्यावरण अनुमती प्राप्त करुन घेतली. सदरहू बाब पर्यावरण विभागाच्या निर्दशनास आली असता केंद्रीय वन व पर्यावरण विभागाकडील संदर्भ क्रमांक १ वरील आदेशान्वये खाणपट्टयाची पर्यावरण अनुमती रद्द करण्यांत आली आहे. त्यानुसार खाणपट्टाधारकास उत्पादन बंद करण्याच्या सुचना निर्गमीत करण्यांत येवून खाणकाम बंद करण्यांत आलेले आहे. सद्यस्थितीत सदर खाणीमध्ये उत्पादन बंद असून नोव्हेंबर २०१३ पासून खाण बंद स्थितीत आहे.

ज्याअर्थी मे.स्वाती मिनरल्स यांनी पर्यावरण विभागाची दिशाभूल करुन पर्यावरण नाहरकत प्राप्त केली, त्याअर्थी सर्वोच्च न्यायालयाच्या SLP ११४/२०१४ व १९४/२०१४ या याचिकेतील निर्णयानुसार खोटे प्रमाणपत्राच्या आधारे केलेले उत्खनन हे अवैध उत्खनन ठरविता येईल.

सदर खनिपट्टा डॉ.कस्तुरीरंगन समितीच्या अहवालानुसार अधिसुचनेत प्रस्तावित केलेल्या अतिसंवेदनशिल क्षेत्राच्या (Ecologically Sensitive Area) गावाच्या यादीमध्ये समाविष्ट आहे. त्या मुळे अशा क्षेत्रामध्ये कुठल्याही खाणकामावर बंदी घालण्यात आलेली आहे.

सबब, नमुद सर्व बाबी विचारात घेता सदरचा खनिपट्टा खनिज सवलत नियम -२०१६ चे नियम १२(९) अन्वये रद्द करण्याची शिफारस करण्यांत येत आहे. तथापि खनिपट्टा रद्द करणेपूर्वी मे. स्वाती मिनरल्स यांना सुनावणीची संधी देणे नियमानुसार आवश्यक राहील.

सबब, आपले माहिती व यथोचित कार्यवाहीस्तव सविनय सादर.

आपली,

सहपत्रे :- वरील प्रमाणे

(प्र. रा. चाफले)
कनिष्ठ भूवैज्ञानिक,
भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन,नागपूर

(मा. संचालकांनी मान्य केलेले प्रारुप)

निर्गमित केले
दिनांक SEP 2018
जीवक लिपिकाची सही

पत्र क्र. एमएलआर-६७४/२०१८/२२३६
भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन, २७, खनिज भवन,
शिवाजी नगर, नागपूर-४४० ०१०
दिनांक:- 17 SEP 2018

प्रति,

मा. अतिरिक्त मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

विषय:- रायगड जिल्ह्यातील मे. भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी यांना मंजूर खनिपट्टयांबाबत.

संदर्भ:- १) महालेखाकार यांचे अहवालातील परिच्छेद क्र. ७.२.२.६
२) जिल्हा खनिकर्म अधिकारी, रायगड यांचा खुलासा दि. २२/०६/२०१८

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, रायगड जिल्ह्यातील मे. भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी यांना मंजूर खनिपट्टयांबाबत विवरणपत्र या पत्रासह संलग्नित करण्यात आले असून मे. भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे प्रोप्रायटर श्री. सुरेन्द्र कोडचवाड यांनी श्री. चेतन शहा, पियुष वोरा व रजनीकांत पंजवानी यांना पॉवर ऑफ अटर्नी म्हणून नियुक्त केल्याचे दिसून येते.

Mines Act, 1952 व MCDR, 1988 मध्ये खनिपट्टाधारकाने 'agent' नेमण्याची तरतूद आहे. सदर अधिनियमामध्ये 'agent' ची व्याख्या खालीलप्रमाणे नमूद केलेली आहे:-

"agent, when used in relation to a mine, means any person whether appointed as such or not, who acts as the representative of the owner in respect of the management of the mine or any part thereof;"

उपरोक्त खनिपट्टाधारकाने प्रदान केलेल्या पॉवर ऑफ अटर्नीचे स्वरुप पाहता, खनिज सवलत नियम, १९६० चे नियम ३७ चा भंग होतो किंवा कसे, याबाबत साशंकता निर्माण होत आहे.

जिल्हा खनिकर्म अधिकारी, रायगड यांचेकडून प्राप्त अहवालानुसार स्वामित्वधनाची रक्कम खनिपट्टाधारकाच्या नांवे शासनजमा होत असून वाहतूक पासेस देखील खनिपट्टाधारकाच्या नांवे निर्गमित करण्यात येतात.

पॉवर ऑफ अटर्नीतील मजकुरामुळे खनिज सुधारणा नियम, १९६० चे नियम ३७ चा भंग होतो किंवा कसे ? व पॉवर ऑफ अटर्नीधारक व खनिपट्टाधारकाचे परस्पर संबंध तपासणे व निर्णय होणेकरिता त्यांना अंतिम निर्णयापूर्वी सुनावणीची संधी देणे आवश्यक राहील असे मत आहे.

कृपया, आपले माहिती व पुढील यथोचित कार्यवाहीस्तव सादर.

सहपत्र:- वरिलप्रमाणे.

आपली,

(प्र. रा. चापले)
कनिष्ठ भूवैज्ञानिक,
भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन,नागपूर

(मा. संचालकांनी मान्य केलेले प्रारुप)

14 SEP 2016
जावक लिपिकाचा शिक्का

मे. भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी यांना मंजूर खनिपट्टयाबाबत विवरणपत्र

अ.क्र.	खनिपट्टाधारकाचे नांव	मौजा/तह /जि.	क्षेत्र (हेक्टर मध्ये)	खनिज	प्रोप्रायटरचे नांव	पॉवर ऑफ अटर्नी होल्डरचे नांव	खनिपट्टयाची मुदत
१	मे. भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी	दांडगुरी-खुजारे, तह. श्रीवर्धन, जि. रायगड	७१.४२	बॉक्साईट	सुरेन्द्र कोडचवाड	i) चेतन शहा ii) पियुष वोरा iii) रजनीकांत पजवानी	खनिपट्टा कालावधी दि. ५/२/२००२ ते ४/२/२०३२. संचालनालयाचे आदेश दि. ०३/११/२०१७ अन्वये खनिपट्टा Lapse करण्यात आलेला आहे.
२	मे. भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी	हरविट-कुडगांव, तह. श्रीवर्धन, जि. रायगड	५०.२१	बॉक्साईट	सुरेन्द्र कोडचवाड	i) चेतन शहा ii) पियुष वोरा iii) रजनीकांत पजवानी	खनिपट्टा कालावधी दि. ३१/१२/२००२ ते ३०/१२/२०३२.संचालनालयाचे आदेश दि. ०३/११/२०१७ अन्वये खनिपट्टा Lapse करण्यात आलेला आहे.
३	मे. भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी	खुजारे, तह. श्रीवर्धन, जि. रायगड	५.५६	बॉक्साईट	सुरेन्द्र कोडचवाड	i) चेतन शहा ii) पियुष वोरा iii) रजनीकांत पजवानी	खनिपट्टा कालावधी दि. ५/२/२००२ ते ४/२/२०३२. संचालनालयाचे आदेश दि. २२/०२/२०११ अन्वये खनिपट्टा Lapse करण्यात आलेला आहे. खनिपट्टा रद्द करणेचा प्रस्ताव शासनास सादर करणेत आला आहे.

पत्र क्र. एमएलआर-६७७/२०१८/ ८२३७
भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन, २७, खनिज भवन,
शिवाजी नगर, नागपूर-४४० ०१०
दिनांक:- 14 SEP 2018

प्रति,

मा. अतिरिक्त मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

विषय:- रायगड जिल्ह्यातील मे. अल्तगे स्टोन क्रशिंग इंडस्ट्रीज यांना मंजूर खनिपट्टयांबाबत.

संदर्भ:- १) महालेखाकार यांचे अहवालातील परिच्छेद क्र. ७.२.२.६
२) जिल्हा खनिकर्म अधिकारी, रायगड यांचा खुलासा दि. २२/०६/२०१८

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, रायगड जिल्ह्यातील मे. अल्तगे स्टोन क्रशिंग इंडस्ट्रीज यांना मंजूर खनिपट्टयांबाबत विवरणपत्र या पत्रासह संलग्नित करण्यात आले असून मे. अल्तगे स्टोन क्रशिंग इंडस्ट्रीज यांचे प्रोप्रायटर श्रीमती सुनिता सुनिल पत्रावली यांनी श्री. प्रकाश बी. कुलकर्णी यांना पॉवर ऑफ अटर्नी म्हणून नियुक्त केल्याचे दिसून येते.

Mines Act, 1952 व MCDR, 1988 मध्ये खनिपट्टाधारकाने 'agent' नेमण्याची तरतूद आहे. सदर अधिनियमामध्ये 'agent' ची व्याख्या खालीलप्रमाणे नमूद केलेली आहे:-

"agent, when used in relation to a mine, means any person whether appointed as such or not, who acts as the representative of the owner in respect of the management of the mine or any part thereof;"

उपरोक्त खनिपट्टाधारकाने प्रदान केलेल्या पॉवर ऑफ अटर्नीचे स्वरुप पाहता, खनिज सवलत नियम, १९६० चे नियम ३७ चा भंग होतो किंवा कसे, याबाबत साशंकता निर्माण होत आहे.

जिल्हा खनिकर्म अधिकारी, रायगड यांचेकडून प्राप्त अहवालानुसार स्वामित्वधनाची रक्कम खनिपट्टाधारकाच्या नांवे शासनजमा होत असून वाहतूक पासेस देखील खनिपट्टाधारकाच्या नांवे निर्गमित करण्यात येतात.

पॉवर ऑफ अटर्नीतील मजकुरामुळे खनिज सवलत नियम, १९६० चे नियम ३७ चा भंग होतो किंवा कसे ? व पॉवर ऑफ अटर्नीधारक व खनिपट्टाधारकाचे परस्पर संबंध तपासणे व निर्णय होणेकरिता त्यांना अंतिम निर्णयापूर्वी सुनावणीची संधी देणे आवश्यक राहील असे मत आहे.

कृपया, आपले माहिती व पुढील यथोचित कार्यवाहीस्तव सादर.

सहपत्र:- वरिलप्रमाणे.

आपली,

का. यु.

(प्र. रा. चापले)
कनिष्ट भूवैज्ञानिक,
भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन,नागपूर

(मा. संचालकांनी मान्य केलेले प्रारुप)

दिनांकित केले
14 SEP 2018
जावक लिपिकाची सही

मे. अल्तगे स्टोन क्रशिंग यांना मंजूर खनिपट्टयाबाबत विवरणपत्र

अ.क्र.	खनिपट्टाधारकाचे नांव	मौजा/तह./जि.	क्षेत्र (हेक्टर मध्ये)	खनिज	प्रोप्रायटरचे नांव	पॉवर ऑफ अटर्नी होल्डरचे नांव	खनिपट्टयाची मुदत
१	मे. अल्तगे स्टोन क्रशिंग इंडस्ट्रीज	शेखाडी, तह. श्रीवर्धन, जि. रायगड	५१.२४	बॉक्साईट	सुनिता सुनिल पत्रावली	प्रकाश बी. कुलकर्णी	खनिपट्टा कालावधी दि. १/६/२००९ ते ३०/०५/२०३९.
२	मे. अल्तगे स्टोन क्रशिंग इंडस्ट्रीज	दांडा-बागमांडले-सायगांव, तह. श्रीवर्धन	१४८.४६.८	बॉक्साईट	सुनिता सुनिल पत्रावली	प्रकाश बी. कुलकर्णी	खनिपट्टा कालावधी दि. ५/११/२००३ ते ४/११/२०५३
३	मे. अल्तगे स्टोन क्रशिंग इंडस्ट्रीज	कुरवडे-मरल, तह. श्रीवर्धन	१६.८६	बॉक्साईट	सुनिता सुनिल पत्रावली	प्रकाश बी. कुलकर्णी	खनिपट्टा कालावधी दि. ३१/१२/२००२ ते ३०/१२/२०५२.

पत्र क्र. एमएलआर-१८४९/२०१८/ २५०३
भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन, २७, खनिज भवन,
शिवाजी नगर, नागपूर-४४० ०१०
दिनांक:- 19 OCT 2018

प्रति,

मा. अतिरिक्त मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

विषय:- मौजे वेळास व साखरी, तह. मंडणगड, जि. रत्नागिरी येथील ९१.१० हेक्टर क्षेत्रावरील श्रीमती सुशिलाबाई धनवटे यांना बॉक्साईट खनिजाकरिता मंजूर खनिपट्टयाबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, विषयांकित खनिपट्टयाचे खनिपट्टाधारक श्रीमती सुशिलाबाई धनवटे यांनी मे. आशापुरा माईनकेम लि. या कंपनीचे श्री. चेतन शहा व रजनीकांत पजवानी यांना पॉवर ऑफ अटर्नी म्हणून नियुक्त केल्याचे दिसून येते.

Mines Act, 1952 व MCDR, 1988 मध्ये खनिपट्टाधारकाने 'agent' नेमण्याची तरतूद आहे. सदर अधिनियमामध्ये 'agent' ची व्याख्या खालीलप्रमाणे नमूद केलेली आहे:-

"agent, when used in relation to a mine, means any person whether appointed as such or not, who acts as the representative of the owner in respect of the management of the mine or any part thereof;"

उपरोक्त खनिपट्टाधारकाने प्रदान केलेल्या पॉवर ऑफ अटर्नीचे स्वरुप पाहता, खनिज सवलत नियम, १९६० चे नियम ३७ चा भंग होतो किंवा कसे, याबाबत साशंकता निर्माण होत आहे.

पॉवर ऑफ अटर्नीतील मजकुरामुळे खनिज सवलत नियम, १९६० चे नियम ३७ चा भंग होतो किंवा कसे ? व पॉवर ऑफ अटर्नीधारक व खनिपट्टाधारकाचे परस्पर संबंध तपासणे व निर्णय होणेकरिता त्यांना अंतिम निर्णयापूर्वी सुनावणीची संधी देणे आवश्यक राहील असे मत आहे.

कृपया, आपले माहिती व पुढील यथोचित कार्यवाहीस्तव सादर.

19 OCT 2018

(मा. संचालकांनी मान्य केलेले प्रारुप)

आपला,
(रो.रा. मेश्राम)
वरिष्ठ भूवैज्ञानिक,
भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन,नागपूर

Raigad

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,रायगड अलिबाग (खनिकर्म शाखा)

दूरध्वनी क्र. ०२१४१-२२२११८/२२२३२२ फॅक्स क्र. ०२१४१-२२२०२५/२२७४५१ e-mail : raigaddmo००३@gmail.com

जा.क्र.खशा/कात-१/लोकलेखा/२०१८ दिनांक : १६/१०/२०१८

प्रति,

मा.संचालक,
भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन, २७, खनिज भवन,
सिमेंट रोड, शिवाजी नगर,
नागपूर ४४० ०१०

विषय :- भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१४-१५ चा "महसूली क्षेत्रावरील" अहवालातील परिच्छेदांचे अनुषंगाने मा.लोकलेखा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ यांना सादर करावयाच्या अहवालाबाबत..

संदर्भ :- १) आपले पत्र क्र. एसटिसी/पिएसी-९१२/भाग ४/२०१४/२४२३ दिनांक १०/१०/२०१८
२) शासन पत्र क्र. लोलेस ०८१८/प्र.क्र. ५१/उद्योग -९ दिनांक ०४/१०/२०१८

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१४-१५ चा "महसूली क्षेत्रावरील" अहवालात प्रमुख खनिजाच्या बाबतीत रायगड जिल्हयाशी संबंधीत परिच्छेदांच्या अनुषंगाने संदर्भीय पत्रान्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

अ.क्र.	महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्रमांक	सादर करावयाची माहिती/अहवाल
१	परिच्छेद क्रमांक ७.२.२.३. (अ) खनिकर्म नियोजनपेक्षा जादा/खनिकर्म योजनेस मान्यता मिळाल्याशिवाय खनिजाचे उत्पादन	रिट याचिका (सिव्हील) क्र.११४/२०१४ व १९४/२०१४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०२/०८/२०१७ रोजीच्या आदेशात दिलेल्या न्यायनिर्णयानुसार मौजे मेघरे, ता.श्रीवर्धन स्थित बॉक्साईट खाणपट्टयामध्ये खाणकाम आराखडामधील एकूण मंजुर परिमाणापेक्षा अधिक उत्खनन झालेले नसल्याचा इकडील दिनांक २९/०९/२०१८ च्या पत्रान्वये अहवाल सादर करण्यात आलेला आहे. (प्रत सलग्न)
२	परिच्छेद क्रमांक ७.२.२.३. (च) पर्यावरण मंजूरी प्रमाणपत्र, खनिकर्म योजना आणि उत्पादन यांच्यातील खनिज उत्पादनातील फरक	मौजे मुळवेळास-हरवित-कुडगाव, मौजे कुरवडे-मारळ आणि मौजे दांडगुरी खुजारे खाणपट्टयात पर्यावरण मंजुरीपेक्षा जास्त उत्खनन झाल्यामुळे संबंधीत खाणपट्टाधारक यांना इकडील दिनांक २६/०९/२०१८ चे पत्रान्वये खनिज मुल्याची आकारणी नोटीस बजाविण्यात

		आली आहे. (प्रत सलग्न) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार खाणकाम योजना उल्लंघन झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
३	परिच्छेद क्रमांक ७.२.२.५ मंजूरी खाणपट्टा क्षेत्राबाहेर अवैध उत्खनन	१) संबंधीत खाणपट्टाधारक यांना इकडील दिनांक १०/१०/२०१८ चे पत्रान्वये दंडाच्या नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत (प्रत सलग्न) २) मे.मनोहर व्हेनीसमल दर्यानानी यांनी बंदरातून निर्यात केलेल्या खनिजाबाबत माहिती सादर करण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना इकडील दिनांक १०/१०/२०१८ आणि १६/१०/२०१८ चे पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यांच्याकडून माहिती प्राप्त होताच तात्काळ माहिती सादर करण्यात येईल. (प्रत सलग्न) ३) मौजे मेघरे, ता.श्रीवर्धन येथील ग.नं. २६ व ४६ या मिळकतीच्या ७/१२ च्या इतर अधिकारात ठेवलेली बोजाची नोंद कमी/रद्द करण्यासाठी इकडील दिनांक १०/१०/२०१८ चे पत्रान्वये तहसिलदार श्रीवर्धन यांस कळविण्यात आले आहे (प्रत सलग्न)
४	परिच्छेद क्रमांक ७.२.२.६ शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय भाडेपट्टाधिकाराचे हस्तांतरण	इकडील दिनांक ११/१०/२०१८ चे पत्रान्वये संबंधीत खाणपट्टाधारक यांस शासनाची पुर्वपरवानगी प्राप्त होईपर्यंत त्यांच्या खाणपट्टयात यापुढे स्वामित्वधनाचा नियमीत भरणा व त्याअनुषंगाने वाहतूक पासेस निर्गमीत करण्यास या कार्यालयाकडून प्रतिबंध करण्यात आले आहे. तसेच प्रकरणी, आणखी पुढील करावयाच्या कार्यवाहीबाबत मा.संचालनालय, नागपूर यांचेकडे मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे.
५	परिच्छेद क्रमांक ७.२.२.७ (अ) स्वामित्वधनाची कमी वसूलीबाबत	संबंधीत खाणपट्टाधारक यांस दंडाची रक्कम भरण्यास इकडील दिनांक ११/१०/२०१८ चे पत्रान्वये नोटीस देण्यात आलेली आहे.

(अफरोज बेग)
जिल्हा खनिकर्म अधिकारी
रायगड-अलिबाग

भारतीय शासन

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,रायगड अलिबाग (खनिकर्म शाखा)

दूरध्वनी क्र. ०२१४१-२२२११८/२२२३२२ फॅक्स क्र. ०२१४१-२२२०२५/२२७४५१ e mail : raigaddmo००३@gmail.com

जा.क्र.खशा/कात-१/शेखाडी/२०१८ दिनांक : १०/१०/२०१८

नोटीस

प्रति,

अलताफ स्टोन क्रशिंग इंडस्ट्रिज,
वायोमिंग को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि.,
४ था मजला, फ्लॉट क्र.४,१२ अ, लिटिल गिब्स रोड,
मालबार हिल्स, मुंबई ४०००० ६

विषय :- भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१४-१५ चा "महसूली क्षेत्रावरील" अहवालातील परिच्छेदांचे अनुषंगाने मा.लोकलेखा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ यांना सादर करावयाच्या अहवालाबाबत..

संदर्भ :- मा.संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचे पत्र क्र. एसटिसी/पिएसी-९१२/भाग ४/२०१४/२४२३ दिनांक १०/१०/२०१८

मौजे शेखाडी, ता.श्रीवर्धन येथील आपल्या प्रमुख खनिज बॉक्साईट खाणपट्टयाची मा.उपसंचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, कोल्हापूर यांचेकडील तपासणी पथकाकडून दिनांक ०४/०४/२०१४ रोजी तपासणी व खाणपट्टा क्षेत्रात झालेल्या उत्खननाची मोजणी करण्यात आली होती. त्या संदर्भात मा.उपसंचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय कोल्हापूर यांचेकडील दिनांक ३०/०५/२०१४ च्या निरीक्षण अहवालात आपण खनिपट्टयाच्या बाहेरील अथवा इतरत्र क्षेत्रातून २५,१४७.१२६ मे.टन इतके परिमाणाचे अवैधपणे बॉक्साईट खनिजाचे उत्खनन करुन वाहतूक/निर्यात केल्याचा निष्कर्ष काढण्यात आला होता.

मा.महालेखाकार (लेखा परिक्षा)-II महाराष्ट्र, नागपूर यांच्या लेखा परिक्षणामध्ये उपरोक्त २५,१४७.१२६ मे.टन अवैध खनिजाच्या उत्खननाबाबत आक्षेप घेण्यात आला होता. सदर आक्षेपाच्या संदर्भात इकडील दिनांक १०/०६/२०१५ चे पत्रान्वये आपण दिनांक २७/०७/२०१५ चे पत्रान्वये आपल्या वरील बॉक्याईट खाणपट्टा क्षेत्रात छोटया छोटया टेकडया व फाल्ट ओव्हर होते व त्यातुनच आपणास जास्तीचे खनिज प्राप्त झाले असून आपण वरील खनिपट्टयाच्या बाहेरील अथवा इतरत्र क्षेत्रातून अवैध उत्खनन करुन वाहतूक केलेले नाही असा खुलासा सादर केला होता.

सदर परिच्छेदाच्या अनुषंगाने मा.लोकलेखा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ यांचेकडे दिनांक ०३/१०/२०१८ रोजी मा.अपर मुख्य सचिव (उद्योग) यांची साक्ष झाली असून सदर साक्षी दरम्यान आपला वरील खुलासा मा.लोकलेखा समितीकडून अमान्य करण्यात आला आहे. प्रकरणी, आपणाकडून दंडाची रक्कम वसुल करण्याबाबत समितीकडून निर्देश देण्यात आलेले आहे.

सबब, भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१४-१५ चा "महसूली क्षेत्रावरील" अहवालातील परिच्छेद क्र. ७.२.२.५. नुसार मौजे शेखाडी, ता.श्रीवर्धन येथील खनिपट्टयाच्या बाहेरील अथवा इतरत्र क्षेत्रातून २५,१४७.१२६ मे.टन इतके परिमाणाचे अवैधपणे बॉक्साईट खनिजाचे उत्खनन करुन

वाहतूक/निर्यात केल्या प्रकरणी **रु.रु. १,८०,३०,४८५/-** इतकी दंडाची रक्कम या कार्यालयाकडे सात दिवसांत शासन जमा करावी.

वरील दंडाची रक्कम भरण्यास आपण विलंब केल्यास आपणाकडून सक्तीच्या मार्गाने थकीत रक्कमेची वसुली केली जाईल याची नोंद घ्यावी.

(अफराज बेग)
जिल्हा खनिकर्म अधिकारी
रायगड-अलिबाग

प्रत : १) मा.संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन, २७, खनिज भवन, सिमेंट रोड, शिवाजी नगर, नागपूर ४४० ०१० यांचे माहितीस्तव सादर
२) तहसिलदार श्रीवर्धन यांचे माहितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठी सादर

स्वच्छ भारत

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,रायगड अलिबाग (खनिकर्म शाखा)

दूरध्वनी क्र. ०२१४१-२२२११८/२२२३२२ फॅक्स क्र. ०२१४१-२२२०२५/२२६४५१ e mail : raigaddn००३@gmail.com

जा.क्र.खशा/कात-१/मेघरे/२०१८ दिनांक : १०/१०/२०१८

नोटीस

प्रति,
श्री.मनोहर व्हेर्सीमल दर्यानानी,
३/५,विवेकानंद सोसायटी,टी.आर.कटारीया मार्ग,
माहिम,मुंबई १६

विषय :- भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१४-१५ चा "महसूली क्षेत्रावरील" अहवालातील परिच्छेदांचे अनुषंगाने मा.लोकलेखा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ यांना सादर करावयाच्या अहवालाबाबत..

संदर्भ :- मा.संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचे पत्र क्र. एसटिसी/पिएसी-११२/भाग ४/२०१४/२४२३ दिनांक १०/१०/२०१८

मौजे मेघरे, ता.श्रीवर्धन, येथील गट नं ३१६, २९ ते ३४, ४२ ते ४४, ४७ आणि ५८ एकूण क्षेत्र ५५.०६ हेक्टर मध्ये आपणास प्रमुख खनिज बॉक्साईटचा खाणपट्टा मंजुर आहे. सदर खाणपट्टयाची दि.०४/०३/२०११ रोजी श्री. एस.पी.सराफ, तत्कालीन प्रभारी उपसंचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, कोल्हापूर व श्री. अे. बी. कांबळे तत्कालीन जिल्हा खनिकर्म अधिकारी रायगड-अलिबाग यांचेकडून स्थळपाहणी करण्यात आली होती. तपासणी दरम्यान त्यांना आपल्या खाण क्षेत्रालगत आपणास मंजूर नसलेल्या गट नं. २६ व ४६ मध्ये ९३,५५० मे.टन इतके बॉक्साईट चे अनाधिकृत उत्खनन झाल्याचे निदर्शनास आले.

अवैध उत्खनन झालेले क्षेत्र आपल्या वरील मंजुर खाणपट्टा क्षेत्रालगतच असल्याने सदर अवैध उत्खनन आपणच केल्याची शक्यता गृहीत धरुन आपणास खाणपट्टाक्षेत्राबाहेर ९३,५५० मे.टन इतके बॉक्साईटचे अवैध उत्खनन केल्या प्रकरणी या कार्यालयाकडून दि.३१/०८/१३ आणि दि.२०/११/१३ रोजीच्या पत्रान्वये नोटीसा देण्यात आलेल्या होत्या. त्याअनुषंगाने आपले कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी श्री.जयंत जानी यांनी दिनांक १८/११/२०१३ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला असून सदर खुलासामध्ये त्यांनी "गट नं २६ व ४६ मध्ये आमच्या कंपनीने उत्खनन केलेले नाही. सदर जमीनी सन १९७०/८० च्या दशकामध्ये भाडेपट्टयाने दिलेल्या होत्या असे समजते त्या भाडेपट्टेधारकाने त्या जमीनीमध्ये खोदलेल्या खड्यांची माहिती शासनाकडे असावी आमच्याकडे ती नाही. त्या उत्खननाशी आमच्या कंपनीचा संबंध नाही. ते उत्खनन आम्ही केले असल्याचा आरोप आम्हाला मान्य नाही आम्ही तो नाकारत आहोत." असे नमूद करुन आमच्या विरुध्द दंडनिय कारवाई करु नये अशी विनंती केली होती.

मा.महालेखाकार (लेखा परिक्षा)-II महाराष्ट्र, नागपूर यांच्या लेखा परिक्षणामध्ये उपरोक्त ९३,५५० मे.टन अवैध खनिजाच्या उत्खननाबाबत आक्षेप घेण्यात येऊन भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१४-१५ चा "महसूली क्षेत्रावरील" अहवालातील परिच्छेद घेण्यात आलेला आहे..

सदर परिच्छेदाच्या अनुषंगाने मा.लोककलेखा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ यांचेकडे दिनांक ०३/१०/२०१८ रोजी मा.अपर मुख्य सचिव (उर्जा) यांची साक्ष झाली असून सदर साक्षी दरम्यान आपला वरील खुलासा मा.लोककलेखा समितीकडून अमान्य करण्यात आला आहे. प्रकरणी, आपणाकडून दंडाची रक्कम वसुल करण्याबाबत समितीकडून निर्देश देण्यात आलेले आहे.

सबब, भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१४-१५ चा "महसूली क्षेत्रावरील" अहवालातील परिच्छेद क्र. ७.२.२.५. नुसार मौजे मेघरे, ता.श्रीवर्धन येथील मंजुर खनिपट्टा क्षेत्राच्या बाहेर ९३,५५० मे.टन इतके परिमाणाचे अवैधपणे बॉक्साईट खनिजाचे उत्खनन करुन वाहतूक/निर्यात केल्या प्रकरणी रु.रु.३,९९,९१,१५८/- इतकी दंडाची रक्कम या कार्यालयाकडे सात दिवसांत शासन जमा करावी.

वरील दंडाची रक्कम भरण्यास आपण विलंब केल्यास आपणाकडून सक्तीच्या मार्गाने थकीत रक्कमेची वसूली केली जाईल याची नोंद घ्यावी.

(अफरोज बेग)
जिल्हा खनिकर्म अधिकारी
रायगड-अलिबाग

प्रत : १) मा.संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन, २७, खनिज भवन, सिमेंट रोड, शिवाजी नगर, नागपूर ४४० ०१० यांचे माहितीस्तव सादर
२) तहसिलदार श्रीवर्धन यांचे माहितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठी सादर

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,रायगड अलिबाग (खनिकर्म शाखा)

दूरध्वनी क्र. ०२१४१-२२२११८/२२३२२० फॅक्स क्र. ०२१४१-२२२०२५/२२६४५१ e mail : raigaddmo003@gmail.com

जा.क्र.खशा/प्र.ख/कात-१/प्रमुख खनिज निर्यात/२०१८ दिनांक : १०/१०/२०१८

प्रति,

१) प्रादेशिक बंदर अधिकारी,
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,
राजपुरी बंदरे समूह,
अलिबाग-रायगड

२) बंदर अधिकारी,दिघी
ता.श्रीवर्धन,जि.रायगड

विषय :- मौजे मेघरे, ता.श्रीवर्धन येथील खाणपट्टयातून दिघी बंदर येथून देशात वा परदेशात निर्यात करण्यात आलेल्या बॉक्साईट या प्रमुख खनिजाची माहिती मिळणेबाबत..

महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभाग विभाग, यांचेकडील आदेश क्र.एमएमएन-१३२०/८१९३/उदयोग-९ दि.२९/१२/२००४ अन्वये मे.मनोहर व्हेन्सीमल दर्यानानी,रा.माहिम यांना मौजे मेघरे, ता.श्रीवर्धन, येथील गट नं ३१६, २९ ते ३४, ४२ ते ४४, ४७ आणि ५८ एकूण क्षेत्र ५५.०६ हेक्टर मध्ये प्रमुख खनिज बॉक्साईटचा खाणपट्टा मंजुर आहे.

सदर खनिपट्टयातून उत्पादीत होणा-या बॉक्साईट या प्रमुख खनिजाची निर्यात श्रीवर्धन तालुक्यातील दिघी बंदरातून समुद्र मार्गे देशात वा परदेशात होत आहे. तरी सन २००८-०९ ते २०१६-१७ या कालावधीमध्ये आर्थीक वर्षनिहाय दिघी बंदर श्रीवर्धन येथून समुद्रमार्गे निर्यात झाले ल्या बॉक्साईट खनिजाची माहिती खालील नमुन्यामध्ये तात्काळ या कार्यालयास उपलब्ध करुन देण्यास विनंती आहे.

अ.क्र.	कंपनीचे नाव	दिघी श्रीवर्धन बदरातून बॉक्साईट खनिज देशात/परदेशात जेथे निर्यात केले त्या ठिकाणाचे नाव	देशात वा परदेशात पाठविण्यात आलेले बॉक्साईट खनिज (मे.टन परिमाण)		
			दिनांक व वित्तीय वर्ष	देशात (मे.टन)	परदेशात (मे.टन)
१	२	३	४	५	६
१	मे.मनोहर व्हेन्सीमल दर्यानानी,रा.माहिम				

(अफरोज बग)
जिल्हा खनिकर्म अधिकारी
रायगड-अलिबाग

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,रायगड अलिबाग (खनिकर्म शाखा)
दूरध्वनी क्र. ०२१४१-२२२११८/२२२३२३ फॅक्स क्र. ०२१४१-२२२०२५/२२६४५१ e mail : raigaddmo003@gmail.com

जा.क्र.खशा/कात-१/मेघरे/२०१८ दिनांक : १०/१०/२०१८

प्रति,
तहसिलदार श्रीवर्धन

विषय :- भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१४-१५ चा "महसूली क्षेत्रावरील" अहवालातील परिच्छेदांचे अनुषंगाने मा.लोकलेखा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ यांना सादर करावयाच्या अहवालाबाबत..

संदर्भ :- १) मा.संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचे पत्र क्र. एसटिसी/पिएसी-९१२/भाग ४/२०१४/२४२३ दिनांक १०/१०/२०१८
२) शासन पत्र क्र. लोलेस ०८१८/प्र.क्र. ५१/उद्योग -९ दिनांक ०४/१०/२०१८

मौजे मेघरे, ता.श्रीवर्धन येथील मे.मनोहर व्हेनर्सीमल दर्यानानी यांचे बॉक्साईट खाणपट्टा क्षेत्रालगत ग.नं. २६ व ४६ मध्ये ९३,५५० मे.टन इतके झालेल्या अवैध बॉक्साईट खनिज उत्खननापोटी रु.रु. ३,९९,९१,१५८/- इतकी दंडाची रक्कम वसुलीच्या संदर्भात मा.महालेखाकार (लेखा परिक्षा)-II महाराष्ट्र, नागपूर यांचेकडील आक्षेप व भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१४-१५ चा "महसूली क्षेत्रावरील" अहवालातील परिच्छेदाची पुर्ततेकामी आपणाकडून संबंधीत जमीन मालक श्री. नितीन नगीनदास गोराडीया व श्रीमती. वंदना नितीन गोराडीया यांस दिनांक १८/०६/२०१८ रोजी थकबाकीची मागणीची नोटीस बजावण्यात येऊन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार उपरोक्त मौजे मेघरे, ता.श्रीवर्धन गट नं २६ व ४६ या मिळकतीच्या ७/१२ च्या इतर अधिकारात ३,९९,९१,१५८/- इतक्या रक्कमेच्या बोजाची नोंद फेरफार नोंद क्रमांक ३६५ अन्वये ठेवण्यात आली आहे.

सदर परिच्छेदाच्या अनुषंगाने मा.लोकलेखा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ यांचेकडे दिनांक ०३/१०/२०१८ रोजी मा.अपर मुख्य सचिव (उद्योग) यांची साक्ष झाली असून सदर साक्षी दरम्यान मा.लोकलेखा समितीने वरील आक्षेपीत रक्कम संबंधीत जमीन मालक यांचेकडून वसुल न करता मे.मनोहर व्हेनसीमल दर्यानानी यांचेकडून वसुल करण्याचे निर्देश दिले आहे. प्रकरणी, शासनाने वरील संदर्भीय पत्र क्र. ०२ अन्वये संबंधीत जमीनमालकाच्या ७/१२ उता-यावरील बोजा कमी करण्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे. (प्रत सलग्न)

सबब, मौजे मेघरे, ता.श्रीवर्धन गट नं २६ व ४६ या मिळकतीच्या ७/१२ च्या इतर अधिकारात रु.रु.३,९९,९१,१५८/- इतक्या रक्कमेच्या बोजा कमी/रद्द करुन तात्काळ अनुपालन अहवाल सादर करावा

(अफरोज बेग)
जिल्हा खनिकर्म अधिकारी
रायगड-अलिबाग

प्रत : १) मा.संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन, २७, खनिज भवन, सिमेंट रोड, शिवाजी नगर, नागपूर ४४० ०१० यांचे माहितीस्तव सादर

E:\Shri_kant\Audit Para\Loklekha Bauxite.doc38

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,रायगड अलिबाग (खनिकर्म शाखा)

दूरध्वनी क्र. ०२१४१-२२२११८/२२२३२२ फॅक्स क्र. ०२१४१-२२२०२५/२२६४५२ e mail : raigaddmooo3@gmail.com

जा.क्र.खशा/कात-१/मेघरे/मायनिंग प्लॉन/२०१८ दिनांक : २९/०९/२०१८

प्रति,

मा.संचालक,
भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन, २७, खनिज भवन,
सिमेंट रोड, शिवाजी नगर,
नागपूर ४४० ०१०

विषय :- लोकलेखा समितीचा सन २०१४-१५ मधील महसूली क्षेत्रावरील लेखापरीक्षा अहवालातील परिच्छेदांबाबत...

संदर्भ :- १) मा.संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचेकडील पत्र क्र. सांख्यिकी/पर्या/७७४/२/२०१३/२१७३ दिनांक ३१/०८/२०१८
२) आपल्या कार्यालयाकडील दूरध्वनी संदेश दिनांक २९/०९/२०१८

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१४-१५ चा "महसूली क्षेत्रावरील" अहवालात मौजे मेघरे, ता.श्रीवर्धन स्थित बॉक्साईट खाणपट्ट्याच्या बाबततीत खाणकाम आराखड्याच्या मधील विहीत मर्यादेपेक्षा अधिक उत्खनन केल्याबाबत खालीलप्रमाणे परिच्छेद घेण्यात आलेला आहे.

७.२.२.३ खनिकर्म नियोजन/खनिकर्म योजनेस मान्यता :-

(अ) खनिकर्म नियोजनापेक्षा जादा/खनिकर्म योजनेस मान्यता मिळाल्याशिवाय खनिजांचे उत्पादन :-

अ-१) मौजे मेघरे, ता.स्थित बॉक्साईट खाणपट्ट्यामध्ये सन २००९-१० ते २०१३-१४ या कालावधीत खालील विवरणाप्रमाणे मंजुर खनिकर्म नियोजनापेक्षा (Approved Mining Plane) जास्त उत्खनन झाले आहे.

खाणपट्ट्याचे नाव	वर्ष	खनिकर्म नियोजनानुसार मंजुर परिमाण (मे.टन)	प्रत्यक्ष उत्पादन (मे.टन)	जादा उत्पादन (मे.टन)
मेघरे बॉक्साईट खाणपट्टा	२००९-१०	३६,०००	५९,२००	२३,२००
	२०१०-११	४८,०००	५६,०००	८,०००
	२०१३-१४	७६,३२९	७९,२००	२,८७१

परील तीन्ही विवरणांचे अवलोकन केले असता सदर खाणकाम आराखडाच्या कालावधीमध्ये मंजुर असलेल्या एकूण परिमाणापेक्षा अधिक उत्खनन झालेले नाही.

प्रकरणी, रिट याचिका (सिव्हील) क्र.११४/२०१४ व १९४/२०१४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०२/०८/२०१७ रोजीच्या आदेशात दिलेल्या न्यायनिर्णयानुसार खाणकाम आराखडामधील एकूण मंजुर परिमाणापेक्षा अधिक उत्खनन झालेले नाही. आपले माहितीस्तव व पुढील आदेशार्थ सादर.

सोबत : मंजुर खाणकाम आराखडा दिनांकाची व मंजुर परिमाणाची छायाप्रत सादर

(अफरोज बेग)
जिल्हा खनिकर्म अधिकारी
रायगड-अलिबाग



महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग (खनिकर्म शाखा)

दूरध्वनी क्र. ०२१४१-२२२११८/२२२३२३ फॅक्स क्र. ०२१४१-२२२०२५/२२६४५१ e mail : raigaddmo003@gmail.com

जा.क्र.खशा/कात-१/जास्त उत्खनन/२०१८ दिनांक : २६/०९/२०१८

नोटीस

प्रति,

१) अलताने स्टोन क्रशिंग इंडस्ट्रिज, वायोमिंग को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., ४ था मजला, प्लॉट क्र.४,१२ अ, लिटिल गिब्स रोड, मालबार हिल्स, मुंबई ४०००० ६

२) भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी, ३४/३५,कॉर्पोरेशन कॉम्पलेक्स,गोवा वेस, हिंदवडी,वेळगांव ५९० ०११

विषय :- पर्यावरण मंजूरीपेक्षा जास्त उत्खननाबाबत..

संदर्भ :- मा.संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचेकडील पत्र क्र. सांख्यिकी/पर्या/७५४/२/२०१३/२१७३ दिनांक ३१/०८/२०१८

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१४-१५ चा "महसूली क्षेत्रावरील" अहवालात आपल्या मौजे मुळवेळास-हरवित-कुडगाव, कुरवडे-मारळ आणि दांडागुरी खुजारे ता.श्रीवर्धन येथील प्रमुख खनिज खाणपट्टा प्रकरणांत पर्यावरण नाहरकतीच्या विहीत मर्यादेपेक्षा अधिक उत्खनन झाल्याबाबत परिच्छेद घेण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र राज्य विधीमंडळाच्या लोकलेखा समितीच्या दिनांक २९/०८/२०१८ रोजीच्या बैठकीत मा.अध्यक्ष व सदस्यांनी बॉक्साईट व लाईमस्टोन सह इतर खनिजांबाबत झालेल्या खाणकाम योजना व पर्यावरण नाहरकतीच्या मर्यादेच्या उल्लंघनाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

रिट याचिका (सिव्हील) क्र.११४/२०१४ व १९४/२०१४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयात दिनांक ०२/०८/२०१७ रोजीच्या आदेशात खाणकाम योजनेपेक्षा २० % अधिक खाणकाम तसेच पर्यावरण नाहरकत आदेशात नमूद उत्खननाच्या मर्यादेपेक्षा अधिक उत्खननास अवैध उत्खनन ठरवून त्याबाबत खनिपट्टाधारकांकडून नुकसान भरपाई म्हणून खनिजाचे मूल्य व स्वामित्वधन वसुल करावे असे निर्देश दिले आहेत.

प्रकरणी, मा.संचालनालय, नागपूर यांनी जिल्हयातील खनिजपट्टाधारकांकडून खाणकाम योजना व पर्यावरण नाहरकत दाखल्यामध्ये नमूद मर्यादेचे उल्लंघन झाले असल्यास मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाप्रमाणे त्वरीत कार्यवही करण्याबाबत या कार्यालयास निर्देशीत केले आहे.

सबब, आपले वरील खाणपट्टयांचे उत्पादन/विक्रीचे मासिक/वार्षीक विवरण, इकडील अभिलेख पडताळून सोबतच्या विवरणाप्रमाणे पर्यावरण नाहरकतीच्या विहीत मर्यादेपेक्षा अधिक उत्खनन केल्यापोटी नुकसान भरपाई म्हणून आपणाकडून मौजे मुळवेळास-हरवित-कुडगाव, कुरवडे-मारळ आणि दांडागुरी खुजारे या खाणपट्टा प्रकरणात अनुक्रमे **र.रु. १,२५,३६,६७१/- व र.रु. ७,७८,४१,५००/- आणि र.रु. ३,५०,३०,१००/-** इतकी खनिजाचे मुल्याची आकारणी करण्यात येत आहे. तरी सदर रक्कमेचा त्वरीत भरणा करावा.

जावक
०४/१०/१८

(अफराज बेग)
जिल्हा खनिकर्म अधिकारी
रायगड-अलिबाग

प्रत : मा.संचालक,भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन, २७, खनिज भवन, सिमेंट रोड, शिवाजी नगर, नागपूर ४४० ०१० यांचे माहितीस्तव सादर

E:\Shri_kant\Audit Para\Loklekha Bauxite.doc29

प्रमुख खनिज बॉक्साईट खाणपट्टामध्ये पर्यावरण नाहरकत दाखला मधील विहीत मर्यादेपेक्षा झालेले उत्खननाचे विवरण

अ. क्र.	खाणपट्टाधारकाचे नाव	गावांचे नांव	मंजूर क्षेत्र	निष्पादनाची तारीख	आर्थिक वर्ष	पर्यावरण मंजूरी दिनांक	पर्यावरण नाहरकत दाखल्यानुसार उत्खननाची मर्यादा (मे.टन)	प्रत्यक्ष निर्गत परिमाण	पर्यावरण नाहरकत दाखल्यामध्ये नमूद मर्यादेपेक्षा जास्तीचे झालेले उत्खनन (मे.टन)	खनिजाचे दर	खनिजाचे मुल्य
१	मे.भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी, बेळगाव	मौजे मुळ्येवाडा, हरचित,कुडगाव ता.श्रीवर्धन	५०-२१-० हे	३१/१२/२००२	२००९-१०	दिनांक १८/०४/२००७	२०४७२.००	२०६१८.००	१४६.००	३५६.००	२२७७६
					२०१०-११		२०४७२.००	२४०००.००	३५२८.००	२१९.००	७७२६३२
					२०११-१२		२०४७२.००	६४३२५.००	४३८५३.००	२६७.००	११७०८७५१
					२०१२-१३		२०४७२.००	२०६००.००	१२८.००	२५४.००	३२५१२
					एकूण		८१८८८.००	१२९५४३.००	४७६५५.००		१२५३६६७१
२	मे.अलतामश स्टोन क्रशींग इंडस्ट्रिज, मुंबई	मौजे पुन्हाडे,मारळ ता. श्रीवर्धन	१६-८६-० हे.	१२/३१/२००२	२००९-१०	दिनांक ०६/१०/२००६	१२०००.००	३७५००.००	२५५००.००	१५६.००	३९७८००००
					२०१०-११		१२०००.००	१३३०००.००	९९६००.००	२१९.००	२१६८१००००
					२०११-१२		१२०००.००	१३३०००.००	१२१०००.००	२६७.००	३२३०७००००
					२०१२-१३		१२०००.००	८९८००.००	७७८००.००	२५४.००	१९७६१२००
					२०१३-१४		१२०००.००	१२५५०.००	४५०.००	२५४.००	११४३००
					एकूण		६००००.००	३८३७५०.००	३२३७५०.००		७७८४१५००
३	मे.भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी, बेळगाव	मौजे दांडगुरी, शुजारे ता.श्रीवर्धन	७१-५२-० हे	५/२/२००२	२००९ - १०	दिनांक १८/०४/२००७	१८०००.००	१८५००.००	५००.००	१५६.००	७८०००
					२०१०-११		१८०००.००	४८०००.००	३००००.००	२१९.००	६५७०००००
					२०११-१२		१८०००.००	१२४३००.००	१०६३००.००	२६७.००	२८३८३१००
					एकूण		५४०००.००	१९०८००.००	१३६८००.००	२५४.००	३५०३०१००
सर्व एकूण							१९५८८८.००	७०४०९३.००	५०८३०५.००		१२५४०८२७१

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,रायगड अलिबाग (खनिकर्म शाखा)

दूरध्वनी क्र. ०२१४१-२२२११८/२२२३२२ फॅक्स क्र. ०२१४१-२२२०२५/२२७४५१ e mail : raigaddmo003@gmail.com

जा.क्र.खशा/प्र.ख/खाणकाम योजना/२०१८ दिनांक : १२/१०/२०१८

नोटीस

प्रति,

मे.व्याघ्रेश्वर मिनरल इंडस्ट्रीयल प्रोडयूसर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि.पेण,
ता.पेण,जि.रायगड

विषय :- मौजे महालमि-या डोंगर आणि पाचगणी, ता.पेण स्थित बॉक्साईट खाणपट्टा मध्ये खाणकाम योजनेस मंजुरी प्राप्त न करता उत्खनन केल्याबाबत..

संदर्भ :- १) मा.संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचेकडील पत्र क्र.एमटिर्सी/२६२/२०१८/२४४४ दिनांक ११/१०/२०१८
२) भारतीय खाण ब्युरो, क्षेत्रीय कार्यालय, नागपूर यांचे पत्र दिनांक २७/०९/२०१८

कृपया, उपरोक्त विषयाकामी संदर्भीय पत्रांचे अवलोकन करावे. भारतीय खाण ब्युरो यांनी दिनांक २१/०६/२०१८ रोजी केलेल्या निरीक्षणामध्ये आपल्या विषयांकीत खाणपट्टयामध्ये सन २०१४-१५ ते २०१६-१७ या कालावधीत मंजूर खाणकाम योजनेच्या अभावी उत्पादन झाल्याचे निर्दशनास आल्याने आपल्यावर प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत भारतीय खाण ब्युरो यांनी वरील संदर्भीय पत्र क्र. ०२ अन्वये कळविले आहे. त्यानुसार मा.संचालनालय, नागपूर यांनी वरील संदर्भीय पत्र क्र. ०१ अन्वये आपणावर दंडाची कार्यवाही करण्याबाबत निर्देशीत केले आहे.

प्रकरणी, रिट याचिका (सिव्हील) क्र.११४/२०१४ व १९४/२०१४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०२/०८/२०१७ रोजीच्या आदेशात दिलेल्या न्यायनिर्णयानुसार आपण खाणकाम आराखडयास मंजुरी न घेता खाणकाम केल्यामुळे सदर उत्खनन अवैध ठरवून आपणावर खालील विवरणाप्रमाणे दंडाची आकारणी करण्यात येत आहे.

अ.क्र.	आर्थीक वर्ष	उत्पादन (मे.टन)	दंडाची रक्कम
१	२०१४-१५	१,२३,८७२	३,४६,८४,१६०/-
२	२०१५-१६	५०,८३८	१,५२,००,५६२/-
३	२०१६-१७	९४,७९६	४,०९,५१,८७२/-
एकूण		२,६९,५०६	९,०८,३६,५९४/-

तरी वरील विवरणाप्रमाणे दंडाची **एकूण रु.रु. ९,०८,३६,५९४/-** इतकी या कार्यालयाकडे सात दिवसांत शासन जमा करावी. अन्यथा वरील दंडाची रक्कम भरण्यास आपण विलंब केल्यास आपणाकडून सक्तीच्या जमीन महसूल मार्गाने थकीत रक्कमेची वसुली केली जाईल याची नोंद घ्यावी.

(अफरोज बेग)
जिल्हा खनिकर्म अधिकारी
रायगड-अलिबाग

प्रत : १) मा.संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन, २७, खनिज भवन, सिमेंट रोड, शिवाजी नगर, नागपूर ४४० ०१० यांचे माहितीस्तव सादर
२) तहसिलदार श्रीवर्धन यांचे माहितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठी रवाना

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,रायगड अलिबाग (खनिकर्म शाखा)

दूरध्वनी क्र. ०२१४१-२२२११८/२२२३२२ फॅक्स क्र. ०२१४१-२२२०२५/२२६४५१ e mail : raigaddmo003@gmail.com

जा.क्र.खशा/प्र.ख/माहिती/२०१८ दिनांक : १९/१०/२०१८

महत्तवाचे/तात्काळ

प्रति,
मे.व्याघ्रेश्वर मिनरल इंडस्ट्रीयल प्रोडयूसर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि.पेण,
ता.पेण,जि.रायगड

विषय :- मौजे महालमि-या डोंगर आणि पाचगणी, ता.पेण स्थित बॉक्साईट खाणपट्टयाबाबतची माहिती..

शासन उद्योग ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडील आदेश क्र.एमएमएन-३२२०/सी.आर.७९१६/आएनडी-९ दिनांक १६/१०/२००६ अन्वये आपणास मौजे महालमि-या डोंगर व पाचगणी येथील ७९.९८.१ हे.आर क्षेत्रात बॉक्साईट खनिजाचा खाणपट्टा नुतनीकरण करण्यात आला आहे.

सदर खाणपट्टयात सन २०१३-१४ ते आजतागयत झालेले उत्पादन/उत्खनन, खाणकाम योजनेनुसार मंजुर परिमाण, पर्यावरण नाहरकत आदेश इ.बाबत इकडील अभिलेख्यात परिपूर्ण माहिती उपलब्ध नाही. तरी आपण आपल्या खाणपट्टयात सन २०१३-१४ ते आजतागयत झालेले उत्पादन/उत्खनन यांची माहिती (मासिक/वार्षीक विरणासह), मंजुर खाणकाम योजना व पर्यावरण नाहरकत आदेश इ.माहिती घेऊन या कार्यालयात उपस्थित रहावे.

(अफरोज बेग)
जिल्हा खनिकर्म अधिकारी
रायगड-अलिबाग

प्रत : मा.संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन, २७, खनिज भवन, सिमेंट रोड, शिवाजी नगर, नागपूर ४४० ०१० यांचे माहितीस्तव सादर



जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,रायगड अलिबाग (खनिकर्म शाखा)

दूरध्वनी क्र. ०२१४१-२२२११८/२२२३२२ फॅक्स क्र. ०२१४१-२२२०२५/२२७४११ e mail : raigaddmo003@gmail.com

जा.क्र.खशा/प्र.ख/कात-१/प्रमुख खनिज निर्यात/२०१८ दिनांक : १९/१०/२०१८

महत्तवाचे

प्रति,
मा.श्री.शैलेश शाह,
रिसल्युशन प्रोफेशनल,
दिघी पोर्ट लि., ५ वा मजला, लोढा एक्सेलस,
अपोलो मिल्स कंपाऊंड, एन.एम.जोशी मार्ग, महालक्ष्मी,
मुंबई- ४०००११
ईमेल rpdighi@bsraffiliates.com

विषय :- मौजे मेघरे, ता.श्रीवर्धन येथील खाणपट्टयातून दिघी बंदर येथून देशात वा परदेशात निर्यात करण्यात आलेल्या बॉक्साईट या प्रमुख खनिजाची माहिती मिळणेबाबत..

महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभाग विभाग, यांचेकडील आदेश क्र.एमएमएन-१३२०/८११३/उदयोग-९ दि.२९/१२/२००४ अन्वये मे.मनोहर व्हेन्सीमल दर्यानानी,रा.माहिम यांना मौजे मेघरे, ता.श्रीवर्धन, येथील गट नं ३१६, २९ ते ३४, ४२ ते ४४, ४७ आणि ५८ एकूण क्षेत्र ५५.०६ हेक्टर मध्ये प्रमुख खनिज बॉक्साईटचा खाणपट्टा मंजुर आहे.

सदर खनिपट्टयातून उत्पादीत होणा-या बॉक्साईट या प्रमुख खनिजाची निर्यात श्रीवर्धन तालुक्यातील दिघी बंदरातून समुद्र मार्गे देशात वा परदेशात होत असून सन २००८-०९ ते २०१६-१७ या कालावधीमध्ये आर्थीक वर्षनिहाय दिघी बंदर श्रीवर्धन येथून समुद्रमार्गे निर्यात झालेल्या बॉक्साईट खनिजाची माहिती खालील नमुन्यामध्ये तात्काळ या कार्यालयास उपलब्ध करुन देण्यास विनंती आहे.

अ.क्र.	कंपनीचे नाव	दिघी श्रीवर्धन बंदरातून बॉक्साईट खनिज देशात/परदेशात जेथे निर्यात केले त्या ठिकाणाचे नाव	देशात वा परदेशात पाठविण्यात आलेले बॉक्साईट खनिज (मे.टन परिमाण)		
			दिनांक व वित्तीय वर्ष	देशात (मे.टन)	परदेशात (मे.टन)
१	२	३	४	५	६
१	मे.मनोहर व्हेन्सीमल दर्यानानी,रा.माहिम				

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१४-१५ चा "महसूली क्षेत्रावरील" अहवालातील परिच्छेदांचे अनुषंगाने मा.लोकलेखा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ यांचेकडे दिनाक ०३/१०/२०१८ रोजी मा.अपर मुख्य सचिव (उद्योग) यांची साक्ष झाली असून सदर साक्षदरम्यान मा.अपर मुख्य सचिव (उद्योग) यांनी दिलेल्या

आश्वासनाच्या अनुषंगाने सदर माहिती मा.लोकलेखा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ यांना तातडीने सादर करावयाची आहे. तरी, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन विषयांकीत माहिती तातडीने या कार्यालयास सादर करावी. ही विनंती

(अफरोज बेग)
जिल्हा खनिकर्म अधिकारी
रायगड-अलिबाग

प्राप्तक
दिनांक - 19/10/18
वेळ -
तपासणीकर

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,रायगड अलिबाग (खनिकर्म शाखा)

दूरध्वनी क्र. ०२१४१-२२२११८/२२२३२२ फॅक्स क्र. ०२१४१-२२२०२५/२२६४५१ e mail : raigaddmo००३@gmail.com

जा.क्र.खशा/कात-१/खनिकर्म योजना /२०१८ दिनांक : १७/१०/२०१८

नोटीस

प्रति,

भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी,

३४/३५,कॉर्पोरेशन कॉम्प्लेक्स,

गोवा वेस, हिंदवडी,बेळगांव ५९० ०११

विषय :- **खनिकर्म योजना मंजुर नसतांना उत्खनन केल्याबाबत..**

संदर्भ :- १) मा.संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचे पत्र क्र. एसटिर्सी/पिएसी-९१२/भाग ४/२०१४/२४२३ दिनांक १०/१०/२०१८

२) शासन पत्र क्र. लोलेस ०८१८/प्र.क्र. ५१/उद्योग -९ दिनांक ०४/१०/२०१८

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१४-१५ चा "महसूली क्षेत्रावरील" अहवालात मौजे मुळवेळास-हरवित-कुडगाव अणि मौजे दांडागुरी-खुजारे या दोन खाणपट्ट्यात खनिकर्म योजना मंजूरी प्राप्त न करता उत्खनन केल्याचा परिच्छेद घेण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र राज्य विधीमंडळाच्या लोकलेखा समितीच्या दिनांक २९/०८/२०१८ रोजीच्या बैठकीत मा.अध्यक्ष व सदस्यांनी बॉक्साईट व लाईमस्टोन सह इतर खनिजांबाबत झालेल्या खाणकाम योजना व पर्यावरण नाहरकतीच्या मर्यादेच्या उल्लंघनाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

रिट याचिका (सिव्हील) क्र.११४/२०१४ व १९४/२०१४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०२/०८/२०१७ रोजीच्या आदेशात खाणकाम योजनेपेक्षा २० % अधिक खाणकाम तसेच पर्यावरण नाहरकत आदेशात नमूद उत्खननाच्या मर्यादेपेक्षा अधिक उत्खनन स अवैध उत्खनन ठरवून त्याबाबत खनिपट्टाधारकांकडून नुकसान भरपाई म्हणून खनिजाचे मूल्य व स्वामित्वधन वसुल करावे असे निर्देश दिले आहेत.

प्रकरणी, मा.संचालनालय, नागपूर यांनी संदर्भीय पत्रान्वये जिल्हयातील खनिजपट्टाधारकांकडून खाणकाम योजना व पर्यावरण नाहरकत दाखल्यामध्ये नमूद मर्यादेचे उल्लंघन झाले असल्यास मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायानिर्णयाप्रमाणे त्वरीत कार्यवही करण्याबाबत या कार्यालयास निर्देशीत केले आहे.

सबब, वरील परिच्छेदाच्या अनुषंगाने खालीप्रमाणे खनिकर्म योजना मंजूरी प्राप्त न करता उत्खनन केल्या प्रकरणी आपणाकडून खालील विवरणाप्रमाणे दंडाची आकारणी करण्यात येत आहे.

अ.क्र.	खाणपट्ट्याचे नाव	वर्ष	उत्खनन केलेले परिमाण	दंडाची रक्कम
१	मुळवेळास-हरवित-कुडगाव	२०१३-१४	४१,५००	१,०५,४१,०००/-
२	दांडगुरी-खुजारे	२०१२-१४	९९,०००	२,५१,४६,०००/-
	एकूण		१,४०,५००	३,५६,८७,०००/-

(अफरोज बेग)
जिल्हा खनिकर्म अधिकारी
रायगड-अलिबाग

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,रायगड अलिबाग (खनिकर्म शाखा)

दूरध्वनी क्र. ०२१४१-२२२११८/२२२३२२ फॅक्स क्र. ०२१४१-२२२०२५/२२७४११ e mail : raigaddmo003@gmail.com

जा.क्र.खशा/कात-१/पर्यावरण मंजुरी/२०१८ दिनांक : १९/१०/२०१८

प्रति,

मा.संचालक,
भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,
महाराष्ट्र शासन, २७, खनिज भवन,
सिमेंट रोड, शिवाजी नगर,
नागपूर ४४० ०१०

विषय :- खाणकाम योजना व पर्यावरण मंजूरीपेक्षा जास्त उत्खननाबाबत..

संदर्भ :- आपले पत्र क्र.सांख्यिकी/पर्या/७७८/२/२०१३/२४३३ दिनांक ११/१०/२०१८

खाणकाम योजना व पर्यावरण मंजूरपेक्षा जास्त उत्खननाबाबत मा.संचालक महोदयांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०६/१०/२०१८ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने संदर्भीय पत्रान्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे खालीलप्रमाणे मुद्देनिहाय अहवाल सादर करण्यात येत आहे.

१) रिट याचिका (सिव्हील) क्र.११४/२०१४ व १९४/२०१४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०२/०८/२०१७ रोजीच्या आदेशात दिलेल्या न्यायनिर्णयानुसार रायगड जिल्हयातील श्रीवर्धन तालूक्यातील सर्व बॉक्साईट खाणपट्टा प्रकरणांत खाणकाम आराखडामधील एकूण मंजुर परिमाणापेक्षा अधिक उत्खनन झालेले नाही. परंतू पर्यावरण नाहरकत आदेशात नमुद उत्खनन मर्यादेपेक्षा अधिक उत्खनन झाले असून प्रकरणी संबंधीत खाणपट्टाधारक यांना नुकसान भरपाई म्हणून खनिजाचे मुल्य शासन जमा करण्याबाबत इकडील दिनांक १९/१०/२०१८ चे पत्रान्वये नोटीस देण्यात आलेली आहे. (प्रत सलग्न) मौजे महालमि-या डोंगर, ता.पेण स्थित बॉक्साईट खाणपट्टासंदर्भात परिपुर्ण माहिती या कार्यालयाकडील उपलब्ध नसल्याने सदर माहिती संबंधीत खाणपट्टाधारक यांचेकडून प्राप्त करुन घेऊन सदर खाणपट्टा प्रकरणात खाणकाम योजना व पर्यावरण मंजूरपेक्षा जास्त उत्खनन झाले अगर कसे ? याबाबत आपणास अलहिदा अहवाल सादर करण्यात येईल.

२) रायगड जिल्हयात सर्व प्रमुख खनिज खाणींना केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाकडील पर्यावरण अनुमती प्राप्त आहे, तथापी, सदर खाणपट्टयांत पर्यावरण मंजूरीपेक्षा जास्त उत्खनन झालेले असून त्याबाबत या कार्यालयाकडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पर्यावरण विभागास इकडील दिनांक ०५-०९-२०१८ व १४-०९-२०१८ चे पत्रान्वये अवगत करण्यात आलेले आहे. (प्रत सलग्न)

३) रायगड जिल्हयात एकूण ०६ खाणपट्टा प्रकरणांत खनिपट्टाधारकाने प्रदान केलेल्या मुख्यत्यारनामा बाबत खनिज सवलत नियम, १९६० च्या नियम ३७ चा भंग झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्याअनुषंगाने इकडील दिनांक ११/१०/२०१८ चे पत्रान्वये संबंधीत खाणपट्टाधारक यांस शासनाची पुर्वपरवानगी प्राप्त होईपर्यंत त्यांच्या खाणपट्टयात नविन स्वामित्वधनाचा निश्चीत भरणा व त्याअनुषंगाने वाहतूक पासेस निर्गमीत करण्यास या

कार्यालयाकडून प्रतिबंध करण्यात आल्याचे कळविण्यात आले आहे. तसेच प्रकरणी, आणखी पुढील करावयाच्या कार्यवाहीबाबत मा.संचालनालय, नागपूर यांचेकडे मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे.(प्रत सलग्न)

४) रायगड जिल्हयील सर्व प्रमुख खनिज खाणपट्टाधारकांकडून भुपृष्ठ भाडे वसुल करण्यात आलेले आहे.

५) रायगड जिल्हयात सर्व प्रमुख खनिज खाणपट्टाधारकांची N-Code यांचेमार्फत तयार करण्यात आलेले ILMS प्रणालीवर नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच सदर प्रणालीच्या माध्यमातूनच खाणपट्टाधारकांना Online वाहतूक पासेस देण्यात येतात. रायगड जिल्हयात प्रमुख खनिज खाणपट्टाधारकांना Manual वाहतूक पासेस दिले जात नाही.

(अफेराज बेग)
जिल्हा खनिकर्म अधिकारी
रायगड-अलिबाग



महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय,रायगड अलिबाग (खनिकर्म शाखा)

दूरध्वनी क्र. ०२१४१-२२२११८/२२३२२२ फॅक्स क्र. ०२१४१-२२२०२५/२७४५१ e mail : raigaddmo003@gmail.com

जा.क्र.खशा/कात-१/जास्त उत्खनन/२०१८ दिनांक : १९/१०/२०१८

नोटीस

प्रति,

१) अलतगे स्टोन क्रशिंग इंडस्ट्रिज, वायोमिंग को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., ४ था मजला, फ्लॉट क्र.४,१२ अ, लिटिल गिब्स रोड, मालबार हिल्स, मुंबई ४०००० ६

२) भरतेश कन्स्ट्रक्शन कंपनी, ३४/३५,कॉर्पोरेशन कॉम्पलेक्स,गोवा वेस, हिंदवडी,बेळगांव ५९० ०११

३) श्री.मनोहर व्हेन्सीमल दर्यानानी,३/४,विवेकानंद सोसायटी,टी.आर.कटारीया मार्ग,माहिम,मुंबई १६

विषय :- पर्यावरण मंजूरीपेक्षा जास्त उत्खननाबाबत..

संदर्भ :- १) मा.संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचेकडील पत्र क्र. सांख्यिकी/पर्या/७७४/२/२०१३/२१७३ दिनांक ३१/०८/२०१८

२) मा.संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचेकडील पत्र क्र. सांख्यिकी/पर्या/७७८/२/२०१३/२४३३ दिनांक ११/१०/२०१८

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१४-१५ चा "महसूली क्षेत्रातील" अहवालात प्रमुख खनिज खाणपट्टा प्रकरणांत पर्यावरण नाहरकतीच्या विहीत मर्यादेपेक्षा अधिक उत्खननाबाबत परिच्छेद घेण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र राज्य विधीमंडळाच्या लोकलेखा समितीच्या दिनांक २९/०८/२०१८ रोजीच्या बैठकीत मा.अध्यक्ष व सदस्यांनी बॉक्साईट व लाईमस्टोन सह इतर खनिजांबाबत झालेल्या खाणकाम योजना व पर्यावरण नाहरकतीच्या मर्यादेच्या उल्लंघनाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

रिट याचिका (सिव्हील) क्र.११४/२०१४ व १९४/२०१४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०२/०८/२०१७ रोजीच्या आदेशात खाणकाम योजनेपेक्षा २० % अधिक खाणकाम तसेच पर्यावरण नाहरकत आदेशात नमूद उत्खननाच्या मर्यादेपेक्षा अधिक उत्खननास अवैध उत्खनन ठरवून त्याबाबत खनिपट्टाधारकांकडून नुकसान भरपाई म्हणून खनिजाचे मूल्य व स्वामित्वधन वसुल करावे असे निर्देश दिले आहेत.

